म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २९८९

# महाराष्ट्रातील महाविद्यालयीन

# विद्यार्थ्यांचे [illegible]

REFBK-0023906

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

20 FEB 1985

( कृ. मा. प. )
५०००-१२-८२

संदर्भ निबंध (शिक्षण विषयक)
२९८१
२३९०६
११।८।८३

# महाराष्ट्रातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रश्न

# महाराष्ट्रातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रश्न

**संपादक मंडळ**

कै. अ. भि. शाह
सुमन करंदीकर
वि. मा. कुलकर्णी
म. न. पलसाने
श्री. अ. पाटणकर

REFBK-0023906

**विद्यार्थी साहाय्यक समिती**

११८२/१/४, फर्ग्युसन महाविद्यालय रस्ता,
पुणे ४११ ००५

विद्यार्थी साहाय्यक समिती प्रकाशन

**महाराष्ट्रातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रश्न**

● पहिली आवृत्ती
२४ डिसेंबर १९८१

● मुखपृष्ठ
स्टुडिओ अस्करा

● मुद्रक
दिलीप माजगावकर
साप्ताहिक मुद्रण
१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

● प्रकाशक
विद्यार्थी साहाय्यक समिती
११८२/१/४, फर्ग्युसन महाविद्यालय रस्ता
पुणे ४११ ००५

● सर्व हक्क प्रकाशकाधीन

● किंमत
कापडी बांधणी : रु. ३०
कागदी बांधणी : रु. २५

## आणखी एक समाधान

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामास २५ वर्षे पूर्ण होत आहेत. १९५६ मध्ये चार विद्यार्थ्यांची राहाण्या-जेवण्याची सोय करण्यापासून समितीच्या कामास सुरुवात झाली. आज, १९८१ मध्ये, सुमारे ५०० विद्यार्थी, समितीने निर्माण केलेल्या सुविधांतून विविध प्रकारचे सहाय्य घेत आहेत. या पाव शतकाच्या काळात विद्यार्थ्यांस देण्यात येत असलेल्या सहाय्याचा विस्तार काहीसा वाढलेला आहे. अल्प दरात राहाण्या-जेवण्याच्या सोयीबरोबरच ग्रंथालय, आरोग्यरक्षण, अल्पकाळाचे काम व व्यक्तिमत्त्व विकासाप्रत शिक्षण, अशांचा अंतर्भाव समितीच्या कामामध्ये झालेला आहे. समितीचे सहाय्य हे महाविद्यालयीन शिक्षणार्थ पुण्यात येणाऱ्या, विशेषतः ग्रामीण भागातील, गरीब, गरजू व हुशार विद्यार्थी-विद्यार्थिनींना देण्यात येते.

या कामाच्या निमित्ताने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसंबंधी अनेक गोष्टी पहावयास मिळाल्या व अनुभवास आल्या. केवळ आर्थिक अडचणी व सुविधा-सोयींचा अभाव यातूनच विद्यार्थ्यांचे प्रश्न व अडचणी निर्माण होतात असे नव्हे तर, कौटुंबिक व सामाजिक परिस्थिती, महाविद्यालयीन अभ्यासक्रम व व्यवस्थापन, शिक्षणाची उद्दिष्टे व व्यक्तीची कर्तव्ये यासंबंधीची विद्यार्थ्यांची जाण, यातून अनेक महत्त्वाचे प्रश्न उद्‌भवतात. या प्रश्नांचा परिचय महाविद्यालयांशी संबंधित असलेल्या व्यक्तींप्रमाणेच, समाजात अन्य स्तरावर काम करणाऱ्या मंडळींनाही झाला आहे. समाजाची धुरा उद्या ज्यांना आपल्या खांद्यावर घ्यावयाची आहे त्या तरुण पिढीचे योग्य संगोपन व रूढ अभ्यासक्रमाबरोबर अन्य मार्गांनी शिक्षण कसे होईल याची चिंता अनेकांच्या अंतःकरणात आहे. यासंबंधीचा विचार व प्रयोग आपापल्या परीने अनेक संस्था आणि व्यक्ती करीत आहेत.

या विचारांचे व अनुभवांचे संकलन करावे आणि त्यातून समाजातील एका महत्त्वाच्या घटकासंबंधीच्या प्रश्नांचा अभ्यास करावा ही सूचना आमचे दिवंगत मित्र प्रा. अ. भि. शाह यांनी सप्टेंबर १९८० मध्ये केली. प्रा. शाह यांनी मांडलेली कल्पना एवढी आकर्षक वाटली की, ' महाराष्ट्रातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रश्न ' या मथळ्याचा व आशयाचा शोध-निबंध संग्रह, विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाच्या पाव शतकी वर्षानिमित्त प्रसिद्ध करण्याचे काही मित्रांनी ठरविले. त्याकरिता प्रा. शाह यांच्या नेतृत्वाखाली या पुस्तकाच्या संपादनाकरिता एक संपादक मंडळही ऑक्टोबर १९८० मध्ये सिद्ध झाले. या मित्रांच्या प्रयत्नांचे फळ शिक्षणप्रेमी जनतेसमोर सादर करण्यात, समितीत काम करणाऱ्या मंडळींना विशेष समाधान आहे.

दुर्दैवाची गोष्ट ही की, वरील प्रयत्न सुरू होऊन वर्ष होण्याच्या आतच दि. ११ ऑक्टोबर १९८१ ला, प्रा. शाह यांचे आकस्मिक देहावसान झाले व समिती एका जुन्या व निकटच्या

मित्रास अंतरली. त्यांच्या प्रेरणादायक स्मृतीस व महाराष्ट्राच्या शैक्षणिक प्रबोधनार्थ त्यांनी केलेल्या अखंड प्रयत्नांस, या संग्रहाच्या रूपाने आमची श्रद्धांजली आहे. संपादक मंडळाचे अन्य सदस्य, प्रा. म. न. पलसाने, श्री. वि. मा. कुलकर्णी, प्रा. श्री. अ. पाटणकर व प्रा. श्रीमती सुमन करंदीकर हे सर्व कित्येक वर्षांपासून समितीचे हितचिंतक आहेत.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रश्न हे समाजातील अन्य घटकांच्या प्रश्नांतून निर्माण झालेले आहेत. काही अंशी त्यांचे प्रातिनिधिक आहेत. या प्रश्नांचे स्वरूप, ग्रंथातील शोध-निबंधांच्या अधिकारी लेखकांनी जसे दाखवले आहे, त्याचप्रमाणे प्रश्नांची पार्श्वभूमी सांगणाऱ्या संपादकीय निवेदनातही दिसून येईल. या सर्व मंडळींचे ऋण मोठे आहे. विद्यार्थी-प्रश्नांच्या अभ्यासाची दिशा त्यांच्या प्रयत्नांतून दिसणार आहे. अधिक संशोधनास व लेखनास केवढा तरी वाव आहे, हेही ग्रंथातील लेखांवरून समजून येते. अशा प्रयत्नांचे वाहन म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीने व्हावे यात आम्हास धन्यता आहे.

**प्रताप गो. पवार**

अध्यक्ष, विश्वस्त मंडळ, विद्यार्थी साहाय्यक समिती

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८८८
दा. क्र. २३८०६
निबंध ग्रा/८३
शाखा (स्थळ प्रत)



**प्रा. अ. भि. शाह**
**( १९२०–१९८१ )**

प्रस्तुत संग्रहाच्या योजनेचा आरंभ दि. १२, ऑक्टोबर १९८० ला झाला. त्या दिवशी प्रा. अ. भि. शाह यांनी, योजनेच्या संदर्भात, महाविद्यालयीन क्षेत्राशी संबंधित व्यक्तींच्या एका बैठकीचे संचालन केले. संग्रहाची मूळ कल्पना त्यांचीच होती. या घटनेस वर्ष होते न होते तो शाहांनी आमचा निरोप घेतला. त्यांच्या प्रेरणेचे फळ पहावयास ते आज नाहीत ही विशेष दुर्दैवाची गोष्ट आहे.

प्रा. शाहांचे आकस्मिक निधन ही केवळ त्यांच्या निकटवर्तियांच्या वैयक्तिक दुःखाची गोष्ट नाही. त्यांची स्वतंत्र प्रतिभा, चतुरस्त्र बुद्धी आणि अखंड विद्यासाधना यांचे आकर्षण भारतातील व भारताबाहेरील त्यांच्या अनेक मित्रांना असे. हे बोलते-चालते विद्यापीठ या मित्रांना यापुढे उपलब्ध असणार नाही, ही खरी दुःखाची गोष्ट आहे. शाहांचे विचार व लेखन यामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली होती. ज्ञानाच्या जगात त्यांना मानाचे स्थान होते.

शाहांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण गुजराथेत झाले. महाविद्यालयीन शिक्षणानिमित्त ते मुंबई-पुण्यात आले व मराठी बनले. येथील महाविद्यालयात त्यांचे उच्च शिक्षण झाले; त्यानतर काही महाविद्यालयांत शाहांनी अध्यापन केले. मुंबईच्या दक्षिण भारतीय शिक्षणसंस्थेच्या महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी शाह काही काळ होते.

मात्र अध्यापन-प्रशासनात त्यांचे मन फार काळ रमले नाही. सामाजिक जाणिवेने त्यांच्या मूळच्या व्यवसायविषयावर विजय मिळवला व गणिताच्या अध्ययनातून समाजातील महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याकडे शाह वळले. 'सांस्कृतिक स्वातंत्र्य संघटना' या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या आशियाई भागातील संचालकपद शाहांनी स्वीकारले. त्या संघटनेचे मासिक मुखपत्र 'क्वेस्ट'च्या संपादनास त्यांनी सुरुवात केली. आणीबाणीच्या काळात 'क्वेस्ट' बंद झाल्यावर 'न्यू क्वेस्ट' व त्याचबरोबर 'सेक्युलॅरिस्ट' ही नियतकालिके शाहांनी चालू केली. इतर नियतकालिकांतूनही शाह नित्य लिहीत असत. विविध विषयांचा त्यांचा अभ्यास व लेखन असले तरी, उच्च शिक्षणावरील त्यांचे लेखन विशेष प्रभावी ठरले. 'महाराष्ट्रातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रश्न' या प्रकल्पाप्रमाणे, त्यांनी अनेक गटांना विविध अभ्यासक्रमांकरिता प्रेरणा दिली. शाह केवळ विचारात रमणारे व व्यवहारातील नित्याच्या धामधुमीपासून दूर राहाणारे विचारवंत नव्हते. स्वतःच्या विचारांबद्दल त्यांचा जसा ठामपणा असे, तसाच आपल्या विचारांचा पाठपुरावा करण्याचे धैर्य त्यांच्या अंगी होते.

शाहांचे बोलणे-चालणे सर्वांना सारखेच मधुर व प्रेरणादायी असे. त्यांच्या मनाची बैठक स्नेहपूर्ण, प्रामाणिक व मोकळी होती. गणिताच्या अध्ययनामुळे त्यांच्या शब्दांत नेटकेपणा व सरलता असे. त्यांचे स्नेही व सहकारी यांच्यामध्ये खालचा-वरचा असा फरक ते करीत नसत. त्यांचे मनमोकळे हास्य व स्वागत दुसऱ्याला काही काळातच आपलेसे करी. असे असले तरी विचाराचा व उच्चाराचा स्पष्टपणा त्यांनी कधी सोडला नाही. मतभिन्नता झाली तरी त्यांच्या वागण्यातील सहजता, आपला त्यांच्याबद्दलचा आदर वाढवीत असे. समाजाच्या तळागाळातील घटकांबद्दल त्यांना अपार सहानुभूती असे. त्याकरिता ते कृतिशील होते. याबाबत मात्र ते प्रसिद्धीपासून दूर राहिले होते.

कोणत्याही देशात, कोणत्याही काळात शाहांचे व्यक्तिमत्त्व विशेष गुणांनी मंडित म्हणून मानले गेले असते. त्यांच्यासारख्या व्यक्तींची निपज समाजात अल्प प्रमाणातच असते. त्यांची वाणी, लेखणी व आचरण या गोष्टी मानवसमाजाच्या खऱ्या हितास वाहिलेल्या होत्या. भारतीय समाजात अशा व्यक्तींची संख्या फार नसली तरी त्यांची परंपरा पुढील पिढ्यांना आदर्श असते.

■ ■

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२०८२
दा. क्र. २३९०६
निबंध/आवड
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)

# संपादकीय निवेदन

## संपादकमंडळाची दृष्टी, कार्यपद्धती व प्रयत्न

### १. प्रश्न

प्रश्नचिन्ह ज्याप्रमाणे प्रत्येक भाषेची अनिवार्य आवश्यकता आहे, त्याप्रमाणेच प्रश्न हे जीवनाची एक अनिवार्यताच समजावयाला हरकत नसावी. प्रश्न नसतील तर ... तर काय ? हा सुद्धा एक कठीण प्रश्न होऊन बसेल. म्हणजे, प्रश्न ही काही अनावश्यक बाब आहे आणि शेवटी, सर्व प्रश्नांची उत्तरे शोधून ते निकालात काढणे हे जीवनाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे, या कल्पना अवास्तव असून, त्या उगाचच मानवी मनावर प्रश्नांचे दडपण निर्माण करीत असतात. अभ्यासक्रम अवघड असला म्हणजे विद्यार्थ्यांसमोर प्रश्न निर्माण होतात. परीक्षेत जरा वेगळे प्रश्न विचारले म्हणजे विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया तीव्र होतात. तरीपण जरा जवळून पाहिले तर ध्यानात येते की, निरनिराळ्या विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया निरनिराळ्या असतात. म्हणजे, त्याच गोष्टी काही लोकांसाठी प्रश्न निर्माण करतात तर इतर लोकांसाठी त्या प्रश्न बनत नाहीत, आणि ज्यांच्यासाठी प्रश्न निर्माण होतात त्यांच्यातही सारखेपणा नसतो. प्रत्येकाचे प्रश्न वेगळे असतात, तेही कमी-अधिक प्रमाणात असतात, वैशिष्टयपूर्ण असतात. त्याचप्रमाणे प्रत्येकाच्या प्रतिक्रिया वेगवेगळ्या, वैशिष्टयपूर्ण आणि कमी-अधिक तीव्र असतात.

प्रश्नचिन्हांचे स्वरूप व्यक्तीनुसार अथवा गटानुसार भिन्न असते, याचे उत्तर वाटते तेवढे सरळ नाही. ऐतिहासिक, सांस्कृतिक, समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय, इत्यादी संदर्भात ते तपासावयास हवे. वेगवेगळ्या समाजात वेगवेगळे प्रश्न-प्रकार संभवतात. एखाद्या समाजाचे प्रश्न प्रामुख्याने आर्थिक असतील, तर दुसऱ्याचे मूल्यविषयक अथवा शैक्षणिक असू शकतील. वास्तव परिस्थितीच्या संदर्भात जसे निरनिराळे प्रश्न उद्‌भवतात तसेच मान्य मूल्यांच्या संदर्भातही त्यांची तीव्रता कमी-अधिक जाणवते. प्रश्नांची जाणीव, त्यांच्याकडे पाहाण्याची दृष्टी, या गोष्टी स्थळ-काळानुसार बदलतात. लेखणीतील शाई संपणे हा एक साधा प्रश्न. पत्र लिहिताना शाई संपली म्हणजे आपण सरळ उठून ती भरून घेतो अथवा पत्र ठेवून देतो. तेच, परीक्षेत उत्तरपत्रिका लिहिताना शाई संपली म्हणजे...

तात्पर्य, प्रश्न ही दिसते तितकी सरळ गोष्ट नाही. कोणत्याही दोन व्यक्तींचे प्रश्न सारखे नसतात. प्रत्येकजण आपापल्या परीने आणि पद्धतीने ते सोडविण्याचा प्रयत्न करीत असतो प्रश्न हे सतत उपस्थित होत असतात. त्यांना, वर लिहिल्याप्रमाणे, वेगवेगळे संदर्भ असतात. विद्यार्थी हा मोठ्या सामाजिक व्यवस्थेतील एक घटक आहे. समाजाचे जे निरनिराळे प्रश्न असतील, मर्यादा असतील, वेगळेपण असेल, त्यांचे प्रतिबिंब त्या व्यवस्थेतील सर्वच घटकांमध्ये

कमी-अधिक प्रमाणात पडलेले आढळते. शिक्षणसंस्था, शिक्षक, विद्यार्थी, हे सर्वच विशाल समाजव्यवस्थेतील परस्परानुवर्ती घटक आहेत. समाजातील मूल्यांचा, घडामोडींचा, परंपरांचा जसा त्यांच्यावर परिणाम होतो, तसाच प्रत्येकाचा दुसऱ्यावरही परिणाम होत असतो. म्हणजेच प्रश्न लहान असला तरी त्याचा संदर्भ मोठा असू शकतो.

दुसरा महत्त्वाचा संदर्भ मानसशास्त्रीय होय. प्रत्येक व्यक्तीच्या गरजा, आशा-आकांक्षा, व्यक्तित्व, इत्यादि गोष्टी वेगवेगळ्या असतात. व्यक्ती आपल्या सभोवतालच्या परिस्थितीशी संतुलन साधताना तिचा अर्थ लावत असते आणि उपस्थित होणारे प्रश्न सोडवीत असते. तो अर्थ आणि ते प्रश्न यांचे आकलन विशिष्ट व्यक्तीच्या गरजा, आशा-आकांक्षा, व्यक्तित्व, इत्यादींच्या संदर्भातच केले पाहिजे. ज्या कुटुंबात अथवा व्यक्तीत शैक्षणिक मूल्यांचा अभाव आहे, त्यांना निकृष्ट शिक्षण हे प्रश्नचिन्ह वाटणार नाही. ज्या प्रश्नांची सवय झालेली आहे त्यांची तीव्रता कमी जाणवते. ते सोडविण्यात सहजपणा असतो. त्या प्रश्नांचे मनावर दडपण नसते. प्रश्न सारखे असले तरी त्यांची जाणीव वेगळी, अनुभव वेगळा व उत्तर वेगळे आणि व्यक्तित्वानुसार हे सर्व वेगवेगळे.

प्रश्न हा एक अनुभव असतो. या दृष्टीने 'महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे प्रश्न' हा विषय एक अतिविशाल, कधी संपुष्टात न येणारा असा अनंत अनुभवसागर होईल. याचा अभ्यास करणे म्हणजे काय हे समजण्यासाठी थोडे तुलनात्मकदृष्ट्या बघता येईल. उदाहरणार्थ आपल्याला सागराचा अथवा सह्याद्रीचा अभ्यास करावयाचा आहे. नेहमी सागरतटावर फिरावयास जाणाऱ्यांना अथवा डोंगरशिखरांवर भटकंती करणाऱ्यांना काही निरीक्षणे सहज नोंदविता येतील. त्यांच्या पलीकडे तेथे प्रत्यक्ष राहणाऱ्यांना आणि तेथील गोष्टींचा, घटनांचा, घडामोडींचा अनुभव असणाऱ्यांनाही काही अधिक सांगता येईल. भूगोल, भूशास्त्र, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, मानववंशशास्त्र, हवामानशास्त्र, वगैरे अनेक शास्त्रे आपापल्यापरीने वरील गोष्टींचा अभ्यास करतात. या शास्त्रातील विद्यार्थी, शिक्षक आणि व्यावसायिक संशोधक, निरनिराळ्या स्तरांवर संशोधनकार्य करीत असतात. हे सर्व प्रयत्न जर एकत्र करून गुंफता आले तर त्यातून सागर आणि सह्याद्री यांची वास्तविक माहिती मिळू शकेल.

अर्थात् अशा प्रकारचे प्रयत्न फार कमी प्रमाणात झालेले आढळतात. आंशिक रूपाने काही बाबींवर मर्यादित दृष्टिकोनातून अभ्यास होत राहातात; परंतु समग्र प्रांत हाताळण्याचा प्रयत्न क्वचित होतो. विद्यार्थी-प्रश्नांची स्थिती अशीच आहे. या विषयाचा अभ्यास कोणत्या शास्त्राच्या अथवा शास्त्रांच्या कक्षेत येतो ? त्यांपैकी किती जणांनी विद्यार्थी-प्रश्नांच्या अभ्यासासाठी पद्धतशीर प्रयत्न केले आहेत ? आजवर झालेल्या या विषयाच्या मंथनात समुद्रावर फिरावयास म्हणून जाणाऱ्या लोकांसारख्यांचा वाटा किती ? यावरून झालेल्या अभ्यासाची खोली आणि व्याप्ती कितपत आहे, याच्या मर्यादा आपणास कळतील. एखाद्या अभ्यासाकडे शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहताना ही जाणीव असणे फार महत्त्वाचे आहे. अन्यथा, शब्दांच्या आणि भाषेच्या भाराने अनुभवांचा प्रवाह खंडित होऊ शकतो, थांबू शकतो किंवा भलतीकडे वाहू लागण्याची शक्यता असते. या सर्व मर्यादा लक्षात ठेवूनच प्रस्तुत अभ्यासाकडे पाहाण्याची आवश्यकता आहे. शब्दांच्या पलीकडे जाऊन प्रश्नांची आणि त्यांच्या संदर्भांची जाणीव निर्माण करण्याचा हा एक अल्पसा प्रयत्न आहे. हे संकलन एका अथवा थोड्याशा झरोक्यांसारखे आहे. त्यातून पलीकडे पहावयाचे आहे, झरोक्यांच्या मर्यादा ओळखून.

### २. विद्यार्थी-प्रश्नांचा अभ्यास कोणी करावा ?

विद्यार्थी साहाय्यक समिती गेली पंचवीस वर्षे सतत विद्यार्थ्यांच्या राहाण्या-जेवण्याच्या व इतर काही सोयी करीत आली आहे. विद्यार्थ्यांना जवळून पाहिल्यामुळे समितीच्या कार्यकर्त्यांना

विद्यार्थी-प्रश्नांची व्याप्ती राहाण्या-जेवण्याच्या प्रश्नांपेक्षा अधिक विस्तृत आहे हे लक्षात आले आणि या प्रश्नांचा अभ्यास मोठ्या प्रमाणावर करण्याचे त्यांनी ठरविले. या प्रयत्नात एकूण अनुभव काय आला याचा सविस्तर वृत्तांत प्रस्तुत निवेदनाच्या शेवटच्या भागात दिलेला आहे. या भागात असा अभ्यास करण्यासाठी काय तयारी असावी लागते याचे थोडे विवेचन करावयाचे आहे.

विद्यार्थी-प्रश्नांवर पुष्कळच लेखन झालेले आहे. प्रातिनिधिक संदर्भ या लेखसंग्रहाच्या शेवटी देण्यात आले आहेत; परंतु महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्राबाहेरील एकूण सर्वच साहित्यावरून नजर फिरवली तर असे वाटते की, या विषयाच्या बाबतीत अजून पुष्कळ करण्यासारखे आहे. मागील भागात लिहिल्याप्रमाणे, यातील बरेचसे लेखन मूलभूत प्रश्नांचा एक तर मागोवा घेत नाही अथवा त्याची सखोल चिकित्सा करीत नाही. गंभीर चिंतनाचा अभाव फार प्रकर्षाने जाणवतो. असे वाटते की, ज्यांचे हे प्रश्न आहेत त्या विद्यार्थ्यांनी तरी अथवा त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघटनांनी त्यांची दखल घ्यावी, त्यांवर सातत्याने लिहावे, ते सोडविण्यासाठी प्रयत्नशील रहावे व त्या प्रयत्नांची कोठे तरी नोंद व्हावी; परंतु असे काही झालेले फारसे आढळत नाही.

जी परिस्थिती विद्यार्थ्यांची आहे तीच शिक्षकांचीही आहे असे वाटते. रोज ज्यांच्याशी संबंध येतो, नव्हे, ज्यांच्याबरोबर आणि ज्यांच्यासाठीच काम करावयाचे आहे, त्या विद्यार्थ्यांच्या काही समस्या आहेत काय याची जाणीव शिक्षकांना, प्राचार्यांना आणि इतर संस्था-चालकांना योग्य प्रमाणात असल्याचे क्वचितच दिसते. ही स्थिती खरोखरच गंभीर आहे. विद्यार्थी-प्रश्न हा विषय कोणाचा ? याचा अभ्यास करण्याची जबाबदारी कोणाची ? हा अभ्यास करण्याचा अधिकार कोणाचा ? आणि याची तयारी कोणाची ?'

हा विषय सामाजिक शास्त्रांच्या कक्षेत येतो. तत्त्वतः शिक्षणाचे सर्वच प्रश्न सामाजिक शास्त्रांच्या कक्षेत येतात. शिक्षण ही एक सामाजिक शास्त्रांची सामायिक बाब आहे. निरनिराळ्या सामाजिक शास्त्रांतील अभ्यासक आणि शिक्षणशास्त्राचे अभ्यासक यांच्या कक्षेत हा विषय येतो. या क्षेत्रांतील संशोधकांची संशोधनपद्धतीविषयीची एकूण तयारी या विषयाच्या अभ्यासासाठी पुरेशी असते; परंतु निरनिराळ्या सामाजिक शास्त्रांची विषयव्याप्ती निरनिराळी असल्यामुळे, प्रत्येकाच्या काही मर्यादा असतात. उदाहरणार्थ मानसशास्त्रज्ञ व्यक्तिगत प्रश्नांचा सखोल अभ्यास करू शकतात तर अर्थशास्त्रज्ञ हे त्यांच्या आर्थिक बाजूकडे अधिक चिकित्सक दृष्टीने पाहू शकतात. याचा अर्थ असा होतो की, प्रश्नांच्या विविध बाजू तपासण्यासाठी वेगवेगळे विशेषज्ञ हवेत.

या बाबतीत आणखी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे; ती म्हणजे सर्वसामान्य विशेषज्ञांचा वा सामाजिक शास्त्रांच्या शिक्षकांचा शिक्षणशास्त्राशी परिचय. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षक आपल्या शिकवण्याच्या विषयांबरोबरच शिक्षणशास्त्राचाही अभ्यास करतात. त्यात शैक्षणिक तत्त्वज्ञान, शैक्षणिक मानसशास्त्र, शैक्षणिक समाजशात्र, शिक्षणपद्धती, अभ्यासक्रम, शैक्षणिक व्यवस्थापन आणि संघटन, वगैरे विषय येतात. हा त्यांच्या व्यावसायीकरणाचा भाग झाला. या प्रशिक्षणातून त्यांच्यामध्ये विद्यार्थ्यांकडे बघण्याची दृष्टी विकसित होते, किमान ती व्हावी अशी अपेक्षा असते. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात अशा प्रशिक्षणाचा अभाव असल्यामुळे शिक्षकांना त्यांच्या कार्याची कल्पना मर्यादित स्वरूपातच येते. अभ्यासक्रम कसा घडविला जातो, विद्यार्थ्यांचे मानसशास्त्र, शिक्षण प्रक्रिया, वगैरे विषय अभ्यासात न आल्याने, शिक्षण म्हणजे अभ्यासक्रमाबरहुकूम मान्य पाठ्यपुस्तक ठराविक वेळेत संपविणे असा शिक्षणाचा

ढोबळ अर्थ घेतला जातो. येथे या क्षेत्राची परिस्थिती मोठ्या प्रमाणातील धर्मक्षेत्रासारखी झालेली आहे. जाणिवेबाहेर गेलेल्या प्रेरणा, कर्मकांडाचे प्रस्थ, कारणमीमांसेचा लोप व यामुळे परंपरागत रूढीप्रमाणे कार्य करीत राहाणे, एवढेच शिक्षणाचे स्वरूप राहिलेले आढळते आणि त्यामुळे एकूण उच्च शिक्षणाचे अस्तित्वच खऱ्या अर्थाने धोक्यात आले आहे की काय असे वाटते. हा मुद्दा येथे मांडण्याचे कारण असे की, या परंपरेतील शिक्षक, मग तो सामाजिक शास्त्र-शाखांतील असो की विज्ञानशाखांतील असो, विद्यार्थ्याकडे सारख्याच दृष्टिकोनातून पाहतो आणि या दोघांनाही त्याच्याकडे 'विद्यार्थी' म्हणून क्वचितच पाहाता येते. जर ते साध्य झाले तर ते शिक्षकाची सामान्य बुद्धी, सामन्य ज्ञान आणि अनुभव यांचा परिपाक म्हणता येईल. यामुळे बऱ्याच वेळा या बाबतीत विज्ञानशाखेतील शिक्षक अधिक चिकित्सक आणि तीक्ष्ण दृष्टी असलेला आढळतो. शिक्षकांचे व्यावसायिक प्रशिक्षण पूर्ण वेळ नाही तर किमान सेवान्तर्गत तरी देता आले तर द्यावे. उच्च शिक्षणक्षेत्रातील निरनिराळ्या पदांवर काम करणाऱ्यांना त्याची नितांत आवश्यकता आहे हे प्रस्तुत अभ्यास-प्रकल्पाच्या अनुभवातून दिसून आले.

वरील चर्चेवरून असे दिसून येईल की, उच्च प्रशिक्षणाच्या क्षेत्रात विद्यार्थी-प्रश्नांचाच काय पण कोणत्याही शैक्षणिक बाबींचा अभ्यास करावयाचा झाला तर योग्य संशोधक मिळविणे दुरापास्त आहे. भारतातील काही विद्यापीठांतून उच्च शिक्षण या विषयात पदविका अथवा पदवी अभ्यासक्रम शिकविले जातात. या अभ्यासक्रमांतून प्रशिक्षित झालेले महाविद्यालयीन शिक्षक जेव्हा या विषयाच्या संशोधनाकडे वळतील तेव्हा काही प्रमाणभूत माहिती एकत्र करणे शक्य होईल. तोपर्यंत काही उत्साही लोकांच्या मदतीने जेवढे शक्य आहे तेवढे काम करणे आणि त्याच्या मर्यादा ओळखून निष्कर्ष काढणे क्रमप्राप्त आहे. समाजकार्याच्या क्षेत्रात ज्याप्रमाणे स्वयं-सेवी कार्यकर्ते आणि संघटना आपापल्याला परीने कार्य करतात, त्याचप्रमाणे उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात असाच हा एक स्वयंसेवी कार्यकर्त्यांचा प्रयत्न आहे. या अभ्यासाच्या मागे प्रशिक्षणाच्या मर्यादा असल्या तरी प्रेरणांचे बळ मात्र खूप आहे. शास्त्रीयदृष्टचा या गोष्टीचे फायदे आहेत तसेच तोटेही आहेत. प्रबळ प्रेरणेमुळेच विद्यार्थी-प्रश्नांसारख्या जटिल क्षेत्रात शिरून, निर-निराळ्या लोकांकडून माहिती एकत्र करून शोध-निबंध लिहिले गेले; परंतु प्रेरणा अधिक प्रबळ असल्यास बऱ्याच वेळा संशोधनातील आवश्यक अशी वास्तवदृष्टी टिकवून ठेवणे अवघड जाते. हेही तितकेच खरे.

वरील सर्व चर्चेचा अर्थ एवढाच की अनेक लोकांनी विद्यार्थी-प्रश्नांच्या अभ्यासाचे महत्त्व समजून या विषयात रस घेतला आणि शक्य ते संशोधन-लेखन करण्याचे धाडस केले आहे. त्यांच्या नेहमीच्या संशोधनाचा हा विषय नाही. संशोधनपद्धती आणि संशोधनकार्याचे निकष पूर्णांशाने या शोध-निबंधांना लावणे शक्य नाही, हे लक्षात ठेवून या निबंधांतील मुद्द्यांचा व माहितीचा अर्थ लावावा लागेल आणि वर लिहिल्याप्रमाणे, झरोके उघडण्याचे कार्य या संकलना-तील शोध-निबंधकारांनी केले आहे. त्यातून विद्यार्थी-विश्व पाहाण्याचे काम उच्च शिक्षणाशी संबंधित लोकांना प्रयत्नपूर्वक करावे लागेल.

### ३. अभ्यासाची रूपरेषा आणि शोध-निबंधांचे स्वरूप

उच्च शिक्षणक्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींच्या मदतीने निरनिराळ्या प्रश्नांचा अभ्यास करण्याची योजना प्रस्तुत संग्रहाच्या निमित्ताने आखण्यात आली. याकरिता अनेक मंडळींशी संपर्क साधून लेखकांच्या आवडी आणि सोयींप्रमाणे विषयांची विभागणी करण्यात आली. अभ्यासविषयांची यादी संपादकमंडळाने प्रथम तयार केली. ऑक्टोबर १९८० मध्ये त्या संदर्भात घेण्यात आलेल्या चर्चासत्रात या यादीमध्ये काही विषयांची भर पडली. तज्ज्ञ संशोधकांची मदत घेऊन खालील विषयांवर व त्यांच्या पोटविभागांवर शोध-निबंध लिहिले जावेत असे ठरविले.

## शोध–निबंधांचे विषय

१. विद्यार्थी-प्रश्नांविषयी आतापर्यंत झालेले संशोधन व लेखन
२. विद्यार्थी-प्रश्नांची जाणीव : अ) विद्यार्थ्यांमध्ये, आ) पालकांमध्ये, इ) शिक्षकांमध्ये, ई) संस्था-चालकांमध्ये.
३. कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचे प्रश्न
४. वरिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचे प्रश्न
५. पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे प्रश्न
६. व्यावसायिक अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांचे प्रश्न : शेतकी, अभियांत्रिकी, वैद्यकीय, वाणिज्य व अध्यापन
७. मुलींचे प्रश्न
८. मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रश्न
९. आदिवासी विद्यार्थ्यांचे प्रश्न
१०. ग्रामीण विद्यार्थ्यांचे प्रश्न : अ) ग्रामीण व आ) शहरी महाविद्यालयांतील
११. अपंग विद्यार्थ्यांचे प्रश्न
१२. वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे प्रश्न
१३. नोकरी करून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रश्न
१४. बहि:स्थ विद्यार्थ्यांचे प्रश्न
१५. महाविद्यालयीन शिक्षणाची उद्दिष्टे
१६. अभ्यासक्रमांचे विश्लेषण
१७. गुणवत्ता आणि निकष
१८. शिकण्यातील अडचणी
१९. नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रश्न
२०. महाविद्यालयीन जीवन म्हणजे आहे तरी काय ?
२१. अभ्यासक्रमांबाहेर काय करायला आवडेल ?
२२. विद्यार्थ्यांचे ग्रंथालयविषयक प्रश्न
२३. प्रशासकीय व्यवहारातील अडचणी
२४. विद्यार्थी-प्रश्न आणि विद्यार्थी-संघटना
२५. विद्यार्थी-प्रश्न आणि विद्यार्थी-आंदोलने
२६. विद्यार्थी आणि राजकारण
२७. विद्यार्थ्यांचा सामाजिक सहभाग
२८. विद्यार्थी-शिक्षक संबंध
२९. विद्यार्थी-पालक संबंध
३०. विद्यार्थ्यांचे मानसिक प्रश्न
३१. विद्यापीठे व राज्यशासनाच्या विद्यार्थी-कल्याण योजना

यापैकी काही विषयांवर संशोधन करून निबंध लिहिले गेले, तर काही महत्त्वाचे विषय राहून गेले, उदाहरणार्थ आदिवासी विद्यार्थ्यांचे प्रश्न, गुणवत्तेचे निकष, इत्यादि.

शोध निबंध हा शब्द जाणीवपूर्वक वापरला आहे. शोधप्रवृत्ती हा निबंधाचा आवश्यक भाग आहे. संशोधकाने हाती घेतलेल्या विषयासंबंधी कोणते प्रश्न विद्यार्थ्यांपुढे उभे राहातात, त्यांचे वास्तव स्वरूप काय आहे, ते कसे उद्भवतात, त्यांचे परिणाम कसे आणि कोणते असतात, त्यांच्यावर उपाय काय, इत्यादि गोष्टी प्रत्यक्ष माहिती गोळा करून तिच्या आधारे लिहावयाचे होते. त्याप्रमाणे प्रत्येक संशोधकाने विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष भेटीत अथवा प्रश्नावलीद्वारा, तसेच शिक्षक, प्राचार्य, पालक, संस्था-चालक, इतर विचारवंत आणि समाजकार्यात रस असलेल्या तज्ज्ञांकडून माहिती मिळवावयाची होती. निव्वळ आकडेवारीवर भर न देता, प्रश्नांचा चिकित्सकरीत्या शोध घेऊन व सर्व अंगांनी त्यांचे विश्लेषण करून त्यांची कार्य-कारणपरंपरा काळजीपूर्वकपणे जाणून घेण्याचा प्रयत्न करावयाचा होता. प्रश्नांच्या बाबतीत सर्वांचे दृष्टिकोन एकत्रित करणे महत्त्वाचे होते. आजवर झालेल्या लेखनाचा आणि संशोधनाचा मागोवाही प्रत्येक संशोधकाने घ्यावयाचा होता. शास्त्रीय संशोधनपद्धतीचा काटेकोर उपयोग करण्यात यावा अशी फारशी अपेक्षा शोध-निबंधकाराकडून नव्हती. त्यामुळे प्रश्नावली, प्रतिसादकांची संख्या अथवा आकडेशास्त्रीय विश्लेषण याकडे दुर्लक्ष केले नसले तरी फार आग्रहाने लक्ष दिलेले नाही. प्रत्यक्ष चर्चा, निरीक्षण, इतरांचे आणि स्वत:चे अनुभव आणि चिंतन, झालेल्या लेखन आणि संशोधनाचे परिशीलन करून शोध-निबंध लिहिले जावेत अशी अपेक्षा होती. त्याप्रमाणे सर्वांनी शक्य तेवढा प्रयत्न करून मर्यादित वेळात हाती घेतलेल्या विषयांसंबंधी जास्तीत जास्त माहिती जमविण्याचा आणि विचार करण्याचा प्रयत्न केला आहे.

शोधनिबंधकारांशी अनेक वेळा त्यांच्या विषयाची आणि कार्याची चर्चा केली गेली, नमुन्यादाखल एका अभ्यासाची रूपरेषा तयार करण्यात आली आणि ती प्रत्येक निबंधकारास देण्यात आली. तीमध्ये शोधनिबंध-विषयाच्या संदर्भात करावयाच्या गोष्टी म्हणजे अभ्यासविषय, अभ्यासाचे उद्देश, अभ्यासाची व्याप्ती आणि मर्यादा, अभ्यासपद्धती, कार्य-काल-नियोजन, इत्यादी गोष्टी उदाहरणाद्वारे स्पष्ट करण्यात आल्या. शोधनिबंध लिहिण्यासाठी एक ढोबळ आकृतिबंध सूचनेखातर प्रत्येकाकडे पाठविला होता. त्यानुसार बहुतेक शोध-निबंध लिहिले गेले आहेत हे वाचकांच्या निदर्शनास येईल.

निबंध लिहिण्याची जबाबदारी प्रामुख्याने एका व्यक्तीकडे सोपविली होती. काही प्रसंगी इतरांनी टिपणे लिहिली, त्यातील काही टिपणे छापलेली आहेत. काहींचा उपयोग लेखकांनी आपल्या निबंधात केलेला आहे. प्रत्येक निबंध ही एक चर्चा आहे. नव्हे, चर्चेची सुरुवात आहे. लेखकांप्रमाणे वाचकांनीही हे चिंतन पुढे चालू ठेवावे आणि ही चर्चा पुढेही चालू राहावी असे संपादक मंडळास वाटते.

### ४. उच्च शिक्षणाचा विकास आणि विद्यार्थी-प्रश्न

विद्यार्थी-प्रश्न समजून घेण्याच्या दृष्टीने उच्च शिक्षणाची आपल्या देशातील वाटचाल पाहाणे महत्त्वाचे आहे. अर्थातच ते येथे थोडक्यातच पाहावे लागेल. १८५७ मध्ये भारतातील पहिली विद्यापीठे कलकत्ता, मुंबई आणि मद्रास येथे स्थापन झाली. त्यानंतरच्या नव्वद वर्षांच्या कालखंडात म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीच्या वर्षापर्यंत, एकूण विद्यापीठांची संख्या एकोणीस झाली. या विद्यापीठांमार्फत दिल्या जाणाऱ्या उच्च शिक्षणाचे ठळक गुणविशेष पुढीलप्रमाणे थोडक्यात मांडता येतील :

१. उच्च शिक्षणाचा प्रमुख हेतू प्रशासनास मदत करणारे मनुष्यबळ निर्माण करणे हा होता. याच्या जोडीला पाश्चात्य संस्कृतीचा प्रसार करणे हाही दुसरा हेतू होता.

२. सरकार चालविण्यास लागणारे प्रशासक व काही प्रमाणात अगदी प्रमुख असे व्यावसायिक निर्माण होतील असे अभ्यासक्रम शिकविले जात होते.

३. पदवीपर्यंतचे शिक्षण प्रामुख्याने विद्यापीठांशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयांमार्फत दिले जाई. त्यामुळे बहुतांश विद्यार्थ्यांचा विद्यापीठाशी संबंध क्वचितच येत असे.

४. पदव्युत्तर शिक्षणक्रमांपैकी काही महाविद्यालयातून तर काही विद्यापीठाच्या विद्याशाखा आणि विभाग यांच्यामार्फत चालविले जात.

५. अध्यापन आणि परीक्षा ही दोन कार्ये दोन स्वतंत्र घटकांमार्फत पार पाडली जात. महाविद्यालये अध्यापनाची व्यवस्था करीत आणि विद्यापीठे परीक्षा घेत.

६. अभ्यासक्रम बहुतांशी पुस्तकी आणि सैद्धांतिक स्वरूपाचे असत. प्रत्यक्ष व्यवहारात शिकविलेल्या ज्ञानाचे उपयोजन करण्याकडे दुर्लक्ष होत असे.

७. विद्यार्थी-कल्याण अथवा अभ्यासेतर प्रवृत्ती यासाठींच्या योजना अगदी अपुऱ्या असत.

८. विविध परीक्षांमध्ये अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण मोठे असे आणि त्यामुळे होणारा उच्च शिक्षणक्षेत्रातील अपव्यय ही रूढ बाब होती.

९. प्राध्यापकांनी संशोधनाकडे लक्ष देणे फारसे अपेक्षित नव्हते. जे थोडे संशोधन करीत ते शास्त्र आणि वाङ्मयशाखांतील असत. उपयोजित स्वरूपाचे संशोधन क्वचित होत असे.

१०. व्याख्यान ही अध्यापनाची मुख्य आणि रूढ पद्धती होती.

या पार्श्वभूमीच्या संदर्भात पाहिले म्हणजे आजच्या उच्चशिक्षणव्यवस्थेतील दोष समजण्यास मदत होते. याबरोबर काही फायदेही झाले हे लक्षात घ्यावयास हवे. तात्त्विक स्वरूपाच्या अभ्यासक्रमातून उदारमतवादी विचारसरणीचा प्रसार, त्याबरोबरच पसरलेली राष्ट्रीय भावना;

राष्ट्रासाठी त्याग करण्यासाठी निर्माण झालेली कार्यकर्त्यांची एकसंध फळी, इंग्रजी भाषा माध्यम म्हणून वापरल्यामुळे घडलेले भाषिक आणि भावनिक ऐक्य, इंग्रजी भाषेमुळे उपलब्ध झालेले जगातील उच्च दर्जाचे साहित्य आणि आधुनिक विज्ञान, या आणि अशा काही गोष्टीही त्या काळच्या उच्च शिक्षणाची जमेची बाजू म्हणावी लागेल. ब्रिटिश साम्राज्यातील इतर देशांच्या तुलनेत भारताने केलेली प्रगती आणि त्याचे जगातील आजचे मानाचे स्थान याच शिक्षणपद्धतीमुळे शक्य झाले असे म्हणता येईल.

पारतंत्र्याच्या काळात वाढत गेलेली उच्च शिक्षणपद्धती स्वातंत्र्यकाळात अकार्यक्षम ठरून त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले. हे समजण्यासाठी थोडे आणखी खोलात शिरणे आवश्यक आहे. पूर्वी विद्यापीठांनी परीक्षा घेणे आणि पदवी देणे एवढ्यापुरतेच आपले कार्य मर्यादित ठेवले. पदवीचा लेखी परीक्षेशी अनिवार्य संबंध जोडला गेला; त्यामुळे ज्ञानाची कसोटी स्मरण-शक्तीशी निगडित राहिली. पदवीधरांची ज्ञानोपासना म्हणजे केवळ माहिती गोळा करणे इतका संकुचित अर्थ उच्च शिक्षणास प्राप्त झाला. समाजाच्या गरजा, समस्या आणि त्या सोडविण्यासाठी मिळवावयाचे ज्ञान, विचारपद्धती व कौशल्ये, या महत्त्वाच्या गोष्टींचे भान सुटले. त्यामुळे समाजाला उपयुक्त अशा नागरिकत्व, नेतृत्व आणि अनुयायित्व या गोष्टींचा अभाव, उच्च-शिक्षणाचा प्रसार होऊनही कायम राहिला. उच्च शिक्षण घेतलेले बहुतांश लोक समाजाच्या निकट येण्याऐवजी त्यापासून दूर गेले. समाजाची पुनर्रचना करण्याचे बाबतीत विद्यापीठे पुढाकार घेऊ शकली नाहीत. ही अक्षमता त्यांनी उच्च शिक्षणाची उद्दिष्टे, कार्यपद्धती, विद्यार्थी-वर्गाच्या आकांक्षा, याकडे दुर्लक्ष केल्यामुळे निर्माण झाली असे म्हणता येईल.

भारताने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकशाही जीवनपद्धती स्वीकारली. समाजवादी समाजरचना स्वीकारली. या दोन्हींमुळे समाजजीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात नवी जीवनप्रणाली आणि कार्यपद्धती समजून वागणारे नेतृत्व यांची तीव्रतेने गरज भासू लागली. एका सनातन जीवनपद्धतीवर नव्या जाणिवा, नव्या सवयी, लावून घेण्याची प्रचंड जबाबदारी येऊन पडली. समाजातील विचारवंत, पुढारी, राज्यकर्ते, यांच्या मते ही जबाबदारी पेलण्यासाठी उच्च शिक्षणातून आवश्यक असे मनुष्यबळ निर्माण व्हावे असे होते. राष्ट्रजीवन निरनिराळ्या बाबतीत सामर्थ्यसंपन्न करण्याची जबाबदारी विद्यापीठांनी उचलावी असे त्यांना वाटले. यासाठी उच्च शिक्षणव्यवस्थेत सुधारणा सुचविण्यासाठी डॉ. एस. राधाकृष्णन् यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमण्यात आला (१९४८). अपेक्षेनुसार राधाकृष्णन आयोगाने संपूर्ण उच्च शिक्षणाचा तपशीलवार विचार केला आणि अनेक बदल सुचविले. हे बदल त्या वेळी दिसून आलेल्या दोषांवर उपाय म्हणून सुचविले होते. त्यामध्ये नवीन विद्यापीठांची स्थापना, ग्रामीण विद्यापीठे, विद्यापीठांना मदत करण्यासाठी यंत्रणा, अध्यापन, परीक्षा, इत्यादी अनेक महत्त्वाच्या बाबींचा समावेश होता. आयोगाच्या सूचनांचे सर्वत्र स्वागत झाले. त्यांपैकी काही अंमलातही आणल्या गेल्या; परंतु तदनंतरच्या ३०-३२ वर्षांच्या काळात एकूण शिक्षणाचा आणि उच्च शिक्षणाचा प्रसार इतका झपाट्याने झाला की, मूळच्या अडचणी कमी होण्याऐवजी अधिक गुंतागुंतीच्या झाल्या. अनेक नवीन प्रश्न निर्माण झाले. कधी शिक्षणाचा स्पर्श झाला नाही अशा वर्गांतून, स्तरांतून, ग्रामीण आणि आदिवासी भागांतून, विद्यार्थी उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात आले. सार्वत्रिक शिक्षण आणि लोकशाही समाज-वादाच्या उद्दिष्टांच्या संदर्भात हे अपेक्षितच होते.

विविध भागांतून आणि गटांतून विद्यार्थी येऊ लागल्याने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील एकजिनसीपणा संपुष्टात आला. शिक्षणप्रक्रियेत या गोष्टीला फार महत्त्व आहे. कारण एकूण शिक्षणाच्या नियोजनात ही बाब पायाभूत समजली जाते. अभ्यासक्रम, अध्ययन-अध्यापनपद्धती, परीक्षाधोरणे, इत्यादी अनेक बाबींमधील गुंतागुंत विद्यार्थ्यांमधील तफावतीमुळे वाढते.

स्वातंत्र्यपूर्व काळातील महाविद्यालयीन शिक्षणाचा स्तर आणि स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षणाचा स्तर यामध्ये अनेक दृष्टीने अंतर आहे. हे अंतर विद्यार्थीगटांमध्ये, महाविद्यालयांमध्ये, आणि शिक्षकवर्गामध्येसुद्धा स्पष्टपणे जाणवते. ही स्थिती बरी किंवा वाईट या दृष्टीने बघण्याची नसून, ती जाणिवेप्रत आणून तिच्यावर पद्धतशीर उपाययोजना करावी लागते. आपल्याकडे प्रामुख्याने ही वस्तुस्थिती नाकारण्याकडे अधिक कल दिसून येत असल्याने, तिच्यात सुधारणा होण्याची शक्यता कमी.

स्वातंत्र्योत्तर काळात प्रादेशिक भाषा या उच्च शिक्षणाचे माध्यम म्हणून वापरल्याने चांगल्या क्रमिक आणि संदर्भग्रंथांची वाण साहजिकच भासू लागली. जेथे इंग्रजीत एका विषयशाखेत एखाद्या स्तरावरील अभ्यासक्रमासाठी ५०–६० प्रमाणित ग्रंथ (४०० ते ६०० पृष्ठसंख्या असलेले) आणि जोडीला इतर संदर्भसाहित्य उपलब्ध असते, तेथे प्रादेशिक भाषेत मात्र जेमतेम १००–१५० पानांचे, प्रश्नमंजूषेवर आधारित, एक गाईडवजा पुस्तक आढळते. अनेक महाविद्यालयांतून शिक्षकसुद्धा या मर्यादेच्या बाहेर जात असलेले दिसत नाहीत. वर्गात तेवढेच उतरून देणे (dictation) अतिशय रूढ झाले आहे. भारतीय पार्श्वभूमीचा संदर्भ घेऊन लिखाण करणे अथवा शिकविणे अजूनही अगदी तुरळक आहे. त्यामुळे समाजाच्या आकांक्षा आणि समस्यांपर्यंत आपले उच्च शिक्षण केव्हा पोचेल हे सांगणे कठीणच.

उच्च शिक्षणाचा प्रसार करताना नवीन संस्था किमान तालुक्याच्या गावापर्यंत जाऊन पोचल्या. त्यातल्या त्यात कमी खर्चाचे म्हणून कला आणि वाणिज्य शिक्षणाच्या संस्था अधिक निघाल्या. हे स्वस्त शिक्षण वस्तुतः अधिक महागडे आहे. नको ती मनुष्यबळनिर्मिती आणि बेकारीत वाढ होते आणि किफायतीवर भर दिल्याने या विद्याशाखांमध्ये दर्जेदार शिक्षणाचा अभाव खटकतो

वर नमूद केल्या तशा अनेक समस्यांमुळे उच्चशिक्षणाची परिस्थिती अगदी गोंधळल्यासारखी झाली आहे. गुणवत्ता आणि संख्या यांचा तोल कसा राखायचा हा यक्षप्रश्न आहे. राष्ट्रीय विकासासाठी आवश्यक असे दर्जेदार मनुष्यबळ निर्माण करणे साधावयाचे असेल तर राष्ट्रीय समस्यांना सामोरे जाणारे शैक्षणिक वातावरण संस्थांमधून निर्माण होणे आवश्यक वाटते. जुनी उद्दिष्टे, जुने अभ्यासक्रम, जुन्या अध्ययन-अध्यापनपद्धती, जुन्या काळबाह्य परंपरा, टाकून देऊन एकूण सर्व कार्यक्रमाची नवीन मांडणी करणे, विद्यापीठे आणि महाविद्यालये यांची पुनर्रचना करणे आणि यासाठी संबंधित शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि शैक्षणिक पदाधिकारी या साऱ्यांच्या दृष्टिकोनात मूलगामी बदल घडवून आणणे, अत्यावश्यक वाटते. वरील गोष्टींची जाणीव आणि भरपूर असमाधान असूनही नवीन प्रयोग होत नाहीत. या गोष्टीमुळेच उच्च शिक्षणाचे क्षेत्र अधिक चिंताजनक वाटते.

या संदर्भात थोडेसे विस्तृत जागतिक पातळीवर युवक आणि महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्याकडे बघणे सोयीचे होईल. मागील शतकातील औद्योगीकरण आणि या शतकातील दोन महायुद्धे यांनी जुन्या जीवनपद्धतींना व मूल्यांना बरेच हादरे दिलेत. संपर्क माध्यमांची प्रगती, वैद्यकीय शास्त्रातील प्रगती, संहारक शस्त्रांची वाढती शक्ती, यामुळे जग जवळ आल्यासारखे वाटू लागले. अनेक राष्ट्रे दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झाली आहेत. विकसित राष्ट्रांच्या जोडीला जाऊन उभे राहण्याची धडपड, नवीन लोकशाही मूल्यांची घडण, सामाजिक पुनर्रचना, इत्यादी गोष्टी करीत असताना निर्माण होणारे असंख्य ताण सांभाळत ती वाटचाल करू लागली. संपर्क माध्यमांमुळे विकसित राष्ट्रांतील नवीन गोष्टी इतरांना लगेचच कळू लागल्या; परंतु जुन्या व्यवस्थेत बाहेरून आणलेल्या नवीन गोष्टी सहजासहजी रुजत नाहीत असा समाजव्यवस्थेतील अनुभव आहे. शिक्षणव्यवस्था हा मोठ्या समाजव्यवस्थेचा एक भाग असल्यामुळे हे ताण या व्यवस्थेतही आढळून येतात आणि तरुण विद्यार्थीवर्ग एकीकडे परंपरागत गोष्टी आणि दुसरी-

कडे नव्या जगातून आयात होत असलेल्या कल्पनांच्या कैचीत सापडला. विकसित अशा पाश्चिमात्य देशांतही महायुद्धामुळे अनेक स्थित्यंतरे झाली आणि तरुणांच्या शिक्षणावर आणि जीवनपद्धतीवर परिणाम करून गेली. एकदा घेतलेले शिक्षण लवकरच कालबाह्य होते आणि आज अस्तित्वात असलेले व्यवसाय उद्या राहतीलच याची शाश्वती नसल्याने पुन:पुन: शिक्षण घेत राहणे आणि व्यावसायिक पुर्ननियोजन हे पाश्चिमात्य गतिमानतेचे मानबिंदू आहेत. आपल्याकडे अजूनही तशी परिस्थिती नाही; परंतु शिक्षणानंतरच्या अनिश्चिततेमुळे अनास्था उत्पन्न झाली असून तीतून बरेच नवीन प्रश्न निर्माण होताना दिसताहेत.

विकसित देशांतील विद्यार्थी-असंतोषाचे चित्र १९६८ मध्ये काही तज्ज्ञ मंडळींनी रेखाटले. त्यावरून खालील गोष्टी प्रामुख्याने दिसून येतात :

१. हजारो विद्यार्थ्यांच्या एकत्रित समुदायाला विद्यापीठ स्तरावर संघटित करून त्यांना अध्यापन वगैरेसाठी नियंत्रित करणे विद्यापीठांना अवघड जाते.

२. काही ठिकाणी विद्यापीठांचा सनातन दृष्टिकोन विद्यार्थ्यांना मान्य नाही. विद्यापीठांनी तात्त्विक अभ्यासक्रमापेक्षा जीवनक्रमाशी आणि व्यवसायाशी निगडित असे व्यावहारिक शिक्षण द्यावे असे त्यांना वाटते.

३. विद्यार्थ्यांच्या असंतोषात काही वेळा प्राध्यापक सहभागी होताना दिसतात, तर काही वेळा ते या असंतोषाला तोंड फोडायला उद्युक्त करणारे घटक ठरतात. प्रसिद्ध तत्त्वचिंतक जाँ पॉल सार्त्र हे याचे उदाहरण होय.

४. राष्ट्राची आर्थिक परिस्थिती खालावली की, बेकारी वाढते व त्या बेकारीचा फायदा राजकारणातील गट करून घेण्याची शक्यता असते. १९६८ मधील फ्रान्समधील विद्यार्थ्यांच्या असंतोषाची परिस्थिती आणि सांप्रत आसाममधील परिस्थिती यात या बाबतीत साम्य आहे.

५. शिक्षणाच्या प्रसाराबरोबर शिक्षकसंख्या वाढविताना त्यांच्या गुणवत्तेच्या बाबतीत तडजोड केली जाते. यामुळे शिक्षकांचा प्रभाव कमी होतो आणि त्यांचे संबंधही दुरावतात.

६. वाढत्या विद्यार्थीसंख्येमुळे चांगले शिक्षकही विद्यार्थ्यांशी सलोख्याचे संबंध निर्माण करण्यासाठी सवड काढू शकत नाहीत.

७. सर्वसामान्यपणे शिक्षकवर्गाबद्दल विद्यार्थ्यांच्या आदराला ओहोटी लागलेली दिसते. खरा विद्वान प्राध्यापक आणि कमी व्यासंगी प्राध्यापक यांच्यात विद्यार्थी सहज भेद करू शकतात.

वरील निष्कर्ष एकूण जागतिक परिस्थितीच्या संदर्भात काढलेले असले तरी ते भारतीय परिस्थितीशीही सुसंबद्ध आहेत असे दिसते. म्हणजे विद्यार्थ्यांचे प्रश्न हे जागतिक स्तरावर, राष्ट्रीय स्तरावर आणि महाराष्ट्रात परिस्थितिसापेक्षतेच्या मर्यादेत फारसे वेगळे असण्याची शक्यता नाही. तसेच महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे प्रश्न समजून घेताना तुलनात्मक दृष्टीने आणि संदर्भासाठी जागतिक आणि अखिल भारतीय परिस्थितीकडे पाहणे उद्बोधक ठरेल. भारतातील निरनिराळ्या राज्यांतील उच्च शिक्षणक्षेत्रातील परिस्थिती फारशी भिन्न नाही. तिची ठळक वैशिष्टये खाली नमूद केली आहेत.

१. भारतीय विद्यापीठे ही पाश्चिमात्य, विशेषत: ब्रिटिश विद्यापीठांची प्रतिकृती आहेत आणि त्यांची उद्दिष्टे आणि कार्यवाही यांचा राष्ट्राच्या गरजांशी व विद्यार्थ्यांच्या आकाक्षांशी संबंध आहे असे दिसत नाही. ही तफावत गंभीर स्वरूपाची असूनही तिचे महत्त्व अजून संबंधितांना उमजलेले नाही.

२. संलग्न महाविद्यालये असलेल्या विद्यापीठांचे प्रश्न दिवसेंदिवस अधिक बिकट होत चालले आहेत. कमी गुणवत्ता असलेल्या महाविद्यालयांची संख्या वाढत आहे. विद्यापीठ कायद्यात आवश्यक सुधारणा झाल्याशिवाय गुणवत्तेचा पैलू जोपासला जाणार नाही.

३. उच्च शिक्षणाची उद्दिष्टे नव्याने आणि स्पष्टपणे मांडण्याची जरुरी आहे. त्यासाठी व्यक्तिगत, आर्थिक आणि सामाजिक विकास साधण्यासाठी काय करावयास हवे याचे स्पष्ट उच्चारण हवे. अजून असा विचार झालेला दिसत नाही.

४. विद्यापीठे ही राष्ट्राची विवेक बुद्धी आहे आणि कोठारी आयोगाने म्हटल्याप्रमाणे त्यांचे काम समाजाला काय हवे ते देणे हे नसून, समाजाला कशाची गरज आहे ते ठरवून देणे हे आहे.

५. प्राध्यापकांनी अध्यापन आणि संशोधन याद्वारे बौद्धिक प्रक्रिया समृद्ध करावयाची आहे. तसेच शैक्षणिक कार्यातील एकांगीपणा टाकून देऊन सामाजिक विकासाच्या प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी व्हावयाचे आहे. यातच त्यांच्या ज्ञानाची कसोटी आहे; परंतु त्यासाठी कोणी तयार आहे असे दिसत नाही.

६. एकूण शैक्षणिक कार्यक्रम आणि त्यातील अभ्यासक्रम हे मोठ्या प्रमाणात कालबाह्य झाले असून ते सर्व गरजांनुसार नवीनपणे मांडणे आवश्यक आहे.

७. शिक्षकांचे सातत्याने प्रबोधन आणि त्यांच्या प्रयोगशीलतेला प्रोत्साहन याद्वारे शैक्षणिक प्रगती साधता येईल.

८. विद्यापीठे आणि महाविद्यालये यातील हितसंबंधीयांचे राजकारण संपविले नाही तर शिक्षकांना मुक्तपणे काम करता येणार नाही. संस्थांतर्गत राजकारण हे शैक्षणिक गुणवत्ता कमी होण्याचे एक प्रमुख कारण आहे.

९. पोपटपंची जोपासणाऱ्या परीक्षापद्धतीऐवजी ज्ञानाची जोपासना करणारी मूल्यमापन पद्धती हवी. अजूनही हा विचार शिक्षणक्षेत्रात रुजलेला नाही.

१०. विपरीत आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीतून निर्माण होणारे नैराश्य आणि चिंता यांचे निराकरण करण्यासाठी मार्गदर्शनाची काहीच यंत्रणा नाही.

११. उच्च शिक्षणक्षेत्रात मोजक्या विद्यार्थ्यांची गुंडगिरी आणि त्यामुळे विद्यापीठात होणारी आंदोलने ही बाब नवीन नाही. बहुसंख्य विद्यार्थी या आंदोलनांशी संबंधित नसतात.

वरील विवेचनाचा मथितार्थ असा की, विद्यार्थ्यांचे प्रश्न हे त्यांचे व्यक्तिगत प्रश्न असले तरी ते परिस्थितीतून उद्‌भवलेले असतात आणि ती परिस्थिती समजून घेणे महत्त्वाचे आहे. या परिस्थितीत अनेक घटक समाविष्ट असतात. उदाहरणार्थ विद्यापीठे, महाविद्यालये, शिक्षक, पालक, शिक्षणाधिकारी, शासन, समाज, इत्यादी, या सर्वांच्या मनात उच्च शिक्षणाच्या उद्दि-ष्टांच्या बाबतीत एकवाक्यता नसल्यामुळे अनेक प्रश्न उद्‌भवले आहेत. विद्यार्थ्यांनासुद्धा आंदोलने का करावीत, कशासाठी करावीत हे माहीत नाही. ज्ञानार्जनात सवलतीसाठी आंदोलने करणे म्हणजे स्वतःच्या विकासाला मर्यादा घालणे हे न कळणाऱ्या आंदोलनांची अनेक उदाहरणे देता येतील. जोपर्यंत उद्दिष्टांची स्पष्टता आणि ती जोपासण्याचा आग्रह निर्माण होत नाही तोपर्यंत उच्च शिक्षणाची मांडणी नीट आणि सरळ होणे शक्य नाही. मार्गदर्शक तत्त्वांच्या अभावी दिशाहीनता, संघर्ष, कामचलाऊ तडजोड इत्यादी गोष्टी रूढ होत राहिल्या आहेत. यातून बाहेर पडावयास हवे.

### ५. लेखांचे विहंगमावलोकन

महाराष्ट्रातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचा जेवढा अभ्यास होऊ शकला तेवढा या लेखसंग्रहात सादर करण्यात आला आहे. ज्या काही प्रश्नांची जाणीव होती पण ज्यांचा विविध अडचणींमुळे अभ्यास होऊ शकला नाही, त्यासंबंधीचा उल्लेख याच निवेदनात इतरत्र आलेला आहे. तरीही हे सांगितले पाहिजे की, अभ्यासिलेल्या प्रश्नांच्या चर्चेतून न अभ्यासिलेल्या काही प्रश्नांवर प्रकाश पडला आहे. अभ्यासिलेल्या प्रश्नांचे एकूण दर्शन कसे होते आहे हे इथे थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

दाभोलकर यांनी स्वतःच्या महाविद्यालयीन काळातील सामाजिक आर्थिक परिस्थितीचे वर्णन करून व श्री. शंकरराव खरात यांच्या 'तराळ-अंतराळ' मधून समर्पक अवतरणे देऊन समाजातील उपेक्षित वर्गातील विद्यार्थ्यांच्या अडचणींच्या चर्चेला चौकट उभी करून दिली. या चौकटीत विलास वाघ, अशोक रंगारी, शि. श्री. काळे, रमेशचंद्र परळकर, भालचंद्र फडके, द. पां. आपटे, आदींनी कुठे विस्ताराने, कुठे संक्षेपाने, पण या वर्गातील, समाजथरातील, विद्यार्थ्यांच्या परिस्थितीच्या चित्रणाला ठसठशीतपणा आणणारा तपशील भरला आहे.

मागासवर्गीय विद्यार्थी, ग्रामीण भागातील विद्यार्थी, अपंग विद्यार्थी, स्त्रिया, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थी, या सर्वांच्याच शैक्षणिक विकासासंबंधीचे प्रश्न रसरसलेले आहेत. शिक्षणाने दर्जा वाढू शकेल, त्याने जीवनपद्धतीत इष्ट बदल होऊ शकेल, हे पुष्कळच प्रभावीपद्धतीने समाजात व्यापक प्रमाणावर जाणवते आहे. इस्लाम धर्मीय नागरिकांची परिस्थिती या संदर्भात थोडी निराळी दिसते. शिक्षणाच्या क्षेत्रात मोठ्या संख्येने शिकायला आलेल्या या विविध वर्गातील, समाजथरातील, मंडळींचे प्रश्न व त्यांच्या येण्याने निर्माण झालेले प्रश्न, सर्वच लेखांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे चिकटलेले आहेत. हे व असे काही प्रश्न इतके सर्वस्पर्शी व जिव्हाळ्याचे झाले आहेत की, विद्यार्थ्यांच्या कोणत्याही प्रश्नाची चर्चा सुरू केली की ते डोके वर काढतात.

माध्यमाचा प्रश्न असाच एक प्रश्न आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना, ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना, वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना, नव्हे बहुसंख्य विद्यार्थ्यांना, तो घेरून राहिला आहे, याचे दर्शन विविध लेखातून होते आहे. इंग्रजी माध्यमाची निरनिराळ्या कारणासाठी आवश्यकता वाटणे व त्यातून निर्माण होणारा अडथळा वारंवार जाणवणे ह्या दोन्ही गोष्टी एकदमच घडत आहेत.

विद्यार्थिनींच्या प्रश्नांचे स्वरूप सुमन करंदीकर, पंडित टापरे, विलास वाघ, ठिगळे, यांच्या लेखातून दिसते. महाविद्यालयीन शिक्षणाच्या उद्दिष्टांच्या जवळपासही विद्यार्थिनींवरचे शैक्षणिक संस्कार त्यांना आणीत नाहीत, असे दिसते. वैयक्तिक प्रतिष्ठा, विचार व कृतिस्वातंत्र्य, या संबंधीचा प्रश्न तथाकथित पुढारलेल्या वर्गातील विद्यार्थिनींनी कसा सोपा मार्ग पकडून सोडवला आहे हे जसे ध्यानात येते, तसे स्त्रीमुक्तीच्या चळवळीच्या वाटेला न जाण्याचा 'समंजस' निर्णय ग्रामीण भागातील विद्यार्थिनींनी कसा आपलासा करण्याचा प्रयत्न केला आहे, हेही ध्यानात येते.

बहिःस्थ व नोकरी करून पदवी मिळविण्यासाठी धडपडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे शालिनी जोगळेकर यांनी लक्ष वेधले आहे. संशोधन करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचा परामर्ष घेताना ठिगळे, भाटवडेकर, द. पां. आपटे, चं. ग. देशपांडे, यांनी काही अडचणींवर प्रखर प्रकाश टाकला आहे.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा चौफेर विकास व्हावा म्हणून अभ्यासेतर कार्यक्रमांची, विद्यार्थी कल्याण व विद्यार्थी विकास योजनांची, स्थापना झालेली आहे. तसे या उपक्रमांचे उद्देश आहेत. पण या साऱ्यांना कर्मकांडाचे स्वरूप कसे प्राप्त झाले आहे आणि त्या मागच्या प्रेरणा कशा क्षीण झाल्या आहेत याची प्रचीती वि. भा. देशपांडे, वीरकर, चं. ग. देशपांडे इत्यादींच्या लेखातून जाणवते.

पदव्युत्तर संशोधन, संशोधनाचा मूळ हेतू पुष्कळ प्रमाणात डावलून, कसे सोयीसाठी विद्यार्थी व मार्गदर्शक (गाइडस्) राबवीत आहेत यावर झगझगीत प्रकाश ठिगळे, भाटवडेकर यांच्या लेखातून पडला आहे.

शिक्षणार्थींच्या राहण्या-जेवण्याच्या मूलभूत गरजांच्या पूर्तीच्या योजनांची कशी परवड होते आहे याची जाणीव शांता मालेगावकर, भालचंद्र फडके, विलास वाघ, परळकर, द. पां. आपटे, श. शां. देशपांडे, शि. श्री. काळे, यांच्या लेखातून होते. वसतिगृहातील वास्तव्याचे महत्त्व ओळखन

वसतिगृहांचा नीट उपयोग करून घेणे किती महत्त्वाचे आहे हे या संदर्भात लेखकांनी ध्यानात आणून दिले आहे.

विद्यार्थ्यांना प्रशासकीय अडचणी, महाविद्यालयीन, विद्यापीठीय व शासकीय पातळीवर येतात. त्यातच सर्व ठिकाणच्या नोकरवर्गाकडून मिळणाऱ्या तुसडया वागवणुकीची, असहकार वृत्तीची, भर पडते. किशोर करंदीकर यांच्या लेखात याचा प्रामुख्याने उल्लेख असला तरी इतरत्रही त्यांच्या विधानांना, निष्कर्षांना, पूरक असे साहित्य सापडते.

विद्यार्थी-शिक्षक संबंधांना शिक्षण व्यवस्थेत अनन्यसाधारण महत्व आहे, त्याचे विश्लेषण हेमंत देवस्थळींनी केले आहे. ह्या संबंधी सुमन करंदीकर, श. शां. देशपांडे, दाभोलकर, तुंगार, यांच्या लेखातही चर्चा आहे. पालकांच्या दृष्टिकोनावर स्वतंत्रपणे सविस्तर लिहिले जायला हवे होते. तसेच संस्था-चालकांच्या दृष्टिकोनाबद्दल. पण देवस्थळी, वि. भा. देशपांडे, वीरकर, सुमन करंदीकर, तुंगार यांच्या लेखातून यासंबंधी पुष्कळच काही आढळते.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे आरोग्य, व त्यांचे लैंगिक व भावनिक प्रश्न महत्त्वाचे. पण यापैकी आरोग्यासंबंधी थोडी चर्चा करायला कुणाची फारशी हरकत नसते. मात्र भावनिक व लैंगिक प्रश्नांचा नुसता उल्लेख जरी केला तरी झटकन काही भुवया वर जातात. गोडबोले व लुकतुके यांनी या प्रश्नांवर चांगला प्रकाश टाकला आहे. वसतिगृहातील स्वच्छतेकडे गोडबोले यांनी आवर्जून लक्ष वेधले आहे. महारोगाची लक्षणे असलेल्या काही विद्यार्थ्यांना आरोग्य योजनेतून रोगमुक्ती लाभली व खुलेपणाने जीवन जगायचा रस्ता खुला झाला हा स्मरणात राहण्यासारखा अनुभव वाटतो.

कनिष्ठ महाविद्यालयातील शाळा व कॉलेजातून होणाऱ्या व्यवस्थेत प्रशासकीय व धोरण-विषयक निर्णयाने निर्माण झालेले प्रश्न यांची आणि त्यातील परिस्थितीजन्य त्रुटी यांची मर्यादित, पण नेटकी ओळख गोगटे यांनी करून दिली आहे.

विद्यार्थी संघटनांबद्दलचा अभ्यास करता आला नाही; पण विद्यार्थी चळवळीतील काही वेचक आंदोलने निवडून त्यांच्या अनुषंगाने चाफेकर यांनी काही निष्कर्ष समर्थपणे काढले आहेत. हा एक आगळा लेख आहे. विद्यार्थी व राजकारण याचा दाभोलकरांनी केलेला उल्लेख व विद्यार्थी आंदोलनासंबंधीचे निष्कर्ष एकत्र वाचण्यासारखे आहेत.

अभ्यासक्रमाचे विश्लेषण साळी व जोशी यांच्या लेखातून आले आहे. ह्यात तात्त्विक चर्चा प्रामुख्याने असली तरी ह्या गुंतागुंतीच्या प्रक्रियेत जर असंतुलन निर्माण झाले तर कोणते प्रश्न निर्माण होतील याचा अंदाज येतो. शिक्षणाचे उद्दिष्ट साधण्याचे प्रयासच विफल करण्याला इथे निर्माण झालेले प्रश्न प्रभावीपणे कारणीभूत होतील असा विचार मनात येतो. जोशींनी 'अभ्यास-क्रमातील दोषांमुळे योग्य ते वर्तन बदल व विद्यार्थ्यांचा विकास न झाल्यामुळे...भावी आयुष्यास सामोरे जाताना' त्यांना भेटणाऱ्या दीर्घ कालीन समस्यांचा उल्लेख करून परखड इशारे दिले आहेत.

संजीव गोखले व वि. रा. देशपांडे यांनी वैद्यकीय व अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या काही विशेष प्रश्नांची दखल घेतली आहे. वाणिज्य विषयाच्या विद्यार्थ्यांच्या विशेष प्रश्नांचा उल्लेख शि. श्री. काळे यांनी एका ठिकाणी केला आहे.

अपंगांच्या पाहाणीवर भर असलेला तुंगारांचा लेख व अंध विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवरचा दीक्षित यांचा लेख, महाविद्यालयातील आजवर अंधारात असलेल्या अपंग विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर पहिल्यांदाच प्रकाश टाकीत आहेत असे वाटते.

इस्लाम धर्मीय विद्यार्थ्यांच्या समस्या काहीशा अप्रत्यक्षपणे य. दि. फडके यांच्या लेखातून ध्यानी येतात. त्यातले नेटकेपण व निराळेपण स्पष्टपणे जाणवते.

अभ्यासातून विद्यार्थ्यांचे प्रश्न कसे दिसतात हे पाहिल्यावर 'विद्यार्थ्यांच्या शब्दात विद्यार्थ्यांचे प्रश्न' ह्या कापडणिसांच्या प्रयोगाच्या परिणामाला एक निराळाच अर्थ प्राप्त झाला आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचा अभ्यास करता करता महाराष्ट्रातील समाजाचेच दर्शन घडते. शिक्षण पद्धतीस अभिप्रेत असलेली उद्दिष्टे आणि प्रत्यक्ष समाज जीवन ह्यातली दरी टापरे, परळकर, वाघ, ठिगळे व इतर लेखक यांच्या लेखातून स्पष्ट ध्यानात येते. शिक्षण व्यवस्था व तिची उद्दिष्टे एका बाजूला व समाजजीवन निराळ्या दिशेला, असा काहीसा प्रकार दिसतो. शैक्षणिक वर्ष कागदांवर केव्हाही सुरू होवो व संपो, प्रस्थापित समाजजीवनात गुरफटलेले विद्यार्थी आणि म्हणून प्राध्यापक आणि संस्था-चालक, त्याचे नेमके काय करतात याची प्रचीती इथे येते. ग्रामीण भागातून येणाऱ्या नव्या लक्ष्मीपुत्र विद्यार्थ्यांचा इतरांनाच नव्हे तर ग्रामीण भागातील व इतर कारणाने मागे असलेल्या विद्यार्थ्यांना कसा नवा धोका आहे ह्याची झलकही या संग्रहातील लेखांतून मिळते.

महाविद्यालयीन शिक्षणाचा हा खिळखिळा महारथ कोणत्या खाचखळग्यांच्या वाटेवरून चालतो आहे याचे काहीसे स्पष्ट-धूसर चित्र या शोध-निबंध संग्रहाच्या वाचनाने नजरेसमोर उभे राहते.

लेखकांनी अडचणी दाखविल्या, प्रश्नांकडे लक्ष वेधले, पण त्याचबरोबर काही उपायही सुचविले आहेत. प्रश्न खूप असले तरी निर्धाराने आशावादी राहून विधायक काम करण्यास खूप वाव आहे असे वाटते. अभ्यासाच्या सर्व प्रयत्नांचा असाच परिणाम जाणवतो. प्रश्नांच्या उकलीसाठी त्यांचे स्वरूप ध्यानात येणे महत्त्वाचे असते. ते काम इथे झालेले प्रतीत होते.

## ६. संपादक मंडळाचे प्रयत्न व कार्यपद्धती

या भागात पुस्तकाच्या योजनेचा पाठपुरावा करण्याकरिता कोणते प्रयत्न करावे लागले, याची माहिती द्यावयाची आहे.

योजनेमागील मूळ कल्पना व प्रेरणा कै. प्रा. शाह यांची होती. ही कल्पना प्रा. शाहनी प्रथमतः सप्टेंबर १९८० मध्ये मांडल्यापासून तिच्या पूर्तीकरता प्रयत्न करणाऱ्या व वाढत गेलेल्या गटात, मूळ कल्पनेचे योजनेत परिवर्तन व योजनेचे प्रत्यक्षात रूपांतर कसे झाले, हे पाहणे उपयुक्त व्हावे. या प्रक्रियेमध्ये अर्थातच अनेकांचे सहकार्य आवश्यक होते. या प्रयत्नामध्ये विविध शैक्षणिक घटकांच्या सहकार्याची अपेक्षा कोणत्या प्रमाणात केली आणि वस्तुतः ते किती मिळाले याचे पुनरावलोकन करणे उद्बोधक ठरावे.

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या गेल्या पंचवीस वर्षांच्या कामामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थीविषयक अनेक गोष्टी पाहावयास व अनुभवयास मिळाल्या. त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या आर्थिक व अन्य अडचणींबरोबर महाविद्यालयीन व्यवस्थापन व सामाजिक परिस्थितीविषयक अशा अनेक गोष्टी होत्या. या तऱ्हेचे अनेक अनुभव अनेक मंडळींना आलेले आहेत. या अनुभवांचे संकलन करावे अशा इच्छेने प्रस्तुत ग्रंथाची योजना झाली.

### प्रास्ताविक चर्चा

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची व्याप्ती किती आहे व या विषयात संबंधित मंडळींना किती रस आहे हे पाहण्याकरिता दि. १२ ऑक्टोबर १९८० ला पुण्यामध्ये एक प्रारंभिक स्वरुपाची बैठक घेण्यात आली. या बैठकीला माध्यमिक प्रशाला, महाविद्यालये व पुणे विद्यापीठ, यातील काही प्राध्यापक व प्राचार्य, विद्यार्थी व विद्यार्थी प्रतिनिधी, तसेच शिक्षणक्षेत्राशी संबंधित अन्य मंडळी उपस्थित होती. या बैठकीत पुढील गोष्टींवर विचारविनिमय झाला : ग्रंथाच्या योजनेची उपयुक्तता; विद्यार्थ्यांचे प्रश्न व त्यांचे भाग, पोटविभाग कोणते आहेत; त्यासंबंधी अधिक

अभ्यास कसा करावा व कसा मांडावा; याबाबत सल्ला देणारी तसेच प्रत्यक्ष काम व साहाय्य करणारी मंडळी कोण आहेत; आणि त्यांच्यापर्यंत कसे पोचावे.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचा अभ्यास, नियोजित लेखसंग्रहाच्या निमित्ताने व्हावा या योजनेस उपस्थितांनी सामान्यतः पाठिंबा दिला. बैठकीत झालेल्या चर्चेत काही गोष्टी सहजच दिसून आल्या. त्यांपैकी महत्त्वाची गोष्ट ही होती की, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे पाहावयाचे विविध दृष्टीकोन आहेत. काही प्रश्न मूलभूत आहेत तर काही प्रासंगिक आहेत. प्रचलित शिक्षणपद्धती व सामाजिक परिस्थिती यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना विशेष रूप आलेले आहे.

### प्रश्न–विषयांची यादी

बैठकीच्या निमित्ताने व त्यानंतर झालेल्या छोटया मोठया चर्चांतून विद्यार्थी-विषयक प्रश्न विषयांची यादी पुढील पाच भागात बनविण्यात आली :

–प्रश्नांची जाण कुणाला व किती प्रमाणात आहे; यामध्ये पालक, शिक्षक व स्वतः विद्यार्थी या सर्व घटकांचा अंतर्भाव आहे.

–महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता उपलब्ध असणाऱ्या सोयी-सुविधा; यामध्ये ग्रंथालये, वसतिगृहे, भोजनालये, आवडीच्या छंदांना व खेळांना जोपासण्याकरिता केलेल्या व्यवस्थामार्ग-दर्शन वगैरे.

–निरनिराळ्या सामाजिक व आर्थिक स्तरांतील विद्यार्थ्यांचे प्रश्न; उदाहरणार्थ मागास व आदिवासी विद्यार्थी, अपंग विद्यार्थी, बहिःस्थ व अर्थार्जन करून शिकणारे विद्यार्थी-विद्यार्थिनी.

–विविध विद्याशाखांतील विद्यार्थ्यांचे प्रश्न, उदाहरणार्थ अभियांत्रिकी, वाणिज्य, शेतकी, वगैरे शाखा; पदव्युत्तर परीक्षांकरिता अभ्यास करणारे विद्यार्थी.

–शैक्षणिक परिस्थितीतील मूलभूत उद्दिष्टे, उदाहरणार्थ महाविद्यालयीन शिक्षणाची उपयुक्तता, शिक्षणाचा पर्याय, विविध अभ्यासक्रमांची रचना व त्यातील आवश्यक बदल; व्यवस्थापनातील विद्यार्थ्यांचा सहभाग, समाजजीवन व त्यात महाविद्यालयीन शिक्षणक्रमाचे स्थान.

### सहकार्याचे आवाहन

संग्रहाच्या प्रास्ताविक तयारीमध्ये अनेकांचे सहकार्य मिळावे याकरिता आमचे सहकारी श्री. अनिल काळे यांनी प्रमुख मराठी दैनिकांत आवाहनात्मक लेख लिहिले. त्याचबरोबर, नियोजित ग्रंथाचे उद्दिष्ट सांगणारे एक परिपत्रक तयार केले. ते परिपत्रक महाविद्यालयांचे प्राचार्य व या कामात रस घेतील वा काही लिहू शकतील अशा एकूण सुमारे हजार मंडळींना पाठविण्यात आले. या परिपत्रकाद्वारे या मंडळींच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली होती; हे सहकार्य कोणत्या प्रकारचे असावे हेही परिपत्रकात विस्तारपूर्वक मांडण्यात आले होते.

अर्थातच वेळोवेळी विविध मंडळींशी चर्चा करण्यात आल्या. पुण्यातील प्राचार्यांची एक बैठक घेण्यात आली. औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली व मुंबई येथील काही मंडळींशी वैयक्तिक व गटागटाने चर्चा झाल्या.

संपादक मंडळाकडे आलेल्या काही लेखांचा अंतर्भाव प्रस्तुत संग्रहात करता आला नाही. त्याच्या कारणांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. काही लेख सर्वसामान्य ठिकाणी आढळणारी माहिती केवळ संकलित करून लिहिलेले होते; त्यात नवा विचार वा नवी माहिती अत्यल्प प्रमाणात होती. अन्य काही लेख केवळ सांख्यिक माहितीवजा होते. त्यात चिकित्सा वा निष्कर्ष दोन्ही नव्हते. तिसऱ्या प्रकारचे लेख हे वैयक्तिक मतांचे आविष्कार होते.

### संपादक मंडळाच्या बैठकी

संपादक मंडळाच्या कामाकरिता एक पद्धत अवलंबविण्यात आली. त्या पद्धतीची उपयुक्तता

अनेक कारणांनी विशेष वाटली. संपादक मंडळाच्या बैठकी प्रत्येक रविवारी सकाळी ९ ते १२ या काळात विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कार्यालयात भरत असत. या बैठकी युक्त असत तेथे सर्व संबंधितांना, जिज्ञासू, साहाय्यक व लेखक या सर्वांना कायमचे निमंत्रण असे. या बैठकीतून एखाद्या विषयावर विविध मंडळींची मते निबंध लेखकास अजमावता येत. लिहिलेल्या शोध-निबंधांची चिकित्सा होई. या प्रकारे अनेक निबंधांच्या विषयांचे नवे नवे पैलू समजत.

### संपर्क

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांत ज्यांना रस असण्याची अपेक्षा करणे योग्य होईल, अशा व्यक्ती व संस्था (मुख्यतः महाविद्यालये) यांच्याप्रत पोचण्याचा व त्यांचे साहाय्य मिळविण्याचा गेल्या वर्षभरात बराच प्रयत्न झाला. या प्रयत्नात मिळालेल्या प्रतिसादासंबंधी थोडी माहिती सांगणे युक्त होईल. महाराष्ट्रात सुमारे ६००–७०० महाविद्यालयीन संस्था आहेत. यामध्ये विद्यापीठे व त्यांना संलग्न असणारी महाविद्यालये, त्याचप्रमाणे विविध विषयांतील पदविकांचे शिक्षण देणाऱ्या विद्यालयांचा अंतर्भाव आहे. मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर व औरंगाबाद ही विद्यापीठे महिलांचे श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ, शेतकीची चार विद्यापीठे, यामध्ये होती. पदविकास्तरावरील विद्यालयांमध्ये अभियांत्रिकी, अध्यापन, तंत्रशिक्षण, वाणिज्य, व्यवसाय, वास्तुशास्त्र व कला यांचे शिक्षण देणाऱ्या संस्था होत्या. या सर्व संस्थांच्या प्राचार्यांना परिपत्रके पाठविण्यात आली होती. मुंबई, पुणे, औरंगाबाद व सांगली येथे लहान-मोठ्या प्रमाणावर प्राध्यापक व प्राचार्य यांच्या बैठकी घेण्यात आल्या.

या संपर्कप्रक्रियेला किती फळ आले ? महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पाठविलेल्या सहाशे-सातशे परिपत्रकांना सुमारे दहा प्राचार्यांची उत्तरे आली. सध्या प्राचार्यपदी असलेल्या एकाही व्यक्तीचे नाव अनुक्रमातील लेखांच्या यादीत नाही. एकूण ३२ शोध-निबंध लेखकांपैकी फक्त पाच लेखक पुण्याबाहेरचे आहेत. दोघे लेखक मराठवाडा (औरंगाबाद) विद्यापीठाच्या क्षेत्रातील महा-विद्यालयीन प्राध्यापक आहेत व तिघे शिवाजी (कोल्हापूर) विद्यापीठाच्या क्षेत्रातील प्राध्यापक आहेत. मुंबई, नागपूर, ठाकरसी व शेतकी विद्यापीठामधील एकही लेखक मिळविण्यामध्ये संपादक मंडळास यश आले नाही. प्रस्तुत योजनेच्या फलिताची ही मर्यादा मानावी लागेल.

पुणे व अन्य ठिकाणाच्या महाविद्यालयांतील प्राध्यापकांनी, स्वतःस युक्त वाटणाऱ्या विषयांवर, संपादक मंडळाच्या विनंतीनुसार, लेख वा शोध-निबंध लिहिण्याचे स्वीकारले होते. पुण्यातील दोन ज्येष्ठ महाविद्यालयांतील प्राध्यापकांच्या गटांनी प्रत्येकी एका महत्त्वाच्या विषया-वर संयुक्तपणे शोध-निबंध लिहिण्याची जबाबदारी स्वीकारली होती. ही सर्व मंडळी त्यांच्या अन्य कामामुळे लेख लिहिण्याची अभिवचने पूर्ण करू शकली नाहीत. काहींना तर त्या कामाची सुरुवातही करणे शक्य झाले नाही.

त्या मानाने वृत्तपत्रांत दिलेल्या निवेदनांना आलेला प्रतिसाद उजवा मागावा लागेल. या ४–५ निवेदनांची दखल सुमारे ५० प्रतिसादकांनी घेतली. त्यांच्यामध्ये अध्यापनाशी संबंध असलेले व नसलेले यांचे प्रमाण समान होते.

विद्यार्थी–प्रश्नांसंबंधी ज्यांनी थोडाफार विचार केलेला आहे, अशा पुण्याबाहेरील मंडळींचे साहाय्य मिळविण्याचे कामी संपादक मंडळास आलेल्या अपयशाची कारणे पुढील असावीत : एक तर या मंडळींचा संपर्क योग्य प्रकारे साधण्याकरिता अनेक गावांत व विभागवार बैठकी घेणे योग्य झाले असते. एक–दोन बैठकींनीही भागले नसते. त्या वरचेवर घेणे आवश्यक होते. त्याचबरोबर व्यक्तिशः व लहानलहान गटांनाही भेटणे उपयुक्त झाले असते. केवळ वृत्तपत्रांतील निवेदने व परिपत्रके यांमधील आवाहने संबंधित मंडळींपुढे योग्य त्या आग्रहाने पोचत नाहीत

असे दिसते. दुसरे असे की, विद्यार्थ्यांचे प्रश्न हे काही प्रसंगी, वृत्तपत्रीय लिखाणाचे विषय झाले असले तरी अधिक खोलवर जाऊन त्यासंबंधी विचार करणे जरूर आहे ही गोष्ट अजून बहुसंख्य मंडळींच्या मनात रुजावयाची आहे. तिसरे कारण असे असावे की, एखाद्या विषयासंबंधीचे विचार मनात तरळणे व त्याला प्रयत्नांचा पाठिंबा देऊन तो लेखनाच्या स्वरूपात आणण ही गोष्ट अनेक मंडळींना त्यांच्या अन्य जबाबदाऱ्यांमुळे सोईची वाटली नसावी. त्यामुळे अनेक मंडळींनी, लेख लिहून देण्याचे स्वीकारून देखील, वचनाची पूर्ती त्यांना करता आली नाही. चौथे कारण : या मंडळींना, त्यांनी संकल्प केलेला लेख लिहिणे हे युक्त व आवश्यक आहे ही गोष्ट संपादक मंडळ त्यांना परिणामकारकरीत्या पटवू शकले नाही.

स्वीकारलेल्या गोष्टींसंबंधी काळानुसार ओसरलेल्या औत्सुक्याचे उदाहरण म्हणजे, विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी वा पुढारी म्हणून काम करणाऱ्या मंडळींचे देता येईल. ग्रंथाच्या नियोजनाच्या सुरुवातीच्या काळात औत्सुक्य दाखविणाऱ्या सर्व तरुण मंडळींना या कामाकडे लक्ष देण्यास यानंतर मुळीच वेळ झाला नाही.

## त्रुटी

या प्रयत्नातील व त्यांच्या फलितातील काही त्रुटी, ज्या आजही आम्हास दिसत आहेत त्यांची नोंद करणे उचित आहे. कालांतराने या त्रुटींचे वास्तव रूप आम्हाला अधिक प्रतीत होईल. तसेच चिकित्सक वाचकांनाही ते स्पष्टपणे दिसेल.

१. महाराष्ट्राच्या विविध भागांत काम करणाऱ्या मंडळींनी लेख पाठवावेत या उद्देशाने संपादक मंडळाकडून पुरेसा प्रयत्न झाला नाही. या भागांचा शैक्षणिक विकास वेगवेगळ्या पद्धतीने होत आलेला आहे. त्यांची सद्यःस्थिती वेगवेगळ्या स्तरावर आहे. वैविध्यांची दखल अधिक खोलवर जाऊन, तसेच अधिक विस्ताराने घेणे जरूर आहे.

२. त्याचप्रमाणे, महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांतील विद्यार्थ्यांचीही चाचपणी अवश्य आहे. वर उल्लेखलेल्या विभागीय विकासातील फरकांमुळे विद्यार्थ्यांच्या अडचणींची तीव्रता व प्रकार यामध्येही फरक असणार व त्यांचा विचार महत्त्वाचा आहे. हे काम प्रस्तुत ग्रंथात अल्प प्रमाणात झालेले आहे. उदाहरण म्हणून मुंबई या महानगरीत राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे सांगता येईल.

३. संग्रहाच्या योजनेत जे विषय शोध-निबंधांकरिता कल्पिले होते, त्यांपैकी काही महत्त्वाचे विषय योग्य लेखकांच्या अभावी राहून गेले आहेत. एक महत्त्वाचे उदाहरण देता येईल : एक विषय आहे, ' विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची जाण. ' ही जाण शिक्षक, पालक, समाज व स्वतः विद्यार्थी या विविध घटकांत किती प्रमाणात आहे, कोणते प्रश्न खरोखरीचे आहेत व कोणते प्रश्न महत्त्वाचे समजले जातात पण तसे ते नाहीत, याचा शोध महत्त्वाचा आहे. ही जाण योग्य प्रकारे आणण्याचा प्रयत्न झाला तर अनेक अडचणी टळतील.

४. सर्वाधिक महत्त्वाची त्रुटी म्हणजे लेखनाच्या व निरीक्षणाच्या क्षमतेचा अभाव. आपल्या भोवतीचे वातावरण दुसऱ्याच्या डोळ्यांनी पाहून समजणार नाही, नेहमी बोलल्या जाणाऱ्या विषयांपलीकडे अनेक व कदाचित अधिक महत्त्वाचे प्रश्न आहेत, याची मर्यादित जाणीव. वास्तवातील हे प्रश्न नेमकेपणाने, परखडपणाने जाणण्याचे कुतूहल जसे अल्प आहे, तसेच ते जाणण्याकरिता लागणारी बौद्धिक क्षमताही अल्प आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे विद्यार्थी संघटना. त्यांचा ' शैक्षणिक ' प्रश्नामधील रस फार मर्यादित आहे असे या ग्रंथाच्या प्रयत्नात दिसले.

५. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर लिहिलेले कसदार साहित्य तसे थोडे आहे. वृत्तपत्रीय थाटाचे प्रासंगिक लिखाण त्या मानाने बरेच आहे. उपलब्ध साहित्याची योग्य दखल घेणे शक्य व्हावे

याकरिता मराठी अभ्यासकांकरिता बनवलेली सूची अजून उपलब्ध व्हावयाची आहे. या उद्दिष्टा-प्रत एक अल्प प्रयत्न प्रस्तुत पुस्तकाच्या शेवटी दिलेला आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची दखल आज प्राथमिक अवस्थेत आहे. या अवस्थेतील प्रस्तुत शोध-निबंध संग्रह हा एक अल्प प्रयत्न आहे.

या लेखसंग्रहाच्या निर्मितीला लेखक, मुद्रक व इतर अनेक मित्र यांचे विविध प्रकारचे साह्य झाले आहे. त्या साऱ्यांना धन्यवाद !

–संपादक

# अनुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| | आणखी एक समाधान | | पाच |
| | प्रा. शाहांचे संस्मरण | | सात |
| | संपादकीय निवेदन | | नऊ |
| | अनुक्रम | | सव्वीस |
| १. | महाविद्यालयीन जीवनाचा आशय | देवदत्त दाभोलकर | १ |
| २. | महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या प्रशासकीय अडचणी | किशोर दिगंबर करंदीकर | २२ |
| ३. | ग्रामीण महाविद्यालयांतील ग्रामीण विद्यार्थ्यांचे प्रश्न | पंडित टापरे | ४६ |
| ४. | शहरी महाविद्यालयांतील ग्रामीण विद्यार्थ्यांचे प्रश्न | रमेशचंद्र परळकर | ५७ |
| ५. | ग्रामीण भागातून शिक्षणासाठी पुण्यास येणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रश्न | शशिकांत शां. देशपांडे | ६५ |
| ६. | कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचे प्रश्न | श्री. ब. गोगटे | ८५ |
| ७. | पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या समस्या | चंद्रशेखर गंगाधर देशपांडे | ९६ |
| ८. | पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे आणखी काही प्रश्न | द. पां. आपटे | १०३ |
| ९. | संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रश्न | स. श्री. ठिगळे | १०९ |
| १०. | संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आणखी काही अडचणी | मो. वि. भाटवडेकर | ११९ |
| ११. | सभ्यासेतर उपक्रमांचे व्यवस्थापन | वि. भा. देशपांडे | १२२ |
| १२. | विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाबाहेर काय करायला आवडेल ? | प्रतिभा वीरकर | १२९ |

| | | | |
|---|---|---|---|
| १३. | मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रश्न | विलास वाघ | १३३ |
| १४. | अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांचा मानसशास्त्रीय अभ्यास | अशोक रंगारी | १३८ |
| १५. | मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या समस्या —एक अभ्यास | शि. श्री. काळे | १४८ |
| १६. | महाविद्यालयीन विद्यार्थिनींचे प्रश्न | सुमन करंदीकर | १६० |
| १७. | बहिःस्थ व नोकरी करणारे विद्यार्थी | शालिनी जोगळेकर | १७५ |
| १८. | विद्यार्थी-शिक्षक संबंध | हेमंत देवस्थळी | १८५ |
| १९. | महाराष्ट्रातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची आंदोलने | विलास चाफेकर | १९७ |
| २०. | वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे प्रश्न | शांता मालेगावकर | २१० |
| २१. | वसतिगृह फक्त चार भिंतीच | भालचंद्र फडके | २२५ |
| २२. | अपंग विद्यार्थ्यांचे प्रश्न | वा. ना. तुंगार | २२९ |
| २३. | अंध विद्यार्थ्यांचे प्रश्न | अरुण दीक्षित | २३६ |
| २४. | वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे विशेष प्रश्न | संजीव गोखले | २४२ |
| २५. | अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे विशेष प्रश्न | वि. रा. देशपांडे | २४६ |
| २६. | महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे आरोग्य | मु. कृ. गोडबोले | २४९ |
| २७. | महाविद्यालयीन तरुण-तरुणींच्या लैंगिक व भावनिक समस्या | उल्हास लुकतुके | २६० |
| २८. | उच्च स्तरांवरील अभ्यासक्रमांचे विश्लेषण | अनंत न. जोशी | २६८ |
| २९. | अभ्यासक्रमांचे आणखी एक विश्लेषण | व. झा. साळी | २८६ |
| ३०. | महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कल्याणाच्या आणि विकासाच्या योजना | शि. श्री. काळे | २९० |
| ३१. | महाराष्ट्रातील मुसलमानांची शैक्षणिक स्थिती | य. दि. फडके<br>गोपाळ दुखंडे<br>मोहम्मद खडस | २९३ |
| ३२. | विद्यार्थ्यांच्या शब्दात विद्यार्थ्यांचे प्रश्न—एक नमुना प्रयोग | चंद्रशेखर कापडणीस | २९९ |
| | संदर्भ सूची | शांताराम ग. महाजन<br>रेवती पानसे | एक |
| | विषय सूची | हेमंत देवस्थळी | पंचवीस |
| | लेखक-परिचय | | सत्तावीस |

# १ महाविद्यालयीन जीवनाचा आशय

देवदत्त दाभोळकर

— १ —

महाविद्यालयीन जीवन आहे तरी काय ?
नंदनवनाच्या अलीकडे केवळ सात पावले असलेली यक्षभूमी ?
नवजागृतीकडे नेणारी स्वप्नभूमी ?
मृगजळापाठीमागे धावावयास लावणारी मरुभूमी ?
ज्ञान आणि कर्म यांचा समन्वय करण्याचा प्रयत्न करणारी कर्मभूमी ?
की हे सर्व आणि अन्यही काही ?

या अशा प्रश्नांचा ज्या ज्या वेळी मी विचार करतो, त्या त्या वेळी मला माझे स्वतःचे विद्यार्थी म्हणून व्यतीत केलेले महाविद्यालयीन जीवन आठवते. त्यानंतरही जवळजवळ चार दशकांच्या दीर्घ कालावधीत प्रत्यही महाविद्यालयात, विद्यापीठात, ये–जा करीत असताना, कार्य करीत असताना, जे जे अनुभवास आले ते तेही सर्व आठवते.

नेमके एक उत्तर अचूकपणे देता यावे असा हा प्रश्न नाही. या प्रश्नातून निर्माण होणाऱ्या उपप्रश्नांनादेखील नेमकी उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करणे फलदायी होणार नाही. परंतु या प्रश्नाच्या कक्षा, सविस्तर, नीटपणे समजावून घेणे यातदेखील या प्रश्नाच्या काही संभाव्य उत्तरांची सूचना मिळू शकते. या लेखाचा मुख्यत्वेकरून हाच हेतू आहे.

१९३६ साली मी महाविद्यालयात विद्यार्थी म्हणून प्रवेश केला. महाविद्यालयात प्रवेश करण्याविषयीची उत्कंठा त्याआधी निदान दोन–तीन वर्षे तरी जागृत झाली होती. महाविद्यालयीन वातावरणात, वसतिगृहातील उत्साही व काहीशा उच्छृंखल अशा जीवनात, चार वर्षे कशी गेली हेच कळले नाही. १९४० मध्ये बी. ए. ची परीक्षा दिल्यानंतर मी एम्. ए.चाही अभ्यास केला; परंतु त्या पदव्युत्तर शिक्षणाचा कालावधी, महाविद्यालयीन जीवन असे ज्याला म्हणता येईल असा कालखंड वाटला नाही. जीवनातील या कालखंडाविषयीच्या भावनात्मक प्रतिक्रियेत आजच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीतही काही वेगळेपणा आढळेल असे मला वाटत नाही.

एक गोष्ट मला सुरुवातीलाच स्पष्ट सांगितली पाहिजे. एका पिढीतील विद्यार्थी दुसऱ्या एखाद्या पिढीतील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक चांगले किंवा अधिक वाईट असतात असे मी कधी मानले नाही. कारण, तसे माझ्या अनुभवासही आले नाही. एका राष्ट्रातील विद्यार्थी दुसऱ्या एखाद्या राष्ट्रातील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक उंच किंवा खालच्या स्तरावर असतात असेही मी कधी

मानत आलो नाही. कुमारवय संपून नवयौवनात प्रवेश करणाऱ्या जगातील सर्व युवकांची मनोभूमिका एकाच स्वरूपाची असते. या मनोभूमिकेच्या आविष्कारात जर काही फरक आढळून येत असले तर ते सभोवतालीच्या इतर परिस्थितीचे परिणाम म्हणून निर्माण झालेले असतात. राष्ट्रा-राष्ट्रांमधील परिस्थितीत तर हे फरक असतातच, परंतु एकाच राष्ट्रात भिन्नभिन्न परिस्थितीतून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबतीतही हे फरक शेवटी परिणामकारक ठरतील इतक्या मोठ्या प्रमाणात असू शकतात. ही गोष्ट आपण तुलना करताना अनेकदा विसरतो आणि परिस्थितीच्या प्रभावामुळे निर्माण झालेले दोष व उणीवा आपण विद्यार्थ्यांच्या माथी मारून अवघड प्रश्नांचे एक सोपे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करतो. हे विद्यार्थ्यांवर तर अन्याय करणारे आहेच; परंतु त्याहूनही अधिक वाईट म्हणजे या क्षेत्रात आपल्यासमोर उभ्या असणाऱ्या समस्यांच्या खऱ्या उत्तराकडे आपल्याला डोळेझाक करावयास लावणारे आहे.

माझ्या व्यक्तिगत महाविद्यालयीन जीवनात मी काय कमावलं व काय गमावलं याचा विचार आज मी ज्या ज्या वेळी करतो त्या त्या वेळी माझी मनःप्रकृती, माझी कमी-अधिक असलेली बौद्धिक क्षमता, याखेरीज इतर अनेक गोष्टी माझ्या डोळ्यांसमोर येतात. माझी कौटुंबिक परिस्थिती, सामाजिक परिस्थिती, माझे प्राध्यापक, माझे निकटचे मित्र, अध्ययन–अध्यापनाच्या बाहेरचेही महाविद्यालयात असणारे एकूण वातावरण, राष्ट्रातील एकूण वातावरण, या सर्वांचा कळत नकळत माझ्यावर परिणाम घडत होता. माझी मनःप्रकृती व बौद्धिक क्षमता या सर्वांना प्रतिसाद देत होती व त्या प्रतिक्रियेत मलाही काही नवे वेगळे वळण लागत होते. परंतु, हीच मनःप्रकृति व बौद्धिक क्षमता असताना इतर परिस्थिती जर वेगळी राहिली असती तर माझी अंतिम घडण काही वेगळीच झाली असती याविषयी माझ्या मनात शंका नाही. ‘There, but for better luck, goes myself !’ असे ज्यांच्या दुर्दैवी जीवनाकडे पाहून वाटावे असे माझ्याहून अधिक क्षमतेचे लोक माझ्या पिढीत जन्मालाच आले नव्हते असा निर्वाळा मी देऊ शकणार नाही. नम्रपणे फार तर मी एवढेच अधिक म्हणेन की, ‘आजच्या आपल्या समाजव्यवस्थेत असा निर्वाळा कोणीच देऊ नये !’

महाविद्यालयीन शिक्षणाची संधी ही, आपल्या देशात आजही अगदी गरीबातील गरीब विद्यार्थी घेतला तरी त्याच्या बाबतीतदेखील इतर अनेक त्याच्याच कुवतीच्या विद्यार्थ्यांना नाकारली गेलेली व त्याला त्याच्या तुलनात्मक सुदैवाने मिळालेली विशेष संधी असते. पुणे विद्यापीठात एका दीक्षान्त समारंभाच्या भाषणात माझ्या महाविद्यालयीन जीवनाच्या काळातील एक आवडता लेखक अर्न्स्ट टोलर याच्या आत्मचरित्रातील एक निवेदन मी उद्धृत केले होते. हा एक समाजवादी जर्मन लेखक, नंतर निर्वासित झालेला. ‘I was a German’ हे त्याच्या आत्मचरित्राचे नाव. वयाच्या पंचविसाव्या वर्षापर्यंत त्याने विद्याभ्यास केला. एखाद्या सुसंस्कृत युवकाप्रमाणे युरोपभर प्रवास केला. तो आपल्या आत्मचरित्रात लिहितो : “माझे शिक्षण नीटपणे चालू होते. माझा मित्र स्टॅनिसलॉस याला मात्र त्याच्या वयाच्या चौदाव्या वर्षीच शाळा सोडून कामावर जावे लागले. त्या वेळी मी आईला विचारी, ‘आई, मला नीटपणे शिकता येते व त्याला मात्र शाळा सोडावी लागते, असे का ?’ आणि आई मला सांगे, ‘बाळ, हे सगळे परमेश्वराच्या इच्छेवर अवलंबून असते !”

हे सर्व लिहून अर्न्स्ट टोलर आपल्या आत्मचरित्रात पुढे लिहितो : ‘बाळ, हे सगळे परमेश्वराच्या इच्छेवर अवलंबून असते, या आईच्या उत्तराने त्या वेळी माझे समाधान झाले; आज या उत्तराने माझ्या मनाचे समाधान होऊ शकत नाही.’

या कसोटीवर घासून पाहिले तर केवळ ‘परमेश्वराच्या इच्छेमुळे’ मागे पडलेले आपल्याच

किंवा आपल्याहून अधिक कुवतीचे अनेक स्टॅन्सिलॉस आपल्याला दिसतील व या समाजव्यवस्थेत कुठे तरी, काही तरी चुकते आहे, याची जाणीव मनाला अस्वस्थ केल्याखेरीज रहाणार नाही.

माझ्या कौटुंबिक परिस्थितीची परंपरा कोकणातील कनिष्ठ मध्यमवर्गीय शेतकऱ्याची. माझ्या आईचे वडील याच परंपरेतून थोडे शिक्षण घेऊन कोल्हापूरला आले व तेथे त्यांनी वकील म्हणून चांगले नाव कमावले. माझ्या वडिलांचे वडील प्रत्यक्ष शेत कसत असत; परंतु माझ्या वडिलांनी स्वप्रयत्नाने आपले एल्एल्. बी. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पुढे ते सातारा येथे येऊन वकिली करू लागले व अगदी वरच्या श्रेणीचे नसले तरी सातारा येथील पहिल्या पाच–दहा वकिलांत निर्देश करावाच लागेल इतके यश त्यांनी मिळवले. माझ्यापुरते म्हणावयाचे तर माझ्या पिढीत माझ्या आईवडिलांच्या दोघांच्याही बाजूला आमच्या कुटुंबात विद्येचे संस्कार स्थिर झाले होते. विद्यार्जन ही भावी आयुष्याच्या दृष्टीने सर्वात अधिक महत्त्वाची गोष्ट आहे याची जाणीव निर्माण झाली होती व यासाठी आर्थिक ताण सहन करावा लागला तरी चालेल, परंतु मुलांचे शिक्षण या गोष्टीला अग्रक्रमच राहिला पाहिजे असे वातावरण माझ्या घरी होते व माझ्या आजोळीही होते. माझ्यापुरतेच सांगावयाचे तर आर्थिक ताणाची झळ माझ्या वडिलांनी माझ्यापर्यंत कधीच पोचू दिली नाही आणि माझ्या एकूण नातेवाईकांच्या परिवारांतही आर्थिक ताण सहन करावा लागणारी अनेक भावंडे असली तरी मुलांचे निदान महाविद्यालयीन शिक्षण तरी पूर्ण झाले पाहिजे या प्रेरणेने सर्व धडपड चालू असे. मुलींचे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाले पाहिजे हा आग्रह माझ्या आजोळी नव्हता; माझ्या आई-वडिलांनी मात्र तोही आग्रह राखला.

आर्थिक अडचणी होत्या; परंतु त्या थोडा-फार ताण सहन करुन पार करता येतील इतपत होत्या. कुटुंबात आधीच्या पिढीत विद्येचे संस्कार दृढ झालेले असल्यामुळे ती अडचण नव्हती. उलट, एक उत्साहाचेच प्रेरक वातावरण होते. सामाजिक स्तरावर जाणवाव्यात अशा तर कोणत्याही अडचणी नव्हत्या.

ज्या कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमीतून विद्यार्थी महाविद्यालयात येतो त्याची छाया त्याच्या महाविद्यालयीन जीवनावर उमटणे अटळ असते. माझ्या कल्पनेतील महाविद्यालयीन जीवन हे प्रा. ना. सी. फडके यांनी ' कलंकशोभा ' या आपल्या कादंबरीत वर्णन केलेले, हलके-फुलके, प्रसन्न, उत्साही वातावरणाचे होते. ती एक यक्षभूमी किंवा स्वप्नभूमी होती. याच वातावरणात एल्फिन्स्टन महाविद्यालयातील वसतिगृहात मी माझ्या महाविद्यालयीन जीवनाची चार वर्षे आनंदात घालवली. एल्फिन्स्टन हे त्या काळातील अत्यंत अग्रेसर असे महाविद्यालय समजले जाई; परंतु वर्गातील व्याख्यानांतून मी काही विशेष शिकलो असे मला वाटत नाही. एक अग्रेसर महाविद्यालय म्हणून चांगले विद्यार्थी त्या महाविद्यालयाकडे आकृष्ट होत व बाहेरगावाहून येणारे चांगले विद्यार्थी वसतिगृहातील चार वर्षे एकमेकांच्या निकटच्या सहवासात असत. महाविद्यालयीन जीवनाच्या कालखंडात निकटचे असे जे स्नेही लाभतात त्यांवर महाविद्यालयीन जीवनाचा प्रमुख आशय अवलंबून असतो. मित्र हे कृत्रिमपणे जोडता येत नाहीत. आपल्या मनःप्रकृतीच्या प्रवृत्तीप्रमाणे व योगायोगाने आपले मित्रमंडळ तयार होत जाते. माझ्या जडण-घडणीत एल्फिन्स्टन महाविद्यालयाचा आहे त्याहूनही अधिक वाटा एल्फिन्स्टन महाविद्यालयाच्या वसतिगृहाचा आहे. माझ्या मित्रमंडळींच्या वर्तुळातील अनेकजण पुढे जीवनात यशस्वी झाले; काहींच्या जीवनाची दुर्दैवाने वाताहत झाली. परंतु एक गोष्ट मला स्पष्टपणे आठवते की यापैकी कोणाचीही जडणघडण महाविद्यालयाच्या वर्गात झाली नाही. समवयस्क, बुद्धिमान, उत्साही, कार्यक्षम तरुण मंडळी एकत्र आली तर आवडीच्या ग्रंथांच्या वाचनातून, मनमोकळ्या वादविवादातून, स्वच्छंद कार्यक्रमातून, त्यांच्या मनाचे जे पोषण होते ते वर्गातील व्याख्यानांनी होत नाही. अर्नेस्ट रेमंड याच्या ' थ्रू लिटरेचर टु लाइफ ' व जे. सी. पॉवीज याच्या ' दी मीनिंग ऑफ

कल्चर ' या पुस्तकांचा व माझा परिचय करून दिला याबद्दल मी माझ्या कालखंडातील अभ्यास-क्रमाचा कृतज्ञ आहे. एरवी एल्फिन्स्टन महाविद्यालयाविषयी मला कृतज्ञता वाटते ती वर्गातील व्याख्यानांविषयी नव्हे तर अनेक बुद्धीमान व गुणी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमुळे; त्या महाविद्या-लयात असणाऱ्या रसरसत्या वातावरणासाठी. परंतु जड ज्ञानाच्या भारापेक्षा लवचिक जिवंत जिज्ञासा अधिक महत्त्वाची आहे याची कोणालाच तशी जागरूक जाणीव नसताना ती जाग-विण्याचे श्रेय मला त्या कालखंडातील मित्रांच्या वर्तुळालाच, कोणताही हातचा न राखता, दिले पाहिजे.

परंतु माझी महाविद्यालयीन जीवनाची परिस्थिती ही एक विशेष सुदैवी अशी परिस्थिती होती. सामान्यपणे सुखवस्तू वरिष्ठ वा कनिष्ठ मध्यमवर्गातील विद्यार्थ्यांच्या वाट्याला येणारे ते महाविद्यालयीन जीवन होते. त्या काळात मला हे जाणवले नाही; परंतु आज जाणवते की, महाविद्यालयीन जीवनाचा विचार करणेही ज्याला अशक्य होते, व त्या जीवनात मोठ्या कष्टाने प्रवेश केलाच तर ज्याला तेथील जोवन कष्टमयच वाटावे, असा समाज हाच त्या काळचा खरा समाज होता.

श्री. शंकरराव खरात आणि मी एकाच वेळी कुलगुरू झालो. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण माझ्या महाविद्यालयीन शिक्षणाच्या कालखंडाच्या आसपासच्याच कालखंडात झाले. त्यांचे शिक्ष-णही फर्ग्युसन महाविद्यालयासारख्या प्रथितयश महाविद्यालयात झाले. या वर्षीच प्रसिद्ध झालेल्या आपल्या ' तराळ–अंतराळ ' या आत्मचरित्रात शंकरराव लिहितात :

" फर्ग्युसन कॉलेजमध्ये मुलं–मुली, टिप–टॉप ड्रेसमध्ये येत होती. त्यांच्याकडं मी बघत असे .. औंधहून जेव्हा मी कॉलेजला कोल्हापूरला निघालो होतो तेव्हा मी चांगल्या ' हरक ' नावाच्या कपडयाचे दोन नवे कॉलरचे शर्टस् व दोन पायजमे शिवले होते. माझ्या जीवनात बऱ्यापैकी शिवलेले तेच पहिले चांगले ' कपडे ' ! त्याच वेळी चपलांचा एक जोडही मी घेतला होता. लहानपणापासून मी अनवाणी पायानेच दिवस काढले होते. कॉलेजमध्ये जातानाच पहिल्यांदा माझ्या पायात चपला आल्या. हे नवे कपडे व नव्या चपला कॉलेजला घालून जाताना मी मना-तून हरकत असे; पण कॉलेजमधल्या मुलांचे भारी भारी कपडे पाहून मी चाटच पडत असे. त्यातच चांगल्या घरची मुलं रोज शर्ट बदलून येत. ते पाहून मला आश्चर्य वाटायचे. त्या काळी कॉलेजमध्ये ब्लू ब्लेझरचा वुलनकोट घालण्याची मुलांत फॅशन होती. तेवढा भारी कोट घेणं मला शक्यच नव्हतं.

" कॉलेजमध्ये क्लासात मी पुढच्या एक–दोन लाइनीतल्या बाकांवर बसत असे. ' वर्गात गैर-हजर राहून, काही विद्यार्थ्यांचे हजेरीचे दिवस कसे भरतात ' हा माझ्यापुढे एक प्रश्न असे. वर्ग सुरू होण्याच्या अगोदर मी वर्गात बसत असे. वर्ग सुटल्यावर बाहेर जात असे. कॉलेजच्या इतर ' ॲक्टिव्हिटीज् 'मध्ये मी सहसा कधी भाग घेतलाच नव्हता. सायंकाळी मात्र ग्राउंडवर क्रिके-टचा खेळ पाहात बसत असे.

" मी कॉलेजमध्ये शिकत होतो एवढेच ! पण कॉलेज-जीवनाचा जो आनंद लुटतात म्हणे, तो माझ्या वाट्याला कधी आला नाही. त्याला एकच मूळ कारण म्हणजे घरची गरिबी ! त्या-मुळे कॉलेजात मित्रकंपनी, ट्रिपा, पार्ट्या यांची काहीच मजा करता आली नाही. त्यात माझ्या ओळखीचेही विशेष कुणी नव्हते. माझा मी एकटाच. वर्गात एकटा, बाहेर एकटा ! माझ्याबरोबर माझी पुस्तकं व वह्या हीच खरी माझी कंपनी !

" गावच्या महाराचा मुलगा कॉलेज शिकतो ही गावाच्या कौतुकाची गोष्ट होती.... माझ्या गावातून माझ्या म्हारोड्यातल्या मित्रांचीही पत्रे मला येत होती. त्यातून गावात आंबेडकरी

चळवळीचे काय काय चालले आहे हे कळत होते. गावात आलेली 'जनता' तक्यात कोण वाचून दाखवते हे समजत होते. त्यातले माझे शाळकरी सोबती दगडू, विठ्ठल, पंढरी, सदा, रामू, दत्तू, कोण कुठं कुठं गेले याचीही मला खबर मिळत होती. माझे शाळकरी मित्र फुटलेले होते. कुणी कळम-शुगर फॅक्टरी गाठली होती. कुणी मुंबईला गेले होते. सदा, दत्तू वगैरे गावीच होते. पक्षी असे पांगले होते." (पा. ३३३-३३४)

नवयौवनाच्या काळात महाविद्यालयातील जीवनाचे ज्या एका गोष्टीमुळे एक अनामिक हुरहूर लावणारे आकर्षण वाटत असते त्या अनुभवाविषयी शंकरराव लिहितात :

"फर्ग्युसन कॉलेजात एफ. वाय. आर्ट्सला मुलीच मुली ! कार्तिक-भाद्रपद महिन्यात फुलांनी बहरलेल्या डवरलेल्या फुलांवर रंगीबेरंगी फुलपाखरं उडतात, फुलारतात तशा मुली दिसायच्या. ते फर्ग्युसन कॉलेज आणि त्यातल्या त्या मुली ! दिसायला सुरेख, देखण्या अन् कपड्यात एकदम टॉपमध्ये फॅशनेबल ! मुलंही तशीच. काय काय मुलं मुंगळ्यागत त्या मुलींच्या पाठीमागं लागत.

"त्यात मी नवीनच पुण्याच्या कॉलेजात. त्यात युनियन बोर्डिंगमध्ये. माझ्या हायस्कूलच्या ड्रेसमध्ये व कॉलेजच्या ड्रेसमध्ये विशेष फरक नव्हता. हायस्कूलमध्ये असताना हाफ-पँट व शर्ट आणि कॉलेजमध्ये आलो तेव्हा शर्ट-पायजमा घालत असे. त्या काळी पांढरा पायजमा-पांढरा शर्ट व त्यावर ब्लू ब्लेझरचा कोट घालणे ही मुलांत मोठी फॅशन होती. आता तो ब्लू-ब्लेझरचा कोट मला कसा परवडणार ! फॅशनेबल मुलं मुलींच्या पाठीमागं लागत असत. पिकनिक, गॅदरिंग, मंडळं यांत हीच मुलं आघाडीवर असत. पण त्यांचा डोळा मात्र मुलींवर ! ...

"आमच्या युनियन बोर्डिंगमध्ये एफ. वाय. आर्टस्-सायन्सपासून ते बी. ए., बी. एस्सी. पर्यंतची मुलं होती. त्यातली काही फॅशनबाज होती. ती मुलींच्यावर लाइनी मारत; पण त्या कोरड्या-फुसक्या ! पत्र्याच्या-तट्ट्याच्या खोलीत बसून कॉलेज मुलींच्याबाबत बंडलं ठोकत. त्यात 'आठ हात लाकूड, अन् नव हात ढलपी' असे. तीच बंडलं ऐकण्यात आम्ही ज्युनिअर मुलं रंगून जात असू. त्या वेळी मलाही क्षणभर वाटायचं, आपणही या बहाद्दरांच्यागत मुलींच्यावर लाइनी माराव्यात...कॉलेजलाइफ रंगवावं...पण मी कॉलेजच्या जीवनात कधी रंगलो नाही...ते कसं शक्य होतं ? तुम्ही कोणतंही सोंग आणू शकता, पण पैशाचं सोंग कसं आणणार ? आणि कॉलेजातल्या मधमाश्यांना पैशाच्या फुलांतूनच मध घावणार ! बोर्डिंगात चालणाऱ्या मुला-मुलींच्या सिंगल-डबल बंडल-मारीतच मी केवळ दंग होत असे. तो द्राक्षाचा वेल माझ्या हातापासून फारच उंच होता. त्यात कोल्ह्यागत उड्या मारण्यात काहीच अर्थ नव्हता, याची मला पूर्ण जाणीव होती." (पा. ३४२-३४३)

शंकररावांच्या त्या अनुभवाला त्यांच्या दारिद्र्याचे, सामाजिक स्थितीचे एक विशेष परिमाण होते; परंतु एरवी नवयौवनातील मुलींच्या परिचयाची उत्सुकता, सहवासाची ओढ, यांच्या निसर्गसहज प्रेरणांच्या प्रभावामुळे उड्या मारणारे कोल्हे युनिअन बोर्डिंगमध्ये जसे होते त्याचप्रमाणे एल्फिन्स्टन महाविद्यालयाच्या वसतिगृहातही होते. त्यात नवलही वाटण्याचे कारण नाही. हा एक सर्वकालीन सार्वत्रिक अनुभव आहे.

शंकररावांनी यापुढे वर्णन केलेला अनुभव विशेष आहे व पोशाखी सुखासीन महाविद्यालयीन जीवन व खडतर महाविद्यालयीन जीवन यातील अंतर स्पष्ट करणारा, त्याचप्रमाणे त्या जीवनाचे अंतिम ध्येयदर्शन करणाराही आहे. ते लिहितात :

"आमच्या त्या झोपड्या. आजूबाजूनं तट्ट्या, वर पत्रा. पुणे म्युनिसिपालटीने त्या प्लेगाच्या साथीत उभ्या केल्या होत्या. त्याच झोपड्या अण्णांनी (कर्मवीर भाऊराव पाटील) मिळवलेल्या

होत्या. ' युनियन बोर्डिंग ' वसतिगृह असा त्याच झोपडयांना बोर्ड लागला होता आणि त्याच झोपडयात आम्ही सुमारे तीस कॉलेज-विद्यार्थी राहून पुढचं शिक्षण घेत होतो.

" फर्ग्युसन कॉलेजच्या त्या टेकडीच्या पायथ्यालाच आमच्या बोर्डिंगच्या झोपडया होत्या. त्या टेकडीवरील थोरांची स्मारके आम्हाला स्फूर्ती देत होती. त्याच टेकडीच्या पोटात उत्तरेच्या बाजूला पांडवलेण्यांमधील देवळातील घाटींचा घणघणाट पहाटे गंभीर समयी आम्हाला आमच्या कर्तव्याची जाणीव देई आणि झोपडयांच्या तट्टयातून येणाऱ्या थंडी-वाऱ्यात अंगावर घोंगडी लपेटून कंदिलाच्या अंधुक उजेडात पुढे धरलेल्या पुस्तकात आमचे डोळे, मन, व्यग्र होऊन जाई. आमच्या झोपडया ऊन-पाऊस-वारा खात होत्या. त्यामुळे तट्टे मोडत होते. त्यांना मोठमोठी भोके पडत होतो. त्या तट्टयातले जुने जात होते व त्या जागी नवे येत होते. सालोसाल त्या झोपडयांतून उच्च श्रेणीचे उत्तीर्ण झालेले पदवीधर उजळ मुखाने बाहेर पडत होते. त्यातले आज अनेकजण उच्च पदे विभूषित करीत आहेत. खरे म्हणजे...रद्दीतून रत्ने बाहेर काढण्याचे पवित्र व श्रेष्ठ असे अण्णांचे कार्य चालू होते." (पा. ३४७)

वरील ' खरे म्हणजे ' या शब्दांपुढील टिंबे टिंबे मूळ पुस्तकाप्रमाणेच आहेत. हा भाग उद्धृत करताना उगाचच माझ्या मनात येऊन गेले : शंकररावांनी मूळ लेखनातच शैली म्हणून ही टिंबे टाकली असतील की आधी लिहिलेला काही भाग गाळताना ही टिंबे तेथे शिल्लक राहिली असतील ? त्या प्रत्येक टिंबात मला वैफल्याचे, दुःखाचे, असीम धडपडीचे, अनंत वेदनांचे सागर भासमान होतात.

हे सर्व येथेच थांबत नाही. आपल्या समाजजीवनातील विदारक वस्तुस्थितीचा साक्षात्कार त्यांच्या यापुढील परिच्छेदात आढळतो. शंकरराव लिहितात :

"आमच्या वसतिगृहाच्या बोर्डिंगच्या झोपडयांच्या मावळतीला माती-वडार, गाडी-वडार, दगडफोडे वडार, गवंडी वडार, यांच्या डबा-पत्र्याच्या, तट्टया-काथ्याच्या, पटकारांच्या, झोपडयाच झोपडया होत्या. त्या कायमच्याच तेथे तळ देऊन होत्या. त्यात पुन्हा कष्टकरी, गोरगरिबांच्या खोपटांची भर पडत होती. त्यांच्या झोपडयांत दारिद्र्याचा तळ पडलेला मला दिसत होता. त्यात अज्ञान नांदत होते. व्यसनांच्या वासांची दुर्गंधी सुटत होती. ते रोज रोज कष्ट करत होते, कसे तरी पोट भरत होते, जगत होते. आला दिवस घालवीत होते. सकाळीच पोटापाण्याचे आवरून, पोरं-लेकरं घेऊन झोपडयांतून माणूस बाहेर पडत असे. मग दिवसभर झोपडया शांत असत; पण दिवे-लागण झाल्यावर मध्येच कुठे तरी कालवा भडके. आरूड होई. माणसांचा गलगा होई. मग आम्हाला कळे, नवरा-बायकोचं भांडण...दादल्याने बायकोला मारले. खूप ठोकले आणि ती रक्ताने न्हाली. कधीकधी बायांच्या शिंदळकीवरून मारामारी होई. बापईगडी एकमेकांची डोकी फोडीत. रक्त बघूनच ते मागे सरत...असे ते जगत होते. त्यांच्यात कसली संस्कृती अन् कसली सुधारणा ! ते मरण्यासाठी जगत होते. ते आमचे शेजारी आणि आम्ही त्यांचे शेजारी ! ...

"आमच्या वसतिगृहाच्या बोर्डिंगच्या उगवतीला फर्ग्युसन कॉलेजच्या भव्य इमारती डोळयांत भरत होत्या. त्याचबरोबर बाजूला धनिकांचे लहान-मोठे टुमदार बंगले. भोवताली सुंदर बागबगीच्यांची किनार. बंगल्यात झळाळत भर्रकन् मोटारगाडी येत होती, पुन्हा बाहेर जात होती. आत भारी कपडे घातलेले गोरेगोमटे चेहेरे दिसत होते. त्यांच्या जगात सुख होते... सौंदर्य होते, संस्कृती होती. अशा परस्परविरोधी दोन संस्कृतींच्या...जीवनांच्या मध्येच आमचे वसतिगृह होते." (पा. ३४७-३४८)

यापुढचा परिच्छेद वाचला आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याविषयीची माझ्या मनातील आदरभावना अनंतपटींनी वाढली.

" अण्णा बाहेर आरामखुर्चीवर बसलेले होते. तेव्हा महत्त्वाचे एकच वाक्य बोलले...'या दोन परस्परविरोधी संस्कृतींच्या मधला दुवा आपण आहोत. हे मधले अंतर आपल्याला तोडावयाचे आहे...' आमच्या वसतिगृहातील प्रत्येक झोपडीत अण्णांच्या ध्येयवादाचे कोवळे रोपटे वाढत होते. अण्णा उन्हातान्हात, अनवाणी, उघड्या डोक्याने वणवण हिंडून त्याला अन्नपाणी घालत होते. त्यात काहींची वाढ होत होती. काही तरीही सुकत होती. " (पा. ३४८).

माझी महाविद्यालयीन जीवनाची वाटचाल व शंकररावांची वाटचाल ह्या सामाजिक व आर्थिकदृष्ट्या प्रगत व अप्रगत अशा विभिन्न वर्गांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन जीवनाच्या वाटचालींच्या प्रातिनिधिक रूप होत्या.

उच्चभ्रू संस्कृति व दलित संस्कृति यातील दुवा जोडण्याचे काम तुम्हाला करावयाचे आहे हा अण्णांचा मोलाचा संदेश होता. शेजारीच उभ्या असलेल्या फर्ग्युसन महाविद्यालयाच्या प्रवर्तकांनी समाजपरिवर्तनाचे ध्येय आपल्या नजरेसमोर ठेवूनच आपल्या कार्याला सुरुवात केली होती. नंतरही त्या संस्थेतील कार्यकर्ते हे ध्येय आपल्यासमोर ठेवूनच आपल्या क्षेत्रात कार्य करीत होते. लोकमान्य टिळक, आगरकर, नामदार गोखले, महर्षि कर्वे ही यांपैकी नंतर अखिल राष्ट्रात मान्यता पावलेली काही नावे. परंतु तरीही शिक्षणाचे प्रवाह दलित समाजापर्यंत नेऊन पोचवले पाहिजेत ही त्यांच्या विचाराच्या वा कार्याच्या मागली प्रभावी प्रेरणा नव्हती. ज्या कालखंडात व ज्या सामाजिक परिस्थितीत या सर्वांनी काम केले त्यातूनच ही त्यांच्या विचाराची व कार्याची कक्षा मर्यादित झाली होती.

जनसामान्यांशी असलेल्या आपल्या संपर्कातून अण्णांना याची जाणीव अगदी सहजपणे झाली आणि त्यांनी आपले कार्य प्रभावीपणे उभे केले. आपला व्यक्तिगत अभ्युदय, आपला कौटुंबिक अभ्युदय, आपल्या जातीचा विकास, यापलीकडे जाऊन आमूलाग्र समाजक्रांतीच्या दिशेकडे वाटचाल केली पाहिजे या त्यांच्या अंतर्गत विचारधारेचे दर्शन या उद्गारातूनच होते.

हे एक फारच महत्त्वाचे पुढचे पाऊल होते; परंतु संपूर्ण मार्गक्रमण केवळ या दिशेने जाऊनही होण्यासारखे होते काय ?

या व अशा प्रश्नांचा विचार करण्यापूर्वी अशा प्रश्नांच्या गुंतवळ्यात न सापडता महाविद्यालयातील विद्यार्थी–जीवनाचे जे निखळ स्वरूप असते ते पाहणे उपयुक्त होईल. परंतु त्या स्वरूपावर, आधीच्या विवेचनात व नंतरच्या विवेचनात निर्दिष्ट होणाऱ्या समस्यांची छाया पडणे केवळ अटळ असते एवढे अवधान ठेवणे उचित होईल.

## – २ –

महाविद्यालयीन जीवनाचा कालखंड केव्हा सुरू होतो हा थोडासा तात्त्विक चर्चेचा प्रश्न होऊ शकेल. अकरावी–बारावीत शिकणारे विद्यार्थी हे उच्च-माध्यमिक शालेय स्तरावरचे विद्यार्थी समजावेत की महाविद्यालयीन विद्यार्थी समजावेत हा वादाचा विषय होऊ शकेल; परंतु या तात्त्विक चर्चेत किंवा या वादात आपल्याला शिरावयाचे कारण नाही. अकरावी–बारावीच्या विद्यार्थ्यांचाही समावेश आपण आपल्या विषयाच्या विवेचनाच्या दृष्टीने करणे योग्य होईल असे मला वाटते. हा केवळ संदेहाच्या परिस्थितीत काही तरी एक भूमिका घेतली पाहिजे अशा स्वरूपाचा व्यावहारिक निर्णय नाही. या निर्णयासाठी आपल्याला काही सयुक्तिक कारणेही मांडावी लागतील. वयाची सोळा वर्षे हा दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण होण्याचा

कालखंड असतो. कुमार-अवस्थेचे वय संपवून याच वेळी मुलगा किंवा मुलगी मुग्धावस्थेतून यौवनाकडे वळत असते. एखाद्या संपूर्ण अज्ञात नवीन प्रदेशात पाऊल टाकताना साहसी प्रवाशाची जशी मनोभावना असावी तशीच भावना या वयातील प्रत्येक व्यक्तीच्या मनात असते. यानंतर आपल्यापुढे उलगडत जाणारा भावनेचा प्रदेश अनोखा असतो, विचारांचा प्रदेश अनोखा असतो व कर्तव्याचा प्रदेशही असाच अज्ञात आणि अनोखा असतो. स्त्री-पुरुषांच्या परस्पर परिचयाची, सहवासाची ओढ आणि हुरहूर तर या वयोगटात प्रत्येकाच्या मनाला लागत असते. जागरूक विद्यार्थ्यांच्या मनाला विविध नवविचारांचे संघर्ष साद घालत असतात. महाविद्यालयाच्या परिमित क्षेत्रातील कर्तृत्वाचे आव्हानही आपली कसोटी पाहणारे व आपला कस वाढवणारे आहे याचा अनुभव येत असतो. परंतु याहूनही, महाविद्यालयीन जीवनाची ही चार–सहा वर्षे दीर्घ वाटली तरी लवकरच संपणार आहेत व त्यानंतर आपल्याला जीवनसंग्रामात, व्यावसायिक क्षेत्रात उतरावयाचे आहे याविषयीची एक साशंक भावना या कालखंडात विद्यार्थ्यांच्या मनाला व्यापून राहिलेली असते. आपण आपले महाविद्यालयीन अभ्यासाचे यश या दृष्टीने सांभाळले पाहिजे ही एक स्वाभाविक चिंता सुप्त वा प्रकट स्वरूपात सतत त्याच्या मनाला जाचत असते आणि त्याचप्रमाणे पदवी मिळवल्यानंतर बाहेरच्या जीवनात त्या पदवीचे जे मोल असेल त्याची व आगामी घटनांची छायाही त्याच्या जीवनाच्या या कालखंडावर अटळपणे पडत असते. ज्या क्षेत्रात व्यावसायिक यशाची निश्चिती आहे त्या क्षेत्राकडे वळणारे विद्यार्थी व ज्या क्षेत्रात अशा यशाची केवळ अंधुकच आशा आहे अशा क्षेत्राकडे अगतिकपणे वळणारे विद्यार्थी यांच्या मनाच्या उत्साहात व उभारीत असलेला फरक सहजपणे जाणवावा इतका स्पष्ट असतो.

'That uncertain age' असा हा अनिश्चिततेने भरलेला जीवनाचा कालखंड असतो सोळाव्या वर्षाचे वळण घेतल्यानंतर पंचविशीचे वळण पार करीपर्यंत प्रत्येकाला आपल्या जीवनात या अनिश्चित आव्हानात्मक कालखंडातून जावे लागते. या दोन वळणांच्यामध्ये काही जण काही काळ प्रवाहपतित होऊन धारेला वहावत गेले, काहीजण भोवऱ्यात भिरभिरले, तरी बहुतेकजण ही वळणे यशस्वीपणे पार करून नंतर जीवनाच्या मुख्य प्रवाहात आपापली स्थाने घेतात. महाविद्यालयातील विद्यार्थी महाविद्यालयात जितके उच्छृंखल वागतात तितकेच पदवीधर होऊन बाहेर पडल्यावर समाजातही वागले असते तर समाजाची परिस्थिति फारच विपरीत झाली असती. ते तसे वागत नाहीत ही दिलासा देणारी गोष्ट आहे असे केवळ म्हणून भागणार नाही. महाविद्यालयीन जीवनाच्या कालखंडात ते असे विपरीत का वागतात याचाच खरे तर शिक्षण-क्षेत्रात काम करणाऱ्या व समाजरचनेचा विचार करणाऱ्या लोकांनी अंतर्मुख होऊन शोध घेतला पाहिजे.

गेली अनेक वर्षे मी शिक्षणक्षेत्रात मला असलेल्या काही कोड्यांचा सभा-संमेलनांतून निर्देश करत असतो. त्यातील काही मी कोठारी आयोगाच्या सदस्यांपुढेही मांडली होती. त्या कोड्यांमुळे आपल्या शिक्षणक्षेत्रातील मूलभूत समस्यांचे आकलन व्हावयास मदत होते म्हणून मी या ठिकाणी पुन्हा त्यांचा निर्देश करतो. त्यातील तीन कोडी अशी :

१. शिक्षणाचे क्षेत्र हे असे एकच क्षेत्र आहे की त्यामध्ये माणूस किंमत मोजतो; परंतु आपल्या पदरात योग्य तो माल पडतो की नाही, शेवटी केवळ एक कागदाचा कपटा देऊन रिकाम्या झोळीने आपल्याला परत पाठवले जाते की काय, याची चिंता करीत नाही. विद्यार्थी फी देतो; परंतु तास झाले नाहीत की त्याला आनंद होतो. महाविद्यालय कोणत्याही कारणाने बंद झाले तर त्याला तो सणाचा दिवस वाटतो. जो विद्यार्थी मंडईत गेला तर कोथिंबिरीच्या एका काडीसाठी हुज्जत घालील तोच विद्यार्थी महाविद्यालयात असे का वागतो ?

२. माझे दुसरे कोडे असे की, प्रत्येक प्राध्यापकाला, प्राचार्याला, कुलगुरूला, विद्यार्थ्यांच्या गैरशिस्त वागणुकीच्या तापाविषयी भय वाटत असते; परंतु हेच विद्यार्थी खाजगी शिकवण्यांच्या वर्गांना जातात, पहाटेपासून ते मध्यरात्रीपर्यंतच्या वेळा सांभाळतात, दाटीवाटीने, अडचणीने बसून किंवा उभे राहून वर्गात शिकवले जाणारे शिकतात, अनेक गैरसोयी सहन करतात आणि तरीही भारतात असे असंख्य वर्ग (अनेकदा महाविद्यालयांतील संख्येच्या तोडीचे) चालत असून आजवर एकदाही अशा वर्गात झालेल्या दंगलीचे वृत्त मी कधीही वर्तमानपत्रात वाचले नाही. असे का व्हावे ? विद्यार्थी करमणुकीसाठी महाविद्यालयात जातात व अभ्यासासाठी शिकवणीच्या वर्गांना जातात असे तर होत नाही ना ?

वेगळ्या भाषेत अनेकदा मी असे म्हणत असे : ‘प्राचार्य म्हणून मला जो पगार मिळतो तो केवळ वार्षिक स्नेहसंमेलनाच्या चार दिवसांच्या कामासाठी मिळतो. आणि पुढे मी सांगत असे : ‘विद्यार्थी महाविद्यालयाची जी फी देतात तीही केवळ या चार दिवसांसाठीच देतात !’

३. माझे तिसरे कोडे मी यापूर्वीच निर्देश केलेले आहे. विद्यार्थी जर मूलतःच इतके उच्छृंखल किंवा उन्मत्त असतील तर हेच विद्यार्थी महाविद्यालयातून बाहेर पडल्यानंतर पदवीधर नागरिक म्हणून सभ्यपणे वावरतात हे कसे घडते ?

पूर्वीच्या काळी एक नेहमीचे कोडे असेः घोडा अडला का ? भाकरी करपली का ? व पान सडले कां ? या तीनही प्रश्नांचे उत्तर एकच असे : ‘न फिरवल्यामुळे !’ वरील कोड्यांच्या उत्तराचेही थोडेसे असेच आहे. आपल्याला ही सर्व कोडी पडतात याचे कारण महाविद्यालयीन शिक्षणाचा हा सर्व खटाटोप कशासाठी करावयाचा या मूलभूत प्रश्नाकडेच आपले दुर्लक्ष होते व तथाकथित महाविद्यालयीन शिक्षणाचा प्रसार करणे व पदवीधरांच्या संख्येत वाढ करीत राहणे हेच केवळ आपले ध्येय आहे असे आपण समजून चालतो.

१९७८ साली राजकोट येथे झालेल्या भारतातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंच्या वार्षिक अधिवेशनात मी हेच थोडे अधिक कडवटपणे मांडले होते. ‘पदवीचा व नोकरीचा संबंध तोडून टाकावा’ असा प्रस्ताव बैठकीपुढे विचारासाठी होता. सर्वांची याला अनुकूलता दिसत होती. शेवटी मी म्हणालो, ‘पदवीचा व नोकरीचा संबंध तोडून टाकावा’ हे माझे कोठारी शिक्षण आयोगाच्या कालखंडापासूनचे मत आहे; परंतु कुलगुरू म्हणून अशा प्रस्तावाकडे पाहताना मला थोडे लाजल्यासारखे होते. नोकरीच्या दृष्टीने आम्ही देत असलेले शिक्षण तसे निरुपयोगीच आहे हे आपण आपल्या या भूमिकेतून मान्य केल्यासारखे होते. दुर्दैवाने ही गोष्टही फार खोटी नाही. मला तर अनेकदा वाटते आपण सर्वांना सांगावे : ‘You delink jobs from degrees; we have already delinked degrees from education !’ (तुम्ही नोकरी आणि पदवीचा संबंध तोडा, पदवीचा आणि शिक्षणाचा संबंध आम्ही कधीच तोडला आहे.) या माझ्या विधानाला अनेकजण नेहमी उत्स्फूर्त प्रतिसाद देतात; परंतु या विधानामागील वेदना मात्र हास्याच्या कल्लोळात फारच थोड्या लोकांच्या अंतःकरणाला स्पर्श करून जाते. We laugh to hide our tears (अश्रू लपवावेत म्हणून आम्ही हसतो) असा प्रत्यय येत नाही.

महाविद्यालयीन शिक्षणाची भारतातील ही शोकान्तिका आहे. आपले विद्यार्थी या परिस्थितीचे बळी आहेत. ही परिस्थती त्यांनी निर्माण केलेली नाही एवढे तरी आपण मान्यच करावयास हवे. आज भारतातील महाविद्यालयीन जीवन निःसत्त्व, खुरटल्यासारखे दिसते याचे कारण ही परिस्थिती आहे. प्रत्येक परिस्थितीवर मात करून काही दमदार व्यक्ती समाजात प्रत्येक क्षेत्रातच पुढे येत असतात; परंतु एकूण परिस्थिती योग्य असती तर अनेकांना जे सहजपणे शक्य झाले असते ते एखाद्याला प्रतिकूल परिस्थितीशी टक्कर देत कष्टाने साध्य करावे

लागते. यात त्या व्यक्तीचे कौतुक असले तरी समाजरचनेवरील मूळ दोषारोपाची तीव्रता त्यामुळे कमी होऊ शकत नाही आणि अशा काही व्यक्ती निर्माण होतात म्हणून माझ्यात काही दोषच नाहीत असे जर ती रचना सांगू लागली तर ते केवळ एक लंगडे आत्मसमर्थन राहणार नाही, तर लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न अशा स्वरूपाचा तो एक अक्षम्य अपराध होईल.

परंतु असे परिवर्तन होईपर्यंत देखील शक्य ती धडपड करीतच राहिले पाहिजे. मला आठवते, मी कुलगुरू झाल्यानंतर काही दिवसांनी माझ्या कार्यालयात एक प्राचार्य मला भेटावयास आले. ‘ मला फार वेळ नको आहे ’ असे त्यांनी कळवले. मला त्यांनी एकच प्रश्न विचारला. ते म्हणाले : “ मी सुमारे दहा वर्षे प्राचार्य म्हणून काम करत आहे. सामान्यपणे मी एक यशस्वी प्राचार्य म्हणून ओळखला जातो. परंतु या व्यवसायात का रहावे हे माझ्या लक्षात येत नाही ! ” मी त्यांना म्हटले : “ असा प्रश्न मनात येणारा एखादा तरी प्राचार्य मला भेटला याचे मला समाधान आहे. मी या प्रश्नाचा विचार एखाद्या सैनिकाच्या दृष्टिकोनातून करीत असतो. राष्ट्राचे रक्षण करावयाचे असेल तर सेना पाहिजे, सैनिक पाहिजेत व आजचे नेतृत्व कसेही असले व ती कितीही विस्कळित असली तरी माझ्या जागी प्रामाणिकपणे कार्य करीत राहण्याखेरीज मला दुसरा पर्याय नाही. तसे करणे आत्मवंचना ठरेल व राष्ट्रद्रोहही ठरेल. या दृष्टिकोनातून मी या कार्याकडे पाहण्याचा प्रयत्न करतो. (टेनिसनच्या Charge of the Light Brigade या कवितेचे मला स्मरण झाले :

“ Charge of the Light Brigade
Was there a man dismayed ?
Not though the soldiers knew
Someone had blundered. ” )

“ शिक्षणाचे क्षेत्र हे एक असेच महत्त्वाचे क्षेत्र आहे, या भूमिकेतून या क्षेत्राकडे पाहण्याचा दृष्टिकोण जर आपण स्वीकारला तरच तात्कालिक किंवा सततच्या निराशेवर, वैफल्याच्या भावनेवर, आपल्याला मात करता येईल. ”

प्राचार्य निरोप घेऊन निघून गेले. त्यांचे समाधान झाले की नाही मला माहीत नाही. माझे विवेचन मी मलाही पेलणार नाही इतक्या पातळीपर्यंत ताणले होते, असेही माझे मलाच वाटल्याखेरीज राहिले नाही. परंतु आजही या भावनेचा आधार न घेता या क्षेत्रात उतरणाऱ्या सजग मनांच्या भाळी शेवटी वैफल्यच लिहिलेले आहे व या भावनेने काम करणाऱ्याना मिळणारे मर्यादित यशही त्यांना वैफल्याच्या भावनेपासून वाचवू शकते अशी माझी श्रद्धा आहे, तसा माझा अनुभवही आहे.

आजच्या परिस्थितीत प्राध्यापकाला स्वतःला एक जातिवंत प्राध्यापक म्हणून वावरावयाचे असेल तर त्याला आपल्या विद्यार्थ्यांच्या खऱ्या हिताचे जतन करण्यात आपली शक्ती वेचली पाहिजे. तीच त्याची स्वतःची परिस्थितीच्या बंधनातून काही प्रमाणात तरी मुक्त होण्याची साधना आहे. ‘ याने आपल्या कुवतीप्रमाणे ज्ञानार्जन करण्याचा सतत प्रयत्न केला व आपल्या विद्यार्थ्यांवर मनापासून प्रेम केले. ’ एवढा स्मृतिलेख आपल्याविषयी लिहिला गेला तर खऱ्या प्राध्यापकाला कृतकृत्य व धन्य वाटले पाहिजे. जिव्हाळ्याच्या भावनेने ओथंबलेला जो ताम्रपट फर्ग्युसन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मला दिला त्याच्यापुढे मला मिळालेले इतर सर्व मानसन्मान माझ्या दृष्टीने गौण आहेत.

गुन्हेगारी वृत्ती असणारे विद्यार्थी महाविद्यालयात येत नसतील असे विधान मी करणार नाही. परंतु ‘ निखालस दुष्ट प्रवृत्तीचा ’ असे ज्याचे वर्णन करता येईल असा एकही विद्यार्थी

मला माझ्या आजवरच्या महाविद्यालयीन अनुभवात आढळला नाही ही गोष्ट खरी. वाह्यात वर्तन करणारे, लपून गोष्टी करत असताना 'आम्हाला कसे ते पकडून दाखवा' असे जवळजवळ आव्हान देणारे, अनेकजण भेटले. परंतु पकडल्यानंतर निर्लज्ज निगरगट्टपणा दाखवणारे कोणी भेटले नाही; पालकासमोर उभे केले असता विरघळला नाही असा कोणी भेटला नाही. योग्य कारणासाठी कडक शिक्षा केली तर मनात नंतर खुनशी दुष्टावा धरला असाही कोणी भेटला नाही. कदाचित हा माझा एक व्यक्तिगत अपवादात्मक योगायोग असेल.

विद्यार्थी हा महाविद्यालयीन जीवनाचा केन्द्रबिंदु आहे हे लक्षात घेतले व सोळा ते वीस-एकवीस या वयाच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक व भावनात्मक कालखंडात त्याचे व्यापार कसे चालू असतात हे लक्षात घेतले की महाविद्यालयीन जीवनाचे गुंतागुंतीचे वाटणारे अनेक पदर आपोआप उलगडू लागतात. कर्तृत्वाची नवी क्षितिजे या नवयुवकांना दिसत असतात. आपणही काही तरी करावे, लोकांचे लक्ष जाईल असे नाव कमवावे, अशी एक अबोध असोशी असते. यातूनच तरुणांना ज्या क्षेत्रात झपाटचाने कीर्ति मिळते अशा क्रीडापटूंच्या यशाकडे, नटनटचांच्या यशाकडे कौतुकाने पहावे व त्या दिशेने जावे असे वाटू लागते. बाहेर क्रांतीचे वातावरण असेल तर जनमानसावर चटकन प्रभाव टाकील व आपले नाव करील असे काही धाडसाचे कृत्य करावे अशी ऊर्मी निर्माण होते. मूळ ऊर्मीचा जोम व परिस्थितीचे दडपण यातूनच त्या ऊर्मीचा बाह्य जगाला दिसणारा आविष्कार निर्माण होतो. माझ्या विद्यार्थीदशेच्या काळात आमच्या वसतिगृहातील भिंतीवर नटचांची चित्रे असत, क्रीडापटूंची असत, सशस्त्र क्रांतिकारकांची असत. अनेकदा ही सर्व मंडळी एकाच भिंतीवर गुण्यागोविंदाने एकत्र नांदत असत.

I slept and dreamt that Life is Beauty
I woke and found that life is Duty
या ओळी व आल्फ्रेड नॉइस या कवीची
Play up, Play up and Play the game
ही ओळ माझ्या खोलीतील भिंतीवर होती.

स्वातंत्र्यवीर सावरकरांचा एक बंदुकधारी फोटो होता व त्याच्याखाली 'पदोपदी पसरुन निखारे आपुल्याच हाती' आदि कुसुमाग्रजांच्या कवितेतील ओळी होत्या. हा सर्व प्रामुख्याने त्या वयोमानाचाच परिणाम होता हे आज जाणवते आणि तरीही 'ते दिवस गेले' ही खंत मनाला स्पर्श केल्याखेरीज रहात नाही.

How sad and bad and mad it was
And yet how it was sweet.
अशीच माझी त्या दिवसांविषयीची भावना आहे व निरंतर राहील.

मूळ ऊर्मीचा जोर व बाह्य परिस्थितीचे दडपण यांच्या गुणोत्तरातून विद्यार्थ्यांच्या जीवनाचा प्रकट आविष्कार होत असतो. ही ऊर्मी स्वभावपरत्वे प्रत्येक विद्यार्थ्याची वेगवेगळ्या आवेगाची असू शकते. परंतु सर्व राष्ट्रांत व सर्व पिढ्यांत या ऊर्मीचा जन्मजात आंतरिक वेग सरासरीने सारखाच असतो असे मानणाऱ्यांपैकी मी आहे. त्यामुळे आमचे तरुण प्रत्येक क्षेत्रात प्रगत राष्ट्रातील तरुणांच्या तुलनेने सामान्यपणे कमी ठरतात असा अनुभव आला तरी माझ्या मनात तरुणांच्याविषयी अविश्वास निर्माण होत नाही तर परिस्थितीचे केवढे दडपण झुगारून देण्यातच या तरुणांना आपली शक्ति खर्च करावी लागत आहे इकडे माझे अवधान जाते व ही परिस्थिती बदलण्याच्या आड भारतात आज ज्या शक्ती उभ्या आहेत त्यांच्याविषयी द्वेषाची भावना निर्माण होते.

या वातावरणात विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करणे ही वाटते तितकी सरळ सोपी गोष्ट मात्र नाही. विद्यार्थ्यांच्या स्वतंत्र कर्तृत्वाला वाव दिला पाहिजे व त्यांच्या प्रागतिक विचारांचा पाठपुरावा केला पाहिजे याचेही अवधान राखावे लागते. पालकांचा व शिक्षकांचा योग्य तो मान तर त्याने राखला पाहिजे, परंतु त्याचबरोबर या दोघांच्या सद्भावप्रेरित परंतु अंतिमदृष्टचा अहितकारक अशा दडपणाला तो बळी पडणार नाही हे पहावे लागते. माझ्या दोघा विद्यार्थी-विद्यार्थिनींनी हे माझ्या तीव्रपणे लक्षात आणून दिले. ही दोघेही एकमेकांवर अनुरक्त होती व त्यांच्या कुटुंबियांना व एकूण समाजालाही त्यांचा विवाह मान्य होण्यासारखी परिस्थिती नव्हती. मी त्या दोघांना बोलाविले आणि सांगितले : ‘ तुमचा प्राचार्य-पालक या नात्याने मला ही गोष्ट तुमच्या पालकांना तरी कळवलीच पाहिजे. ’ ती मुलगी म्हणाली, ‘ सर, आमच्या प्रेमात जर तुम्हाला काही अयोग्य वाटत नसेल तर प्रागतिक विचारसरणीचे म्हणूनही या प्रश्नाचा तुम्ही विचार करावयास नको का ?’

त्यानंतर काही महिन्यांनी त्या उभयतांचे एक Season's Greeting Card मला आले. ‘ To Principal Dabholkar, Educational Administrator and also a Marriage Counsellor.’ असा निर्देश लिहून त्यांनी ते माझ्याकडे पाठवले होते.

राजकीय स्वातंत्र्याच्या कल्पनेने भारलेले आपल्या वा अन्य राष्ट्रातील तरुण ज्या वेळी समोर येतात त्या वेळी तर याहूनही कठीण कसोटीचा प्रसंग असतो. आपल्याकडे हे युवक चर्चेसाठी, मार्गदर्शनासाठी येतात याचा एका बाजूने अभिमान वाटत असतो; तर त्याच वेळी त्यांच्या उत्कट भावनेच्या तुलनेत आपले जीवन तोलून पाहिले की उणेपणाची जाणीव मनाला आतल्या आत टोचू लागल्याशिवाय रहात नाही.

‘ That uncertain age ’चे हे मंतरलेले दिवस असतात. शालेय जीवनात अनुभव असलेल्या उबदार व संरक्षक अशा कौटुंबिक कवचातून विद्यार्थी बाहेर पडत असतो. कदाचित तो आपल्याच गावी व आपल्या कुटुंबात रहात असला तरी नव्या वयात त्याची मानसिक धडपड या कोषातून बाहेर पडून आपले स्वतंत्र पंख उभारण्याचीच असते. महाविद्यालयात तो प्रथम पदार्पण करतो तेव्हा त्याला आपल्या आजूबाजूला असे अनेक समानधर्मी विद्यार्थी दिसतात. नव्या वातावरणात एकाकी पडल्यासारखे वाटू नये म्हणून कोणत्या तरी एखाद्या मित्रमंडळींच्या गटात तो सामील होतो. स्वभावाच्या, उपक्रमशीलतेच्या, सामाजिक वा आर्थिक परिस्थितीच्या भिन्नतेप्रमाणे सामान्यपणे हे गट बनतात.

देशभक्तीच्या किंवा क्रांतीच्या कल्पनेने भारलेल्या तरुणांचा एखादा छोटा गट प्रत्येक पिढीत असतो. त्यातील काहींचे भारणे खरे असते, तर काहींचे त्यांनाही नकळत परंतु नकली असते. कौटुंबिक जबाबदारीविषयी वाटणारी भीती किंवा अभ्यासक्रमातील आपल्या यशाविषयी वाटणारी आशंका यातून हे नकलीपण सामान्यपणे निर्माण होत असते. आपल्याभोवती एखादे वलय निर्माण करून आपला पलायनवाद लपविण्याचा तो प्रयत्न असतो. या गटाहून संख्येने मोठा (परंतु फार मोठा नाही) असा गट केवळ अभ्यासात व पाठ्यपुस्तकात लक्ष घालणाऱ्यांचा असतो. हे लोक प्रामाणिक असतात, कष्टाळू असतात; परंतु अभ्यासाखेरीजही काही विविध रंगी जीवन आहे व त्याचा विकास करणे हे देखील महत्त्वाचे आहे, याचे त्यांना भान नसते. शिक्षणव्यवस्था त्यांना हे भान आणून देत नाही व दुर्दैवाने, ते इतक्या कष्टाने आपले लक्ष ज्या अभ्यासावर केंद्रित करीत असतात, त्याचा कस योग्य राहील याचीही दक्षता शिक्षणव्यवस्था घेत नसते. (‘तुला खरे ज्ञानार्जन करावयाचे असेल तर तू महाविद्यालयातून नाव काढून टाक! ’ हा विनोबाजींनी एका विद्यार्थ्याला दिलेला सल्ला, हा खरोखर विद्यार्थ्याला दिलेला सल्ला

नसून आपल्या संपूर्ण शिक्षणव्यवस्थेला दिलेला इशारा आहे.)

'क्रांतिकारक' व 'अभ्यासजड' अशा या दोन छोट्या गटांच्या टोकांच्या मधल्या अंतरात विविध प्रवृत्तींप्रमाणे छोटे-मोठे गट असतात; परंतु विधायक कामाच्या वा आत्मविकासाच्या दृष्टीने सामान्यपणे ते निःसत्त्व असतात. बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन जीवनावरील छाया ही न्यूनगंडाने ग्रासलेल्या क्रियाशून्यतेची, व जे कोणी काही करत असतील त्यांना सामूहिक हशा आणि विकृत टाळ्या यांनी नाउमेद करून आपल्या क्रियाशून्य पातळीपर्यंत खाली ओढण्याच्या प्रवृत्तीची असते. व्यक्ती म्हणून माझ्यात काहीच विशेष गुण नाहीत ही मनाला आतून टोचणारी न्यूनगंडाची भावना असते. असा न्यूनगंड असणारे आम्ही अनेकजण जर एकत्र आलो तर 'हशा आणि विकृत टाळ्या' यांच्या सहाय्याने व सामूहिक उच्छृंखलतेच्या बळावर आम्ही कोणताही कार्यक्रम विफल केल्याचे साफल्य मिळवू शकतो व आपल्या न्यूनगंडाचे काही प्रमाणात तरी परिमार्जन करू शकतो, ही भावना याच्या पाठीशी असते. मेंढ्यांत ज्याप्रमाणे काही शेळ्या असतात त्याप्रमाणे या न्यूनगंडाने पछाडलेल्या झुंडीत तशाच न्यूनगंडाने पछाडलेले परंतु तरीही आपला अहंगंड त्यातल्या त्यात जपण्याचा प्रयत्न करणारे, Cheer-leaders असतात.

माझ्या विवेचनाच्या एका मुख्य सूत्राचा पुनरुच्चार करावयाचा तर एखाद्या राष्ट्राची एखादी युवकांची संपूर्ण पिढीच्या पिढी न्यूनगंडाने पछाडलेली असते ही भूमिकाच मला कधी मान्य होण्यासारखी नाही. नवयुवकांच्या सुप्त कर्तृत्वशक्तीला कार्याचे धुमारे फुटावेत, त्यातून त्यांचे जीवन विकसित व्हावे व त्यांचा कर्तृत्वशक्तीचा कस उत्तरोत्तर वाढत जावा यासाठी जे योग्य वातावरण आसपास असावे लागते व आवश्यक ती परिस्थिती निर्माण करावी लागते ती अस्तित्वात नसली की, कर्तृत्वशून्यतेचा न्यूनगंड स्वाभाविकपणेच मनात निर्माण होतो व मूळ मानसात कर्तृत्वाची जी उभारी असते ती या न्यूनगंडाचे शमन करण्याच्या प्रयत्नात वाह्यात सामूहिक अहंगंडाचे रूप धारण करते. केवळ काही आखीव-रेखीव कागदी रचना करून यातून बाहेर पडता येत नाही. आपल्या देशातील युवकांचे क्रीडाक्षेत्र, एन्. सी. सी., एन्. एस्. एस्. या सर्वांचे कार्य पाहिले तर मुख्य प्रेरणा कधीच न गवसलेल्या या रचना आहेत हे फारसा वादविवाद न होता मान्य होऊ शकेल असे मला वाटते.

एक-दोन माझ्या अनुभवातील गोष्टी सांगून हे थोडे अधिक स्पष्ट करतो.

क्रिकेटच्या सामन्यांच्या काळात आपल्याकडे शहरात आढळणारे वातावरण आपल्या सर्वांच्या परिचयाचे आहे. शालेय जीवनात मी नेमाने संध्याकाळी क्रीडांगणावर जात असे. (नंतर महाविद्यालयीन विद्यार्थी-जीवनात हे कधी केले नाही हेही आता महाविद्यालयीन जीवनाचा आशय या विषयाचा विचार करताना आठवते.) भारतीय खेळ मी उत्साहाने खेळलो आहे. क्रिकेट, हॉकी आदि खेळही त्या काळात खेळलो आहे. यापैकी कोणत्याच खेळात माझी कनिष्ठ दुय्यम स्तराच्यावर कधीच प्रगती होऊ शकली नाही. याचे मला त्या वेळी दुःख वाटत असे व यशस्वी होणाऱ्या क्रीडापटूंची मनातून असूया वाटत असे. क्रीडांगणावर उत्साहाने उतरणे हीच खरी महत्त्वाची गोष्ट आहे, हे मला नंतर उमगले. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या जिमखाना प्रतिनिधींच्या प्रतिवार्षिक पहिल्या बैठकीमध्ये ज्या वेळी मी त्यांना सांगत असे की, माझ्या दृष्टीने फर्ग्युसन महाविद्यालय आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांत यशस्वी होते की नाही यापेक्षा फर्ग्युसन महाविद्यालयाच्या एकूण विद्यार्थ्यांपैकी किती विद्यार्थी नियमाने खेळण्यासाठी क्रीडांगणावर येतात ही अधिक महत्त्वाची गोष्ट आहे आणि फर्ग्युसन महाविद्यालय एखादी मॅच जिंकते की हरते यापेक्षा ती जिंकताना किंवा हरतानाही माझे विद्यार्थी कोणत्या वृत्तीने व किती

खरी खिलाडू वृत्ती दाखवतात हे अधिक महत्त्वाचे आहे. त्या वेळी हे माझे विधान विद्यार्थी-प्रतिनिधी व या क्षेत्राशी त्या वर्षापुरते संबंधित प्राध्यापक शांतपणे ऐकून घेत; परंतु क्रीडा-क्षेत्राविषयीच्या माझ्या प्रेमाविषयी व फर्ग्युसन महाविद्यालयाच्या या क्षेत्रातील यशाच्या आस्थेविषयी त्यांच्या मनात ते बोलून दाखवत नसलेली शंका निर्माण होत असावी असे मात्र मला माझे विधान पूर्ण केल्यानंतर वाटल्याखेरीज राहात नसे.

क्रिकेटविषयी माझा आजचा उत्साह हा फार पूर्वी किनाऱ्यावर आदळून गेलेल्या लाटेची एक मागे उरलेली पुसटशी खूण आहे. त्यामुळे आज-काल क्रिकेटच्या क्षेत्रातील तपशिलाकडे माझे लक्ष रहात नाही. (परंतु पुरेसा वेळ असेल तर, शेजारच्याच मैदानात बालचमूंची चाल-लेली 'अटीतटी'ची मॅच पाहताना, एखादी टेस्ट मॅच पहात असताना मिळत असणारा आनंद आज अजूनही मला वाटतो.) मला आठवते त्याप्रमाणे मी फर्ग्युसनचा प्राचार्य असताना एक टेस्ट मॅच भारताने जिंकली होती. तीस-पस्तीस विद्यार्थी उत्साहाने माझ्या खोलीत आले व 'आपण आज सुट्टी जाहीर केली पाहिजे!' असा आग्रह धरू लागले. मी त्यांना म्हटले : "एखादी कसोटी-मालिका जिंकली म्हणून इतर कोणत्या राष्ट्रात सुटी जाहीर केली गेली असे तुम्ही कधी ऐकले आहे किाय ? हा साठ कोटी लोकसंख्येचा देश केवळ एक मालिका जिंकली म्हणून इतका हुरळून जातो असे दृश्य दिसले तर इतर राष्ट्रे आपले काय मूल्यमापन करतील ?"

विद्यार्थ्यांचा उत्साह काही एवढ्याने सहजपणे उपशम होण्याइतका कमी नव्हता. शेवटी मी त्यांना म्हणालो की, मी 'तुम्हाला क्रिकेटविषयी काही प्रश्न विचारतो त्यांची उत्तरे तुम्ही मबरोबरदलीत तर मी सुट्टी जाहीर करीन!' मी त्यांना काही प्रश्न विचारले.

'एल्. बी. डब्ल्यू.' चा नेमका नियम काय आहे ?

'गुगली बोलिंग' म्हणजे काय ?

'टाय टेस्ट' हे काय प्रकरण झाले ?

विनू मंकडने एका टेस्टमध्ये इंग्लंडच्या संघाशी कशी रोमहर्षक एकाकी झुंज दिली ?

कुणालाही समाधानकारक उत्तरे देता आली नाहीत. (या गोष्टीचेही खरे तर मला दुःख आहे.) मी त्यांना शांतपणे म्हणालो, 'आता तुम्ही आपापल्या वर्गाकडे जाऊ शकता!' आणि विद्यार्थी थोडेसे वरमून परतले.

नंतर याच विद्यार्थ्यांपैकी एक जण काही वर्षांनी रोटर-ॲक्टचा प्रमुख पदाधिकारी झाला. त्यांच्या एका समारंभात प्रमुख पाहुणा म्हणून माझा परिचय करून देताना त्याने ही गोष्ट सांगितली व मी त्या सर्वांना कसे वाटेला लावले हे कौतुकाने व आदराने सांगितले. माझ्या नाला आतून थोडे समाधान वाटले.

मला त्या माझ्या विद्यार्थ्यांचा उपहास मुळीच अभिप्रेत नाही. जी शैक्षणिक पद्धती आपल्या नवयुवकांना याच पातळीपर्यंत आणून पोचवते त्या शैक्षणिक पद्धतीविषयीची उद्विग्नता माझ्या मनात आहे.

यातून आजच्या घडीला कोणताच मार्ग उपलब्ध नाही का ? संपूर्ण रचना बदलण्यासाठी प्रयत्नशील राहणे हा एक भाग झाला; परंतु ती बदलली जात नसली तरीही आपापल्या जागी करता येण्यासारख्याही अनेक गोष्टी असतात. 'या परिस्थितीत काही होऊच शकणार नाही' अशा विचाराचे प्रावरण ओढून आपली निष्क्रीयता लपवण्याचा प्रयत्न करावासा वाटणे ही एक स्वाभाविक मानवी वृत्ति आहे; परंतु अशा निष्क्रीयतेत आपल्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकासही आठरून जातो हे लक्षात आले तर निदान स्वतःच्या मानसिक उल्हासासाठी या

वृत्तीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करण्याची प्रेरणा निर्माण होऊ शकते.

आपल्याला ज्या ज्या विषयात, ज्या ज्या कालखंडात, रस वाटत असेल त्या त्या विषयात रस असणाऱ्या विद्यार्थ्यांना एकत्र आणून त्या छोट्या गटाशी आवश्यक तितका काळ संपर्क राखला तर त्यातूनही आपल्यापुरते व त्या विद्यार्थ्यांपुरते जिवंत उत्साही वातावरण निर्माण होऊ शकते. 'काही तरी' केले पाहिजे अशा कृत्रिम किंवा अपराधी भावनेतून मात्र हे गट निर्माण होता कामा नयेत. लहान-मोठा कसाही का असेना मात्र तो जिवंत झरा असावयास हवा.

पुन्हा एकवार एक उदाहरण देऊन ही गोष्ट स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतो.

'यातून काही होणारच नाही' अशा तीव्र 'सिनिसिझम्'च्या कालखंडातून मी स्वतः गेलेलो आहे. त्यामुळे या वृत्तीच्या लोकांची भावनाही प्रामाणिक असू शकते याविषयी माझ्या मनात शंका नाही. माझ्या सुदैवाने या कालखंडात मला जे काही सहकारी-मित्र मिळाले त्यांच्या सहवासामुळे, त्यांनाही नकळत, मी या भावनेच्या प्रभावातून मुक्त झालो. यामुळेच त्यानंतर 'I may be defeated a thousand times but I will not feel frustrated.' अशा प्रकारची माझी वृत्ती बनली. माझ्या प्रयत्नांमुळे शिक्षणक्षेत्रात काही परिवर्तन घडेल असा अहंकार मला कधी नव्हता व आजही नाही; परंतु शेवटी मुक्कामावर पोचता आले वा आले नाही तरी मार्गक्रमगातच आनंद आहे. असा प्रत्यय ज्याला आला त्याचा प्रवास त्याच पावला-पासून व निरंतरचा सफल झाला असे निश्चितपणे म्हणता येईल. हे ज्यांना मान्य असेल त्यांनाच माझ्या मनातील आशय स्पष्ट होऊ शकेल असे मला वाटते.

कालपरत्वे व माझ्या उत्साहपरत्वे ज्या ज्या वेगळ्या गटांत मी समरस झालो त्यात सुमारे पंचवीस-तीस वर्षांपूर्वी फर्ग्युसन महाविद्यालयातच प्राध्यापक म्हणून काम करीत असताना मी एक वर्ष चालवलेल्या वक्तृत्वकला अभ्यासगटाची मला आठवण आहे.

हा एक वीस-पंचवीस विद्यार्थी-विद्यार्थिनींचा गट होता. गटात प्रवेश मिळविण्यासाठी कोणतीही फी नव्हती; परंतु दोन अटी होत्या. या गटात सामील होणाऱ्या कोणत्याही विद्यार्थी-विद्यार्थिनीने त्यापूर्वी कधी वक्तृत्वात भाग घेतलेला असता कामा नये ही पहिली अट होती. दुसरी अट अशी होती की, मी सांगेन त्या वेळी सदस्याने आपले विचार व्यासपीठावर येऊन मांडलेच पाहिजेत. ते जर त्याला अशक्यच वाटले तर त्याने निदान 'मी आज माझे विचार मांडू शकत नाही याबद्दल दिलगीर आहे.' एवढे तरी व्यासपीठावर येऊन सांगितलेच पाहिजे !

एक वर्षभर हा वर्ग चालला. नंतर माझी बदली होऊन मी सांगलीला गेलो. तेथे अचानक एके दिवशी मला एक कार्ड आले. "सर, तुम्ही मला विसरला असाल; परंतु मी तुमच्या वर्गात येत होते. एके दिवशी मी बोलायला कचरत असताना 'मी बोलू शकत नाही' एवढे तरी तू व्यासपीठावरच येऊन सर्वांना सांगितले पाहिजे असा आग्रह तुम्ही धरला आणि म्हणून मी त्या दिवशी तेवढे बोलले. आज मी हे पत्र तुम्हाला यासाठी लिहीत आहे की, आंतरमहा-विद्यालयीन वक्तृत्वस्पर्धेत मला पहिले बक्षीस नुकतेच मिळाले आहे."

हे श्रेय कुणाचे होते ? निःसंशयपणे तिच्या अंगातील निसर्गदत्त गुणांचे होते. शिक्षकाचे श्रेय, हे गुण आपल्या ठिकाणी आहेत याची विद्यार्थ्याला जाणीव करून देणे व त्या गुणांच्या विकासाचा मार्ग दाखविणे व शक्य तर त्या गुणविकासाला आपल्या व्यक्तिगत कुवतीप्रमाणे काही टप्प्यांपर्यंत मदत करणे, एवढेच राहू शकते.

त्यानंतर वक्तृत्वकलेचा असा वर्ग मी कधी घेतला नाही. माझ्या आवडीनिवडींनी, उत्साहाने, अनेक वळणे-आडवळणे घेतली; परंतु आपल्याला काही उत्साहाने करावेसे वाटले तर एका

विद्यार्थ्यांचाही प्रतिसाद मला पुरेसा वाटतो आणि असे वाटले व असा प्रतिसाद देणारा एकही विद्यार्थी भेटला नाही अशी खंत माझ्या मनात राहिली अशी एकही माझ्या उत्साहाची ऊर्मी मला आठवत नाही.

महाविद्यालयातील चाकोरीबद्ध अभ्यासक्रमापलीकडे जाऊन होणाऱ्या या क्रिया-प्रतिक्रिया यांनी खरे तर महाविद्यालयातील जीवन फुलत असते, विद्यार्थ्यांचे व त्याचबरोबर त्यांच्या प्राध्यापकांचेही. असा उत्स्फूर्त वसंत, भावनेच्या, बुद्धीच्या, कृतीच्या, क्षेत्रात ज्या ठिकाणी बहरत नाही त्या ठिकाणी 'आला वसंत आला' म्हणून कितीही आभास निर्माण करण्याचा प्रयत्न केला तरी तो विफल आहे. आजच्या एकूण परिस्थितीत एखाद्या महाविद्यालयात असे एखादेच जिवंत रोपटे दिसले तरी ते त्या महाविद्यालयाच्या जिवंतपणाची खूण म्हणून मानावयास मी तयार आहे.

'Let a Hundred flowers bloom.' असे मी म्हणणार नाही. कारण त्याचे वेगळेच प्रतिध्वनी आपल्या मनात साहजिकपणेच उमटतात; परंतु अशी सहस्रावधी फुले प्रतिवर्षी उमलण्याच्या आड काही खऱ्या अडचणी उभ्या आहेत असे मला वाटत नाही. प्रत्येक प्राध्यापकाच्या जीवनात खऱ्या उत्साहाचे कोणतेही एखादे कारंजे उडत असले की तेवढे त्यासाठी पुरेसे आहे. एखादा तरी खरा तृषार्त विद्यार्थी त्या प्राध्यापकाला भेटल्याखेरीज रहाणार नाही. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी चालू राहू शकेल अशी ही चैतन्यमय प्रक्रिया आहे.

## — ३ —

शैक्षणिक व्यवस्थेचे संपूर्ण नियोजन व त्या नियोजनाची कार्यवाही करण्याची ज्यांची जबाबदारी आहे त्यांना मात्र प्रत्येक प्राध्यापकाने अशा प्रकारे काम केले की पुरेसे आहे असे म्हणून अंग झटकून मोकळे होता येणार नाही. विद्यार्थी महाविद्यालयात कोठून येतो ? त्या पार्श्वभूमीचे त्याच्यावर कोणते परिणाम झालेले असतात ? तो का येतो ? त्याच्या महाविद्यालयीन शिक्षणापासून कोणत्या अपेक्षा असतात ? तो कसा येतो ? त्याच्यापुढे त्यामुळे महाविद्यालयात कोणत्या प्रकारच्या अडचणी उभ्या राहतात? याचा विचार शिक्षण-व्यवस्थेला केला पाहिजे. महाविद्यालयात असताना विद्यार्थी काय, कसे व का शिकतो याचेही अवधान या व्यवस्थेला ठेवले पाहिजे. शिक्षण पूर्ण होऊन पदवी घेऊन विद्यार्थी बाहेर पडला की त्यानंतर त्याचे काय होते ही आमची जबाबदारी नाही असे कदाचित् एखाद्या महाविद्यालयाला म्हणता येईल, परंतु संपूर्ण शिक्षणव्यवस्थाच तसे म्हणू लागली तर सुलभ नोकरी-व्यवसायाच्या कालखंडात तिच्याशी कोणी वाद घालणार नाही; परंतु समाजात या शिक्षणव्यवस्थेतून केवळ सुशिक्षित बेकारांच्याच संख्येत वाढ होत आहे असे आढळून आले तर ती शिक्षणव्यवस्था व शेवटी ती राज्ययंत्रणादेखील कोलमडून पडल्याखेरीज राहणार नाही.

कोणत्याही शिक्षणव्यवस्थेचा कस खालील गोष्टींवर ठरत असतो :

१. राष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीच्या अंगभूत गुणांच्या विकासाला ती पुरेपूर वाव देते की नाही ?

२. या गुणविकासाचा राष्ट्राच्या एकूण उभारणीचा अनुबंध ती कसा राखते ?

३. आंतरराष्ट्रीय तुलनेत—विशेषतः लष्करी सामर्थ्याच्या किंवा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेच्या क्षेत्रात ज्या राष्ट्रापेक्षा आपल्याला अग्रेसर राहिलेच पाहिजे त्या राष्ट्राच्या तुलनेत—तिचे स्थान

कसे रहते ? (१९५८ साली रशियाचे स्पुटनिक अंतराळात झेपावले आणि अमेरिकेला आपल्या शिक्षणव्यवस्थेचा निकडीने फेरविचार करणे आवश्यक वाटले.)

राष्ट्राच्या पुढे त्या त्या कालखंडात असलेले ध्येय, राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाची पुढील दहा ते वीस वर्षांच्या काळातील संभाव्य शक्यता, शिक्षणाच्या कार्यक्रमासाठी राष्ट्र खर्च करू शकत असलेला राष्ट्रीय उत्पन्नाचा भाग व राष्ट्रात शिक्षणाच्या क्षेत्रात समान संधीच्या तत्त्वाचा आग्रह किती धरावा याविषयीची शासनाची भूमिका, या सर्वांवर राष्ट्राच्या शिक्षणाच्या कार्य-क्रमाची आखणी अवलंबून असते. परंतु राष्ट्राच्या विकासासाठी उपयोगी असे शिक्षण देणे व सर्व शिक्षितांना योग्य असे काम उपलब्ध असेल याची दक्षता घेणे, हा यात सर्वांत अत्यंत महत्त्वाचा असा भाग असावा लागतो. शिक्षणाच्या सर्व स्तरांवर या गोष्टींचे महत्त्व असते; परंतु साहजिकच या गोष्टींचे सर्वात अधिक महत्त्व महाविद्यालयीन शिक्षणाच्या पातळीवर रहाते.

'कोणताही विद्यार्थी नंतरच्या अर्थार्जनाचा विचार केल्याखेरीज उच्च शिक्षणाकडे वळत नसतो.' अशा आशयाचे कान्फ्यूशियसचे सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वीचे वचन आहे. आजही हे वचन तितकेच खरे आहे. भारतासारख्या देशात या अर्थार्जनाचा मार्ग म्हणजे नोकरी असेच आज तरी सामान्यपणे जनतेच्या व विद्यार्थ्यांच्या मनातील समीकरण आहे. यामुळे पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक असली व त्या संख्येचा उपलब्ध नोकऱ्यांच्या संख्येशी मेळ बसला नाही की सहाजिकच बेकारीचा प्रश्न निर्माण होतो. 'अशिक्षित बेकारापेक्षा सुशि-क्षित बेकार मी अधिक पसंत करतो.' असे हमखास टाळी मिळविणारे वाक्य अधिकारावर असलेल्या राजकीय नेत्याकडून मी व्यासपीठावरील भाषणात ऐकले आहे. परंतु हे जर खरे असेल तर त्याचे पर्याय काय होतात ? एक तर अशी परिस्थिती निर्माणच होणार नाही अशा पद्धतीने राष्ट्राचा विकास-कार्यक्रम घडत जाईल असा त्यांना मनोमन विश्वास असावा किंवा सुशिक्षित बेकारांच्या वाढीतून जी स्फोटक परिस्थिती निर्माण होईल त्यातून जन्म पावणारी क्रान्ती त्यांना इष्ट वाटत असावी. भारतात वरीलपैकी पहिल्या पर्यायातील परिस्थिती अस्तित्वात नाही हा आता आपल्या सर्व पंचवार्षिक योजनांचा अनुभव आहे. दुसरा पर्याय स्फोटक क्रांतीचा. अधिकारारूढ असलेला व सध्याच्या समाजरचनेतच ज्याला अधिकारावर राहणे शक्य आहे असा कोणता नेता हा पर्याय प्रामाणिकपणे आपल्या मनाशी वागवील ?

महाविद्यालयीन शिक्षणासाठी किती विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा व त्यातही कोणत्या शाखेला किती जणांना प्रवेश द्यावा याचा निर्णय घेताना अर्थव्यवस्थेची पदवीधरांची गरज जितक्या प्रमाणात अधिक निश्चित करता येते तितक्या प्रमाणात नंतरच्या बेकारीचा प्रश्न सुटू शकतो. हे अगदी नेमकेपणाने सांगणे कोणत्याच अर्थव्यवस्थेला शक्य होत नाही. समृद्ध भांडवलशाही राष्ट्रे प्रत्येकाला काम हे मिळालेच पाहिजे असा घटनात्मक अधिकार देत नाहीत; परंतु बेकारी टाळावी असा त्यांचा प्रयत्न असतो व बेकार अगदीच वाऱ्यावर पडणार नाहीत एवढी त्यांची बेकारभत्ता आदि सहाय्यक गोष्टींची तरतूद असते. प्रत्येकाला काम मिळालेच पाहिजे व प्रत्येकाने काम केलेच पाहिजे या तत्त्वावर आधारित अशी समाजवादी समाजरचना असते. तेथे एखाद्या क्षेत्रात अधिक पदवीधर आहेत असे आढळले तर त्यांचे नवीन प्रशिक्षण करण्यात येते, परंतु बेकारीचा प्रश्न निर्माण होऊ दिला जात नाही. राष्ट्रापुढे अनेक विकासाची कामे असताना श्रमशक्ती बेकार राहण्याचा प्रश्नच निर्माण होण्याचे कारण नाही, हा या समाजवादी समाजरचनेचा दृष्टि-कोन असतो. वेगवेगळ्या प्रकारच्या कामाकडे योग्य प्रमाणात विद्यार्थी जातील यासाठी प्रोत्सा-हनात तरतमभाव ठेवता येतो. 'राष्ट्राच्या मदतीने तुम्ही सुशिक्षित झालेले आहात तर राष्ट्राला गरज असेल तेथे जाऊन तुम्ही काम केले पाहिजे.' असा आग्रह धरता येतो. एका क्षेत्रापासून दुसऱ्या क्षेत्राकडे जाण्यासाठी नवे प्रशिक्षणही देता येते.

भांडवलशाही व समाजवादी अर्थरचनांतील बेकारीविषयींच्या परिणामांचा हा फरक आपण लक्षात घेतला पाहिजे.

इंग्लंडमधील उच्च शिक्षणाचा विचार करणाऱ्या आयोगाचा १९६३ साली प्रसिद्ध झालेला अहवाल त्या आयोगाच्या अध्यक्षांच्या नावाने 'रॉबिन्स रिपोर्ट' म्हणून प्रसिद्ध आहे. आपल्या अहवालात तो आयोग लिहितो :

"सोव्हिएत रशियातील शैक्षणिक नियोजनात श्रमशक्तीच्या नियोजनावर (Manpower Planning) फार भर असतो व त्याची संकलित आकडेवारी मोठी महत्त्वाकांक्षी असते. या सुशिक्षित-प्रशिक्षितांच्या संख्येशी श्रमशक्तीच्या अनेक कारणांमुळे बदल होऊ शकणाऱ्या गरजेशी मेळ बसेलच याची शाश्वती काय याची चर्चा आम्ही त्या लोकांशी केली; तेव्हा आम्हाला असे सांगण्यात आले की, तेथे हा प्रश्न निर्माण होत नाही. आपापल्या कुवतीप्रमाणे अधिकात अधिक ज्ञान आत्मसात केलेले जितके अधिक लोक निर्माण होतील तितके ते आपल्या विकासासाठी रशियाला हवेच आहेत."

आयोग यानंतर लिहितो : "आपल्या राष्ट्रातील लोकांच्या बुद्धीचा पूर्ण उपभोग करून घण्याची आवश्यकता असलेले केवळ रशिया हे एकच राष्ट्र आहे असे आपण मानावयाचे कारण नाही. इंग्लंडने तर हे विशेषत्वाने केले पाहिजे. इंग्लंडकडे नैसर्गिक साधनसंपत्तीची असलेली तुलनात्मक उणीव यशस्वीपणे भरून काढण्यासाठी याची गरज आहे." (Robbins Report प. ७४)

ज्या राष्ट्राजवळ साधनसंपत्ती आहे त्याने आपल्या सर्वांगीण अभ्युदयासाठी या प्रश्नाकडे ह्याच पद्धतीने पाहणे युक्त होणार नाही काय ?

आपल्या देशातील पदवीधर बेकारांची परिस्थिती आपण या दृष्टिकोनातून तपासून पाहिली पाहिजे. बंगालमध्ये झालेल्या एका पाहणीप्रमाणे पदवी मिळाल्यानंतर जवळजवळ तीन वर्षे आपला पदवीधर बेकार असतो. या काळात कोणत्याही सहाय्याची तरतूद आपल्या रचनेत नाही. राष्ट्रात विकासाची अनेक कामे करावयाची असताना या लोकांना आपण काम का देऊ शकत नाही या समस्येचे मूलगामी उत्तर स्वीकारण्याचे व त्या दिशेने आपल्या अर्थव्यवस्थेचे परिवर्तन करण्याचे धैर्य आपणाजवळ नाही.

पदवीधर झाल्यावर प्रत्येकालाच काही काळ बेकार राहावे लागेल असे नाही; परंतु ही शक्यता अनेकांच्या बाबतीत राहणार. या अस्थिरतेची कृष्णछाया प्रकट किंवा अप्रकट रीतीने महाविद्यालयीन जीवनावर राहणारच. यशस्वी जीवनाचा मार्ग स्पष्टपणे दिसत असताना सहज-पणे उसळणारा उत्साह आणि भवितव्याविषयीची अनिश्चितता विसरण्यासाठी पांघरलेला कृत्रिम उत्साह यात महदंतर राहणे अटळ आहे. यासाठी एखादे महाविद्यालय, एखादे विद्यापीठ किंवा केवळ शिक्षणव्यवस्था काही करू शकत नाही. राष्ट्ररचनेची आर्थिक, राजकीय सूत्रे ज्यांच्या हाती आहेत त्यांनी हे अवधान राखावयास हवे.

महाविद्यालयाच्या, शिक्षणक्षेत्राच्या बाहेरील एकूण वातावरणाचा विद्यार्थ्यांच्या महाविद्या-लयातील जीवनावर प्रभाव पडणे केवळ अटळ असते. असा प्रभाव पडणे हे विद्यार्थ्यांच्या मनाच्या संवेदनाक्षमतेचे एक स्वागतार्ह गमकही मानावे लागेल. स्वातंत्र्याच्या लढ्याचा काळ असला की, विद्यार्थी त्या वातावरणाने भारले जातात. राष्ट्रात क्रान्तीचे वारे असले की, ते तिकडे खेचले जातात. बेचाळीसच्या आंदोलनाच्या काळात भारतात याचा अनुभव आला. बांगला देश मुक्तीनंतरच्या आठवड्यात तेथील महाविद्यालयांतून असलेले सशस्त्र विद्यार्थ्यांचे

तळ मी पाहिले आहेत. मुजीबची सुटका झाल्याच्या आनंदात डाक्का विद्यापीठाच्या आवारात फटाक्यांचे सर उडवावेत त्याप्रमाणे जिवंत काडतुसांचे सर उडविणारे विद्यार्थी पाहिले आहेत व त्या पैकी एकाचे कवच मी आठवण म्हणून बरोबर आणले आहे. अमेरिका व युरोपमध्ये १९६० ते १९७० च्या दरम्यान विद्यार्थी-आंदोलनांचे जे उद्रेक झाले ते त्या वेळच्या अस्थिर परिस्थितीची प्रतिक्रिया म्हणून होते. व्हिएतनामसारख्या देशात आपल्या देशाने चालविलेल्या युद्धाचा निषेध म्हणूनही अमेरिकेत विद्यार्थी-आंदोलने झाली. हा त्या त्या काळाच्या जनमानसातील प्रभावी प्रेरणांचा परिणाम होता. एरवी या आंदोलनात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्याच कुटुंबातील विद्यार्थी याआधीच्या दशकात शांत प्रवृत्तीचे होते व मध्यंतरीच्या दशकानंतरच्या गेल्या दशकात याच कुटुंबातून आलेले नवे विद्यार्थीही शांत प्रवृत्तीचेच निघाले.

समाजमानसाच्या अशा आंदोलनात विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे की नाही ? विद्यार्थ्यांनी राजकारणात भाग घ्यावा की नाही ? या प्रश्नांना सरळ सोपी उत्तरे आहेत असे मला वाटत नाही. मला आठवते, राजकीय पक्षांनी आपल्यासाठी आचारसंहिता तयार करावी यासाठी सुमारे वीस वर्षांपूर्वी गोखले इन्स्टिटयूट ऑफ एकॉनॉमिक्स अँड पॉलिटिक्स व समाजप्रबोधन संस्था या संस्थांच्या वतीने भाटघर येथे महाराष्ट्रातील विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांची बैठक घेण्यात आली होती. महाराष्ट्रातील राज्यस्तरावर व भारतीय स्तरावरही मान्यता असणारे राजकीय नेते या बैठकीला उपस्थित होते. राजकीय पक्षांशी बांधिलकी नसलेले शिक्षणक्षेत्रातीलही लोक होते. या वेळी तयार करण्यात आलेली, सर्व राजकीय पक्षांना मान्य झालेली आचारसंहिता ' भाटघर आचारसंहिता ' या नावाने ओळखली जाते.

' विद्यार्थ्यांनी राजकारणात भाग घेऊ नये ' असा विचार पहिल्या दिवशी जवळजवळ सर्वमान्य झाला होता. त्या दिवशीच्या बैठकीला यशवंतराव चव्हाण उपस्थित नव्हते. ते त्या वेळी मुख्यमंत्री होते. ते दुसऱ्या दिवशी सकाळी आले. त्या वेळी मधु लिमये यांनी हा प्रश्न पुन्हा उपस्थित केला. लिमये म्हणाले, ' यशवंतरावांच्या उपस्थितीत मला हा भाग पुन्हा चर्चेला घ्यावयाचा आहे. विद्यार्थ्यांनी राजकारणात भाग घेऊ नये हे मला मान्य नाही. यशवंतरावांना याविषयी काय म्हणावयाचे आहे ?'

यशवंतराव म्हणाले, ' मधूचे म्हणणे मला मान्य आहे. ' ते पुढे थोडयाशा विनोदाने म्हणाले, ' त्या काळी मी राजकारणात भाग घेतला नसता तर आज मुख्यमंत्री झालो नसतो ! '

मला वाटते विद्यार्थ्यांनी राजकारणात भाग घेण्याची कल्पना आपण थोडी अधिक तपासून पाहिली पाहिजे.ज्या आंदोलनात भाग घ्यावयाचा त्याच्या पाठीमागची वैचारिक बैठक त्यांनी आग्रहपूर्वक समजावून घेतली पाहिजे.' ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. यात समजून ते काय घ्यावयाचे ?' ही वृत्ती भावनेची तीव्रता दाखविणारी आहे, बुद्धीची क्षमता नव्हे. अशा अभ्यासाबरोबरच (सतत चालणारी अभ्यासमंडळे हे याचे एक बाह्य गमक होऊ शकेल.) एक सहजपणे वापरता येणारे बेजबाबदार हत्यार, असा तर आपले नेते आपला उपयोग करून घेत नाहीत ना या विषयीही दक्षता घेण्याची गरज आहे.

मला दोन उदाहरणे आठवतात :

बेचाळीसच्या चळवळीचा काळ. एका विद्यार्थ्याला त्याचे प्राध्यापक सांगत होते, ' तू आंदोलनात उतरू नकोस. अभ्यास कर !'

' सर, तुमच्या काळात कधी अशी चळवळ झाली होती का ?'

' होय, १९२० ची चळवळ. '

' त्या वेळी तुम्ही काय केले ?'

‘मी चळवळीत पडलो नाही.’

‘Now I know why that movement failed!’ असे सांगून तो आंदोलनात उतरला.

त्याच्या गटापैकी सातजण शहीद झाले.

हा मरता मरता नशिबाने वाचला.

त्याचा शिक्षणक्रम अपुरा राहिला.

त्याच्या कर्तृत्वाने तो एका वेगळयाच क्षेत्रात शिरला व आपल्या क्षेत्रात अखिल भारतात आज त्याचा अग्रक्रम आहे.

परंतु आंदोलनात उतरण्यापूर्वी वा त्यानंतर राजकारणाचा त्याने विशेष विचार केल्याचे मला आढळले नाही.

त्याची त्या वेळची कृती भावनात्मक होती का नव्हती? की राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढयात अधिक विचार तो कसला करायचा?

माझ्या मनाचा अजूनही निर्णय होत नाही.

दुसरे उदाहरण माझ्याशी वैचारिक मतभेद असलेल्या परंतु विद्यार्थी असल्यापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघात अत्यंत निष्ठेने जाणाऱ्या माझ्या मित्राचे आहे. हा माझा एक अत्यंत बुद्धिमान सहाध्यायी.

तो मला एके दिवशी म्हणाला, ‘मला माझ्या अभ्यासाची व परीक्षेतील यशाची काळजी घेतलीच पाहिजे. संघामुळे मी या कामात उगा पडलो असा ठपका संघावर येता कामा नये!’

त्याने आपला आग्रह राखला. सर्व परीक्षांत उत्तम यश मिळविले. ज्या व्यावसायिक क्षेत्रात तो उतरला तेथेही महत्त्वाची स्थाने त्याने भूषविली.

आज परत तो संघाचेच काम निष्ठेने करीत आहे.

या दोघांच्या मनासमोर ज्या समस्या उभ्या राहिल्या त्यांचा विचार राजकारणात प्रत्यक्ष भाग घेण्यापूर्वी आपल्या मनाशी विद्यार्थ्यांनी करणे आवश्यक आहे असे मला वाटते. नाही तर एक केवळ साहसवाद, अभ्यासाच्या मूलभूत कर्तव्यापासूनचा पलायनवाद, किंवा त्या त्या काळाच्या लाटेबरोबर वाहून जाण्याचाच तो एक प्रकार होईल.

एरवी कोणत्याही संवेदनाशील तरुण मनाला विद्यार्थी-जीवनाच्या व नंतरच्याही काळात समाजातील खदखदणाऱ्या प्रश्नांचा स्पर्श झाल्याखेरीज राहाणारच नाही व आपण याविषयी काही तरी केलेच पाहिजे अशी प्रेरणाही त्याला झाल्याखेरीज राहाणार नाही.

प्रिन्स क्रोपोटकिन या रशियन विचारवंताने एका तरुण डॉक्टर मित्राला लिहिलेले पत्र प्रसिद्ध आहे. त्यात तो म्हणतो:

“तू आता डॉक्टर झालास. उद्या तुझ्यापुढे एखादा क्षय झालेला दरिद्री रुग्ण येईल. त्याला तू काय सल्ला देशील? तू विश्रांती घे, दूध–फलाहार घे, कोरडया हवेच्या ठिकाणी जाऊन रहा, असे तू त्याला सांगू शकशील का? आणि मग तू एकूण समाजरचनेचाच विचार करू लागशील.”

विद्यार्थीजीवनात, राजकारणात भाग घेतला वा न घेतला तरी असे प्रश्न आपण होऊन सुचू लागले व त्या प्रश्नांचा खोलवर जाऊन शोध घेण्याची प्रवृत्ती मनात निर्माण झाली की विद्यार्थी-जीवनाच्या काळात या अंगाने जे साधावयाचे ते साधले असे म्हणता येईल.

आपल्या महाविद्यालयीन जीवनात अनेक उणीवा आहेत याची खंत अवश्य हवी. परंतु मनाला नाउमेद करून निष्क्रीयता आणणारी अशी ती खंत असता कामा नये. महाविद्यालयीन शिक्षणाच्या क्षेत्रात अगदी आदर्श अशी परिस्थिती जगात कोणत्याही कालखंडात, कोणत्याही राष्ट्रात, कधीही अस्तित्वात नव्हती, आजही नाही. आजची भांडवलशाही किंवा साम्यवादी

अग्रेसर राष्ट्रेही याला अपवाद नाहीत. जीवनाच्या या कालखंडात तात्त्विक ज्ञान मिळाले पाहिजे, तंत्रकौशल्य वाढले पाहिजे, सामाजिक बांधिलकी अंगी बाणली पाहिजे, स्वतंत्रपणे विचार करण्याची शक्ती व निर्भयता यांची जोपासना झाली पाहिजे. यासारख्या कसोट्या जर आपण लावल्या व या शिक्षणाची संधी समाजात सर्व घटकांना समानतेने पोचली पाहिजे हा आग्रहही धरला तर या सर्व कसोट्यांवर पूर्णपणे उतरणारे एकही राष्ट्र आज भूतलावर नाही याचे आश्चर्य वाटावयास नको. महाविद्यालयीन शिक्षणाचे आदर्शही नेहमी तसेच राहिले आहेत असे नाही. ऑक्सफर्ड, केंब्रिज, हारवर्ड या अनेक शतकांचे अस्तित्व असणाऱ्या व सर्वोत्तम म्हणून दीर्घकाळ गाजलेल्या विश्वविद्यालयांचा आदर्श, विद्यार्थ्याला नेमके माहितीच्या स्वरुपाचे ज्ञान देण्यापेक्षा ज्ञानग्रहणाची शक्ती देण्याकडे होता. विद्यार्थी पुढे ज्या क्षेत्रात उतरेल त्या क्षेत्रातील ज्ञान सहज मिळविण्याची कुवत त्याला देणे हाच या शिक्षणाचा मुख्य हेतू असे. आज शास्त्र व तंत्रज्ञान इतके विकसित झाले आहे की काही नेमके तंत्रज्ञान विद्यार्थ्यापर्यन्त अचूकपणे पोचवणे ही एक आवश्यक गोष्ट होऊन बसली आहे. एखाद्या शास्त्राच्या उपशाखेच्याही उप-शाखेचा सूक्ष्म अभ्यास करत असताना त्या मूळ शास्त्राचे किंबहुना त्या शास्त्राच्या इतर सर्व शास्त्रांशी असणाऱ्या अनुबंधाचे अवधान कसे राखावे हे विद्यार्थ्याला शिकविणे हा उच्च शिक्ष-णाच्या क्षेत्रात परदेशातही अगदी अलीकडच्या काळात निर्माण झालेला प्रवाह आहे.

असे बदल हे नेहमी होतच राहाणार. परंतु प्रत्येक युवकाच्या अंगभूत गुणांचा विकास करणे व हा गुणविकास राष्ट्रविकासासाठी कारणी लागेल अशी रचना ठेवणे, या मुख्य सूत्राला या अशा व इतर बदलांनी बाधा येण्याचे कारण नाही.

हे जसे खरे आहे त्याचप्रमाणे परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी उपक्रमशील प्राध्यापकांना व उत्साही विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वयंप्रेरणेने करता येण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत हेही खरे आहे. अंधाराला दोष देत आपल्या जागी कुढत दबून बसण्यापेक्षा आपला छोटा का होईना दीप प्रज्वलित केला तर ते स्वतःलाही आश्वासक आहे व त्यातूनच पुढे काही मार्ग सापडणेही शक्य आहे. असे धडपडणारे प्राध्यापक व विद्यार्थी आजही अनेक ठिकाणी आहेत हे आजच्या परिस्थितीत मनाला दिलासा देणारे एक खरे आश्वासन आहे.

पूर्वसैबेरियात पदवीशिक्षणाच्या प्रथम वर्षात असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वर्गात मी गेलो होतो.

चर्चेच्या शेवटी त्या मुलांनी मला विचारले, ' तुमच्याकडील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा जीवनक्रम कसा असतो ?'

' जगातील कोणत्याही विद्यार्थ्यांप्रमाणेच त्यांनाही प्राध्यापकांची कंटाळवाणी व्याख्याने चुकवावयास आवडते. ' मी सुरुवात केली.

जगातील सगळे विद्यार्थी सारखेच असतात या आनंदाचे स्मित त्यांच्या चेहऱ्यावर झळकले.

नंतर अधिक काही तपशील सांगून शेवटी मी म्हणालो :

' एखाद्या विद्यार्थ्याला आपले सर्व महाविद्यालयीन जीवन व्यर्थच घालवावयाचे असेल तर आमच्याकडे त्याला कोणी अडवीत नाही; परंतु एखाद्याला आपले महाविद्यालयीन जीवन खऱ्या अर्थाने कारणीच लावावयाचे असेल तर तशीही संधी त्याला असेल.'

यातील उत्तरार्ध मी केवळ एक सुबक समतोल विधान करावे या हौसेने सांगितला असा आक्षेप कोणी घेतला तर मला त्याचा सूक्ष्म विचार करावा लागेल.

परंतु अशी ईर्षा असणारा कोणी विद्यार्थी खराच मला भेटला तर हे विधान प्रत्यक्ष कसोटीला लावून पाहण्यात मला आनंदच होईल.

■

# २

## महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या प्रशासकीय अडचणी

किशोर दिगंबर करंदीकर

भारतामध्ये स्वातंत्र्योत्तर काळापासून म्हणजे सुमारे १९५० पासून शिक्षणाचा प्रसार झपाट्याने सुरू झाला. सर्वांना सुशिक्षित बनविणे हे शासनाचे एक प्रमुख उद्दिष्ट बनले. पूर्व-प्राथमिक स्तरापासून उच्च शिक्षणापर्यंत शिक्षण देणाऱ्या संस्था निर्माण झाल्या. अजूनही दरवर्षी नवीन शिक्षणसंस्था निर्माण होत आहेत. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. शिक्षणाच्या सोई वाढल्या. त्याचे कार्यक्षेत्र विकसित झाले. नवनवीन शाखांतर्गत शिक्षण उपलब्ध होऊ लागले. ज्ञानाची क्षितिजे विस्तारली. शिक्षणाची व्याप्ती जी एका विशिष्ट वर्गापुरती मर्यादित होती, तिने आपल्या कक्षा ओलांडल्या. समाजाच्या सर्व स्तरांमध्ये शिक्षण झिरपू लागले. गेल्या दोन दशकांत झालेला शिक्षणाचा प्रसार खालील तक्त्यावरून दिसून येईल.

**सारणी क्र. १ : महाराष्ट्रातील शिक्षणाचा प्रसार**

| **शैक्षणिक पातळी** | | **शैक्षणिक संस्था** | |
|---|---|---|---|
| | १९६०–६१ | १९७०–७१ | १९७९–८० |
| पूर्वप्राथमिक शिक्षण | ५२७ | ६४१ | ८५५ |
| प्राथमिक शिक्षण | ३४,५९४ | ४४,५३५ | ४९,८७७ |
| माध्यमिक शिक्षण | २,४६८ | ५,३९३ | ६,०२६ |
| उच्च शिक्षण | २११ | ५१५ | ६४६ |
| **शैक्षणिक पातळी** | | **विद्यार्थी संख्या** | |
| | **१९६०–६१** | **१९७०–७१** | **१९७९–८०** सुमारे |
| पूर्वप्राथमिक शिक्षण | ३३,९३१ | ४७,४०१ | ७४,००० |
| प्राथमिक शिक्षण | ४१,७८,०२४ | ६५,३९,१६१ | ८२,७१,००० |
| माध्यमिक शिक्षण | ८,५७,८६४ | १९,८४,६५४ | ३०,९२,००० |
| उच्च शिक्षण | ८४,१११ | २,०१,२८५ | ५,४७,००० |

जसजसा शिक्षणाचा प्रसार होऊ लागला तसतशा त्यामध्ये नवीन अडचणीही निर्माण होऊ लागल्या. नित्य नवीन प्रश्न समोर उभे राहू लागले. त्या प्रश्नांचा उलगडा करण्याकरिता, त्या समस्यांचे स्वरूप जाणून घेण्यासाठी व त्यावर उपाययोजना करण्यासाठी योजना तयार होऊन कार्यान्वित होऊ लागल्या. सरकारी व खाजगी क्षेत्रांमध्ये यासंबंधी कार्य होऊ लागले. अनेक समस्यांची सोडवणूक झाली. तथापि येणारा नवीन दिवस हा नवीन समस्या घेऊन येऊ लागला.

भारतातील विद्यार्थी-जीवन हा एक संशोधनाचा नवीन विषय झाला आहे. विद्यार्थी-जीवनाच्या अनेक अंगोपांगांचे संशोधन होत आहे. विषयांच्या कक्षेबरोबरच त्यांच्या समस्याही वाढत आहेत. त्यावर उपाय-योजना तयार होत आहेत.

गेली आठ वर्षे टिळक शिक्षण महाविद्यालयात कार्यालय अधीक्षक म्हणून काम करताना विद्यार्थ्यांशी फार जवळून संबंध आला. दरवर्षी नवीन विद्यार्थी; त्यांच्या नवनवीन समस्या. त्या-सोडवीत असता एक गोष्ट फार प्रकर्षाने जाणवली; ती अशी की, शालांत परीक्षा उत्तीर्ण होऊन महाविद्यालयीन जीवनात पदार्पण करताना विद्यार्थी सर्वात कुठे जास्त भांबावून जात असेल तर तो प्रशासकीय बाबी पूर्ण करण्यात. प्रशासकीय बाबींची तरतूद पूर्ण करण्यात त्याला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. आणि ह्या बाबी पूर्ण केल्याशिवाय त्याचे महाविद्यालयीन जीवन सुरळीत सुरू होऊच शकत नाही. इतकेच नव्हे तर त्याचे महाविद्यालयीन जीवन सुरू होऊन ते संपले तरी त्यास ज्या प्रशासकीय बाबी पूर्ण कराव्या लागतात त्यासंबंधाने तो नेहमीच अडचणीत येत असतो.

तेव्हा विद्यार्थ्यांना येणाऱ्या या अडचणींचा मागोवा घेतल्यास, कोणत्या प्रकारच्या अडचणी त्यांच्यापुढे उभ्या राहतात ? अशा अडचणींचा उगम कशात आहे ? अशा अडचणी विद्यार्थी कशा प्रकारे सोडवितो ? इत्यादी प्रश्नांची उत्तरे मिळू शकतील. एवढ्याचसाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जाणवणाऱ्या प्रशासकीय अडचणींचा अभ्यास करण्याची योजना तयार करून त्या अडचणींचे स्वरूप, विद्यार्थी त्याला कशा प्रकारे तोंड देतो यासंबंधीचे येणारे निष्कर्ष, या शोधनिबंधाद्वारे आपणापुढे ठेवीत आहे. या निष्कर्षांच्या आधारे या अडचणी दूर करण्याचे उपायही प्रस्तुत संशोधकाने सूचित केले आहेत.

**समस्येचे स्वरूप**

महाविद्यालयीन जीवनात प्रवेश करताच विद्यार्थ्याजवळ असलेल्या पालकाच्या कुबड्या गळून पडतात. त्याला स्वतःलाच मार्गक्रमणा करावी लागते, नव्हे ते आवश्यकच असते. स्वतःच्या पायावर उभे राहताना विद्यार्थ्यांच्या वाटेत अनेक अडचणी उद्‌भवतात. अभ्यासक्रमाशी संबंधित तसेच अभ्यासेतर कार्यक्रमातील अडचणींना त्यास पदोपदी तोंड द्यावे लागते. महाविद्यालयात प्रवेश करण्यापासूनच त्याच्या अडचणींना सुरुवात होते. विद्यार्थ्यांचे स्वतःचे कार्यक्षेत्र विकसित होत असताना त्यास निरनिराळ्या समस्यांना तोंड द्यावे लागते. विशिष्ट अभ्यासक्रम निवडावयाचा ठरविल्यास त्याबाबत माहिती मिळविण्यापासून तो अभ्यासक्रम पूर्ण करीपर्यंत त्यास अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. अशा समस्यांचे जाणीवपूर्वक संशोधन होणे आवश्यक वाटते.

महाविद्यालयीन जीवन सुरळीतपणे पार पाडण्यासाठी विद्यार्थ्यास अनेक प्रशासकीय बाबींची पूर्तता करावी लागते. शालेय जीवनात अशा बाबींची पूर्तता बव्हंशी पालक व वर्गशिक्षक करीत असतात. येथे मात्र त्याच्या साहाय्याला यापैकी कोणीच येऊ शकणारे नसते. त्यास स्वतःचा मार्ग स्वतःच आक्रमावयाचा असतो. या बाबतीत तो स्वतः अगदीच अनभिज्ञ असतो. अनेकांचे मार्गदर्शन त्याला स्वतःलाच मिळवावयाचे असते. महाविद्यालयाच्या कार्यालयाचे नियम, विद्या-

पीठाचे नियम, शासनाचे नियम, अशा अनेकविध नियमावलींतून स्वतःचा मार्ग विद्यार्थ्याला काढावयाचा असतो. अशा प्रकारे अनेकविध दृष्टिकोनांतून विद्यार्थ्यास जाणवणाऱ्या प्रशासकीय अडचणींचा अभ्यास हा महत्त्वपूर्ण आहे. दुर्लक्षणीय खासच नाही !

### समस्येची व्याप्ती

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या समस्यांचा विचार करताना महाराष्ट्रातील महाविद्यालयांत शिकत असलेली एकूण विद्यार्थीसंख्या विचारात घ्यावी लागेल. सन १९७९-८० या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्रात महाविद्यालयीन शिक्षण घेणारे एकूण ४,८७,३९८ विद्यार्थी होते. त्यांपैकी उच्च माध्यमिक शिक्षण घेणारे एकूण ३,३७, ३६१ एवढे विद्यार्थी होते.* ही विद्यार्थी-संख्या पाहता महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींची व्याप्ती किती मोठी असेल याची कल्पना करता येते. तथापि प्रस्तुत संशोधन अगदी मर्यादित स्वरूपाचे आहे. त्यामध्ये एवढ्या मोठ्या जनसंख्येचा (population) विचार केलेला नाही. मुख्यतः पुणे शहर आणि त्याच्या परिसरातील काही महाविद्यालये यांच्यापुरताच हा अभ्यास मर्यादित राहिला; परंतु त्याच-बरोबरच अन्य जिल्ह्यांतीलही काही महाविद्यालये या अभ्यासात समाविष्ट केली आहेत. या अभ्यासाला प्रातिनिधिक स्वरूप येण्यासाठी जास्तीतजास्त शाखांमधील प्रातिनिधिक विद्यार्थ्यांना सामावून घेण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनींची संख्याही शक्यतो त्याच प्रमाणात राखण्याचा प्रयत्न केला आहे. महाविद्यालयीन जीवन उच्च माध्यमिक शिक्षणक्रमा-पासून सुरू होत असल्याने एकूण ११२ प्रतिसादकांपैकी ६४ प्रतिसादक हे इयत्ता ११ वी / १२ वीतील निवडले होते.

संपूर्ण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या समस्यांचे प्रातिनिधिक प्रतिबिंब या संशोधन-अहवालाद्वारे दृग्गोचर व्हावे या दृष्टिकोनातून महाराष्ट्रातील तीन प्रमुख विद्यापीठे व उच्च माध्यमिक मंडळे यांच्यातर्फे परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश यात करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्रा-तील एकूण २८ जिल्ह्यांपैकी ११ जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांचा प्रातिनिधिक स्वरूपात या संशोधन-अहवालात समावेश करण्यात आला आहे. अशा रीतीने या संशोधन-अहवालास शक्यतो प्रातिनिधिक स्वरूप देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

### संशोधनाच्या मर्यादा

संशोधनक्षेत्राची व्याप्ती लक्षात घेता त्यावर काही मर्यादा पडणे अपरिहार्यच होते. शिवाय हा लघुसंशोधन-अहवाल पूर्ण करण्यास अत्यंत थोडा कालावधी (सुमारे ६ ते ७ महिन्यांचा) असल्याने कित्येक बाबींकडे अनवधानाने दुर्लक्ष झाले असल्याचीही शक्यता आहे.

महाविद्यालयीन जीवन इयत्ता ११ वीपासून सुरू होत असल्याने उच्च माध्यमिक शाळांत व महाविद्यालयांत शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अडचणींवर जास्त भर देण्यात आला असून त्यानंतर अभ्यासक्रम पुरा करणारे विद्यार्थी हे कनिष्ठ महाविद्यालयांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यां-पेक्षा जास्त अनुभवी असल्याने त्यांचे प्रतिनिधित्व त्या मानाने कमी आहे.

या संशोधन-अहवालास प्रातिनिधिक स्वरूप येण्याच्या दृष्टीने कनिष्ठ व वरिष्ठ विद्यालयांतील कला, वाणिज्य व शास्त्र-शाखांतर्गत, विद्यार्थ्यांबरोबरच, विधि, अभियांत्रिकी, वैद्यकीय, शिक्षण, इत्यादी शाखांतर्गत विद्यार्थ्यांचाही फक्त प्रातिनिधिक स्वरूपात समावेश करण्यात आला आहे. शहरी विद्यार्थ्यांबरोबरच ग्रामीण विभागात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचाही समावेश प्राति-निधिक स्वरूपात करावा लागला.

---

* **शिक्षणावर दृष्टिक्षेप** १९७९ । ८०, शिक्षण संचालनालय, पुणे. डिसेंबर १९८०

### प्रस्तुत अभ्यासाची उद्दिष्टे

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जाणवणाऱ्या प्रशासकीय अडचणींचा अभ्यास करताना खालील उद्दिष्टे डोळयांसमोर ठेवली आहेत :

१. महाविद्यालयीन स्तरावर प्रवेश करण्यापूर्वी ज्या प्राथमिक प्रशासकीय अडचणींना विद्यार्थ्यांस तोंड द्यावे लागते, त्या अडचणींचे स्वरूप समजावून घेणे;

२. महाविद्यालयात प्रवेश केल्यानंतर येणाऱ्या दैनंदिन प्रशासकीय अडचणींचा अभ्यास करणे;

३. महाविद्यालयीन जीवन संपवून बाहेर पडल्यानंतर महाविद्यालयाशी संबंधित प्रशासकीय अडचणींचा अभ्यास करणे;

४. विद्यार्थ्यांना जाणवणाऱ्या विविध प्रकारच्या अडचणींच्या कारणांचा शोध घेणे;

५. अशा अडचणी कोणत्या प्रकारे सोडविल्या जातात याचा मागोवा घेणे;

६. विद्यार्थ्यांच्या प्रशासकीय अडचणींबाबत महाविद्यालये, विद्यापीठे, विविध शासकीय कार्यालये यांतील अधिकारी व कर्मचारी वर्गाची प्रतिक्रिया अजमावणे;

७. विविध अडचणींच्या निराकरणाबाबत योजल्या जाणाऱ्या उपायांच्या फलश्रुतीचा अंदाज घेणे; आणि

८. वरील अभ्यासावरून विद्यार्थ्यांच्या प्रशासकीय अडचणींबाबत व त्यांच्या सुलभ निराकरणाबाबत सूचना करणे.

### शोधनिबंधाचे महत्त्व

या शोधनिबंधामुळे, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना येणाऱ्या प्रशासकीय अडचणींचे वास्तव स्वरूप काय आहे आणि त्या समस्यांवर काय उपाय केले असता विद्यार्थ्यांचे महाविद्यालयीन जीवन सुरळीतपणे चालू राहील याबाबत काही निश्चित सूचना करता येतील. या अभ्यासामुळे महाविद्यालयीन, विद्यापीठीय व शासकीय स्तरांवर प्रशासनात कोणते बदल केले असता विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर होऊ शकतील याबाबत निष्कर्ष काढता येतील.

प्रस्तुत शोधनिबंधाच्या विषयाच्या संदर्भात यापूर्वी काही संशोधन झाले आहे किंवा काय याबाबत अनेकांशी चर्चा केली. महत्त्वाच्या ४–५ ग्रंथालयांशी (उदा. जयकर ग्रंथालय, राज्य शिक्षणशास्त्र संस्थेचे ग्रंथालय, टिळक शिक्षण महाविद्यालयाचे ग्रंथालय, इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशनचे ग्रंथालय, गोखले इन्स्टिटयूट ऑफ इकॉनॉमिक्सचे ग्रंथालय, इ.) संपर्क साधून संशोधनपर संदर्भ ग्रंथ चाळले असता या विषयावर पूर्वी संशोधन झालेले आढळून येत नाही. बुच (सं) ह्यांच्या Survey of Educational Research in India किंवा अदावाल (सं) ह्यांच्या Third Year Book on Educational Research यात शैक्षणिक प्रशासनाच्या विभिन्न प्रश्नांवर संशोधन झाल्याचे उल्लेख आढळतात; परंतु प्रस्तुत विषयाकडे संशोधन करण्यासाठी कोणा संशोधकाने नजर वळवल्याचे आढळून येत नाही. महाविद्यालयीन अथवा विद्यापीठ-व्यवस्थापनावर काही लेखन झाले आहे, काही नियतकालिके निघाली आहेत. तथापि विद्यार्थ्यांना जाणवणाऱ्या प्रशासकीय अडचणींचा अभ्यास यातसुद्धा झालेला आढळून आला नाही. त्यामुळे या शोधनिबंधाचे विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनाच्या दृष्टीने आगळे महत्त्व आहे असे वाटते.

### शोधनिबंधाची पद्धती

प्रश्नाचा अभ्यास महाराष्ट्रातील विद्यालयीन विद्यार्थ्यांशी संबंधित असल्याने शोधनिबंधासाठी

सर्वेक्षणपद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. समस्येचे स्वरूप वर्तमानकाळाशी निगडित असल्याने सर्वेक्षणपद्धतीचा वापर करणे अपरिहार्यच होते. या पद्धतीचा वापर केल्याने विद्यार्थी-जगतातील वर्तमान स्थितीचे यथार्थ चित्रण करण्यास मदत झाली आहे. समस्येची उकल करण्याकरिता लागणारी परिस्थिती समजून घेण्यासाठी वस्तुनिष्ठ पद्धतीने संशोधन करण्यासाठी सर्वेक्षणपद्धतीशिवाय अन्य पर्याय नसल्याने याच पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील महाविद्यालयीन स्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रचंड संख्या आणि महाराष्ट्र राज्याचा २८ जिल्ह्यांतील विस्तार लक्षात घेता संपूर्ण जनसंख्येचे सर्वेक्षण करणे केवळ अशक्यच होते. तथापि यासाठी आदर्शभूत मानण्यात आलेली न्यादर्श सर्वेक्षण (Sample Survey) ही पद्धत वापरून हा शोधनिबंध तयार केला आहे.

हा अभ्यास करण्यासाठी प्रामुख्याने 'प्रश्नावली' व 'मुलाखती' ह्या दोन साधनांचा वापर केला आहे. विद्यार्थी प्रतिसादकांकडून प्रश्नावली भरून घेण्यात आल्या आहेत. बाहेरगावच्या विद्यार्थ्यांकडे त्या टपालद्वारा पाठविण्यात आल्या होत्या.

मुलाखतीचे स्वरूप निश्चित करताना प्रामुख्याने शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या अधिकारी व्यक्ती डोळ्यांसमोर होत्या. मुलाखती तीन स्वतंत्र स्तरांवर काम करणाऱ्या व्यक्तीं-कडून घेण्याचे निश्चित केले. ते तीन स्तर म्हणजे महाविद्यालयीन स्तर, विद्यापीठीय स्तर व शासकीय स्तर. या तीन ठिकाणी काम करणाऱ्या अधिकारी व्यक्ती, लेखापाल व लेखनिक यांच्याशी संपर्क साधला होता. अशा प्रकारे या अभ्यासाच्या संदर्भात मुलाखतींसाठी संपर्क साधला असता मिळालेला प्रतिसाद खरोखरच खिन्न करणारा होता. अपवाद फक्त हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढे. दोन दोन वेळा स्मरणपत्रे पाठवूनसुद्धा अनेक अधिकारी व्यक्तींकडून मुलाखतीसाठी वेळ मिळू शकला नाही. तेव्हा शेवटी काही मुलाखती ह्या पूर्वसूचनेशिवाय प्रत्यक्ष संपर्क साधून घेण्यात आल्या.

## संकलित माहितीचे विश्लेषण

या लघुसंशोधन अहवालासाठी 'प्रश्नावली' व 'मुलाखती' या दोन साधनांद्वारे माहिती एकत्रित करण्यात आली होती. प्रश्नावलीवरून संकलित केलेल्या माहितीचे विशदीकरण पुढील-प्रमाणे आहे. प्रश्नावलीत एकूण ४२ प्रश्न विचारण्यात आले होते. एकूण २०० विद्यार्थ्यांपैकी प्रश्नावली भरून देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ११२ असून त्यामध्ये ६८ मुलगे आणि ४४ मुली आहेत. ४० मागासवर्गीय विद्यार्थ्यांपैकी फक्त दोनच विद्यार्थ्यांनी प्रश्नावली भरून दिल्या.

**सारणी क्र. २ : कोर्सची निवड कशी केली ?**

| पर्याय | मुलगे | मुली | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) स्वतःस आवड असल्याने | ५७ | ४० | ९७ | ८०·८ |
| ब) पालकांनी सांगितल्याने | ४ | ६ | १० | ८·६ |
| क) मित्र–मैत्रिण या कोर्सला आहे | १ | १ | २ | १·३ |
| ड) दुसऱ्या कोणत्याही कोर्सला प्रवेश नाही | ७ | १ | ८ | ६·६ |
| इ) अन्य कारणामुळे | २ | १ | ३ | २·५ |
| एकूण | ७१ | ४९ | १२० | |

आठ प्रतिसादकांनी एकापेक्षा जास्त पर्यायांना प्रतिसाद दिला आहे. ८० टक्के विद्यार्थ्यांनी

स्वतःच्या आवडीचा कोर्स निवडला आहे. यावरून आवडीचा कोर्स निवडताना तरी काही विशेष अडचणी बहुसंख्य विद्यार्थ्यांना येत नाहीत असे दिसून येते. ह्या प्रश्नाबरोबरच कोर्स निवडताना आवश्यक असणाऱ्या गुणवत्तेबाबत पूर्वी माहिती होती काय ? असाही प्रश्न विचारला होता. त्यास ११२ प्रतिसादकांपैकी ९६ प्रतिसादकांनी शैक्षणिक गुणवत्तेविषयी पूर्वी माहिती होती असे सांगितले. फक्त १६ विद्यार्थ्यांना ( १४ टक्के) पूर्ण ज्ञान नव्हते.

**सारणी क्र ३ : प्रवेशापूर्वी कागदपत्रांच्या पूर्ततेस लागणारा वेळ**

| पर्याय | मुलगे | मुली | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) पुरेसा होता | ३९ | ५४ | ९३ | ८३·३ |
| ब) पुरेसा नव्हता | ६ | १३ | १९ | १६·९० |
| एकूण | ४५ | ६७ | ११२ | |

सर्व प्रतिसादकांनी ह्या प्रश्नाला उत्तर दिले असून ८३ टक्के विद्यार्थी कागदपत्रांची पूर्तता प्रवेशापूर्वी वेळेत करू शकले. फक्त १७ टक्के विद्यार्थी हे काम करू शकले नाहीत. मात्र त्यासाठी काय कारण घडले याचे दिग्दर्शन एकाही विद्यार्थ्याने केलेले नाही हे लक्षणीय आहे.

**सारणी क्र. ४ : प्रवेशाची प्रशासकीय व्यवस्था**

| पर्याय | मुली | मुलगे | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) योग्य आहे | ३० | ३७ | ६७ | ६२·६ |
| ब) योग्य नाही | १४ | २६ | ४० | ३७·३ |
| एकूण | ४४ | ६३ | १०७ | |

**सारणी क्र. ५ : प्रवेशाची प्रशासकीय व्यवस्था अयोग्य असल्याची कारणे**

| पर्याय | मुली | मुलगे | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) व्यवस्था वेळ घेणारी आहे | १२ | १६ | २८ | ४३· ७ |
| ब) कार्यालयातील सेवकांकडून सहकार्य नाही | ३ | १६ | १९ | २९·२३ |
| क) प्रवेशअर्ज इंग्रजीत असतात त्यामुळे ते नीट भरता येत नाहीत | ४ | ६ | १० | १५·३८ |
| ड) अर्ज मराठीत असूनही काही शब्दांचा अर्थबोध होत नाही | ० | ४ | ४ | ६·१५ |
| इ) अन्य पर्याय | १ | ३ | ४ | ६·१५ |
| एकूण | २० | ४५ | ६५ | |

सारणी क्र. ४ वरून हे दिसून येते की, ६२·६ टक्के विद्यार्थ्यांच्या मते प्रवेश घेण्यासाठी महाविद्यालयामार्फत वापरण्यात येणारी प्रशासकीय व्यवस्था योग्य आहे. ३७·३ टक्के विद्यार्थ्यांच्या मते ही व्यवस्था योग्य नाही. ही व्यवस्था अयोग्य असल्याची कारणे मात्र या ३७ टक्क्यां-

व्यतिरिक्त आणखी २५ टक्के विद्यार्थ्यांनी म्हणजे एकूण ६५ टक्के विद्यार्थ्यांनी दिलेली आहेत. सर्वांत जास्त आक्षेप या व्यवस्थेस लागणाऱ्या वेळासाठी आहे. ४३ टक्के विद्यार्थ्यांच्या मते ही व्यवस्था वेळ घेणारी आहे (सारणी क्र. ५). त्यानंतर कार्यालयीन सेवकांकडून सहकार्य मिळत नाही या कारणाचा क्रमांक लागतो (२९·२३ टक्के). या प्रश्नातून अन्य पर्याय म्हणून आलेल्या उत्तरातूनसुद्धा कार्यालयीन सेवकांच्या वर्तणुकीवर आक्षेप घेण्यात आला आहे. उदा. "कर्मचाऱ्यांची भाषा 'रफ' असते," 'कार्यालयात हेलपाटे घालावे लागतात.' इ.

**सारणी क्र. ६ : कोणती प्रमाणपत्रे वेळेवर मिळत नाहीत ?**

| पर्याय | मुली | मुलगे | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) गुणपत्रिका | ३ | ३ | ६ | १२·८ |
| ब) पासिंग सर्टिफिकेट | १ | ४ | ५ | १०·६ |
| क) विशेष प्राविण्याची प्रशस्ति-पत्रके | १ | ४ | ५ | १०·६ |
| ड) पूर्वीची शाळा, संस्था सोडल्याचा दाखला | ११ | ११ | २२ | ४७·०० |
| इ) कॅरेक्टर सर्टिफिकेट | २ | ४ | ६ | १२·८ |
| फ) अन्य सर्टिफिकिटे | २ | १ | ३ | ६·३ |
| एकूण | २० | २७ | ४७ | |

**सारणी क्र. ७ : प्रमाणपत्रे वेळवर न मिळण्याची कारणे**

| पर्याय | मुली | मुलगे | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) अपुरा वेळ | १ | ४ | ५ | १३·१५ |
| ब) पूर्वीच्या संस्थांकडून उशीर | ९ | १४ | २३ | ६०·५२ |
| क) कशी मिळवावयाची याची माहिती नव्हती | २ | ४ | ६ | १५·७८ |
| ड) शासनाकडून उशीर | १ | ० | १ | २·६३ |
| इ) अन्य पर्याय | २ | १ | ३ | ७·८९ |
| एकूण | १५ | २३ | ३८ | |

सारणी क्र. ६ नुसार 'पूर्वीची शाळा / संस्था सोडल्याचा दाखला' विद्यार्थ्यांना वेळेवर मिळत नाही. तथापि या प्रश्नाला ११२ प्रतिसादकांपैकी फक्त ४७ विद्यार्थ्यांनीच प्रतिसाद दिलेला असल्याने निम्म्यापेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश-अर्जासोबत जोडण्यासाठी आवश्यक असणारी प्रमाणपत्रे वेळेत मिळतात असे जाणवते. ज्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे वेळेवर मिळू शकली नाहीत त्यांच्या कारणांचा तपशील सारणी क्र. ७ वरून लक्षात येईल. 'पूर्वीच्या संस्थांकडून उशीर' हे महत्त्वाचे कारण आहे. या कारणामुळे ६० टक्के विद्यार्थ्यांना त्यांना आवश्यक असलेली प्रमाणपत्रे (पूर्वीची शाळा/संस्था सोडल्याचा दाखला) वेळेवर मिळू शकली नाहीत.

सारणी क्र. ६ व ७ वरून असे लक्षात येते की, जरी ४७ प्रतिसादकांना प्रमाणपत्रे वेळेवर मिळू शकली नाहीत तरी त्याच्या कारणांची मीमांसा फक्त ३८ प्रतिसादकांनी केलेली आहे. ही

मीमांसा करताना आलेल्या अन्य पर्यायांत 'कार्यालयीन सेवकांचे असहकार्य आणि त्यांची दिरंगाई' यांचा उल्लेख करण्यात आला आहे.

**सारणी क्र. ८ : प्रवेश फी भरताना अडचणी येतात का?**

| पर्याय | मुली | मुलगे | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) अडचणी येतात | ७ | २५ | ३२ | २८·५७ |
| ब) अडचणी येत नाहीत | ४० | ४० | ८० | ७१·४२ |
| एकूण | ४७ | ६५ | ११२ | |

**सारणी क्र. ९ : प्रवेश फी भरताना येणाऱ्या अडचणी**

| पर्याय | मुली | मुलगे | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) फीची रक्कम जास्त होती | ४ | १९ | २३ | ४८·९३ |
| ब) मुदत थोडी होती | ३ | ११ | १४ | २९·७८ |
| क) हप्त्याने फी भरण्याची सवलत नव्हती | १ | ९ | १० | २१·२७ |
| ड) अन्य पर्याय | ० | ० | ० | |
| एकूण | ८ | ३९ | ४७ | |

११२ प्रतिसादकांपैकी ८० प्रतिसादकांना (७१·४२ टक्के) प्रवेश फी भरताना कोणत्याच अडचणी येत नाहीत. केवळ २८ टक्के विद्यार्थ्यांना अडचणी येतात. (सारणी क्र. ८). या अडणींचे विश्लेषण सारणी क्र. ९ मध्ये दिले आहे. 'फीची रक्कम जास्त होती' असे ४८·९३ टक्के प्रतिसादकांचे मत आहे. अडचणी येणाऱ्या एकूण ४७ प्रतिसादकांपैकी ३९ प्रतिसादक (८३ टक्के) पुरुष आहेत. याचा अर्थ स्त्रियांपेक्षा पुरुषांना प्रवेश फी भरताना अडचणी येतात. सारणी क्र. ८ व ९ यांचा एकत्रित विचार केला असता महाविद्यालयात प्रवेश घेणे विद्यार्थ्यांच्या पुढील आयुष्याच्या दृष्टीने महत्त्वाची बाब असल्याने येणाऱ्या अडचणींवर येनकेनप्रकारे मात करून विद्यार्थी प्रवेश घेत असावेत असे वाटते.

**सारणी क्र. १० : राखीव जागांचे प्रमाण**

| पर्याय | मुली | मुलगे | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) जास्त आहे | १२ | १८ | ३० | २८·५७ |
| ब) योग्य आहे | ४ | १७ | २१ | २०·०० |
| क) कमी आहे | ० | २ | २ | १·९० |
| ड) राखीव जागा ठेवणे इष्ट नाही | ९ | २० | २९ | २७·६१ |
| इ) राखीव जागा पूर्णपणे भरल्या जात नाहीत | ३ | ७ | १० | ९·५२ |
| फ) अन्य पर्याय | ५ | ८ | १३ | १२·३८ |
| एकूण | ३३ | ७२ | १०५ | |

ह्या प्रश्नास प्रतिसाद देणाऱ्या एकूण १०५ प्रतिसादकांची प्रतिक्रिया लक्षात घेता फक्त २० टक्के विद्यार्थ्यांनाच राखीव जागांचे प्रमाण योग्य आहे असे वाटते. अन्य ८० टक्के विद्यार्थ्यांनी आपले स्वतंत्र मत व्यक्त केले आहे. सारणी क्र. १० वरून केवळ दोन विद्यार्थ्यांनाच हे प्रमाण कमी आहे असे वाटते. उरलेल्या ७८ टक्के प्रतिसादकांपैकी २८·५७ टक्के विद्यार्थ्यांना हे प्रमाण जास्त आहे असे वाटते तर जवळ जवळ तितक्याच म्हणजे २७.६१ टक्के विद्यार्थ्यांना राखीव जागा ठेवणे इष्ट नाही असे वाटते. ९.५२ टक्के विद्यार्थांच्या मते राखीव जागा पूर्णपणे भरल्या जात नाहीत.

**सारणी क्र ११ : प्रवेशासाठी निकष**

| पर्याय | मुली | मुलगे | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) केवळ गुणवत्ता | १८ | २७ | ४५ | २९·०३ |
| ब) कोर्सविषयक आवड | २८ | ३६ | ६४ | ४१·२९ |
| क) प्रवेशपूर्व चाचणीद्वारा निवड | १५ | ३० | ४५ | २९·०३ |
| ड) कोणतेही निकष असू नयेत | १ | ० | १ | ०·६४ |
| इ) अन्य पर्याय | ० | ० | ० | |
| एकूण | ६२ | ९३ | १५५ | |

प्रवेशासाठी चार निकष पर्याय दिले होते. त्यापैकी 'कोर्सविषयक आवड' या पर्यायाची निवड सर्वांत जास्त विद्यार्थ्यांनी केलेली आहे. 'गुणवत्ता' आणि 'प्रवेशपूर्व चाचणीद्वारा निवड' ह्या दोन्ही पर्यायांची निवड करणाऱ्या प्रतिसादकांची संख्या समान आहे. (२९·०३ टक्के). ४३ प्रतिसादकांनी 'अ' आणि 'ब' या दोन्ही पर्यायांना प्रतिसाद दिला असल्याने एकूण 'प्रतिसादकांची संख्या वाढलेली दिसत आहे. प्रतिसादकांनी निवडलेल्या पर्यायांवरून 'गुणवत्ता आणि आवड' याची सांगड प्रवेशासाठी लावण्यात येणाऱ्या निकषांत केली पाहिजे.

**सारणी क्र. १२ : फीचा २ रा / ३ रा हप्ता भरताना अडचणी येतात का ?**

| पर्याय | मुली | मुलगे | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) अडचणी येतात | २ | १२ | १४ | १३·३३ |
| ब) अडचणी येत नाहीत | ४२ | ४९ | ९१ | ८६·६६ |
| एकूण | ४४ | ६१ | १०५ | |

सारणी क्र. १२ वरून फीचा २ रा किंवा ३ रा हप्ता भरताना विद्यार्थ्यांना अडचणी येत नाहीत असे दिसते. सारिणी क्र. ८, ९ व १२ यांचा एकत्रित विचार केल्यास महाविद्यालयात फी भरताना विद्यार्थ्यांना विशेष अडचणी येत नाहीत.

**सारणी क्र. १३ : स्कॉलरशिप्स्, फ्रीशिप्स् बाबत येणाऱ्या अडचणी**

| पर्याय | मुली | मुलगे | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) सवलतींची माहिती नव्हती | ५ | ७ | १२ | २०·६८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ब) प्रवेशानंतर महाविद्यालयातून माहिती दिली गेली नाही | ४ | ११ | १५ | २५·८६ |
| क) सूचना-फलकावरील सूचना पाहिली नाही | २ | २ | ४ | ६·८९ |
| ड) अर्ज भरण्यास मुदत थोडी होती | ३ | ७ | १० | १७·२४ |
| इ) अर्जाबरोबरच्या कागदपत्रांची पूर्तता वेळेत होऊ शकली नाही | १ | ५ | ६ | १०·३४ |
| फ) अर्ज इंग्रजीत असल्याने नीट भरता आले नाहीत | ० | २ | २ | ३·४४ |
| ग) कार्यालयातून सहकार्य मिळाले नाही | ० | ५ | ५ | ८·६२ |
| ह) अन्य पर्याय | ३ | १ | ४ | ६·८९ |
| एकूण | १८ | ४० | ५८ | |

सारणी क्र. १३ पाहता एकूण ११२ प्रतिसादकांपैकी फक्त ५८ प्रतिसादकांना स्कॉलरशिप्स्, फ्रीशिप्स् बाबत अडचणी येतात असे दिसून येते. हे प्रमाण एकूण प्रतिसादकांशी ५१·७८ टक्के पडते. एकूण शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी स्कॉलरशिप्स्, फ्रीशिप्स् घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जवळजवळ निम्मीच असल्याने सर्वसाधारणपणे आर्थिक सवलतींचा लाभ घेणाऱ्या बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या अडचणींचे प्रतिबिंब वरील सारणीवरून लक्षात येईल. 'अ', 'ब' व 'क' पर्यायास पसंती देणाऱ्या प्रतिसादकांची एकूण टक्केवारी ५३·४३ प्रतिशत होते. ह्या तीनही पर्यायांवरून आर्थिक सवलतींबाबत विद्यार्थ्यांपर्यंत माहिती पोचत नाही हे स्पष्ट होत आहे. सवलतीचे अर्ज भरण्याची मुदत थोडी होतो असे १७·२४ प्रतिशत विद्यार्थ्यांचे मत आहे तर आर्थिक सवलतींबाबत महाविद्यालयाच्या कार्यालयातून विद्यार्थ्यांना सहकार्य मिळत नाही असे ८·६२ टक्के विद्यार्थ्यांना वाटते.

**सारणी क्र. १४ : स्कॉलरशिप्सबाबत शासकीय कार्यालयातून सहकार्य मिळते काय ?**

| पर्याय | मुली | मुलगे | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) सहकार्य मिळते | ७ | १० | १७ | १७·८९ |
| ब) सहकार्य मिळत नाही | ४ | ९ | १३ | १३·६८ |
| क) प्रश्न उपस्थित होत नाही | २९ | ३६ | ६५ | ६८·४२ |
| एकूण | ४० | ५५ | ९५ | |

**सारणी क्र. १५ : आर्थिक सवलतींबाबत तांत्रिक अडचणी सोडविण्यासाठी महाविद्यालयाच्या कार्यालयातील सहकार्याबाबत**

| पर्याय | मुली | मुलगे | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) सहकार्य मिळते | २३ | ३९ | ६२ | ७२·९४ |
| ब) सहकार्य मिळत नाही | १२ | ११ | २३ | २७·०५ |
| एकूण | ३५ | ५० | ८५ | |

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आर्थिक सवलती प्राप्त करून घेताना महाविद्यालयाचे कार्यालय व शासकीय कार्यालय यांच्याशी सतत संपर्क साधावा लागतो. कारण त्याशिवाय अशा सवलती मिळणे अवघड होते. ह्या दोन्ही कार्यालयांतील सहकार्यावर आर्थिक मदत सहज व विनासायास मिळणे अवलंबून असते. सारणी क्र. १४ व १५ वरून हे सहकार्य मिळते ही गोष्ट स्पष्ट होते. सारणी क्र. १४ मधील 'क' पर्यायाला प्रतिसाद देणारे ६५ प्रतिसादक हे अशा प्रकारच्या सवलती घेणारे नाहीत. उरलेल्या ३० प्रतिसादकांपैकी १७.८९ टक्के विद्यार्थ्यांना शासकीय कार्यालयातून सहकार्य मिळते तर १३.६८ टक्के विद्यार्थ्यांना सहकार्य मिळत नाही. सारणी क्र. १५ वरून ७२.९४ टक्के विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या कार्यालयाकडून सहकार्य मिळते तर २७.०५ टक्के विद्यार्थ्यांना सहकार्य मिळू शकत नाही. अशा प्रकारे सहकार्य न मिळणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण जरी कमी असले तरी ते दुर्लक्षणीय खास नाही. विशेषतः मागासवर्गीय विद्यार्थ्यांबाबत ही बाब जास्त प्रकर्षाने जाणवते असे अनेकांशी केलेल्या चर्चेतून स्पष्ट झाले आहे.

**सारणी क्र. १६ : कार्यालयीन मार्गदर्शनाबाबतचा अनुभव**

| पर्याय | मुली | मुलगे | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) मार्गदर्शन मिळाले | १८ | २५ | ४३ | ५३.०८ |
| ब) मार्गदर्शन मिळाले नाही | २ | १० | १२ | १४.८१ |
| क) लेखनिकांची वागणूक तुसडेपणाची होती | ६ | १४ | २० | २४.६९ |
| ड) अन्य पर्याय | ५ | १ | ६ | ७.४० |
| एकूण | ३१ | ५० | ८१ | |

महाविद्यालयातील कार्यालयीन मार्गदर्शनाच्या अनुभवाबाबत ८१ प्रतिसादकांनी त्यांच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. उरलेले ३१ प्रतिसादक याबाबत मौन धारण करून आहेत. ८१ प्रतिसादकांपैकी ५३.०८ टक्के प्रतिसादकांना मार्गदर्शन मिळते तर उरलेल्या ३८ प्रतिसादकांना मार्गदर्शन मिळत नाही. लेखनिकांची वागणूक तुसडेपणाची वाटते. अन्य काही प्रतिक्रिया अशा आहेत. 'अमुक अमुक ठिकाणी चौकशी करा. आम्ही याबाबत काहीच करू शकत नाही.', 'मार्गदर्शनाचा प्रयत्नच केला जात नाही.', 'जेवढ्यास तेवढे मार्गदर्शन', इ. सारणी क्र. १६ वरून मार्गदर्शन मिळणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ५३.०८ टक्के असली तरी जवळजवळ तितक्याच म्हणजे ४६.९० टक्के विद्यार्थी मार्गदर्शनाच्या अभावी अडचणीत येतात हे दिसून येईल.

**सारणी क्र. १७ : रेल्वे / एस्. टी. कन्सेशनबाबत येणाऱ्या अडचणी**

| पर्याय | मुली | मुलगे | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) कन्सेशनची माहिती कार्यालयातून दिली जात नाही | ५ | १२ | १७ | १८.४७ |
| ब) फॉर्मस् उपलब्ध होत नाहीत | ५ | १० | १५ | १६.३० |
| क) कार्यालयातून निष्कारण दिरंगाई | १० | १० | २० | २१.७३ |
| ड) एस. टी. / रेल्वे सेवकांकडून अडवणूक | ६ | २८ | ३४ | ३६.९५ |
| इ) अन्य पर्याय | १ | ५ | ६ | ६.५२ |
| एकूण | २७ | ६५ | ९२ | |

सारणी क्र. १७ नुसार रेल्वे / एस. टी. कन्सेशनबाबत येणाऱ्या अडचणींचे दिग्दर्शन एकूण ११२ प्रतिसादकांपैकी ९२ प्रतिसादकांनी केलेले आहे. हे प्रमाण ८२·१४ टक्के पडते. यावरून प्रवासविषयक सवलती मिळविताना विद्यार्थ्यांना निरनिराळ्या अडचणींना मोठ्या प्रमाणावर तोंड द्यावे लागते हे दिसून येते. प्रवासविषयक सवलतींबाबतच्या अडचणींपैकी सर्वांत जास्त अडचण कोणती असेल तर ती म्हणजे ' रेल्वे / एस. टी. सेवकांकडून होणारी अडवणूक.' एकूण विद्यार्थ्यांपैकी ३६·९५ टक्के विद्यार्थी प्रतिसादकांना ही अडचण येते, हे वरील सारणीवरून स्पष्ट होत आहे. त्याखालोखाल ' महाविद्यालयाच्या कार्यालयाकडून होणारी दिरंगाई ' (२१.७३ टक्के), ' माहितीचा अभाव ' (१८,४७ टक्के) व ' फॉर्म्सची अनुपलब्धता ' या अडचणींचा क्रमांक लागतो. या प्रश्नासाठी प्रतिसादकांनी दिलेल्या अन्य पर्यायांकडे लक्ष दिल्यास त्यांतसुद्धा ' कार्यालयातील कारकून बेफिकिरीने वागतात.', ' कन्सेशनचे काम नंतर केले तरी चालेल अशी भावना ', अशा प्रकारच्या अडचणींची नोंद प्रतिसादकांनी केलेली आढळून येते.

प्रवासविषयक अडचणींबाबत महाविद्यालयाच्या कार्यालयातील हे काम करणाऱ्या संबंधित काही व्यक्ती तसेच एस. टी. व रेल्वे अधिकारी यांच्याशी संपर्क साधून घेतलेल्या मुलाखतींतून खालीलप्रमाणे माहिती समजली :

१. महाविद्यालयाकडे सवलतींबाबतच्या नियमांची माहिती वाहतूक करणाऱ्या संस्थांकडून लेखी स्वरूपात मागणी करूनसुद्धा मिळू शकत नाही.
२. सवलतींच्या नियमांत वेळोवेळी होणाऱ्या बदलांची माहिती महाविद्यालयांकडे तत्काळ येत नाही.
३. निरनिराळ्या स्थानकांवर निरनिराळे निकष लावले जातात (उदा. वयाची, उत्पन्नाची अट, इ.).
४. सवलतीचे अर्ज विद्यार्थ्यांकडून आयत्या वेळी कार्यालयात सादर केले जातात.
५. अर्ज नियमात बसविण्यासाठी विद्यार्थ्यांच्या संबंधित रेकॉर्डमध्ये (उदा. कायम राहण्याचे ठिकाण, इ.) बदल करण्याबाबत लेखनिकांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत दडपण आणले जाते.
६. कन्सेशनसाठी केलेल्या अर्जात खोटी माहिती दिलेली असते (उदा. वयाबाबत, राहण्याच्या ठिकाणाबाबत, इ.).
७. प्रवासाच्या मार्गात आयत्यावेळी बदल करण्यात येतो.
८. प्रवास सवलतींचा लाभ अनेक वेळा विद्यार्थ्यांबरोबर त्यांचे मित्र व नातेवाईक घेण्याचा प्रयत्न करतात.

**सारणी क्र. १८ : अभ्यासेतर उपक्रमांबाबत येणाऱ्या अडचणी**

| पर्याय | मुली | मुलगे | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) शिक्षकांचे सहकार्य व मार्गदर्शन मिळत नाही | ७ | १४ | २१ | २९·१६ |
| ब) कार्यालयाकडून प्रशासकीय बाबींची पूर्तता करण्यात दिरंगाई | ३ | ५ | ८ | ११·११ |
| क) आर्थिक बोजा विद्यार्थ्यांस सहन करावा लागतो | ५ | १६ | २१ | २९·१६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ड) महाविद्यालयाकडून प्रोत्साहन नाही | २ | १२ | १४ | १९.४४ |
| इ) अन्य पर्याय | ३ | ५ | ८ | ११.११ |
| एकूण | २० | ५२ | ७२ | |

अभ्यासेतर उपक्रमांत (Co-curricular / Extra-curricular activities) भाग घेताना एकूण प्रतिसादकांपैकी ७२ प्रतिसादकांना म्हणजे ६४.२८ टक्के विद्यार्थ्यांना अडचणी येतात. या अडचणींमध्ये 'शिक्षकांच्या सहकार्याचा व मार्गदर्शनाचा अभाव' आणि 'आर्थिक बोजा' या दोन अडचणी प्रामुख्याने (२९.१६ प्रतिशत) आढळून आल्या आहेत. सारणी क्र. १८ मध्ये दिलेल्या अडचणींव्यतिरिक्त अन्य काही अडचणी पुढीलप्रमाणे आहेत :

१. अभ्यासेतर उपक्रम व महाविद्यालयीन अभ्यासाच्या वेळा यांचा मेळ जमत नाही. एकाच महाविद्यालयात अनेक विद्याशाखा, दुबार पद्धत, सत्र पद्धती अशा अनेक कारणांमुळे ही अडचण उद्भवते.

२. अशा कार्यक्रमांबाबत काही ठराविक गटांचे वर्चस्व महाविद्यालयातून आढळून येते.

**सारणी क्र. १९ : दैनंदिन प्रशासकीय अडचणींबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधता येतो काय ?**

| पर्याय | मुली | मुलगे | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) संपर्क साधता येतो | ३६ | ५५ | ९१ | ८५.८४ |
| ब) संपर्क साधता येत नाही | ७ | ८ | १५ | १४.१५ |
| एकूण | ४३ | ६३ | १०६ | |

**सारणी क्र. २० : प्रशासकीय अडचणींबाबत महाविद्यालयाच्या कार्यालयाकडून योग्य मार्गदर्शन केले जाते काय ?**

| पर्याय | मुली | मुलगे | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) मार्गदर्शन केले जाते | ३२ | ५३ | ८५ | ८५.८५ |
| ब) मार्गदर्शन केले जात नाही | ७ | ७ | १४ | १४.१४ |
| एकूण | ३९ | ६० | ९९ | |

सारणी क्र. १९ व २० वरून असे दिसून येते की, विद्यार्थ्यांना दैनंदिन प्रशासकीय अडणींबाबत महाविद्यालयातील अधिकाऱ्यांशी सहज संपर्क साधता येतो व अशा अडचणींबावत महाविद्यालयाच्या कार्यालयामार्फत योग्य मार्गदर्शनही मिळते. केवळ १४ टक्के विद्यार्थ्यांनाच अपेक्षित मार्गदर्शनाला मुकावे लागते.

**सारणी क्र. २१ : अडचणी दूर करण्याबाबत शिक्षकांकडून मार्गदर्शन मिळते काय ?**

| पर्याय | मुली | मुलगे | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) मार्गदर्शन मिळते | ३४ | ५२ | ८६ | ८१.९० |
| ब) मार्गदर्शन मिळत नाही | ८ | ११ | १९ | १८.०९ |
| एकूण | ४२ | ६३ | १०५ | |

सारणी क्र. २१ नुसार सुमारे ८२ टक्के विद्यार्थ्यांना अडचणी दूर करण्याबाबत शिक्षकांकडून मार्गदर्शन मिळते आणि उरलेल्या १८ टक्के विद्यार्थ्यांना अपेक्षित मार्गदर्शन शिक्षकांकडून मिळत नाही.

सारणी क्र. १९, २० व २१ वरून सकृतदर्शनी असे दिसते की, महाविद्यालयीन बहुसंख्य विद्यार्थ्यांना येणाऱ्या प्रशासकीय अडचणींबाबत महाविद्यालयातील अधिकारीवर्ग, कार्यालयीन सेवक आणि शिक्षक यांचेकडून योग्य मार्गदर्शन मिळते. त्यांच्याशी संपर्क साधता येतो. असे असताही विद्यार्थ्यांना जाणवणाऱ्या अडचणींची संख्याही तितकीच मोठी का ? अडचणी दूर का होऊ शकत नाहीत ? प्रत्यक्षात काय होते ? असे प्रश्न संशोधकासमोर उभे राहिले. याचे विश्लेषण करून नेमकी परिस्थिती कशी शोधून काढावी हा मोठा यक्ष-प्रश्न होता. त्यासाठी नेहमीचा चाकोरीबद्ध उपाय केवळ अशक्यच होता. तेव्हा संशोधकाने शास्त्रीय पद्धत बाजूस ठेवून स्वतःच काही विद्यार्थ्यांच्या, शिक्षकांच्या, कार्यालयीन सेवकांच्या व अधिकारीवर्गाच्या अप्रत्यक्ष मुलाखती घेतल्या. त्यांच्याशी सर्वसाधारण चर्चा केली. ज्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळत नाही व ज्या विद्यार्थ्यांना मिळते अशा दोन्ही गटांतील विद्यार्थ्यांच्या अप्रत्यक्षपणे (म्हणजे त्यांना या संशोधनाची जाणीव न देता) मुलाखती घेतल्या. या सर्वांशी झालेल्या एकूण चर्चेतून संशोधकास या परिस्थितीबाबत खालीलप्रमाणे माहिती आढळून आली.

ज्या सुमारे २० टक्के विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळत नाही हे विद्यार्थी स्वतःच काहीसे लाजाळू किंवा पुढाकार वृत्तीचा (initiative) अभाव असलेले आढळले. एखादी अडचण येते आहे असे दिसताच ती सोडविण्याच्या अन्य काही मार्गाचा शोध घेण्याऐवजी ती अडचण टाळण्याकडेच त्यांचा कल दिसून आला. याउलट ज्यांना मार्गदर्शन मिळते त्यांना येणाऱ्या सर्वच अडचणींचे निवारण त्यांच्या मनाप्रमाणे होतेच असे नाही. त्यांनाही अडचणी येतात, मात्र असे विद्यार्थी, अधिकारी, सेवकवर्ग व शिक्षक यांच्याशी संपर्क साधून अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करतात. ह्याचाच सरळ, सोपा व सुटसुटीत अर्थ एवढाच की, अडचणी येतात, त्या सोडविण्याचा प्रयत्न होतो; नाही असे नाही, तथापि जितक्या आत्मीयतेने हे काम व्हावयास हवे तेवढे दोन्ही बाजूंनी होत नाही. अडचणींचा पाठपुरावा योग्य तऱ्हेने केला जात नाही. त्यामुळे निष्कारण गुंतागुंत वाढते. काही सुखावतात, काही दुखावतात या सदर्भात एका विद्यार्थ्याने दिलेल्या अन्य प्रतिसादाची प्रचीती येते. तो म्हणतो. " जितक्यास तितके काम, हा धर्म झाला आहे. "

वरील विवेचनावरून हे दिसून येते की, अडचणींच्या निराकरणाबाबत जरी मार्गदर्शन मिळत असले तरी त्याच विद्यार्थ्यांनी यापूर्वीच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे येणाऱ्या अडचणींचे दिग्दर्शन केले आहे.

**सारणी क्र. २२ : महाविद्यालयातून सर्टिफिकिटे मिळण्याबाबत येणाऱ्या अडचणी**

| पर्याय | मुली | मुलगे | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) कार्यालयाकडून दिरंगाई | ५ | १६ | २१ | ४५.६५ |
| ब) पैसे भरावे लागतात | ३ | १० | १३ | २८.२६ |
| क) ट्रु कॉपीज मिळत नाहीत | १ | ६ | ७ | १७.२१ |
| ड) टंकलेखनासाठी खर्च फार होतो | १ | ४ | ५ | १०.८६ |
| इ) अन्य पर्याय | ० | ० | ० | ० |
| एकूण | १० | ३६ | ४६ | |

महाविद्यालयातून सर्टिफिकिटे मिळविण्याबाबत येणाऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या अडचणी एकूण ४६ विद्यार्थ्यांनी मांडल्या आहेत. एकूण ११२ विद्यार्थ्यांच्या संदर्भात हे प्रमाण ४१.७ इतके पडते. याचा अर्थ निम्म्यापेक्षा जास्त विद्यार्थ्यांना ही सर्टिफिकिटे मिळविण्यात फारशा अडचणी येत नाहीत असा होतो. सर्टिफिकिटे मिळविण्यात ज्या काही अडचणी येतात त्यांत सर्वांत जास्त प्रमाणात येणारी अडचण म्हणजे 'कार्यालयांकडून दिरंगाई.' या अडचणींना प्रतिसाद देणाऱ्यांची टक्केवारी ४५.६५ प्रतिशत आहे. (सारणी क्र. २२)

**सारणी क्र. २३ : डिपॉझिटचे पैसे परत मिळताना येणाऱ्या अडचणी**

| पर्याय | मुली | मुलगे | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) प्रोसिजर वेळ खाणारे आहे | ४ | ७ | ११ | २२.९१ |
| ब) अनेक वेळा हेलपाटे घालावे लागतात | ५ | १५ | २० | ४१.६६ |
| क) योग्य कारणांची दखल घेत नाहीत | ३ | ८ | ११ | २२.९१ |
| ड) अन्य पर्याय | २ | ४ | ६ | १२.५० |
| एकूण | १४ | ३४ | ४८ | |

प्रवेश फीबरोबरच महाविद्यालयात डिपॉझिट म्हणून काही रक्कम भरलेली असते. कोर्स पूर्ण झाल्यावर अथवा काही कारणाने विद्यार्थ्यांनी महाविद्यालय सोडल्यास ही रक्कम परत मिळते. ही रक्कम परत मिळविताना येणाऱ्या अडचणींचे पृथक्करण सारणी क्र. २३ मध्ये दर्शविले आहे. ११२ प्रतिसादकांपैकी ४८ विद्यार्थ्यांना निरनिराळ्या प्रकारच्या अडचणी येतात. याचाच अर्थ असा की, उरलेल्या ६४ विद्यार्थ्यांना विशेष प्रकारच्या अडचणी न येता डिपॉझिटची रक्कम परत मिळते. डिपॉझिटची रक्कम परत मिळविण्यासाठी अनेक वेळा हेलपाटे घालावे लागतात असा ४१.६६ टक्के विद्यार्थ्यांचा दावा आहे. तसेच ही रक्कम परत मिळविताना जी व्यवस्था महाविद्यालयात आहे ती व्यवस्था (प्रोसीजर) वेळ खाणारी आहे, असे २२.९१ टक्के विद्यार्थ्यांचे मत आहे. या व्यवस्थेत काही तरी बदल करणे आवश्यक आहे.

डिपॉझिटची रक्कम परत मिळविताना आणखीही काही अडचणी येतात असे दिसून आले. अन्य पयाय म्हणून ज्या प्रतिसादकांनी त्यांचा पर्याय नमूद केलेला आहे, त्यातील काही प्रमुख प्रतिसाद खालीलप्रमाणे आहेत.

१. डिपॉझिट परत मिळते; परंतु खूप खटपटीनंतर. त्यामुळे ते जणू काही कमावल्यासारखे वाटते.

२. महाविद्यालयात फी फारच काटली जाते. विद्यापीठात कोणी काही ऐकूनच घेत नाहीत.

३. पैसे कसे कापले जातात त्याचा उल्लेख नसतो.

४. पैसे परत मिळाले तरी काही रक्कम विनाकारणच काटली जाते.

५. कार्यालयातील असहकार.

वरील विधानांबाबत काही महाविद्यालयातील हे काम करणाऱ्या सेवकांशी चर्चा केली. त्यात वरील बाबीत काही प्रमाणात तथ्य असल्याचे आढळून आले. बऱ्याच महाविद्यालयांतून "डेव्हलपमेंट फंडासाठी" वा अन्य काही उपक्रमांसाठी अशा प्रकारे विद्यार्थ्यांकडून निधी गोळा करतात.

काही संस्थांमधून ही प्रथा आहे. बहुतेक ठिकाणी अशा गोळा केलेल्या निधीची पावतीही दिली जाते. याउलट काही महाविद्यालयांतून डिपॉझिटची रक्कम न नेणाऱ्यांचीही संख्या लक्षणीय आहे. त्याच्या कारणांची चौकशी करता असे आढळून आले की, अशा प्रकारे डिपॉझिट परत मिळते याची माहितीही विद्यार्थ्यांस नसते.

**सारणी क्र. २४ : महाविद्यालय सोडल्याचा दाखला (ट्रान्स्फरन्स सर्टिफिकेट) मिळवताना येणाऱ्या अडचणी**

| पर्याय | मुली | मुलगे | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) वेळेवर मिळत नाहीत | ३ | ५ | ८ | १७·०२ |
| ब) अनेक हेलपाटे घालावे लागतात | ८ | ११ | १९ | ४०·४२ |
| क) पत्रव्यवहाराची दखल घेतली जात नाही | ३ | ८ | ११ | २३·४० |
| ड) जादा फी द्यावी लागते | २ | ७ | ९ | १९·१४ |
| इ) अन्य पर्याय | ० | ० | ० | ० |
| एकूण | १६ | ३१ | ४७ | |

सारणी क्र. २४ वरून असे दिसते की, फक्त ४७ विद्यार्थ्यांना हे दाखले मिळविताना अडचणी आल्या. एकूण प्रतिसादकांच्या संख्येशी हे प्रमाण ४१.९७ प्रतिशत आहे. सर्वांत जास्त अडचण कोणती असेल तर ह्या दाखल्यासाठी अनेक हेलपाटे घालावे लागतात (४०.४२ टक्के). त्या-खालोखाल "पत्रव्यवहाराची दखल घेतली जात नाही.", "दाखले वेळेवर मिळत नाहीत.", "जादा फी द्यावी लागते." अशा प्रकारच्या अडचणी निर्माण झालेल्या दिसून येतात.

**सारणी क्र. २५ : महाविद्यालयीन कोर्स संपल्यानंतर स्थलांतर (ट्रान्स्फरन्स सर्टिफिकेट व स्थानांतर (मायग्रेशन सर्टिफिकेट) दाखले मिळविताना येणाऱ्या अडचणी**

| पर्याय | मुली | मुलगे | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) दाखले वेळेवर मिळत नाहीत | २ | ५ | ७ | ३३·३३ |
| ब) अनेक हेलपाटे घालावे लागतात | ० | ५ | ५ | २३·८० |
| क) संबंधित पत्रव्यवहाराची दखल घेतली जात नाही | २ | ५ | ७ | ३३·३३ |
| ड) कार्यालयातून सहकार्य मिळत नाही | १ | १ | २ | ९·५२ |
| इ) अन्य पर्याय | ० | ० | ० | |
| एकूण | ५ | १६ | २१ | |

पदवी परीक्षा संपल्यावर महाविद्यालयातून स्थलांतर व विद्यापीठातून स्थानांतर दाखले मिळवावे लागतात. हे दाखले मिळविताना पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणत्या अडचणी येतात ते सारणी क्र. २५ मध्ये दर्शविले आहे. पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या एकूण २१ प्रतिसादकांपैकी सर्वच्या सर्व प्रतिसादकांनी या प्रश्नास प्रतिसाद दिला आहे. याचा अर्थ १०० टक्के विद्यार्थ्यांना सदरचे दाखले मिळविताना या ना त्या प्रकारच्या अडचणी येतात. ३३·३३ टक्के विद्यार्थ्यांना हे दाखले वेळेवर मिळत नाहीत, तर तितक्याच विद्यार्थ्यांच्या बाबतीत संबं-

धित पत्रव्यवहाराची दखल घेतली जात नाही. २३·८० टक्के विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या अथवा विद्यापीठाच्या कार्यालयात हे दाखले मिळविण्यासाठी अनेक हेलपाटे घालावे लागतात.

**सारणी क्र. २६ : पदवी परीक्षेनंतर गुणपत्रके व पदवी प्रमाणपत्रे मिळविताना येणाऱ्या अडचणी**

| पर्याय | मुली | मुलगे | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) उशीरा मिळतात | १ | ३ | ४ | २८·५७ |
| ब) अर्जाची दखल घेतली जात नाही | ० | ४ | ४ | २८·५७ |
| क) फी भरण्यासाठी लांब जावे लागते | १ | १ | २ | १४·२८ |
| ड) वारंवार हेलपाटे घालावे लागतात | १ | २ | ३ | २१·४२ |
| इ) अन्य अडचणी | ० | १ | १ | ७·१४ |
| एकण | ३ | ११ | १४ | |

पदव्युत्तर शिक्षणक्रम करीत असलेले किंवा पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेले असे एकूण २१ प्रतिसादक निवडण्यात आले होते. त्यापैकी १४ प्रतिसादकांना म्हणजे ६६·६६ टक्के प्रतिसादकांना पदवी परीक्षेनंतर गुणपत्रके व पदवी प्रमाणपत्रे मिळविताना अडचणी आल्या. सर्वात जास्त म्हणजे २८·५७ टक्के विद्यार्थ्यांना ही प्रमाणपत्रे एक तर उशीरा मिळाली अथवा त्याबाबत त्यांनी केलेल्या अर्जाची दखल घेतली गेली नाही. २१·४२ टक्के विद्यार्थ्यांना या कामासाठी महाविद्यालयाच्या वा विद्यापीठाच्या कार्यालयात वारंवार हेलपाटे घालावे लागले.

सारणी क्र. २ ते २६ मध्ये प्रश्नावलीतील प्रमुख प्रश्नांना मिळालेल्या प्रतिसादानुसार विश्लेषण केले आहे. याशिवाय विद्यार्थ्यांना इतर काही प्रशासकीय अडचणी येत असल्यास त्या स्वतंत्र नमूद करावयास सांगितल्या होत्या. त्यानुसार विद्यार्थ्यांनी त्या नमूद केल्या आहेत. त्यातील या अभ्यासाशी संबंधित प्रमुख अडचणी खालीलप्रमाणे आढळून आल्या :

१. जर क्लार्कची ओळख असेल तर काहीच अडचणी नाहीत; पण ओळख नसेल तर अडचणीच अडचणी.

२. फॉर्म्स / फी भरताना रांगेत लागणारा फार वेळ.

३. महाविद्यालयीन व विद्यापीठ फी भरताना फार लांब रांगा लागतात. कमीत कमी २ तास जातात.

४. विद्यार्थ्यांची सर्टिफिकिटे महाविद्यालयाकडून गहाळ होतात. त्याची नुकसान-भरपाई अथवा विचार होत नाही.

५. कार्यालय-सेवकांची तुसडेपणाची वागणूक.

६. अॅडमिशन घेताना हेलपाटे मारावे लागतात.

७. विद्यापीठ म्हणजे अनंत घोटाळे आणि विद्यार्थ्यांबद्दल सर्वोच्च निष्काळजीपणा.

८. कॉलेजचे प्रॉस्पेक्टस् व कोर्सचे सिलॅबस मराठीतून असावे.

९. स्कॉलरशिप्स, फ्रीशिप्स देताना सेंट्रल व स्टेट बोर्डातील फरक लक्षात घेतला जात नाही. त्यामुळे काहींना आर्थिक सवलतींना मुकावे लागते.

१०. शिष्यवृत्तीचे अर्ज किचकट, मोठे व इंग्रजीतून असतात.

## निष्कर्ष

संकलित माहितीच्या आधारे केलेल्या विश्लेषणावरून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जाणवणाऱ्या प्रशासकीय अडचणींबाबतचे येणारे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत :

१. सारणी क्र. २ वरून बहुसंख्य विद्यार्थ्यांना स्वतःच्या आवडीचा कोर्स निवडण्यात फारशा अडचणी येत नाहीत. तसेच कोर्सविषयक पूर्वकल्पनाही विद्यार्थ्यांना असते असे आढळून आले आहे.

२. प्रवेशापूर्वी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता बहुसंख्य विद्यार्थी वेळेत पूर्ण करतात. तथापि सारणी क्र. ७ नुसार पूर्वीच्या संस्थेतील दाखला वेळेवर मिळत नाही असे दिसून येते.

३. महाविद्यालयीन प्रवेशासाठी सध्या निरनिराळ्या महाविद्यालयांतून निरनिराळी प्रशासकीय व्यवस्था असते. ही व्यवस्था अयोग्य आहे. त्यासाठी खूप वेळ लागतो व ती व्यवस्था राबविणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून विद्यार्थ्यांना अयोग्य वागणूक मिळते.

४. प्रथम प्रवेश घेताना (सारणी क्र. ८ व ९) व फीचा दुसरा हप्ता भरतानाही (सारणी क्र. १२) विद्यार्थ्यांना विशेष अडचणी येत नाहीत असे आढळून आले आहे.

५. आर्थिक सवलतींबाबतचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत. (सारणी क्र. १३ ते १५ पहा.)

अ) विद्यार्थ्यांना सवलतींची माहिती नीट, पुरेशी व वेळेवर मिळत नाही.

ब) सवलतीचे अर्ज भरण्यास मुदत थोडी असते.

क) महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांचे सहकार्य मिळत नाही.

६. महाविद्यालयातील राखीव जागांचे प्रमाण जास्त आहे. बऱ्याच वेळा राखीव जागा पूर्णपणे भरल्या जात नाहीत. राखीव जागांबाबतचे निकष परिस्थितीनुरूप बदलावयास हवेत.

७. महाविद्यालयातील प्रवेश गुणवत्ता व आवड ह्या दोनच निकषांवर देण्यात यावा.

८. रेल्वे/एस. टी. कन्सेशनबाबत मोठ्या प्रमाणावर अडचणी येतात. कन्सेशनचे फॉर्म्स सहज उपलब्ध होत नाहीत. महाविद्यालयाच्या कार्यालयाकडून दिरंगाई होते. वाहतूक संस्थांतील सेवकांकडून अडवणूक होते. प्रवास-विषयक सवलतींबाबत विद्यार्थीही अशा सवलतींचा गैरफायदा घेतात असे आढळून आले आहे.

९. अडचणींच्या निराकरणाबाबत महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांचे मार्गदर्शन सर्वच विद्यार्थ्यांना आत्मीयतेने मिळत नाही (सारणी क्र. १९, २० व २१).

१०. महाविद्यालयात भरलेल्या डिपॉझिटची रक्कम सुलभ रीतीने परत मिळत नाही (सारणी क्र. २२).

११. महाविद्यालय सोडल्यानंतर आवश्यक ते दाखले वेळेवर मिळत नाहीत. त्यासाठी अनेक हेलपाटे घालावे लागतात (सारणी क्र. २४ व २५).

१२. पदवी परीक्षेनंतर विद्यापीठाकडून पदवी प्रमाणपत्रे व गुणपत्रके वेळेवर मिळत नाहीत. त्यासाठी वारंवार हेलपाटे घालावे लागतात. तसेच त्यासंबंधीच्या पत्रव्यवहाराची योग्य दखल घेतली जात नाही (सारणी क्र. २६).

१३. विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवण्याबाबत महाविद्यालयीन व विद्यापीठ कर्मचाऱ्यांची वागणूक योग्य नसते.

### महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जाणवणाऱ्या प्रशासकीय अडचणींबाबत उपाययोजना

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जाणवणाऱ्या प्रशासकीय अडचणींपैकी बहुतांश अडचणींचा विचार आतापर्यंत केला. त्यांपैकी ज्या अडचणी निश्चित स्वरूपात आणि बहुसंख्य विद्यार्थ्यांना

धित पत्रव्यवहाराची दखल घेतली जात नाही. २३·८० टक्के विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या अथवा विद्यापीठाच्या कार्यालयात हे दाखले मिळविण्यासाठी अनेक हेलपाटे घालावे लागतात.

**सारणी क्र. २६ : पदवी परीक्षेनंतर गुणपत्रके व पदवी प्रमाणपत्रे मिळविताना येणाऱ्या अडचणी**

| पर्याय | मुली | मुलगे | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| अ) उशीरा मिळतात | १ | ३ | ४ | २८.५७ |
| ब) अर्जाची दखल घेतली जात नाही | ० | ४ | ४ | २८.५७ |
| क) फी भरण्यासाठी लांब जावे लागते | १ | १ | २ | १४.२८ |
| ड) वारंवार हेलपाटे घालावे लागतात | १ | २ | ३ | २१.४२ |
| इ) अन्य अडचणी | ० | १ | १ | ७.१४ |
| एकुण | ३ | ११ | १४ | |

पदव्युत्तर शिक्षणक्रम करीत असलेले किंवा पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेले असे एकूण २१ प्रतिसादक निवडण्यात आले होते. त्यापैकी १४ प्रतिसादकांना म्हणजे ६६·६६ टक्के प्रतिसादकांना पदवी परीक्षेनंतर गुणपत्रके व पदवी प्रमाणपत्रे मिळविताना अडचणी आल्या. सर्वात जास्त म्हणजे २८·५७ टक्के विद्यार्थ्यांना ही प्रमाणपत्रे एक तर उशीरा मिळाली अथवा त्याबाबत त्यांनी केलेल्या अर्जाची दखल घेतली गेली नाही. २१·४२ टक्के विद्यार्थ्यांना या कामासाठी महाविद्यालयाच्या वा विद्यापीठाच्या कार्यालयात वारंवार हेलपाटे घालावे लागले.

सारणी क्र. २ ते २६ मध्ये प्रश्नावलीतील प्रमुख प्रश्नांना मिळालेल्या प्रतिसादानुसार विश्लेषण केले आहे. याशिवाय विद्यार्थ्यांना इतर काही प्रशासकीय अडचणी येत असल्यास त्या स्वतंत्र नमूद करावयास सांगितल्या होत्या. त्यानुसार विद्यार्थ्यांनी त्या नमूद केल्या आहेत. त्यातील या अभ्यासाशी संबंधित प्रमुख अडचणी खालीलप्रमाणे आढळून आल्या :

१. जर क्लार्कची ओळख असेल तर काहीच अडचणी नाहीत; पण ओळख नसेल तर अडचणीच अडचणी.

२. फॉर्म्स / फी भरताना रांगेत लागणारा फार वेळ.

३. महाविद्यालयीन व विद्यापीठ फी भरताना फार लांब रांगा लागतात. कमीत कमी २ तास जातात.

४. विद्यार्थ्यांची सर्टिफिकिटे महाविद्यालयाकडून गहाळ होतात. त्याची नुकसान-भरपाई अथवा विचार होत नाही.

५. कार्यालय-सेवकांची तुसडेपणाची वागणूक.

६. ॲडमिशन घेताना हेलपाटे मारावे लागतात.

७. विद्यापीठ म्हणजे अनंत घोटाळे आणि विद्यार्थ्यांबद्दल सर्वोच्च निष्काळजीपणा.

८. कॉलेजचे प्रॉस्पेक्टस् व कोर्सचे सिलॅबस मराठीतून असावे.

९. स्कॉलरशिप्स, फ्रीशिप्स देताना सेंट्रल व स्टेट बोर्डातील फरक लक्षात घेतला जात नाही. त्यामुळे काहींना आर्थिक सवलतींना मुकावे लागते.

१०. शिष्यवृत्तीचे अर्ज किचकट, मोठे व इंग्रजीतून असतात.

## निष्कर्ष

संकलित माहितीच्या आधारे केलेल्या विश्लेषणावरून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जाणवणाऱ्या प्रशासकीय अडचणींबाबतचे येणारे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत :

१. सारणी क्र. २ वरून बहुसंख्य विद्यार्थ्यांना स्वतःच्या आवडीचा कोर्स निवडण्यात फारशा अडचणी येत नाहीत. तसेच कोर्सविषयक पूर्वकल्पनाही विद्यार्थ्यांना असते असे आढळून आले आहे.

२. प्रवेशापूर्वी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता बहुसंख्य विद्यार्थी वेळेत पूर्ण करतात • तथापि सारणी क्र. ७ नुसार पूर्वीच्या संस्थेतील दाखला वेळेवर मिळत नाही असे दिसून येते •

३. महाविद्यालयीन प्रवेशासाठी सध्या निरनिराळ्या महाविद्यालयांतून निरनिराळी प्रशासकीय व्यवस्था असते. ही व्यवस्था अयोग्य आहे. त्यासाठी खूप वेळ लागतो व ती व्यवस्था राबविणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून विद्यार्थ्यांना अयोग्य वागणूक मिळते.

४. प्रथम प्रवेश घेताना (सारणी क्र. ८ व ९) व फीचा दुसरा हप्ता भरतानाही (सारणी क्र. १२) विद्यार्थ्यांना विशेष अडचणी येत नाहीत असे आढळून आले आहे.

५. आर्थिक सवलतींबाबतचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत. (सारणी क्र. १३ ते १५ पहा.)
   अ) विद्यार्थ्यांना सवलतींची माहिती नीट, पुरेशी व वेळेवर मिळत नाही.
   ब) सवलतीचे अर्ज भरण्यास मुदत थोडी असते.
   क) महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांचे सहकार्य मिळत नाही.

६. महाविद्यालयातील राखीव जागांचे प्रमाण जास्त आहे. बऱ्याच वेळा राखीव जागा पूर्णपणे भरल्या जात नाहीत. राखीव जागांबाबतचे निकष परिस्थितीनुरूप बदलावयास हवेत.

७. महाविद्यालयातील प्रवेश गुणवत्ता व आवड ह्या दोनच निकषांवर देण्यात यावा.

८. रेल्वे/एस.टी. कन्सेशनबाबत मोठ्या प्रमाणावर अडचणी येतात. कन्सेशनचे फॉर्म्स सहज उपलब्ध होत नाहीत. महाविद्यालयाच्या कार्यालयाकडून दिरंगाई होते. वाहतूक संस्थांतील सेवकांकडून अडवणूक होते. प्रवास-विषयक सवलतींबाबत विद्यार्थीही अशा सवलतींचा गैरफायदा घेतात असे आढळून आले आहे.

९. अडचणींच्या निराकरणाबाबत महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांचे मार्गदर्शन सर्वच विद्यार्थ्यांना आत्मीयतेने मिळत नाही (सारणी क्र. १९, २० व २१).

१०. महाविद्यालयात भरलेल्या डिपॉझिटची रक्कम सुलभ रीतीने परत मिळत नाही (सारणी क्र. २२).

११. महाविद्यालय सोडल्यानंतर आवश्यक ते दाखले वेळेवर मिळत नाहीत. त्यासाठी अनेक हेलपाटे घालावे लागतात (सारणी क्र. २४ व २५).

१२. पदवी परीक्षेनंतर विद्यापीठाकडून पदवी प्रमाणपत्रे व गुणपत्रके वेळेवर मिळत नाहीत. त्यासाठी वारंवार हेलपाटे घालावे लागतात. तसेच त्यासंबंधीच्या पत्रव्यवहाराची योग्य दखल घेतली जात नाही (सारणी क्र. २६).

१३. विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवण्याबाबत महाविद्यालयीन व विद्यापीठ कर्मचाऱ्यांची वागणूक योग्य नसते.

**महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जाणवणाऱ्या प्रशासकीय अडचणींबाबत उपाययोजना**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जाणवणाऱ्या प्रशासकीय अडचणींपैकी बहुतांश अडचणींचा विचार आतापर्यंत केला. त्यांपैकी ज्या अडचणी निश्चित स्वरूपात आणि बहुसंख्य विद्यार्थ्यांना

येतात त्यावर काही उपाययोजना करता येईल किंवा कसे याबाबत अनेकांशी चर्चा व विचार-विनिमय केला. त्यातून काही मार्ग काढता येतो का यासंबंधी चाचपणी केली. तथापि महा-विद्यालयाचे प्रशासन, ते राबविणारे कर्मचारी, विद्यापीठ प्रशासन व कर्मचारी, यांच्यामध्ये अशा उपाययोजनांबाबत मतैक्य होण्याऐवजी मतभेदच दिसून आले. प्रत्येक स्तरावरील व्यक्ती स्वतःच्या अडचणीव्यतिरिक्त दुसऱ्याच्या दृष्टिकोनातून विचार करण्यास अजिबात तयार नाही असे आढळून आले. प्रत्येकाच्या अडचणी तर निश्चितच आहेत. तथापि त्यावर सर्वंकष उपाय करण्यास मात्र कोणीही तयार नाही. 'जैसे थे' परिस्थिती अशीच चालू राहावी अशा प्रकारची भावना दिसून आली. याबाबत उच्च स्तरावर गंभीरपणे विचार होण्याची नितांत आवश्य-कता आहे.

प्रस्तुतच्या शोध-निबंधाद्वारे निदर्शनास आलेल्या काही महत्त्वाच्या अडचणींबाबत संशोधक खालीलप्रमाणे उपाययोजना सुचवीत आहे :

१. शैक्षणिक संस्था सोडल्याचे दाखले, शैक्षणिक गुणवत्तेबाबतचे दाखले, इत्यादी कागदपत्रे विद्या-र्थ्यांस वेळवर मिळत नाहीत. त्यामुळे अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांस अडचणींना तोंड द्यावे लागते. यासाठी विद्यार्थ्यांच्या शिक्षणविषयक प्रगतीचा आलेख प्रत्येकाजवळ कायम स्वरूपात राहील अशा प्रकारे एक हस्तपुस्तिका प्रत्येकास सुरुवातीपासूनच म्हणजे अगदी प्राथमिक शिक्षणापासून देण्यात यावी. त्यामध्ये सर्व प्रकारच्या नोंदी त्या त्या संस्थाप्रमुखाकडून वेळोवेळी करून, शिक्षणसंस्था सोड-ताना ती पुस्तिका विद्यार्थ्यांकडे द्यावी. दुसऱ्या शिक्षणसंस्थेत प्रवेश घेताना ती नवीन संस्थेस सादर करून नवीन संस्थाप्रमुखांनी पुढील नोंदी त्या पुस्तिकेत कराव्यात.अशी प्रथा राष्ट्रीय स्तरावर सुरू केल्यास विद्यार्थ्यांच्या एकूण शैक्षणिक प्रगतीचा आढावा संस्थाप्रमुखास सतत व सहज उपलब्ध होऊ शकेल व शिक्षणक्षेत्रातील अन्य काही प्रश्नही सुलभ रीतीने हाताळता येतील. विद्यार्थी-जीवन संपल्यावर ही पुस्तिका कायमच्या नोंदींसह त्या त्या व्यक्तीजवळ सतत राहील. या संदर्भात प्रा. डॉ. पिंपळखरे त्यांच्या पुस्तकात म्हणतात : 'विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबद्दल एकत्रित व संघटित माहिती मिळविण्याकरिता संकलित हस्तपत्रिकांचा उपयोग होऊ शकेल.* अशा काही संकलित हस्तपत्रिकांचे नमुनेही त्यांच्या पुस्तकात दिलेले आहेत (पृ. ५० ते ७०).

२. महाविद्यालयाच्या प्रवेशासाठी असणाऱ्या प्रशासकीय व्यवस्थेत एकसूत्रता असणे आवश्यक आहे. तथापी प्रत्येक महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाचे स्वतंत्र स्वरूप, महाविद्यालयाची विविधता, प्रशासकीय बाबी योग्य तऱ्हेने हाताळण्यास आवश्यक असणारी प्रशिक्षित व्यक्तींची कमतरता, प्रत्येकाचे स्वतंत्र वैशिष्टय असणाऱ्या निरनिराळ्या कोर्सची विविधता, या सर्वांचा साकल्याने विचार करता एकसंघ व समान व्यवस्था सर्वच महाविद्यालयांतून त्वरित सुरू करणे शक्य दिसत नाही. तथापि जी काही व्यवस्था असेल त्याबाबतची पूर्ण माहिती विद्यार्थ्यांस लवकर व नीट रीतीने समजेल अशा रीतीने कळविणे अगत्याचे आहे. याबाबतीत किमान खालीलप्रमाणे उपाययोजना करता येईल.

प्रवेशाबाबतची सर्व माहिती, उदा. फॉर्म केव्हा, कोठे, कधी व काय किंमतीत मिळतील ? प्रवेशासाठी काय निकष आहेत ? प्रत्यक्ष प्रवेश कोणत्या रीतीने व कसा मिळू शकेल ? अशा प्रकारच्या प्रश्नांसंबंधीची सविस्तर माहिती, माहिती-पत्रकात विस्ताराने नमूद करावी. शिवाय कोणाही विद्यार्थ्यास प्रत्यक्ष महाविद्यालयात चौकशी केल्यास ती विनासायास व योग्य रीतीने समजावी अशी व्यवस्था, व्यवस्थापनाकडून होणे आवश्यक आहे.

---

* **शैक्षणिक आणि व्यावसायिक मार्गदर्शन,** मो. ह. पिंपळखरे,
ऑक्टोबर १९७१, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे ३० (पृ. ११७)

३. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आर्थिक सवलती बहुतांशी शासनाकडून उपलब्ध होतात. त्यासाठी शासनाची स्वतंत्र व्यवस्था आहे. उपसंचालक या दर्जाच्या अधिकाऱ्याच्या हाताखाली स्वतंत्र खाते काम करीत आहे. परंतु ह्या सवलतींचा पुरेपूर लाभ विद्यार्थ्यांस मिळत नाही असे दिसून आले. यामध्ये सर्वांत जास्त अडचण म्हणजे सवलतींबाबतची पूर्ण माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचतच नाही. महाराष्ट्रातील विद्यार्थी व शिक्षणसंस्था यांची प्रचंड संख्या लक्षात घेता शासकीय स्तरावर विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संपर्क साधणे अशक्य झाले आहे असे दिसते. विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष संबंध महाविद्यालयांशी येतो. त्यामुळे ही माहिती महाविद्यालयांमार्फतच विद्यार्थ्यांपर्यंत जाणे आवश्यक आहे. तथापि सर्व माहिती सर्व विद्यार्थ्यांना सतत उपलब्ध करून देणे प्रत्येक महाविद्यालयालाही सहज शक्य होणार नाही. त्यासाठी पुढील उपाय सुचविले आहेत :

शासनामार्फत देण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या सवलतींबाबत एक स्वतंत्र छोटी पुस्तिका प्रसिद्ध करावी. त्यामध्ये अशा सवलतींचे सर्व नियम, फॉर्मचे नमुने, ज्यांना अर्ज पाठवावयाचे त्या अधिकाऱ्यांचे पत्ते, सवलतींच्या अटी, सवलतीची रक्कम, अर्जाची शेवटची तारीख, अर्जा-सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची माहिती, इत्यादी सर्व बाबी सुस्पष्टपणे मांडाव्यात. दरवर्षी अशा प्रकारची पुस्तिका प्रकाशित करावी अथवा नियमांच्या बाबतीत करावे लागणारे बदल दरवर्षी न करता ठराविक वेळी दर ३ वर्षांनी अथवा ५ वर्षांनी करावेत व ३ वर्षांतून किंवा ५ वर्षांतून एकदा ही पुस्तिका प्रसिद्ध करावी व पुस्तकांच्या सर्व दुकानांतून सवलतीच्या दरात ती सर्वांना उपलब्ध व्हावी. यायोगे महाविद्यालयांचा त्रास वाचून ज्या विद्यार्थ्यास सवलत हवी असेल त्यास त्या बाबतची माहिती सहज व एकत्रितपणे मिळेल व पुढील कार्यवाही करणे महा-विद्यालयास व शासनास सूकर होईल.

४. राखीव जागांबाबतचे धोरण हे राष्ट्रीय स्तरावर राजकीय नेत्यांनी घेतलेल्या निर्णया-नुसार ठरत असते व त्यानुसारच याबाबत कार्यवाही शासनामार्फत होते. याबाबतीत स्वतंत्र आयोगाची नियुक्ती घटनेनुसार झालेली आहे. तथापि बदलत्या परिस्थितीत आखलेल्या धोरणात सहज बदल घडून येऊ शकतील अशा प्रकारचे लवचिक धोरण ठरविणे अगत्याचे झाले आहे. तसेच राखीव जागांमुळे गुणवत्तेला वाव मिळत नाही अशी भावना वाढीस लागणार नाही असे धोरण ठरविण्याची वेळ आली आहे असे आढळून आले आहे.

५. प्रवासविषयक येणाऱ्या अडचणींतून मार्ग काढण्यासाठी खालीलप्रमाणे व्यवस्था केल्यास सर्वांनाच सोईचे होईल असे वाटते :

प्रवासाचे सवलतींचे अर्ज एस टी. वा रेल्वे-स्थानकावर तसेच एस. टी. च्या कंडक्टरजवळ उपलब्ध व्हावेत. हे अर्ज विद्यार्थ्यांनी स्वतःच तेथल्या तेथे म्हणजे कंडक्टर अथवा तिकिट-मास्तरजवळ द्यावेत. त्यावरच्या नोंदी त्यांनी विद्यार्थ्यांजवळच्या आयडेंटिटी कार्डावर पाहून योग्य असल्याची खात्री करून तेथल्या तेथेच सवलतींच्या दरात तिकिटे द्यावीत. आयडेंटिटी कार्डावर विद्यार्थ्याचा फोटो, नाव, महाविद्यालयाचे नाव, वर्ग क्रमांक व जन्मतारीख असावी व त्यावर महाविद्यालयाचा शिक्का व संस्थाप्रमुखांची सही असावी. आयडेंटिटी कार्डाशिवाय प्रवास करू देऊ नये.

यामुळे अनावश्यक वेळ व कागदपत्रे वाचून केवळ विद्यार्थीच सुलभ रीतीने प्रवास करू शकेल. इतरांना अशा सवलतींचा दुरुपयोग करण्याची संधी मिळणार नाही.

६. विद्यार्थ्यांना महाविद्यालयात भरलेली डिपॉझिटची रक्कम त्वरेने मिळण्याची बाब वर क्र. १ मध्ये सुचविलेल्या हस्तपुस्तिकांद्वारे सुलभ रीतीने हाताळता येईल. केवळ नोंदींवरून हे काम लवकर होऊ शकेल.

७. महाविद्यालय सोडल्यानंतर आवश्यक तो दाखला (ट्रान्स्फरन्स सर्टीफिकेट) मिळविण्यात ज्या अडचणी येतात त्या वर क्र. १ मध्ये सुचविलेल्या हस्तपुस्तिकांच्या नोंदीद्वारा सहज दूर होऊ शकतील. नवीन संस्थेत प्रवेश घेतल्यावर हस्तपुस्तिका नवीन संस्थेकडे राहील व त्यावर सर्व नोंदी होऊन संस्था सोडताना सदरची हस्तपुस्तिका विद्यार्थ्यांस परत करता येईल.

८. पदवी परीक्षेनंतर गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्रे त्वरेने मिळण्यासाठी खाली दिलेली उपाय-योजना सुचविली आहे :

पदवीदानसमारंभ पूर्णपणे रद्द करावा. पदवीप्रमाणपत्रे व गुणपत्रके निकालाच्या दिवशीच संबंधित महाविद्यालयात पोहोचतील अशी व्यवस्था व्हावी. (१० वीच्या परीक्षेबाबत विद्यार्थी-संख्या प्रचंड असूनही गुणपत्रिका त्याच दिवशी संबंधित शाळांत जाऊ शकतात ही वस्तुस्थिती आहे.) बहिस्थ विद्यार्थ्यांच्या बाबतीत गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्रे त्याच दिवशी रजिस्टर पोस्टाने विद्यार्थ्यांच्या पत्त्यावर जाऊ शकतील अशी व्यवस्था सहज करता येईल. यासाठी कॉम्प्युटरची मदत घेणे शक्य होईल.

'पदवीदान समारंभ पूर्णपणे रद्द करावा' हे विधान विचारपूर्वक व वस्तुस्थिती लक्षात घेऊन केले आहे. पुणे विद्यापीठातून प्रतिवर्षी सुमारे ३० ते ३५ हजार विद्यार्थी पदवी परीक्षा उत्तीर्ण होतात. त्यापैकी फक्त १० ते १२ हजार विद्यार्थीच पैसे भरून पदवी प्रमाणपत्रे पदवीदान समारंभात घेतात.

मार्च १९८० मध्ये झालेल्या पुणे विद्यापीठाच्या पदवीदान समारंभासाठी ५,४४८ विद्यार्थ्यांनी नावे नोंदविली होती. त्यापैकी फक्त १,७२० विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष पदवीदान समारंभात भाग घेऊन पदवी घेतली. तसेच नोव्हेंबर १९८० मध्ये झालेल्या पुणे विद्यापीठाच्या विशेष पदवीदान समारंभासाठी एकूण ८,२०२ विद्यार्थ्यांनी नावे नोंदविलेली होती. त्यापैकी प्रत्यक्ष पदवीदान समारंभात भाग घेऊन पदवी घेणाऱ्यांची संख्या फक्त २,१३६ होती.* पदवीदान समारंभ रद्द करण्याबाबतची मला वाटणारी महत्त्वाची कारणे खालीलप्रमाणे आहेत :

१. दिरंगाई;

२. आर्थिक बोजा, विद्यार्थ्यांवर आणि विद्यापीठावर;

३. समारंभासाठी व त्याच्या तयारीसाठी होणारा कालापव्यय; आणि

४. परीक्षा पास होणारे विद्यार्थी व प्रत्यक्ष पदवीदान समारंभात भाग घेऊन पदवी धारण करणारे विद्यार्थी यांचे अत्यंत व्यस्त प्रमाण.

वरील मुद्द्यांचा साकल्याने विचार करून पदवीदान समारंभाबाबत गंभीरपणे विचार व्हावा असे वाटते.

९. या संशोधनातून एक गोष्ट फार प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे विद्यापीठांतील व महाविद्यालयांतील कर्मचाऱ्यांची विद्यार्थ्यांशी वर्तणूक अतिशय उद्धट, बेफिकिरीची व बेशिस्तीची असते. शिक्षणाचा केंद्रबिंदू विद्यार्थी आहे या जाणिवेचा अभाव आढळून येतो. शिक्षणाचा व पर्यायाने शिक्षणसंस्थांचा केंद्रबिंदू विद्यार्थी मानला गेला पाहिजे.

C. Gilbert Wrenn, as quoted by Humphreys and Traxler, states that, " the institution exists fundamentally for the sake of students and not the students for the institution. "*

---

* *Thirty-Second Annual Report, 1980–81*, University of Poona, pp. 132.

* *Guidance Services* by J. Anthony Humphreys and Arthur E. Traxler, published by Science Research Associates, Inc., Chicago, 1954, pp. 6.

हे विधान आजच्या परिस्थितीस योग्य प्रकारे लागू पडत आहे.

विद्यार्थ्यांना जाणवणाऱ्या बऱ्याचशा अडचणी या, 'विद्यार्थी हा शिक्षणसंस्थांचा केंद्रबिंदू आहे.' या जाणिवेच्या अभावी आणि सेवकांच्या बेफिकीर वागणुकीतून निर्माण झालेल्या आहेत. थोडेसे मन लावून काम केले तर विद्यार्थ्यांच्या ५० टक्के अडचणी दूर होऊ शकतील. मात्र त्यासाठी उद्‌बोधनाची नितांत आवश्यकता आहे. विद्यापीठात व महाविद्यालयातून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे प्रशीक्षण ही खरोखर नितांत तातडीची बाब आहे. प्राचार्य डॉ. मो. ह. पिंपळखरे यांनी त्यांच्या पीएच. डी. च्या प्रबंधात ए. एस. नोलेस यांच्या 'हॅन्डबुक ऑफ कॉलेज अॅन्ड युनिव्हर्सिटी अॅडमिनिस्ट्रेशन' पुस्तकातील उतारा उद्‌धृत केला आहे. तो अत्यंत बोलका आहे म्हणून पुढे दिला आहे :

"The Handbook of College and University Administration edited by Knowles stresses the need of training the non-academic staff. A strong programme of staff development serves the institution in two ways. First of all, it can greatly improve employee performance on the job. Some employees, of course, do not need the impetus and help of training programmes to enhance their value to their employer, but many employees can profit from such assistance. Staff development programmes should not be limited to improving employee work performance. Much of the concern of these programmes should be aimed at identifying and readying employees for promotional opportunities. Most institutions have employees who, with proper training, would make excellent candidates for those positions which are so difficult to fill. Organised staff development requires devoted, professional leadership. It requires the full support and encouragement of top management, which means that someone in the institutional staff must be assigned this specific responsibility and be given adequate managerial support and adequate budget. A good programme of organised staff development is indeed an investment, but it can pay handsome dividends."*

महाराष्ट्रातील कोणत्याही विद्यापीठात शिक्षकेतर सेवकांना प्रशिक्षणाची सोय उपलब्ध नाही. 'There are hardly any facilities for training the non-teaching staff of the University and Colleges.'✤ हा निष्कर्ष डॉ. पिंपळखरे यांच्या वरील संशोधनातील आहे. तेव्हा शिक्षकेतर सेवकांचे प्रशिक्षण होणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. त्यासाठी प्रत्येक विद्यापीठाने पुढाकार घेऊन काही आठवडे चालणारे प्रशिक्षणाचे वर्ग काढावेत व क्रमन्वित पद्धतीने काही महिन्यांच्या अथवा वर्षांच्या अवधीत विद्यापीठांतर्गत सर्व महाविद्यालयातील सेवकवर्ग प्रशिक्षित होईल असे पाहावे. दरवर्षी नवीन सेवक येतात. त्यांनाही प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. प्रशिक्षणाशिवाय महाविद्यालयातील सेवेत त्यांना कायम करण्यात येऊ नये. तसेच एकदा प्रशिक्षण झाल्यानंतर ३ ते ५ वर्षांच्या अवधीनंतर रिफ्रेशर कोर्स पूर्ण करणे अत्यावश्यक करावे. अशा

---

* *A study of Arts, Science & Commerce Colleges in Maharashtra* (1971–72) Ph. D. Thesis submitted to Poona University by Dr. M. H. Pimpalkhare, pp. 252

✤ ibid–p. 389

७. महाविद्यालय सोडल्यानंतर आवश्यक तो दाखला (ट्रान्स्फरन्स सर्टिफिकेट) मिळविण्यात ज्या अडचणी येतात त्या वर क्र. १ मध्ये सुचविलेल्या हस्तपुस्तिकांच्या नोंदीद्वारा सहज दूर होऊ शकतील. नवीन संस्थेत प्रवेश घेतल्यावर हस्तपुस्तिका नवीन संस्थेकडे राहील व त्यावर सर्व नोंदी होऊन संस्था सोडताना सदरची हस्तपुस्तिका विद्यार्थ्यांस परत करता येईल.

८. पदवी परीक्षेनंतर गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्रे त्वरेने मिळण्यासाठी खाली दिलेली उपाय-योजना सुचविली आहे :

पदवीदानसमारंभ पूर्णपणे रद्द करावा. पदवीप्रमाणपत्रे व गुणपत्रके निकालाच्या दिवशीच संबंधित महाविद्यालयात पोहोचतील अशी व्यवस्था व्हावी. (१० वीच्या परीक्षेबाबत विद्यार्थी-संख्या प्रचंड असूनही गुणपत्रिका त्याच दिवशी संबंधित शाळांत जाऊ शकतात ही वस्तुस्थिती आहे.) बहिस्थ विद्यार्थ्यांच्या बाबतीत गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्रे त्याच दिवशी रजिस्टर पोस्टाने विद्यार्थ्यांच्या पत्त्यावर जाऊ शकतील अशी व्यवस्था सहज करता येईल. यासाठी कॉम्प्युटरची मदत घेणे शक्य होईल.

'पदवीदान समारंभ पूर्णपणे रद्द करावा' हे विधान विचारपूर्वक व वस्तुस्थिती लक्षात घेऊन केले आहे. पुणे विद्यापीठातून प्रतिवर्षी सुमारे ३० ते ३५ हजार विद्यार्थी पदवी परीक्षा उत्तीर्ण होतात. त्यापैकी फक्त १० ते १२ हजार विद्यार्थीच पैसे भरून पदवी प्रमाणपत्रे पदवीदान समारंभात घेतात.

मार्च १९८० मध्ये झालेल्या पुणे विद्यापीठाच्या पदवीदान समारंभासाठी ५,४४८ विद्यार्थ्यांनी नावे नोंदविली होती. त्यापैकी फक्त १,७२० विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष पदवीदान समारंभात भाग घेऊन पदवी घेतली. तसेच नोव्हेंबर १९८० मध्ये झालेल्या पुणे विद्यापीठाच्या विशेष पदवी-दान समारंभासाठी एकूण ८,२०२ विद्यार्थ्यांनी नावे नोंदविलेली होती. त्यापैकी प्रत्यक्ष पदवी-दान समारंभात भाग घेऊन पदवी घेणाऱ्यांची संख्या फक्त २,१३६ होती.✢ पदवीदान समारंभ रद्द करण्याबाबतची मला वाटणारी महत्त्वाची कारणे खालीलप्रमाणे आहेत :

१. दिरंगाई;

२. आर्थिक बोजा, विद्यार्थ्यांवर आणि विद्यापीठावर;

३. समारंभासाठी व त्याच्या तयारीसाठी होणारा कालापव्यय; आणि

४. परीक्षा पास होणारे विद्यार्थी व प्रत्यक्ष पदवीदान समारंभात भाग घेऊन पदवी धारण करणारे विद्यार्थी यांचे अत्यंत व्यस्त प्रमाण.

वरील मुद्द्यांचा साकल्याने विचार करून पदवीदान समारंभाबाबत गंभीरपणे विचार व्हावा असे वाटते.

९. या संशोधनातून एक गोष्ट फार प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे विद्यापीठांतील व महाविद्या-लयांतील कर्मचाऱ्यांची विद्यार्थ्यांशी वर्तणूक अतिशय उद्धट, बेफिकिरीची व बेशिस्तीची असते. शिक्षणाचा केंद्रबिंदू विद्यार्थी आहे या जाणिवेचा अभाव आढळून येतो. शिक्षणाचा व पर्यायाने शिक्षणसंस्थांचा केंद्रबिंदू विद्यार्थी मानला गेला पाहिजे.

C. Gilbert Wrenn, as quoted by Humphreys and Traxler, states that, " the institution exists fundamentally for the sake of students and not the students for the institution. "※

---

✢ *Thirty-Second Annual Report, 1980–81*, University of Poona, pp. 132.

※ *Guidance Services* by J. Anthony Humphreys and Arthur E. Traxler, published by Science Research Associates, Inc., Chicago, 1954, pp. 6.

हे विधान आजच्या परिस्थितीस योग्य प्रकारे लागू पडत आहे.

विद्यार्थ्यांना जाणवणाऱ्या बऱ्याचशा अडचणी या, 'विद्यार्थी हा शिक्षणसंस्थांचा केंद्रबिंदू आहे.' या जाणिवेच्या अभावी आणि सेवकांच्या बेफिकीर वागणुकीतून निर्माण झालेल्या आहेत. थोडेसे मन लावून काम केले तर विद्यार्थ्यांच्या ५० टक्के अडचणी दूर होऊ शकतील. मात्र त्यासाठी उद्बोधनाची नितांत आवश्यकता आहे. विद्यापीठात व महाविद्यालयातून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे प्रशीक्षण ही खरोखर नितांत तातडीची बाब आहे. प्राचार्य डॉ. मो. ह. पिंपळखरे यांनी त्यांच्या पीएच. डी. च्या प्रबंधात ए. एस. नोलेस यांच्या 'हॅन्डबुक ऑफ कॉलेज अॅन्ड युनिव्हर्सिटी अॅडमिनिस्ट्रेशन' पुस्तकातील उतारा उद्धृत केला आहे. तो अत्यंत बोलका आहे म्हणून पुढे दिला आहे :

"The Handbook of College and University Administration edited by Knowles stresses the need of training the non-academic staff. A strong programme of staff development serves the institution in two ways. First of all, it can greatly improve employee performance on the job. Some employees, of course, do not need the impetus and help of training programmes to enhance their value to their employer, but many employees can profit from such assistance. Staff development programmes should not be limited to improving employee work performance. Much of the concern of these programmes should be aimed at identifying and readying employees for promotional opportunities. Most institutions have employees who, with proper training, would make excellent candidates for those positions which are so difficult to fill. Organised staff development requires devoted, professional leadership. It requires the full support and encouragement of top management, which means that someone in the institutional staff must be assigned this specific responsibility and be given adequate managerial support and adequate budget. A good programme of organised staff development is indeed an investment, but it can pay handsome dividends."*

महाराष्ट्रातील कोणत्याही विद्यापीठात शिक्षकेतर सेवकांना प्रशिक्षणाची सोय उपलब्ध नाही. 'There are hardly any facilities for training the non-teaching staff of the University and Colleges.'✤ हा निष्कर्ष डॉ. पिंपळखरे यांच्या वरील संशोधनातील आहे. तेव्हा शिक्षकेतर सेवकांचे प्रशिक्षण होणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. त्यासाठी प्रत्येक विद्यापीठाने पुढाकार घेऊन काही आठवडे चालणारे प्रशिक्षणाचे वर्ग काढावेत व क्रमन्वित पद्धतीने काही महिन्यांच्या अथवा वर्षांच्या अवधीत विद्यापीठांतर्गत सर्व महाविद्यालयातील सेवकवर्ग प्रशिक्षित होईल असे पाहावे. दरवर्षी नवीन सेवक येतात. त्यांनाही प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. प्रशिक्षणाशिवाय महाविद्यालयातील सेवेत त्यांना कायम करण्यात येऊ नये. तसेच एकदा प्रशिक्षण झाल्यानंतर ३ ते ५ वर्षांच्या अवधीनंतर रिफ्रेशर कोर्स पूर्ण करणे अत्यावश्यक करावे. अशा

---

* *A study of Arts, Science & Commerce Colleges in Maharashtra* (1971–72) Ph. D. Thesis submitted to Poona University by Dr. M. H. Pimpalkhare, pp. 252

✤ ibid–p. 389

प्रशिक्षणातून विद्यापीठ कामकाजांची व नियमांची पूर्ण माहिती होऊन महाविद्यालयीन प्रशासनात जास्त सूकरता येईल व त्यायोगे विद्यार्थ्यांना जाणवणाऱ्या प्रशासकीय अडचणींचे बहुतांशाने निराकरण होण्यास पूर्ण मदत होईल असा विश्वास वाटतो.

१०. विद्यार्थ्यांच्या सर्व प्रकारच्या अडचणींचे निवारण तत्काळ होईल यासाठी आवश्यक त्या मार्गदर्शनासाठी एखाद्या अनुभवी मार्गदर्शकाची (गायडन्स कौन्सेलरची) प्रत्येक महाविद्यालयात नियुक्ती करावी. ज्येष्ठ प्राध्यापक किंवा उपप्राचार्य यांच्याकडे हे काम सहजपणे सोपविता येईल.

## नवीन संशोधनाची दिशा

या शोधनिबंधाचा विषय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जाणवणाऱ्या प्रशासकीय अडचणींचा अभ्यास असा असला तरी त्याबाबत प्रतिसादकांनी प्रतिसाद देताना अन्य काही मुद्देही उपस्थित केले. तसेच या प्रश्नांची इतर स्तरावर चर्चा करताना काही बाबी आढळल्या. त्या सर्वांचा साकल्याने विचार करून महाविद्यालयीन शिक्षणाबाबत संशोधनासाठी काही विषय संशोधक सुचवीत आहे :

१. विद्यापीठ व महाविद्यालयीन प्रशासकीय व्यवस्थेचा तुलनात्मक अभ्यास करून त्यात योग्य बदल सुचविणे.

२. महाविद्यालयातील राखीव जागांबाबतचे योग्य मूल्यमापन करून त्यांच्या आवश्यकतेविषयी व उपयुक्ततेविषयी निष्कर्ष काढणे.

३. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्त्या व शुल्कसवलतींबाबत सर्वस्पर्शी अभ्यास करून तत्संबंधीच्या प्रशासनात सुसूत्रता व सोपेपणा कसा आणता येईल याबाबत सूचना करणे.

४. निरनिराळ्या राज्यांतील विद्यापीठे व महाविद्यालये यांच्या प्रशासकीय व्यवस्थेच तूलनात्मक अभ्यास करणे.

५. निरनिराळ्या राज्यांतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शुल्कसवलती, शिष्यवृत्या, तसेच प्रवासविषयक सवलती यांचा तूलनात्मक अभ्यास करणे.

६. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अभ्यास व अभ्यासेतर उपक्रम आणि खेळ याबाबत मिळत असलेल्या संधी आणि सवलतींचा तूलनात्मक अभ्यास करून त्यांचा एकूण गुणवत्तेवर काय परिणाम होतो याबाबत संशोधन करणे.

■ ■

## संदर्भ


१. उपासनी, ना. के., **शैक्षणिक कृतिसंशोधन**, १९७२.

२. पिंपळखरे, मो. ह., **शैक्षणिक आणि व्यावसायिक मार्गदर्शन**, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे-३०. १९७७.

३. बापट, भा. गो., **शैक्षणिक संशोधन**, १९७५.

४. मुळे, रा. शं. आणि वि. तु. उमाठे, **शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे**, १९७७.

५. Best, John W., *Research in Education*, 3rd Ed., 1977.

६. Director of Education, Maharashtra State, Pune, *Education at a Glance*, 1979–80.

७. Humphreys, J. Anthony and Arthur E. Traxlor, *Guidance Services*, published by Science Research Association, Inc., Chicago. 1954.

८. Pimpalkhare, M. H., *A Study of Arts, Science and Commerce Colleges in Maharashtra*, 1971–72, Doctoral Thesis, Poona University, October 1975.

९. University of Poona, *Thirty-Second Annual Report*, 1980–81.

–

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २३००६
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# ३

## ग्रामीण महाविद्यालयांतील ग्रामीण विद्यार्थ्यांचे प्रश्न

पंडित टापरे

आज आपले जीवन बहुकक्ष आणि बहुपेडी बनलेले आहे. शहरी जीवन आणि ग्राम-जीवन यांच्या सीमारेषा एकमेकांत मिसळल्या आहेत. विज्ञान, तंत्रज्ञानाचे उपयोजन, चित्रपट, आकाशवाणी, इत्यादी 'संवाद' (Communication) माध्यमांचा समाजजीवनावर पडणारा प्रभाव, यातून या प्रक्रियेस वेग आलेला आहे. यातूनच आपल्या समाजजीवनात अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. हे प्रश्न दूर करून, समाजपरिवर्तन घडावे यासाठी आपण शिक्षणाकडे आशेने पाहतो आहोत. या शिक्षणातील प्रश्न जर सुटले तर शिक्षण हे विकासाचे प्रभावी साधन बनेल असे वाटते. या शैक्षणिक प्रश्नांपैकी ग्रामीण महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचे प्रश्नही अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत.

या प्रश्नांचा विचार प्राधान्याने करण्याचे आणखीही एक कारण आहे. भारतातील दहा लोकांपैकी अजूनही जवळजवळ आठ लोक ग्रामीण भागात राहतात. जसजशा वाटा मोकळ्या होत आहेत तसतशी ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढते आहे हे लक्षात येईल. त्याबरोबर हेही ध्यानात ठेवावयास हवे की, जर या विद्यार्थ्यांचे प्रश्न सुटले, त्यांचे अध्ययन आणि अध्यापन योग्य दिशेने झाले, तर ग्रामीण भागाच्या विकासाची रेंगाळलेली गाडी गती घेईल आणि योग्य मार्गाने विकासाच्या ध्येयाप्रत जाईल.

या प्रश्नांच्या संदर्भात आजपर्यंत विचार अगदीच झाला नाही असे नाही. निरनिराळ्या पातळींवर थोडा-फार विचार झालेला आहे. विविध शिबिरे, उपक्रम, यात ग्रामीण विद्यार्थ्यांचा सहभाग असल्यास त्या निमित्ताने त्यांचे मनोगत जाणून घेण्याचा प्रयत्न झालेला आहे. पण ग्रंथबद्ध अथवा प्रकल्पवजा असा या समस्येचा विचार काही उपलब्ध होऊ शकला नाही.

प्रस्तुत शोधनिबंध लिहिताना अभ्यासकाने एक प्रश्नावली तयार केली होती. त्या प्रश्नावलीत शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक या शीर्षकांखाली एकूण त्रेपन्न प्रश्न विचारले होते. विद्यार्थिनींसाठी वेगळ्या सहा प्रश्नांची प्रश्नावलीही जोडली होती. ही प्रश्नावली कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांतील पन्नास विद्यार्थिनी आणि पन्नास विद्यार्थी यांना दिलेली होती. विद्यार्थ्यांची निवड करताना भौगोलिक दृष्ट्या आणि आर्थिक व सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने भिन्न भिन्न पातळींवर असलेल्या एकूण चाळीस गावांची निवड केली होती. याशिवाय विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन, चर्चा करून, तसेच खोली घेऊन राहिलेल्या विद्यार्थ्यांशीही चर्चा करून माहिती घेतली. त्याचप्रमाणे सहकारी प्राध्यापक आणि काही पालकांशीही चर्चा केलेली आहे.

## पार्श्वभूमी

या विद्यार्थ्यांचे प्रश्न समजून घेण्यापूर्वी ग्रामीण विद्यार्थ्यांची पूर्वपीठिका पाहणेही अगत्याचे आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात महाविद्यालयात जाऊन उच्च शिक्षण घेणारे ग्रामीण भागातील विद्यार्थी अत्यल्प होते आणि त्यातही ते उच्च आणि सधन वर्गातीलच विद्यार्थी होते असे दिसते. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र हळूहळू या विद्यार्थी-संख्येत वाढ झाली. विविध गावांमध्ये माध्यमिक शाळा निघाल्या. महाराष्ट्रात पुणे, मराठवाडा, शिवाजी या विद्यापीठांची स्थापना झाली. लोकशाहीचे विकेन्द्रीकरण, ग्रामीण भागातून आलेले नवे नेतृत्व, शिक्षणाविषयी वाढलेली जाणीव, हीही या शिक्षणसंस्थांच्या वाढीची कारणे आहेत. १ मे १९६० ला महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि त्याच सुमारास महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी इकॉनॉमिकली बॅकवर्ड क्लास (इ. बी. सी.) ची सवलत जाहीर केली. त्याचा फायदा विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर मिळाला. १९६० ते १९७५ पर्यंतच्या काळात महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांच्या कक्षेत अनेक महाविद्यालयांची स्थापना झाली. ग्रामीण भागात स्थापन झालेल्या महाविद्यालयांत कला आणि वाणिज्य महाविद्यालयेच अधिक होती.

इ. बी. सी. ची सवलत मिळण्यापूर्वीचा विद्यार्थी आणि ही सवलत ज्याला मिळते आहे असा विद्यार्थी यांच्या मनोभूमिकेत खूपच फरक आहे असे जाणवते. या मनोभूमिकेस सभोवतालची वेगाने बदलत जाणारी परिस्थिती तितकीच कारणीभूत आहे, हेही लक्षात ठेवावयास हवे. पूर्वी महाविद्यालयात प्रवेश मिळणे अवघड होते; पण नोकरी मिळणे सोपे होते. आज नेमकी उलट परिस्थिती आहे. आज महाविद्यालयात प्रवेश मिळणे सोपे आहे; पण नोकरी मिळणे अवघड आहे. पूर्वी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची संख्या कमी होती. आज ती संख्या तुलनेने वाढलेली आहे. दोन्ही काळांतला अभ्यासक्रम, व्याख्यानपद्धती, परीक्षापद्धती यामध्येही फरक पडलेला आहे. यामुळेच पूर्वीचा विद्यार्थी आणि आजचा विद्यार्थी यांच्या शिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात फरक पडलेला आहे. या पूर्वपीठिकेच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचा विचार करणे श्रेयस्कर ठरेल.

या विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचा विचार करताना विवेचनाच्या सोयीसाठी शैक्षणिक प्रश्न आणि सामाजिक-सांस्कृतिक प्रश्न अशी विभागणी केलेली आहे. खरे तर हे दोन्ही प्रश्न एकमेकांपासून अलग करता येत नाहीत. सामाजिक-सांस्कृतिक प्रश्न सुटले तर शैक्षणिक प्रश्न सुटतील; सुटण्याला साहाय्य होईल.

## अर्धवेळचा विद्यार्थी

महाविद्यालयात हा विद्यार्थी पायी यतो का सायकलने येतो अथवा बसने येतो किंवा खोली घेऊन राहातो आणि त्याला अभ्यासाला किती वेळ मिळतो याची पाहणी केली तर, हा विद्यार्थी अर्धवेळ (Part-time) विद्यार्थी आहे हे लक्षात यावे. कारण या विद्यार्थ्यांपैकी जे परगावाहून येतात त्यांचा जाण्यायेण्यात आणि बस-स्थानकावर बसची प्रतीक्षा करण्यात बराच वेळ जातो. जे विद्यार्थी खोली घेऊन राहतात ते हातानेच स्वयंपाक करतात. तेव्हा स्वयंपाक करण्यात आणि बाजारहाट करण्यात त्यांचा बराच वेळ मोडतो. परगावाहून येणाऱ्या विद्यार्थ्याला घरी टेबल, खुर्ची तर सोडाच, पण अभ्यासासाठी स्वतंत्र खोलीही नसते. हंगामाच्या काळात मजूर मिळत नाही अथवा मजूर वाचतो या भावनेने या विद्यार्थ्यांना शेतावर काम करावे लागते. एरव्हीदेखील शेतातून वैरण कापून आणणे, शेतावरची इतर कामे करणे, हे उद्योग असतातच. त्यामुळे अभ्यासास वेळ असा मिळत नाही.

यासाठी विद्यार्थ्यांनी जो वेळ मिळेल तो अभ्यासासाठी लावावयास हवा. बस-स्थानकावर, बसमध्ये, अभ्यास करावयाची सवय लावली पाहिजे. इतर काय म्हणतील याची पर्वा करणे हास्यास्पद आहे. खेडेगावात ग्रामपंचायतीच्या सहकार्याने एखादी खोली मिळवून आपणावरच आपले बंधन लादून स्वपर्यवेक्षित अभ्यास (Self–Supervised Study) केला पाहिजे.

## अभ्यासाची निराळी पद्धत

अभ्यास ज्या पुस्तकांच्या आधारे करावयाचा ती पुस्तके बरेचसे विद्यार्थी विकत घेऊ शकत नाहीत. एक तर बुक-बँकेतून अथवा महाविद्यालयाच्या वाचन-कक्षा(Reading–Room)-तून त्यांना पुस्तके मिळतात आणि त्यावर त्यांचे भागते.

परीक्षेची तयारी करताना क्रमिक पुस्तके ते वाचतातच; पण त्यासोबत मार्गदर्शिका आणि नोटस् यांचाच अधिक आधार घेतात. इंग्रजी पुस्तके इंग्रजी समजत नाही म्हणून वाचली जात नाहीत. खूप अभ्यास करावा, प्रथम वर्ग मिळवावा अशी महत्त्वाकांक्षाही फार थोड्या विद्यार्थ्यांमध्ये आहे असे दिसते.

असे का घडते याची मीमांसा करताना जाणवते की, शाळेच्या प्रांगणातून महाविद्यालयाच्या वर्गात विद्यार्थी जेव्हा शिरतो तेव्हा तेथील अध्यापनाच्या व्याख्यान-पद्धतीने तो गोंधळून जातो. शाळेमध्ये असताना या विद्यार्थ्याला शिक्षक काही फलकलेखन देत असत. काही मुद्दे उतरून देत असत. त्या वेळी शिक्षक विद्यार्थी वहीवर नीट फलकलेखन, मुद्दे, उतरून घेतो का नाही ते पाहत. विद्यार्थ्यांच्या लेखनाच्या गतीशी आपली निवेदनाची गती जुळवून घेत.

या पार्श्वभूमीवर विचार करताना महाविद्यालयातील व्याख्याने त्यास अपुरी वाटतात. वर्गात व्याख्यान चालू असताना टिपणे कशी घ्यावीत याचे प्रशिक्षण त्यास मिळत नाही. तसेच एखादा संदर्भग्रंथ वाचून त्याच्या नोटस् कशा काढाव्यात हेही त्याला समजत नाही. त्यामुळे तो गोंधळून जातो; मार्गदर्शिका, संभाव्य प्रश्नोत्तरे, यांचा आश्रय घेतो.

या प्रश्नांचा विचार करताना लक्षात येते की, विद्यार्थ्यांनी स्वयं-शासनाची, शिस्तीची सवय लावून घ्यावयास हवी. आपला आपणच अभ्यास करावा. पण व्याख्यानांची टिपणे कशी काढावीत, संदर्भग्रंथ वाचून नोटस् कशा काढाव्यात, संदर्भग्रंथात शेवटी दिलेल्या तळटीपांतील संक्षिप्त शब्दांचा अर्थ काय, याविषयी प्राध्यापकाने समजून सांगावयास हवे.

प्राध्यापकांनी ग्रामीण विद्यार्थ्यांच्या या साऱ्या अडचणी लक्षात घेऊन आपल्या अध्यापनाच्या पद्धतीत योग्य ते बदल करावयास हवेत. शो-केसमध्ये नोटस् लावणे, संदर्भ-पुस्तकांची आणि पूरक पुस्तकांची यादी जोडणे, श्रेष्ठ ग्रंथांचा परिचय करून देणे, आपापल्या विषयातील महत्त्वाच्या ग्रंथांचे, नियतकालिकांचे प्रदर्शन भरविणे, हे यावर काही उपाय सांगता येतील.

## स्वभावविशेष व मर्यादा

महाविद्यालयात येणारे ग्रामीण विद्यार्थी बुजरे असतात. प्राध्यापकांना ते अडचणी विचारीत नाहीत, कारण त्यांना भीती वाटते. त्यांच्या ठिकाणी न्यूनगंड असतो. त्यांनी आजपर्यंतच्या आयुष्यात जे शैक्षणिक अनुभव घेतलेले असतात, त्यांच्याशी हे नवे अनुभव कसे जुळवून घ्यावयाचे हा प्रश्न असतो. त्यांच्या मनात काही पूर्वग्रह पक्के रुजलेले असतात. ते काढून टाकणे आणि नव्या विचारांशी त्यांची ओळख करून देणे अगत्याचे असते. त्यासाठी गटवार मार्गदर्शन योजना आखावयास हवी. खरे तर सामाजिक जाणिवेचा आणि एकंदरच नव्या विचारांचा त्यांना परिचय व्हावा यासाठी एक अभ्यासक्रमच तयार करावयास हवा आणि तो अभ्यासक्रम अभ्यासानुवर्ती (Co-Curricular) कार्यक्रमांचा एक भाग व्हावयास हवा.

## इंग्रजी भाषेचा प्रश्न

आज शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावयास हवे याविषयीचा आग्रह धरला जातो. हा आग्रह योग्यच आहे; पण इंग्रजी ही ग्रंथालयाची भाषा (Library Language) म्हणून आवश्यकच आहे. इंग्रजीच्या अध्ययनाबाबत या विद्यार्थ्यांची परवडच झालेली असते. इंग्रजी हा विषय आकलनाच्या दृष्टीने अवघड, म्हणून इंग्रजीची भाषिक कौशल्ये आत्मसात करता येत नाहीत आणि भाषिक कौशल्ये आत्मसात करता येत नाहीत म्हणून इंग्रजी समजत नाही; अशा दुष्ट चक्रात विद्यार्थी अडकलेला असतो. अनेक विद्यार्थ्यांच्याकडे डिक्शनरी नसते; कारण अभ्यासक्रमात जी पुस्तके नेमलेली आहेत, त्यातील अवघड शब्दांचे अर्थ मार्गदर्शिकेत दिलेले असतात. शिवाय इंग्रजीतील इतर वाचन विद्यार्थी अजिबातच करीत नसल्याने डिक्शनरी पाहण्याचा प्रश्नच येत नाही.

इंग्रजीचा प्रश्न हे एक आव्हानच आहे; पण त्या संदर्भात काही गोष्टी करता येणे शक्य आहे. इंग्रजीच्या प्राध्यापकाला महाविद्यालयातील अभ्यासानुवर्ती कार्यक्रमांतून अधिक सवड देऊन विद्यार्थ्यांची वाचनाची आणि आकलनाची क्षमता वाढविणाऱ्या कार्यक्रमांत अधिक गुंतवावयास हवे. आकाशवाणी व टी. व्ही. (दूरदर्शन) वरील चर्चा, कार्यक्रम, विविध बोधप्रद व मनोरंजक चित्रपट, एपिडियास्कोप, टेपरेकॉर्डर, इत्यादी साधनांचे प्रभावी उपयोजन करावयास हवे. समूहाच्या शिक्षणासाठी ही साधने निश्चितच उपकारक ठरतात. उद्योगासाठी वीज, शेतीसाठी वीज, करमणुकीसाठी वीज, एवढे आपणाला मान्य असते; पण शिक्षणासाठी वीज हा विचार समाजमानसात रुजवावयास हवा. आज टी. व्ही. वर इंग्रजीतून चर्चा, तसेच इतर कार्यक्रमही दाखविले जातात; पण याची फिल्म (व्हीडिओटेप) ज्या भागात टी. व्ही. नाही अशा महाविद्यालयांत जावयास हवी. विविध मासिके, भारतीय जीवनावर लिहिलेले इतरांचे आणि भारतीयांचे साहित्य, ' retold ' आणि ' Simplified ' अशा श्रेष्ठ कथा-कादंबऱ्यांच्या मालिका, विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

## मराठी वाचनाच्या आवडी-निवडी

ही मुले मराठी साहित्य मात्र आवडीने वाचतात. त्यातही कथा-कादंबरी, नाटके यांचा अग्रक्रम लागतो. कविता मात्र फार थोडेच विद्यार्थी वाचतात. तीच स्थिती वैचारिक लेखनाची. विद्यार्थ्यांच्या आवडीच्या लेखकांत वि. स. खांडेकर, प्र. के. अत्रे, पु. ल. देशपांडे, बाबा कदम, शंकरराव खरात, ग. दि. माडगूळकर, ना. सी. फडके, हरिभाऊ आपटे, अण्णाभाऊ साठे, वसंत कानेटकर, शिवाजी सावंत, रणजित देसाई, गुलशन नंदा, देवदत्त पाटील हे आहेत. काही जणांना पु. भा. भावे आणि खानोलकर हे लेखक आवडतात.

यांच्या वाचनाची वृत्तपत्रे मराठीच; पण त्या वाचनातही अग्रलेख, एखादा महत्त्वाचा लेख, रविवारची पुरवणी वाचणारे विद्यार्थीही तुलनेने कमीच.

नियतकालिकात किर्लोस्कर, शेतकरी, दक्षता, मनोहर, स्त्री, श्री, रसरंग, क्रीडांगण, हंस, चित्रानंद यातच विद्यार्थ्यांना अधिक रस आहे. काहीजण अद्यापही ' किशोर ' आणि ' चांदोबा ' वाचतात. Competition, Success, Illustrated Weekly of India ही इंग्रजी नियतकालिके वाचणारेही काहीजण आहेत. हिंदीतील सारिका, धर्मयुग, माधुरी यांचेही काहींना आकर्षण आहे.

## अभिरुचीची निर्मिती व संवर्धन

अवांतर वाचनासाठी सत्यकथा, ललित, नवभारत, समाज-प्रबोधनपत्रिका या मासिकांकडे

ही मुले वळत नाहीत. कारण त्या दृष्टीने त्यांची अभिरुची विकसितच झालेली नाही. सर्व-सामान्य माणसाची वाचनाची अभिरुची आणि महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची अभिरुची यामध्ये तसा विशेष फरक वाटत नाही.

शहरातील सुशिक्षित नातेवाइकांशीही त्यांचा या संदर्भात आणि एकूणच शिक्षणाच्या संदर्भात तसा 'संवाद' नाही. कधी त्यांच्याकडे गेल्यानंतर आपले भवितव्य घडविण्याच्या दृष्टीने त्यांचा काही सल्ला, काही मार्गदर्शन घेण्याचीही या विद्यार्थ्यांच्या ठिकाणी वृत्ती नाही. किंबहुना असे मार्गदर्शन घ्यावे अशी जाणीवच नाही. त्याचप्रमाणे ते नातेवाईकही शहरात लाभणाऱ्या विविध सुविधा आणि विविध विचार यांच्याशी अधिक ओळख करून घेतात असेही दिसत नाही. त्या दृष्टीने ते पहातच नाहीत. तेव्हा हे नातेवाईक काय अथवा विद्यार्थी काय या दोघांच्याही ठिकाणी या प्रागतिक दृष्टिकोनाचा अभावच आहे.

दर्जेदार अभिरुची, प्रागतिक दृष्टिकोन या प्रश्नांचा जरा अधिक विचार करावयास हवा. ग्रामीण भागातील विद्यार्थ्याने नागर अभिरुचीचे केवळ अनुकरण करावे असेही नाही; पण ग्रामीण जीवनातील आतिथ्यशीलता, सहकार्यवृत्ती इत्यादी गुणांना अधिक संस्कारित करावे आणि नागर अभिरुचीला ग्रामीण अभिरुचीतील चांगल्या भागाची जोड द्यावी. जर जीवनाविषयीचा दृष्टिकोन प्रागतिक असेल तर हे साध्य होऊ शकेल.

हा दृष्टिकोन नसल्यामुळे, महाविद्यालयीन शिक्षणक्रमात व्यक्तिमत्त्व-विकासाच्या विविध उपक्रमांत हा विद्यार्थी बहुतकरून भाग घेत नाही. तो केवळ परीक्षार्थी राहतो. प्रारंभी म्हटल्याप्रमाणे त्याचे अर्धवेळ-विद्यार्थी हे चित्र अधिक ठळकच होते.

## पुष्कळ प्रश्नांचे मूळ – प्राथमिक शाळा

या साऱ्या प्रश्नांच्या मुळाशी जर आपण गेलो तर खेडेगावांतील प्राथमिक शाळा, हेच या प्रश्नांचे प्रमुख कारण आहे असे उत्तर सापडते. विद्यार्थ्यांच्या मनोभूमीत वाचनाची, ज्ञानाची, अभिरुचीची, दृष्टिकोनाची बीजे प्राथमिक शाळा या केन्द्रानेच रुजवावयाची असतात. तेथे या विद्यार्थ्यांची ही बौद्धिक भूक खरोखर मारली जाते. प्राथमिक शाळेतील अध्यापन प्रभावी होत नाही. त्याच्याकडे दुर्लक्ष होते. याची कारणेही सर्वश्रुत आहेत. पण या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन शिक्षणात सुधारणा व्हावी असे ज्यांना वाटते, त्यांनी प्राथमिक शाळा अधिकाधिक प्रेरक कशी बनेल हे पाहिले पाहिजे. शहरातील प्राथमिक शाळेत जाणारा विद्यार्थी, त्याला मिळणारे विविध शैक्षणिक अनुभव आणि खेड्यातील प्राथमिक शाळेत जाणारा विद्यार्थी याचे शैक्षणिक अनुभव, यांचे चित्र डोळ्यांसमोर आणल्यास हे अधिक स्पष्ट व्हावे.

## ग्राम-ग्रंथालये व इतर कार्यक्रम

प्राथमिक शाळा या जशा अधिक प्रभावशाली करावयास हव्यात त्याप्रमाणे ग्राम-ग्रंथालयांची मोहीम देखील उघडावयास हवी. गावातल्या यात्रेमध्ये जो खर्च वर्षाकाठी केला जातो त्यामधील काही भाग या मोहिमेसाठी खर्च केला तर हा उपक्रम साकार होऊ शकेल. त्याच्याबरोबरच कथा-कथन स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा याही घेण्याची व्यवस्था हवी. प्रत्येक महिन्यात एक सांस्कृतिक कार्यक्रम व्हावा. यासाठी हवे तर प्रशिक्षण देखील ग्रंथपालास, शिक्षकास द्यावे. तीच योजना पुढे माध्यमिक शाळांतूनही काही आवश्यक फेरफारानंतर राबवता येईल. यातून मुलांच्या मनात खचितच ज्ञानलालसा आणि ज्ञानपिपासा निर्माण होण्यास सहाय्य होईल. ग्रामीण शाळा व ग्रंथालय यांच्या कार्यात सहकार्य व समन्वय हवीत.

## सामाजिक-सांस्कृतिक प्रश्न

शैक्षणिक प्रश्नांइतकेच सामाजिक-सांस्कृतिक प्रश्न महत्त्वाचे आहेत. किंबहुना विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व-विकासाशी त्यांचा अधिक जवळचा संबंध आहे. समाजजीवनात जे प्रश्न सातत्याने समोर येतात, सारे समाजजीवन जे प्रश्न ढवळून काढतात, त्याबाबतच्या विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया या संदर्भात महत्त्वाच्या आहेत.

स्थूलमानाने ग्रामीण विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकी मान्य आहे. समाजासाठी काही काम करावे असे त्यांना वाटते; पण ते नेत्याच्या शोधात आहेत. कोणी तरी नेता व्हावे असे त्यांना वाटते आणि तो सांगेल ते काम करण्याची त्यांची तयारी असते. हुंडाबंदीसारख्या प्रश्नाबाबत, हुंडाबंदी असावी याकडे त्यांचा कल आहे; पण आपण हुंडा घेणार का ? अथवा आपल्या बहिणीच्या लग्नात हुंडा देणार का ? या प्रश्नांना हे विद्यार्थी गोंधळले. एखाद्या प्रश्नासाठी संघर्ष करण्याची त्यांची तयारी नाही. त्या संघर्षाची तेवढी निकड त्यांना वाटत नाही. परंपरेचे एक जोखड ग्रामीण जीवनावर सतत आहे असे जाणवते. दलित युवक ज्याप्रमाणे आज संघर्षास सिद्ध झालेला आहे, तसा जुन्या, कालबाह्य, समाजशोषक अशा रुढींविरूद्ध हा तरुण उभा राहू शकत नाही. त्या दृष्टीने त्याच्या जाणिवा अधिक संवेदनाक्षम व्हावयास हव्यात.

या विद्यार्थ्यांना ' एक गाव एक पाणवठा ' असावा असे वाटते. राखीव जागांसही त्यांची अनुकूलता आहे. त्यांचा बगाड, मोठी बाई, देव-देवर्षी यांवर विश्वास नाही. विधवाविवाह, आंतरजातीय विवाह, स्त्रीला समान हक्क, याबाबत त्यांची भूमिका अनुकूल आहे; पण ही अनुकूलता वरवरची आहे असे जाणवले. कारण अधिक प्रश्न विचारल्यावर हे विद्यार्थी गोंधळून गेले. ' एक गाव एक पाणवठा ' मान्य, मग आपल्या गावातील स्थिती काय ? ती उलटच आहे. राखीव जागा हव्यात हे आपले म्हणणे आणि समाजात घडत असणाऱ्या एखाद्या कृतीस असणारी प्रत्यक्षाप्रत्यक्ष साथ, यांचे गणित कसे जुळवावयाचे ? विधवाविवाहाबाबतही विधवेला जर मूल असेल तर तिने पुर्नविवाह करू नये असे त्यांचे मत दिसले. मग विधुर असणाऱ्या आणि मुले असणाऱ्यानेही लग्न करू नये यावर ते गोंधळले. स्त्रियांना समान हक्क असणे यावरही मल्लीनाथी केल्यावर त्यांची मते विरुद्ध बाजूकडे झुकली.

## परंपरेकडे झुकणारे मन

या निरीक्षणातून असे आढळून आले की, ग्रामीण तरुणाचे मन परंपरेकडे अधिक झुकणारे आहे. आधुनिकता परंपरेला विरोध करते. तो विरोध करण्याची दृष्टी या विद्यार्थ्यांकडे नाही. नव्या ज्ञान-विज्ञानाच्या दृष्टीने सामाजिक कल्याणाचे भान ठेवून नवीन जीवन घडवावे यास या ग्रामीण विद्यार्थ्यांचे मन उत्सुक नाही. परिस्थितीच्या रेटचाने काही बदल झालेले आहेत; पण त्या बदलांचे स्वरूप वरवरचे आहे. सामाजिक, सांस्कृतिक जीवनात अद्यावत केशभूषा, वेषभूषा आलेली असली; रेडिओ, टी. व्ही., ट्रॅक्टर, मोटारसायकल, विविध रासायनिक खते ग्रामीण भागात आलेली असली, तरी मन हे भूतकाळात रेंगाळत आहे. परंपरेतील चांगला भाग जतन करून नव्या दृष्टिकोनाची जोड त्यास कशी द्यावयाची हाच या विद्यार्थ्यांपुढे मोठा प्रश्न आहे.

## स्त्री-विषयक प्रतिगामी दृष्टिकोन

ह्या मनोवस्थेमुळे त्यांचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन प्रतिगामी आहे. लोकनाटचातून व्यक्त होणारी परंपरागत, सरंजामशाही दृष्टी प्रकट करणारीच त्यांची स्त्रीविषयक भूमिका आहे. स्त्री ही उपभोगाची वस्तु आहे, पायातील चप्पल पायातच रहावी, अशा जुन्या कालबाह्य

विचारांशीच या विद्यार्थ्यांचे नाते आहे. आपल्या घरामध्ये आपली आई, बहीण, वहिनी, इत्यादींशी ते या दृष्टिकोनानेच वागतात. आपण कसेही वागलो तरी चालेल, पण आपल्या बहिणीने मात्र आखून दिलेल्या रेषेतच वागावयास हवे यावर त्यांचा कटाक्ष असतो.

स्त्री ही मैत्रीण असू शकते, समाजजीवनात आपल्याबरोबरीने ती वागू शकते, तीही आपल्यासारखी एक हाडामांसाची व्यक्ती आहे, ती माणूस (human-being) आहे, याचे नेमके भान या विद्यार्थ्यांना नाही. त्यामुळे आपल्या सहाध्यायी विद्यार्थिनींशी वागताना, बोलताना, एक प्रकारची सहजता ते हरवून बसतात.

## दूषित भाव-विश्व

कौटुंबिक जीवनात देखील ही मुले फुलून येत नाहीत. भाऊबंदकी, घरातील वडीलधाऱ्या व्यक्तीचे व्यसन, आजारपण, कोणत्या ना कोणत्या शापाने ते विद्ध असतात. या साऱ्या शापात भाऊबंदकीचा शाप हा दुःसह असतो. त्या शापाचे परिणाम फार भयानक आणि सखोल अशा स्वरूपाचे होतात. या भाऊबंदकीमुळे घरातील, वाड्यातील आणि एकूण गावातील वातावरण दूषित झालेले असते. भाऊबंदकीमुळे तरुण पिढीतदेखील अंतर पडते. वडीलधारी माणसे या मुलांना लहानपणापासून विरोधकांविषयी वाईट गोष्टी सांगतात, शिकवतात. हे विरोधाचे, तणावाचे वातावरण सतत तापलेले राहते, ताणलेले राहते. कोर्ट-खटले, दुसऱ्याचा उत्कर्ष न पाहवणे, दुसऱ्याच्या दुःखाने आनंदित होणे, अशा अनेक गोष्टी यातून निर्माण होतात.

विद्यार्थ्यांपेक्षा विद्यार्थिनींना या भाऊबंदकीचा अधिक त्रास होतो. विद्यार्थिनीने आपल्या अध्ययनात कितीही उत्कर्ष केला तरी तिचे कौतुक होणे दूरच; भाऊबंदकीमुळे सारेजण तिच्याकडे तिरस्काराने पाहतात आणि तिच्या उत्साहावर, आकांक्षांवर पाणी पडते.

## सत्ता, श्रीमंती व गरीबी

ग्रामीण भागात गरीव-श्रीमंत, सरपंच अथवा पाटलाची मुले-मुली व सामान्यांची मुले-मुली, यांच्यात एक मोठीच दरी पडलेली असते. ही श्रीमंतांची मुले सामान्यांच्या मुलांना तुच्छ लेखतात, कमी लेखतात, सतत त्यांची मानहानी करतात. या संदर्भात परगावाहून दररोज शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थिनींना आपल्या सहाध्यायी विद्यार्थिनींचा देखील खूप त्रास होतो. आपल्याविषयी घरी कोण काय सांगेल आणि आपले शिक्षण कोणत्या क्षणी बंद पडेल याची भीती त्यांच्या मनावर सतत असते. त्यामुळे व्यक्तित्व-विकासाच्या उपक्रमातही त्या सामील होऊ शकत नाहीत.

जर घरामध्ये वडीलधारी माणसे व्यसनाच्या आहारी गेली असतील तर या विद्यार्थी-विद्यार्थिनींना अभ्यासात स्वारस्य ते काय उरणार? व्यसनाचा अंमल असताना ही वडीलधारी माणसे वाटेल तशी बोलतात आणि त्यामुळे आहे तो आनंद लुप्त होतो.

## सांस्कृतिक कार्यक्रमांच्या सामर्थ्य-मर्यादा

गावामध्ये जत्रा, भजनीमंडळ, लग्न-समारंभ, विविध सण, ज्ञानेश्वरीसप्ताह, इत्यादी कार्यक्रम होत असतात. या कार्यक्रमांविषयीच्या विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया बोलक्या आहेत. या कार्यक्रमात इतर गावकऱ्यांप्रमाणे हे विद्यार्थीही आनंदाने सामील होतात. आपल्या जीवनात हेच आनंदाचे क्षण आहेत असे त्यांना वाटते. या समारंभांच्या निमित्ताने गावात ऐक्य प्रत्ययास येते. नातेवाईक एकत्र येतात. ज्ञानेश्वरी-सप्ताह, भजन, यामुळे संतसाहित्य कानांवर पडते. संतसाहित्य आपणाला refresh करते अशी एका विद्यार्थ्याची प्रतिक्रिया आहे. मात्र असे असले तरी अनाठायी खर्च, पोकळ डौल, भांडणे यांमुळे या आनंदाला गालबोट लागते. तरीही या सणासमा-

रंभांतून आपल्या संस्कृतीचे दर्शन घडते हे त्यांना महत्त्वाचे वाटते.

या साऱ्या परिस्थितीतही, विशेषतः काही विद्यार्थी, व्यक्तिमत्त्वविकासाच्या लेखन, वक्तृत्व, खेळ, एन. सी. सी., एन. एस. एस., इत्यादी उपक्रमांत भाग घेतात. त्यातही खेळ व एन. सी. सी., एन. एस. एस., यात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे. त्याखालोखाल लेखनात विद्यार्थ्यांना रस आहे. वक्तृत्वाच्या बाबतीत मात्र ही मुले मागे आहेत. कारण सभाधीटपणा अंगी बाणावयास आवश्यक ठरणारे शैक्षणिक अनुभव, शालेय स्पर्धांतील सहभाग, त्यांना लाभलेले नाहीत असे दिसते.

व्यक्तित्व-विकासाच्या वरील कार्यक्रमात ही मुले हिरीरीने, बहुसंख्येने भाग घेत नाहीत. त्याला 'वेळ नाही,' यासोबतच वर वर्णन केलेली समाजजीवनातील तणावाची परिस्थिती हीही कारणीभूत आहे.

### आरोग्यासाठीच्या सुविधांची जाणीव

आरोग्याच्या दृष्टीने पिण्याचे पाणी, विहीर, नळ, नदी, झरा, कूपनलिका यांद्वारे आणले जाते. अनेक घरांतून पाणी गाळून घेतले जाते तर काही ठिकाणी आवश्यकतेनुसार पाणी गाळून घेतात. गावाच्या आरोग्याच्या दृष्टीने प्राथमिक आरोग्यकेन्द्र, रस्तादुरुस्ती, कचरापेटी, गटार-व्यवस्था, गोबर गॅस प्लॅन्ट यांची आवश्यकता, निकड वाटते. गाव जर व्यसनमुक्त झाले तर गावाच्या आरोग्यात खूपच भर पडेल. गावात सुविधा निर्माण होण्याच्या दृष्टीने कार्य करण्याची विद्यार्थ्यांची तयारी आहे; पण त्यासाठी योग्य असे मार्गदर्शन मिळावयास हवे; मुख्य म्हणजे गावकऱ्यांचे सहकार्य मिळाले पाहिजे.

### श्रद्धा व अंधश्रद्धा

सभोवतालच्या परिसराचा प्रभाव या मुलांवर पडणे स्वाभाविक आहे. या विद्यार्थ्यांच्या धर्मश्रद्धा प्रबळ आहेत. गावगाडा आणि धर्म यांचे अतूट नाते आहे. ही मुले आस्तिक आहेत. स्थूलमानाने ती श्रद्धा आणि अंधश्रद्धा यात फरक करतात; पण नित्याच्या व्यवहारात अनेकदा अंधश्रद्धेला शरण जातात. नित्य नियमाने ती जशी देवपूजा करीत नाहीत, तशीच नियमितपणे देवळातही जात नाहीत. धार्मिक जीवनात जे कर्मकांड असते त्याच्याशीच ती परिचित असतात. त्या कर्मकांडामागे काही तत्व आहे का? आजच्या जीवनव्यवहाराच्या संदर्भात ते आवश्यक, अपरिहार्य आहे का? याविषयी ती विचार करीत नाहीत. त्यामुळे श्रद्धा-अंधश्रद्धा यातील त्यांच्या मनातला फरक हा वरवरचाच ठरतो.

यावर उपाय म्हणून त्यांचे हे जे काही धार्मिक कार्यक्रम आहेत ते नित्याच्या जीवनाशी कसे जोडून घेता येतील ते पाहिले पाहिजे.

फी, कपडेलत्ते, पुस्तके, औषधे, याविषयीचे प्रश्न प्रायः आर्थिक आहेत. पण या प्रश्नांचे त्यांना विशेष वाटत नाही, कारण यातून ती मुले काही ना काही मार्ग काढतात, मिळवून जुळवून घेतात.

### चित्रपट, जीवनाचा एक अविभाज्य भाग

'संवाद' माध्यमांच्या संदर्भात चित्रपट हा जीवनाचा आज एक अविभाज्य भाग बनलेला आहे. याला ग्राम-जीवनही अपवाद नाही. महिन्यातून किमान सरासरी दोन चित्रपट तरी ही मुले बघतात. टी. व्ही.ची सोय असल्याने आता आर्थिक प्रश्नही येत नाही. पण या चित्रपटात देमार, धार्मिक आणि 'ए' सर्टिफिकेट असणारे चित्रपटच अधिक्याने ही मुले पाहतात. कलात्मक चित्रपटांकडे काही त्यांचा अधिक ओढा नाही. चित्रपटास वाहिलेली मासिकें बरीच मुले वाच-

तात; पण विकत घेऊन वाचणारे विद्यार्थी अत्यल्पच आहेत. त्यातही वाचनात मराठी आणि हिंदीला प्राधान्य अधिक. तूलनेने इंग्रजी नियतकालिके वाचणारे कमी.

रेडिओच्या कार्यक्रमात गाणी, मराठी-हिंदी बातम्या, भाषणे आणि युववाणी या कार्यक्रमात त्यांना अधिक रस आहे. टी. व्ही. वर चित्रपट आणि छायागीत यांच्याशीच त्यांचा परिचय आहे. इतर कार्यक्रम न पाहण्याचे कारण ग्रामपंचायत एवढ्या दोनच कार्यक्रमांना टी. व्ही. चालू करते. इतर कार्यक्रम दाखविण्याचा आग्रह का करीत नाही याला वरील विवेचनात आलेली कारणेच विद्यार्थ्यांनी दिली.

आपल्या ठिकाणी विनोदबुद्धीचा अभाव आहे याचीही खंत काही मुलांशी बोलताना जाणवली. आपण बुद्धिनिष्ठ विनोद करू शकत नाही आणि असा विनोद कोणी केला तर तो आपणास समजत नाही हाही त्यांच्यापुढे प्रश्न आहे.

'संवाद' माध्यमांच्या संदर्भातील प्रश्न काय, अथवा विनोदबुद्धीच्या संदर्भातील प्रश्न काय, हे सारे त्यांच्या अभिरुचिपोषणाच्या वातावरणाच्या अभावाच्या संदर्भातील आहेत. त्यांच्यामध्ये ही अभिरुची निर्माण केली पाहिजे. कलेचे प्रत्यक्ष दर्शन,. या संदर्भात त्यांच्याशी चर्चा, विविध साहित्यकृतींशी त्यांचा करून दिलेला परिचय, या द्वाराच हे प्रश्न सुटू शकतील.

महाविद्यालयांतून विद्यार्थ्यांना कलात्मक चित्रपट दाखविण्याची सोय झाली पाहिजे. चित्रपटाचे तंत्र, त्यातील कलात्मकता, याविषयीच्या त्यांच्या जाणिवा अधिक तरल कशा होतील या दृष्टीने प्रयत्न व्हावयास हवेत. विविध कलांचा त्यांना परिचय व्हावा यासाठी चित्रकलेचे प्रदर्शन भरवावे. शिल्प, संगीत, वास्तुशिल्प यातील श्रेष्ठ कलाकृतींची रसिकांनी आणि मान्यवरांनी केलेली रसग्रहणे त्यांच्यापुढे यावयास हवीत; ती 'शो-केस'मध्येही लावावीत. ललित-निबंधाच्या आस्वादनाची, लेखनाचीही दिशा अशा विद्यार्थ्यांना दिली तरी बरेचसे काम होईल.

### खोली घेऊन राहणाऱ्यांच्या अडचणी

शहरामध्ये खोली घेऊन राहणाऱ्या विद्यार्थ्यांना एका वेगळ्याच समस्येला तोंड द्यावे लागते. हे विद्यार्थी तीन-चार जणांत मिळून एक खोली घेतात. स्वतः स्वयंपाक करतात आणि इतर वेळी अभ्यास करतात. पण त्यांना गावाकडून येणाऱ्या 'गेस्ट' मंडळींचा फार त्रास होतो. आपल्याच गावची मुले शहरात खोली घेऊन राहतात तेव्हा त्यांच्याकडेच मुक्काम करणे या 'गेस्ट'ना सोयीचे पडते. त्यांच्याबरोबरच मग या विद्यार्थ्यांना गावातून त्यांची कामे करीत हिंडावे लागते; त्यांची ऊठ-बस करावी लागते; चित्रपटास जावे लागते. यात या विद्यार्थ्यांचा अभ्यासाचा वेळ किती जातो याचा 'गेस्ट' विचारच करीत नाहीत. बरे त्यांना टाळावयास जावे तर घरी ते आणखी काही कपोलकल्पित सांगणार. भिडस्तपणाही आड येतो.

यावर उपाय म्हणजे खेडोपाडी पालकांचे आणि इतरांचेही या संदर्भात प्रशीक्षण व्हावयास हवे. विद्यार्थ्यास अभ्यासासाठी निवांतपणा मिळवून दिला पाहिजे.

### काम हवे, पण नाविन्यपूर्ण

'कमवा आणि शिका' ही योजनादेखील त्यांना सुधारित स्वरूपात हवी आहे. ही योजना त्यांना महत्त्वाची वाटते; पण जे काम त्यांना या योजनेत करावे लागते तेच त्यांना गावीही करावे लागते. त्या कामात नाविन्य नाही. ते काम संपूर्ण टाळावे असेही त्यांचे म्हणणे नाही. ते काम थोडे कमी करून ग्रंथालयात, कार्यालयात त्यांना छोटी छोटी कामे मिळावीत. ग्रंथालयात नियतकालिकांतील संदर्भांची सूची तयार करणे, पुस्तकांवर क्रमांक टाकणे, कार्यालयात काही

नकला करणे, या कामांतून काही गोष्टी त्यांना शिकायलाही मिळतील असे दिसते.

### आजार

आरोग्याच्या संदर्भातही काही प्रश्न आहेत. स्वच्छतेची अपरिहार्यता हा प्रश्न काही आता उरलेला नाही. पण छोट्या छोट्या आजारासाठी डॉक्टरकडे जावे लागते हा त्यांच्यापुढे प्रश्न आहे.

यावर उपाय म्हणजे पूर्वीचा ‘आजीबाईचा बटवा’ पुन्हा शोधला पाहिजे. देशी औषधांचा त्यांना परिचय करून द्यावयास हवा. त्याचप्रमाणे First-Aid च्या शिक्षणाचीही सोय करावयास हवी.

### मुलींपुढचा यक्षप्रश्न

वरील प्रश्नांपेक्षा वेगळे असे मुलींचे काही प्रश्न आहेत. त्यांना शिक्षणासाठी घरातून विरोध होत नाही; पण कोणी काही सांगेल आणि आपले शिक्षण बंद पडेल याची टांगती तलवार त्यांच्या डोक्यावर असते. व्यक्तित्वाचा विकास वगैरे गोष्टी त्यांना हास्यास्पद वाटतात. कारण आज त्या ज्या घरात जाणार आहेत, तेथील माणसांची वृत्ती ही पूर्णतः सरंजामशाही वृत्ती आहे, याविषयी त्यांची खात्री आहे. नवीन ज्ञान-विज्ञान, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, माणुसकी, इत्यादी मूल्यांचा उद्‌घोष करणारे शिक्षण आणि त्याविरुद्ध वर्तन करणारा समाज यांचा मेळ कसा घालावयाचा हा त्यांच्यापुढे प्रश्न आहे.

स्त्रीमुक्ती आंदोलनाची अधिक ओळख करून घेणे म्हणजे आपल्या यातनांत भर घालणेच आहे असे त्यांना वाटते. आपण शिक्षण घेतो ते नोकरी मिळावी म्हणून, असेच अनेकींचे उत्तर आले.

संगीत, चित्रकला, फोटोग्राफी या कला शिकवण्याची सोय झाली तरी घरून परवानगी मिळणार नाही असे त्यांना वाटते. मात्र शिवणकला, टायपिंग, भरतकाम या कला शिकण्यास परवानगी मिळते. जीवनोपयोगी ठरणाऱ्या गोष्टींकडे–अर्थप्राप्तीकडेच–ग्राम-समाजाचे लक्ष असते आणि ते स्वाभाविकच आहे. हे सारे प्रश्न ग्रामीण मनाच्या वेशीवर येऊन थांबतात. हे मन जितके आधुनिक होईल तितके हे प्रश्न सुटण्यास साहाय्य होणार आहे. यासाठी ग्रामीण जीवनात प्रबोधन घडावे म्हणून पद्धतशीर प्रयत्न व्हावयास हवेत. ग्रामीण युवकाचे प्रबोधन झाले तर उच्चविद्याविभूषित ग्रामीण युवतीचाही उद्धार होणार आहे आणि त्यातूनच साऱ्या ग्राम-जीवनाचा विकास होणार आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांचा प्रश्न असा राष्ट्र-विकासाच्या कार्याशी संबद्ध आहे.

### या साऱ्या पाहणीचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे मांडता येतील

१. ग्रामीण महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक असे प्रश्न आहेत.

२. अभिरुची, विद्यार्थ्यांची जीवनविषयक दृष्टी, या संदर्भातही काही प्रश्न आहेत.

३. या प्रश्नांची काही कारणे ग्रामीण जीवनातील परंपराप्रियता आणि स्थितिशीलता यांमध्ये पहावयास मिळतात.

४. ग्रामीण नेतृत्वही काळाची ही आव्हाने स्वीकारण्यास तोकडे पडलेले आहे. शिक्षक, समाजसुधारक आणि नेतेमंडळी यांच्या कार्यात समन्वय नाही असेही जाणवते.

५. त्याचे परिणाम म्हणजे ग्रामविकासाची गती ही मंद झालेली आहे. भौतिक प्रगती

कितीही झालेली असली तरी अभिरुचिसंपन्न जीवन जगण्याच्या दृष्टीने आवश्यक ती ग्राम-समाजाची सांस्कृतिक तयारी झालेली नाही.

६. यावर उपाय म्हणजे सबंध ग्रामीण समाजाचे प्रबोधन व्हावयास हवे. शिक्षक, ग्रंथपाल, कीर्तनकार यांचे या दृष्टीने प्रबोधन झाले पाहिजे.

७. चित्रपट, आकाशवाणी, दूरदर्शन, रेकॉर्डस् यांचा या दृष्टीने उपयोग करून घेतला पाहिजे.

या मर्यादित क्षेत्रातील सर्वेक्षणावरून असे म्हणावेसे वाटते की, महाराष्ट्रभर अशी सर्वेक्षणे व्हावयास हवीत. त्या त्या ठिकाणच्या समस्या, त्या त्या ठिकाणच्या गरजा, यांच्या संदर्भात विचार व्हावयास हवा. या दृष्टीने प्रत्येक गावातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी स्वतः पुढाकार घेऊन ग्राम-ग्रंथालयासारखी योजना राबवली पाहिजे. महाविद्यालयातील व माध्यमिक शाळेतील शिक्षकांचा, परिसराला अधिकात अधिक उपयोग होईल असे पाहिले पाहिजे. आज तालुका पातळीवर क्रीडा-स्पर्धा भरतात त्या वेळी जे उत्साहाचे, आनंदाचे वातावरण असते तसेच वातावरण तालुक्यातील साहित्यिकांचा मेळावा, ग्रंथपालांचा मेळावा, विविध स्पर्धा या वेळी निर्माण झाले पाहिजे. या दिशेने कार्य होण्याची गरज आहे, निकड आहे. असे झाले तरच ग्रामीण महाविद्यालयांचा आजचा चेहरा-मोहरा बदलेल. प्रायः सांस्कृतिकदृष्ट्या दुर्लक्षिले जाणारे हे महाविद्यालय प्रेरक, आश्वासक, रेखीव बनू शकेल असे म्हणावेसे वाटते.

## सारांश

ग्रामीण महाविद्यालयातील ग्रामीण विद्यार्थ्यांचे प्रश्न समाजपरिवर्तनाच्या आणि विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. त्याचप्रमाणे महाविद्यालयात येणाऱ्या विद्यार्थ्यांत ग्रामीण विद्यार्थी संख्येने अधिक असल्याने हे प्रश्न अधिक महत्त्वपूर्ण आहेत.

या प्रश्नांच्या संदर्भात आजपर्यंत त्रुटित स्वरूपातच विचार झालेला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातला ग्रामीण विद्यार्थी आणि स्वातंत्र्योत्तर काळातला ग्रामीण विद्यार्थी यांमध्ये फरक आहे. या विद्यार्थ्यांचे मानस, त्यांचे प्रश्न वेगवेगळे आहेत. हा विद्यार्थी खरे तर अर्धवेळ विद्यार्थी आहे.

शैक्षणिक प्रश्न व सामाजिक-सांस्कृतिक प्रश्न असे या प्रश्नांचे प्रायः दोन भाग पडतात. अध्ययनातील अडचणी, 'इंग्रजीचा प्रश्न' इत्यादी त्यांचे शैक्षणिक प्रश्न आहेत. कौटुंबिक जीवनातील प्रश्न, धार्मिक प्रश्न, इत्यादी सामाजिक-सांस्कृतिक प्रश्न आहेत. ग्रामीण समाजाचे प्रबोधन करणाऱ्यांची आणि नव्या दिशा देणारांची अगत्यशीलता, तळमळ या मार्गाने हे प्रश्न सुटू शकतील असे म्हणावेसे वाटते.

■ ■

# ४ शहरी महाविद्यालयांतील ग्रामीण विद्यार्थ्यांचे प्रश्न

रमेशचंद्र परळकर

किशोर अवस्था संपवून तारुण्यात नुकतेच पदार्पण केलेल्या व शिक्षणासाठी शहरी महाविद्यालयात आलेल्या खेड्यातील विद्यार्थ्यांस अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. त्या अडचणी समजून घेण्यासाठी ग्रामीण भागातून शहरी महाविद्यालयात उच्च शिक्षण घेण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना भेटलो; त्यांच्याशी चर्चा केल्या; त्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यांच्यासमोर अनेक अडचणी असल्याचे या प्रयत्नातून ध्यानात आले.

पैशाची जमवाजमव करणे, आवश्यक ती प्रमाणपत्रे मिळविणे, शहरात राहण्यास योग्य कपडे तयार करवून घेणे, शहरामधून खोल्या मिळविणे, हॉस्टेलमध्ये प्रवेश घेणे, हॉस्टेलमध्ये प्रवेश न मिळाल्यास आपणास साजेसा साथीदार निवडणे, परत आपल्या गावी जाऊन तीन-चार महिने पुरेल एवढे धान्य घेऊन येणे, या सर्व गोष्टी या विद्यार्थ्यांना कराव्या लागतात. एवढे करून शहरात आल्यानंतर शहरी वातावरणाशी जुळवून घेणे, महाविद्यालयातील प्रस्थापित ‘ दादां ’ना तोंड देणे, यासारख्या गोष्टींकडेही त्याला लक्ष पुरवावे लागते.

### उत्पन्नाचा दाखला

या विद्यार्थ्यांची पहिली अडचण, त्यांना आपल्या गावातील सरपंचाकडून उत्पन्नाचा जो दाखला मिळवावा लागतो त्यातून निर्माण होते. वास्तविक आपल्या गावातून शहरामध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्याविषयी सरपंचांच्या मनात आपुलकी असावयास पाहिजे; परंतु प्रत्यक्षात तसं काही होत नाही. उत्पन्नाचा साधा दाखला घेण्यासाठी विद्यार्थ्यांना पैसे मोजावे लागतात असे बऱ्याच विद्यार्थ्यांनी सांगितले. दिलेल्या पैशाची पावती देण्याची प्रथा कुठेच नाही असे दिसते. सरपंच कोणत्याही राजकीय पक्षाचा असो, त्याला पैसे दिल्याशिवाय उत्पन्नाचा दाखला मिळत नाही. किंबहुना उत्पन्नाचा दाखला देण्यासाठी म्हणजे त्यावर सही करण्यासाठी पैसे घेणे हा आपला अधिकारच आहे अशी सरपंचाची समजूत असते असे अनेक विद्यार्थ्यांनी सांगितले. गावामध्ये पार्टीबाजीचे राजकारण असेल, आणि एखाद्या विद्यार्थ्याचा पालक सरपंचाच्या विरोधी पक्षातील असेल, तर विद्यार्थ्यास उत्पन्नाचा दाखला मिळविण्यास अधिक त्रास होतो. म्हणून काही विद्यार्थी शहरातच सरपंचाचा शिक्का तयार करून घेतात व या अडचणीवर मात करतात असे दिसते.

### जात सांगणारे प्रमाणपत्र

एखाद्या विद्यार्थ्यास आपल्या जातीसंबंधी प्रमाणपत्र (Caste Certificate) पाहिजे असल्यास त्याला अधिक त्रास होतो. सरपंचाकडे अनेक वेळा जाऊन त्याची मनधरणी करावी लागते.

विद्यार्थ्यांस सरपंचाकडून जातीविषयक प्रमाणपत्र घ्यावे लागते, कारण सरपंचाने दिलेल्या जातीविषयक प्रमाणपत्राच्या आधारेच त्याला तहशीलदार अथवा अन्य संबंधित अधिकाऱ्याकडून जातीविषयक प्रमाणपत्र मिळते. अशा अधिकाऱ्याकडून मिळालेले प्रमाणपत्रच ग्राह्य धरले जाते. विद्यार्थी कोणत्याही उत्पन्न-गटातील असो त्याला प्रमाणपत्र देताना सरपंच पैसे घेतो. समाजवाद, गरीबांचे कल्याण यासंबंधी वल्गना करणारे सरपंच अगदी शेतमजुरापासूनदेखील पैसे घेतात; पैसे घेण्याच्या बाबतीत ते पक्षपात करीत नाहीत, असे दिसते. प्रमाणपत्र मिळविताना जो त्रास होतो त्या त्रासास वैतागून काही विद्यार्थ्यांनी सरकारने सर्व स्तरांवरील शिक्षण मोफत करावे असे सुचविले आहे. विद्यार्थ्यांच्या म्हणण्यानुसार जवळजवळ ९० टक्के प्रमाणपत्रे बोगस असतात. शेतमजुराच्या मुलास व २०–२५ एकर बागायती शेती असणाऱ्या शेतकऱ्याच्या मुलास कित्येकदा एकाच प्रकारचे उत्पन्नाचे दाखले दिले जातात. काही आर्थिक दृष्ट्या गरीब असणाऱ्या विद्यार्थ्यांनी उत्पन्नाच्या दाखल्याबरोबर ७–१२चा उतारा जोडण्याची सक्ती केली जावी असे सुचविले आहे. असे केल्यास एखाद्याच्या उत्पन्नाची खरी माहिती मिळू शकेल असे त्यांचे म्हणणे.

### राहण्याची सोय

उत्पन्नाचा दाखला मिळाल्यानंतर विद्यार्थी शहरात येतो. आपल्या गावातील इतर विद्यार्थी ज्या महाविद्यालयात प्रवेश घेतात त्या महाविद्यालयात प्रवेश घेण्याचा तो प्रयत्न करतो. महाविद्यालयात प्रवेश मिळणे तितकेसे अवघड नसते; परंतु महाविद्यालयाच्या वसतिगृहात प्रवेश मिळविणे अवघड असते. श्रीमंत व बागायतदारांच्या मुलांना, तसेच ज्या पालकांचा संस्थाचालकांशी संबंध असतो अथवा ज्यांचा राजकीय नेत्यांशी संबंध असतो अशा पालकांच्या मुलांना त्यांची गुणवत्ता लक्षात न घेता वसतिगृहात प्रवेश दिला जातो. बहुतेक संस्थाचालक कोणत्या ना कोणत्या तरी राजकीय पक्षाशी संबंधित असतात. त्यामुळे त्यांना अशा मुलांना वसतिगृहात प्रवेश द्यावाच लागतो; परंतु पालक बडा असामी नसेल, राजकीय पक्षाबरोबर त्याचे संबंध नसतील, तर त्याच्या पाल्याला वसतिगृहात प्रवेश मिळणे अवघड असते.

अशा विद्यार्थ्यांना मग शहरातून खोल्या मिळवाव्या लागतात. औरंगाबादसारख्या शहरामध्ये १० × १० फुटांच्या खोलीला रु. १०० ते १५० दरमहा भाडे घेतले जाते. एका विद्यार्थ्यास एवढे भाडे परवडत नाही म्हणून त्याला इतर विद्यार्थी भागीदार घ्यावे लागतात. असे भागीदार निवडताना ते कसे आहेत ? त्यांच्या व आपल्या सवयी, आवडी-निवडी एकच आहेत का ? ते आपल्यापेक्षा गरीब आहेत का श्रीमंत आहेत ? या प्रश्नांची उत्तरे शोधायला वेळ नसतो. अशा प्रकारची चौकशी करत बसल्यास खोली हातची जाण्याची भीती असते. म्हणून जे मिळतील ते भागीदार स्वीकारून, त्याला खोली ताब्यात घ्यावी लागते. खोली ताब्यात घेतल्यानंतर धान्य आणण्यासाठी पुन्हा गावी जावे लागते. खाणावळीचे दर त्याला परवडण्यासारखे नसतात. घरी गेल्यानंतर धान्य सहजासहजी मिळते; परंतु पालक आवश्यक ते पैसे वेळेवर देऊ शकत नाहीत. पैसे मिळेपर्यंत बऱ्याच विद्यार्थ्यांना आपल्या गावीच रहावे लागते. हे सर्व करण्यात त्यांचा जवळजवळ एक महिना जातो. एका महिन्यानंतर असे विद्यार्थी महाविद्यालयात खऱ्या अर्थाने प्रवेश करतात.

### शैक्षणिक वर्षाची परवड

महाविद्यालयातील वर्ग तोपर्यंत सुरू झालेले असतात. औरंगाबादमध्ये दोन-तीन महाविद्यालये एका अर्थाने ग्रामीण विद्यालयेच आहेत. कारण या महाविद्यालयांमध्ये जवळजवळ ८० टक्के विद्यार्थी खेड्यांमधून आलेले असतात. त्यामुळे हे विद्यार्थी येईपर्यंत या महाविद्यालयातील वर्ग नियमितपणे सुरू होतच नाहीत. विद्यापीठाने सुट्ट्या कशाही ठरविल्या असल्या तरी या

महाविद्यालयातील सुट्ट्या विद्यार्थीच खऱ्या अर्थाने ठरवीत असतात. बहुसंख्य विद्यार्थी वर्गात आल्याशिवाय या महाविद्यालयातील प्राध्यापक शिकविण्यास सुरुवात करीत नाहीत. विद्यापीठाच्या आदेशानुसार शैक्षणिक वर्ष २० जूनला सुरू होत असले तरी या महाविद्यालयांचे शैक्षणिक वर्ष खऱ्या अर्थाने २० जुलैपासून सुरू होते ! शैक्षणिक वर्ष अशा प्रकारे सुरू झाल्यानंतर प्रथम सत्र संपण्यापूर्वी निदान १५ दिवस तरी ग्रामीण भागातील विद्यार्थी गायब होतात. याशिवाय पोळा, गौरी-गणपती या सणांसाठी विद्यार्थी आपल्या गावांकडे जातात ते निराळेच. तेव्हा अशा महाविद्यालयात शिकविणाऱ्या प्राध्यापकांना विद्यार्थ्यांच्या कलाप्रमाणे शिकविण्याची योजना तयार करावी लागते. विद्यार्थ्यांच्या वेळापत्रकाप्रमाणे आपले वेळापत्रक जमविण्याचे तंत्र ज्या प्राध्यापकाला जमत नाही तो प्राध्यापक अशा महाविद्यालयात यशस्वीपणे काम करू शकत नाही. विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीमुळे विद्यार्थ्यांचेच नुकसान होते. हे त्यांना मान्यही आहे. परंतु ते आपल्या वागण्यात बदल करण्यास तयार नसतात किंवा त्यांना तसा बदल करणे शक्य होत नाही.

### निवडणुका : समेलने : कोचिंग क्लासेस : पुस्तके

महाविद्यालयात ग्रामीण विद्यार्थी थोडासा रुळतो न रुळतो तोच महाविद्यालयाच्या विद्यार्थी-संसदेच्या निवडणुकांना प्रारंभ होतो. ज्या महाविद्यालयात शहरी व ग्रामीण विद्यार्थ्यांचे प्रमाण सम असते त्या महाविद्यालयांमध्ये शहरी विरुद्ध ग्रामीण असे गट पडतात. हे गट विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित नसतात. शहरी विद्यार्थी निवडणुकांच्या वेळी आपल्या मोहल्ल्यातील दादा मंडळींची मदत घेऊन ग्रामीण विद्यार्थ्यांना दमदाटी करतात, त्यांच्यावर दडपण आणण्याचा प्रयत्न करतात, असे ग्रामीण विद्यार्थ्यांचे म्हणणे; परंतु शहरी विद्यार्थी या उलट सांगतात. त्यांच्या मते ग्रामीण भागातून आलेल्या बड्या शेतकऱ्यांच्या मुलांजवळ भरपूर पैसा असतो. निवडणुका जिंकण्यासाठी तेच शहरातील गुंडांना खाऊपिऊ घालून, प्रसंगी त्यांना 'ओली' पार्टी देऊन, त्यांचा महाविद्यालयीन निवडणुकांमध्ये उपयोग करून घेतात. याबाबतीत सत्यशोधन करणे कठीण आहे; परंतु एक गोष्ट मात्र खरी की, महाविद्यालयीन निवडणुकांमध्ये गावगुंडांचा हस्तक्षेप वाढत चालला आहे व विद्यार्थी-संसदेच्या निवडणुका शांतपणे पार पाडणे कठीण होत चालले आहे. दोन्ही गटांचे विद्यार्थी निवडणुकांमध्ये भरपूर पैसा खर्च करतात. पहिले सत्र संपत आले तरी बहुसंख्य विद्यार्थी क्रमिक पुस्तके विकत घेत नाहीत. क्रमिक पुस्तके विकत न घेणाऱ्यात ग्रामीण भागातून येणाऱ्या श्रीमंत विद्यार्थ्यांचेच प्रमाण जास्त आहे असे आढळते. त्यामुळे त्यांना इंग्रजीसारख्या अवघड समजल्या जाणाऱ्या विषयासाठी कोणती क्रमिक पुस्तके नेमली गेली आहेत हे गॅदरिंग संपेपर्यंत, म्हणजे डिसेंबर-जानेवारीपर्यंत माहीत नसते. गॅदरिंग संपल्यानंतर पुस्तके जरी विकत घेतली तरी त्यांना त्यातले काही समजत नाही. शेवटी कोणत्या तरी ट्यूशन-क्लासचा आधार घेतला जातो. महाविद्यालयात इंग्रजीचे प्राध्यापक धड्याचा सारांश मराठीत सांगत नाहीत. त्यांचे इंग्रजी समजत नाही म्हणून आम्ही कोचिंग क्लासला जातो असे बऱ्याच विद्यार्थ्यांनी सांगितले आहे. शिवाय कोचिंग क्लासमध्ये प्रश्नोत्तरे दिली जातात; धड्याचा सारांश मराठीत सांगितला जातो, असेही सांगितले जाते. या प्रयत्नांनी परीक्षेत यश मिळत नाही असे दिसल्यास परीक्षेच्या वेळी कॉपी करून निदान पासापुरते मार्क मिळविण्याची धडपड अनेक विद्यार्थी करतात.

### बुक बँक : स्टूडंट्स् अेड फंड

महाविद्यालयाच्या बुक बँकेमधून ५०–६० टक्के विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके वाटली जातात. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना बुक बँकेतून पुस्तके दिली जावीत व अशा विद्यार्थ्यांना अध्यापनात

मदत व्हावी हा बुक बँकेचा प्रमुख हेतू. परंतु बुक बँकेच्या कमिटीतर्फे श्रीमंत व कॉलेजमध्ये वजन असणाऱ्या विद्यार्थ्यांनाच त्यांची गुणवत्ता व गरज लक्षात न घेता पुस्तके वाटली जातात, अशी ग्रामीण भागातून आलेल्या गरीब विद्यार्थ्यांची तक्रार आहे. त्यांच्यामते श्रीमंत विद्यार्थी निवडणुका लढवितात, त्यापैकी बरेचसे निवडूनही येतात. त्यामुळे ते कमिटीतील प्राध्यापकांवर दडपण आणू शकतात. ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थी सर्वार्थाने गरीब असतात. म्हणून त्यांच्यावर अन्याय होतो. बुक बँकेप्रमाणेच महाविद्यालयात गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना परीक्षेची फी भरण्यासाठी आर्थिक मदत करता यावी म्हणून "स्टूडंट्स् अेड फंड" असतो. त्या फंडातून देखील श्रीमंत विद्यार्थ्यांनाच जादा मदत दिली जाते, अशी ग्रामीण भागातून आलेल्या गरीब विद्यार्थ्यांची दुसरी तक्रार आहे. एरवी घड्याळ, लॉकेट, अंगठी घालणारे व मोटारसायकलीवरून फिरणारे विद्यार्थी "स्टुडंटस् अेड फंडा"च्या इंटरव्ह्यूच्या वेळी या सर्व वस्तू घरी ठेवून येतात. फक्त त्या दिवशीच त्यांच्या अंगावर साधे कपडे असतात. कमिटीतील एखाद्या प्राध्यापकाने लॉकेट, अंगठी, कपडे, इत्यादींविषयी धाडस करून चौकशी केलीच तर "मित्राचे होते, मित्राने वापरण्यासाठी दिले होते." अशी उत्तरे मिळतात. त्यामुळे ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थी त्यांच्याच भागातील श्रीमंत विद्यार्थ्यांविषयी फार चिडून व संतापाने बोलताना दिसतात. मग असे विद्यार्थी मदतीसाठी प्राध्यापकांना विनंती करतात. काहींना मदत मिळते, काहींना मदत मिळत नाही. त्यामुळे ग्रामीण भागातून शहरी महाविद्यालयात शिक्षण घेण्यासाठी आलेल्या गरीब विद्यार्थ्यांचे फार हाल होतात.

### प्राध्यापक, ग्रंथालये व निवासाची व्यवस्था

अशा गरीब विद्यार्थ्यांना तुम्ही तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या महाविद्यालयात का शिकत नाही असे विचारले तेव्हा मिळालेली उत्तरे आश्चर्यकारक वाटली. तालुक्याच्या महाविद्यालयांतून काम करणारे बहुसंख्य प्राध्यापक स्थानिक असतात. त्यांचे संस्थाचालकांशी लागेबांधे असतात. जवळच्या खेड्यात त्यांची शेती असते. वर्गात जाऊन नियमितपणे शिकविण्याचे कार्य त्यांच्याकडून क्वचित होते. त्यांच्या अनियमितपणाबद्दल जाब विचारण्याची प्राचार्यांची देखील प्राज्ञा नसते, तर विद्यार्थ्यांची कशी असेल? शिवाय अशा महाविद्यालयांच्या ग्रंथालयांमधून क्रमिक पुस्तकांचाच भरणा अधिक असतो. त्यामुळे अवांतर वाचन करून ज्ञानाच्या कक्षा वाढविणे शक्य नसते. अर्थात काही महाविद्यालये याला अपवाद आहेत. अशा अनेक अडचणींना तोंड देऊन विद्यार्थी शहरातील महाविद्यालयात प्रवेश घेणेच पसंत करतो. शिवाय तालुक्याच्या महाविद्यालयांनी अल्प खर्चात भोजन, फुकट निवासाची व्यवस्था, वगैरेसंबंधी दिलेल्या जाहिराती फसव्या असतात असे अनेकांचे म्हणणे. ज्या विद्यार्थ्यांना अल्प खर्चात भोजन मिळविण्याची इच्छा असेल त्यांना एक पोते ज्वारी द्यावी लागते. निवासाची मोफत व्यवस्था असते; पण ती एखाद्या निकामी व पडक्या वाड्यात केलेली असते. त्यापेक्षा जनावरांच्या गोठ्यात राहणे बरे असे बऱ्याच विद्यार्थ्यांनी सांगितले आहे. ज्या तालुक्याच्या ठिकाणच्या महाविद्यालयास साखरकारखान्यांची मदत असते अशा ठिकाणी व्यवस्था बरी असते; पण फायद्यात चालणाऱ्या साखरकारखान्यांची संख्या मराठवाड्यात अत्यंत कमी आहे.

### शहरातल्या सवयी

शहरात आल्यामुळे बऱ्याच विद्यार्थ्यांना सिनेमा पाहण्याची व हॉटेलमध्ये खाण्याची सवय लागते सिनेमा पाहून विद्यार्थी बिघडतात अशी तक्रार केली जाते. त्याविषयी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले असता त्यांनी त्या गोष्टीचा इन्कार केला. त्यांच्या मते त्यांच्याजवळ सिनेमा पाहण्याइतके भरपूर पैसे नसतात. सिनेमा पाहिलेच तर सिनेमातील जीवन कृत्रिम

असते हे जाणवते; त्या जीवनाशी आपण सहमत होऊ शकत नाही असे अनेकांनी सांगितले. केवळ करमणुकीसाठी आपण सिनेमा पाहतो असे काहींचे म्हणणे. सिनेमा पाहून बिघडलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्तीतजास्त शेकडा ५ असेल असे त्यांना वाटते. त्यांच्यामते सिनेमा पाहून बिघडलेल्या विद्यार्थ्यांमध्ये शहरी विद्यार्थ्यांचे प्रमाणच जास्त आहे. मुलींची छेड काढणे, मुलींना पाहून अश्लील हावभाव करणे, सिनेमातील गाणी म्हणणे, या गोष्टी करण्यात शहरी विद्यार्थीच आघाडीवर आहेत.

### शहरात कलागुणांच्या विकासास वाव

शहरातील महाविद्यालयात येण्यासाठी उत्तम ग्रंथालये, नियमितपणे वर्ग चालणे याशिवायही इतर काही कारणे आहेत का असे विचारले असता काही विद्यार्थ्यांनी शहरामध्ये आमच्या कलागुणांच्या विकासास वाव मिळतो असे सांगितले. ग्रामीण भागातून शहरी महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ५ टक्के विद्यार्थीच विविध प्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रमांत भाग घेतात असे प्रत्यक्षात दिसते.

### राहायची सोय व स्वयंपाक

शहरातून खोल्या घेऊन राहणारे बहुसंख्य विद्यार्थी खोलीवरच स्वयंपाक करतात. ज्यांची परिस्थिती बऱ्यापैकी असते असे विद्यार्थी ४–५ जणात मिळून स्वयंपाकासाठी एखादी बाई लावतात. त्या बाईला महिन्याकाठी ५० रु. ते ८० रु. द्यावे लागतात. ज्यांना स्वयंपाकाची बाई लावणे परवडत नाही ते विद्यार्थी हातानेच आळीपाळीने स्वयंपाक करतात. स्वयंपाक करण्याच्या कामात श्रीमंतांची मुले व दादामंडळी चुकारपणा करतात. त्यामुळे गरीब व खालच्या वर्गांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्यासाठी स्वयंपाक करावा लागतो. खोली भाडे १००–१५०/– रु. असूनदेखील संडास, स्नानगृह, नळ यांच्या सोयी सामायिक असतात. त्यामुळे बऱ्याच विद्यार्थ्यांना सकाळच्या तासाला हजर राहता येत नाही.

### मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या विशेष अडचणी

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना खोल्या मिळविण्यास विशेष त्रास होतो. नामांतराच्या चळवळीपासून सवर्ण लोक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना खोल्या देत नाहीत. खोल्या घेऊन राहणारे ७० ते ८० टक्के मागासवर्गीय विद्यार्थी मुसलमानांच्या घरात खोल्या घेऊन राहतात. ते त्यांना त्यांची जात विचारीत नाहीत असे बहुसंख्य मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी सांगितले. मुसलमानांच्या घरांतून नळ, संडास, स्नानगृह यांच्या सोयी समाधानकारक नसल्या तरी मागासवर्गीय विद्यार्थी त्यांच्याच घरात राहणे अधिक पसंत करतात. एखाद्या सवर्णाने मागासवर्गीय विद्यार्थ्याला खोली दिलीच तर त्याला विद्यार्थ्यांच्या जातीविषयी कल्पना आल्यावर तो त्याला जागा सोडावयास सांगतो. सवर्णांच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या जातीच्या अज्ञानामुळेच त्यांना क्वचित प्रसंगी खोल्या मिळतात. खोल्या दिल्यानंतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडे नामांतर, धर्मांतर, दलितांना मिळणाऱ्या सवलती, त्यांच्यावर होणारे अन्याय, यासंबंधी जी चर्चा चालते ती सवर्णांना आवडत नाही; त्यांना ती सहन होत नाही आणि म्हणून ते मागासवर्गीय विद्यार्थ्यांना घरे सोडून जाण्यास सांगतात असे बऱ्याच मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी सांगितले.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांची त्यांना मिळणाऱ्या अपुऱ्या शिष्यवृत्तीविषयी तक्रार आहे. दिवसेंदिवस महागाई वाढत असतानाही सरकार त्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करीत नाही. त्यामुळे बऱ्याच मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडे अपुरी शैक्षणिक साधने असतात. बरेच मागासवर्गीय विद्यार्थी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात एक वेळेस जेवण घेतात असे दिसून येते.

## शहरातले मित्र, गावात तिऱ्हाईत

मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या गावातले; गावाजवळचे, सवर्ण विद्यार्थी त्यांच्याबरोबरच शहरामध्ये शिकत असतात. शहरामध्ये राहात असताना ते मागासवर्गीय विद्यार्थ्यांबरोबर बोलतात, त्यांच्या खोलीवर काही वेळा गप्पा मारण्यासाठी जातात; परंतु हेच सवर्ण विद्यार्थी गावी गेल्यावर मात्र अजिबात संबंध नसल्याचे दाखवतात. गावात असताना सवर्ण विद्यार्थी मागासवर्गीय विद्यार्थ्यांबरोबर हॉटेलमध्ये चहा घेण्याचे देखील टाळतात. गावात आल्यावर त्यांच्यावर वडीलधाऱ्या मंडळींचे व गावातील पुढाऱ्यांचे दडपण असते असे सवर्ण विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. सवर्ण विद्यार्थ्यांचा पुरोगामीपणा शहरापुरता व महाविद्यालयापुरताच मर्यादित असतो असे मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.

## लग्न झालेले विद्यार्थी व त्यांचे आरोग्य

ग्रामीण भागातून उच्च शिक्षणासाठी विशेषतः पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या शेकडा ४० ते ५० टक्के विद्यार्थ्यांची लग्ने झालेली असतात. त्यांच्या बायका अर्थातच गावी घरीच असतात. लग्न झाल्यामुळे त्यांना शारीरिक सुखाची चटक लागलेली असते. वरचेवर गावाकडे गेल्यास घरातील वडील मंडळी रागावतात. शिवाय घरातील सनातनी वातावरणामुळे वरचेवर घरी जाण्याची बऱ्याच विवाहित विद्यार्थ्यांना लाज वाटते. त्यामुळे भावना आवरू न शकणारे विद्यार्थी विषयवासनेस बळी पडून वाममार्गास लागतात. ४–५ वर्षांपूर्वी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची शारीरिक तपासणी औरंगाबाद येथे घेण्यात आली. त्या तपासणीत ५०–६० टक्के महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना गुप्तरोग झाल्याचे आढळून आले. त्यात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक होते. पदवीधर झाल्याबरोबर आपल्या पाल्यास पुढे शिकण्याची इच्छा असो वा नसो, त्याला नोकरी असो वा नसो, ग्रामीण भागातील पालक आपल्या पाल्याचे लग्न करून मोकळे होतात. लग्न करणे अथवा न करणे हे आपल्या हातात नसल्याचे बऱ्याच ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांनी सांगितले आहे.

## उपाय

वरील विवेचनावरून ग्रामीण भागातून शहरी महाविद्यालयांत शिकण्यासाठी आलेल्या, विशेषतः गरीब व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना, बऱ्याच अडचणींना तोंड द्यावे लागते हे स्पष्ट होते. त्यावर खालीलप्रमाणे उपाययोजना केल्यास त्यांच्या समस्या सुटण्यास बरीच मदत होईल असे वाटते.

## सवलतींसाठी उत्पन्न-मर्यादा

ई. बी. सी. ची सवलत मिळविण्यासाठी खोटे शिक्के तयार करून घेण्यापर्यंत काही वेळा विद्यार्थ्यांची मजल जाते असे आढळते. याचाच अर्थ ते वरील सवलती मिळविण्यासाठी बेकायदेशीर कृत्य करण्यासही मागेपुढे पहात नाहीत. शिवाय या सवलतीचा श्रीमंत शेतकऱ्यांकडून गैरवापर होतो. हे सर्व थांबवायचे असेल तर प्राथमिक ते महाविद्यालयीन स्तरापर्यंतचे सर्व शिक्षण एक तर मोफत करावे किंवा सरकारला ते शक्य नसेल तर सध्याची महागाई लक्षात घेता १० हजार रुपयांपर्यंत उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या पाल्यांना मोफत शिक्षणाची सोय उपलब्ध करून द्यावी. खेड्यातील बड्या बागाईतदारांची मुले सरपंचांकडून आपले उत्पन्न ४,८०० रुपयांच्या आत असल्याचे प्रमाणपत्र आणून सवलती मिळवतात; परंतु शहरात कोणत्याही ऑफिसमध्ये शिपाई म्हणून काम करणाऱ्या माणसाचा पगार ५००।–रु. असेल तर त्याच्या पाल्यास सवलत मिळू शकत नाही. त्यामुळे अशा लोकांमध्ये नैराश्य उत्पन्न होते.

## स्टूडंट्स् अेड फंड

महाविद्यालयाच्या 'स्टूडंट्स् अेड फंडा'मध्ये अत्यंत तोकडी रक्कम असते. त्यातून सर्व गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना मदत दिली जाऊ शकत नाही. त्या फंडामध्ये वाढ झाली तरच जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना फायदा मिळेल. सरकारच्या नवीन अनुदानपद्धतीमुळे महाविद्यालयांजवळ जादा पैसा उपलब्ध होऊ शकत नाही. संस्थाचालकही महाविद्यालयांना निधी देत नाहीत. अशा परिस्थितीत शहरातील व्यापाऱ्यांच्या व उद्योगपतींच्या संघटनांनी पुढे येऊन महाविद्यालयांना आर्थिक मदत द्यावी. अलीकडे बँका काही खेडी दत्तक घेतात व त्यांचा विकास करण्याचा प्रयत्न करतात. त्या धर्तीवरच व्यापाऱ्यांच्या व उद्योगपतींच्या संघटनांनी महाविद्यालयांचा विकास व्हावा म्हणून प्रयत्न करावेत. असे झाल्यास जास्तीत जास्त गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत मिळू शकेल.

## आहेत ती महाविद्यालये सुधारावीत

तालुक्याच्या ठिकाणांची काही महाविद्यालये चांगली आहेत; पण त्यांची संख्या फारच कमी आहे. आता शिक्षणाचा प्रसारही भरपूर झाला आहे. तेव्हा यापुढे तालुक्यांच्या ठिकाणी नवीन महाविद्यालये सुरू न करता, आहेत त्यांची स्थिती सुधारण्याचे प्रयत्न करावेत. ही महाविद्यालये सर्व दृष्टींनी सुसज्ज व स्वयंपूर्ण झाल्यास त्यांच्याविषयी विद्यार्थ्यांमध्ये आकर्षण निर्माण होईल. खेड्यांतून शहरांकडे येणाऱ्या विद्यार्थ्यांचा लोंढा थोपविता येईल. नवीन महाविद्यालये सुरू करून त्यावर लाखो रुपये खर्च करण्यापेक्षा, आहेत ती महाविद्यालये कशी सुधारतील यावर लक्ष केंद्रित करावे. नवीन महाविद्यालये सुरू करण्यापेक्षा शहरातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकरिता सर्व सोयींनी युक्त अशी वसतिगृहे बांधावीत. त्यासाठी लागणारी आर्थिक मदत जिल्हापरिषदा, पंचायतसमित्या व साखरकारखान्यांकडून घ्यावी.

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी अधिक वसतिगृहे

मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या सोयींकडे अधिक लक्ष पुरविले जावे. औरंगाबादसारख्या महत्त्वाच्या शहरात सरकारने मागासवर्गीयांसाठी चालविलेल्या वसतिगृहांतून जास्तीत जास्त ५०० विद्यार्थ्यांची सोय होऊ शकते. शिवाय महाविद्यालयांच्या वसतिगृहांतून आणखी फार तर ५०० मागासवर्गीय विद्यार्थ्यांची सोय होते. म्हणजे एकूण १,००० विद्यार्थ्यांची राहण्याची सोय होते. परंतु औरंगाबादमध्ये विविध शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या ३-४ हजार आहे. त्यामुळे सुमारे दोन हजार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निवासाचा प्रश्न तीव्रतेने भेडसावत असतो. त्यासाठी सरकार व इतर सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांनी पुढे येऊन त्यांची सोय करावी.

## इंग्रजीची अडचण

इंग्रजीसारख्या अवघड मानल्या जाणाऱ्या विषयाच्या प्राध्यापकांनी ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांविषयी अधिक सहानुभूती दाखवावी. वर्गात एखाद्या धड्याचा सारांश मराठीत सांगण्यात काय गैर आहे ? इंग्रजी शिकविण्याच्या ज्या पद्धती आहेत त्यात Translation Method पण आहेच. तेव्हा इंग्रजीच्या तासाला मराठीतून बोलल्यास आपली प्रतिष्ठा कमी होईल असे इंग्रजीच्या प्राध्यापकांनी मानण्याचे काहीच कारण नाही. ज्या पद्धतीचा अवलंब केल्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना विषय समजतो ती पद्धत उत्तम मानावी असे शिक्षणमहाविद्यालयात सांगतातच.

## गुप्त रोगांचे बळी

मुलगा पदवीधर झाल्याबरोबर तो पुढील शिक्षण घेत असतानादेखील त्याचे लग्न करण्याची प्रवृत्ती ग्रामीण विभागातील पालकांमध्ये दिसून येते. ती आता बदलली पाहिजे. गुप्तरोगाने

पछाडलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण सध्या जरी अल्प असले तरी ते, परिस्थिती अशीच घसरत राहिली, तर वाढेलही. अलीकडे पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांभोवती घुटमळणाऱ्या धंदेवाईक स्त्रियांचे प्रमाण वाढत चालले आहे. त्या ठराविक वेळी ठराविक ठिकाणी थांबतात व आपले सावज गाठण्याचे प्रयत्न करतात. त्यांच्या चाळ्यांना बळी पडून विद्यार्थी वाममार्गाला लागतात. तेव्हा पोलीसखात्याने विद्यार्थी-वसतिगृहाभोवती विशिष्ट हेतूने फिरणाऱ्या धंदेवाईक स्त्रियांवर कडक नजर ठेवावी. या बाबतीत बऱ्याच वेळा कुंपणानेच शेत खाल्ल्याचे प्रकार घडतात असे ऐकिवात आहे. हे खरे असेल तर त्यावर उपाययोजनाही करणे कठीण आहे.

■ ■

## ५

# ग्रामीण भागातून शिक्षणासाठी पुण्यास येणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रश्न

शशिकांत शां. देशपांडे

बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयात १९७७-७८ सालापासून 'ग्रामीण विद्यार्थी विकास मंडळाचे' काम माझ्याकडे दिले गेले आहे. ग्रामीण परिसरातून या महाविद्यालयात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्या अडचणी व जे प्रश्न आहेत, त्यांचा विचार करणारे (अनेक अभ्यासेतर मंडळांपैकी) हे एक मंडळ आहे. १९८०–८१ या शैक्षणिक वर्षात प्राचार्य डॉ. चिं. ग. वैद्य यांच्या मार्गदर्शनानुसार व सहकार्याने आम्ही एक नमुना प्रश्नमंजूषा तयार केली. ग्रामीण विद्यार्थ्यांचा साकल्याने अभ्यास करता यावा असा उद्देश असल्याने विद्यार्थ्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, स्तरांच्या संदर्भातील त्यांची माहिती, त्यांच्या आवडी–निवडी–सवयी, त्यांची राहण्याची-जेवणाची सोय, महाविद्यालयात त्यांना येणारा एकूण अनुभव, शैक्षणिक वातावरणाविषयीची त्यांची मते, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीतील महत्त्वाचे दुवे, अभ्यासेतर गोष्टीत त्यांच्याकडून घेतला जाणारा रस व त्याचे स्वरूप, त्यांच्या त्रुटी किंवा मर्यादा, शहरात त्यांना मिळणाऱ्या प्रेरणा, त्यांनी आखलेला त्यांच्या भविष्याचा आराखडा, इत्यादी संबंधीचे ६३ प्रश्न त्यांना विचारले आहेत. 'ग्रामीण विद्यार्थी विकास मंडळा'तील आमच्या ३०–३५ सभासद-विद्यार्थ्यांनी मंजूषा पुण्यातील जवळजवळ सर्व महाविद्यालयांतील काही विद्यार्थ्यांकडून भरून घेण्याचे महत्त्वाचे काम केले आहे. साधारण जानेवारी ८१ साली आमच्या हाती विद्यार्थ्यांनी भरलेल्या १५० प्रश्नमंजूषा आल्या. या १५० प्रश्नमंजूषांपैकी सर्वतोपरी व्यवस्थित भरलेल्या १०० प्रश्नमंजूषांचा अभ्यास करण्याचे ठरविले.

पुण्यामध्ये शिक्षण घेणाऱ्या हजारो ग्रामीण विद्यार्थ्यांपैकी केवळ शंभर विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरून काढलेले निष्कर्ष व केलेला अभ्यास कितपत प्रातिनिधिक ठरणार? हा विचारवंतांच्या मनात येणारा व्यावहारिक प्रश्न असला तरी हा अभ्यास केवळ शंभर विद्यार्थ्यांच्या नमुनापाहणीवर आधारलेला नाही हे या ठिकाणी सांगणे जरूरीचे आहे. आतापर्यंत ग्रामीण विद्यार्थ्यांचे जे प्रश्न अनुभवातून स्पष्ट दिसले त्यांचाही मागोवा घेतलेला आहे. या शोधनिबंधात काढले गेलेले निष्कर्ष नमुनापाहणीच्या अनुषंगाने आहेत, पण त्याचबरोबर या विषयावर झालेले संशोधन व लेखन यांच्या परिशीलनातूनदेखील काही मते मांडलेली आहेत.

या शोधनिबंधात काढलेल्या निष्कर्षांच्या अनुषंगाने जो विचार अखेरीला मांडलेला आहे, त्या विचारात या शोधनिबंधात प्रथमपासून केलेल्या अभ्यासाचा आधार घेतलेला आहे. प्रश्नमंजूषेत जे ६३ प्रश्न विचारलेले आहेत ते सर्व प्रश्न शोधनिबंधात बसविण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रश्नमंजूषेतील प्रश्नांचे पृथक्करण व एकत्रीकरण करण्यासाठी काही विद्यार्थ्यांची खूप मदत झाली. माहितीचे संकलन करणे, कोष्टके तयार करणे, इत्यादी जिकिरीची कामे या विद्यार्थ्यांनी

सांगितल्याप्रमाणे करून आवश्यक ते सहकार्य दिले.

शोधनिबंधाच्या अखेरीला काही महत्वाचे संदर्भ दिलेले आहेत. अनेकांच्या सहकार्यातून आकाराला आलेला हा अभ्यास परिपूर्ण आहे असे जरी म्हणता आले नाही, तरी महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा या शोधनिबंधात झालेली आहे असे म्हणता येईल.

### ग्रामीण विद्यार्थ्यांची जिल्हावार विभागणी

पुणे शहरातील निरनिराळ्या महाविद्यालयात विविध विद्याशाखातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची जिल्हानिहाय विभागणी केल्यास काही महत्वाच्या गोष्टी स्पष्ट रीतीने प्रतीत होतात. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण पाहणीत या अंगाला अनेक दृष्टींनी महत्त्व आहे.

शंभर ग्रामीण विद्यार्थ्यांची जिल्हानिहाय माहिती खाली निर्देश केल्याप्रमाणे आहे.

**कोष्टक क्रमांक – १**

| क्रमांक | जिल्हा किंवा राज्य | विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|
| १ | पुणे | ३५ |
| २ | सातारा | १३ |
| ३ | अहमदनगर | १३ |
| ४ | सोलापूर | १० |
| ५ | नासिक | ०७ |
| ६ | बीड | ०४ |
| ७ | धुळे | ०३ |
| ८ | उस्मानाबाद | ०३ |
| ९ | रत्नागिरी | ०३ |
| १० | सांगली | ०२ |
| ११ | नांदेड | ०२ |
| १२ | जळगाव | २ |
| १३ | बुलढाणा | ०१ |
| १४ | रायगड | ०१ |
| १५ | कर्नाटक | ०१ |

हे विद्यार्थी ज्या विद्याशाखांत अभ्यास करतात त्या विविध विद्याशाखांच्या, विद्यार्थ्यांचा संख्या-संदर्भातील तपशील खालीलप्रमाणे :

**कोष्टक क्रमांक – २**

| क्रमांक | विद्याशाखा | विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|
| १ | शास्त्र | ४१ |
| २ | वाणिज्य | ३२ |
| ३ | मानव्य (Arts) | १२ |
| ४ | विधी | ०८ |
| ५ | वैद्यकीय | ०५ |
| ६ | तांत्रिक पदविका | ०१ |
| ७ | शिक्षण (Education) | ०१ |

पहिल्या कोष्टकावरून असे दिसते की, पुणे शहरात अभ्यासासाठी येणाऱ्या ग्रामीण महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपैकी सामान्यपणे ३५% विद्यार्थी हे पुणे जिल्ह्यातून येतात. त्यात देखील पुण्याच्या ४०–४५ मैलांच्या परिसरातून पुण्याला शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या तूलनेने अधिक आहे. यापैकी जास्तीत जास्त विद्यार्थी जा-ये करणारे (up and down) आहेत. कोणत्याही जिल्हा महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या ग्रामीण विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेतली तर त्याच जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या संख्येचे प्रमाण सामान्यतः तूलनेने अधिक आढळणार, हे गृहीत धरले तरी देखील जळगाव, बुलढाणा, उस्मानाबाद, नांदेड, कर्नाटक इत्यादी दूरस्थ भागातून शिक्षणासाठी येणाऱ्या बहुसंख्य विद्यार्थ्यांनी पुणे हे शिक्षणाचे केंद्र आहे, पुण्याला शिक्षणाची थोर परंपरा आहे, पुणे हे विद्येचे माहेरघर आहे, म्हणून आम्ही यातायात करून राहण्याची कसलीही सोय नसताना येथे आलो असे निःसंदिग्धपणे सांगितलेले दिसते. याचाच अर्थ गैरसोय सोसून शिक्षणासाठी पुण्याला प्राधान्य देणारे विद्यार्थी अन्यथा त्या त्या जिल्ह्यातील महाविद्यालयात गेले असते.

दुसऱ्या कोष्टकावरून स्पष्टपणे असे निदर्शनास येते की, शिक्षणासाठी पुण्यात आलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी ४१% विद्यार्थी शास्त्रशाखेत शिक्षण घेणारे, ३२% विद्यार्थ्यांचा कल वाणिज्यशाखेकडे आणि मग त्या खालोखाल मानव्य, विधी, वैद्यकीय, तांत्रिक पदविका, शिक्षण, या अभ्यासक्रमांकडे किंवा विद्याशाखांकडे दिसतो. याचाच अर्थ शास्त्र व वाणिज्यशाखेच्या पदव्या घेऊन बाहेर पडणाऱ्या पाल्यांना व त्यांच्या पालकांना पुणे शहर महत्त्वाचे वाटते. पुण्याने त्यांच्या अपेक्षा उंचावलेल्या दिसतात.

शंभर विद्यार्थ्यांच्या नमुना-पाहणीवरून एकदम धाडसी किंवा अंतिम निष्कर्ष काढता आले नाहीत तरी, दिवसेंदिवस औद्योगीकरणामुळे झपाट्याने वाढणाऱ्या पुण्यात, भविष्यकाळात ग्रामीण परिसरातून शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांचा लोंढा थोपविता येणार नाही इतके मात्र खरे आहे, असे वाटते. आज सामान्यतः तालुकापातळीवर महाविद्यालयांची स्थापना झालेली असून देखील ही स्थिती आहे. अभियांत्रिकी, शास्त्र, वैद्यकीय, इत्यादी विशिष्ट अभ्यासक्रमांची त्या त्या विभागात सोय नाही असे समजले तरी वाणिज्य व मानव्यशाखेतील शिक्षणासाठी पुण्याला येण्याचे कारण म्हणजे येथील महाविद्यालयातून विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे मार्गदर्शन मिळेल याबद्दल त्यांच्या मनात शंका नसते, हेच होय. या नमुना-पाहणीत वाणिज्यशाखेपेक्षाही शास्त्रशाखेकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक वाटली तरीही प्रत्यक्षात पुणे शहरातील वाणिज्य महाविद्यालये विद्यार्थ्यांच्या संख्येने तुडुंब भरून वाहत आहेत असेच दृश्य दिसते. बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाचेच उदाहरण घ्यायचे झाले तर असे म्हणता येईल की, वाणिज्यशाखेतील पदव्युत्तर अभ्यास (एम. कॉम.) करणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांपैकी शेकडा ८०% विद्यार्थी ग्रामीण भागातून आलेले असतात. पदवीपातळीवर देखील ग्रामीण विद्यार्थी अधिक सापडतील. पुण्यातील शैक्षणिक वातावरण, उत्कृष्ट मार्गदर्शन, इत्यादी कारणांमुळे हे घडत असावे असेही वाटते. म्हणजे नशीब घडविण्यासाठी जसे भारतातील सगळ्या राज्यातील लोक मुंबईकडे धाव घेतात, त्याप्रमाणे निदान पुणे विभागातील विद्यार्थी चांगले शिक्षण मिळावे म्हणून पुण्यास येतात असे मानावे लागते.

ग्रामीण भागातील चांगल्या महाविद्यालयात देखील विद्यार्थी मिळणे आजकाल कठीण होत चाललेले आहे. विषय टिकविण्यासाठी, कॉलेज चालण्यासाठी व प्राध्यापकांच्या नोकऱ्या टिकविण्यासाठी अक्षरशः ज्या ठिकाणी आमिषांची खैरात करून देखील 'सुजाण' विद्यार्थी पाठ

फिरवितात व काहीही करून पुण्यासारख्या शहरी महाविद्यालयात प्रवेश मिळावा म्हणून अनंत उलाढाली करतात, यावरून काय समजायचे ?

उच्च वर्गातील शहरी लोक उच्च शिक्षणासाठी माझा मुलगा इंग्लंड-अमेरिकेला आहे, हे ज्या आनंदमिश्रित अभिमानाने सांगतात, तशीच गोष्ट आजचा ग्रामीण परिसरात राहणारा साधा शेतकरी किंवा नवधनाढ्य वर्ग 'माझा मुलगा पुण्यात शिकतोय.' असे सांगतो ही वस्तुस्थिती आहे. त्यात पुण्यात असणाऱ्या महाविद्यालयांना इतिहास आहे, परंपरा आहे. एस. पी., फर्ग्युसन, वाडिया या नुसत्या नावात जादू आहे. पुण्यात आपल्या पाल्याने शिकायला जाणे म्हणजे गंगेत घोडे न्हाणे असा जिथे समज आहे तिथे अप्रतिहत वाहणारा विद्यार्थ्यांचा लोंढा सावरण्याचा प्रयत्न करणे केवळ अशक्य कोटीतली गोष्ट ठरते. शाहू मंदिर महाविद्यालय, फर्ग्युसन महाविद्यालय, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, वाडिया महाविद्यालय इत्यादी महाविद्यालयांत शिकणाऱ्यात ग्रामीण विद्यार्थ्यांची संख्या पाहिली म्हणजे धक्काच बसतो.

### शिकत असताना अर्थार्जन करणारे विद्यार्थी

शंभर विद्यार्थ्यांच्या नमुना पाहणीत दहा विद्यार्थी अर्थार्जन करून शिकणारे व ९० विद्यार्थी गावाकडून वा अन्य ठिकाणांहून येणाऱ्या पैशावर शिक्षण करणारे आढळले. विशेष सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे नोकरी करून शिकणाऱ्या या दहा मुलांच्या ठिकाणी तूलनेने आत्मविश्वास अधिक जाणवला. भविष्यकाळात नोकरी मिळण्याची त्यांना खात्री वाटते. त्यांच्या अपेक्षा उंचावलेल्या दिसतात. महाविद्यालयाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण निकोप दिसतो. ते महाविद्यालयीन वातावरणाशी एकरूप होतात. पुणे शहराबद्दल व येथील शैक्षणिक वातावरणाबद्दल ते बरे बोलतात. महाविद्यालयातील अभ्यासेतर गोष्टीत अधिक रस घेतात. एकूण ग्रामीण विद्यार्थ्यांच्या पार्श्वभूमीवर त्यांचा उत्साह अधिक वाटतो.

असे असले तरी परिस्थितीमुळे नोकरी करावी लागते; नोकरीचा अभ्यासाला अडथळा होतो; म्हणून तक्रारीचा सूर आळविणारे विद्यार्थीदेखील याच समूहात दिसले.

नव्वद विद्यार्थ्यांपैकी अनेकांना नोकरीची आवश्यकता आहे; पण प्रयत्न करूनही ती मिळत नसल्याचे दुःख आहे, असे सांगितलेले आहे. नोकरी (अर्ध वेळ) करून अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी अनेकांनी पुण्यासारख्या स्पर्धामय वातावरणात पुढे जाण्याची नकळत प्रेरणा मिळते असे उत्तर दिलेले आहे. काही विद्यार्थी घरून पुरेसा पैसा मिळत नाही म्हणून अनिच्छेने नोकरी करावी लागते असे रडगाणे गाऊन आपल्या दैवाला दोष देतात. चार तास नोकरी योजनेमुळे अभ्यासाचा वेळ फुकट जातो असे सात्त्विक संतापाने तक्रार करणारे विद्यार्थी क्वचित दिसत असले तरी अशी संधी मिळण्याची चातकाप्रमाणे वाट पाहणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याच अधिक आहे.

वृत्तपत्रे टाकणे, दूधवाटप करणे, विजेची-टेलिफोनची बिले भरणे, परीक्षेत पर्यवेक्षकांची कामे करणे, घरकाम करणे, अशी किती तरी कामे करून शिक्षण घेणारे व स्वावलंबनातून उद्धार करून घेणारे विद्यार्थी आपले भविष्य अधिक आत्मविश्वासाने घडवू शकतील हे सांगण्यासाठी ज्योतिषाची आवश्यकता नाही. स्वावलंबी बनण्याची एकही संधी त्यांना नाकारली गेली नाही तर हे विद्यार्थी आयुष्यात पुढे जाऊ शकतील (पहा– 'मैत्रीच्या पलीकडे' सप्टेंबर १९७९, स्वावलंबी शिक्षण विशेषांक.).

### आर्थिक स्थितीचा आढावा

ग्रामीण भागातून पुण्यास शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची आर्थिक स्थिती समजून घेण्यासाठी नमुना पाहणीसाठी तयार केलेल्या प्रश्नमंजूषेत वेगवेगळे पाच प्रश्न विद्यार्थ्यांना विचार-

लेले आहेत. या प्रश्नांना विद्यार्थ्यांनी दिलेल्या उत्तरांवरून त्यांची आर्थिक स्थिती हलाखीची आहे असे दिसेल. याच प्रश्नांची दुसरी बाजूही पाहावी लागते. कारण जवळजवळ ७५% शेती असणारे विद्यार्थी उत्पन्नाची खरी माहिती देत नाहीत असे दिसते. बागायत जमीन, पशुपालन, दुग्धव्यवसाय आणि तरी देखील वार्षिक उत्पन्न मात्र ५०० ते १००० रुपये ! हे इतके कमी उत्पन्न का ? याचा शोध घेण्याचा फार प्रयत्न करण्याची जरूरी नाही. इ. बी. सी. शिष्यवृत्त्यांसाठी व इतर सवलतींसाठी हे असावे असे वाटते.

शंभर विद्यार्थ्यांच्या नमुना-पाहणीत ७१ विद्यार्थी स्वतःच्या गावाकडे घर असणारे आहेत. भाड्याच्या घरात राहणारे २९ विद्यार्थी दिसतात. सायकलने महाविद्यालयात येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ३७ आहे. बसने येणारे विद्यार्थी १३ आहेत तर पायी येणारे, महाविद्यालयाचा रस्ता तुडविणारे, ५० विद्यार्थी आहेत. २ एकरांपासून १० एकरांपर्यंत जमीन असणारे ५०% विद्यार्थी दिसतात तर १० एकरांपासून ५० एकरांपर्यन्त जमीनधारक विद्यार्थी २५% दिसतात. १००–१२५ एकरांपर्यन्त जमीन असणारे काही विद्यार्थी आहेत. बागायतदारांच्या मुलांचा भरणादेखील वरील विद्यार्थ्यांत आहे.

आर्थिक अडचणींमुळे महत्त्वाची पुस्तके विकत घेता येत नाहीत असे ६०% विद्यार्थी आढळले. खाजगी लायब्ररी व खाजगी क्लास परवडत नाही असे सांगणारे विद्यार्थीदेखील ८०% आढळले.

प्राथमिक शिक्षकांची मुले, इ. बी. सी. स्कॉलरशिप व इतर आर्थिक मदत मिळणारे विद्यार्थीयांचे प्रमाण अधिक आढळले.

‘आमचे जीवन इतके कष्टप्रद व खडतर आहे की, ते फक्त आम्हीच समजू जाणे. आमचे प्रश्न सोडविण्यासाठी विकास मंडळे स्थापन करावीत.’ अशा अर्थाच्या सूचना अनेक विद्यार्थ्यांनी केलेल्या आहेत.

ग्रामीण विद्यार्थ्यांपैकी काही काही उदाहरणे तर हृदयविदारक अनुभव देणारी आहेत. झोपडपट्टीत राहून शिक्षण घेणारा विद्यार्थी किंवा खिशात एक पैसाही नसताना जिद्दीने येऊन शिक्षण घेणारा विद्यार्थी, पोटात कालवाकालव निर्माण करतो.

### शहरी महाविद्यालयीन जीवनाशी एकरूपता किती ?

आपल्या गावाकडून शिक्षणासाठी पुण्यात आलेले बहुसंख्य विद्यार्थी पुण्याच्या धावपळीच्या जीवनामुळे, झगमगाटाने आणि एकूणच कल्पनेत न बसणाऱ्या गोष्टींमुळे चक्रावून जातात. इतक्या मोठ्या महासागरप्राय नवख्या शहरात त्यांना भेडसावणाऱ्या अनेक समस्यांची ओझी घेऊन चक्रावलेले हे विद्यार्थी मुलांनी भरून वाहणाऱ्या महाकाय दगडी-काँक्रीटच्या महाविद्यालयीन वास्तु-परिसराच्या अनोख्या दर्शनाने बावचळून जातात. त्यांच्या मनातील गोंधळ अधिकच वाढतो. कसाबसा एकवटलेला निश्चय ढासळू पाहतो. आज शहरे व खेडी जवळ आलेली आहेत. सकाळ उजाडली म्हणजे तरुण-प्रौढ लोक मिळेल त्या वाहनाने शहरात धावतात; त्यांना शहराची अपूर्वाई आता वाटत नाही; शहर त्यांच्या ओसरीवर आलेले असते; मनाने ते ‘शहरी’च झालेले असतात; वगैरे सारे विचार ठीक असले तरी महाविद्यालयीन रम्य जीवनाची सुरुवात करणारी ही मुले येथील वातावरणाने जडमूढ होतात इतके मात्र खरे आहे. या त्यांच्या मानसिक-भावनिक बदलाला आर्थिक-कौटुंबिक-सामाजिक असे अनेक थर जबाबदार असतात. शिक्षणक्रमाच्या ४–६ वर्षांच्या कालावधीत पोरकेपणाच्या, उपरेपणाच्या, रितेपणाच्या जाणिवेने वाकलेले हे विद्यार्थी खऱ्या अर्थाने शहरी महाविद्यालयीन जीवनाशी एकरूप होतात का ?

हा चिंतनाचा विषय ठरावा. ते जर एकरूप होत नसतील तर ती चिंतेची बाब ठरावी व त्यावर स्वतंत्र संशोधन व्हावे.

१९७८–७९ या शैक्षणिक वर्षात बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयात 'ग्रामीण विद्यार्थी शहरी महाविद्यालयीन जीवनाशी एकरूप होतो का ?' यावर आम्ही एक परिसंवाद आयोजित केलेला होता. आबासाहेब गरवारे महाविद्यालय, शाहू मंदिर महाविद्यालय, विधि-विद्यालय, वाडिया महाविद्यालय, आदर्श शिक्षण महाविद्यालय, अशा पुण्यातील अनेक महाविद्यालयांचे विद्यार्थी व्यासपीठावर येऊन मोकळेपणाने बोलले. त्यांनी आपल्या अडचणी निर्भीडपणे मांडल्या. त्यांच्या सुख-दुःखसंवादाने शहरी-ग्रामीण हा विसंवाद पुनः एकदा सिद्ध झाला. त्यांच्या मनोगतात नाजूक हळवेपणा व हळुवारपणा नव्हता. कडवट वास्तवाचे भान असणारे हे विद्यार्थी जीव तोडून, मनाच्या तळातून व परखडपणे बोलले. पुनः एकदा आमची सामाजिक मूल्ये, शैक्षणिक धोरणे, शिक्षणातील समान सूत्र, तळागाळाच्या लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी पडणारी पावले व चालणारे प्रयत्न, यांचा पुनर्विचार होणे जरुरीचे आहे असे प्राचार्य-उपप्राचार्य यांनादेखील वाटले असणार. अगदी वेगळा, अंतर्मुख करणारा विचार, मर्यादित कालावधीत आपल्या वकुबाप्रमाणे या विद्यार्थ्यांनी मांडला, हे त्यांना नव्या जाणिवा होत आहेत याचेच प्रतीक मानता येते.

**विदारक वास्तव**

नमुना प्रश्नपत्रिकेच्या अनुषंगाने आणखीही काही गमतीच्या व गंभीर गोष्टी जाणवल्या. प्राचार्यांची आणि आमची वर्षानुवर्षे गाठच पडत नाही. प्राध्यापक हे महापेठेतील व्यापारी वाटतात. जवळिकेची फुंकर घालण्याचा आभास सतत होत राहतो; पण या आभासमय वातावरणातून जेव्हा आम्ही बाहेर येतो तेव्हा बरेच वरवरचे व खोटे वाटते. मायेची हळुवार फुंकर घालणारे प्राचार्य-प्राध्यापक एका सुरक्षित जागेत असतात; आम्ही मात्र असुरक्षित असतो. असुरक्षितांना देण्यात येणारी मदत सुरक्षितांची जागा सुरक्षित राहील इतकीच देण्यात येते. या लक्ष्मणरेषेच्या पलीकडे जाणे इच्छा असूनही त्यांना शक्य होत नाही. त्यामुळे आर्थिक, सामाजिक, भावनिक, कोंडीमुळे स्वास्थ्याचे व पर्यायाने मनाचे संतुलन ढळलेली ही पोरकी मंडळी ससासारखी भित्री वाटतात.

सामाजिक अपंगांचा हा चेहऱ्यावरचा ओशट ओशाळेपणा शिक्षण संपेपर्यंत टिकून असतो कारण त्यांच्यापुढे उबदार कोश नसतो, अशा आशयाचा विचार स. शि. भावे मांडतात. (माणूस : २७ जून १९८१ : उत्तरमीमांसा : ११ : )

शहरी महाविद्यालयीन जीवनाशी एकरूप होणारे नमुना-पाहणीत ८० विद्यार्थी दिसले. एकरूप होता येत नाही असे सांगणारे २० विद्यार्थी आढळले. मुख्यतः आर्थिक परिस्थितीमुळे विद्यार्थी अस्थिर झालेले दिसले. महाविद्यालयात अभ्यासेतर जे उपक्रम चाललेले असतात. त्यात ७०% ग्रामीण विद्यार्थी भागच घेत नाहीत असे दृष्टोत्पत्तीस आलेले आहे. लेखन, वक्तृत्व, इत्यादी गोष्टींत पूर्वकाळातील मार्गदर्शनाच्या अभावी निर्माण झालेल्या न्यूनगंड व भयगंड यांमुळे ती मागे मागे रहातात असे समजता येते. मग ८०% विद्यार्थी शहरी महाविद्यालयीन जीवनाशी कसे काय एकरूप होतात ?

शहरी चटपटीत बोलणारे 'स्मार्ट' विद्यार्थी आणि इंग्लिश माध्यमातील धबधब्याच्या वेगात इंग्लिश बोलणारी मॉड पोरे पाहून हा विद्यार्थी बावरू नये, गोंधळू नये तर आणखी काय व्हावे ? इंद्रधनुष्याला लाजविणाऱ्या रंगांची शरीरावर ओढणी घेणाऱ्या फॅशनेबल विद्यार्थ्यांच्या दिवसा-दिवसाला बदलणाऱ्या वेगळ्या अदा या विद्यार्थ्याला पेलणार तरी कशा ? त्याचे

बेंगरूळ, ओबडधोबड खडकाळ बोलणे, वागण्याच्या पद्धतीतील रासवट राकटपणा, खाली मान घालून भक्तिभावाने अभ्यास ग्रहण करण्यातली त्याची तल्लीनता, चेष्टेचे, कुचेष्टेचे आणि टाँटिंगचे विषय ठरतात. आपली रास्त बाजू आग्रहाने गळी उतरविता न आल्याने त्याला पुढे जाता येत नाही. चुकीची बाजू असतानादेखील आपल्या गोष्टीचे समर्थन करणाऱ्यांना सगळीकडेच न्याय मिळतो; पण इथे सूरच सापडत नाही; जुळावे तरी कसे ? गवयाची एखादी बैठक जमत नाही. वक्त्याला एखाद्या वेळी चांगले बोलता येत नाही. इथे तर सगळ्या मैफलींचा रंग उडून गेलेला !

व्यंजना-लक्षणा व्यापारातून बोलणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत साध्या सरळ पद्धतीने बोलणारी ही मंडळी या वातावरणाशी एकरूप होऊ शकणार नाहीत असे वाटते. तासाला बसणाऱ्या ग्रामीण विद्यार्थ्यांना चिडविणाऱ्या विद्यार्थ्यांकडूनच परीक्षेच्या अवघड खिंडीत गाठून त्यांच्याकडून फायदा करून घेतला जातो अशीही उदाहरणे कमी नसतात.

'आम्ही शहरी महाविद्यालयाशी एकरूप होतो.' असे ८०% विद्यार्थी सांगत असले तरी खऱ्या अर्थाने ते दूरच राहतात. त्यांच्या हेल काढून बोलण्याच्या ग्रामीण भाषेची टर उडते. इंग्रजी बोलता न आल्यामुळे तर कशीबशी एकवटलेली त्यांची उमेद व जिद्द यांची रयाच राहत नाही. या ठिकाणी रेखाटलेले हे चित्र प्रथमदर्शनी नाण्याची एकच बाजू वाटण्याची शक्यता नाकारता येत नाही; पण 'आता मी शहरीच झालो. आता मी कमी पडत नाही.' असे सांगणाऱ्या ग्रामीण विद्यार्थ्याचे हे सांगणे खरे किती याचे आत्मशोधन करून त्यानेच विचार केला तर आभासाच्या वलयात आपण गुरफटलेलो आहोत हे त्याचे त्यालाच कळल्याखेरीज राहणार नाही.

### शहरात राहण्याची सोय

नमुना-पाहणीत असे आढळून आले आहे की, ग्रामीण परिसरातून शिक्षणासाठी पुण्यात येणाऱ्या बहुसंख्य विद्यार्थ्यांना राहण्याच्या जागेचा प्रश्न भेडसावत असतो. स्वतंत्र खोली अभ्यासासाठी मिळणे आजच्या परिस्थितीत नुसते अवघड नसते तर अशक्य असते. त्यामुळे एखाद्या नातेवाइकाची मेहेरबानी, मित्राची खोली, कॉट-बेसिसवर आणि मोठ्या प्रमाणावर वेगवेगळ्या विद्यार्थी-वसतिगृहात राहणारे विद्यार्थी आज पुण्यात दिसतात.

**कोष्टक क्रमांक–३**

| क्रमांक | राहण्याची सोय | विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|
| १ | वसतिगृहे | ८५ |
| २ | कॉट बेसिस | ०२ |
| ३ | नातेवाइकांकडे | ०५ |
| ४ | मित्राची खोली | ०८ |

वेगवेगळ्या संस्थांनी, वर्गांनी चालविलेल्या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी बहुसंख्य (६०) विद्यार्थ्यांनी वसतिगृहाचे फायदे कथन केलेले आहेत. वसतिगृहांचे तोटे सांगणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी असली तरी त्यांच्या अडचणी, तक्रारी, सूचना कमी महत्त्वाच्या ठरत नाहीत.

होस्टेलचे रेक्टर फार मायाळू असतात. ते घरची आठवण होऊ देत नाहीत. अशी मते

ज्याप्रमाणे मांडली गेलेली दिसतात त्याप्रमाणेच निव्वळ दंडाची भाषा बोलणारे आणि क्षुल्लक गोष्टीसाठी कायद्यावर बोट ठेवणारे रेक्टर हे काही जणांना अस्सल हुकूमशहाप्रमाणे वाटतात. वसतिगृह म्हणजे ' Home, away from home. ' पण तरीही घरची आठवण पदोपदी या ठिकाणी होतेच असे सांगणारे विद्यार्थी अधिक आढळतात.

महाविद्यालयातील वसतिगृहे अधिक बंदिस्त पण अधिक सुरक्षित वाटतात असे सांगणारे ग्रामीण विद्यार्थी पुरेसे जागृत झालेले वाटतात. ज्युनियर्सना सिनियर्सकडून रॅगिंगच्या स्वरूपात होणारा त्रास, अनावश्यक बंधनांचा ससेमिरा, मोकळ्या पटांगणांचा अभाव,इत्यादी काही तक्रारी विद्यार्थी धीटपणे मांडतात. आंघोळीला गरम पाणी मिळत नाही. पिण्याचे पाणी खराब असते. उन्हाळ्याच्या दिवसात पंखा मिळत नाही. बल्ब्सपेक्षा ट्यूबची आवश्यकता अधिक. अशा काही ' जागृत सूचनांचा ' प्रश्नपत्रिकेत मुळीच अभाव दिसत नाही.

महाविद्यालयांच्या वसतीगृहात गुणवत्तेनुसारच प्रवेश दिला जातो हा नियम शिथिल व्हावा असे काही विद्यार्थ्यांना वाटते. पुण्यासारख्या मोठ्या व शैक्षणिक केंद्र असणाऱ्या शहरात आपल्या मुलाला शिकायला मिळावे अशी इच्छा असणाऱ्या अनेक पालकांच्या आशेला फुटलेली पालवी जागेच्या भयंकर प्रश्नामुळे कोमेजून जाते. महाविद्यालयात प्रवेश; पण वसतिगृहाने मात्र नाकारले आहे, अशी स्थिती आज दिसते. अभ्यास करण्याच्या उमेदीने शहरात पाऊल ठेवणाऱ्या ग्रामीण विद्यार्थ्यांच्या ज्या अनेक शक्ती शहरात खच्ची होतात, त्याची सुरुवात कदाचित इथूनच होत असणार. त्यांच्या पीछेहाटीला इथूनच सुरुवात होत असणार. माझ्या माहितीचे असे किती तरी विद्यार्थी आहेत की, ज्यांना पुण्यात राहण्यासाठी जागा मिळाल्यावर जो अवर्णनीय स्वर्गीय आनंद झालेला आहे तो नंतर चांगल्या गुणांनी ते पास झाल्यावर देखील त्यांना झालेला नाही !

आज पुण्यात शिक्षण घेणारे ग्रामीण विद्यार्थी, विद्यार्थी साहाय्यक समितीची वसतिगृहे, म. फुले विद्यार्थी वसतिगृह, मराठवाडा विद्यार्थी वसतिगृह व त्या त्या महाविद्यालयांची वसतिगृहे, यांत राहून शिक्षण घेतात. इतर ठिकाणांपेक्षा खर्चाच्या दृष्टीने अत्यंत स्वस्त असणाऱ्या या वसतिगृहप्रवेशासाठी बऱ्या-वाईट मार्गांचा अवलंब होत नसेल असे सांगता येत नाही.

पुण्यातील महाविद्यालयीन वसतिगृहे व इतर वसतिगृहे यांच्यावर अधिक विचार व्हायला हवा असे वाटते. अर्थात अशा वसतिगृहांवर सप्टेंबर १९७९ च्या ' मैत्रीच्या पलीकडे ' या विशेषांकांत बराच विचार झालेलाही दिसतो.

वसतिगृहे म्हणजे सुधारगृहे नाहीत. ती एक जीवनपद्धत आहे. समूहजीवनाच्या वाटचालीत चाकोरीबाहेरच्या अभ्यासाला क्रमिक-अभ्यासापेक्षा अधिक महत्त्व असते. मानसिकदृष्ट्या घरापासून दूर असलेल्या विद्यार्थ्याचे जीवन इथे घडते. त्याचे व्यक्तिमत्त्व घडते. तो एकटा राहू शकत नाही. त्यामुळे स्वयंकेंद्रितता, आत्मकेंद्रितता कमी होते. स्वतंत्र निर्णय घेण्याची शक्ती व पात्रता येथे वाढीला लागते. सुखस्वप्ने जेथे आकार घेतात अशा या ठिकाणाला विद्यार्थ्यांच्या आयुष्यात अपार महत्त्व असते. राहण्याच्या जागेला जीवनात किती महत्त्व असते, हे वेगळे सांगायला नको. म्हणूनच शिकताना सोयीची जागा मिळाली नाही, नव्हे तशी ती मिळतच नाही, म्हणूनच ज्यांची किमान जागेची सोय झालेली आहे असे ग्रामीण विद्यार्थी सुखी-समाधानी आहेत असे समजायला हरकत नाही.

### जेवणाचा प्रश्न

ग्रामीण विद्यार्थ्यांच्या मार्गात जे अनेक अडथळे असतात त्यापैकी जेवणाचा प्रश्न हा फार महत्त्वाचा असतो. नवख्या वातावरणात, मोहाच्या क्षणात, फसण्याची एखाद्या ग्रामीण विद्यार्थ्याच्या बाबतीत जी भीती असते ती त्याच्यापुढे शहरात आल्यापासून जी प्रश्नमालिका सुरू होते

तिच्यामुळे किंचित कमी होते. अशा या प्रश्नांनी त्याला खूपच सतावलेले दिसते. प्रश्न अधिक उत्तरे कमी; अडचणी अधिक, सोयी कमी; झगडा अधिक, प्राप्ती कमी; याच गोष्टी त्याच्या बाबतीत दिसतात.

अन्न हे परब्रह्म असते. ते खाणे नुसतेच उदरभरण नसते. ते एक पवित्र यज्ञकर्म असते. हे ग्रामीण विद्यार्थ्यांना कळत नाही ही खरी शोकांतिका. नमुना प्रश्नपत्रिकेच्या द्वारे या विद्यार्थ्यांचा जेवणाचा प्रश्न कितपत आहे याचा शोध घेतांना खालील कोष्टकात दाखविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

**कोष्टक क्रमांक–४**

| क्रमांक | जेवण कोठून मिळते ? | विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|
| १. | महाविद्यालयाची मेस | ६० |
| २. | घरून (गावाकडून) येणारे डबे | ३५ |
| ३. | घरी जेवण तयार करणे | ०५ |

मेसमधल्या जेवणाबद्दल म्हणजे परब्रह्माबद्दल वाईट बोलणारे विद्यार्थी अधिक आहेत; पण हा विषय गहन-गंभीर जितका आहे त्यापेक्षा तो अधिक आर्थिक व म्हणून जटिल आहे. चाल-कांना वेठीला बांधणे या बाबतीत निव्वळ एकांगीपणा वाटतो.

आज महाविद्यालयातील वसतिगृहासाठी असणाऱ्या बिचाऱ्या रेक्टरची भूमिका 'ना घरका ना घाटका' अशी झालेली आहे. उडदामधील काळे गोरे निवडताना त्याची अक्षरशः दमछाक तर होतेच, पण त्याचे कसबही पणाला लागते. एखाद्या तक्रार निवारण केंद्रातील तक्रार निवारण अधिकाऱ्याची भूमिका त्याच्या वाट्याला येते.

एखादी लहानशी अंधारी खोली घेऊन त्या खोलीत ५–६ विद्यार्थी राहतात व स्वयंपाक करून स्वावलंबनाने जेवणाचा प्रश्न सोडवितात. पण अशी उदाहरणे तूलनेने कमी. कारण स्वतंत्र जागा मिळणे मागे सांगितल्याप्रमाणे आज शहरात अशक्य झालेले आहे. गावाकडून एस. टी. मार्फत दररोज ज्यांचे डबे येतात असे विद्यार्थीही खूपच आढळतात; पण या विद्यार्थ्यांचे प्रश्न वेगळे असून त्यावर स्वतंत्रच विचार होणे जरूरीचे आहे असे वाटते. दि. २३।२।१९८१ रोजी मुंबई दूर-दर्शनने एक आगळा कार्यक्रम सादर केला होता. शहरात राहणाऱ्या ग्रामीण विद्यार्थ्यांच्या व्यथा समजून घेण्याचा उद्देश त्या कार्यक्रमात होता. पुण्यात महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या काही विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या होत्या. नादुरुस्त होणाऱ्या गाड्यांमुळे किंवा मधून मधून (सरकारी मालमत्तेप्रमाणे) गायब होणाऱ्या जेवणाच्या डब्यांमुळे, डब्याअभावी दोन दोन दिवस अक्षरक्षः भुकेने व्याकुळ होणाऱ्या विद्यार्थ्यांची वेदना बोलकी वाटली. डबा आला नाही तर दोघा-तिघांनी एकाचा डबा खाऊन कशी तरी भूक शमवावयाची. मोकळ्या पोटाने महाविद्यालयात व्याख्याने ऐकण्यासाठी जायचे. त्यामुळे जवळजवळ नेहमीच मुलांनी भरलेल्या वर्गात मोकळ्या पोटाच्या या विद्यार्थ्यांचे मन तरी कशाने भरावे ? नुसत्या पोकळ व्याख्यानाने की ज्ञानाच्या अमृताने ? मग हा विद्यार्थी भरारी मारणाऱ्या उत्साही विद्यार्थ्यांच्या थव्यात मरगळून गेलेल्या अवस्थेत वर्गाबाहेर पडतो. मेसच्या बेचव अन्नाच्या कल्पनेने अंगावर काटा येणाऱ्या विद्यार्थ्यांना आपल्या आईच्या रापलेल्या हातांची व तिच्या गोड मीठ-भाकरीची आठवण होते. हा देखील अनुभव अस्वस्थ करणारा. महाविद्यालयातील कॅन्टीन्स मुलांनी भरलेली असताना, शहरातील 'रूपाली,' 'वैशाली,' 'आम्रपाली,' 'रुचिरा' सारखी हॉटेल्स कॉलेजियन्सनी उत्साहित

झालेली असताना, एका ग्रामीण विद्यार्थ्याला ' हॉटेल ' म्हणजे काय हे माहीत नसावे ! सप्टेंबर १९७८ च्या 'मैत्रीच्या पलीकडे' या अंकात पृ. ८ वर सुमन करंदीकर दाखवून देतात की ग्रामीण विद्यार्थ्यांच्या अनेक बिकट प्रश्नांपैकी त्यांच्या जेवणाचा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. कारण चांगल्या अन्नाअभावी त्यांचे भरणपोषण नीट होत नाही व या गोष्टीचा परिणाम त्यांच्या एकूण शैक्षणिक जीवनावर व व्यक्तिमत्त्वावर होतो.

### अभ्यासक्रम व शैक्षणिक वातावरणाविषयींची मते

विविध प्रश्नांना सामोरे जाऊन व परिस्थितीशी मिळते-जुळते करून घेणाऱ्या ग्रामीण विद्यार्थ्यांच्या दृष्टीने बोर्डाने किंवा विद्यापीठाने नेमलेला अभ्यास महत्त्वाचा असतो. पुढे येणाऱ्या अभ्यासाचा पाठपुरावा करण्यासाठी साऱ्या शक्ती एकवटून बसलेला ग्रामीण विद्यार्थी जेव्हा प्रत्यक्ष अभ्यासाला सुरुवात करतो तेव्हा त्याला काय वाटते ? नेमलेल्या अभ्यासक्रमाविषयीची त्याची मते काय आहेत ? अशा दिशेने या विद्यार्थ्यांचा होणारा विचार महत्त्वाचा ठरतो. कोणत्याही गोष्टीच्या मूर्त आविष्कारासाठी पूर्वतयारीची नितांत आवश्यकता असते. काया-वाचा-मने करून बांधीलकी ( Involvement ) स्वीकारावी लागते. इतके करूनही हाती काही लागत नसेल, देण्या-घेण्यातून समाधान मिळत नसेल, कामातून आनंद घेता येत नसेल, संवादच साधला जात नसेल, तर कुठे तरी चूक होते आहे हे लक्षात यावे. साहित्यिक, कलावंत, यंत्रज्ञ, तंत्रज्ञ यांच्या अभ्यासाला एक दिशा, बैठक असते. या अभ्यासाला एक हेतू असतो. विजेचे वलय पूर्ण झाल्यावर प्रकाश पडतो, त्याप्रमाणे जगात आणि जीवनात हरघडी हे घडावे लागते. असे घडले नाही तर असमाधान, अपुरेपणा, विफलता आणि असफलतेच्या अभावात्मक जाणीवेतून निर्माण होणारा नकाराचा सूर, यामुळे सारे जीवनच बदसूर होऊन जाईल. आगगाडी चालवण्यासाठी रूळ समांतर हवेत, इंजीन दोषहीन हवे आणि मुख्य म्हणजे चालणाऱ्या आगगाडीची सारी चाके समान आकाराची व समान अंतरावर हवीत. असे नसेल तर समानतेतल्या कच्च्या दुव्यांमुळे एकूण प्रक्रियेलाच फार मोठा अडथळा झाल्याखेरीज राहात नाही. विवेचनाच्या या पार्श्वभूमीवर ग्रामीण विद्यार्थ्यांची पुण्यातील शैक्षणिक वातावरण, प्राध्यापक-प्राचार्य-विद्यार्थी संबंध, सत्रपद्धती, इत्यादी विषयींची मते विचारात घेणे महत्त्वाचे वाटते. स्वातंत्र्योत्तर काळापासून शिक्षणात एकसारखा बदल होत गेलेला दिसतो. ब्रिटिशांच्या वेळेचे लिबरल एज्युकेशन, इंग्रजी भाषेचे अभ्यासक्रमातील स्थान, कोठारी कमिशनने सुचविलेला अभ्यासक्रम, इत्यादी विषयांची वेगळी चर्चा या अभ्यासात अभिप्रेत नाही. तरी पण शिक्षणापुरते बोलायचे झाले तर संक्रमणकाळ (Transit Period) सारखाच असल्याने चिंता-काळ (Anxiety Period) सारखाच भेडसावीत आहे. शिक्षणक्षेत्रात प्रत्यही प्रयोग होत आहेत; त्यामुळे पिढीच्या पिढी संभ्रमात पडते. हाती काही लागूच नये असेच वातावरण तयार होते. शिक्षणविषयक धोरणातील धरसोडीची वृत्ती सगळ्यांनाच त्रासाची व अडचणी निर्माण करणारी वाटते. शहरी विद्यार्थ्यांच्या मनात ज्या ठिकाणी साशंकता, संभ्रम, अनिश्चितता, इत्यादी भावना शिक्षण घेत असताना जर निर्माण होत असतील तर अनेक गोष्टींना वंचित राहिलेल्या ( being deprived of ) बहुजन समाजातील विद्यार्थ्यांचे सारे कसे सुरळीत चालावे असा विचार एकांगी व दुटप्पीच वाटावा.

### प्राध्यापक-विद्यार्थी संबंध

शंभर विद्यार्थ्यांच्या नमुना-पाहणीत प्राध्यापक-विद्यार्थी संबंधाचा कानोसा घेतला तेव्हा असे आढळले की, प्राध्यापक-विद्यार्थी संबंध चांगले आहेत असे म्हणणारे ५८ विद्यार्थी सापडले; हे संबंध बरे आहेत असे म्हणणारे २५ विद्यार्थी दिसले; हे संबंध मुळीच चांगले नाहीत म्हणणारे

१७ विद्यार्थी आढळले. सत्रपद्धतीबद्दल प्रचंड असंतोषाचा सूर आढळला. सत्रपद्धती चांगली आहे म्हणणारे ३३ विद्यार्थी दिसले, सत्रपद्धतीची अंमलबजावणी अतिशय सदोष पद्धतीने व गलथानपणाने होते असे म्हणणारे १३ विद्यार्थी आहेत, तर ही पद्धत अत्यंत त्रासदायक व जिकिरीची आहे असे म्हणणारे ४१ विद्यार्थी दिसतात. ज्यांच्यापुढे ही पद्धत नाही असे १२ विद्यार्थी आढळले. (११ वी–१२ वी मध्ये शिकणारे); शिक्षण व एकूण वातावरणाविषयी काही मते खालीलप्रमाणे :

१. सारख्या जीवघेण्या परीक्षांच्या काचामुळे अभ्यास करावाच लागतो.
२. शिक्षणाविषयीची जिज्ञासा लोप पावत आहे.
३. सध्याचे शैक्षणिक वातावरण पुरेसे अशैक्षणिक व भ्रष्टाचारी आहे. विद्यार्थ्यांचे गुण परीक्षापद्धतीने वाढतात म्हणून ही विद्यार्थ्यांची गुणात्मक वाढ ठरू शकत नाही.
४. कमी अभ्यास करून अधिक गुण सहज मिळतात.
५. ठोकळेबाजपणा.
६. पुढचा अभ्यासक्रम पाठ, मागचा अभ्यासक्रम विस्मरणाच्या गर्तेत जातो.
७. प्राचार्यांशी दूरान्वयाने संबंध येतो.
८. प्राध्यापकांना देखील विद्यार्थ्यांशी संबंध ठेवता येत नाही.
९. कारकून तयार करणारी पद्धत.
१०. एकूण शिक्षणक्षेत्रातच नीतिमत्तेची जाणीव ऱ्हास पावू लागलेली आहे.
११. अशा गर्दीत व घाईत आत्मविश्वास गमावला जातो.
१२. कोचिंग क्लास व गाईडचे फॅड वाढतेच आहे.
१३. ज्ञानलालसा लोप पावली; निकालाला व मार्कांना महत्त्व.

वर्गातील व्याख्याने समजत नाहीत असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ६०% आहे. ज्येष्ठ विद्यार्थीमित्र व प्राध्यापक यांच्याकडून विषय समजून घेण्याचा क्वचित प्रयत्न होतो. प्राध्यापकांना इच्छा असूनही विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर करता येत नाहीत अशीही काही मते. नवीन प्राध्यापकांना पुरेसा अनुभव नसल्याने ते शिकविण्यात अयशस्वी ठरतात, तर ज्येष्ठ प्राध्यापक काहीवेळा बेफिकिरी दाखवितात, ही मते देखील चिंतनीय वाटतात.

या संदर्भात आणखी एक मुद्दा विचारात घेण्यासारखा आहे. बहुसंख्य ग्रामीण विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रम सहजपणे पेलता येण्यासारखा नाही, हे त्यांना वर्गातील व्याख्याने समजत नाहीत यावरून दिसते; पण हेच विद्यार्थी लिहितात, बोलतात, त्यावरून आवडत्या शाखेकडे त्यांना जायचे असून देखील अनेक अडचणींमुळे आवडत्या विद्याशाखेला त्यांना अखेरचा निरोप द्यावा लागतो. महाविद्यालयात प्रवेश घेणारा हा ग्रामीण विद्यार्थी त्याच्या पहिल्याच पिढीचा प्रतिनिधी असतो. त्याच्यामागे शिक्षणातून मिळणारे संस्कार व पूरक-पोषक वातावरणाचे पाथेय नसल्याने नव्या दिमाखदार वातावरणात, बौद्धिक-वैचारिक कक्षा वाढलेल्या क्षितिजाजवळ जाताना तो खुजा-खुरटा ठरतो. या गोष्टीची त्याला जाणीव होत नाही असेही नाही; पण आता त्याला काहीच करता येणार नसते.

शहरी शैक्षणिक वातावरणाने या विद्यार्थ्यांच्या अपेक्षा उंचावल्या जातात. आपल्याला देखील हे जमले असते असे त्याला वाटत राहते. अद्यापीही जमेल अशी चिकाटी व जिद्द त्याला हे वातावरण देते. त्याच्यातील प्रयत्नशील पुरुष मधूनमधून त्याला मिळणाऱ्या प्रेरणांमुळे (Motivations) प्रस्फुरित होतो; पण शेवटी आपल्याला काही मिळेल का या आशंकेने त्याचा ऊर धपापून जातो. पुस्तकी शिक्षणापेक्षा इतर गोष्टींना आज महत्त्व मिळत आहे हे तो पाहतो. पैसा, मोटारी, समृद्धी, कमालीची उपभोगाची भावना, इत्यादी गोष्टी पाहणारा हा विद्यार्थी

आपल्या हाती घेतलेल्या कार्यापासून व लक्ष्यापासून विचलित होणार नाही असे म्हणता येणार नाही. या ठिकाणी पुन: एकदा कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक परिस्थिती महत्त्वाची ठरते. ही परिस्थितीच त्याच्यावर विजय मिळविते.

### शहरी महाविद्यालयांकडून मिळालेल्या प्रेरणा

पुण्यातील महाविद्यालयांत शिकायला आल्यानंतर अनेक गोष्टी ग्रामीण विद्यार्थ्यांना नव्याने समजलेल्या दिसतात. ८५% विद्यार्थ्यांनी स्पष्टपणे असे सांगितले आहे की, येथील महाविद्यालयांमुळे अनेक गोष्टी आम्हाला समजल्या व प्रेरणा मिळाली. १५% विद्यार्थ्यांनी आम्हाला येथील महाविद्यालयांकडून कसलीही प्रेरणा मिळाली नाही, उलट संकुचित विद्यार्थी, धावपळीचे स्वार्थी जीवन, यामुळे घरी पळून जावेसे वाटते. महागडी वाहने उडविणारे व स्वत:ला शहाणे समजणारे येथील विद्यार्थी प्राध्यापकांना देखील मानत नाहीत, हे पाहून अपेक्षाभंग झाला. अपटूडेट पोषाख करून मित्र-मैत्रिणींबरोबर उंडारणे, पिकनिक-हॉटेलिंग यामध्ये पैशाची धूळधाण करणे यामध्ये त्यांना काहीच वाटत नाही. उलट महाविद्यालयांत याचसाठी ते येत असावेत असे वाटते. वर्गात मुळीच हजर न राहणे, कॉलेजच्या निवडणुकांत पाण्यासारखा पैसा खर्च करणे, महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनात धुमाकूळ घालणे, अशी महद् कार्ये करणारी असंख्य मुले आज अनेक महाविद्यालयांतून दिसतात. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवणे आम्हाला शक्यच नसते. शहरी विद्यार्थ्यांचा ग्रामीण विद्यार्थ्यांकडे पाहण्याचा संकुचित दृष्टिकोण आणि कॉलेजच्या सेवकांची अरेरावी यामुळे आमचा जीव कोंडला जातो असे म्हणणारे विद्यार्थी ‘खेळात व सांस्कृतिक कार्यक्रमात देखील हे विद्यार्थी आम्हाला पुढे येऊ देत नाहीत.’ असे सांगतात. ‘इतक्या सोयी-सवलती, इतके चांगले वातावरण-लहानपणापासून आम्हाला मिळाले असते तर आम्ही देखील प्रगती केली असती.’ असाही सूर काढतात.

इतके जरी असले तरी येथील महाविद्यालयाने आमचे अज्ञान, आमचे अपसमज व आमची पारंपारिक विचारसरणी बदलून टाकण्यास मदत केली असेही विद्यार्थी सांगतात. महाविद्यालयातील एन. एस. एस., ग्रामीण विद्यार्थी विकास मंडळ, अशांसारख्या अभ्यासेतर मंडळांमुळे आमच्या ठिकाणी सेवाभावीवृत्ती तयार झाली; त्याचप्रमाणे आमची अस्मिताही जोपासली गेली. महाविद्यालयीन परिसरातील स्वच्छता, येथील नीटनेटकेपणा, व्यवस्थितपणा, यांचा आमच्या मनावर विलक्षण परिणाम झालेला आहे. एखाद्या विषयाचा अतिसखोल अभ्यास करण्याची प्रेरणा आम्हाला येथेच मिळाली. स्पर्धामय वातावरणात राहिल्यामुळे आयुष्यात पुढे जाण्याची प्रेरणा येथे तयार होते अशी निसंदिग्ध कबुली अनेक विद्यार्थ्यांनी दिलेली आहे. शहरी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांप्रमाणे आपले जीवनमान देखील उंचावलेले असले पाहिजे असा विचार आमच्या मनात देखील येतो. नाटक-सिनेमा पाहिल्याने आपले नित्यनैमित्तिक करण्यास नवा हुरूप येतो असे प्रामाणिकपणे सांगणारे हे विद्यार्थी वृत्तपत्रे, रेडिओ, टी. व्ही., व्याख्याने, चर्चासत्रे यांचा मर्यादित स्वरूपात का होईना पण फायदा घेतात असे दिसते.

शहरी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे कपडयांच्या बाबतीत अनुकरण करणारे ३३% विद्यार्थी नमुना-पाहणीत आढळले. हॉटेल-चैनी यांचे अनुकरण करण्याची इच्छा असते, पण पैसे नसतात असे सांगणारे विद्यार्थीही ३०% दिसले. शहरी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे एकाही बाबतीत अनुकरण करावेसे वाटत नाही असे सांगणारे ३७% विद्यार्थी आढळले. शहरी जीवनाविषयी चांगले, बरे, वाईट, अशी मते असणारे अनुक्रमे ६८%, ११% आणि २१% विद्यार्थी दिसले.

सारांश शहरी जीवनातील डोळे दिपविणाऱ्या झगमगाटाने हे विद्यार्थी दिपून जसे जात नाहीत, त्याप्रमाणे आपल्या परिस्थितीची त्यांना यथार्थतेने जाणीव असल्याने तात्कालिक आकर्षणाला भुलून शहरी महाविद्यालय आदर्श आहे, शहरी जीवन सुखाचे आहे, अशी मते ते मांडित नाहीत.

शहरी महाविद्यालये त्यांना सामावून घेण्याचा जरूर तो सर्व प्रयत्न करतात. महाविद्यालयात अभ्यास करणारे हे विद्यार्थी मुख्यत: 'टीन एज'चे असतात. या संस्कारक्षम कोवळ्या वयात भल्या-बुऱ्या अनुकरणाची सांसर्गिक साथच सुरू होते; पण असे असूनही आपले चांगले-वाईट कोणते याची त्यांच्या मनातील जाण या वातावरणात पुरती गारद होत नाही. चांगले वक्ते, लेखक, गायक, कलावंत, शिक्षक, प्राध्यापक त्यांना मोहात पाडतात. मोकळेपणा, चटपटीतपणा, या वातावरणात वावरणारे हे विद्यार्थी मोहरून जातात; बदलून जातात. 'माझ्या परिसरातील महाविद्यालयाची दयनीय अवस्था मला माहीत असल्याने शिक्षणक्रम पूर्ण झाल्यावर मी प्राध्यापक म्हणून तिकडच्या महाविद्यालयात जाणार !' हा येथील महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा विचार इतर ग्रामीण विद्यार्थ्यांनादेखील प्रेरणादायक वाटावा इतका महत्त्वाचा आहे. शिक्षणासाठी शहरात आल्याने आम्ही नेमके कोठे आहोत याचे ज्ञान आम्हाला होते, हे सांगणारा विद्यार्थी शहरी महाविद्यालयांमुळे आम्हाला खूप काही मिळते असेच अप्रत्यक्षपणे सांगत असतो. तुटपुंज्या ज्ञानाच्या बळावर खेडेगावातील महाविद्यालयात अध्यापनाचे काम करणाऱ्या माणसाला वेळ सहज मारून नेता येते, शहरात मात्र असे नसते. चांगला प्राध्यापक म्हणजे गुणांनी चांगला, असे इथे समीकरण असते. कारण इथले विद्यार्थीदेखील गुरूंचा पराजय करणारे असतात. चांगल्याला चांगले म्हणणारे व वाईटाला वाईट म्हणणारे असतात. ग्रामीण विद्यार्थ्यांनीच मांडलेली ही मते किती महत्त्वाची आहेत, हे सहज लक्षात येते.

'ग्रामीण विद्यार्थी व शहरी विद्यार्थी असा वेगळा विभाग पुणे शहरात मी शिकत असणाऱ्या महाविद्यालयात नाही.' असे विधान करणाऱ्या ग्रामीण विद्यार्थ्यांच्या या विचाराची व्याप्ती सीमित नाही असेच म्हणावे लागते. खरे म्हणजे ग्रामीण विद्यार्थी व शहरी विद्यार्थी असा भेद करण्याची देखील मुळीच आवश्यकता नाही. विद्यार्थी गुणांनीच अखेरीला चांगला-वाईट ठरतो. एका ग्रामीण विद्यार्थ्यानेच व्यक्त केलेल्या याच विचाराचे सूत्र पुढे नेले तर ग्रामीण विद्यार्थ्यांच्या प्रगतीच्या दृष्टीने ते एक सूत्रबद्ध सुभाषित ठरेल व त्यांच्यातील आळस, मरगळ, नष्ट होईल. एकलव्याने ज्या एकाग्रतेने धनुर्विद्येचे शिक्षण स्वत:च घेतले तसे या विद्यार्थ्यांना सहज करता येईल. कोणी कशी प्रेरणा घ्यायची व आपला विकास कसा साधायचा हा ज्याच्या त्याच्या वकूबाचा व दृष्टीचा प्रश्न आहे. सगळे चांगले नसते व सगळे वाईटही नसते, ही जाणीव ठेवून ग्रामीण विद्यार्थ्यांनी वाटचाल केली तर त्यांची एकारू पाहणारी व क्वचित नकारात्मक वळणे घेणारी दृष्टी बदलू शकेल. ज्या पुण्यात आगरकर, महात्मा फुले, माटे कार्यरत राहिले त्याच पुण्यात आपण शिकत आहोत, ही जाणीव देखील त्यांना प्रेरणादायी ठरल्याखेरीज राहाणार नाही.

## ग्रामीण विद्यार्थ्यांच्या मर्यादा

झपाट्याने बदलत जाणाऱ्या खेड्यांचा व ग्रामीण भागाचा तोंडावळा आता न ओळखता येण्याइतका वेगळा दिसत आहे. शिक्षणामुळे सळसळणारा उत्साह शेताशेतातून, घराघरातून वाऱ्याबरोबर डोलत आहे. पूर्वी कोकणात किंवा सातारा, कोल्हापूर, येथील घरटी एक तरी माणूस सैन्यात असायचा, अजूनही ती परंपरा टिकून आहे. आज खेडेगावातल्या प्रत्येक घरातील एक तरी मुलगा शहरात शिक्षणासाठी आहे असे दृश्य दिसते. या गोष्टीचा ग्रामीण परिसरावर परिणाम होणे सहज शक्य वाटते. तसा परिणाम झालेलाही आहे. हरितक्रांतीबरोबरच शिक्षणक्रांतीचे लोण गावागावातून झपाट्याने वाढते आहे. पूर्वीच्या अंधाऱ्या झोपड्या व पडकी घरे आता विजेने न्हाऊन निघालेली आहेत आणि त्यात भर म्हणून की काय शिक्षणाचे वारे घरोघर पसरत आहे. प्रत्येक वर्षी नव्या उत्साहाने विद्यार्थी शहरी महाविद्यालयांकडे आगेकूच करीत आहेत. त्याची केशभूषा, वेषभूषा आमूलाग्र बदलत आहे. चेहऱ्यावर नवी टवटवी येत आहे. हातात

नवीन नवीन पुस्तके दिसत आहेत. पूर्वीचा जड सुस्तावलेला, आळसावलेला हा परिसर जादूची कांडी फिरावी त्याप्रमाणे बदलत आहे. प्रत्यही बदलणार आहे.

पण मागे वेळोवेळी सांगितल्याप्रमाणे अपेक्षा उंचावलेल्या ग्रामीण विद्यार्थ्यांची परिस्थिती शहरी महाविद्यालयांमध्ये कशी होते हे लक्षात येऊन देखील त्या दिशेने फार काही करता येत नाही. महाविद्यालयाच्या वसतिगृहामध्ये राहून शिक्षण पूर्ण करण्याच्या ईर्षेने शहरात आलेल्या विद्यार्थ्यांला स्वत:बद्दल सुरुवातीला वाटणारा फाजील आत्मविश्वास कमी होत जातो. पुढे पुढे आपण प्रत्येक ठिकाणी कमी पडत आहोत हे त्याच्या लक्षात येते. तसं म्हटलं तर त्याच्या व्यक्तिमत्त्वसुधारणेच्या प्रक्रियेतील ही इष्टापत्ती समजायला हरकत नाही. त्याच्या विभागातील महाविद्यालयात शिकताना कदाचित त्याच्या या मर्यादा त्याला समजल्यादेखील नसत्या; पण खरी महत्त्वाची गोष्ट अशी दिसते की, आपल्या मर्यादांची जाण वेगळ्या वातावरणामुळे ज्या वेळी किंवा ज्या क्षणी त्याला येत असते, त्या वेळी या उणीवा किंवा त्रुटी कमी करणारी व्यवस्था असेल तर तो विद्यार्थी त्याला जे हवे ते (मानसिक-बौद्धिक विकास मर्यादित प्रमाणात घडवून) साध्य करू शकेल. पण दुर्दैवाने असे काहीच होत नाही. हीच खरी व्यथा.

बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयात ग्रामीण विद्यार्थी विकास मंडळाचा एक कार्यक्रम एकदा आयोजित करावयाचा होता. त्या निमित्ताने काही लोकांच्या भेटी घेतल्या. सहज बोलता बोलता एक मुद्दा मांडला गेला की, 'ग्रामीण विद्यार्थी विकास मंडळ' असे नाव देण्याऐवजी तुम्ही 'विद्यार्थी विकास मंडळ' असे का म्हणत नाही ? या विचाराने क्षणभर तरी विचारांना खाद्य पुरविले. पुढे महाविद्यालयातील या मंडळात काम करताना असे लक्षात आले की, सुरुवातीला सुरुवातीला ग्रामीण असूनही स्वत:ला 'ग्रामीण' म्हणवून घेण्यात काही विद्यार्थ्यांना लाज वाटत होती हे जरी खरी असले तरी हा विचार त्यानंतर पूर्णपणे झटकला गेला. ग्रामीण म्हणवून घेण्यात लाज कसली ? असा विचार मांडणारे हे विद्यार्थी, 'असे मंडळ असते हे इथे आल्यावर आम्हाला समजले.', असे म्हणतात. आमच्या अडचणी समजून घेणारे एक मंडळ या महाविद्यालयात आहे हे समजल्यावर आमच्या अंगावर मूठभर मांस आले असे सांगणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नेमक्या भावना स्पष्ट होतात. शहरी व ग्रामीण विद्यार्थी असा भेद करण्याचे कारण नाही असे म्हणणाऱ्या काही सुजाण विद्यार्थ्यांच्या मतांचा कानोसा आधीच आपण घेतलेला आहे. सारासार विचार करून या संदर्भात असेच म्हणावे लागते की, 'ग्रामीण' या शब्दातून जो 'गांवढळ' असा अर्थ निघतो तो आम्हाला नको आहे. बाकी खऱ्या अर्थाने आम्हीच भारताचे खरे प्रतिनिधी आहोत. लाज वाटण्याचे कारणच नाही. काही वेळा मात्र 'हा विद्यार्थी ग्रामीण असूनही त्याने दैदीप्यमान यश मिळविले.', असे म्हटले जाते. म्हणजे, आम्हाला खिजविले जाते. आमचा मागासलेपणा उकरून काढला जातो. अशा 'सहानुभूतीची' आम्हाला गरज नाही, असेही सांगणारे विद्यार्थी निघाले.

५३% विद्यार्थ्यांना इंग्रजी नीट बोलता येत नाही याचे वाईट वाटते. ४७% विद्यार्थ्यांना या गोष्टीचे मुळीच वाईट वाटत नाही. परकीय भाषेचे अवास्तव महत्त्व नको, इंग्रजीचे स्तोम कमी व्हायला पाहिजे, असे विद्यार्थी सांगतात. इंग्रजीऐवजी आमची मराठी भाषा सुधारली पाहिजे, अशीही काही मते मांडली गेली. खरी गोष्ट अशी आहे की बहुसंख्य विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणापासून 'इंग्रजी' ची पार्श्वभूमी नसल्याने या वातावरणात आल्यावर, इंग्रजी चांगले बोलता न आल्याने त्यांची पदोपदी होणारी ससेहोलपट त्यांना स्वत:लाच व्यथित करते. इंग्रजीचे आंतरराष्ट्रीय महत्त्व, स्पर्धात्मक परीक्षेत तिला असणारे एकमेव स्थान, यामुळे आपण 'इंग्रजी' च्या अभावाने दूर फेकले जाणार हे जळजळीत दुःख या विद्यार्थ्यांना अधिकच दुःखी करते. म्हणूनच, 'इंग्रजीचे वर्ग उघडावेत' अशा सरसकट सूचना दिलेल्या दिसतात.

'ग्रामीण विद्यार्थी विकास मंडळा 'च्या वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक ग्रामीण विद्यार्थ्यांशी बोलता आले, वेगवेगळे अनुभव घेता आले. मागे एका ठिकाणी सांगितल्याप्रमाणे आपले म्हणणे पटवून देण्याच्या बाबतीत ग्रामीण विद्यार्थी कमी पडतो असे दिसले तरी सभाधीटपणा त्याला नसतो असे नाही. विचार करण्याच्या बाबतीतही तो फार कमी पडतो असेही नाही. पण त्याची भाषा या ठिकाणी शुद्ध नसते, त्याच्या हेल काढून बोलल्या जाणाऱ्या भाषेची या ठिकाणी टर उडविली जाण्याचीच शक्यता असते, त्यामुळे त्याच्या ठिकाणी न्यूनगंड तयार होतो. आपल्याला काय हवे ते त्याला कळते; पण योग्य त्या मार्गाने, योग्य त्या परिणामकारक पद्धतीने मांडण्यात तो अयशस्वी ठरतो. या साऱ्या मर्यादा त्याला मान्य असतात; पण त्याच्याच म्हणण्याप्रमाणे 'ग्रामीण' असणे हा त्याचा दोष ठरूच शकत नाही. स्वतः होऊन प्राचार्य-प्राध्यापकांना आपल्या समस्या सोडवून घेण्यासाठी भेटण्यात देखील विद्यार्थ्यांना लाज वाटते. हळूहळू हा संकोच कमी कमी होत आहे. ही गोष्ट चांगली वाटते. 'शहरी विद्यार्थी ज्याप्रमाणे मोठमोठ्या लोकांच्या ओळखी करून घेतात, त्याप्रमाणे आम्हाला ते जमत नाही. कसली तरी भीती मनात असते.', असे सांगणाऱ्या विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊन त्यांच्यासाठी कार्यक्रम आखता येणे शक्य आहे. या दिशेने प्रयत्न होणे ही काळाची गरज आहे. 'आम्ही शहरी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या तुलनेने मुळीच कमी पडत नाही.', असे काही विद्यार्थ्यांनी ठणकावून सांगितले असले तरी हा विचार नियमाचे स्थान घेऊ शकणार नाही. या विद्यार्थ्यांना आपल्या मर्यादा समजलेल्या असतात हेच खरे.

## व्यक्तिमत्त्व विकास

शहरी महाविद्यालयीन जीवन अनुभवणाऱ्या ग्रामीण विद्यार्थ्यांची साधारण धाटणी जरी आतापर्यंतच्या विवेचनावरून समजली असली तरी आणखी काही गोष्टींच्या आधारे ग्रामीण विद्यार्थ्यांच्या अंतरंगात डोकावण्याचा प्रयत्न नमुना-पाहणीत केलेला आहे. उद्देश हा की, त्याच्या आवडी-निवडी, समज-अपसमज, जीवनाकडे व समाजाकडे पाहण्याची त्याची दृष्टी, तो करीत असलेला त्याच्या भविष्याचा विचार, शहरात आल्यावर त्याला लागलेल्या सवयी, खेडेगावातील चांगल्या सवयी टिकविण्याचा त्याच्याकडून होणारा प्रयत्न, वगैरे गोष्टी समजाव्यात व त्या आधारे, त्याला समजून घेता यावे.

ललित स्वरूपाचे वाचन करणारे ३५% विद्यार्थी, वैचारिक वाङ्मय वाचणारे १०% विद्यार्थी, शास्त्रीय स्वरूपाचे वाचन करणारे ४५% विद्यार्थी, तर कोणत्याच प्रकारच्या वाचनाच्या वाटेला न जाणारे १०% विद्यार्थी आढळले. मुलींच्याबरोबर मैत्री नाही असे सांगणारे खूप विद्यार्थी दिसतात; पण अशी मैत्री आवडेल असे सांगणारे ४०% आहेत. महिन्याला २ पत्रे लिहिणारे ५८% तर २ ते ४ पत्रे लिहिणारे ३६% विद्यार्थी आढळले. मुळीच पत्रे न लिहिणारे विद्यार्थी ६% आहेतच. शिक्षण पूर्ण झाल्यावर नोकरी करू इच्छिणारे ६४ विद्यार्थी आढळले. व्यवसायात गुंतवून घेऊ इच्छिणारे २२ आढळले, इतर गोष्टी करण्याची इच्छा दाखविणारे ७ विद्यार्थी दिसले, तर अनिश्चितता व्यक्त करणारे ७ विद्यार्थी आढळले. देशी व्यायाम नियमित करणारे ५८ विद्यार्थी आहेत, खेळ खेळणारे २०, योगासने करणारे १० व कोणताच व्यायाम करीत नाही असे सांगणारे १२ विद्यार्थी दिसतात. शहरात नाटक-सिनेमा पाहणारे ६३ विद्यार्थी आढळले, तर काहीच न पाहणारे ३७ विद्यार्थी निघाले. आपल्या गावात किंवा परिसरात चालणाऱ्या वेगवेगळ्या उद्योगधंद्यांची माहिती असणारे १८ विद्यार्थी आढळले; पण नमूद करण्यासारखी किंवा ज्या गोष्टीवर विचार होणे अगत्याचे आहे अशी गोष्ट म्हणजे आपल्या गावाकडे, परिसरात चालणाऱ्या उपक्रमांची मुळीच माहिती नसणारे ७२ विद्यार्थी आढळले.

लेखन व वक्तृत्वस्पर्धेत सुरुवातीला भाग घेतला; पण पुढे मात्र कमी पडत गेलो म्हणून

निराश होऊन स्वस्थ बसलो. आपल्याला या गोष्टी जमणार नाहीत असे वाटले. अशा प्रकारचे प्रामाणिक निवेदन करणारे काही विद्यार्थी दिसतात. घरापासून दूर असल्याने विविध अनुभव मिळतात. आपल्या माणसांसाठी, दुसऱ्यांसाठी काही करावे असे वाटत राहते, अशीही उत्तरे लक्षवेधी वाटतात. एका विद्यार्थ्याने आय. ए. एस. पास करण्याची उमेद ठेवलेली आहे तर रत्नागिरीच्या एका तालुक्याच्या ठिकाणी सरकारी नोकरीत ज्याचे वडील शिपाई (Peon) आहेत असा एक मुलगा मी डॉक्टर होणार आहे अशी जिद्द बाळगून आहे.

परिस्थितीला सामोरे जाणारे विद्यार्थी मधूनमधून खचतात,मागे जातात; पण तरीही मूलतःच कष्ट करण्याची प्रवृत्ती असल्याने, आलेल्या संकटांना तोंड देत जीवनाच्या अशाही वाटेवरून भविष्यकालीन सुख-स्वप्नांच्या पूर्तीसाठी ते चालत असतात. चालणाऱ्या वाटसरूंपैकी काही मध्येच आपला प्रवास थांबवितात, काहींच्या पायांतील शक्ती संपून जाते, काहींना प्रवास फार मोठा व त्रासदायक वाटतो. पूर्ण प्रवास करून साफल्याचे समाधान मिळविणारे अगदी हाताच्या बोटांवर मोजण्यासारखे. पण तरीही हे असेच चालणार आहे.

वरील काही गोष्टींवरून असे लक्षात येते की, शहरी महाविद्यालयांत (पुण्यासारख्या) अभ्यास करणारा ग्रामीण विद्यार्थी आपल्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्याचा प्रयत्न करीत असतो. असा प्रयत्न त्याला करावाच लागतो. कारण धावणारे जग तो सतत पाहत असतो. त्याला थांबून चालणारच नसते. फक्त त्याला योग्य ते मार्गदर्शन आवश्यक असते. त्याच्या उंचावणाऱ्या अपेक्षांना खतपाणी मिळणे हीच काळाची गरज वाटते; पण दुर्दैवाने असे होत नाही आणि मग उंचावलेल्या त्याच्या अपेक्षा कमी होतात. प्रा. एस. डी. गोरे यांनी ५०० विद्यार्थ्यांची अशीच-नमुना पाहणी केलेली होती (पाहा–*Some Problems of Rural Students in Poona*–Prof. S. D. Gore). त्यात देखील थोड्याफार फरकाने या विद्यार्थ्यांच्या बाबतीत अशाच गोष्टी त्यांना आढळतात.

### ठळक निष्कर्ष

१. पुणे शहरात शिक्षणासाठी आलेल्या ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये पुणे जिल्ह्यातून आलेले विद्यार्थी सगळ्यात अधिक आहेत.
२. अध्ययन करणाऱ्या ग्रामीण विद्यार्थ्यांत अर्थार्जन करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी.
३. विद्यार्थ्यांना आर्थिक समस्या हा भेडसावणारा प्रश्न वाटतो.
४. हे विद्यार्थी शहरी महाविद्यालयीन जीवनाशी एकरूप होण्याचा प्रयत्न करतात; पण ते पूर्णपणे या वातावरणाशी एकरूप होऊ शकत नाहीत.
५. आवश्यक ते स्वास्थ्य या विद्यार्थ्यांना मिळत नाही. त्यामुळें मानसिक एकलकोंडेपणा त्यांच्यात निर्माण होऊन त्याचा त्यांच्या अभ्यासावर दृश्य परिणाम होतो.
६. इंग्रजी विषय प्रथमपासून कच्चा असल्याने त्यांच्या मनात स्वतःविषयी न्यूनगंडाची भावना निर्माण होते.
७. शहरातील भयंकर स्पर्धामय वातावरणात होणारी फरफट.
८. महाविद्यालयातील अभ्यासेतर मंडळात अभावाने सहभाग.
९. ग्रामीण पार्श्वभूमीमुळे अभ्यासावर पडणाऱ्या अनेक मर्यादा.
१०. शहरात अध्ययन करताना राहण्याचा व जेवणाचा प्रश्न गंभीर.
११. व्यक्तिमत्त्वविकासाची जरुरी.
१२. 'ग्रामीण विद्यार्थी विकास मंडळा'सारख्या मंडळांची विद्यार्थ्यांच्या विशिष्ट प्रश्नांच्या संदर्भात जरुरी आहे.

१३. मर्यादा स्पष्ट होतात.
१४. नकाराचा सूर वैफल्य-भावनेतून निघत असावा.
१५. राज्यातील शिक्षणपद्धतीत सुसूत्रता पण भिन्न शैक्षणिक वातावरणामुळे विद्यार्थी कमी पडतो.
१६. व्यापक शिक्षणरचनेच्या आराखड्यात ग्रामीण भाग हा अनेक गोष्टींना वंचित राहतो. पर्यायाने शहरी जीवनसमूहात या विद्यार्थ्यांना आपले नेमके स्थान कळत नाही.

### या निमित्ताने आणखी थोडे

स्वातंत्र्योत्तर काळाचा विचार शिक्षणाच्या संदर्भात केला म्हणजे तीस वर्षांतील पहिली पंधरा वर्षे व नंतरची पंधरा वर्षे अशा दोन टप्प्यात ग्रामीण भागातून शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची होणारी वाढ लक्षणीय वाटते. गेल्या काही वर्षांपासून ग्रामीण भागातील बागायतदारांच्या (लक्ष्मी) पुत्रांचा महाविद्यालये व त्यांची वसतिगृहे येथील प्रवेश डोळ्यात भरण्याइतका जाणवतो. 'बुलेट' मोटारसायकलवरून भरधाव वेगाने येणारे व जाणारे नव-धनाढ्य वर्गातील हे विद्यार्थी महाविद्यालयांची मोठी डोकेदुखी झालेली आहे, हे एखाद्या साध्या आढाव्यावरूनदेखील सहज लक्षात येईल. नवधनाढ्यवर्गातून शिक्षणासाठी शहरात येणारे हे विद्यार्थी या नमुना-पाहणीत मुळीच अभिप्रेत नाहीत. कारण त्यांचा विचार वेगळ्या दृष्टीने करावा लागेल. तसा विचार केला तर नवधनाढ्य वर्गातून शिक्षणासाठी शहरात येणारा विद्यार्थी सामान्य ग्रामीण विद्यार्थ्यांच्या मार्गातील अडसर होऊ शकेल. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या पुढे शहरात शिक्षण घेताना जे प्रश्न उभे राहतात त्या प्रश्नांत आता नव्याने या नवधनाढ्यवर्गातील विद्यार्थ्यांमुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नांची भर पडणार आहे. पुरेसा दहशतवाद निर्माण करू शकणारे हे 'लक्ष्मीपुत्र' आपल्या भागातून आलेल्या विद्यार्थ्यांचे गट तयार करू शकतात, आपल्या पॅनेलचे 'यु. आर.' निर्माण करू शकतात अर्थातच भरपूर पॉकेटमनी असणाऱ्या व टगेगिरी करणाऱ्या या विद्यार्थ्यांच्या हातातील खेळणे बनण्याची पाळी सामान्य ग्रामीण विद्यार्थ्यांवर येणार. अगोदरच शहरात मोहाचे डोह जागोजागी; ते चुकवता चुकवता खाली मान घालून दिनक्रम संपविणाऱ्या ग्रामीण विद्यार्थ्यांपुढे आज हे एक नवे संकट उभे ठाकले आहे असे वाटते.

पाहता पाहता बदललेले ग्रामीण विद्यार्थी गेल्या काही वर्षांत विचाराला एक नवा विषय ठेवून गेलेले आहेत. पुण्यासारख्या शहराचे बदललेले व प्रत्यही बदलत जाणारे रूप, पराकोटीला जात असणारा भौतिक उपभोग, टोकाला जाणाऱ्या फॅशन्स, इत्यादी किती तरी मोहात व प्रेमात पाडणाऱ्या गोष्टींचे ग्रामीण विद्यार्थ्यांना आकर्षणच वाटू नये असे कोणीही म्हणणार नाही. गंमत अशी की, या आकर्षणांना बळी पडणाऱ्या ग्रामीण विद्यार्थ्यांचे इतके नुकसान होते की, ज्याच्यासाठी इतकी तयारी व इतका अट्टाहास केला ते शिक्षण पुन्हा कधीही त्यांच्या दृष्टिपथावर येत नाही.

प्रेयस व श्रेयस या दोन महत्त्वाच्या जीवनमूल्यांचा विचार करता आज प्रेयसच्या मागे धावण्याची मोठी स्पर्धा सुरू झालेली दिसते. 'ऊस डोंगा, परि रस नोहे डोंगा' म्हणणाऱ्या चोखामेळ्याच्या अभंगवाणीतील वचनाचा आधार घेतला तरी वरच्याच रंगाला भुलणारे जग कमी होणारे नाही असेही दिसते. माणसाची ही भावना आदीमच मानावी लागेल. भले भले येथे फसण्याची शक्यता तेथे बिचाऱ्या ग्रामीण विद्यार्थ्यांचा कसा पाड लागणार ? श्रेयसाचा पाठपुरावा मात्र अभावाने होतो. श्रेयसाचा पाठपुरावा करणारी धारणा (Instinct) सामान्य नसते आणि म्हणूनच सामान्यांकडून श्रेयस उपेक्षित राहते. ज्या गोष्टींचे सहजपणे अनुकरण करण्याचा माणसाचा वकूब असतो त्या ठिकाणी अनुकरणाचीच सद्दी असते, पुन्हा हे अनुकरण केवळ अनुकरणासाठीच असते. ग्रामीण विद्यार्थ्यांपुढे असणारे 'श्रेयस' त्याला दिसत असते; पण दुर्गम वाटते. ज्या पुणे शहरात पदोपदी प्रलोभने असतात, विश्वामित्राची तपस्या भंग होऊ

शकेल असे ' स्वर्गीय ' वातावरण असते, ' डिस्को दिवाने ' सारखे बेहोष करणारे संगीत असते, त्याचप्रमाणे ज्यामुळे जिद्द सारखी वाढतच जावी असे वातावरणही असते. ताड-माड कर्तृत्वाची माणसे याच पुण्यात आहेत; अग्निहोत्राच्या घरात ज्याप्रमाणे सतत वन्ही चेतत असावा अशी ज्ञान-सत्रे सतत येथे चालत असतात; पण ती दिसावी लागतात. अगोदरच्या वयात मनावर झालेल्या अनेक परिणामांमुळे अस्थिर झालेल्या, ग्रामीण विद्यार्थ्यांचे मन या बदलाने अधिकच भिरभिरले जाते. चांगले, जीवनाला वळण लावणारे अगोदर दिसतच नाही आणि दिसल्यावर ते टाळले जाते.

या नमुना-पाहणीच्या निमित्ताने एकमेकांना छेद देणारे,आडवे-उभे किती तरी प्रश्न विद्यार्थ्यांना छळत असतात हे दिसले. परस्पर मतांचा गलबला या पाहणीत आढळून आला. तरी समूह-जीवनाचे ते एक अपरिहार्य अंग आहे असेच मानावे लागते. इंग्रजी बोलता येत नाही, मराठीचे उच्चार नीट करता येत नाहीत, त्यामुळे न्यूनत्वाची भावना विद्यार्थ्यांच्या मनात पोसली जाते. शहरी विद्यार्थी व लोक त्याच्याकडे एक उपरा म्हणून पाहतात हे त्यांचे दुःख फार मोठे असते.

विद्यार्थीजीवनातील काही मूलभूत प्रश्नांचा वेध घेण्याचा प्रयत्न या शोधनिबंधात केलेला आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांपुरते बोलायचे झाल्यास भौगोलिक, प्रादेशिक वातावरणाचा लहानपणा-पासून ज्यांच्यावर परिणाम (Impact) झालेला असतो अशा विद्यार्थ्यांचे पुन्हा विशिष्ट कौटुंबिक जीवन असते. त्यांचे सामाजिक स्थानदेखील भिन्न असते. या अशा अनेक गोष्टींची पुटे त्यांच्या मनावर चढलेली असतात; न पुसले जाणारे संस्कार मनावर कोरलेले असतात. या विशिष्ट परिस्थितीमुळेच त्यांच्या पुढच्या प्रश्नांचे स्वरूप बदलून जाते. वरवर सामान्य वाटणारे प्रश्न त्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अतिगहन तर होतातच, पण त्यांची सारी जीवनशक्ती शोषून घेऊन पुन्हा तेच प्रश्न बांडगुळाप्रमाणे पोसले जातात!

आतापर्यंत या विद्यार्थ्यांनी इतके धावपळीचे व संघर्षमय जीवन पाहिलेलेच नव्हते. त्यांच्या जीवनात आजपर्यंत अंतर्गत किंवा बाह्य संघर्ष फारसा नव्हताच. असा ताण त्यांना कधीच सहन करावा लागलेला नसतो. एकाएकी पुढे होणाऱ्या किंवा पुढ्यात वाढून ठेवल्या जाणाऱ्या या बदलासाठी त्यांची मानसिक तयारी मुळीच न झाल्याने पुढच्या सर्व गोष्टी क्रमाक्रमाने व भराभर होऊ लागतात. त्यांच्या शाळेतील लेखन, वक्तृत्व-स्पर्धा फार तर तालुकापातळीवरच्या. त्या ठिकाणी त्यांनी खूप बक्षिसेही मिळविलेली असतात; पण पुण्यासारख्या मोठ्या शहरात आल्यावर स्पर्धांचा गुणात्मक कस वाढलेला असतो.

पुण्यासारख्या शहरात अभ्यासातील त्याचे पहिले उत्साहाचे दिवस निराशेने वेढले जातात. बऱ्यापैकी आर्थिक स्वास्थ्य, निदान पोटाचा तरी प्रश्न नाही, ग्रामपंचायत, स्कूलबोर्ड, जिल्हा परिषदा येथे घरातील वडीलधाऱ्यांचा राबता, पंचक्रोशीत या विद्यार्थ्याला ओळखणारी सगळीच दुनिया. येथे हतबलता कशी येते हे कळून देखील येत नाही. येथे हा विद्यार्थी कोणीच नसतो. कोणी त्याला ओळखत नाही. येथे ओळख करून देण्यात येते ती रोल-नंबरवरून. वर्गात प्राध्यापक देखील त्याला त्याच्या नावाने, आडनावाने ओळखत नाहीत. त्याचे अस्तित्व कॅटलॉग-मधल्या रोलनंबरात बांधले जाते. कैद्याला ज्याप्रमाणे पुढे पुढे स्वतःच्या नावाचे विस्मरण झालेले असते (कारण तुरुंगात कैदी नंबरावरून ओळखले जातात.) त्याप्रमाणे हा विद्यार्थीदेखील गर्दीतील कोलाहलात स्वतःला हरवून बसतो.

गावाकडच्या वडीलधाऱ्यांचे त्याला योग्य मार्गदर्शन झाले असते तर ही अवस्था त्याच्या वाट्याला आली नसती; पण हे मार्गदर्शन आजच्या परिस्थितीत होणार तरी कसे? शेकडा ७०% विद्यार्थ्यांना घरची आठवण येते हे आपण पाहिले. या आठवणीत आर्थिक प्रश्न महत्त्वाचा मानला तरी स्वतःबद्दलच्या न्यूनत्वभावनेच्या पोटीच मानसिक विकलांगता अधिक वाढून त्याचे पर्यवसान असे होते असे निश्चितपणे वाटते. काही बेडर विद्यार्थ्यांनी आम्ही अशा भावनांना

थारा देत नाही असे जरी सांगितलेले असले तरी हेदेखील वरवरचे आहे; ही मनाची फसवणूक आहे असे वाटल्याशिवाय राहात नाही. एकाकीपणाची रिती पोकळी, न्यूनत्वाची पोखरण, सारखी अस्वस्थ करते. त्यामुळेच हा सर्व अभ्यास व या कटकटी सोडून घरी जावे अशी त्रागा करण्याची वेळ या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनात पदोपदी येते.

आपल्यासाठी धडपड करणारी काही मंडळे व सेवाभावी संस्था आहेत हे समजल्यावर या विद्यार्थ्यांच्या ज्या मानसिक प्रतिक्रिया होतात त्या हृदय हेलावून टाकणाऱ्या असतात; पण पुढे पुढे अशी मंडळेदेखील त्यांना फार काही देऊ शकत नाहीत असे दिसते. चाकोरीबाहेरच्या शिक्षणाला विद्यार्थ्यांच्या जीवनात स्थान असते. पारंपारिक शिक्षणापेक्षा वेगळे शिक्षण त्यांचा विकास घडवू शकते. हे ठीक आहे; पण या विद्यार्थ्यांच्या बाबतीत आता काय करायचे ? हा खरा प्रश्न असतो प्राध्यापक-प्राचार्यांपुढे. त्याच वेळी ‘आता आपले कसे होणार ? ’ हा प्रश्न विद्यार्थ्यांना भेडसावत असतो. आता या ३–४ वर्षांत एकदम सुधारणा घडण्यासाठी काय काय म्हणून करायचे संस्कारवर्ग प्राध्यापकांनी घ्यायचे ? इंग्रजी बोलण्याच्या वर्गाचे आयोजन करायचे की उच्चारवर्ग घ्यायचा ? विद्यार्थ्यांना देखील आता मरायला फुरसत नसते. प्राध्यापकांनी तरी घड्याळाचे काटे उलटे का म्हणून फिरवावयाचे ? विद्यार्थ्यांना वेग गाठण्याचा प्रयत्न करावाच लागतो. नाही वेग गाठता आला तर फरफट आहेच. लोखंड आता थंड झालेले आहे. मातीचा ओलसरपणा कमी झालेला आहे. लोहार आणि कुंभाराने तरी आता काय करावे ? हॅम्लेटला सारखे वाटायचे ही दुनियाच बिघडून गेलेली आहे. या विद्यार्थ्यांच्या बाबतीत हेच घडत असावे. खेडी व शहरे यांच्यातील व्यवस्थेतली भयानक दरी हेच या भयानकतेचे कारण.

शिक्षणपद्धती सगळीकडे समान असली तरी ती राबविणारे हात व मने यांच्यातच मूलभूत फरक आहे. आज ग्रामीण परिसराची चेहरेपट्टी बदलत आहे. अंतरंग होते तसेच आहे. तुटपुंज्या शैक्षणिक सोयी, अभ्यासिका, ग्रंथालये, प्रयोगशाळा यांची लाजिरवाणी अवस्था, शिक्षणक्षेत्रात शिरलेले भयानक राजकारण, त्या ठिकाणी बदलणाऱ्या शैक्षणिक मूल्यांचा अभ्यास करण्यात कमी पडणारी विचारधारा, गुणांविषयी असणारी पुरेशी अनास्था, यामुळेच सर्व अनवस्था प्रसंग. ज्ञानाच्या सीमित कक्षेत फिरणारे विद्यार्थी व त्यांना फिरवून आणणारे शिक्षक ही सारी फुलणाऱ्या मनांची क्रूर थट्टा आहे. अपेक्षा उंचावून ठेवावयाच्या व हाती मात्र काही लागायचे नाही. विहिरीतील बेडकाला क्रमाक्रमाने तळे, नदी, समुद्र दाखविला तर मनासारखे त्याला जगता येईल. ‘पाण्यात पडणारा बुडत नाही’ अशा प्रकारे बोलायला सोपे असणारे तत्त्वज्ञान आज अर्थहीन व झिझवट नाण्याप्रमाणे झालेले दिसेल. शिक्षण ही एक अखंड जीवनपद्धती असायला हवी. तो काही प्रयोग नाही. संक्रमणकाळ व प्रयोगावस्था या काळाचे ‘ प्रॉडक्टस् ’ देखील तसेच निपजणार ! ‘ समान शिक्षण ’ म्हटल्यावर ही समानता प्रत्येक गोष्टीत हवी याचे भान ठेवले गेले असते तर आजचा अनवस्था प्रसंग घडताच ना !

पुण्यातील जवळजवळ सर्वच महाविद्यालये गुणवत्तेच्या संदर्भात दर्जेदार आहेत हे विधान धाडसाचे म्हणता येणार नाही. गुणवत्ता असणारा प्रशिक्षित प्राध्यापक, सगळ्या सोयींनी युक्त असा परिसर, उपक्रमशीलतेला नित्यनूतन धुमारे फुटावेत असे वातावरण, निर्मितीस सुयोग्य व पोषक परिस्थिती, चर्चासत्रे, परिसंवाद, स्टडीसर्कलस्, मेरिट बॅचेस यांची धावपळ, अधिकाधिक फायदा करून घेण्यासाठी अडथळ्यांची शर्यत पार करण्यासाठी धडपडणारा विद्यार्थीवर्ग, या यंत्रणेत व व्यवस्थेत मागे सांगितल्याप्रमाणे ग्रामीण विद्यार्थ्यांची कुचंबणा होते.

दुसरी महत्त्वाची गोष्ट एस. पी., बी. एम. सी. सी., फर्ग्युसन, गरवारे, मॉडर्न या महाविद्यालयात प्रवेश घेणारे बहुसंख्य विद्यार्थी हुषार असतात. काही तर गुणवत्तायादीत (Merit

List) आलेले असतात. या विद्यार्थ्यांजवळ जाणाऱ्या ग्रामीण विद्यार्थ्यांची अवस्था आणखी वाईट होते.

अथांग समुद्रासारखे निळेभोर पाणी आकाशाच्या प्रतिबिंबासह ग्रामीण विद्यार्थ्यांना दिसत असते; पण त्यातील किती थेंब त्यांना पिता येतात ? आयुष्यातील उमेदीची ३–४ वर्षे घालविणाऱ्याला खरोखरच या कालावधीत काय मिळते ? एखादी पदवी, बदललेला चेहरा, थोराड शरीर यापेक्षा अधिक काही नाही. पदव्या घेऊन महाविद्यालयातून प्रत्येक वर्षी ४०-५० बरे ग्रामीण विद्यार्थी बाहेर पडत आहेत असे समजले तर हातात पदव्यांची भेंडोळी घेऊन एकामागोमाग चालणाऱ्या या तांड्याला पाठमोऱ्या अवस्थेत आपण पाहत आहोत अशी कल्पना करून घेऊ. आपल्याकडे पाठ असणाऱ्या व आपल्या पुढून सरळ बाहेर जाणाऱ्या या तांड्यातील विद्यार्थ्यांचे चेहरे जरी आपल्याला दिसले नाहीत तरी त्यांच्या न दिसणाऱ्या चेहऱ्यांवरचे भाव वाचता येतात. या शिक्षणपद्धतीतून इतर मुलांना बरेच काही मिळत असताना या पाठमोऱ्या चालणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पाठीला कणाच नाही असे उगाचच वाटते. कदाचित भास असेल; पण असा भास तरी का व्हावा ?

समाजव्यवस्थेवर व शिक्षणपद्धतीवर तोंडसुख घेणाऱ्या ग्रामीण विद्यार्थ्यांना समजून घेण्यात आपण चूक तर करीत नाही ना असे वाटते. त्यांच्या ठिकाणी नकाराचा सूर क्वचित उमटतो किंवा प्रचलित व्यवस्थेवर ते टीका करतात याला कारण स्वतः हे विद्यार्थी वंचनेचे बळी आहेत. त्यांच्या तोंडून सारखी बाहेर पडणारी टीका त्यांच्या वैफल्यभावनेतून आलेली असते. 'आम्हाला ग्रामीण म्हणवून घेण्यात लाज वाटत नाही.' असे म्हणणारे ग्रामीण विद्यार्थी न्यूनत्वभावनेपोटी आपली अहंता किंवा अहंकार गोंजारतात. इंग्रजी भाषा परकीय असल्याने तिचा फाजील बडेजाव नको असे सांगणाऱ्या विद्यार्थ्यांची मते ग्राह्य धरून इंग्रजी भाषेचे उच्चाटण करणे जसे मूर्खपणाचे ठरेल त्याचप्रमाणे शहरी प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या विषयीची त्यांनी मांडलेली मते सरसकट नियमांचे स्थान घेऊ शकणार नाहीत. कारण ही मते त्यांच्या विशिष्ट क्षुब्ध मनःस्थितीतून बाहेर पडलेली आहेत. अर्थात सगळ्या ठिकाणी मात्र असे म्हणता येणार नाही. शिक्षणातील भ्रष्टाचार, संस्थेतील लाचलुचपत व वशिलेबाजी यांविषयी या विद्यार्थ्यांनी काही ठिकाणी जी कडवट विधाने केलेली आहेत म्हणून परिस्थिती खरोखरच हाताबाहेर गेलेली आहे असेही म्हणता येणार नाही. सारांश विद्यार्थ्यांनी मांडलेली मते व केलेला विचार यांचा पुरेसा आदर करूनही असे म्हणावे लागते की, त्यांनी मांडलेली ही सर्वच मते ग्राह्य धरता येत नाहीत. त्यांच्या न्यूनत्वभावनेतून ही मते जन्माला येतात.

■ ■

**संदर्भ**


(१) **Research Paper**
Some Problems of Rural Students in Poona
Prof.– S. D. Gore

(२) मैत्रीच्या पलीकडे (Beyond Friendship),
जुलै १९७२, जानेवारी १९७८, सप्टेंबर १९७८,
मार्च १९७९, सप्टेंबर १९७९, सप्टेंबर १९८०

(३) माणूस , २७ जून १९८१
उत्तरमीमांसा : ११ : स. शि. भावे
माणूस १ ऑगस्ट १९८१, पृ. ५.

(४) पुण्यात शिकणाऱ्या काही ग्रामीण विद्यार्थ्यांच्या समस्या
दूरदर्शन-मुलाखत : दिनांक २३–२–१९८१, संध्या. ७–४० वा.


—

# ६

# कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचे प्रश्न

श्री. ब. गोगटे

महाराष्ट्रातील कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचा अभ्यास करताना ही कनिष्ठ महाविद्यालये ज्या परिस्थितीत सुरू झाली, ज्या उद्देशाने सुरू झाली व ती सुरू होताना शासनाने आणि शाळा-महाविद्यालये चालविणाऱ्या संस्थांनी जी काळजी घेतली किंवा घेतली नाही, या सर्वांचाच विचार करणे जरूर आहे. त्याचबरोबर शिक्षणाचा जुना आकृतिबंध जाऊन नवा आकृतिबंध सुरू झाला तेव्हा त्याचा सांधा नेमका कसा जुळवला गेला याबद्दलचीही चर्चा होणे जरूर आहे. कारण कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांचे प्रश्न हे प्रामुख्याने या परिस्थितीतून निर्माण झालेले आहेत. या निबंधामध्ये शाळा-महाविद्यालयांतून प्रत्यक्ष गोळा केलेली काही माहिती उद्धृत केलेली आहे. प्रस्तुत लेखकाने १९७६-७७ साली महाराष्ट्रातील कनिष्ठ महाविद्यालयांचा जो अभ्यास केला होता त्या अभ्यासातील, तसेच स्वामी रामानंद तीर्थ संस्था, औरंगाबाद, व इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन, पुणे, या संस्थांच्यावतीने प्रस्तुत लेखकास कनिष्ठ महाविद्यालयांसंबंधी ज्या प्रकारचे मार्गदर्शन करण्याची संधी मिळाली होती त्या प्रकल्पाच्या अहवालातील ही माहिती आहे हे लक्षात ठेवणे जरूर आहे.

## प्रास्ताविक

या खंडप्राय देशाच्या विविध प्रांतांमध्ये शिक्षणाचा आकृतिबंध सारखा असावा अशा सूचना अनेक शैक्षणिक आयोगांनी केलेल्या होत्या. कलकत्ता विद्यापीठ आयोग, राधाकृष्णन् आयोग व मुदलियार आयोग यांच्या शिफारसींमध्ये शालांत पहिल्या परीक्षेपर्यंतचे शिक्षण १० वर्षांचे असावे, शालेय शिक्षण १२ वर्षांचे असावे, प्राथमिक प्रथम पदवी ३ वर्षांची असावी, अशा प्रकारचा उल्लेख आलेला होता. राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने भारतातील सर्व राज्यांत शिक्षणाचा सारखा आकृतिबंध असावा असा पुरस्कार डॉ. संपूर्णानंद समितीने केला होता. शिक्षण आणि राष्ट्रीय विकास या उद्देशाने १९६४–६६ या दरम्यान प्रा. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली जो शिक्षण-आयोग नेमलेला होता त्याने राष्ट्रीय शिक्षणाचा व देशात एकच शैक्षणिक आकृतिबंध असावा या गोष्टीचा, तपशीलवार विचार केला. याच आयोगाने संपूर्ण देशभर १०+२+३ असा शिक्षणाचा आकृतिबंध असावा असा पुरस्कार केला.

या आयोगाच्या शिफारसींमध्ये +२ स्तरांवरील शिक्षणाचा अधिक तपशीलवारपणे व सर्वंकष दृष्टीने विचार करण्यात आला. कोठारी आयोगाने +२ वर्गांबद्दल पुढील कल्पना स्पष्टपणे मांडल्या:

१. हा आकृतिबंध अंमलात आणल्यानंतर एक राष्ट्रीय आकृतिबंध अंमलात येईल.

२. हा आकृतिबंध अंमलात आणल्यानंतर काही शाळांतून उच्च माध्यमिक शिक्षण दिले

जाईल. मात्र यासाठी प्रत्येक शाळा उच्च माध्यमिक होणे आवश्यक नाही.

३. उच्च माध्यमिक शिक्षण माध्यमिक शिक्षणाचा एक भाग व्हावयास पाहिजे.

४. उच्च माध्यमिक स्तरावर मोठ्या प्रमाणावर व्यावसायिक अभ्यासक्रम हवेत. १० वी–नंतर एक ते तीन वर्षांचे व्यावसायिक अभ्यासक्रम आयोजित केल्यास पारंपरिक शिक्षणाकडे जाणाऱ्यांची संख्या कमी होईल.

५. उच्च माध्यमिक आणि उच्च शिक्षणासाठी अध्यापकांची व्यावसायिक तयारी वेगळ्या तऱ्हेने करून घ्यावयास पाहिजे.

६. हा आकृतिबंध अंमलात आणल्यानंतर उच्च शिक्षणासाठी निवडक अशा विद्यार्थ्यांनाच प्रवेश देणे शक्य होईल (सिलेक्टिव्ह ॲडमिशन्स).

७. १० वर्षांच्या सर्वसाधारण शिक्षणानंतर मुलांच्या मनाचा कल आणि त्यांची अभिरुची या निश्चित झालेल्या असतात हे लक्षात घेऊन १० वीनंतर विविधलक्षी अभ्यासक्रम हवेत.

८. पारंपरिक पद्धतीने शास्त्रशाखा निवडायची म्हणजे पदार्थविज्ञान, रसायन, जीवशास्त्र, भूगर्भशास्त्र व गणित असे विषय घ्यावे लागतात. या सर्वच विषयांची प्रत्येक विद्यार्थ्याला जरूरी नसते. तेव्हा मानसशास्त्र, अर्थशास्त्र अशा विषयांची शास्त्रविषयांशी जुळणी करून शास्त्रशाखेकडे विद्यार्थ्यांना विषय घेण्यास परवानगी द्यावी.

९. १९६६ पूर्वी काही राज्यांमध्ये ११ वर्षांचे माध्यमिक शिक्षण होते तर काही राज्यांत ते १२ वर्षांचे होते. ते सरसकट १० वर्षांचे करण्यात यावे.

१९६८ साली भारताच्या लोकसभेने जे राष्ट्रीच शैक्षणिक धोरण मान्य केले त्यामध्ये देश-भर १०+२+३ हा आकृतीबंध स्वीकारावा व +२ स्तरावरील वर्ग शाळेत अथवा महाविद्या-लयामध्ये, जसे सोयीस्कर असतील त्याप्रमाणे ठेवावेत असा पुरस्कार केला.

राज्य-पुनर्रचनेनंतर पूर्वीच्या मध्यप्रदेशातील ८ जिल्हे महाराष्ट्रामध्ये आले. त्याचप्रमाणे हैद्राबाद राज्यातील ५ जिल्हेही महाराष्ट्रात आले. मुंबई राज्यातील महाराष्ट्राचा मूळचा भाग, म्हणजेच पश्चिम महाराष्ट्रातील १३ जिल्हे, विदर्भातील ८ जिल्हे व मराठवाड्यातील ५ जिल्हे या तिन्ही ठिकाणी राज्य-पुनर्रचनेच्या सुमारास शिक्षणाचे वेगवेगळे आकृतिबंध अंमलात होते. मध्यप्रदेशात मुदलियार कमिशनच्या आयोगाप्रमाणे बहुउद्देशीय माध्यमिक शाळा सुरू करण्यात आलेल्या होत्या. मराठवाड्यामध्ये १० वीनंतर पदवीपूर्व वर्ग तसेच उच्च माध्यमिक परीक्षा या दोन्ही गोष्टी अंमलात आलेल्या होत्या. हे सर्व जिल्हे महाराष्ट्राचा एक भाग झाल्यानंतर या तिन्ही ठिकाणी एकच आकृतीबंध असणे क्रमप्राप्त होते. या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने प्रथम प्राथमिक शिक्षणाच्या पातळीवर सर्व ठिकाणी एकच अभ्यासक्रम मुक्रर केला व त्याप्रमाणे कार्यवाही केली. त्याचप्रमाणे १९७२ साली महाराष्ट्राच्या सर्व माध्यमिक शाळांतून ८ वीचा एकच अभ्यासक्रम सुरू झाला. या नव्या अभ्यासक्रमाप्रमाणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची पहिली तुकडी मार्च १९७५ मध्ये १० वीच्या शालांत परीक्षेसाठी बसली. त्याच वेळेस पश्चिम महाराष्ट्रामध्ये जुन्या ११ वीचे विद्यार्थीही होते. त्यामुळे १९७५–७६ साली एकाच वेळेस दोन शालांत परीक्षा झाल्या. एक ११ वीनंतरची, व दुसरी १० वीनंतरची. विदर्भ व मराठवाड्यात मात्र परिस्थिती वेगळी होती. कारण दोन्ही ठिकाणी १० वीनंतरच शालांत परीक्षा अंमलात आलेल्या होत्या.

नवा अभ्यासक्रम सुरू झाल्यानंतर पश्चिम महाराष्ट्रातील महाविद्यालयांतील प्रथम वर्ग (एफ. वाय.) किंवा पदवीपूर्व वर्ग रद्द व्हावयाचे होते. त्यामुळे ११वी – १२वीचे वर्ग महा-विद्यालयास न जोडल्यास महाविद्यालयांची विद्यार्थीसंख्या कमी होईल आणि आपली नोकरी जाईल या दृष्टीने महाविद्यालयीन अध्यापकांनी ११ वी–१२ वीचे वर्ग महाविद्यालयांसच जोडावेत अशी जोरदार मागणी केली. संख्या घटली तर उत्पन्न घटेल या दृष्टीने महाविद्यालये चालविणाऱ्या

संस्था व महाविद्यालयांचे प्राचार्य यांनीही तशीच मागणी केली. असे असले तरी १९७५–७६ साली पश्चिम महाराष्ट्रातील महाविद्यालयांमध्ये जुन्या अभ्यासक्रमाप्रमाणे ११ वी शालांत परीक्षा उत्तीर्ण होणारे विद्यार्थी नेहमीप्रमाणे येणार असल्यामुळे नव्या अभ्यासक्रमाप्रमाणे १० वी शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना तेथे जागा नव्हती. त्यामुळे ७ फेब्रुवारी १९७५ रोजी महाराष्ट्र शासनाने एक फतवा काढून पश्चिम महाराष्ट्रात नवे ११ वीचे वर्ग फक्त शाळातून उघडण्यात येतील असे जाहीर केले. मात्र विदर्भ-मराठवाड्यातील हे वर्ग महाविद्यालयात उघडले जातील हेही जाहीर केले. असे करताना तेथील काही शाळांनाही ११ वी–१२ वीचे वर्ग देण्यात येतील असा निर्णय शासनाने घेतला.

१९७६–७७ साली जुन्या ११वीची परीक्षा बंद झाली. त्यामुळे महाविद्यालयांमध्ये पदवीपूर्व वर्ग (किंवा मुंबई विद्यापीठाच्या कक्षेतील एफ. वाय. चे वर्ग) बंद झाले. त्यामुळे महाविद्यालयांना आता विद्यार्थ्यांची चणचण भासणार हे स्पष्ट झाले. यापूर्वीच नमूद केल्याप्रमाणे महाविद्यालयीन शिक्षक व चालक यांच्या दडपणामुळे महाराष्ट्र शासनाने १९ फेब्रुवारी १९७६ रोजी आदेश काढून प्रामुख्याने खालील गोष्टी जाहीर केल्या :

१. महाराष्ट्र राज्यातील ११वी–१२वीच्या वर्गांना कनिष्ठ महाविद्यालयांचे वर्ग असे संबोधण्यात यावे.

२. ७६–७७ साली १२ वीचे वर्ग केवळ महाविद्यालयांतच उघडण्यात यावेत आणि ११वीचे अतिरिक्त वर्गही महाविद्यालयांत उघडण्यात यावेत.

३. ११ वीच्या वर्गांनंतर सार्वजनिक परीक्षा होणार नाही. ती १२वी नंतर होईल. ११ वीची परीक्षा मुले ज्या शाळा-महाविद्यालयांत शिकत आहेत त्या शाळा-महाविद्यालयांकडूनच घेतली जाईल.

वरील निर्णयाप्रमाणे जून १९७६ पासून ११ वी–१२ वीचे वर्ग प्रामुख्याने महाविद्यालयांत यावयास पाहिजे होते. त्याप्रमाणे बहुतांशी ते आलेही. मात्र अनेक कारणांमुळे ११ वी–१२वीचे वर्ग शाळांतूनही उघडण्याची परवानगी देणे जरूर वाटले. ती कारणे अशी :

१. अनेक तालुक्यांच्या गावी किंवा जेथे बऱ्याच मोठ्या संख्येने मुले १० वीची परीक्षा उत्तीर्ण झालेली होती अशा ठिकाणी महाविद्यालये नव्हती.

२. तालुक्यांच्या गावातील काही महाविद्यालयांमध्ये कला वा वाणिज्य या विद्याशाखा होत्या; पण तेथे शास्त्र-शिक्षणाची सोय नव्हती. मात्र त्या परिसरातील अनेक विद्यार्थ्यांना शास्त्र-शिक्षण घेण्याची इच्छा होती.

३. जिल्ह्यांच्या काही ठिकाणी शाळांमध्ये तांत्रिक शिक्षणाची सोय होती. मात्र अशा ठिकाणी महाविद्यालयांत तांत्रिक शिक्षणाची सोय नव्हती.

४. महाराष्ट्राच्या इतर राज्यांबरोबरच्या सीमेवरील जिल्ह्यांत इंग्रजी, मराठी, याशिवाय गुजराथी, उर्दू, उडिया, कन्नड, तेलगू, इत्यादि भाषा शिकविण्याची आवश्यकता होती. हे विषय शिकविण्याची तेथल्या महाविद्यालयांमध्ये व्यवस्था नव्हती.

५. मुंबईसारख्या ठिकाणी अनेक विद्यार्थी रात्र-शाळेतून १०वीची परीक्षा उत्तीर्ण झाले होते. त्या वेळेस अशा विद्यार्थ्यांसाठी रात्रीचे वर्ग असलेली महाविद्यालये उपलब्ध नव्हती.

वरील सर्व कारणांसाठी ११ वी–१२ वीचे वर्ग महाविद्यालयांतच असावेत असा जरी निर्णय शासनाने घेतलेला असला तरी जवळजवळ २५० माध्यमिक शाळांतून हे वर्ग उघडण्याची परवानगी द्यावी लागली.

१९७७–७८ नंतर शासनाने आणखी एक गंमतीशीर निर्णय घेतला. तो असा की, सामान्यत: ७७–७८ पर्यंत महाविद्यालयांना ११ वी–१२ वीच्या जेवढ्या तुकड्या उघडण्याची परवानगी

देण्यात आलेली होती त्यापेक्षा अधिक तुकड्या उघडू द्यावयाच्या नाहीत. या तुकड्यांपेक्षा अधिक असलेली मुले ११ वी–१२ वीच्या तुकड्या माध्यमिक शाळांतून उघडून तेथे त्यांना प्रवेश द्यावयाचा. या धोरणामुळे शाळेमध्ये अनेक माध्यमिक शाळांना ११वी–१२वीचे वर्ग उघडावे लागले. मात्र ११ वी–१२ वीचे वर्ग शाळेत व महाविद्यालयांत अशा दोन्ही ठिकाणी आहेत म्हटल्यानंतर विद्यार्थ्यांचा कल महाविद्यालयांकडे अधिक असतो. त्याची कारणे अनेक प्रकारची असतात. महाविद्यालयांतून मोकळेपणा मिळेल, गणवेशाची सक्ती असणार नाही, मुलामुलींना मिसळणे अधिक सोयीचे होईल, महाविद्यालयांतील सुविधांचा उपयोग होईल, त्यामुळे तेथे चांगले शिक्षण मिळेल. अशा अनेक कल्पनांनी मुले प्रवेशासाठी प्रथम महाविद्यालयांकडे धाव घेतात व तेथे प्रवेश मिळाला नाही तरच शाळेत प्रवेश घेतात. काही शाळा आपली मुले दुसरीकडे जाऊ नयेत म्हणून त्यांचे शाळा सोडण्याचे दाखले अडवून ठेवतात. हे व असे अनेक प्रश्न शाळा व महाविद्यालये या दोन्ही ठिकाणी ११ वी–१२ वीचे वर्ग उघडण्याने निर्माण झाले.

## अभ्यासपद्धती

हा निबंध दोन-तीन शोध-प्रकल्पांवर आधारित आहे, असा उल्लेख वर आलेला आहेच. या शोध-प्रकल्पात खालील अभ्यासपद्धती अमलात आणलेल्या होत्या.

अ) १९७६–७७ या वर्षी हाती घेतलेल्या प्रकल्पात महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतील कनिष्ठ महाविद्यालयांना त्यांच्याकडे असलेल्या सुविधांबाबत प्रश्नावलीमार्फत माहिती विचारण्यात आली होती. विविध जिल्ह्यांतील ४० कनिष्ठ महाविद्यालये प्रत्यक्ष भेटीसाठी निवडण्यात येऊन त्या ठिकाणच्या १२ वीतील विद्यार्थ्यांकडून प्रश्नावलीच्या आधारे माहिती मिळविण्यात आली होती. विद्यार्थी त्याच गावचे का परगावचे; परगावचे असल्यास कोठे रहातात, कोठे जेवतात; पाठ्यपुस्तके घेतली का, नसल्यास का घेतली नाहीत; त्यांना कोणते विषय अवघड वाटतात, का अवघड वाटतात; ते ग्रंथालयांचा उपयोग कसा करतात, करत नसल्यास का करत नाहीत; कोणत्या अभ्यासेतर कार्यक्रमांत भाग घेतात, घेत नसल्यास कोणत्या प्रकारच्या अडचणी आहेत; शाळेत-महाविद्यालयात व्यावसायिक शिक्षणाची सोय असली तर व्यावसायिक अभ्यासक्रम निवडला असता काय, कोणता अभ्यासक्रम निवडला असता; विशिष्ट विद्याशाखा का निवडली; यासारखे प्रश्न विचारून माहिती मिळविण्यात आली.

प्राध्यापकांनाही एक प्रश्नावली देण्यात आली व प्राध्यापक-प्राचार्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या.

वरील दोन साधनांव्यतिरिक्त श्री. गो. ह. नाफडे यांनी तयार केलेली बुद्धिमत्तेची चाचणी व प्रस्तुत लेखकाने अध्यापक-मित्रांच्या सहाय्याने तयार केलेली प्रगती-चाचणी अशा दोन चाचण्या विद्यार्थ्यांना देण्यात आल्या.

आ) १९७९–८० या वर्षी मराठवाड्यात जो प्रकल्प घेतला त्यात कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य, सर्व अध्यापक, निवडक संस्थाचालक, पालक आणि विद्यार्थी यांना प्रश्नावल्या देण्यात आल्या. या सर्वांसाठी वेगवेगळ्या प्रश्नावल्या मुद्दाम तयार करण्यात आल्या होत्या. प्रश्नावल्यांबरोबर प्राचार्य-प्राध्यापकांच्या सभांतून व मुलाखतीद्वारे माहिती मिळविण्यात आली होती. या अभ्यासात सुमारे ६३ प्राचार्य, ६४६ अध्यापक, ४२२ पालक, ११६ संस्थाचालक व ३,५९७ विद्यार्थी यांना प्रश्नावल्या देऊन माहिती मिळविण्यात आली.

इ) १९८०–८१ या वर्षी रायगड जिल्ह्यात एक प्रकल्प हाती घेण्यात आला होता. १९७८ मार्चमध्ये झालेल्या १० वी शालांत परीक्षेत जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले त्यांनी नंतर काय केले,

त्यातून पुढील शिक्षणाच्या दृष्टीने किती मुलांची गळती झाली, का झाली, याचा अभ्यास करण्यात आला. १९७८ मार्चमध्ये २,०६७ विद्यार्थी १० वी उत्तीर्ण झाले. त्यातील ७२२ विद्यार्थी ११वी-१२ वीत गेले नाहीत. या ७२२ विद्यार्थ्यांपैकी ५०४ विद्यार्थ्यांशी पत्रद्वारे व शाळेतर्फे संपर्क साधण्यात आला. ( इतरांच्या बाबतीत त्यांनी वा शाळेने प्रतिसाद दिला नाही.) व ८५ विद्यार्थ्यांच्या बाबतीत संशोधक सहाय्यकांना त्यांच्या घरी पाठवून संपर्क साधण्यात आला. त्यांच्या कुटुंबियांची मुलाखत घेऊन माहिती मिळविण्यात आली.

## निष्कर्ष

जुना अभ्यासक्रम बदलून नवा अभ्यासक्रम अमलात आला त्याची काही पार्श्वभूमी प्रास्ताविकात वर्णन केली आहे. नव्या अभ्यासक्रमामुळे आणि तो ज्या पद्धतीने अमलात आला त्यामुळे विद्यार्थ्यांचे जे प्रश्न निर्माण झाले ते थोडक्यात पाहू.

१. कोणत्या प्रकारचे विद्यार्थी, कोणत्या प्रकारच्या विद्याशाखेतून शिक्षण घेतात याचा ७६–७७ च्या अभ्यासात आढावा घेण्यात आला होता. त्या वेळेस सामान्यतः असे दिसून आले होते की, कलाशाखेतील विद्यार्थ्यांचा सरासरी बुद्धिगुणांक १००च्या आसपास होता. शास्त्रशाखेतील विद्यार्थ्यांचा बुद्धिगुणांक ११५ च्या आसपास होता तर वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा बुद्धिगुणांक १०५चे आसपास होता. या विद्यार्थ्यांचे १०वीचे गुण कसे होते याचा अभ्यास केला असता ते अनुक्रमे सरासरीने ४३ टक्के, ५८ टक्के आणि ५३ टक्के होते.

या सर्वच अभ्यासक्रमांना ११वी–१२वी असे म्हटले जात असल्याकारणाने जे विषय दोन्ही अभ्यासक्रमांमध्ये समाईक असतात त्या विषयांच्या बाबतीत कमी क्षमतेच्या विद्यार्थ्यांवर अन्याय होत असला पाहिजे. त्यामुळे विद्यार्थ्यांना असे काही विषय अवघड वाटतात असे शिक्षकांचे म्हणणे आहे. इंग्रजी, मराठी, हिंदी यांसारख्या भाषा, अर्थशास्त्र अगर मानसशास्त्र,वाणिज्य विद्याशाखेमधील काही विषय, गणित हा सर्वच विद्याशाखांना समाईक असलेला विषय, या विषयांच्या बाबतीत निश्चितपणे असे घडते.

२. १० वीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थी नेमके काय करतात याचा अभ्यास एका प्रकल्पामध्ये करण्यात आलेला होता. रायगड जिल्ह्यामध्ये असे आढळून आले आहे की, मार्च १९७८ च्या १० वी शालांत परीक्षेमध्ये जे २,०६७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले त्यातील १,३४५ म्हणजे ६५.७ टक्के विद्यार्थ्यांनी ११वी–१२वीत प्रवेश घेतला. याचाच अर्थ असा की, ७२२ विद्यार्थ्यांनी म्हणजे ३४.९३ टक्के विद्यार्थ्यांनी या शिक्षणासाठी पुढे नाव नोंदविले नाही. या ७२२ पैकी ५०४ विद्यार्थ्यांची व्यक्तिगत माहिती मिळवली असता असे दिसून आले आहे की, यापैकी १३७ विद्यार्थ्यांनी डी. एड्., पॉलिटेक्निक व इतर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला होता. १५७ विद्यार्थ्यांनी पुढील शिक्षण घेणे शक्य नाही म्हणून नोकरी पत्करली होती. १७३ विद्यार्थी काहीही न करता घरी बसून होते. २३ मुलींची लग्ने झाली होती तर १४ मुले इतर काही फुटकळ उद्योग करीत होती.

विद्यार्थी पुढे का शिकू शकले नाहीत याची चौकशी केली असता १५० पैकी १४० विद्यार्थ्यांनी प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे पुढे शिकू शकलो नाही असे सांगितले.

जुन्या ११वी–१२वीचा विचार करता असे आढळून येते की, पूर्वी जेवढ्या शाळांमध्ये जुन्या ११ वीचे वर्ग शिकवले जात होते त्यांपैकी किती तरी कमी संख्येने असलेल्या शाळा-महाविद्यालयांतून नव्या ११ वी–१२ वीचे वर्ग शिकविले जातात. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा विचार करता उच्च शिक्षणाची संधी कमी झालेली आहे असे म्हणावे लागते.

३. ७६-७७ मध्ये जो अभ्यास करण्यात आला होता त्या वेळेस विद्यार्थ्यांनी कोणाच्या पसंतीने विद्याशाखा निवडली असा प्रश्न विचारण्यात आलेला होता. त्या वेळेस सामान्यत: पुढील माहिती मिळाली. ३,५०० विद्यार्थ्यांपैकी ९० टक्के विद्यार्थ्यांनी स्वत:च्या पसंतीने विद्याशाखा निवडलो होती. ४ टक्के विद्यार्थ्यांनी वडिलांच्या पसंतोने, तर अर्धा टक्का विद्यार्थ्यांनी आईच्या पसंतीने विद्याशाखा निवडली होती. दीड टक्का विद्यार्थ्यांनी मित्र, शिक्षक, अशांच्या पसंतीने विद्याशाखा निवडली होती. उरलेल्या सर्वांनी महाविद्यालयात किंवा शाळेत दुसरी विद्याशाखा शिकविण्याची सोयच नव्हती म्हणून ही विद्याशाखा निवडली होती. अशा विद्यार्थ्यांची संख्या साहित्य विद्याशाखेकडे सर्वाधिक म्हणजे ११ टक्के होती. थोडक्यात या विद्यार्थ्यांना मारून-मुटकून या विद्याशाखेत अभ्यास करावा लागत होता.

४. पुरेशा वसतिगृहांचा प्रश्न हा महाविद्यालयांमध्ये नेहमीचाच प्रश्न आहे. ११ वी–१२ वीच्या मुलांना तो विशेष तऱ्हेने भेडसावतो. ग्रामीण भागातील बहुसंख्य विद्यार्थ्यांना १० वी-नंतर पुढील शिक्षणासाठी शहर गावातच जावे लागते; तेथे त्यांची रहाण्याची, तसेच जेवण्याचीही अत्यंत गैरसोय होते. खाणावळीत जेवणे परवडत नाही, महाविद्यालयात योग्य खर्चात जेवण्याची सोय नसते, त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना हाताने स्वयंपाक करून जेवावे लागते. जेवणाचे बाबतीत विद्यार्थ्यांचे खूपच हाल होतात.

एका अभ्यासात असे दिसून आले की, प्रातिनिधिक ३,५२४ विद्यार्थ्यांपैकी १,६४५ स्थानिक तर १,८७९ परगावचे होते. या १,८७९ विद्यार्थ्यांपैकी ४०५ वसतिगृहात, ३७८ नातेवाइकांकडे तर १,०९६ खोली घेऊन रहाणारे होते. या विद्यार्थ्यांची जेवणाची व्यवस्था पुढीलप्रमाणे होती: ४०७ नातेवाइकांकडे, ३७६ वसतिगृहात, ६७ खाणावळीत, ८२० स्वत: हाताने करून आणि २०९ घरून डबा मागवून.

५. विद्यार्थ्यांनी १० वीनंतर कोणती विद्याशाखा घ्यावी अथवा कोणता व्यावसायिक अभ्यासक्रम घ्यावा याविषयी विद्यार्थ्यांना अजिबात माहिती मिळत नाही असे दिसून आले. रायगड जिल्ह्यातील प्रकल्पात ज्या विद्यार्थ्यांशी त्यांचे घरी जाऊन संपर्क साधण्यात आला त्यांनी अशी जोरदार तक्रार केली की, प्रवेशाच्या अडचणींमुळे त्यांना वेगवेगळ्या विद्याशाखा किंवा व्यावसायिक अभ्यासक्रमात जाता येत नाही ही गोष्ट खरीच आहे; पण त्यातून खरोखर कोणती विद्याशाखा निवडावी व कोणत्या विद्याशाखेमध्ये पुढे काय करता येईल याबद्दलची सामान्य माहितीही विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना नसते. खरे म्हणजे ही माहिती इयत्ता ९ वी, १० वी मध्ये शाळेतूनच द्यावयास पाहिजे. अशी कोणतीही माहिती देण्याचा पद्धतशीर उपक्रम शाळांमध्ये उपलब्ध नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांची व त्यांच्या पालकांची खूपच अडचण होते.

६. महाविद्यालयांना विद्यार्थी कमी पडू लागल्यावर आपल्या महाविद्यालयात वा शाळेत विद्यार्थ्यांना आकर्षित करण्याची एक नवीच चढाओढ सुरू झाली होती आणि आपण विद्यार्थ्यांना जेवढ्या अधिक सवलती देऊ तेवढे अधिक विद्यार्थी आपल्याकडे आकर्षित होतील या भावनेने अनेक सवलती विद्यार्थ्यांना देण्यात येऊ लागलेल्या होत्या. त्यामध्ये पाठ्यपुस्तके देणे ही एक सवलत होती.

दुसरी एक गोष्ट अशी झाली होती की, कागदाच्या व छपाईच्या वाढत्या किंमतींमुळे पाठ्य-पुस्तकांच्या किंमती वाढल्या होत्या. याचा एक परिणाम असा झाला की, मुले पाठ्यपुस्तके घेईनाशी झाली. काही मुलांचे म्हणणे असे की, वर्गात शिक्षक टिपणे उतरवून देतात व ती पाठ्य-पुस्तकातीलच देतात, तर पुस्तके कशाकरता विकत घ्यावयाची?

याबाबतीत १९७६–७७ च्या प्रकल्पामध्ये असे दिसून आले होते की, ३,२७९ विद्यार्थ्यांपैकी

१,८२७ म्हणजे ५५.७२ टक्के विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तके विकत घेतलेली नव्हती. ज्यांनी ती विकत घेतली नव्हती त्यापैकी ७० टक्के विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तके घेण्याइतकी आर्थिक परिस्थिती नाही असे सांगितले, २० टक्के विद्यार्थ्यांनी पुस्तके उपलब्ध नाहीत असे सांगितले, तर १० टक्के विद्यार्थ्यांनी पुस्तके घेण्याची जरूरच भासली नाही अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. मराठवाड्यातील अभ्यासात असे आढळून आले की, ३,२७१ विद्यार्थ्यांपैकी २,४९४ विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तके खरेदी केली नव्हती. ती का खरेदी केली नाहीत असे विचारले असता ८६९ विद्यार्थ्यांना ती विकत घेणे परवडले नव्हते, ३७३ विद्यार्थ्यांना ती गावात मिळाली नाहीत व २८९ विद्यार्थ्यांना ती घेणे जरूर वाटले नाही अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या. यात सामान्यतः असे दिसले की, ७६ टक्के विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तके विकत घेतलेली नव्हती.

७. ११वी–१२वीच्या विद्यार्थ्यांना कोणते अध्यापन आवडते, कोणते अध्यापन आवडत नाही, याबद्दल विचारले असता विद्यार्थ्यांनी पुढीलप्रमाणे प्रतिक्रिया व्यक्त केल्या :

३,५०० विद्यार्थ्यांपैकी २,०३२ विद्यार्थ्यांनी शिक्षक स्पष्टीकरण देतात, १,१६४ विद्यार्थ्यांनी शिक्षक टिपणे देतात, ८२० विद्यार्थ्यांनी शिक्षक विचारांना चालना देतात, ७०८ विद्यार्थ्यांनी त्या विशिष्ट शिक्षकांचे वेळेस वर्गातील वातावरण मोकळेपणाचे असते व ३६० विद्यार्थ्यांनी शिक्षक परीक्षेस आवश्यक ते शिकवतात, अशी कारणे अध्यापन का चांगले याबद्दल दिली.

विद्यार्थ्यांना शिकवलेले का समजत नाही या बाबतीत ३,५०० विद्यार्थ्यांपैकी १,६७३ विद्यार्थ्यांनी विषय अवघड वाटतो, ९४२ विद्यार्थ्यांनी शिकवलेले समजत नाही, ६५६ विद्यार्थ्यांनी भाषा अवघड वाटते, ४८१ विद्यार्थ्यांनी वर्गात गोंधळ असतो, अशी उत्तरे दिली, तर सुमारे १०० विद्यार्थ्यांनी विद्यार्थी वा शिक्षक अनियमित असतात व वर्गातील शिकवणे अभ्यासक्रमास धरून नसते, असे कारण सांगितले.

८. नवा अभ्यासक्रम हा पूर्वीच्या अभ्यासक्रमाशी तुलना करता सुधारित अभ्यासक्रम आहे. १० वीच्या परीक्षेस आलेला गणित, शास्त्र व इतर विषयांचा दर्जा पूर्वीच्या ११ वीच्यापेक्षा थोडा-फार अधिकच आहे. त्यामुळे नव्या ११ वी १२ वीचा दर्जा त्यापेक्षा किती तरी अधिक आहे. ग्रामीण भागातील प्राध्यापक व प्राचार्य यांनी याबाबत निखालसपणे असे सांगितले आहे की अनेक विद्यार्थ्यांना हा अभ्यासक्रम अवघड वाटतो. त्यामुळे त्यांना अपयश येते किंवा वर्गात शिकवलेले कळत नाही व त्यामुळे अशी मुले वर्गामध्ये अनुपस्थित असतात. परीक्षेत उत्तीर्ण व्हावयाचे म्हणजे एक तर त्यांना शिकवण्या लावाव्या लागतात किंवा गैरप्रकारांचा उपयोग करून परीक्षेत उत्तीर्ण होण्याची खटपट करावी लागते.

ग्रामीण भागातील ६३ प्रातिनिधिक प्राचार्यांना परीक्षांचे निकाल वाईट का लागतात याचे कारण विचारले असता त्यांतील ४० प्राचार्यांनी अभ्यासक्रम अवघड आहे अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

९. नव्या अभ्यासक्रमास अनुसरून शाळा-महाविद्यालयांमधील ग्रंथालये, प्रयोगशाळा, इत्यादी प्रगत असावयास पाहिजे होत्या. ११ वीचे वर्ग उघडले तेव्हा शासनाने शाळांना थोडी-फार मदत केली. मात्र १२ वीसाठी मदत केली नाही. महाविद्यालयांना कोणतीच मदत केली नाही. त्यामुळे असे घडले की, ग्रामीण भागातील सर्वच महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांची ग्रंथालयाबद्दल ओरड राहिली व ज्या शाळांमधून शास्त्रविषय शिकविण्यात येत, तेथील शास्त्रशाखेबद्दलही विद्यार्थ्यांची ओरड कायम राहिली.

एका अभ्यासात असे दिसून आले की, ग्रामीण भागातील शाळांतून ११ वी–१२ वीच्या विद्यार्थ्यांच्या ग्रंथालयात सरासरीने केवळ १२८ पुस्तके असतात. तसेच केवळ ५६ टक्के शाळांतून ग्रंथालयात अभ्यासासाठी वेगळी जागा असते. ५५ टक्के शाळांतून रात्र-अभ्यासिका आहेत.

४८ टक्के शाळांतून मुलांना पुस्तके उसनी देण्याची सोय आहे. ग्रामीण महाविद्यालयातील हे प्रमाण अनुक्रमे ७९ टक्के (वेगळी जागा), ७४ टक्के (रात्र - अभ्यासिका) आणि ८२ टक्के (उसनी पुस्तके देणे) असे होते.

१०. प्रास्ताविकात नमूद केलेच आहे की, हा अभ्यासक्रम शासनाने शाळेत आणि महाविद्यालयात अशा दोन्ही ठिकाणी चालविण्यास परवानगी दिली. त्यामुळे शहरात असे घडले की, हुशार मुले महाविद्यालयात गेली तर सामान्य मुले शाळेमध्ये गेली. त्यामुळे शाळेत जावे लागले म्हणून मुले नाखूष आणि शिक्षकही दुय्यम दर्जाची मुले आपल्याकडे आली म्हणून नाखूष. त्यामुळे या दोघांच्या दृष्टीने विषम समायोजनाचे प्रश्न निर्माण झाले. खेड्यांतील शाळांमध्ये जवळ जवळ तसाच प्रश्न निर्माण झाला. आपण दुसरीकडे जाऊ शकलो नाही म्हणून येथे आहोत या कल्पनेने विद्यार्थ्यांमध्ये वैफल्य आहे. या दोन्ही ठिकाणी असा परिणाम झाला की, ११ वी – १२ वीच्या स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये अनुपस्थिति, अभ्यासाकडे दुर्लक्ष, गृहपाठ न करण्याची प्रवृत्ती, शाळेच्या वस्तूंची मोडतोड, अशा प्रकारचे प्रश्न निर्माण झाले.

११ वी – १२ वीच्या विद्यार्थ्यांचे गैरवर्तनाचे प्रमुख प्रकार कोणते हे ६४१ अध्यापकांना विचारले असता ३०५ अध्यापकांनी 'वर्गात हजर न राहाणे', १२८ जणांनी 'वर्गात पुस्तके न आणणे', १०८ जणांनी 'वर्गात उशीरा येणे', अशी व इतरांनी 'अभ्यास न करणे', 'गोंधळ करणे', 'गैरवर्तन करणे', या प्रकारच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

११. ज्या वेळेस हा आकृतिबंध अमलात यावयाचे ठरले त्या वेळेस, १०वी–११वी–१२वी या तिन्ही परीक्षा शालांत परीक्षा मंडळातर्फे घेण्यात येतील असा एक समज होता. कोठारी आयोगाच्या शिफारसीत ही गोष्ट नव्हती. तरीही सुरुवातीला विद्यार्थ्यांना व शिक्षकांना असे वाटले होते की, ११ वीची परीक्षा शालांत मंडळातर्फे होईल. फेब्रुवारी १९७६ मध्ये जेव्हा शासनाने जाहीर केले की, ही परीक्षा मुले ज्या शाळा-महाविद्यालयांमध्ये शिकत आहेत त्यांचेकडून घेतली जाईल, तेव्हा सर्वांनीच निश्वास टाकला. कारण शाळा-महाविद्यालयांना १२वीचे वर्गात मुले हवी होती. मुले किमान संख्येत असल्याखेरीज शासन १२ वीचे वर्ग उघडावयास परवानगी देत नव्हते. त्यामुळे सुरुवातीची एक-दोन वर्षे ११ वीचे निकाल जवळपास १०० टक्के लागले. यातले मर्म विद्यार्थ्यांना कळावयास उशीर लागला नाही. आपण ११ वी उत्तीर्ण होण्याची शाळा-महाविद्यालयानाच जरूर आहे हे कळल्यावर ११ वीच्या वर्गात कसेही वागावयास विद्यार्थ्यांनी सुरुवात केली. आपण अनुपस्थित राहिलो, परीक्षेस बसलो नाही, वर्गातील अभ्यास केला नाही तरी शाळा-महाविद्यालये आपणास काही करू शकणार नाही हे विद्यार्थ्यांना पुरेपूर कळले आहे. त्यामुळे संपूर्ण ग्रामीण महाराष्ट्रात ११ वीचे वर्ग हे नावापुरतेच वर्ग असेच विद्यार्थी मानतात, असा शिक्षक-प्राध्यापकांचा अनुभव आहे. फक्त शास्त्रशाखा यास अपवाद आहे. कारण प्रत्यक्षात इंजिनिअरिंग, मेडिकलला प्रवेश मिळो वा न मिळो, ११ वी-१२ वी शास्त्रवर्गातील प्रत्येक विद्यार्थी आपण इंजिनिअर, डॉक्टर होणार असे मानूनच अभ्यास करीत असतो, वर्गातही येत असतो.

१२. ११ वी – १२ वीचे वर्ग शाळेत व महाविद्यालयात अशा दोन्ही ठिकाणी असल्याने अभ्यासेतर कार्यक्रमांचे दृष्टीने 'ना घरचे ना दारचे' अशी या विद्यार्थ्यांची स्थिती झाली आहे. या विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन कार्यक्रमात भाग घेता येत नाही, तर यातील बऱ्याच विद्यार्थ्यांना शालेय कार्यक्रमातही भाग घेता येत नाही. त्यामुळे अभ्यासेतर कार्यक्रमांचे बाबतीत या मुलांची फार कुचंबणा झाली आहे.

प्रातिनिधिक अशा ३,६९७ विद्यार्थ्यांना अभ्यासेतर कार्यक्रमातील सहभागाबद्दल प्रश्न विचारला असता, ३,०१८ विद्यार्थी शाळा-महाविद्यालयांचे क्रीडांगणांवर खेळतात एवढ्याच अर्थाने

अभ्यासेतर कार्यक्रमात भाग घेतात असे कळले. उरलेले विद्यार्थी वक्तृत्व, नाट्य, इत्यादी कार्यक्रमात सहभागी होतात.

१३. कोठारी आयोगाने ११ वी – १२ वीचा पुरस्कार केला त्या वेळेस या स्तरावर मोठ्या प्रमाणावर व्यावसायिक अभ्यासक्रम अमलात येतील, आणि १० वी उत्तीर्ण झालेले ५० टक्के विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रम निवडून एक तर व्यवसायांत जातील किंवा पुढील व्यावसायिक शिक्षण घेतील आणि हे ५० टक्के विद्यार्थी पारंपरिक अभ्यासक्रमाकडे जाणार नाहीत अशी अपेक्षा होती. महाराष्ट्रात मात्र मोठ्या प्रमाणावर व्यावसायिक अभ्यासक्रमांची सोय झालेली नाही. त्यामुळेच नेहमीचे शिक्षण घेऊनही त्याचा उपयोग नाही, आणि व्यावसायिक शिक्षण घेता येत नाही अशी विद्यार्थ्यांची भावना झालेली आहे. पारंपरिक शिक्षणाचा पुढे काहीही उपयोग होणार नाही हे दिसत असल्याने साहजिकच मुलांचे या शिक्षणाकडे दुर्लक्ष आहे.

१९७६–७७ साली संपूर्ण महाराष्ट्रभर केलेल्या अभ्यासात ३,३४४ पैकी ३,०७४ म्हणजे ९१·९२ टक्के विद्यार्थ्यांनी शाळा-महाविद्यालयांत व्यावसायिक अभ्यासक्रम असते तर त्यात नाव घातले असते असे सांगितले. त्या वेळेस कलाशास्त्राकडील विद्यार्थ्यांचा कल स्टेनोटायपिंग, हस्तकला याकडे, शास्त्र विद्यार्थ्यांचा कल तांत्रिक आणि शेतीविषयक अभ्यासक्रमांकडे आणि वाणिज्य विद्यार्थ्यांचा कल कॉमर्सचेच व्यावसायिक अभ्यासक्रम आणि स्टेनोटायपिंगकडे होता, असे दिसले.

१९७९–८० सालच्या मराठवाड्यातील पाहाणीत ३,२८६ पैकी २,९७३ (९०·४७ टक्के) विद्यार्थ्यांनी व्यावसायिक अभ्यासक्रम निवडला असता असे सांगितले. त्यांचा प्रमुख कल तांत्रिक अभ्यासक्रम, रेडिओदुरुस्ती, टायपिंग, स्टेनोग्राफी, हस्तकला व शेतीविषयक अभ्यासक्रम याकडे होता.

१४. ११ वी – १२ वीसाठी नवा व प्रगत अभ्यासक्रम जरी संमत झाला असला तरी त्या मानाने शिक्षकांची शिकविण्याची तयारी झालेली नाही, याबद्दल फारशी खटपट केली गेली नाही. वास्तविक पहाता नवा अभ्यासक्रम अमलात आल्यानंतर विविध विषयांचा आशय व अध्यापनाची पद्धती यासाठी अध्यापकांचे उद्‌बोधन व्हावयास पाहिजे होते. तसे ते झाले नाही. त्यामुळे त्या विषयातले त्यांना जे माहीत होते व जसे माहीत होते तसे त्यांनी वर्गात शिकवले. त्याचा परिणाम असा झाला की शिक्षकांनी जे शिकविले ते अभ्यासक्रम तयार केला त्यापेक्षा काही वेगळे होते आणि प्रामाणिक मुलांचे बाबतीत असे घडले की, वर्गात शिकविलेले परीक्षेत लिहूनही, ही मुले उत्तीर्ण होऊ शकली नाहीत. एकूण शिक्षकांची तयारी नव्या अभ्यासक्रमाच्या दृष्टीने कमी पडल्यामुळे महाराष्ट्रभर, विशेषतः ग्रामीण भागात, परीक्षेचे निकाल अतिशय वाईट लागले.

महाराष्ट्राच्या विविध ग्रामीण भागात **मार्च १९७७ मध्ये झालेल्या १२ वीच्या परीक्षेचे निकाल (टक्केवारी)** कसे लागले हे पुढील कोष्टकावरून स्पष्ट होईल.

| विभाग | ग्रामीण शाळा / महाविद्यालय | कला | शास्त्र | वाणिज्य |
|---|---|---|---|---|
| प. महाराष्ट्र | शाळा | ३२·५२ | ३७·८२ | ५१·६८ |
| | महाविद्यालये | ३९·२६ | ४६·९२ | ५५·६३ |
| विदर्भ | शाळा | २५·७५ | २५·४३ | ३१·१५ |
| | महाविद्यालये | ३०·७८ | ३१·४५ | २५·६४ |
| मराठवाडा | शाळा | २१·६६ | २१·४९ | ६४·४४ |
| | महाविद्यालये | २४·४१ | ३९·९१ | ३८·१६ |

(मराठवाड्यात एकाच ग्रामीण शाळेत कॉमर्स-अभ्यासक्रम होता व ४५ पैकी २९ मुले उत्तीर्ण झाली.)

१५. ११ वी – १२ वीचे वर्ग अमलात येण्यापूर्वी इंजिनिअरिंग व मेडिकल अभ्यासक्रमांसाठी इंटर सायन्स परीक्षा ही किमान पात्रता समजली जात असे. विद्यापीठाच्या इंटरच्या सर्व परीक्षांचा दर्जा जरी सारखाच असला तरी इंटर सायन्स, इंटर आर्टस, इंटर कॉमर्स या परीक्षा वेगवेगळ्या वेळी होत असत. त्यामुळे इंटर सायन्स या परीक्षेस वेगळे महत्त्व असे व थोड्याफार गांभीर्याने या परीक्षेकडे पाहिले जात असे. १२ वीच्या आर्टस्, सायन्स व कॉमर्स या परीक्षा एकत्र होत असल्याने, तसेच खेड्यापाड्यांतून या परीक्षेच्या वेळेस सर्रास गैरप्रकार होत असल्याने आणि १२ वी सायन्सची पयीक्षा हीच इंजिनिअरिंग, मेडिकलची प्रवेशपरीक्षा असल्याने १२ वीच्या परीक्षेच्या वेळेस न भूतो न भविष्यति अशा प्रकारचे गैरप्रकार होत असतात. गैरप्रकारात ज्या ज्या शक्यता असतात त्या त्या सर्व या परीक्षेच्या वेळेस घडतात असे विद्यार्थी, प्राध्यापक, पालक, संस्थाचालक, या सर्वांचे मत आहे.

११ वी – १२ वीच्या परीक्षेच्या वेळेस किती प्रमाणात गैरप्रकार होतात, भरपूर प्रमाणात, सर्वसाधारण की, होत नाहीत, या प्रश्नांची उत्तरे देताना ३,४७२ विद्यार्थ्यांपैकी १,३३९ विद्यार्थ्यांनी बऱ्याच प्रमाणात व १,५६७ विद्यार्थ्यांनी साधारणपणे चालतात असे सांगितले. ५६६ विद्यार्थ्यांचे मते गैरप्रकार होत नाहीत. ५९५ शिक्षकांपैकी ३५ जणांनी भरपूर, ३४४ जणांनी साधारण व उरलेल्या २१६ शिक्षकांनी गैरप्रकार होत नाहीत अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. मोठ्या प्रमाणात गैरप्रकार होतात हेच विद्यार्थी व शिक्षकांचे सर्वसाधारण मत दिसते.

१६. ११ वी – १२ वीचे वर्ग सुरू झाल्यानंतर ११ वीच्या परीक्षा कशा तऱ्हेने घ्याव्यात याबद्दल महाराष्ट्र शासनाने काही पद्धती ठरवून दिलेली होती. सहामाही परीक्षा, वार्षिक परीक्षा व वर्गातील काम, यांवर आधारित असा ११ वीचा निकाल लावला जातो. १२ वीचे वेळेस मात्र केवळ वार्षिक परीक्षेच्या गुणांवर निकाल अवलंबून असतो. याशिवाय काही घटकचाचण्या, साप्ताहिक परीक्षा इत्यादी घेतल्या जातात. **११ वीच्या परीक्षा कोणत्या पद्धतीने घ्याव्यात** यासाठी ३,५०० विद्यार्थ्यांनी पुढील प्रतिक्रिया व्यक्त केल्या :

| **परीक्षेचा प्रकार** | | **विद्यार्थी संख्या** |
|---|---|---|
| घटक चाचण्या | ... | ४२३ |
| साप्ताहिक परीक्षा | ... | १९८ |
| मासिक परीक्षा | ... | ३५२ |
| सहामाही परीक्षा | ... | ७४२ |
| वार्षिक परीक्षा | ... | १,७९० |

## उपाय-योजना

वरील सर्व अभ्यासावरून ११वी – १२वीच्या विद्यार्थ्यांचे प्रश्न टाळण्यासाठी, निदानपक्षी त्यांची तीव्रता कमी करण्यासाठी, शाळा-महाविद्यालयांचे चालक, विद्यापीठे, शासन व शिक्षकसंघटना यांनी खालील गोष्टी तातडीने करणे जरूर आहे :

१. शाळेमध्ये ९ वी – १० वीच्या वर्गात विद्यार्थ्यांना १० वी उत्तीर्ण झाल्यानंतर कोणती विद्याशाखा निवडावी वा कोणता व्यावसायिक अभ्यासक्रम निवडावा याविषयी मार्गदर्शन करण्याची सोय हवी.

२. कला, शास्त्र, वाणिज्य या विद्याशाखांमध्ये निश्चितपणे वेगवेगळ्या क्षमतेचे विद्यार्थी प्रवेश घेतात असे आढळून येऊ लागलेले आहे. त्या दृष्टीने निदान कलाशाखेच्या अभ्यासक्रमाची

पुनर्रचना करण्यात येऊन त्या शाखेतील सामान्य विद्यार्थ्यांना झेपेल अशा तऱ्हेने अभ्यासक्रमाचा आशय आखण्यात यावा.

३. नवा अभ्यासक्रम निखालसपणे जुन्या ११ वीच्या अभ्यासक्रमापेक्षा प्रगत असा आहे. मात्र हा अभ्यासक्रम शिकविणाऱ्या अध्यापकांची तयारी करून घेण्यात आलेली नाही. त्या दृष्टीने अध्यापकांसाठी आशय व पद्धती या दोन्हींचे बाबतीत उद्बोधनवर्ग घेण्यात यावेत. शासन व राज्य शिक्षण संस्था यांनी एकत्रित येऊन 'कनिष्ठ महाविद्यालयांतील अध्यापकांसाठी शिक्षण पदविका' असा नवा अभ्यासक्रम सुरू करावा व सेवांतर्गत पद्धतीने तो शिकविण्याची सोय करावी.

४. कमी संख्या असलेली ग्रामीण महाविद्यालये व ११ वी – १२ वीचे दोन्ही वर्ग असलेल्या शाळा यांना पगारेतर खर्चासाठी पैसा खूपच कमी पडतो. त्यामुळे त्यांना ग्रंथालयासारख्या सोयी विद्यार्थ्यांना पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देता येत नाहीत. अशा प्रकारच्या संस्थांना ग्रंथालय-विकासासाठी विशेष निधी उपलब्ध करून द्यावयास पाहिजे.

५. बहुसंख्य विद्यार्थ्यांची व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी मागणी आहे. तरी स्थानिक गरजे-वर आधारित असे व्यावसायिक अभ्यासक्रम अधिकाधिक प्रमाणात शाळा-महाविद्यालयांतून सुरू करण्याची खटपट करावी.

६. शाळेत आणि महाविद्यालयात अशा दोन्ही ठिकाणी ११ वी – १२ वीचे वर्ग असल्याने अनेक शाळा-महाविद्यालयांमध्ये एक घातुक चढाओढ सुरू झालेली आहे. ती टाळण्यासाठी अशा गावांमध्ये शाळा किंवा महाविद्यालय अशा एकाच ठिकाणी ११ वी – १२ वीचे वर्ग उघडण्यास परवानगी द्यावी.

७. ११ वी – १२ वीच्या वर्गातील मुले पौगंडावस्थेतील मुले असतात. त्यांना निसर्गतःच अभ्यासेतर कार्यक्रमात भाग घ्यावासा वाटतो; पण अशा कार्यक्रमांची योग्य ती व्यवस्था मुळा-तच नसते. ज्याप्रमाणे आंतरमहाविद्यालयीन व शालेय कार्यक्रमांना अधिकृत स्वरूप आहे तसेच स्वरूप केवळ क्रीडा-स्पर्धांनाच नव्हे तर नाट्य, वक्तृत्व या प्रकारच्या अभ्यासेतर कार्यक्रमांनाही प्राप्त करून द्यावे.

८. ग्रामीण भागातील मुलांचा रहाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत आहे. शहरी भागा-मध्ये आणि तालुक्याच्या गावांमध्येही जागा बांधण्याचा खर्च दिवसेंदिवस वाढत असल्याने मुलांना भाड्याने खोल्या मिळणे हे जवळजवळ अशक्य झाले आहे. अन्नधान्याच्या किंमती वाढ-ल्याने खाणावळीत जेवणे दुरापास्त झाले आहे. या दृष्टीने परगावच्या अधिकाधिक विद्यार्थ्यांची वसतिगृहात राहण्याची सोय व ज्यांना आवश्यक आहे त्यांना कमी खर्चात साधे पण चांगले जेवण मिळण्याची सोय शाळा-महाविद्यालयांत झाली पाहिजे.

शाळा-महाविद्यालयांतील वातावरण, परीक्षेमधील गैरव्यवहार इत्यादी गोष्टींबद्दल या लेखामध्ये फारशी चर्चा केलेली नाही. तसेच अध्यापक-प्राचार्य संबंध, प्राचार्य-संस्थाचालक संबंध, यांसारख्या प्रश्नांचाही येथे ऊहापोह केलेला नाही. जे प्रश्न केवळ ११ वी – १२ वीच्या आकृतिबंधामुळे व हा आकृतिबंध कशा रीतीने राबविली गेला यामुळे निर्माण झालेले आहेत, केवळ त्यांचीच चर्चा या निबंधांमध्ये केलेली आहे.

■ ■

# ७ पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या समस्या

चंद्रशेखर गंगाधर देशपांडे

व्यवस्थापन, शिक्षक आणि विद्यार्थी यांना शिक्षणत्रयी म्हणून संबोधता येईल. यातील तिन्ही घटक परस्परावलंबी आणि पूरक असे आहेत. व्यवस्थापनाचा संबंध शिक्षणाची उद्दिष्टे ठरविणे, उद्दिष्टांप्रत शिक्षणप्रक्रिया होत आहे की नाही याबद्दल दक्षता घेणे, शिक्षकांची गुणवत्ता पाहून त्यांच्या नेमणुका करणे, विद्यार्थ्यांना प्रवेश देणे, आवश्यक त्या सोयी उपलब्ध करून देणे, इत्यादि घटकांबरोबर असतो. प्रत्यक्ष शिक्षणप्रक्रियेत मात्र शिक्षक आणि विद्यार्थी या दोघांचाच संबंध येतो. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या परस्पर संबंधांमुळे शिक्षण-प्रक्रिया सुरू होत असली तरी ती मर्यादित स्वरूपाची असते. ज्या वेळी शेकडो-हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण द्यावे लागते त्या वेळी व्यवस्थापन हे अपरिहार्य ठरते. एकंदरीत, विद्यार्थ्यांचा व्यवस्थापनाशी अप्रत्यक्ष तर शिक्षकांशी प्रत्यक्ष संबंध असतो.

आज शिक्षणाचा व्याप फार वेगाने वाढत आहे. शिक्षण हे एका विशिष्ट वर्गाची मक्तेदारी न होता, समाजातील सर्व घटकांना त्याचा फायदा मिळाला पाहिजे आणि विद्यार्थी हा शिक्षण-पद्धतीतील केन्द्रबिंदू म्हणून समजला गेला पाहिजे ही विचारधारा पुढे येत आहे. या विचार-धारेतून शैक्षणिक संस्थांची—शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे यांची—फार झपाट्याने वाढ होत आहे. काही दशकांपूर्वी महाराष्ट्रात केवळ एक विद्यापीठ होते, त्या जागी आज सहा विद्यापीठे आहेत. आणखी एक-दोन विद्यापीठे स्थापन होण्याची शक्यता आहे. शैक्षणिक विस्तारा-बरोबर विद्यार्थ्यांच्या समस्या देखील वाढत आहेत.

## समस्यांचे निराळेपण

निरनिराळ्या शैक्षणिक स्तरांवरील विद्यार्थ्यांच्या समस्या निरनिराळ्या असणार. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या समस्या अगदी प्रारंभिक स्वरूपाच्या असतात. त्यांच्यात संकल्पना-निर्मिती फार कमी प्रमाणात असते. हे विद्यार्थी शिक्षक सांगतील ते निमूटपणे ग्रहण करीत असतात. माध्यमिक स्तरातील विद्यार्थी मात्र स्वतःच्या विचारांना चालना देण्याचा प्रयत्न कर-तात. कित्येकदा त्यांना पाठ्य-पुस्तकांव्यतिरिक्त इतर पुस्तके वाचावी असे वाटते. त्यातून नवीन ज्ञान मिळविण्याचा ते प्रयत्न करतात. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शिक्षकांवर फार कमी अव-लंबून राहावे लागते. त्यांना स्वतःचा अभ्यास स्वतः करावा लागतो. त्याकरिता त्यांना स्वतंत्र शैक्षणिक सोयींची आवश्यकता असते आणि हे करीत असताना त्यांचे विचार आकार घेत असतात. ते शिक्षकांशी आणि इतरांशी चर्चा करतात व आपले मतभेद व्यक्त करतात.

पदव्युत्तर विद्यार्थी हे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या प्रमाणात सुमारे दोन किंवा तीन टक्के

असावेत. हे विद्यार्थी साधारणतः शिक्षणाची जाण असणारे, प्रगल्भ आणि प्रत्यक्ष संशोधन करीत नसले तरी संशोधनाची दखल घेणारे असे असतात. ह्या विद्यार्थ्यांनी अगोदर झालेल्या संशोधनाचा संदर्भ म्हणून सतत उपयोग करावा अशी शिक्षकांची अपेक्षा असते. या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर बराच वरचा असल्यामुळे त्यांच्या समस्या देखील इतर विद्यार्थ्यांपेक्षा वेगळ्या प्रकारच्या असतात. या समस्यांचे योग्य आकलन झाल्यास त्यावर आपणास काही उपाय सुचविता येतील व त्यायोगे त्यांची शैक्षणिक क्षमता वाढविण्यास मदत होईल, हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून प्रस्तुत अन्वेषण करण्यात आलेले आहे.

### अन्वेषणपद्धती

अन्वेषणाकरिता एक प्रश्नावली तयार करण्यात आली आणि त्यायोगे विद्यार्थ्यांच्या अनुभवास येणाऱ्या निरनिराळ्या सहा क्षेत्रांतील समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. ती क्षेत्रे पुढीलप्रमाणे– कौटुंबिक वातावरण, शैक्षणिक वातावरण, शैक्षणिक कृती, अभ्यासक्रमाबाहेरील कृती, परस्पर संबंध आणि वैयक्तिक समायोजन.

एकूण ४१७ विद्यार्थ्यांकडून ही प्रश्नावली भरून घेण्यात आली. यातील बहुसंख्य विद्यार्थी पुणे विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागातील आणि संलग्न महाविद्यालयांच्या पदव्युत्तर विभागातील होते. याशिवाय नागपूर, मुंबई आणि शिवाजी विद्यापीठातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांचा प्रातिनिधिक स्वरूपात समावेश करण्यात आला. या पदव्युत्तर विद्यार्थ्यांमध्ये एम. ए., एम्. एस्सी., एम्. कॉम्., एम्. फिल्., एम्. ई., एम्. एस्. डब्ल्यू. आणि एल्. एल्. एम्., इत्यादी निरनिराळ्या विद्याशाखांतील विद्यार्थ्यांचा समावेश होता. अर्थात पहिल्या तीन प्रकारच्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांचा अंतर्भाव जास्त प्रमाणात होता.

विद्यार्थ्यांच्या निरनिराळ्या क्षेत्रांतील समस्यांचा क्रमशः विचार पुढे केला आहे.

### कौटुंबिक वातावरण

सुमारे पाच टक्के विद्यार्थ्यांनी त्यांच्या आईवडिलांचे परस्परांमधील संबंध सलोख्याचे नसल्याचे सांगितले. सुमारे वीस टक्के विद्यार्थ्यांचे त्यांच्या कुटुंबियांशी तणावपूर्ण संबंध असल्याचे आढळून आले. वडिलांचे व्यसन, आईवडिलांचा शिक्षणाला असणारा विरोध, भाऊबंदकी, गरिबीमुळे आईवडिलांकडून पैसे न मिळणे, इत्यादी कारणांचा त्यांनी उल्लेख केला. हे तणावपूर्ण सबध साधारणतः शिवाजी आणि नागपूर विद्यापीठातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांमध्ये अधिक प्रमाणात आढळून आले. अशा संबंधांचा त्यांच्या अभ्यासावर परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले. उरलेल्या विद्यार्थ्यांनी सांगितले की, त्यांचे घरच्या लोकांशी असलेले संबध सलोख्याचे आणि प्रेमाचे आहेत.

### शैक्षणिक वातावरण

शैक्षणिक वातावरणाचा अभ्यास शिक्षक-विद्यार्थीसंबंध, अभ्यासक्रम व प्रशासकीय सोयी, यांच्या सदर्भात करण्यात आला. दोनतृतियांश विद्यार्थ्यांनी त्यांना त्यांच्या आवडीनुसार पदव्युत्तर शिक्षणाकरिता विषय घेता आला असे सांगितले. उरलेल्यांपैकी बहुसंख्य विद्यार्थ्यांनी त्यांना ज्या विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला त्यात त्यांनी अध्ययन सुरू केल्याचे समजते.

**अध्यापनाबद्दलचे मत –** विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या अध्यापनाचे मूल्यमापन करण्यास सांगितले असता सुमारे दोनतृतियांश विद्यार्थ्यांनी अध्यापन चांगले, तर एकतृतियांश विद्यार्थ्यांनी ते समाधानकारक नसल्याचे सांगितले. एल्. एल्. एम्., एम्. ई. आणि एम्. एस्सी.च्या बहुसंख्य विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिक्षकांबद्दल आदर दर्शविला. तुलनात्मक दृष्ट्या हे प्रमाण इतर विद्यार्थ्यांमध्ये कमी होते. एकूण विद्यार्थ्यांपैकी सुमारे पाच टक्के विद्यार्थी लहान शहरात स्थापन झालेल्या

महाविद्यालयांच्या पदव्युत्तर विभागातील होते. त्यांनी काही शिक्षकांबद्दल असमाधान व्यक्त केले. कारण त्यांच्या मतानुसार काही शिक्षकांचे ज्ञान सखोल नसते आणि त्यामुळे त्यांच्या पदव्युत्तर शिक्षणाची हेळसांड होते.

**शिक्षक–विद्यार्थी संबंध–** शिक्षक आणि विद्यार्थी यांचे वैयक्तिक आणि शैक्षणिक अशा दोन स्तरांवर संबंध असू शकतात. काही विद्यार्थ्यांचे शिक्षकांशी असलेले संबंध दोन्ही स्तरांवर तर काहींचे केवळ एका स्तरावर असतात. शिक्षकांशी वैयक्तिक स्तरावर संबंध असणे ही एक चांगली बाब आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांबरोबर सहलीला जाणे, एकत्र चहाला जाणे, काही बाबींवर चर्चा करणे, इत्यादी संबंध फार आवश्यक आहेत; परंतु हे संबंध दुय्यम स्वरूपाचे समजले पाहिजेत. याहून महत्त्वाचे प्राथमिक स्तरावरील संबंध म्हणजे शैक्षणिक स्तरावरील. या संबंधात विद्यार्थ्यांना निरनिराळी पुस्तके वाचावयास लावणे, निरनिराळ्या संदर्भ-ग्रंथांची सूची देणे, विषयांचे प्रत्यक्ष ज्ञान देणे, इत्यादींचा अंतर्भाव होतो. विद्यापीठीय स्तरावर शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये प्रामुख्याने शैक्षणिक स्वरूपाचे संबंध असल्याचे आढळून आले. विज्ञान विद्याशाखेत हे संबंध अधिक जवळचे असतात. लहान शहरांतील महाविद्यालयांमध्ये उत्कृष्ट ग्रंथसंपदा आणि प्रयोगशाळा नसल्यामुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक ते शैक्षणिक संबंध निर्माण होत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. व्यवस्थापनाने ग्रामीण विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त सोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. तसेच शिक्षकांनी शैक्षणिक संबंध प्रस्थापित करून शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शहरी भागातील जे शिक्षक शैक्षणिक संबंध चांगल्या प्रकारे प्रस्थापित करू शकतात त्यांच्याकडे विद्यार्थ्यांचा अधिक ओढा असतो.

**अभ्यासक्रमाबद्दलच्या अपेक्षा –** अभ्यासक्रमाविषयी विद्यार्थ्यांमध्ये निरनिराळी मतमतांतरे आढळून आली. बऱ्याच विद्यार्थ्यांनी त्यांचे अभ्यासक्रम केवळ पुस्तकी-ज्ञान देणारे असल्याचे सांगितले. त्यांच्या मतानुसार पुस्तकी-ज्ञानाला थोड्या प्रमाणात का होईना क्षेत्रीय संशोधनाची जोड मिळाली पाहिजे. विषयाचा उपयोग प्रत्यक्ष व्यवहारात कसा करावा या दृष्टीने अभ्यासक्रमात काही प्रमाणात शिकविले पाहिजे. विद्यार्थ्यांना एखादा लहान प्रकल्प देऊन त्यावर त्यांना काम करावयास सांगितले पाहिजे. वाणिज्य, कला आणि सामाजिक विज्ञान या शाखांतील विद्यार्थ्यांनी यावर अधिक भर दिला. विज्ञानशाखेतील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष काम करण्याची संधी बहुधा मिळतेच. काही विद्यार्थ्यांनी त्यांचे अभ्यासक्रम विस्तृत असल्याचे सांगितले. याबाबत शिक्षक आणि विद्यार्थी यांनी एकत्र चर्चा करावयास हवी. विस्तृत अभ्यासक्रमाविषयी सांगताना विद्यार्थ्यांनी 'अंतर्गत परीक्षा व अभ्यासक्रम संपविणे यातच सत्राचा वेळ निघून जातो आणि अभ्यासाला पुरेसा वेळ मिळत नाही.' असे नमूद केले. विषयातील काही भागांची पुनरुक्ती होते असे काही विद्यार्थ्यांचे मत होते. ही पुनरुक्ती टाळण्यास विषयातील इतर भाग शिकविता येईल. काही विद्यार्थ्यांनी त्यांचे अभ्यासक्रम इतर विषयांच्या तुलनेत फार त्रोटक आणि मर्यादित आहेत असे सांगितले. एकंदरीत आपण निरनिराळ्या शाखांचा जरी विचार केला नाही तरी प्रत्येक विद्याशाखेत निरनिराळ्या विषयांच्या अभ्यासक्रमांचे बाबतीत सुसूत्रता आणण्याची नितांत आवश्यकता आहे असे दिसते. प्रत्येक कोर्समध्ये किती तासांचे अध्यापन व्हावे, तसेच त्यात काय काय शिकवावे याबाबत पुनर्निरीक्षण करावयास हवे.

**प्रशासकीय सोयी –** सुमारे चाळीस टक्के विद्यार्थ्यांनी त्यांना महाविद्यालयांतील किंवा विद्यापीठांतील शासकीय वर्ग निश्चित स्वरूपाची माहिती देण्याचे टाळतो असे सांगितले. हे कर्मचारी कित्येकदा विद्यार्थ्यांना त्या त्या विभागातील शिक्षकांकडे पाठवितात. परीक्षा, पदवीदान समारंभ, निरनिराळ्या वेळी होणारे परीक्षा-पद्धतीतील बदल, शिष्यवृत्ती, पास झालेल्या विषयात पुन्हा सुधारणा करणे, इत्यादींविषयी बरोबर माहिती मिळत नाही अशी विद्यार्थ्यांची तक्रार

होती. विद्यापीठातील निरनिराळ्या प्रमुख कार्यांचे आणि नियमांचे संकलन करून त्यांचे विद्यार्थ्यांकरिता एक माहिती-पत्रक तयार केले तर त्याचा विद्यार्थ्यांना खूप उपयोग होईल. या माहिती-पत्रकात विद्यार्थ्यांना उपयुक्त अशी सर्व माहिती एकत्रित मिळावी.

पुणे विद्यापीठातील एम्. फिल्. विद्यार्थ्यांनी त्यांना पीएच्. डी. विद्यार्थ्यांप्रमाणे शिष्यवृत्ती देण्याची सूचना केली. अर्थात एम्. फिल्. आणि पीएच्. डी. या दोन पदव्यांच्या अध्ययन-प्रक्रियेत फरक असतो. एम्. फिल्. विद्यार्थ्यांना एम्. ए. च्या विद्यार्थ्यांप्रमाणे काही अभ्यासक्रमाकरिता निश्चितपणे विद्यापीठात जावे लागते. पीएच्. डी. पदवीमध्ये केवळ मार्गदर्शन अभिप्रेत असते; परंतु एम्. फिल्. करिता अध्यापन आणि मार्गदर्शन या दोहोंचीही आवश्यकता असते. एम्. फिल्. च्या विद्यार्थ्यांना काही अभ्यासक्रम शिकावा लागतो. तसेच त्यांना एक शोधनिबंध तयार करावयाचा असतो; त्याला मार्गदर्शनाची फार आवश्यकता असते. या शोधनिबंधांकरिता त्यांना शिक्षकांकडून योग्य ते मार्गदर्शन मिळत नाही अशी तक्रार त्यांनी केली. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळण्याच्या दृष्टीने शिक्षक, विद्यार्थी आणि विद्यापीठीय अधिकारीवर्ग, यांनी एकत्र बसून, अडचणींवर चर्चा करून, विद्यार्थ्यांच्या तक्रारी दूर करावयास हव्यात.

**शैक्षणिक कृती –** विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शिक्षणाकरिता लागणाऱ्या सोयी कोणत्या आणि ज्या सोयी आहेत त्यांचा ते कसा उपयोग करतात, याचा विचार करण्यात आला. बहुसंख्य पदव्युत्तर विद्यार्थी उपलब्ध शैक्षणिक सोयींचा भरपूर उपयोग करून घेत नाहीत असे आढळून आले. सुमारे ५० टक्के विद्यार्थी पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त इतर संदर्भग्रंथ वाचीत नसल्याचे आढळून आले. बरेच विद्यार्थी शक्य असून देखील स्वखर्चाने पुस्तके घेण्याचे टाळतात; परंतु हेच विद्यार्थी साहसी किंवा ललित साहित्याची पुस्तके मात्र खरेदी करतात. सुमारे ३० टक्के विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयांतील तीन संदर्भ-ग्रंथांची नावे देखील सांगता आली नाहीत. अभ्यासक्रमाचे शेवटी दिलेल्या पाठ्यपुस्तकांची नांवे देखील बऱ्याच विद्यार्थ्यांना माहीत नव्हती. पाठ्यपुस्तके आणि संदर्भग्रंथ यांचा सखोल अभ्यास न करणे ही सवय त्यांना महाविद्यालयीन जीवनापासून लागलेली असते. गाईडस् वाचणे आणि शिक्षकांनी प्रश्नांची उत्तरे लिहून देणे, यामुळे पाठ्यपुस्तके आणि संदर्भग्रंथ न वाचण्याकडे त्यांचा कल असतो असे दिसते. अर्थात यामध्ये शिक्षक आणि व्यवस्थापन या दोहोंचेही उत्तरदायित्व आहे. विद्यार्थी पाठ्यपुस्तके आणि संदर्भग्रंथ वाचतात की नाही याबद्दल शिक्षकांनी चौकशी करावयास हवी. त्याचप्रमाणे काही महाविद्यालयांतील व्यवस्थापकीय मंडळी, निकाल चांगले लागावेत म्हणून, शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रश्नांची उत्तरे लिहून द्यावीत अशा सूचना देतात. त्यामुळे विद्यार्थी परावलंबी तर होतोच; परंतु पाठ्यपुस्तके न वाचता आपण पास होऊ शकतो याची त्याला खात्री वाटते.

**ग्रंथालये व विद्यार्थी –** केवळ ३० टक्के विद्यार्थी ग्रंथालयाच्या शोध-पत्रिका विभागात बरेचदा जातात असे आढळून आले. ५५ टक्के विद्यार्थी तर फक्त एक-दोनदाच या विभागात गेले होते. बहुसंख्य विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयांतील शोध-पत्रिकांची नावे देखील सांगता आली नाहीत. काहींना तर अशा शोध-पत्रिकांची कल्पना देखील नव्हती. आपल्या विषयांतील नवनवीन संशोधन जाणून घेण्याविषयीचे त्यांच्यातील अनौत्सुक्य पाहून आश्चर्य वाटले. असे विद्यार्थी ग्रंथालयात अमुक एक शोध-पत्रिका नाही अशी तक्रार तरी कशी करणार ? अभ्यासाची नावड असल्यामुळे त्यांना समस्याच नसतात.

ग्रंथालयासंबंधी येणाऱ्या अडचणींबाबत विचारणा केली असता ग्रंथालयाचा वापर अधिक चांगल्या पद्धतीने कसा करावा यासंबंधी ग्रंथालयाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले पाहिजे असे बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सांगितले. आनंदाची बाब म्हणजे पुणे विद्यापीठाच्या ग्रंथालय विभागाने अशा प्रकारचे मार्गदर्शनपर प्रशिक्षण यंदापासून (१९८१) सुरू केले आहे.

संपूर्ण विचार केला असता असे स्पष्टपणे जाणवते की, विद्यार्थ्यांना अध्ययन करण्यात आणि संशोधन-पत्रिकांचे संदर्भ घेण्यास उद्युक्त केले पाहिजे. अर्थात हे एकदम होणार नाही. शिक्षकांनी पुढाकार घेऊन, त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये हळूहळू हा बदल घडवून आणला पाहिजे.

**अभ्यासक्रमाव्यतिरिक्तचे कार्यक्रम –** अभ्यासक्रमाव्यतिरिक्त खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, इत्यादींमध्ये विद्यार्थी किती प्रमाणात भाग घेतात आणि त्यांना कोणत्या सोयी उपलब्ध आहेत हे जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. सुमारे ३० टक्के विद्यार्थ्यांनी त्यांना खेळाची आवड नसल्यामुळे ते कोणताही खेळ खेळत नसल्याचे सांगितले. २० टक्के विद्यार्थ्यांच्या म्हणण्यानुसार पदव्युत्तर शिक्षण घेत असताना शिक्षणाव्यतिरिक्त इतर काही करण्यास फारसा वेळ मिळत नाही. उरलेल्या विद्यार्थ्यांनी बऱ्याच खेळांचा उल्लेख केला. त्यांचे आवडते खेळ म्हणजे टेबलटेनिस, बॅडमिंटन, कॅरम, कबड्डी, क्रिकेट, व्हॉलीबॉल, इत्यादी. सुमारे ४० टक्के विद्यार्थी वर उल्लेखिलेले खेळ खेळतात; परंतु त्यांचे खेळणे नियमित नसल्याचे आढळून आले. पत्ते, कराटे, फूटबॉल, हॉकी, इत्यादी खेळांचा देखील विद्यार्थ्यांनी उल्लेख केला; परंतु हे खेळणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण दहा टक्क्यांपेक्षा जास्त नव्हते. खेळण्यास उत्सुक असणाऱ्या बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या तक्रारी पुढील स्वरूपाच्या : खेळाचे सामान वेळेवर न मिळणे, सामान अपुरे मिळणे, मार्गदर्शकाची व्यवस्था नसणे, इत्यादी. या तक्रारी खऱ्या आहेत; पण किरकोळ आहेत. खरी अडचण मार्गदर्शकांची आणि उत्साहदात्यांची आहे. हे काम काही प्रमाणात विद्यार्थी परस्परांकरिता करू शकतील; पण याकरिता अंतःकरणात उत्साह हवा. अर्थात काही प्रमाणात याचे उत्तरदायित्व शिक्षकांकडे देखील आहे. त्यांचा उत्साह पूर्वीपेक्षा कमी झाला आहे. हे शारीरिक शिक्षण देणाऱ्या शिक्षकांबाबत अधिक खरे आहे.

गेल्या काही वर्षांत विद्यार्थ्यांमधील खेळांची आवड ओसरत चालली आहे असे जाणवते. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांकरिता महाविद्यालये आणि पदव्युत्तर विभाग बंद ठेवण्यात येतात; परंतु या कार्यक्रमांना विद्यार्थ्यांची उपस्थिती मात्र नगण्य असते. तीन वर्षांपूर्वी पुण्यात आंतर-विद्यापीठीय स्पर्धा झाल्या होत्या. त्यातदेखील हेच आढळून आले.

नाटक, नृत्य, नकला, वक्तृत्व, इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रमांबाबत कोणत्या सोयी आहेत याची देखील पाहणी या अभ्यासात करण्यात आली. आश्चर्य म्हणजे सुमारे ६० टक्के विद्यार्थ्यांनी त्यांना सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेण्याची इच्छा नाही असे सांगितले. अभ्यासामुळे वेळ मिळत नाही हे प्रमुख कारण बहुतेकांनी नमूद केले. एकूण विद्यार्थ्यांपैकी केवळ १० टक्के विद्यार्थी उत्साहाने सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतात. महाविद्यालयातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांमध्येदेखील अशीच वृत्ती आढळून येते.

एकंदरीत, पदव्युत्तर विद्यार्थ्यांचा खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांतील उत्साह कमी असल्याचे आढळून आले. त्यामुळे या क्षेत्रात त्यांच्या समस्या मोजक्या होत्या. पुण्या-मुंबईसारख्या शहरांत सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रोत्साहन देणाऱ्या हौशी संस्था बऱ्याच आहेत. त्या ठिकाणी सोयी देखील भरपूर असतात. काही विद्यार्थी अशा संस्थांचे सभासद असल्यामुळे त्यांना पदव्युत्तर विभागातील सांस्कृतिक कार्यक्रमात विशेष रस वाटत नसावा.

### परस्पर संबंध

विद्यार्थी-विद्यार्थिनींचे वर्गातील आणि वर्गाबाहेरील संबंध कसे आहेत, विद्यापीठ परिसरात विद्यार्थी-विद्यार्थिनी काय करतात, परिसराबाहेर कुठेकुठे जातात, कोणत्या कारणांमुळे एकत्र येतात, इत्यादी बाबींचा विचार करण्यात आला. परिचय असलेले इतर विद्यार्थी आणि मित्र यात विद्यार्थी विशेष फरक करताना आढळत नाहीत. आपुलकी, जिव्हाळा, स्नेहसंबंध, पर-

स्परांशी सहकार्य करणे, कठीण प्रसंगी लगेच मदत करणे, इत्यादी गोष्टी मित्रत्वात अपेक्षित असतात. एक-दोनदा भेटी-गाठी घेऊन चहा पिणे म्हणजे मित्रत्व नव्हे. या परिचयाच्या व्यक्ती होत. बऱ्याच विद्यार्थ्यांनी तथाकथित परिचितांचा मित्र म्हणून उल्लेख केलेला आढळतो. वस्तुतः बहुतेक विद्यार्थ्यांचे मोजके मित्र असल्याचे आढळून आले. सुमारे २० टक्के विद्यार्थ्यांनी मित्र आणि परिचयाचे इतर विद्यार्थी यात फरक करून त्यांना मोजके मित्र असल्याचे सांगितले. परस्परांना भेटणे, अधिक जवळिक निर्माण होणे, एकत्र बसणे, गप्पा मारणे अशा प्रकारच्या संबंधांचे विद्यार्थी-विद्यार्थिनींमधील प्रमाण वाढत असल्याचे आढळून आले. हे प्रमाण वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींमध्ये जास्त आहे. आईवडिलांपासून दूर मोकळ्या वातावरणात स्वतंत्रपणे राहात असल्यामुळे कदाचित हे प्रमाण वसतिगृहांतील विद्यार्थ्यांमध्ये जास्त असावे.

निरनिराळी विभागीय मंडळे, स्नेहसंमेलने, खेळाडूंची निवड, सहली, सिनेटच्या निवडणुका, यांमुळे विद्यार्थ्यांमध्ये कटुता निर्माण होत असल्याचे आढळून आले. खरे तर निवडणुका आणि विविध प्रकारचे कार्यक्रम यांच्या माध्यमांतून विद्यार्थ्यांना एक प्रकारचे सामाजिक प्रशिक्षण मिळत असते. तो उद्देश काही प्रमाणात सफल देखील होतो; परंतु काही प्रसंगी निवडणुकादि कार्यक्रमांमुळे भांडणे आणि मारामाऱ्या होतात. हे सारे टाळण्याचे व्यवस्थापनाने आणि शिक्षकांनी सतत प्रयत्न केले पाहिजेत.

वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये विशिष्ट कारणांमुळे लहान-लहान गट निर्माण होतात. त्यामुळे संलग्नता, आपुलकी, स्नेहभाव, सहकार्य, इत्यादी गरजांची पूर्ती होते. महाराष्ट्राच्या विशिष्ट भागातून आलेले, विशिष्ट जातीचे, विशिष्ट सत्रामधील, विशिष्ट सवयी असलेले, विशिष्ट रहाणीमान असलेले, इत्यादी कारणांमुळे हे गट पडत असतात. सिनेमाला जाणे, एकत्र अभ्यास करणे, निरनिराळ्या विषयांवर चर्चा करणे, नाटक बसविणे, सांस्कृतिक कार्यक्रम करणे, पार्टीला जाणे, सहलीला जाणे, धूम्रपान करणे, दारू पिणे, इत्यादी उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये आढळून येतात. सुमारे पाच टक्के विद्यार्थ्यांमध्ये धूम्रपान, दारू पिणे, एकत्रित रीत्या चालते. या सवयींना आळा घालण्याकरिता वेळीच खबरदारी घेतलेली बरी. एरवी हे प्रमाण वाढल्यास धोकादायक ठरेल.

## वैयक्तिक समायोजन

सुमारे २६ टक्के विद्यार्थ्यांनी त्यांचे शारीरिक आरोग्य उत्तम, सुमारे ६० टक्के विद्यार्थ्यांनी साधारण आणि उरलेल्यांनी निकृष्ट प्रतीचे असल्याचे सांगितले. धूम्रपान, दारू पिण्यासारख्या वाईट सवयी, पित्त, दात किडणे, खरूज, पोटाच्या तक्रारी, रक्तदोष, इत्यादी कारणांमुळे शारीरिक आरोग्य ठीक नसल्याचे आढळून आले. विद्यापीठातील आरोग्य-केंद्राचा फायदा बरेच विद्यार्थी घेतात. परंतु स्वतःचे आरोग्य नीट कसे राखता येईल या दृष्टीने प्रयत्नशील असणारे विद्यार्थी फार थोडे आहेत. त्यांना आरोग्यविषयक (शारीरिक आणि मानसिक) माहिती काही ठराविक भाषणांच्या माध्यमांतून देणे फार उपयुक्त ठरेल.

घरची सतत आठवण येणे, झोप न येणे, पैशांची टंचाई, पदव्युत्तर शिक्षणानंतर काय करावे ही काळजी, परीक्षेतील अपयश, परीक्षेत कमी गुण मिळणे, पदव्युत्तर शिक्षणानंतर नोकरी कशी मिळेल याची चिंता, इत्यादी विविध कारणांमुळे त्यांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होत असल्याचे आढळून आले. सुमारे ३० टक्के विद्यार्थ्यांनी त्यांना बरेचदा निराशापूर्ण, दुःखी आणि बेचैन असे वाटण्याची प्रमुख कारणे म्हणजे खालच्या जातीतील असल्यामुळे इतरांनी मैत्री करण्याचे टाळणे, आईवडिलांच्या अपेक्षेप्रमाणे परीक्षेत गुण न मिळणे, परीक्षेची भीती, पुण्यातील वातावरणात समरस होऊ न शकणे, इंग्रजी माध्यमामुळे विषय न समजणे, आईवडिलांची सतत आठवण येणे, प्रेमभंग, शिक्षकांशी ताणलेले संबंध, विद्यार्थ्यांची परस्परांतील भांडणे, इत्यादी.

विद्यार्थ्यांच्या निरनिराळ्या प्रतिक्रियांचे विश्लेषण केल्यानंतर असे दृष्टोत्पत्तीस आले की,

सुमारे २० टक्के विद्यार्थ्यांना निद्रानाश, असुरक्षिततेची भावना, न्यूनगंडाची भावना, आत्मविश्वासाचा अभाव, झोपेतून दचकून उठणे, अकारण भीती, हुरहूर, अकारण चिंता, एकटेपणाची जाणीव, गोंधळलेली मनःस्थिती, भावनिक तोल जातो की काय ही भीती, आपल्याला काही तरी होणार अशी अकारण भीती, घरच्या मंडळींच्या सुरक्षिततेविषयीचे विचार, इत्यादि मानसिक विचलनात्मक अनुभव प्रत्ययास येतात.

एकंदरीत, विद्यार्थी-जीवनात वैयक्तिक समायोजनाच्या आणि शिक्षण-विषयक अशा दोन्ही प्रकारच्या समस्या विद्यार्थ्यांमध्ये आढळतात. काही विद्यार्थ्यांना दोन्ही प्रकारच्या समस्या असतील तर काहींना केवळ एका प्रकारच्या. या समस्यांमुळे विद्यार्थी विकृत निश्चित होणार नाहीत, परंतु भावनिक तोल जाऊन त्यांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होण्याची मात्र दाट शक्यता असते. अशा विद्यार्थ्यांकरिता मार्गदर्शन आणि समुपयोजन केंद्रांची नितांत आवश्यकता आहे. आज असे केंद्र विद्यापीठात किंवा कोणत्याही महाविद्यालयात नाही. विद्यार्थ्यांच्या समस्यांचे निराकरण शास्त्रीय पद्धतीने होत नाही. अशी केंद्रे स्थापन करण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने प्रयत्न करावयास हवेत. विद्यापीठातील मानसशास्त्रविभाग आणि विद्यार्थी सहाय्यक समिती यांनी संयुक्तरित्या त्या दृष्टीने प्रयत्न केला. समस्या-निराकरणाची निकड ओळखून या संबंधात एक कृतिसत्र आयोजित करण्यात आले होते. यात महाविद्यालयीन शिक्षकांना मार्गदर्शन आणि समुपयोजनाचे प्रशिक्षण देण्यात आले होते. या शिक्षकांनी त्यांच्या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या समस्यांचे निराकरण करावे, त्यांच्या विचारांना योग्य दिशा द्यावी, हा या प्रशिक्षणामागील हेतू होता. परंतु व्यवस्थापनाची अनास्था आणि पैशाची टंचाई यामुळे अशी केंद्रे स्थापन होऊ शकली नाहीत. अजूनही अशी केंद्रे स्थापन करता आली तर त्यांचा विद्यार्थ्यांना निश्चितपणे फायदा होईल. त्या दृष्टीने प्रयत्न करावयास हवेत.

**सारांश**

विद्यार्थ्यांच्या एकूण समस्यांचा समग्र विचार केला तर त्यांच्या समस्या दोन प्रकारच्या आढळल्या. भावात्मक आणि अभावात्मक. भावात्मक समस्या म्हणजे ज्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्षपणे जाणवतात. उदाहरणार्थ, शिक्षकांच्या वागणुकीमुळे त्रास होणे, कर्मचाऱ्यांच्या तऱ्हेवाईकपणामुळे बेचैनी वाटणे, मानसिक तोल जात असल्याचा अनुभव येणे, खेळण्याची इच्छा असून देखील खेळाचे सामान न मिळणे, पैशाअभावी पुस्तके घेण्याची क्षमता नसणे, इत्यादी.

अभावात्मक समस्या म्हणजे ज्या समस्या विद्यार्थ्यांना जाणवत नाहीत परंतु संपूर्ण शिक्षण-क्षेत्राचा विचार केला तर त्यांची दखल घेतल्याशिवाय जाणत्यांना गत्यंतर नाही अशा. पाठ्य-पुस्तके व संदर्भ-ग्रंथ न वाचणे, खेळांची आवड नसणे, शोध-पत्रिकांचे संदर्भ न पाहणे, हे पदव्युत्तर विद्यार्थ्यांना महत्वाचे वाटले नाही तरी सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, शिक्षणतज्ञ यांच्या दृष्टीने चिंतनीय ठरते. पदव्युत्तर विद्यार्थी अपेक्षित गोष्टी (अध्ययन, चिंतन,) करण्यापासून परावृत्त होतात ही काळजीची बाब आहे आणि त्यात शिक्षकांचा देखील वाटा आहे. शिक्षकांनी प्रश्नांची उत्तरे लिहून देणे कटाक्षाने टाळावयास हवे. तसेच वारंवार चर्चासत्रे घडवून विद्यार्थ्यांना त्यात विविध विषयांवरील चर्चेत भाग घ्यावयास लावले पाहिजे. जे विद्यार्थी दारू आणि धूम्रपानाच्या सवयीला बळी पडतात, त्यांना त्यात कांही गैर वाटत नसले तरी पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या संदर्भात पालकांच्या आणि शिक्षकांच्या दृष्टीने ती एक समस्याच होय हे ध्यानात घ्यायला हवे.

एकूण विशिष्ट बाबतीत विद्यार्थ्यांनी समस्या नाहीत असे सांगितले म्हणून आपणास स्वस्थ बसता येणार नाही. सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक आणि शिक्षणतज्ञ यांनी दोन्ही प्रकारच्या समस्यांचा विचार केलाच पाहिजे.

■ ■

# ८

# पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे आणखी काही प्रश्न

द. पां. आपटे

गोखले अर्थशास्त्र संस्थेमध्ये प्राध्यापक तसेच कुलसचिव या नात्याने माझा पदव्युत्तर विद्यार्थ्यांशी संबंध येतो. गेल्या दहा वर्षांतील काही अनुभवांवर आधारित चर्चा मी येथे करीत आहे. शिक्षणक्रमात प्रवेश घेण्यापासून तो शिक्षणक्रम पुरा करून वा अर्धवट सोडून जाईपर्यंत विद्यार्थ्यांपुढे विविध प्रश्न उभे राहातात. त्यामुळे एका विषयापुरती चर्चा मर्यादित ठेवण्याऐवजी वेगवेगळ्या प्रश्नांचा वा अडचणींचा येथे विचार केला आहे.

पदव्युत्तर शिक्षण घेण्यासंबंधी प्रवेश घेण्यापूर्वी, पुरेसा विचार केला नसल्याचे बऱ्याच विद्यार्थ्यांच्या बाबतीत आढळते. त्यामध्ये नागरी, ग्रामीण, मागासवर्गीय किंवा इतर असा फारसा फरक आढळत नाही. दहावीची परीक्षा झाली की महाविद्यालयात प्रवेश आणि पदवी हातात पडली की पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश, असा सर्वसाधारण नियम आढळतो.

### पुष्कळांची उमेदीची वर्षे वाया जातात

प्रथम पदव्युत्तर शिक्षणाची आवश्यकता कोणाला आहे हे पाहू या. महाविद्यालयात वा विद्यापीठात शिकवण्यासाठी किंवा संशोधनसंस्थेत नोकरी करण्यासाठी पदव्युत्तर शिक्षण आवश्यक आहे. अशा नोकरीसाठी नुसती एम. ए. पदवी पुरेशी पडत नाही. एम. ए. तसेच बी. ए. परीक्षेत कमीत कमी ५५ टक्के गुण आवश्यक असून शिवाय एम. फिल्. वा पीएच्. डी. पदवी महाविद्यालयात, विद्यापीठात आवश्यक आहे. शाळेतील शिक्षकाच्या नोकरीसाठी बी. ए. पदवीचे जोडीला बी. एड्. पदवी असणे आवश्यक आहे. काही वरिष्ठ पदांवरील नोकऱ्यांसाठी एम्. ए. किमान पात्रता असते; परंतु बँका, औद्योगिक समूह यातील बहुतेक नोकऱ्यांसाठी तसेच आय्. ए. एस्. परीक्षेला बसण्यासाठीसुद्धा पदव्युत्तर शिक्षणाची अट नाही. उच्च शिक्षणाने व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो, कार्यक्षमता वाढण्यास मदत होते, इत्यादी मुद्दे जरी पुढे मांडले तरी पदव्युत्तर शिक्षणाची आवश्यकता ही मुख्य करून शिक्षणक्षेत्रात किंवा संशोधनक्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी आहे हे मान्य केले पाहिजे. या क्षेत्रात ज्यांना प्रवेश करावयाचा नाही किंवा बी. ए. परीक्षेतील साधारण यशामुळे व अन्य कारणामुळे ज्यांना एम. ए. पदवी प्राप्त करूनही पुढील आयुष्यात प्राध्यापकाची नोकरी मिळण्याच्या दृष्टीने शक्यता नाही, अशा विद्यार्थ्यांनी एम. ए. शिक्षणक्रमाकडे वळू नये असे मला वाटते. विद्यार्थ्यांमध्ये कुवत नसल्यास त्यांना पदव्युत्तर शिक्षणक्रम पुरा करताना नाकी नऊ येतात व कशीबशी एम. ए. ची पदवी त्यांच्या पदरात पडते. परंतु तिसऱ्या वर्गात पास झालेल्या एम. ए. पेक्षा पहिल्या वर्गात पास झालेला पदवीधर नोकरीसाठी जास्त पसंत केला जातो. त्यामुळे, एम. ए. होऊनही अशा

विद्यार्थ्यांना अपेक्षेप्रमाणे नोकरी मिळत नाही. बी. ए. नंतर दोन वर्षात शिक्षणक्रम पुरा करण्यात अपयश आले तर त्यानंतर दर सहा महिन्यांनी उरलेले विषय सोडवण्यासाठी परीक्षेला बसावे लागते. त्यामध्ये वेळही जातो. राहाण्या-जेवण्याचा खर्च येतो, अभ्यासास पुरेसे मार्गदर्शन मिळत नाही आणि अशा विद्यार्थ्यांपैकी बऱ्याच जणांना शेवटी अभ्यासक्रम अर्धवट सोडावा लागतो. एम. ए. परीक्षेत अपेक्षेप्रमाणे यश न आल्याने किंवा शिक्षणक्रम अपुरा सोडावा लागल्याने विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील ऐन उमेदीची वर्षे वाया जातात, त्याचा आत्मविश्वास ढळतो. आणि त्याच्या जीवनात निराशा येते.

## योग्य मार्गदर्शनाचा अभाव

वरील विवेचनावरून पदव्युत्तर शिक्षण घेण्यापूर्वी आपणास पुढील आयुष्यात कोणत्या प्रकारची नोकरी वा व्यवसाय करावयाचा आहे याचा विद्यार्थ्यांनी सर्व बाजूंनी विचार करणे आवश्यक आहे असे लक्षात येते. बी. ए. झालेल्या वीस-बावीस वर्षांच्या युवक-युवतींमध्ये या बाबतीत आवश्यक तो विचार करण्याची क्षमता असेल असे नाही. त्यांना कोणी तरी मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. येथे नागरी, ग्रामीण, मागासवर्गीय व इतर, असा फरक निश्चितपणे होऊ शकेल. नागरी भागात उच्च शिक्षण घेतलेले संख्येने जास्त असल्याने, तसेच पुढारलेल्या जातीतील अनेक कुटुंबात पिढ्यान्‌पिढ्या उच्च शिक्षण घेतलेल्या व्यक्ती असल्याने, अशा शहरातून वा कुटुंबातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांकडून, आप्तांकडून, प्राध्यापकांकडून वा अन्य कोणाकडून मार्गदर्शन मिळण्याची शक्यता उद्‌भवते. अर्थात सर्वच उच्चशिक्षित व्यक्ती योग्य तो सल्ला देऊ शकतील असे नाही, परंतु ग्रामीण भागातून व मागासवर्गातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी पदव्युत्तर शिक्षण घ्यावे किंवा अन्य काही करावे याबाबत मार्गदर्शन मिळणे फारसे संभवत नाही. तरीसुद्धा पदव्युत्तर शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचे महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राचार्य किंवा पदव्युत्तर शिक्षणकेन्द्रातील प्राध्यापक वा अन्य जाणकार या लोकांचे मार्गदर्शन घ्यावे व पदव्युत्तर शिक्षण घेणे खरोखर आवश्यक आहे का ? ते झेपेल का ? हे ठरवावे.

## क्षमतेच्या आधारावर प्रवेश असावा

काही विद्यापीठांत पदव्युत्तर शिक्षणक्रम घेण्यापूर्वी प्रवेशपरीक्षा घेतली जाते व पदवीपरीक्षेतील व परीक्षेतील गुणांचा विचार करून ते समाधानकारक असल्यास प्रवेश दिला जातो. परंतु बहुतेक विद्यापीठांत व महाविद्यालयांतील पदव्युत्तर केन्द्रात सरसकट सर्वांना प्रवेश दिला जातो. पदव्युत्तर शिक्षणापासून समाजातील कोणत्याही जातीच्या विद्यार्थ्याला वंचित करू नये या धोरणापेक्षा जेवढे जास्त विद्यार्थी तेवढी जास्त आवक असे शिक्षणसंस्थांचे बाजारी धोरण असावे अशी शंका येते. शंका येण्याचे कारण म्हणजे पदव्युत्तर शिक्षणक्रम हा कसाबसा रेटला जातो. त्यासाठी पुरेशा संख्येने व्याख्याने दिली जात नाहीत. शिक्षणसत्रात द्यावयाच्या चाचणी परीक्षा जरूर तेवढ्या न देता सरसकट सर्व विद्यार्थ्यांना ६०/७० टक्के गुण दिले जातात आणि विद्यापीठाच्या अंतिम परीक्षेत यातील बहुसंख्य विद्यार्थी पुरेशी तयारी करून न घेतल्याने नापास होतात. तेव्हा विद्यापीठाने पदव्युत्तर शिक्षणक्रमासाठी प्रवेश देताना चाचणी परीक्षा घेऊन किंवा काहीं नियम लावून शिक्षणक्रम चांगल्या तऱ्हेने पूर्ण करण्याची क्षमता असलेल्यांनाच फक्त प्रवेश देण्याचे धोरण सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या हित राखण्याच्या दृष्टीने ठरवले पाहिजे.

## पदव्युत्तर अभ्यासक्रम निवडण्याची वेगवेगळी कारणे

मुक्तद्वार प्रवेशपद्धतीमुळे वेगवेगळ्या कारणांसाठी विद्यार्थी प्रवेश घेत असल्याचे आढळते. पदवीपरीक्षेपर्यंत तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी राहावयास लागल्यामुळे पदव्युत्तर

शिक्षण घेण्याचे निमित्त करून पुण्यामुंबईचे शहरी जीवन उपभोगावे हा काहींचा हेतु. घरची बागाईत शेती–विशेष करून ऊसाची, पैशाला कमी नाही, तेव्हा दोन-चार वर्षे शिकण्यात गेली तरी एम. ए. पदवी मिळवावी ही पालकांची इच्छा. तिचा पुढील आयुष्यात काय उपयोग हा विचार केलेला नसतो. केवळ पालकांची इच्छा आणि आर्थिक सुस्थिती हे प्रवेश घेण्याचे कारण कमी उत्पन्नाच्या गटातील कुटुंबातील विद्यार्थ्यांना किंवा मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सरकारी विद्यावेतन वा कर्जाऊ शिष्यवृत्ती मिळते. त्याचा फायदा (गैरफायदा) घेऊन मोठ्या शहरात पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घ्यायची काहींची रीत दिसते. त्यामुळे गावी असलेल्या कुटुंबियां-वरील आर्थिक बोजा कमी होतो. (काही वेळा तो निष्कारण वाढतो. कारण पाल्याकडून काही ना काही खर्चासाठी वारंवार पैशाची मागणी केली जाते.) प्रवेश घेतल्यानंतर लवकरच लक्षात येते की, हा अभ्यासक्रम आपल्याला पेलणारा नाही. तेव्हा शिकण्याऐवजी (सरकारी खर्चाने शिष्यवृत्तीचे पैशावर) नोकरी शोधायची आणि शिक्षणक्रम अर्धवट सोडून द्यायचा. शिक्षणक्रम अर्धवट सोडल्यास सरकारकडून मिळालेले शिष्यवृत्तीचे पैसे परत फेडण्याचे विद्या-र्थ्यांवर बंधन नाही. खरे तर प्रत्येक शिष्यवृत्तीपोटी मिळालेले पैसे शिक्षण पूर्ण झाल्यापासून किंवा अर्धवट सोडल्यापासून सव्याज वा बिनव्याज मासिक हप्त्याने परत फेडण्याचे कायदेशीर बंधन असावयास हवे. त्यामुळे मिळालेल्या आर्थिक मदतीचा चांगला उपयोग करून सरकारचे, समाजाचे, ऋण फेडण्याची नैतिक जबाबदारी विद्यार्थ्यांवर राहील व एक जबाबदार नागरिक घडवण्याचे दृष्टीने ही एक चांगली बाब राहील. शिवाय सरकारच्या तिजोरीवरील बोजा हलका होऊन गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी पैसा उपलब्ध होईल. तसेच बेजबाबदार विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेण्याच्या पद्धतीला यामुळे आळा बसेल.

### विद्यार्थिनींनी विचार करण्याची गरज

विद्यार्थिनींचे बाबतीत लग्न ठरेपर्यंत पदव्युत्तर शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेतल्याचेही आढळते; परंतु अर्धवट शिक्षणक्रम सोडण्याऐवजी दुसरा एखादा, नोकरी मिळण्याचे दृष्टीने किंवा संसारो-पयोगी काही अभ्यासक्रम त्यांनी पार पाडल्यास त्यांना तो जास्त उपयोगी ठरेल. तेव्हा विद्या-र्थ्यांप्रमाणेच विद्यार्थिनींनीही पदव्युत्तर शिक्षण घेण्यासंबंधी जास्त विचार केला पाहिजे.

### राहण्या-जेवण्याची गैरसोय

प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्यांना दोन तऱ्हेच्या अडचणींना तोंड द्यावे लागते. परगावाहून येणाऱ्यांना वसतिगृह व भोजनाची सोय व पदव्युत्तर अभ्यासक्रम व शिक्षणपद्धती पचनी पडणे, यातील अडचणी येतात. प्रथम राहण्या-जेवण्याचा विचार करू. गेली तीन-चार वर्षे पुणे विद्यापीठाच्या पदवी परीक्षेचा निकाल जुलै अखेर वा ऑगस्टमध्ये लागतो. तोपर्यंत महाविद्यालयांतील व खाजगी वसतिगृहांतील व घरांतील खोल्या इतर विद्यार्थ्यांनी घेतलेल्या असतात. त्यामुळे जागेसाठी वणवण फिरावे लागते. पुण्यातील विद्यार्थी सहाय्यक समितीच्या वा अन्य वसतिगृहात विद्या-र्थ्यांनी आधीपासूनच प्रवेशअर्ज दिले तर इतकी अडचण येत नाही; परंतु बऱ्याच विद्यार्थ्यांना या सोयीची माहिती नसते. या बाबतीत खरे म्हणजे त्यांच्या महाविद्यालयांतील प्राध्यापकांनी यासंबंधी माहिती देऊन, आधी पुरेशी खटपट करण्याचा सल्ला दिला पाहिजे. महाविद्यालयाच्या व अन्य संस्थांच्या वसतिगृहांत राहण्या-जेवण्याचा खर्च सर्वसाधारण विद्यार्थ्यांच्या खिशाला पर-वडणारा असतो, परंतु जर तेथे प्रवेश मिळाला नाही तर खाजगी जागेत खोली घेऊन राहणे व बाहेर जेवणे हे खूपच खर्चाचे होते व मध्यमवर्गातील पालकांना न परवडणारे ठरते. 'पेईंग गेस्ट' पद्धतीत परदेशी पाहुण्यांना व विद्यार्थ्यांना प्राधान्य मिळते, कारण त्यांच्याकडून पैसेही जास्त मिळतात व परदेशी असल्याचे आकर्षण असते. परंतु ज्यांना शक्य आहे अशा शहरातील

सुखवस्तु कुटुंबांनी ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना या सवलतीचा फायदा उपलब्ध करून दिला पाहिजे.

### दुर्बल घटकांच्या विशेष अडचणी

दुर्बल घटकांतील कुटुंबांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांना शहरातील खर्च भागवणे आणखीच जड जाते. वसतिगृहात राहायला मिळाले तरी खाणावळीचा खर्च, निदान दोनदा चहा व खाणे, कपडालत्ता व इतर खर्च भागवणे कठीण होते. मग अशा विद्यार्थ्यांमध्ये एक गट करून राहण्याची प्रवृत्ती निर्माण होते. त्यांना इंग्रजीमध्ये संभाषण करता येत नाही. त्यामुळे वसतिगृहातील इतर विद्यार्थ्यांत मिसळता येत नाही व एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण होतो. विद्यार्थिनींपैकी बहुतांशी सधन कुटुंबांतील असल्याने त्यांच्याशीही मैत्री होत नाही. फी भरण्यासाठी, खाणावळीचे पैसे देण्यासाठी व इतर पैसे देण्यासाठी त्यांना धावपळ करावी लागते. वेळप्रसंगी मानहानी पत्करावी लागते. पैशांच्या विवंचनेत राहिल्यामुळे अभ्यासाकडे लक्ष लागत नाही आणि परिणामी परीक्षेत अपेक्षित यश मिळत नाही. सरकारी कारभारसुद्धा और आहे. कर्जाऊ शिष्यवृत्तीच्या अर्जांचा निकाल वर्षाअखेर लागतो. ज्यांना शिक्षणक्रम पार पाडण्यासाठी खरोखरच आर्थिक साहाय्याची जरूर आहे व त्यासाठी ज्यांनी कर्जाऊ शिष्यवृत्ती मिळण्यासाठी अर्ज केला आहे अशा विद्यार्थ्यांनी अर्जांचा निकाल लागेपर्यंत पैसे कोठून उभे करावयाचे ? या प्रश्नाचे गांभीर्य शिक्षणखात्याच्याही लक्षांत येऊ नये हे अत्यंत खेदजनक आहे. मागासवर्गीयांना मिळणाऱ्या शिष्यवृत्त्यांबाबतची परिस्थिती थोडी बरी आहे. पैसे जरी वर्षअखेर मिळणार असले तरी महाविद्यालयांतील व विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या मेहेरबानीने उचल मिळू शकते. पण मेहेरबानीची याचना करण्याची वेळ तरी का आणावी ? दरमहा निश्चित हप्ता देण्याची सोय व्हावयास हवी.

### काही न पेलणारे अभ्यासक्रम व विद्यार्थी

आता पदव्युत्तर अभ्यासक्रम व शिकवण्याच्या पद्धतीचा विचार करू. काही अभ्यासक्रम अवघड आहेत आणि सर्वसामान्य विद्यार्थ्यांना न पेलणारे आहेत. त्यामुळे निदान दुसऱ्या वर्गात चांगले गुण मिळवून यशस्वी होणे हे ज्यांच्या अंगी क्षमता आहे अशा बुद्धिमान विद्यार्थ्यांनाच शक्य होऊ शकते. तेव्हा अशा अभ्यासक्रमांना, सर्वसाधारण बुद्धीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन वर्षअखेर त्यांच्या पदरी अपयशाचे माप घालण्याऐवजी विद्यापीठाने पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश देतानाच निश्चित धोरण आखावे व चाचणी परीक्षा घेऊन वा ठराविक टक्के गुण ज्यांना आहेत अशांनाच प्रवेश द्यावा.

### माध्यम : मराठी व इंग्रजी

चांगल्या पदव्युत्तर केंद्रात प्रवेश मिळण्यासाठी पदवी परीक्षेत चांगले गुण मिळवणे आवश्यक असते व ते मराठी माध्यमांतून अभ्यास केल्याने शक्य होते. परंतु पुणे विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षणाचे माध्यम इंग्रजी व परीक्षेची प्रश्नपत्रिका इंग्रजी भाषेत; फक्त मराठीतून उत्तर लिहिण्याची सवलत. ज्या विद्यार्थ्यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण मराठी माध्यमातून झालेले असते त्यांना इंग्रजी माध्यम जड जाते. वर्गात प्राध्यापक काय शिकवतात ते समजत नाही. प्राध्यापकांनी वाचावयास सांगितलेली पुस्तके वा लेख कळत नाहीत आणि कळले तरी इंग्रजी भाषेतून योग्य तऱ्हेने उत्तर देता येत नाही. तेव्हा जोपर्यंत पदव्युत्तर शिक्षणासाठी व प्रश्नपत्रिकांसाठी इंग्रजीचा माध्यम म्हणून वापर केला जातो तोपर्यंत पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेचा जरूर तितका अभ्यास केला पाहिजे. त्यासाठी इतर मित्रांचे साहाय्य घेतले पाहिजे. इंग्रजी बोलण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सुरुवातीला चुकले तरी चुका समजून घेऊन सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे. इंग्रजीतून उत्तरे लिहून प्राध्यापकांना विषयाबरोबर इंग्रजीच्या चुकाही नजरेस आणून

देण्याची विनंती केली पाहिजे. शब्दकोशाचा कटाक्षाने वापर करून शब्दांचा अर्थ समजून घेतला पाहिजे. वारंवार येणाऱ्या तसेच महत्त्वाच्या आणि अवघड शब्दांचे स्पेलिंग पाठ केले पाहिजे. जेव्हा जेव्हा वेळ मिळेल तेव्हा तेव्हा, इंग्रजी भाषा आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. असे न करणाऱ्या विद्यार्थ्यांची धडगत लागत नाही. त्यांना सुमार यश मिळते किंवा शिक्षणक्रम अपुरा सोडण्याची त्यांच्यावर पाळी येते.

### आवश्यक विषय शिकायलाच हवेत

काही अभ्यासक्रमांसाठी गणित व संख्याशास्त्राचे ज्ञान आवश्यक ठरते. बी. ए. पास होणाऱ्या बहुतेक विद्यार्थ्यांचा या दोन्ही विषयांशी संबंध नसतो. परंतु तरीसुद्धा जर हे मुख्य विषयांचे ज्ञान प्राप्त करून घेण्याच्या दृष्टीने आवश्यक असतील तर त्यांचा अभ्यास केला पाहिजे. इंग्रजी, गणित, संख्याशास्त्र किंवा अन्य आवश्यक विषय शिकण्याची जिद्द बाळगली पाहिजे. त्यांचा ध्यास घेतला पाहिजे. याउलट हे विषय न येणारे विद्यार्थी त्यांचा एक अलग गट करून वावरू लागले तर त्यांना ऊर्जितावस्था येणे अशक्य आहे.

### प्राध्यापक-विद्यार्थी संबंधांची गरज

वरील चर्चेमध्ये प्राध्यापकांकडून विविध अडचणींच्या संदर्भात सल्ला घेण्याची सूचना केली आहे. त्यातील एक महत्त्वाची अडचण म्हणजे प्राध्यापक व विद्यार्थी यांचा महाविद्यालयीन वा पदव्युत्तर शिक्षणात वैयक्तिक जवळिकीचा संबंध येत नाही. परंतु ज्या विद्यार्थ्यांना असा सल्ला घेण्याची गरज आहे, वैयक्तिक अडचणी असोत वा अभ्यासक्रमातील न समजलेल्या भागासंबंधी मार्गदर्शन हवे असो, त्यांनी प्रयत्नपूर्वक, प्राध्यापकांशी वैयक्तिक संबंध जोडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. बहुतेक शिक्षकांकडून अशा विद्यार्थ्यांना निश्चितच साद मिळेल असे वाटते. पदव्युत्तर केंद्रात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची सुरुवातीला प्राध्यापकांना माहिती नसते. तेव्हा विद्यार्थी सांगतील त्या माहितीच्या आधारावर प्राध्यापक त्यांच्या वैयक्तिक अडचणी सोडवण्यासंबंधात मदत करतात. त्यामध्ये त्यांना बरेवाईट अनुभव येतात. परंतु दहा विद्यार्थ्यांना मदत केली आणि त्यात दोन चार कटु अनुभव आले तरीसुद्धा प्राध्यापकांना त्यांची जबाबदारी टाळता येणार नाही.

### सवलतींचा दुरुपयोग

आधी म्हटल्याप्रमाणे सध्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सरकारी शिष्यवृत्त्या वा कर्जाऊ शिष्यवृत्त्या मिळण्याची सोय असल्याने अशा सवलतींचा फायदा पदव्युत्तर शिक्षण घेण्याऐवजी पुण्यासारख्या शहरामध्ये नोकरी शोधण्यासाठी केला जातो. असे विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षण-क्रमासाठी व त्या निमित्ताने वसतिगृहामध्ये प्रवेश घेतात. त्यासाठी त्यांना सुरुवातीला थोडे-फार पैसे भरावे लागतात. त्यानंतर सात-आठ महिन्यांनी संस्थेला सरकारी शिष्यवृत्तीचे पैसे मिळतात. जरूर लागली तर शिष्यवृत्तीचे पोटी विद्यापीठाकडून उचल मिळते. त्यामुळे यापैकी काही विद्यार्थी अशी शिष्यवृत्ती घेऊन नोकरीची खटपट करीत राहतात व नोकरी मिळताच शिक्षणक्रम सोडून निघून जातात. त्यानंतर या विद्यार्थ्यांकडून येणे असलेले वसतिगृहाचे भाड्याचे पैसे, मेसमधील जेवणाचे पैसे, वगैरेची वसुली करणे हे संस्था-चालकांचे काम होऊन बसते. शिक्षणक्रम सोडून जाताना संस्था-चालकांना न सांगता विद्यार्थी वसतिगृहातून निघून जातात. त्यामुळे त्यांच्या मित्रांकडून त्यांचा पत्ता मिळाला तर त्याआधारे त्यांचा पाठपुरावा करावा लागतो. येणे असलेले पैसे दरमहा हप्त्याने फेडा अशी विनंती करूनही काही वेळा पैसे येत नाहीत. मग जेथे ते नोकरी करतात तेथील वरिष्ठ अधिकाऱ्यांना यासंबंधी कळविण्याची धमकी दिल्यानंतर एखाद-दुसरा हप्ता येतो. मग पुन्हा विनंती व शेवटी वरिष्ठ अधिकाऱ्यांना

पत्र. अशा विद्यार्थ्यांपैकी बहुतेकांची आर्थिक परिस्थिती चांगली नसेल याबद्दल दुमत नाही; परंतु चार-सहा महिने जेवण घेतले त्याचेसुद्धा पैसे न देण्याची बेपर्वाई आणि नैतिक जबाबदारीच्या जाणिवेचा अभाव याचे दुःख होते. पदवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या या विद्यार्थ्यांवर शिक्षणाचे काहीच संस्कार होत नाहीत का ?

आमच्या संस्थेच्या ग्रंथालयात बसून वाचावयासाठी पुस्तके हवी असली तर वर्षाला फक्त ५ रुपये द्यावे लागतात. जर घरी पुस्तके न्यावयाची असली तर दोन पुस्तकांना रु. ८० डिपॉझिट व वर्षासाठी रु. दहा द्यावे लागतात. अभ्यासक्रम सोडून जाताना जरी डिपॉझिटचे रु. ८० परत मिळणार असले तरी सुरुवातीला एवढी रक्कम भरणे काही विद्यार्थ्यांना जड जाते. चार वर्षांपूर्वी एका विद्यार्थ्यासाठी डिपॉझिट भरण्याकरता आम्हा शिक्षकांपैकी एकाने ८० रुपये दिले. पहिले वर्ष संपल्यावर नोकरी मिळताच शिक्षणक्रम सोडून न सांगता तो विद्यार्थी गेला. मात्र जाण्यापूर्वी डिपॉझिटचे ८० रुपये त्याने काढून नेले. अजूनही या विद्यार्थ्याकडून या पैशांची फेड पूर्णपणे झालेली नाही. यंदाच्या वर्षी दोन-तीन विद्यार्थ्यांना पैशाची अडचण होती म्हणून त्यांच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी ऐच्छिक वर्गणी काढून, काही रकमा गोळा करून, आमच्या संस्थेकड गरीब विद्यार्थ्यांचे लायब्ररी डिपॉझिट भरण्यासाठी दिले आहेत. त्यामधून एका विद्यार्थ्याचे रु. ८० भरले; परंतु तो विद्यार्थीही पहिल्या सत्रात अनियमित हजर राहून पहिल्या सत्राच्या विद्यापीठाच्या परीक्षेला बसला नाही. विद्यार्थी सहाय्यक समितीच्या कार्यकर्त्यांना गळ घालून तेथे त्याची राहण्याची व जेवण्याची सोय मी केली होती; परंतु तेथेही न सांगता व जेवणाचे वगैरे पैसे न देता तो विद्यार्थी समितीचे वसतिगृहातून निघून गेला. अडचणी असतातच; पण ही वागण्याची तऱ्हा इतर विद्यार्थ्यांच्या अडचणी वाढवते.

वसतिगृहामध्ये जेवण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये जेवणाचे पैसे चार-सहा महिने बाकी ठेवणारे, हे बहुधा सरकारी शिष्यवृत्त्यांवर अवलंबून राहणारे असतात. वर्षअखेर सरकारकडून पैसे मिळण्याच्या आशेवर त्यांना जेवण देण्यात येते. जो विद्यार्थी समंजस आहे व ज्याला नैतिक जबाबदारीची जाणीव आहे त्याला याची पूर्ण जाणीव असते व तो अधूनमधून संस्था-चालकांना भेटून पैसे फेडण्यासाठी मुदत मागून घेतो; परंतु अशी जाणीव नसणारे विद्यार्थी संस्था-चालकांनी बोलावणे पाठविले तरी भेटण्याची टाळाटाळ करतात. लहान वसतिगृहातील खाणावळीत जेवण घेणाऱ्यांची संख्याही कमी असल्याने तेथे खाणावळ चालवणे अवघड होते.

पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे, विशेष करून ग्रामीण भागातून येणाऱ्या आणि मागास जाती-जमातींच्या विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

■ ■

# ९

## संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रश्न

स. श्री. ठिगळे

'अ‍ॅपलचे यशस्वी उड्डाण', 'सागरी संपत्ती मिळविण्याचे तंत्र, भारतीय शास्त्रज्ञांना ज्ञात...', 'अग्निबाणाची यशस्वी झेप...', या व अशा प्रकारच्या संशोधनाची प्रगती सांगणाऱ्या बातम्या विविध प्रसिद्धी-माध्यमांतून–दूरदर्शन, आकाशवाणी, वृत्तपत्रे–आपल्यापर्यंत अधूनमधून पोहोचवीत असतात. या पार्श्वभूमीवरच अधूनमधून विद्यापीठांमध्ये चाललेल्या संशोधनांची चर्चाही आपल्या वाचण्यात किंवा अैकण्यात येते. दुर्दैवाने विद्यापीठांमध्ये चाललेल्या संशोधनाबद्दल जे वाचण्यात वा अैकण्यात येते त्याचा सूर, काही अपवाद वगळता, बहुतांशी टीकेचाच असतो. अनेक वेळा या टीकात्मक सुरांमधून काही मूलभूत प्रश्न ध्वनित होतात. विद्यापीठांमधील संशोधनाचे उद्दिष्ट काय ? त्याचे फलित काय ? त्याची सामाजिक उपयुक्तता किती ? या संशोधनाचा दर्जा काय ? यावर होणारा अवाढव्य खर्च व त्यातून निघणारे निष्कर्ष यांचा मेळ काय ? वगैरे वगैरे. बरेच वेळा या प्रश्नांवरील चर्चेला टीकेची तीव्र धार चढते. तथापी ही टीका कितपत गांभीर्याने होते ? या चर्चेची व टीकेची विद्यापीठीय, राज्यस्तरीय व राष्ट्रीय पातळीवर कितपत दखल घेतली जाते; या टीकेत कितपत तथ्य आहे ? तथ्य असल्यास त्यावर उपाय-योजना सुचविली जाते का ? का ही टीका केवळ 'विद्यापीठे म्हणजे डॉक्टरेटस् निर्माण करणारे कारखाने आहेत, असे म्हणण्याकरिताच आहे ? असे अनेक प्रश्न तुमच्या-आमच्या मनात घर करून राहातात.

या पार्श्वभूमीवर जेंव्हा 'महाराष्ट्रातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रश्न' या शोधनिबंध-संग्रह-पुस्तकासाठी, संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या (पीएच. डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या) प्रश्नांवर लिहाल काय ? अशी विचारणा झाली तेव्हा मी लगेच होकार दिला. ही विचारणा व लेख लिहिण्याची वेळ यात सुमारे वर्षाचा अवधी मिळाला. या कालावधीत नागपूर व शिवाजी विद्यापीठात संशोधन करणाऱ्या काही विद्यार्थ्यांची तसेच काही गाईडस्‌ची गाठभेट झाली. पुणे विद्यापीठातील संशोधन करणारे विद्यार्थी व गाईडस् तर घरचेच. या सर्वांशी झालेल्या चर्चेचा परिणाम म्हणजे हा शोधनिबंध.

### संशोधन-पद्धती

वर उल्लेख केल्याप्रमाणे हा शोधनिबंध मुख्यत्वेकरून पुणे, नागपूर व शिवाजी विद्यापीठांतील संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या चर्चेवर आधारित आहे. या शोधनिबंधासाठी एक प्रश्नमालिका तयार करण्यात आली होती. ती सर्व दृष्टींनी परिपूर्ण होण्याच्या दृष्टीने काही विभागप्रमुख, गाईडस् व विद्यार्थी यांच्याशी प्रथम विचार-विनिमय केला. या प्रश्नमालिकेवर आधारित मुलाखती (Structured Interviews) घेण्यात आल्या.

**संशोधन करताना तुम्हाला कोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागते ?–** या प्रश्नाच्या उत्त-रांचा आढावा घेताना असे आढळून आले की, संशोधन करताना येणाऱ्या अडचणींचे स्वरूप विद्याशाखेच्या स्वरूपाप्रमाणे बदलत असते. शास्त्रशाखेतील विद्यार्थ्यांच्या अडचणी या वाङमय, वाणिज्य वा समाजशास्त्र, क्षेत्रांत संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा भिन्न असतात. शास्त्रशाखेतील विद्यार्थ्यांस संशोधनासाठी प्रयोगशाळा, विशिष्ट उपकरणे, व ग्रंथालयातील सुविधा, यांवर अव-लंबून राहावे लागते. उलटपक्षी वाङमय किंवा वाणिज्यशाखेतील संशोधन बहुतांशी ग्रंथालया-तील सुविधांवर अवलंबून असते. शिवाय काही शास्त्र व समाजशास्त्र शाखांतील विषयात संशो-धन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संशोधनामध्ये क्षेत्र-कामाला ( field work ) महत्त्व असते. त्यामुळे त्यांच्या अडचणींचे स्वरूप आणखीनच वेगळे असते. यामुळे या अडचणींची खालीलप्रमाणे गटवारी केली :

– ग्रंथालयात येणाऱ्या अडचणी,
– क्षेत्र-कामात येणाऱ्या अडचणी,
– प्रयोगशाळेत येणाऱ्या अडचणी, आणि
– कार्यालयीन व इतर अडचणी.

प्रत्येक गटात येणाऱ्या अडचणींचे विवेचन खाली केले आहे.

**ग्रंथालयांतील अडचणी–** कोणत्याही प्रकारच्या संशोधनामध्ये ग्रंथालयांना अनन्यसाधारण महत्त्व असते. ग्रंथालयांमध्ये जितक्या अधिक सोयी उपलब्ध होतील तितक्या कोणाही संशोध-काला हव्याच असतात. ग्रंथालयात येणारे संदर्भ ग्रंथ, भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय संशोधन पर नियतकालिके, यांची संख्या संशोधन करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना अपुरी वाटते. विशेषत: आंतरराष्ट्रीय नियतकालिकांची निकड फारच तीव्रतेने जाणवते. अशा नियतकालिकांसाठी दुसऱ्या ग्रंथालयांवर अवलंबून राहावे लागते. त्यात खूपच वेळ जातो व शिष्यवृत्ती तर ठराविक काळा-पुरतीच असते. बव्हंशी विद्यार्थ्यांची अशी तक्रार दिसली की, काही आंतरराष्ट्रीय नियतकालि-कांचा वापर फारच मर्यादित आहे किंवा नाहीच. त्यांची संख्या कमी करून नेहमी लागणाऱ्या आंतरराष्ट्रीय नियतकालिकांची संख्या वाढवावी. काही थोड्याजणांची अडचण अशी आहे की, ग्रंथालयांना अनावश्यक सुट्ट्या फार असतात. सुट्ट्या कमी करून ग्रंथालये जास्तीत जास्त वेळ कशी उघडी राहातील याचा विचार संबंधित अधिकाऱ्यांनी करावा. तसेच पुस्तके जागचे जागी न सापडणे, ती शोधण्यात वेळ जाणे, इत्यादी, अडचणींनाही विद्यार्थ्यांना तोंड द्यावे लागते. दहा ते पंधरा ग्रंथ वा नियतकालिके घरी वाचण्यास उपलब्ध होऊ शकतात याबद्दल मात्र संशोधन करणारे विद्यार्थी समाधानी आहेत.

**क्षेत्र-कामात येणाऱ्या अडचणी –** काही विषयांतील संशोधनात क्षेत्रकामाला, तेथे जमविलेल्या सामग्रीला, फारच महत्त्व असते. किंबहुना अनेक प्रबंधांचा क्षेत्र-काम हा गाभा असतो. या क्षेत्र-कामासाठी विद्यार्थ्यांना खेडोपाडी जावे लागते, दऱ्याडोंगरांतून फिरावे लागते. काहींना अनेक दिवस, तर काहींना महिनोंमहिने क्षेत्र-काम करावे लागते. यासाठी सुविधा मात्र फारच तुटपुंज्या असतात. खेड्यापाड्यात राहाण्याची-जेवणाची सोय होऊ शकत नाही. बहुतेक वेळा सरकारी विश्रामगृहांमध्ये केवळ विद्यार्थी म्हणून राहाण्याचीही सोय होऊ शकत नाही. दुसरी महत्त्वाची अडचण म्हणजे प्रवास. एस. टी. ने प्रवास म्हणजे दिव्यच. हव्या तितक्या प्रमाणात पैसा उपलब्ध नसल्याने जीप नेणे परवडत नाही. पैसा उपलब्ध नसल्यास विद्यापीठांमधल्या जीप्स उपलब्ध नसतात. अशा अनेक अडचणींतून विद्यार्थ्यांना क्षेत्र-काम करावे लागते.

**प्रयोगशाळेतील अडचणी –** प्रयोगशाळांतील सुविधा व अडचणी यांविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा करताना असे आढळले की, या विद्यार्थ्यांना प्रयोगशाळेत काम करताना विविध प्रकारच्या अड-

चणींना तोंड द्यावे लागते. संशोधनाची, विशेषत: शास्त्रीय संशोधनाची, वेगाने होणारी प्रगती त्यातून निर्माण होणारी अत्याधुनिक उपकरणे व आपल्या प्रयोगशाळा, त्यातील सुविधा, यात खूपच तफावत आहे. सर्वसाधारणपणे विद्यार्थ्यांना प्रयोगशाळेत काम करताना खालील अड-चणींना तोंड द्यावे लागते :

- काही विभागांमधील प्रयोगशाळांमध्ये नेहमी लागणारी उपकरणेसुद्धा सहजगत्या हाताळा-यला मिळत नाहीत.
- बहुतेक प्रयोगशाळांमध्ये अत्याधुनिक उपकरणांचा मोठ्या प्रमाणात अभाव आहे. जी काही अत्याधुनिक उपकरणे उपलब्ध असतात त्यांची जबाबदारी विशिष्ट व्यक्तींवर सोपविलेली असते. त्या उपकरणांची उपयुक्तता सर्वस्वी त्या व्यक्तीवर अवलंबून असते. यातून काही अडचणी निर्माण होतात.
- नेहमी लागणारी उपकरणे व रसायने पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसतात. अनेक वेळा उपकरणे नादुरुस्तच असतात. ही उपकरणे दुरुस्त व्हावयास किंवा नवीन रसायने किंवा उपकरणे मिळण्यास काही दिवसच नव्हे तर महिनोन्महिने वाट पहावी लागते.
- एखादी वस्तू आज उपलब्ध असते तर उद्या नसते. ती वस्तू उपलब्ध होईपर्यंत दुसरी वस्तू दुर्मिळ झालेली असते. अशा परिस्थितीत संशोधन करणे म्हणजे तारेवरची कसरतच आहे.
- अनेक वेळा एखादा गाईड व त्याचे विद्यार्थी दुसरे गाईड्स व त्यांच्या विद्यार्थ्यांच्या कामात अडथळे निर्माण करण्यासाठी उपकरणांमध्ये तांत्रिक बिघाड करणे, रसायने लप-विणे, आदी उद्योगात मग्न असतात.

या सर्व अडचणींमुळे संशोधनाचे वेळापत्रक ठरविणे अशक्य होते; वेळेचा अपव्यय होतो. तसेच मानसिक परिस्थिती विचित्र होते.

**कार्यालयीन व इतर अडचणी** – यातही विविध प्रकारच्या अडचणींचा अंतर्भाव दिसून येतो. अनेक वेळा शिक्षणक्षेत्राला न शोभणारे असे प्रकारही घडतात, असे विद्यार्थ्यांचे म्हणणे दिसते. यातील महत्त्वाच्या अडचणी खालीलप्रमाणे :

- काही विभागांमध्ये विभागप्रमुख व त्यांच्या विश्वासातील सहकाऱ्यांच्या विद्यार्थ्यांना अनेक सुविधा तत्परतेने उपलब्ध होऊ शकतात. इतर विद्यार्थ्यांना मात्र आकसाची वाग-वणूक मिळते.
- प्रत्येक विभागात असलेल्या सुविधा व संशोधन करणारे विद्यार्थी यांचे प्रमाण अतिव्यस्त आहे. त्यामुळे बसायलाच जागा नसते, मग बाकीच्या सुविधांबद्दल न बोललेलेच बरे अशी परिस्थिती असते.
- कार्यालयामार्फत जो पत्रव्यवहार वगैरे करावा लागतो त्याला अनेक वेळा विलंब लागतो. क्षेत्र-कामासाठी प्रश्नावली तयार केल्यानंतर टंकलेखन करून सायक्लोस्टायलिंग होणे यातही अनेकदा खूप वेळ जातो.
- कारकून, स्टोअर-कीपर, तसेच लॅबोरेटरी ॲसिस्टंट यांच्या मर्जी-गैरमर्जीतूनही काही अडचणी निर्माण होतात.
- विद्यापीठांमधील विविध विभागांमध्ये हवे तितके सहकार्य नसते. त्यामुळे तेथील उपकर-णांच्या सुविधा तत्परतेने मिळू शकत नाहीत. काही ठिकाणी अशा उपकरणांसाठी भाडे आकारले जाते व ते अवाजवी असते.
- विद्यापीठांच्या मध्यवर्ती कार्यालयांतून ग्रँटस्‌चे आगाऊ पैसे (advance) मिळण्यास पुष्कळ वेळा उशीर लागतो. त्यामुळेही अनेक अडचणी निर्माण होतात. विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या

शिष्यवृत्त्यांची रक्कम मात्र, काही अपवाद वगळता मध्यवर्ती कार्यालयांमधून ठरलेल्या वेळी मिळते.

– एखाद्या विभागातील एखादा गाईड व त्याचे विद्यार्थी, टोळी करून, दुसरे मार्गदर्शक व विद्यार्थी यांनाही हर तऱ्हेचा त्रास देण्यात सदैव आनंद मानतात. टोळी, विद्यार्थ्याने कष्टाने जमविलेली संशोधन-सामग्री पळविणे, पुस्तके लपविणे, एकमेकांत भांडणे लावणे वरिष्ठ अधिकाऱ्यांना निनावी पत्रे लिहिणे, इत्यादी लाजिरवाण्या गोष्टी करण्यात दंग असते. यामुळे काही विद्यार्थ्यांमध्ये मानसिक तणाव निर्माण होऊन त्यांच्या आत्मविश्वासास तडा जातो.

– शिष्यवृत्तीधारकांना मिळणाऱ्या इतर खर्चासाठीच्या (Contingency) रकमेचा विनियोग कसा करायचा हे अनेक वेळा विभागप्रमुख ठरवितात. त्यातून काही अडचणी निर्माण होतात. काही विभागात मात्र या रकमेचा वापर विद्यार्थी व त्यांचे गाईडस् स्वतंत्रपणे करू शकतात.

**गाईडस्‌बद्दल विद्यार्थ्यांची मते काय आहेत ?**

संशोधन व संशोधन करणारे विद्यार्थी यांच्यातील सर्वांत महत्त्वाचा दुवा म्हणजे गाईड. कोणत्याही प्रबंधामधील सामग्री गोळा करण्याच्या पद्धती, या सामग्रीची मांडणी, विश्लेषण व तर्कशुद्ध निष्कर्ष, या सर्वांत मोठ्या प्रमाणात गाईडचाही सहभाग असतो. विद्यार्थ्यांकडून सामग्री जमवून घेण्याचे, ती जमविताना विद्यार्थी योग्य पद्धतीचा वापर करीत आहे किंवा नाही, त्यात तो खोटेपणा करीत नाही ना हे पाहाण्याचे, ही सामग्री आपण का जमवीत आहोत याची जाणीव करून देण्याचे, तसेच विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व शास्त्रीय चिकित्सा जागृत करण्याचे महत्त्वाचे कार्य गाईडचेच असते. थोडक्यात म्हणजे संशोधनाच्या गुणवत्तेला गाईड सर्वार्थाने जबाबदार असतो. या कारणामुळेच विद्यार्थी व गाईडस् यांच्या परस्पर संबंधांचा सविस्तर परामर्ष घेण्याचा प्रयत्न केला आहे.

तुमचे गाईड किती विद्यार्थ्यांना गायडन्स देतात ? या प्रश्नाच्या उत्तरात असे आढळून आले की, बहुतेक गाईडस् सरासरी चार ते पाच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असतात. काहीजण एक किंवा दोनच विद्यार्थ्यांना एकावेळी मार्गदर्शन करणे पसंत करतात. तथापि काही गाईडस् असेही आहेत की, ते दहा ते पंधरा विद्यार्थ्यांना एकाच वेळी मार्गदर्शन करीत आहेत. एवढेच नव्हे तर काहींच्या प्रतीक्षा-यादीत (Waiting list) आणखी दहा-पंधरा विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

या पार्श्वभूमीवर, जेव्हा तुमचे गाईड आठवड्यात सरासरी किती वेळ चर्चेसाठी किंवा अडचणी सोडविण्यासाठी उपलब्ध असतात असा प्रश्न विद्यार्थ्यांना विचारला, तेव्हा विविध प्रकारची–त्यातील काही उपहासगर्भही होती–उत्तरे मिळाली. अर्थात अपेक्षेप्रमाणे फारच थोड्या विद्यार्थ्यांनी आमचे गाईडस् आमच्या अडचणी सोडविण्यासाठी वा चर्चेसाठी भरपूर वेळ उपलब्ध असतात असे अभिमानाने व आदराने सांगितले. ज्यांनी असे सांगितले त्यांनी प्रांजलपणे हेही कबूल केले की, त्यांचे गाईडस्‌च त्यांच्यापेक्षा अधिक वेळ विभागात हजर असतात व विद्यार्थ्यांची गैरहजेरी ते सतत नजरेस आणून देत असतात. संशोधनावर चर्चा करण्यात, त्यातील अडचणी सोडविण्यात त्यांना मनापासून आनंद वाटत असतो. अशा गाईडस्‌ची आपल्या विद्यार्थ्यांनी निरनिराळ्या चर्चासत्रात भाग घ्यावा, परिषदांना उपस्थित राहावे, अशीही अपेक्षा असते. यापैकी अनेकजण दर आठवड्याला व महिन्यातून निदान एकदा आपल्या विद्यार्थ्यांची सभा घेऊन त्यांच्या प्रगतीचा आढावा घेत असतात. पुढील कार्यक्रमाची आखणी करतात. थोडक्यात म्हणजे विद्यार्थ्यांना संशोधनाची आवड लागेल व त्यांच्या संशोधनाच्या प्रगतीचा वेग कायम राहील यासाठी हे गाईडस् सदैव प्रयत्नशील असतात.

अर्थात बहुसंख्य विद्यार्थी या आनंदाला त्यांच्या गाइडस्च्या प्रवृत्तींमुळे पारखे झालेले दिसतात. बहुतेक गाईडस् हे साडेअकरा ते बाराच्या सुमारास विभागात येतात व चार-पाचच्या सुमारास घरी परततात, असे विद्यार्थ्यांशी चर्चा करताना आढळले. अशा गाईडस्ना विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यास व त्यांच्याशी चर्चा करण्यास फारशी सवड सापडत नाही. या परिस्थितीची कारणे सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे असतात :

– विषयातील मान्यतेमुळे व वरिष्ठ हुद्द्यामुळे (विभाग-प्रमुख, प्रोफेसर्स, आदी) अशा गाईडस्ना परीक्षक, निवडसमितीचे सदस्य, व्याख्याने वा परिसंवादात भाग घेणारे, म्हणून वरचेवर बाहेरगावी वा परदेशी जाण्याचा योग येत असतो. साहजिकच त्यांचे विद्यार्थ्यांच्या संशोधनाकडे दुर्लक्ष होते.
– अनेक गाईडस्ना विद्यापीठातील अभ्यासेतर कार्यक्रमांमध्ये ( Extra–Curricular activities ) अधिक भाग घ्यावा लागतो. अशा गाईडस्ची सामाजिक बांधिलकीही अधिक असते.
– काही गाईडस् विद्यापीठीय किंवा तत्सम राजकारणात रस घेतात.
– काहींना सहकाऱ्यांबरोबर गप्पा मारण्यात विशेष आनंद मिळत असतो.
– बऱ्याच जणांचा वेळ कँटीनमध्ये दोन-तीन फेऱ्या मारण्यात व जगाच्या पाठीवरचे विषय चघळण्यात जातो.

साहजिकच पुढचा प्रश्न उपस्थित होतो तो असा की, अशा गाईडस्च्या गुणवत्तेबद्दल, त्यांच्या विद्यार्थ्यांची बौद्धिक भूक भागविण्याच्या समर्थपणाबद्दल, काय स्थिती असेल ? बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या मते अशा गाइडस्ना मार्गदर्शन म्हणजे काय ? ते कसे द्यावे ? याची कल्पनाच नसते. गाईडबद्दल तुमचा असा समज का झाला याची विद्यार्थ्यांनी दिलेली कारणे अशी :

– आमचे गाईडस् आमच्याशी आमच्या विषयातील संशोधनाबद्दल चर्चा करण्याचे टाळतात, टोलवाटोलवीची उत्तरे देतात किंवा आमच्यापासून लांब राहण्याचा प्रयत्न करतात.
– आपल्या विषयातील संशोधनात नवीन काय भर पडली आहे, याची आमच्या गाइडस्ना फारशी कल्पना नसते. कारण ग्रंथालयात जाण्याची, नवीन संदर्भ ग्रंथ व नियतकालिके चाळण्याची, ते तसदी घेत नाहीत.
– आधी झालेल्या प्रबंधांना समांतर प्रबंध लिहिण्यावर अशा गाईडस्चा भर असतो.
– काही गाईडस् इतरांच्याच संशोधनावर टीका करतात व स्वतः नवीन काहीच करीत नाहीत. फक्त मी हे करणार, ते करणार, असे सांगत असतात.
– जे प्रबंध इंग्रजीत लिहायचे असतात ते लिहिताना गाईडस्च्या मर्यादा लक्षात येतात.

एकंदरीत गाईडस्बद्दल विद्यार्थ्यांच्या भावना फारच तीव्र दिसल्या. एका वाङ्मयशाखेतील विद्यार्थ्याने चक्क सांगितले की, माझ्या गाईडला आमच्या विषयावरील पुस्तके ग्रंथालयात कोठे असतात हेही सांगता येणार नाही. कारण त्याने आतापर्यंतच्या दहा-बारा वर्षांत ग्रंथालयात पाऊलही टाकलेले नाही ! दुसऱ्याने तर 'गाईड'बद्दल काव्यपंक्तीच ऐकवल्या. त्या अशा : 'जन्माला आला– एम्. एस्सी. (डॉक्टर, इंजिनिअर, होता आले नाही म्हणून) झाला–पदव्युत्तर विभागात व्याख्याता म्हणून लागला– त्यानंतर Ph. D. घेतली– नियमानुसार गाईडशिप मिळाली !'

### प्रश्नाची दुसरी बाजू

वर उल्लेखलेल्या चर्चेच्या अनुषंगाने प्रश्नाची दुसरी बाजू जाणून घेण्यासाठी काही विभाग-प्रमुख व गाईडस्शी चर्चा केली. त्यापैकी बहुतेक विभागप्रमुखांनी संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अनेक अडचणी खऱ्या आहेत हे मान्य केले. त्यांच्या दृष्टीने त्यांनी खालील गोष्टी

निदर्शनास आणून दिल्या :

– विद्यापीठातील बहुतेक विभागांचे वार्षिक अंदाजपत्रक (budget) तुटपुंजे असते. त्यातून वर्षाचा खर्च भागवायचा असतो. साहजिकच इच्छा असूनसुद्धा ग्रंथालये, उपकरणे, आदीं-मध्ये वाढ करता येणे अशक्य होते.

– संशोधनाकडे वळणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रचंड लोंढा. या लोंढ्यावर विभागप्रमुख काहीच उपाय करू शकत नाहीत. त्यांनी जर याबाबतीत पाउले टाकायला सुरुवात केली तर सहकारी सहकार्य देत नाहीत. उलट संशोधन-स्वातंत्र्यावर गदा येते अशी ओरड करतात. तथापि विद्यार्थ्यांच्या संख्येवर निर्बंध घातल्यासच हे प्रश्न थोड्या-फार प्रमाणात सुटू शकतील.

– उपकरणे दुरुस्त होण्यास, रसायने आदी मिळण्यास खूपच वेळ लागणे ह्या विद्यार्थ्यांच्या अडचणीही अनेक विभागप्रमुखांना मान्य आहेत. त्यांच्या मते विद्यापीठांमधील मध्यवर्ती कार्यालये याला सर्वस्वी जबाबदार आहेत. विभागातून ऑर्डर गेल्यानंतर ती ' प्रोसेस ' होऊन पुढे जाण्यास खूपच कालावधी लागतो. अनेक वेळा असेही होते की, मागवलेल्या निविदा ( quotations ) व त्यांना पोहोचलेली ऑर्डर यात इतका कालावधी जातो की, त्या वस्तूची किंमत खूपच वाढलेली असते.

– काही सहकाऱ्यांच्या विद्यार्थ्यांना आकसाची वागवणूक दिली जाते या आरोपात विभाग-प्रमुखांच्या मते विशेष अर्थ नाही. काही गाइडस् विभाग-प्रमुखांशी असलेल्या मतभेदांमध्ये आपल्या विद्यार्थ्यांचा खेळणी म्हणून वापर करतात. त्यांना अनेक वेळा त्यांची जागा दाखवावीच लागते.

काही गाईडस्‌शी याबद्दल चर्चा करता त्यांनी आपल्या समर्थनार्थ खालील मुद्दे उपस्थित केले :

– संशोधनाकडे वळणारे विद्यार्थी साधारण गुणवत्तेचे असतात. उत्तम गुणवत्तेचे विद्यार्थी वैद्यकीय वा अभियांत्रिकी अभ्यासक्रम घेतात. उरलेल्यांपैकी बहुतांशी पदव्युत्तर शिक्षणा-कडे वळतात. केवळ संशोधन करायचे म्हणून पदव्युत्तर शिक्षण घेणारे विद्यार्थी अत्यल्प आहेत.

– बहुतेक विद्यार्थ्यांना विशेष कष्ट न घेता Ph. D. हवी असते.

– गाईडबद्दल विद्यार्थ्यांच्या कल्पना विचित्र आहेत. आमचे काम म्हणजे ह्यांना संशोधनाचा 'Topic' देणे. काम कसे करायचे ? किती वेळात करायचे ? हे सर्व विद्यार्थ्यांनी पाहावे. सर्व सामग्री जमल्यानंतर आम्ही त्यांना प्रबंध लिहिण्यास मदत करतो. (आमच्या गाईड-स्‌नीही आम्हाला याच प्रकारे मार्गदर्शन केले होते. काही गाईडस्‌नी अशाही आठवणी सांगितल्या.)

– काही गाईडस्‌च्या मते विद्यार्थ्यांच्या ज्या तक्रारी आहेत त्यात बरेच तथ्य आहे. आम्ही त्यांना योग्य मार्गदर्शन करीत नाही. त्यामुळे त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यांची संशोधनाची आवड, नवीन काही करण्याची उमेद, कमी होत जाते.

– काही गाईडस्‌च्या मते स्वत: ग्रंथालयात जाण्यानेच संशोधनास सहाय्य होते असे नाही. आम्ही विद्यार्थ्यांकडून संदर्भ-ग्रंथ वा नियतकालिके आणवितो व आमचे काम भागवितो.

**निष्कर्ष**

वरील चर्चेतून निघणारे महत्त्वाचे निष्कर्ष खालीलप्रमाणे :

१. Ph. D. संशोधनास विशेष पात्रता लागतेच असे नाही. साधारण गुणवत्ता असलेले विद्यार्थीही Ph. D. ही संशोधनातील पदवी मिळवू शकतात. यापैकी बहुतेकांना शिष्यवृत्त्या उपलब्ध होऊ शकतात.

२. निश्चित दृष्टिकोनाने संशोधनाकडे आकृष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. केवळ Ph. D. पदवी मिळविण्यासाठी, नोकरी मिळविण्यासाठी, नोकरी टिकविण्यासाठी वा बढती मिळविण्यासाठी, संशोधन करणारे अधिक आहेत.

३. साहजिकच गाईड निवडताना किंवा संशोधनाचा विषय निवडताना हे विद्यार्थी कोणतेही निकष लावताना दिसत नाहीत.

४. संशोधन करताना विद्यार्थ्यांना असंख्य अडचणींना तोंड द्यावे लागते. यातील महत्त्वाच्या अडचणी ग्रंथालय, प्रयोगशाळा, क्षेत्र-काम वा कार्यालयीन बाबी यांच्याशी निगडित आहेत. यातीलकाही अडचणी सहजगत्या दूर करता येण्यासारख्या आहेत, तर काही अडचणींचे स्वरूप (उदाहरणार्थ : प्रयोगशाळेतील अडचणी) गंभीर आहे.

५. काही ठिकाणी गाईडस्‌चे आपापसातील हेवेदावे, विभाग-प्रमुखांशी संघर्ष, यामुळे संशोधनात अपप्रवृत्ती बळावत आहेत, व विद्यार्थ्यांना या अपप्रवृत्तींपासून निर्माण होणाऱ्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.

६. संशोधन करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना गाईडस्‌च्या कार्यक्षमतेबद्दल तसेच परिपक्वतेबद्दल शंका आहे. या शंकेतून अनेक अडचणी निर्माण होताना दिसतात व मानसिक तणाव वाढत जातात. संशोधनाचा दर्जा ज्या घटकावर सर्वस्वी अवलंबून असतो त्या गाईडमुळे असे तणाव निर्माण व्हावेत ही चिंतनीय बाब आहे.

७. बहुसंख्य विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या मिळत असतात. त्या दोन ते तीन वर्षांसाठी असतात. अनेक अडचणींतून मार्ग काढूनही या काळात Ph. D. संशोधन पूर्ण होणे अशक्य होते. साहजिकच सामग्री जमविताना गैरमार्गांचा वापर करण्याच्या प्रवृत्तीची शक्यता डावलता येत नाही.

## काही विचार

संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रश्न हा या लेखाचा विषय. यात संशोधन करणारे विद्यार्थी व गाईडस् यांची गुणवत्ता गोवण्याचा प्रयत्न का असे कोणासही वाटणे स्वाभाविक आहे. ज्यांना असे वाटते त्यांचा हा दोष नसून परिस्थितीचा आहे. माझ्या मते केवळ संशोधन करणाऱ्यांचे प्रश्न काय आहेत ? त्यावर उपाययोजना काय ? यांचा वेध घेणे ही वरवरची मलमपट्टी होय. अशी मलमपट्टी सर्वच क्षेत्रांत मान्य झाली आहे. याला दोन कारणे संभवतात. पहिले म्हणजे प्रश्नाचे मूळ काय आहे हे अशा प्रश्नांचा अभ्यास करणाऱ्या तज्ज्ञांच्या लक्षात येत नाही व दुसरे म्हणजे प्रश्नाचे मूळ समजले तरी प्रस्थापितांविरुद्ध लढण्याचे धैर्य त्यांच्यात नसते. (असणार कसे ? त्यांच्यापैकी काही स्वतःच प्रस्थापित असतात ना ?)

वरील निष्कर्षांवरून मला असे वाटते की, विशिष्ट गुणवत्ता असलेले, संशोधनात रस असणारे (aptitude) विद्यार्थीच संशोधनाकडे कसे वळतील याचा विचार करणे आवश्यक झाले आहे. यासाठी Ph. D. कोर्समध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची aptitude test प्रत्येक विद्यापीठामध्ये घेऊनच त्यांना प्रवेश देण्याचा प्रयोग करण्यास काय हरकत आहे ? यातही उणीवा आहेतच; पण कोठें तरी सुरुवात केली पाहिजे.

विद्यार्थी व संशोधन यातील सर्वांत महत्त्वाचा घटक गाईड. त्याच्याबद्दलही गंभीरपणे विचार करणे आवश्यक झाले आहे. संशोधनाच्या प्रगतीचा प्रचंड वेग लक्षात घेता निरनिराळ्या विद्यापीठांमध्ये गाईड म्हणून मान्यता देण्याचे जे नियम आहेत ते जीर्णशीर्ण वाटतात. सर्वांत प्रथम मान्यता देण्याचे नियम हे कालानुरूप बदलणे आवश्यक आहे. त्याच्या पुढचा उपाय म्हणजे U. P. S. C. सारख्या कमिशन्स्‌मार्फत गाईड म्हणून मान्यता देण्यासाठी स्पर्धा-परीक्षा घेणे. अशा परीक्षांमधून ज्यांना मान्यता मिळेल त्यांच्या संशोधनाचा, दर तीन किंवा पाच वर्षांनी

आढावा घेऊन त्यांची मान्यता काढून घेण्याची किंवा चालू ठेवण्याची पद्धती सुरू करावी.

संशोधनाच्या प्रगतीचा वेग व आवाका इतका प्रचंड आहे की, प्रत्येक विषयांतील शाखा (branches) या प्रगल्भ व स्वतंत्र शास्त्रे होऊ लागली आहेत. गाईडस्ना मान्यता देताना संपूर्ण विषयासाठी न देता त्या विषयातील ठराविक शाखांसाठीच दिली जाणे इष्ट ठरेल. या व अशासारख्या उपाययोजना झाल्या नाहीत तर आज जे काही गाईडस्बद्दल 'आडातच नाही तर पोहऱ्यात कोठून येणार ?' असे हळूच बोलले जाते, ते उद्या गाईडस्बद्दल ओरडून सांगितले जाईल.

विद्यार्थ्यांच्या अडचणींचा विचार करता आणखी एक प्रश्न उपस्थित होतो तो म्हणजे विद्यापीठांमध्ये संशोधनास पोषक असे वातावरण (academic atmosphere) आहे काय ? वास्तविक पहाता विद्यापीठांमध्ये संशोधनाच्या नवीन नवीन सुविधा प्राप्त होत आहेत, निरनिराळ्या संस्थांमार्फत पैसा उपलब्ध होत आहे, असे असूनही संशोधनास पोषक असे वातावरण हळूहळू कमी होत आहे, असे वाटण्याइतकी परिस्थिती निश्चितच निर्माण झाली आहे. विद्यापीठांमधील राजकारण, प्राध्यापकांना बढतीच्या कमी शक्यता व त्यातून निर्माण होणारी स्पर्धा, या व अशासारख्या गोष्टी याला जबाबदार आहेत असे वाटते. बढती मिळवायची असेल तर Ph. D. निर्माण केले पाहिजेत, संशोधनपर लिखाण केले पाहिजे, मग त्याचा दर्जा कसा का असेना, अशी वृत्ती बळावत चाललेली दिसते. या पोटार्थी संशोधनामुळे संशोधनाचा आत्माच आपण गमावून बसणार नाही ना अशी शंका येते. यामुळेच निरनिराळ्या विद्यापीठांमधील अनेक विभागांत दोन तट पडून लोक हमरीतुमरीवर येऊ पाहात आहेत. यातून दुसऱ्यास हवी आहेत अशी उपकरणे नादुरुस्त करणे, रसायने लपविणे, सामग्री पळविणे, महत्त्वाचे टपाल गहाळ करणे, आदी निंद्य प्रकारांची वाढ होत आहे. असे विकृत प्रकार थांबले पाहिजेत.

संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे अनेक प्रश्न, अनेक अडचणी, अशा आहेत की, संबंधित व्यक्ती एकत्र येऊन तोडगा काढू शकतात, उपाय योजू शकतात; परंतु हे सर्व जर गुणी विद्यार्थी नसतील, संशोधनमग्न गाईडस् नसतील व संशोधनास पोषक वातावरण नसेल, तर व्यर्थ आहे. आम्ही विद्यापीठांतील शिक्षक आम्हाला दिसणाऱ्या भ्रष्टाचाराबद्दल ओरडा करीत असतो, वशिलेबाजीबद्दल टाहो फोडीत असतो. जिथे जिथे 'अन्याय' असतो तेथे आपला वावर असतो. मग आपल्याच अवतीभवती दिसणारा संशोधनातील भ्रष्टाचार आपणास दिसत नसेल काय ? का आपल्याच सावल्यांना आपण घाबरत आहोत ? आपल्याला ज्या सुविधा प्राप्त आहेत त्यातून आपण संशोधन करू शकत नसू, परंतु प्रामाणिक संशोधन आपल्याच हातात नाही का ?

■ ■

# १०

# संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आणखी काही अडचणी

मो. वि. भाटवडेकर

सोयीच्या किंवा इष्ट कॉलेजात प्रवेश मिळणे, प्रवेश मिळाला तर जेवणाची, राहण्याची सोय होणे आणि या सर्वांसाठी लागणारा खर्च या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या समस्या आता सर्वांना परिचित आहेत. या सर्वांना तोंड देऊन, एम्. ए. किंवा एम्. एस्सी. झाल्यावर संशोधन करून डॉक्टरेट मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अल्प असली तरी त्यांच्या अडचणी अनंत असतात. त्या दूर करण्यासाठी योजनापूर्वक आणि संघटित प्रयत्न होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने या विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेणे अतिशय महत्त्वाचे वाटते.

### योग्य गाईड दुर्मिळ

पहिली अडचण म्हटली म्हणजे योग्य ' गाईड ' मिळणे. चांगला, आस्थेवाईक आणि कष्टाळू ' गाईड ' मिळणे सध्या अशक्यप्राय झाले आहे. याला कारणे अनेक. पीएच्. डी.चा ' गाईड ' विश्वविद्यालयाची मान्यता असलेला पाहिजे, ही मान्यता देण्यासाठी सर्वसाधारण ज्या अटी व नियम आहेत त्यांचे पालन करून मान्यता मिळालेले गाईड वृद्ध व एम्. ए. चे वर्ग शिकविणारे प्राध्यापक असतात. त्यांचा बहुतेक वेळ परीक्षेसाठी शिकविण्यात, विश्वविद्यालय व महाविद्यालय यांच्या ' मीटिंगज् ' भरविण्यात, वा त्यात भाग घेण्यात खर्ची पडतो. विषयाला वाहून घेतलेला, संशोधनात गढलेला, असा प्राध्यापक आता महाविद्यालयांतून किंवा विश्वविद्यालयांतून मिळणे अशक्य होऊन बसले आहे.

### केवळ संशोधक गाईड अमान्य ?

अशा तऱ्हेचे ' गाईडस् ' संशोधनाला वाहून घेतलेल्या संस्थांतून मिळण्याची शक्यता असते; पण तेथे अन्य अडचणी उपस्थित होतात. वेगवेगळ्या ' व्यवस्थापन ' संस्था, ' राष्ट्रीय प्रयोग-शाळा ' अशांसारख्या, संस्थांतून काम करणारे प्राध्यापक, विश्वविद्यालयाने मान्य केलेले 'गाईड' असतातच असे नाही. काही असतात, काही नसतात. सगळ्यांना एम्. ए. किंवा एम्. एस्सी.च्या वर्गांना शिकविण्याची संधी मिळाली असेलच असे नाही आणि संस्थेतून ' संशोधन 'कार्याचा अनुभव हा मान्यतेला पुरेसा ठरतोच असे नाही. एकूण परिस्थितीचे अवलोकन केले असता असे वाटते की, ' विश्वविद्यालयाबाहेरील ' नामवंत संशोधकांना ' गाईड ' म्हणून मान्यता देण्याला विश्वविद्यालये फारशी उत्सुक नसतात.

### चाकोरीतले संशोधन

अशा ' संशोधनाला ' वाहिलेल्या संस्थांतून काही विद्यार्थ्यांना फेलोशिप देऊन त्यांना संशोधन करण्याची आणि पदवी मिळविण्याचीहि सोय असते. तथापि अशा सोयींबरोबर काही अड-

चणीही निर्माण होत असतात. अशा संस्थांचा 'संशोधना'चा कार्यक्रम असतो आणि या चाकोरीत बसणारे संशोधन करण्याची तयारी असल्याशिवाय 'शिष्यवृत्ती' मिळत नाही. परिणामी पैसे मिळविण्यासाठी पडेल ते काम करावयाचे अशी वृत्ती धारण करून विद्यार्थी कामाला लागतो आणि संशोधनाचा आत्माच हरवून बसतो. मग पीएच्. डी.चा अभ्यासक्रम पुरा करायला ५।७ वर्षे लागतात. असा सरसकट अनुभव.

### शिष्यवृत्ती : नोकरी : संशोधन

विद्यार्थीवर्गाच्या बाजूने विचार केला तरीही परिस्थिती गुरुशिष्यसंयोग घडून येण्याला पोषक आहे असे दिसून येत नाही. पीएच्. डी. करणारे विद्यार्थी आर्थिकदृष्टचा आपल्या कुटुंबावर अवलंबून राहू शकत नाहीत. बी. ए., एम्. ए. पर्यंतचा खर्च पालकांनी करावा हे ठीक; पण मग मोठा झाल्यावर मुलाने चार पैसे घरात आणावेत; निदान, विद्येचा हव्यास असेल तर तो छंद आपला आपण जोपासावा, त्याची आर्थिक जबाबदारी आई-वडिलांवर पडू नये अशी अपेक्षा असते. त्यामुळे संशोधन करणारे विद्यार्थी संशोधन-शिष्यवृत्ति मिळविणारे किंवा नोकरी करणारे असतात. पहिल्या गटातील विद्यार्थ्यांच्या अडचणींचा उल्लेख करून झालाच आहे.

नोकरी करून अभ्यास करणाऱ्यांच्या अडचणी वेगळयाच असतात. ते ज्या संस्थेत काम करतात त्या संस्थेला उपयोगी पडणारे संशोधन असले तर त्या संस्थेकडून अभ्यासास मदत. मग अडथळे येणार नाहीत असे मानावयास हरकत नाही. पण खरी गोष्ट अशी की, आपल्या अनुभवांवर आधारित असे संशोधन करण्यासाठी, जरूर ती माहिती, कागदपत्र, थोडा वेळ, एवढचा सवलती तरी संस्थेकडून मिळाल्या पाहिजेत. त्या बहुधा उपलब्ध होत नाहीत, असा नेहमीचा अनुभव.

### समन्वयाची गरज

प्रत्यक्ष दैनंदिन आयुष्यात येणाऱ्या समस्यांवर संशोधन झाले तर ते सर्वांनाचा फलदायी ठरेल; पण त्यासाठी विश्वविद्यालये आणि कारखाने, बँका, एल्. आय्. सी., यांसारख्या संस्थांमध्ये समन्वय असला पाहिजे; देवाण-घेवाण झाली पाहिजे. विचारविनिमयासाठी संपर्क पाहिजे. पण या सर्व गोष्टींचा सध्या अभाव आहे.

### संशोधनाचा खेळखंडोबा

अशा कोंडीत सापडलेल्या विद्यार्थ्यांना योग्य असा गुरू मिळणे आणि संशोधनासाठी चांगला विषय निवडता येणे या फार दुर्मिळ गोष्टी होऊन बसल्या आहेत. जे मान्यवर 'गाईड' आहेत त्यांच्याकडेच जाणे आणि त्यांना पटेल तोच विषय निवडणे असा मामला सध्या चालू आहे आणि यापायी संशोधनाचा खेळखंडोबा होतो.

### संशोधनापेक्षा पदवी महत्त्वाची

चांगला विषय हाती लागण्यातल्या अडचणींचे मूळ बव्हंशी विद्यार्थीवृत्तीत दिसून यते. या नाही त्या कारणाने पहिला वर्ग हुकलेले पण याची भरपाई करून चांगली नोकरी मिळविण्याची धडपड आपण केली पाहिजे याची जाणीव असलेले विद्यार्थी पीएच्. डी.कडे वळत असतात. आता प्राध्यापकाची नोकरी मिळविण्यासाठी किंवा टिकविण्यासाठी एम्. फिल्. ची अट असल्याने संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे; पण संशोधनापेक्षा पदवी मिळविणे हाच त्यांचा स्वच्छ हेतू असतो. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांचा पहिला प्रश्न असतो, 'सर, एखादा विषय सुचवा.'

### समस्येच्या जाणिवेचे महत्त्व

मला हा प्रश्न फार बोचतो. एखाद्या प्रश्नाची वा समस्येची जाणीव होणे, ती वैज्ञानिक

पातळीवर हाताळण्याची तीव्र इच्छा असणे या गोष्टी संशोधनाला अत्यंत आवश्यक आहेत. त्यांचाच अभाव असेल तर संशोधन करणार काय? खरोखर एखाद्या प्रश्नाने विद्यार्थ्याला पछाडले नसेल तर त्याने संशोधनाच्या वाटेलाच जाऊ नये; पण तसे होत नाही आणि विद्यार्थी आपल्या विषयाची निवड कोणातरी पदाधिकाऱ्याच्या व गाईडच्या सांगण्यावरून करतात आणि अडचणीत येतात.

**'मी सांगतो तसे कर...'**

अडचणींना तोंड देऊन जे विद्यार्थी टिकून राहातात त्यांची परिस्थिती मोठी चांगली असते असे नाही. गाईड वेळ देत नाही. लिहून दिलेला मजकूर वाचून वेळेवर परत करत नाही. मतभेदांच्या मुद्द्यांवर चर्चा करण्याची गाईडची तयारी नसते आणि मी सांगतो तसे कर म्हणजे मी तुझे संशोधन मान्य होण्याची व्यवस्था करतो असेही गाईड सांगतात. अशी परिस्थितीच सरसकट आढळून येते. अपवाद नियम सिद्ध करण्याला उपयोगी पडतील एवढेच. अशा कोंडीत विद्यार्थ्यांची मनःस्थिती विचित्र होते.

सर्व अनुभवांमागील विचार किंवा प्रश्न एकच. संशोधनक्षेत्रासारख्या मर्यादित क्षेत्रातही ज्ञानाच्या जोपासनेबद्दल एवढी अनास्था का? शिक्षणाचा प्रसार होतो तसा दर्जा खालावतो हा नेहमीचा अनुभव. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या स्तरांवर असा अनुभव आला तर ते आपण समजू शकतो. सध्या महाविद्यालयीन स्तरावर या खालावलेल्या दर्जाची सवय होत आहे.

पण संशोधन-क्षेत्राची गोष्ट वेगळी. ज्ञानवृद्धी संशोधनावर अवलंबून. संशोधनक्षेत्र मर्यादित, त्यात काम करणारे लोक चांगले सुशिक्षित, विद्या व ज्ञानसंवर्धन याबद्दल तीव्र आस्था असलेले पाहिजेत. पण तेथेच अनास्था, अनागोंदी कारभार माजला तर ज्ञानवृद्धीचा पायाच खच्ची होईल, अशी भीती वाटते.

■ ■

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८८९
ग्रा. क्र. २३७०६
दिनांक ११।८।८३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# ११ अभ्यासेतर उपक्रमांचे व्यवस्थापन

वि. भा. देशपांडे

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अभ्यासेतर उपक्रमांचे स्वरूप १. मानसिक–बौद्धिक, २. शारीरिक, ३. कलात्मक, ४. सामाजिक या विभागात सर्वसाधारणतः विखुरलेले असते. अशा विविध उपक्रमांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तित्वविकासाला एक आधार निर्माण होतो, ही गोष्ट आता सर्वमान्य झाली आहे. महाविद्यालयात निश्चित स्वरूपाचा शिक्षणक्रम आपण स्वीकारलेला आहे. विषयविभागपरत्वे त्याचे तपशील बदलत असतील, पण तत्त्वतः चौकट सर्वत्र तशीच आहे. शिक्षणक्रमातील अभ्यासाला पूरक ठरतील असेही अनेक उपक्रम – चर्चा, परिसंवाद, मुलाखती, आदींच्या द्वारा – केले जातात. त्यातला तिसरा भाग म्हणजे अभ्यासक्रमाबाहेरील उपक्रम. अशा उपक्रमांची आखणी महाविद्यालयाच्या कार्याचा एक भाग म्हणून केलेली असते. अशा अभ्यासेतर उपक्रमांचे संयोजन नेमके कसे होते? कसे व्हावे? त्यातील उणीवांबरोबरच वेगळी दिशा शोधण्याचा प्रयत्न होतो आहे का? संयोजनातील किंवा व्यवस्थापनातील महत्त्वाचे घटक कोणते? याचा शोध घेणे महत्त्वाचे आहे. वास्तविक महाविद्यालयीन स्तरावर कला आणि क्रीडा असे स्थूल मानाने दोन विभाग केले जातात. त्याच्या जोडीला विशिष्ट विषयाची, विभागांची मंडळे काम करीत असतात. या मंडळांचे कार्य म्हणजे अभ्यासाला पूरक ठरतील अशा कार्यक्रमांचे संयोजन करणे. पण हे विभाग करीत असताना सहसा विद्यार्थ्यांच्या मानसिक, शारीरिक, कलात्मक, सामाजिक, आर्थिक, बौद्धिक गोष्टींचा अलगपणाने किंवा एकत्रितपणे विचार केलेला असतोच असे नाही. बहुधा तसा तो नसतो. परंपरेने, जिमखाना किंवा क्रीडाविभाग, कलामंडळ, वक्तृत्वमंडळ, कधी एखादे अभ्यासमंडळ, वाङ्मयमंडळ, विविध विषयांची मंडळे, असे सर्वसाधारण कार्यक्रमाचे स्वरूप असते. गेली कित्येक वर्षे हेच स्वरूप आपण पाहात आहोत. या कार्यक्रमांच्या व्यवस्थापनामध्ये मुख्यतः पाच घटक काम करीत असतात : १. विद्यार्थी, २. पालक, ३. प्राध्यापक, ४. संस्थाचालक, ५. सार्वजनिक संस्था. या प्रत्येक घटकाचे संयोजनातील स्थान आणि कार्य कोणते आहे ते पाहणे महत्त्वाचे ठरेल.

### विद्यार्थी–अपेक्षा, अनुभव आणि भूमिका

विद्यार्थी हा यातला केन्द्रवर्ती घटक असतो. तो शालेय जीवनातून महाविद्यालयाच्या जीवनात जेव्हा प्रवेश करतो तेव्हा त्याच्या व्यक्तित्वविकासाचा प्रश्न खऱ्या अर्थाने निर्माण होत असतो. या वयातील त्याच्या शरीरावस्थेत होणारे बदल महत्त्वाचे असतात. त्याच्या शिक्षणविषयक किंवा एकूण जीवनविषयक आशा, अपेक्षा निराळ्या असतात. त्याच्या मनात, शरीरात, जीवनविषयक दृष्टिकोनात जे जे म्हणून बदल होत असतात, ते गृहित धरून त्याला अभ्यासेतर उपक्रमात सामावून घेतले पाहिजे. त्याची वृत्ती, वय आणि परिस्थिती ध्यानात घेऊन

हे उपक्रम त्याच्यासमोर ठेवले जातात का ? मुळातच त्याची गरज प्रमाण मानून एकूण उपक्रमांचे आयोजन केले जाते का ? याचे उत्तर बहुतांशी नकारात्मक येते. विद्यार्थी हा घटक स्वतः किती विचार करतो ? आपणहून या उपक्रमांची मागणी किंवा आखणी विद्यार्थी किती आस्थेने किंवा हिरीरीने करतात ? तर तेही प्रमाण अल्पच असते. विद्यार्थ्याला क्रीडांगणाविषयी मोठ्या प्रमाणात आकर्षण असते, विविध कलांच्या स्पर्धाविषयी आकर्षण असते, परंतु त्या त्या विषयाच्या संदर्भातील संयोजनात त्याला फारसा रस नसतो.

अभ्यासेतर उपक्रमांचे संयोजन करीत असताना किंवा स्पर्धेच्या निमित्ताने विद्यार्थी जेव्हा भेटतात तेव्हा त्यातले काहीजण आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करीत असतात. कधी धीटपणाने, नेमकेपणाने, तर कधी अस्पष्ट, त्रोटक स्वरूपात. पण ते बोलत असतात... त्यांतल्या काहींचे म्हणणे असे की, 'आम्ही जेव्हा महाविद्यालयात प्रवेश घेतो तेव्हा या अभ्यासेतर उपक्रमांबद्दल आमच्या खूप अपेक्षा असतात; पण प्रत्यक्षात त्या फारच थोड्या प्रमाणात पूर्ण होतात ' महाविद्यालयाच्या सुरुवातीला प्राचार्य, प्राध्यापक भाषणे करतात. तेव्हा नेहमी ते सांगत असतात की, 'महाविद्यालयाच्या जीवनात केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्याच्या जोडीला विविध उपक्रमांची योजना आम्ही केलेली आहे, त्यामुळे तुमचा व्यक्तित्वविकास साधेल ' वगैरे. खरे पाहिले तर तसे काही होते का असे विचारले तर त्याचे उत्तर बहुतांश प्रमाणात नकारात्मकच असते. 'अभ्यासाच्या ओझ्याखाली आम्ही इतके वाकलेले असतो की, काही वेळा इच्छा असूनही आम्ही कोणत्याही उपक्रमात भाग घेत नाही. काही वेळेला मित्रांच्या, प्राध्यापकांच्या आग्रहाखातर आम्ही काही तरी करीत असतो, पण ते तेवढ्यापुरतेच. कारण आमचे दोन-तीन हेतू असतात. 'एक म्हणजे, त्या निमित्ताने मुलां-मुलींमध्ये वावरायला मिळते, नव्याने ओळखी होतात, कॉलेजच्या पैशात खाणेपिणे होते, तसा वेळही बरा जातो.' भाग घेणारांपैकी काहीजण मात्र मनापासून मेहनत करीत असतात. कारण त्यांना त्या त्या गोष्टीत पुढे काही ना काही मिळवण्याची महत्त्वाकांक्षा असते; पण असे फार थोडे. 'काही उपक्रमात भाग घेतल्यामुळे प्रमाणपत्रे मिळतात, विद्यापीठाच्या परीक्षेत थोडेफार गुणही मिळतात, त्यामुळे त्यासाठी काही तरी करावेसे वाटते. अनेकदा तसा पालकांचा आम्हाला आग्रहही असतो. पालकांनी, मित्र-मैत्रिणींनी कौतुक केले की, उपक्रमात भाग घेतल्याचे सार्थक झाल्यासारखे वाटते. सगळ्या आयुष्याच्या संदर्भात या उपक्रमांचा विचार वगैरे करतो कोण ? काय संबंध ?'

"वर्ष सुरू झाले की, निरनिराळ्या स्पर्धांच्या सूचना लागतात; मग निवड करण्याचा एक 'देखावा समारंभ' होतो. बहुतेक वेळेला कोणाला घ्यायचे ते अगोदर ठरलेलेच असते; पण हे नंतर कळते. अगदीच गरज पडली तर कोणाकोणाला बोलावतात; पण ते तेवढ्यापुरतेच."
'आम्हाला जे नाटक हवे असते किंवा गाण्याचा किंवा इतर कोणता कार्यक्रम हवा असतो तो प्राध्यापक नाकारीत असतात. कधी तुटक शब्दांत तर कधी प्राध्यापकी पद्धतीने आम्हाला 'पटवून' देत असतात. असे हे 'पटवणे' आणि 'ढोस' पाजणे सारखे चालूच असते. आम्ही काय म्हणतो ते त्यांना कळत तरी नसावे किंवा कळत असून ते त्याकडे मुद्दाम दुर्लक्ष करीत असावेत. कदाचित त्यांच्या आमच्या मधले अंतरही त्याला कारण असेल. हे अंतर केवळ वयाचेच आहे असे नाही, तर ते वृत्तीचे, दृष्टिकोनाचेही असू शकेल. काय आहे कोणास ठाऊक ? त्यामुळे आपला खाक्या असा की, 'आपल्या सोयीचा, काही देणारा, असा उपक्रम असला तर त्यात भाग घ्यायचा, नाही तर त्या भानगडीत पडायचे नाही. आधी आपले आपण आणि मग कॉलेज, त्यातले उपक्रम, व्यक्तिमत्वाचा विकास, वगैरे काय म्हणतात ते ! अशी स्वच्छ भूमिका आहे.'"

## विद्यार्थी प्रतिनिधींची कार्यशैली

उपक्रमाशी संबंधित असलेले एखादे अधिकाराचे पद असेल तर विद्यार्थी आपले सर्वस्व पणाला

लावून ती निवडणूक जिंकतो. ते पद प्राप्त करून घेतो. त्या बळावर वर्षभर मिरवीत असतो. आपण ते मिळवले, अमक्या-तमक्याचा पराभव करून मिळवले, अशा गोष्टींचा त्याला अभिमान अथवा कधीकधी अहंकारही असतो. जेव्हा प्रत्यक्ष कामाला प्रारंभ होतो तेव्हा तो आपली शक्ती सर्वार्थाने पणाला लावीलच असे नाही. वास्तविक विविध उपक्रमांच्या व्यवस्थापनाचा तो एक भाग बनलेला असतो. अनेकांचे प्रतिनिधित्व त्याला मिळालेले असते. त्या प्रतिनिधित्वाचा एक भाग म्हणून त्याने मूळचे व्यवस्थापन अधिक सुसंवादी, किंवा त्याच्या वयाच्या, वृत्तीच्या विद्यार्थ्यांना जसे अपेक्षित असेल तसे घडवून घ्यायला हवे. आपल्या आणि इतरांच्या मनातल्या कल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी आग्रही सक्रीय भूमिका घ्यायला हवी. व्यवस्थापनाचा परंपरेने जीर्ण झालेला, निर्जीव चेहरा-मोहरा त्याने बदलून टाकायला हवा. जर या उपक्रमांच्या केंद्रस्थानी विद्यार्थी हा घटक आहे तर त्याचे स्वत्त्व अधिक वृद्धिंगत कसे होईल यासाठी आपल्या प्रतिनिधीपदाचा, इतरांच्या साह्याने उपयोग करायला हवा; पण प्रत्यक्षातला अनुभव असा की, विद्यार्थी-प्रतिनिधी किंवा व्यवस्थापनात आलेला विद्यार्थी-पदाधिकारी हा निष्क्रीय असतो. तो आपणहून व्यवस्थापनात सहभागी होत नाही. व्यवस्थापनाची असेल ती चौकट मान्य करतो. अगदीच जिथे आपल्या स्वार्थाला, व्यक्तित्त्वाला धक्का पोहोचेल त्या ठिकाणी तो काहीसा जागृत होतो. त्याच्यात चैतन्य निर्माण झाल्यासारखे वाटते. पण ते क्षणिक असते. कारण त्या मागचा हेतूही क्षणिक, तात्पुरता असतो. त्या पदाधिकारी विद्यार्थ्याचा स्वार्थ किंवा संबंधित गटाचा स्वार्थ, काही अंशी का होईना, पूर्ण झालेला असतो. त्यामुळे त्यांच्या भूमिकेतले, मागणीतले आग्रहीपण त्वरेने विरून जाते. तेवढ्या विशिष्ट काळात त्या पदाधिकारी विद्यार्थ्याला किंवा अन्य विद्यार्थ्यांना आपल्या हक्कांची, लोकशाही मूल्यांची जाण निर्माण होते. तशा प्रकारची शब्दयोजना त्यांच्या तोंडी येते. त्यावेळी असे वाटते की, यांना जर स्वत्त्वाचे भान खरोखरच आले तर या उपक्रमांचे ठरीव, चाकोरीमय झालेले स्वरूप पालटेल. पण विद्यार्थ्यांच्या मागणीत सातत्य नसते. मागणीत कणखरपणा नसतो. त्या विद्यार्थ्याला विशिष्ट कार्यक्रमात, स्पर्धेत सहभागी होता आले किंवा त्याला प्रशस्तिपत्र, पारि-तोषिक मिळाले तर त्याची कोणत्याच गोष्टीबद्दल तक्रार नसते. मग तोच विद्यार्थी व्यवस्था-पनाच्या बाजूने इतर विद्यार्थ्यांशी वाद घालीत असतो. याचा अर्थ कोणत्याच विद्यार्थ्याकडे काहीच नवकल्पना नसतात अथवा उपक्रमांबाबत नवयोजना नसतात असे नाही. काही विद्यार्थी जरूर नवीन कल्पना, योजना सुचवतात; पण ते विद्यार्थी व्यवस्थापनामध्ये समाविष्ट होण्यास फारसे उत्सुक नसतात. काही जण अभ्यासाच्या जबाबदारीमुळे, तर काही निवडणुकीच्या वातावरणामुळे, या उपक्रमांच्या व्यवस्थापनातील पदांपासून दूर राहातात. या सर्व व्यवस्थेपासून दूर राहून अधूनमधून ते काही सूचना करतात. त्यांच्या व्यक्तित्त्वाचा जेवढा प्रभाव असेल तेवढाच सूचनांचा स्वीकार होतो. विद्यार्थी हा घटक या अभ्यासेतर उपक्रमांच्या व्यवस्थापनात इतक्या निष्क्रीयतेने, निष्काळजीपणाने का वागत असतो या प्रश्नाचा अधिक खोलवर जाऊन शोध घ्यायचा झाला तर आपल्या असे लक्षात येते की, त्याला अन्य काही घटकही तितक्याच प्रमाणात जबाबदार आहेत. त्या घटकांच्या वृत्तीचा, मतांचा, अधिकारांचा, धाकाचा, परिणाम विद्यार्थ्यावर होत असावा. अशा घटकांमध्ये पालक, प्राध्यापक, संस्था-चालक, सामाजिक संस्था आणि अन्य काही शक्ती यांचा समावेश होतो. हे घटक कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्ष-पणाने विद्यार्थ्यांची मनोवृत्ती या उपक्रमांच्या संदर्भात वेगळी बनवण्याचा प्रयत्न करीत असतात. आपण असे काही करीत आहोत याचे त्यांना पुरेसे भानही नसते. जसे त्या घटकांना भान असतेच असे नाही तसे ते पूर्णत: विद्यार्थ्यालाही नसते असा अनेकदा अनुभव येतो.

## पालकांची धोरणे

विद्यार्थ्यांचे पालक हा एक घटक या व्यवस्थापनाशी अप्रत्यक्षपणाने संबंधित असतो. ज्या वेळी महाविद्यालयात विविध उपक्रमांविषयीच्या सूचना लावल्या जातात तेव्हा त्यामध्ये सहभागी होण्यासाठी विद्यार्थी काही वेळा स्वत: निर्णय घेतो, तर काही वेळा पालकांच्या सम्मतीची आवश्यकता असते. ज्या महत्त्वाच्या उपक्रमांत विद्यार्थी-सहभाग अपेक्षित असतो त्या ठिकाणी जर पालकांनी आपली प्रतिकूलता दर्शविली तर त्याचा परिणाम त्या उपक्रमांवर आणि पर्यायाने व्यवस्थापनावरही होतो. अनेकदा व्यवस्थापनातल्या माणसाला पालकांची परवानगी मिळविण्याचा उद्योग करावा लागतो. महाविद्यालयाच्या उपक्रमात किंवा त्यातल्या स्पर्धांमध्ये विशिष्ट विद्यार्थ्याची आवश्यकता का आणि किती आहे हे संबंधितांना पटवून द्यावे लागते. पालक हटवादी असतील तर व्यवस्थापनाचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा होतो. ह्यातही दोन प्रकार आढळतात. एक म्हणजे उपक्रमात सहभागी होण्याची विद्यार्थ्याची तयारी असते; पण पालकांची संमती नसते; दुसरा प्रकार म्हणजे पालकांची इच्छा असूनही विद्यार्थी नकारात्मक भूमिका घेत असतो. हा पेच तर अधिकच त्रासाचा होतो. आपल्याकडच्या बहुतांश पालकांची अभ्यासेत्तर उपक्रमांबद्दलची मनोभूमिका ही स्वार्थी आणि उदासीन आहे. स्वार्थी अशा अर्थाने की, जर आपल्या पाल्याने अभ्यासेतर गोष्टीत सहभाग घेतला तर त्याला प्रशस्तिपत्र, पारितोषिक किंवा एकूण तत्सम काहीही मिळाले तर त्याचा उपयोग पुढच्या स्पर्धा-परीक्षांसाठी गुणांच्या संदर्भात होऊ शकतो ह्याची पालकाला जाणीव असते. ते गुण त्याला मिळावेत किंवा तो फायदा सकृतदर्शनी मिळावा ह्यासाठी काही पालक पाल्याला प्रोत्साहित करीत असतात. किंबहुना तशी आग्रही भूमिका घेतात. पण त्या आग्रहातली, प्रोत्साहनातली, सहेतुकता परिणामी घातक ठरणारी असते. कारण ती तात्कालिकतेवर आधारलेली असते. काही वेळेला व्यवस्थापनातल्या प्राध्यापकाला अशा पालकांच्या इच्छेखातर त्या विद्यार्थ्याला उपक्रमात सहभागी करून घ्यावे लागते. अतिशय किरकोळ कारणासाठी उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्याला अनिच्छेने एखादे अधिकृत (प्रशस्ती ?) पत्र द्यावे लागते. पालकही त्या व्यवहारावर समाधानी असतो. उपक्रमातील सहभागाची गुणवत्ता किती आहे किंवा विद्यार्थ्यांच्या व्यक्तित्त्व विकासात त्याचा किती उपयोग आहे, या गोष्टींशी त्याला कर्तव्य नसते. अशा प्रकारे स्वार्थी हेतूने या उपक्रमाशी अप्रत्यक्ष संबंधित असलेला पालक अनेकदा उदासीनही असतो. आपल्या पाल्याने अभ्यासाच्या बरोबरीने कला-क्रीडा या क्षेत्रात काही महत्त्वपूर्ण कामगिरी करावी, त्यात प्राविण्य मिळवावे, त्याचे व्यक्तित्त्व अधिक संपन्न, चौरस व्हावे, असा विचार प्रत्यक्षात आणणारे पालक फारच विरळा. त्या तूलनेत उदासीनताच अधिक असते. याचे कारण आपल्या समाजव्यवस्थेत आहे, आपल्या आर्थिक स्थितीत किंवा एकूणच आपल्या मनोवृत्तीत आहे. चाकोरीबद्ध शिक्षणक्रम स्वीकारून पदवी संपादित करावी, त्या आधारे नोकरी-व्यवसाय करावा, घरसंसार आणि आपण, या गोष्टींमध्ये आयुष्याचे सुख शोधीत राहावे, हे तर सगळेच करतात; पण या जगण्यात व्यावहारिक जीवनापलीकडची काही आव्हाने आहेत ती स्वीकारून आपण आपल्या पाल्याला तशी दिशा दाखवावी, त्याचे जीवन निराळेपणाने घडण्यास साह्यभूत व्हावे, अशी वृत्ती कमी असते. ती बऱ्याच वेळेला फक्त बोलण्यात असते. आपण आधुनिक आहोत, जीवनाचा सर्वांगीण विचार करणारे आहोत, अशी प्रतिमा निर्माण करण्याची धडपड त्यात असते; पण कार्यवाहीची वेळ आली की माघार घेतली जाते.

## संयोजक-प्राध्यापकांचे दोन प्रकार

अभ्यासेतर उपक्रमांचे प्रत्यक्ष संयोजन किंवा त्यांची कार्यवाही संबंधित प्राध्यापकवर्ग करीत असतो. अशा प्रकारचे काम करणारे प्राध्यापक दोन प्रकारचे असतात: एक गट आपणहून

विशिष्ट विभागात, विषयात रस घेऊन आपल्याकडे जी गुणवत्ता आहे ती पूर्णपणे वापरणाऱ्या प्राध्यापकांचा. त्यांना ज्या उपक्रमात विशेष गोडी आणि गती असते त्यामध्ये ते आपले सर्वस्व खर्ची घालतात. आपले अध्यापनाचे काम सांभाळून जादा वेळ देऊन, प्रसंगी पदरमोड करूनही तो उपक्रम अधिक चांगला कसा होईल यात ते मग्न असतात. अतिशय निरपेक्ष वृत्तीने काम करणारे प्राध्यापकही आहेत. त्यांच्या मार्गदर्शनामुळे, सहवासामुळे, कल्पकता योजकता यांमुळे, अनेक विद्यार्थ्यांच्या जीवनात कला-क्रीडाक्षेत्रांत लक्षणीय गोष्टी घडल्याची उदाहरणे आहेत. विशेषतः वक्तृत्व, लेखन, नाट्य अशा काही विषयांच्या संदर्भात हे घडलेले अनुभवास येते. याचा अर्थ असा की, अशा पद्धतीने त्या उपक्रमात समरसून काम करणारा प्राध्यापक लाभला तर या उपक्रमांचे स्वरूप वेगळे घडू शकते; पण अशा प्राध्यापकांची संख्या विरळाच असते. बहुतांश प्राध्यापकांची वृत्ती, वरिष्ठांनी आज्ञा केल्यामुळे,कोणत्या ना कोणत्या कारणाने ते काम आपल्या वाटचाला आल्यामुळे, नोकरीच्या स्थिरतेसाठी, अनिच्छेने काम करण्याची असते. अशा प्राध्यापकाचा त्या उपक्रमात मनःपूर्वक सहभाग असतोच असे नाही. त्याच्या या वृत्तीमुळे संपूर्ण उपक्रम निर्जीव होण्याचा धोका असतो. काही प्राध्यापक तर विद्यार्थ्यांना स्पष्टपणे बोलावून सांगत असतात की, मी हे काम करतोय कारण माझ्याकडे ते आले आहे, मला सांगितले गेले आहे. साहजिकच तो प्राध्यापक त्या विद्यार्थ्याला उपक्रमात सहभागी होण्याविषयी एका मर्यादेनंतर आग्रह करीत नाही, प्रोत्साहित करीत नाही. वरिष्ठांकडून जेवढी पत्रके, परिपत्रके, सूचना, वगैरे जे काही येईल किंवा ते करण्याविषयी आज्ञा होईल, तेवढेच कोरडेपणाने, निरिच्छपणाने करीत राहायचे. प्राध्यापकाची ही निरिच्छता, अलिप्तता विद्यार्थ्यांच्या नजरेतून सुटत नाही. काही प्राध्यापकांचा आणखी एक वर्ग असू शकतो. तो म्हणजे त्यांची काम करण्याची इच्छा असते परंतु ते तेवढा वेळ देऊ शकत नाहीत. या उपक्रमांच्या व्यवस्थापनातील प्राध्यापक हा फार मोठा दुवा आहे. त्याची या सर्व गोष्टींकडे पाहण्याची वृत्ती आणि त्यात सक्रीय असण्याची क्षमता, यावर उपक्रमांचे भवितव्य अवलंबून असते. परंतु पंधरा-वीस टक्के उत्साही, सक्रीय सहभागी होणारे प्राध्यापक सोडले तर उरलेला फार मोठा गट निष्क्रीयतेत जमा होतो. असे का होते याचा आणखी खोलवर जाऊन शोध घेतला तर, त्याची अनेक कारणे हाती लागतात. त्यातले एक महत्त्वाचे कारण म्हणजे संपूर्ण समाजवृत्तीतच भयग्रस्तता व व्यवहारीपण आलेले आहे. मी अमुक इतका वेळ दिला, काम केले, तर मला काय मिळेल ? किती मिळेल ? असे सततचे प्रश्न असतात. याऐवजी तोच वेळ मी अन्य काही कामात घालवला तर मला अधिक आर्थिक प्राप्ती होईल, ही भूमिका असते. म्हणजे याचा अर्थ महाविद्यालयातील प्राध्यापकाला आपल्या अध्यापनाच्या कामाव्यतिरिक्त जादा वेळ नसतोच असे नाही; पण त्या वेळेचे गणीत तो पैशाच्या मोबदल्यात तरी करू इच्छितो किंवा वेळेच्या संदर्भात दुसरी काही पळवाट तरी काढत असतो. आपण ज्या शिक्षणक्षेत्रात उपजीविकेसाठी आलो आहोत, ते क्षेत्र अन्य क्षेत्रांहून भिन्न आहे, त्यामध्ये केवळ अध्यापन करून भागत नाही, तर ज्यांच्यासाठी ते आपण करतो त्यांना ज्ञानाबरोबरच इतरही जीवनांगांबद्दल सांगणे, त्यांचे व्यक्तित्व घडविणे ही आपली एक अतिरिक्त जबाबदारी आहे, याचे भान कितीकांना असते ? अशी संख्या अत्यल्पच आहे. बहुतांश लोकांची वृत्ती ' मला काय त्याचे ' अशीच असते.

### संस्था–चालकांची दृष्टी

महाविद्यालयाचे प्राचार्य किंवा संस्था-चालक हे या उपक्रमांच्या व्यवस्थापनाचे सूत्रधार असतात. त्यांची या उपक्रमांकडे पाहण्याची, ती कार्यवाहीत आणण्याची, पद्धती कशी आहे यावर बरेच अवलंबून असते. संस्था-चालक जर उदासीन असतील तर परिणामी काय होते ते सांगणे नकोच. आपल्याकडच्या संस्था-चालकांची वृत्ती ही परंपरेचा मार्ग स्वीकारण्याची असते.

महाविद्यालय चालू ठेवायचे म्हटल्यावर ज्या अनेक गोष्टी कराव्या लागतात त्यामध्ये अभ्यासेत-उपक्रम करायचे हे एक असे त्यांनी ठरवलेले असते. वर्षाच्या एकूण कामामध्ये ह्या गोष्टी घडत आहेत की नाहीत हे ते पाहात असतात. त्यामध्ये आस्था असणारे, स्वतः लक्ष घालणारे संस्था-चालक फारच विरळा आहेत. यात आणखी एक वर्ग असतो. तो म्हणजे ते स्वतः जरी फारसा पुढाकार घेत नसले तरी जे प्राध्यापक या उपक्रमांच्या संदर्भात नवीन कल्पना, योजना, अमलात आणीत असतात त्यांच्या वाटेत ते अडथळे निर्माण करीत नाहीत. पूर्ण स्वातंत्र्य देऊन उपक्रम यशस्वी होण्यास जे जे म्हणून साह्यभूत होईल ते ते करीत राहतात. काही संस्था-चालकांना या उपक्रमांच्या तपशिलाशी काहीच कर्तव्य नसते. त्यांना महाविद्यालयाच्या नियतकालिकात सचित्र वृत्तांत हवे असतात. संस्थेचे आणखी जे कोणी वरिष्ठ असतात त्यांच्यासाठी आणि स्वतःसाठी. संस्थेची प्रतिष्ठा इतरांच्या नजरेत यावी हाही त्या मागचा हेतू असू शकतो. काही चांगली अपर वादात्मक उदाहरणे सोडली तर संस्था-चालकांची भूमिका अनुकूलतेच्या बाजूची नसते. याचे एक महत्त्वाचे कारण आपल्या शिक्षणविषयक दृष्टिकोनातच आहे. शिक्षणसंस्था ह्या केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या, परीक्षा घेणाऱ्या, संस्था आहेत, अशी अनेकांची समजूत आहे. शिक्षणेतर उपक्रम हे फावल्या वेळचे, मनोरंजनाच्या स्तरावरचे, वृत्तांतापुरते असतात, अशीही समजूत आहे. मूळ शिक्षणाचा, विद्यार्थ्यांचा आणि विविध उपक्रमांचा काही अनुबंध आहे, तो त्यातला आंतरिक भाग आहे, अशी जाणीवच कमी प्रमाणात आहे. जी जाणीव आहे ती फक्त चर्चा, परिसंवाद आणि प्रसिद्धी एवढ्याचपुरती आहे. या उपक्रमांकडे गांभीर्याने पाहून त्यांची कार्यवाही तितक्याच आस्थेने करण्याची वृत्ती नाही.

### सार्वजनिक संस्थांनी महाविद्यालयांची जागा घेतली ?

काही वेळेला असे घडते की, जे अभ्यासेतर उपक्रम मोठ्या प्रमाणात महाविद्यालयात घडावेत असे वाटते ते भिन्न भिन्न सार्वजनिक संस्था घडवून आणीत असतात. पुणे, मुंबई, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, नगर, बारामती, सांगली, सातारा, कोल्हापूर, मिरज अशा किती तरी गावी अशा सार्वजनिक संस्था आहेत की, ज्या या उपक्रमांच्या संदर्भात फार मोलाचे कार्य सातत्याने करीत आहेत. त्यातल्या काही केवळ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आहेत तर काही सर्व युवकांसाठी आहेत. एक प्रातिनिधिक उदाहरण म्हणून रानडे वक्तृत्व स्पर्धेचे सांगता येईल. या स्पर्धेत महाराष्ट्रातील बहुसंख्य महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी होतात. किंबहुना या स्पर्धेत प्रशस्तिपत्र, पारितोषिक, मिळाले तर विद्यार्थ्यांच्या जीवनात तो एक अभिमानाचा, कौतुकाचा विषय असतो. तीच गोष्ट पुण्यातील ' महाराष्ट्रीय कलोपासका 'ने आयोजित केलेल्या पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेची आहे. बेळगावच्या वाङ्मयचर्चा मंडळाच्या वतीने होणाऱ्या स्पर्धेची आहे. अशी किती तरी उदाहरणे सांगता येतील. स्पर्धात्मक स्तरावर न राहताही केवळ गुणविकासाच्या उद्दिष्टाने काम करणाऱ्या काही संस्था आहेत. अनेकदा असे लक्षात येते की, महाविद्यालयीन उपक्रमांना खरे बळ जर कोणामुळे येत असेल तर त्याचे बरेचसे श्रेय अशा सार्वजनिक संस्थांकडे जाते.

### आर्थिक अडचणी व त्यांचे निवारण

उपक्रमांच्या संयोजनातील आर्थिक भागही तितकाच महत्त्वाचा असतो. ही आर्थिक योजना केली जाते ती १. विद्यार्थ्यांकडून जमा केलेल्या फीमधून; २. महाविद्यालयाच्या विविध फंडांतून; ३. शासनाने दिलेल्या अनुदानातून; ४. काही वेळेला वैयक्तिक स्तरावर; किंवा ५. मंडळाच्या सदस्यांकडून घेतलेल्या वर्गणीतून. विविध मार्गांनी पैसा उभा होत असला तरी तो पुरेसा असतोच असे नाही. कारण विद्यार्थी-संख्या आणि उपलब्ध पैसा यांचे प्रमाण व्यस्त असते. पुरेसा पैसा मिळाला तर उपक्रमांची संख्या आणि गुणवत्ता अधिक वाढेल असे काहींना वाटत असते.

ते एका दृष्टीने अर्ध-सत्य आहे. कारण उपक्रमांच्या कार्यवाहीत केवळ भरपूर पैसा असणे हे गमक नसते. पैसा मिळाला तर अधिक काही करता येईल हे जितके खरे, तितके हेही खरे की मर्यादित पैशांत खूप काही करता येईल.म्हणजे उपक्रम न होण्याला केवळ पैशाची त्रुटी हे कारण आहे असे नव्हे. माझ्या माहितीत, अनुभवात, असे काही प्राचार्य किंवा संस्था-चालक आहेत, की जर एखाद्या प्राध्यापकाने वेगळा उपक्रम, कार्यक्रम, सुचवला तर पैशाच्या अभावी त्यांनी तो नाकारलेला नाही. उलट त्याला अधिक प्रोत्साहित केलेले आहे. मूळच्या चौकटीत आर्थिक व्यवस्था होत नसेल तर त्यातून मार्ग काढून उपक्रम यशस्वी करून दाखवलेले आहेत.

### काही इतर पण महत्त्वाचे प्रश्न

अभ्यासेतर उपक्रमांच्या संयोजनातील घटकांचे स्वरूप पाहिल्यावर असे लक्षात येते की, यातून बरेच प्रश्न निर्माण होतात. त्यातले काही प्रश्न असे : १. अशा उपक्रमांना विद्यार्थ्यांचा प्रतिसाद किती असतो ? २. तो प्रतिसाद वाढावा म्हणून आपण किती प्रयत्नशील असतो ? ३. भिन्न भिन्न विद्याशाखांपरत्वे आपण त्यात फेरबदल केलेले आहेत का ? ४. असे फेरबदल घडवून आणण्यासाठी आपण मूळची, परंपरेची चौकट मोडावयास तयार आहोत का ? ५. ती चौकट मोडताना आपल्याजवळ नवा कार्यक्रम कोणता आहे ? ६. एकूण चित्र जर उदासीन असेल (ते आहे असे जाणवते !) तर हे उपक्रम आपण थांबवणार आहोत का ? जर ते बंद केले तर त्याची प्रतिक्रिया काय होईल ?

### संयोजनातील छोटी–मोठी छिद्रे

असे अनेक प्रश्न आपल्यासमोर येतात. या प्रश्नांमध्ये अनेक पोट-प्रश्नही संभवतात. असे प्रश्न भयरूप होऊन आले की, आपण नकारात्मक भूमिकेचा आश्रय सहजपणाने घेतो, स्वीकारतो. कारण तो आपल्याला सोईचा, सुखाचा असतो. पण अशी नाकर्तेपणाची भूमिका स्वीकारून आपण त्यातून निसटून जाऊ असे जर वाटत असेल तर तसे घडेल या भ्रमात राहता कामा नये. हे प्रश्न समजावून घ्यायला हवेत. त्यातल्या त्रुटी कोणकोणत्या कारणांमुळे निर्माण झाल्या आहेत त्याचा शोध घ्यायला पाहिजे. त्यावर उपाय शोधायला पाहिजेत. आपण काळजीपूर्वक विचार केला तर या उपक्रमांच्या संयोजनात अनेक छोटी-मोठी छिद्रे आहेत. मार्गदर्शन च अभाव आहे, साधनांची उपलब्धी मोठ्या प्रमाणात नाही. विद्यार्थ्यांची वाढती संख्या, जागेचे अपुरेपण, आर्थिक त्रुटी, नव्या सेमेस्टर पद्धतीमुळे शिक्षणाचे किंवा अभ्यासाचे बदललेले स्वरूप, (विद्यार्थी हा परीक्षार्थी झालेला आहे.) विविध काळज्यांमुळे पालकांचे आपल्या पाल्यांकडे दुर्लक्ष, त्यांच्या आपल्या पाल्यांविषयीच्या चुकीच्या समजुती,प्राध्यापकांचा निरुत्साह व त्यांची उदासीनता, संस्था-चालकांची तटस्थ वृत्ती, विविध स्पर्धांमुळे उपक्रमांना आलेले बाजारूपण, प्रसिद्धीची, मनोरंजनाची विपुल साधने, अशा अनेक गोष्टी अडथळा निर्माण करणाऱ्या आहेत. त्यांची पाळेमुळे समाजाच्या आर्थिक, कौटुंबिक, राजकीय, शैक्षणिक आदी गोष्टींमध्ये खोलवर गेलेली आहेत. ती परस्परांना छेद देणारी आणि पूरकही आहेत.

पण ती पाळेमुळे खोलवर गेलेली आहेत म्हणून आपल्या केंद्रबिंदूपासून आपण दूर होऊन भागणार नाही किंवा ती जबाबदारीही टाळता येणार नाही. कारण शिक्षणपद्धती कोणतीही आणली तरी विद्यार्थ्यांच्या व्यक्तित्व-विकासाचे, कलागुणवृद्धीचे, प्रश्न कधीच मिटणारे नाहीत. उलट बदलत्या विज्ञानयुगात, स्पर्धेच्या जगात, ते प्रश्न गुंतागुंतीचे होणार आहेत. त्यातली संमिश्रता गृहीत धरून प्राध्यापक, पालक, प्राचार्य आदींना विद्यार्थ्याला बरोबर घेऊन त्या प्रश्नांना सामोरे जावे लागेल. त्यातून मार्ग काढावा लागेल. त्यासाठी आपल्या वृत्तीत, कार्यपद्धतीत, दृष्टिकोनात बदल घडवावा लागेल. तसे आपण करणार की नाही हा खरा प्रश्न आहे. ■ ■

# १२

## विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाबाहेर काय करायला आवडेल ?

प्रतिभा वीरकर

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडविणे हे शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट आहे. हा विकास घडविण्याचे कार्य शाळा, महाविद्यालये, इतर विविध संघटना, पालक, शिक्षक व समाजातील अन्य घटक आपापल्या दृष्टिकोनातून करण्याचा प्रयत्न करीत असतात. यासाठीच महाविद्यालयांत अभ्यासक्रमाच्या जोडीला अभ्यासेतर व अभ्यासानुवर्ती कार्यक्रम असतात. महाविद्यालयांतील अभ्यासेतर कार्यक्रमांसारखे कार्यक्रम महाविद्यालयांबाहेर आम समाजातही आयोजित केले जातात. महाविद्यालयांत व महाविद्यालयांबाहेर असे जे कार्यक्रम असतात, त्यातले विद्यार्थ्यांना काय करायला आवडते ? आवडेल ? हे जाणून घेण्याचा प्रयत्न एका अभ्यासाद्वारा केला. महाविद्यालयांतील व महाविद्यालयांच्याबाहेर व्यक्तिमत्त्व-विकासाच्या कार्यक्रमांत आणखी काही भर घालता येण्यासारखी आहे का ? याचाही कानोसा घेण्याचा प्रयत्न केला त्याचा उपयोग या शोधनिबंधासाठी केला आहे.

शालांत परीक्षा पास होऊन विद्यार्थी जेव्हा महाविद्यालयात प्रवेश करतो तेव्हा तो किशोरावस्था संपवून कुमारावस्थेत आलेला असतो. ह्या अवस्थेतील विद्यार्थी वयाने १७ ते २० वर्षांच्या दरम्यान असतो. या कालात कुमारअवस्थेतील विद्यार्थ्यांत शारीरिक व मानसिक बदल घडून येत असतात. त्यामुळे महाविद्यालयाच्या विशाल विश्वात आल्यावर त्याच्यापुढे अनेक समस्या उभ्या राहतात, तो गोंधळून जातो.

जीवनाच्या या विविधतापूर्ण व गुन्तागुन्तीच्या कालखंडात विद्यार्थ्यांकडून, त्यांनी अभ्यासक्रमात नेमून दिलेल्या विषयांचा सतत अभ्यास करून अर्थार्जनाचे एक महत्त्वपूर्ण साधन हस्तगत करावे आणि भावी जीवनाची दिशा निश्चित करण्यासाठी या काळात कसून प्रयत्न करावा, अशी अपेक्षा मोठ्या प्रमाणावर असते. याच वेळी विद्यार्थ्यांच्या भावनिक व मानसिक अवस्थेनुरूप त्यांना आपल्या व्यक्तिमत्त्वाचे इतर पैलूही विकसित व्हावेत असे वाटत असते. या गरजेच्या जाणिवेतून, जी संबंधितात कधीकधी असावी तेव्हढी प्रखर असत नाही, महाविद्यालयात अभ्यासेतर व अभ्यासानुवर्ती असे कार्यक्रम आयोजित केले जातात. या कार्यक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू–शारीरिक, मानसिक, बौद्धिक व सामाजिक–जोपासले जावेत असा प्रयत्न असतो. महाविद्यालयांत व त्या पलिकडच्या खुल्या समाजातही यासाठी प्रयत्न होत असतात. या साऱ्या प्रयत्नांना विद्यार्थ्यांची कशी साद मिळते ? ते कशाबद्दल उदासीन किंवा उत्सुक असतात ? इत्यादी गोष्टी जाणून घेण्यासाठी विद्यार्थी, त्यांचे प्राध्यापक व पालक यांच्याकडून माहिती जमा करून काही निष्कर्ष काढण्याचा इथे प्रयत्न केला आहे.

## अभ्यासाची पद्धत

माहिती प्रश्नावली व मुलाखतीद्वारा मिळविली. विद्यार्थ्यांत कला, शास्त्र, वाणिज्य, अभियांत्रिकी, विधी, कृषी, शिक्षण, गृहशास्त्र व वैद्यक अशा विद्याशाखांतील विद्यार्थ्यांचा समावेश केला होता. विद्यार्थ्यांना प्रश्नावली दिल्या होत्या. त्याचबरोबर त्यांच्या मुलाखतीही घेतल्या होत्या. प्राध्यापक व पालक यांचे विचार जाणून घेण्यासाठी मात्र फक्त मुलाखतीच घेतल्या. व्यक्तिमत्त्वविकासासाठी विद्यार्थी कोणते उपक्रम करतात ? कोणते उपक्रम त्यांना करावेसे वाटतात पण करता येत नाहीत ? यांतले कोणते उपक्रम अभ्यासक्रमाबरोबर असावेत ? ते तसे का असावेत ? ह्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा व त्या प्रश्नांकडे पाहण्याचा विद्यार्थी, पालक, प्राध्यापक यांचा दृष्टिकोन जाणून घेण्याचा इथे प्रयत्न आहे. माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण करताना विद्यार्थी-विद्यार्थिनी, अभ्यासातील विद्यार्थ्यांचा दर्जा आणि विद्यार्थ्यांचा आर्थिक स्तर यावर लक्ष ठेवले होते. अभ्यासातील दर्जा ठरवताना ६० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणारे; ४५ ते ६० टक्क्यांच्या दरम्यान गुण मिळविणारे व ४५ टक्क्यांपेक्षा कमी गुण मिळविणारे, असे विद्यार्थ्यांचे विभाग केले होते. वार्षिक रु. २०,००० किंवा त्याहून जास्त उत्पन्न असलेल्या घरातील विद्यार्थी; दहा ते वीस हजार रुपये वार्षिक उत्पन्न असलेल्या घरातील विद्यार्थी आणि वार्षिक रुपये १० हजारांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या घरांतून येणारे विद्यार्थी, असेही विद्यार्थ्यांचे गट केले होते. या लेखात ' बहुतांश विद्यार्थी ', ' काही विद्यार्थी ' व ' थोडे विद्यार्थी ' असे शब्दप्रयोग केले आहेत. त्यांचा टक्केवारीत अर्थ सांगायचा तर अनुक्रमे ६० ते ८० टक्के, ४० ते ६० टक्के, व २० ते ४० टक्क्यांपर्यंत, असा गृहीत धरला आहे.

**शरीरस्वास्थ्य** – शरीरस्वास्थ्यासाठी विद्यार्थी-विद्यार्थिनी करीत असलेल्या उपक्रमांचे दोन भाग होतात : (१) विविध व्यायामप्रकार, व (२) विविध प्रकारचे खेळ. बहुतांश विद्यार्थी दंड-बैठका, डबलबार, वेटलिफ्टिंग, सूर्यनमस्कार असा व्यायाम करतात. काही विद्यार्थी क्रिकेट, कुस्ती, खोखो, कबड्डी, बास्केट बॉल, टेबलटेनिस, बॅडमिन्टन आदि खेळ खेळतात. थोडे विद्यार्थी धावणे, योगासने, पोहणे, ट्रेकिंग, गिर्यारोहण, बागकाम, सायक्लिंग आदि उपक्रमांद्वारा शरीराचे संगोपन व संवर्धन करण्याचा प्रयत्न करतात. विद्यार्थिनी खोखो, कबड्डी, टेबलटेनिस खेळतात. त्याचबरोबर काही विद्यार्थिनी योगासने, सूर्यनमस्कार, पोहणे, फिरणे यांच्याद्वारा शरीरस्वास्थ्य मिळविण्याचा व टिकविण्याचा प्रयत्न करतात.

**मानसिक स्वास्थ्य** – मानसिक स्वास्थ्यासाठी विद्यार्थ्यांकडून हाती घेतले जाणारे उपक्रम दोन गटात विभागता येतात : (१) भौतिक; (२) अध्यात्मिक. भौतिक कार्यक्रमात करमणूक (नाटके, चित्रपट, दूरदर्शन, मैफिली, इ. इ.), वाचन, छंद जोपासणे, वगैरेंचा समावेश होतो. अध्यात्मिक मार्गात धार्मिक ग्रंथांचे वाचन, योगासने, पूजापाठ, देवदर्शन, प्रार्थना इत्यादींचा समावेश होतो.

**बौद्धिक विकास** – बौद्धिक विकासासाठी निवडक वाचन, स्पर्धा-परीक्षा देणे, विशेष प्रकारचे खेळ खेळणे (बुद्धिबळे), प्रश्नोत्तर-कार्यक्रम पाहणे व क्वचित त्यात भाग घेणे, विविध मंडळांचे सभासदत्व स्वीकारणे, लोकांच्या गाठीभेटी घेऊन त्यांच्याशी चर्चा करणे, इत्यादी उपक्रम विद्यार्थी हाती घेतात. याच्या जोडीला शहरात होणाऱ्या विविध व्याख्यानांना, परिसंवादांना, सांस्कृतिक कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचाही विद्यार्थी प्रयत्न करतात.

**सामाजिक जाणीव** –सामाजिक परिस्थितीचा परिचय व्हावा आणि त्यातील समस्यांची उकल होण्यास आपलाही हातभार लागावा यासाठी विद्यार्थी व विद्यार्थिनी एन्. एस्. एस्., एन्. सी. सी. अगर महाविद्यालयांतील व महाविद्यालयांबाहेरील संघटनांत प्रवेश घेतात. शिक्षण, समाज-

कल्याण, आरोग्य, करमणूक, इत्यादी क्षेत्रांत उपेक्षितांसाठी जे कार्यक्रम संघटित होतात त्यात भाग घेऊन या संदर्भातील आपल्या ऊर्मींची पूर्तता करून घेण्याचा प्रयत्न विद्यार्थी करीत असतात.

## फरक व अडचणी

महाविद्यालयांत व महाविद्यालयांबाहेर वर्णन केलेल्या विविध उपक्रमांत भाग घेताना लिंग-भेदामुळे, घरच्या आर्थिक स्तरामुळे किंवा अभ्यासातील दर्जामुळे फार मोठा फरक पडतो असे आढळून आले नाही. श्रीमंत घरांतून येणारे विद्यार्थी परदेशी खेळ व खर्चाची साधने वापरू शकतात हे मात्र जाणवते. आर्थिक स्थिती बेताची असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उपक्रम-निवडीवर साहजिकच परिणाम होतो. कित्येक आवडत्या कार्यक्रमात इच्छा असूनही आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना भाग घेता येत नाही असेही विद्यार्थ्यांकडून कळले. कित्येक वेळा विद्यार्थी बुजरेपणामुळे या कार्यक्रमात समाविष्ट होत नाहीत असेही दिसते.

## विद्यार्थ्यांचे विचार

वर ओझरते चर्चिलेले उपक्रम महाविद्यालयात किंवा त्यापलीकडे समाजात संघटित होत असतात. पण त्यांना आवडणाऱ्या या व यासारख्या उपक्रमांचे महत्त्व नीट ओळखून हे उपक्रम व्यवस्थितपणे व पद्धतशीरपणे महाविद्यालयांत संघटित व्हावेत असे विद्यार्थी-विद्यार्थिनींना वाटते. त्यामुळे त्यात सातत्य राहील व जे एकेकटयाने करणे शक्य होत नाही तेही विद्यार्थ्यांच्या आटोक्यात येईल. काहींच्या मते असे कार्यक्रम ऐच्छिक असावेत तर काहींच्या मते ते सक्तीचे असावेत. या उपक्रमांत मार्गदर्शनाची व शिकविण्याची व्यवस्था असावी असेही विद्यार्थ्यांना वाटते. या कार्यक्रमांसाठी आवश्यक ती साधने व सोयी महाविद्यालयांत पुरेशा प्रमाणात उपलब्ध असाव्यात असे विद्यार्थ्यांचे मत आहे. सध्याचे उपक्रम निकृष्ठ दर्जाचे असून या उपक्रमांकडे असावे तेव्हढे कुणाचेच लक्ष नसते, असे विद्यार्थ्यांना जाणवते. विशेष म्हणजे या उपक्रमांत भाग घेण्यास पुष्कळदा पालकांचा विरोध असतो. हे उपक्रम व्यक्तिमत्व-विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असले—नव्हे तसे ते असतीलही—पण ते अभ्यासक्रमाचा भाग नसल्यामुळे, त्यामुळे अधिक गुण मिळण्याची शक्यता कमी असल्यामुळे, पालकांचे या सहभागाला प्रोत्साहन मिळत नाही. या उपक्रमांना परीक्षार्थी मूल्य नाही म्हणून पालक आणि शिक्षक या दोघांचे या कार्यक्रमांकडे दुर्लक्ष होते आहे असाही विद्यार्थ्यांचा समज आहे. हे उपक्रम आनंद, समाधान, उत्साह देणारे तसेच प्रेरणा व आत्मविश्वास देणारे असतात म्हणून ते अभ्यासाबरोबर असावेत असेही विद्यार्थ्यांना वाटते. विशिष्ट अभ्यासक्रम एव्हढा खर्च करून घ्यायचे तर आपल्या पाल्याने इतर उपक्रमांत भाग घेऊन अभ्यासाचा वेळ वाया घालवू नये असे पालकांच्या दृष्टीकोनाचे दर्शन मुलाखतीतून झाले. महाविद्यालयातील अभ्यासक्रमात चांगली गुणवत्ता मिळविली तर व्यक्तिमत्वाचे विविध पैलू आपोआप विकसित होतील अशीही पालकांची समजूत दिसली. सेमीस्टर पद्धतीमुळे अभ्यासक्रमावर अधिक लक्ष द्यावे लागते. सतत परीक्षांमुळे विद्यार्थ्यांचा इतर उपक्रमातला रस कमी झाला आहे. उत्स्फूर्तपणे विद्यार्थी अशा अभ्यासेतर व अभ्यासक्रमानुवर्ती उपक्रमात भाग तर घेत नाहीतच, पण आग्रह जरी केला तरी टाळाटाळ करतात

## महाविद्यालयांतून काय होत असते ?

महाविद्यालयांतून होणारे अभ्यासानुवर्ती व अभ्यासेतर उपक्रम विविध मंडळांमार्फत चालतात. या मंडळांचे उपविभागही असतात. कुठे कुठे विषयवार अभ्यासमंडळेही आहेत. संघटित होणाऱ्या विविध उपक्रमांत वक्तृत्व-स्पर्धा, गायनाच्या बैठकी, नाटयवाचन, एकांकिका सादर करणे, मासिक वा त्रैमासिक काढणे, क्रीडा-स्पर्धा घेणे, सहली, असे उपक्रम चालतात. विद्यार्थी-

प्रतिनिधी व सल्लागार प्राध्यापक विचारविनिमय करून कार्यक्रम आखतात व पार पाडतात. बाहेरच्या स्पर्धात भाग घेण्यासाठी विद्यार्थ्यांची निवड करणे, त्यांना पूर्वतयारीस मदत करणे आदि गोष्टी कराव्या लागतात. होतातही.

## निष्कर्ष व सूचना

या साऱ्या पूर्वचर्चेच्या आधारे काही निष्कर्ष हाती आले ते व काही सूचना पुढे दिल्या आहेत :

१. आपली शारीरिक, मानसिक, बौद्धिक व सामाजिक क्षमता वाढावी म्हणून अभ्यासेतर व अभ्यासानुवर्ती उपक्रमांत आपापल्या कुवतीप्रमाणे, ज्यात आर्थिक कुवतीचाही समावेश होतो, महाविद्यालयात व महाविद्यालयाबाहेरच्या समाजातही विद्यार्थी धडपड करीत असतात. अशा उपक्रमांची गरज आहे ह्याची जाणीव विद्यार्थ्यांना आहे, अशा कार्यक्रमांना विद्यार्थ्यांच्या जगात महत्त्वाचे स्थान आहे.

२. या उलट, पालक व शिक्षक यांच्या लेखी या अभ्यासेतर व अभ्यासानुवर्ती कार्यक्रमांना फारसे महत्त्व नाही. अभ्यासेतर व अभ्यासानुवर्ती कार्यक्रमांच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वविकासातील महत्त्वाच्या योगदानाची पालक शिक्षकांना जाणीव आहे; तरीही असल्या उपक्रमांना प्रोत्साहन देण्याची पालक शिक्षकांची तयारी नाही.

३. अभ्यासक्रमाबाहेरील व अभ्यासक्रमानुवर्ती उपक्रमांबाबत विद्यार्थीवर्गाचे विचार व पालकांचे व शिक्षकांचे विचार यात तफावत आहे. या उपक्रमांबद्दल विद्यार्थीवर्ग वाटतो तेव्हढा उदासीन नाही. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमांसंबंधी काही आवडीनिवडी व अपेक्षा आहेत. त्या समजून घेऊन हे उपक्रम संघटित व्हावेत. अभ्यासातच हे उपक्रम समाविष्ट झाले तर अधिकच चांगले होईल. विद्यार्थी अभ्यासाबाहेरील उपक्रमांबद्दल उदासीन आहेत ही संबंधितांची गैरसमजूत आहे असे आढळून आले.

महाविद्यालयीन अभ्यासक्रमाचा भार अतिशय असल्यामुळे आणि सेमिस्टरपद्धती, गृह-पाठ (टयुटोरियल्स), प्रात्यक्षिक काम (प्रॅक्टिकल वर्क) यामुळे इतर उपक्रमांत भाग घेण्यास वेळच मिळत नाही अशी विद्यार्थ्यांची तक्रार आहे. हे उपक्रम अभ्यासेतर न करता अभ्यासाचा एक भाग म्हणून संघटित व्हावेत. सध्याच्या परीक्षार्थी शिक्षण युगात आजच्या अभ्यासेतर व अभ्यासानुवर्ती उपक्रमांना महत्त्व येण्यासाठी या उपक्रमांतील विद्यार्थी-सहभागाला गुण ठेवावेत. असे झाले तर पालक व शिक्षक यांची अशा उपक्रमांबाबतची उदासीनता दूर होण्याचा संभव दिसतो.

विविध उपक्रमांबद्दलचे विद्यार्थ्यांचे कल विचारात घेऊन त्यांचे गट बनवावेत आणि या गटांस योग्य ते अभ्यासानुवर्ती व अभ्यासेतर उपक्रम द्यावेत.

उपक्रमांचे आजचे स्वरूप वर्षानुवर्षे चालत आलेले आणि निःसत्व व अनाकर्षक झालेले दिसते या उपक्रमात नाविन्य आणण्याची वाढती गरज आहे.

आपल्या आवडीचे अभ्यासेतर व अभ्यासानुवर्ती उपक्रम वैयक्तिक पातळीवर कसेबसे होत असतात; पण सगळेच कार्यक्रम आर्थिकदृष्टया सर्वच विद्यार्थ्यांना पेलतात असे नाही. शिवाय काही उपक्रमांचे स्वरूप सामूहिकच असते. म्हणून असे उपक्रम महाविद्यालयांतूनच संघटित करावेत. महाविद्यालयांनीच त्यासाठी लागणारी साधने व साहित्य उपलब्ध करून द्यावे.

■ ■

# १३ मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रश्न

विलास वाघ

मागासवर्गीय विद्यार्थी महाविद्यालयात जेव्हा प्रवेश घेतात तेव्हा सामाजिक विषमतेचे ओझे मनावर घेऊनच प्रवेश घेत असतात; पण त्याच वेळी महाविद्यालयीन उच्च शिक्षण घेणार असल्याने भावी आयुष्याची स्वप्नेही रंगवत असतात. शिवाय हे वयही असामान्य शक्ती दाखविण्याचे असते. या वयातच तरुणांना योग्य तो वाव मिळण्याची आवश्यकता असते. अशा वेळी त्यांना जर योग्य संधी मिळाली नाही तर उमेद खच्ची होते. अशी वाव देणारी परिस्थिती हवी आहे; परंतु मागासवर्गीय विद्यार्थी मानसिक दबावाखालीच महाविद्यालयात वावरत असतात. खुल्या मनाने ते शिक्षण घेऊ शकत नाहीत. ते आपली मागासवर्गीय जात कुणाला कळू नये म्हणून काळजी घेतात. जातीमुळे आपणाला हीन लेखले जाईल याची त्यांना चिंता वाटत असते. सवर्ण विद्यार्थ्यांकडून चांगली वागवणूक मिळणार नाही ह्याची काळजी वाटते. सवर्ण मुलींशी ओळख झाली तर जातीमुळे त्या दूर जातील की काय याची भीती वाटत असते. अशा अनेक कारणांनी मागासवर्गीय विद्यार्थी महाविद्यालयात मोकळेपणाने वागू शकत नाही.

महाविद्यालयात प्रवेश घेणारा मागासवर्गीय विद्यार्थी बहुतेककरून ग्रामीण भागातून आलेला असतो. ग्रामीण भागातील शालेय शिक्षण संपले की महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांच्यापैकी काहींना मोठ्या शहरांमध्ये यावे लागते. खेड्यातील आणि शहरातील वातावरणात खूपच फरक असतो. शहरी वातावरणाची अशा विद्यार्थ्याला सवय नसते. तो शहरात थोडाफार दबकूनच वागतो. हळूहळू त्याला शहरी वातावरणाची सवय होते.

### शिक्षणाचा प्रसार व वाढत्या समस्या

दिवसेंदिवस मागासवर्गीयांमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे. आतापर्यंत शिक्षणात फारशी प्रगती नसणाऱ्या जातींची मुलेही शिकू लागली आहेत. उदाहरणार्थ : भटक्या व विमुक्त जातीतही शिक्षणाचे प्रमाण वाढू लागले आहे. तसेच शहरातील मागासवर्गीय विद्यार्थीही निरनिराळ्या महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत आहेत. आता मागासवर्गीय विद्यार्थी निरनिराळ्या विद्याशाखांमध्ये प्रवेश घेत आहेत. उदाहरणार्थ : वृत्तपत्रविद्या, सी. ए., फार्मसी, वगैरे. महाविद्यालयीन शिक्षण, घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या वाढते आहे, त्यांचे प्रश्नही विविध स्वरूपात पुढे येत आहेत.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी माफ झाली किंवा त्यांना शिष्यवृत्ती मिळाली म्हणजे त्यांचे प्रश्न संपले असे नाही. त्यांची राहाण्या-जेवणाची सोय झाली म्हणजे त्यांचे शिक्षण सुखकर झाले असे नाही. काही विद्यार्थी ग्रामीण भागातील महाविद्यालयांमध्ये तर काही शहरी महाविद्यालयां-

माहिती प्रश्नावली व मुलाखतीद्वारा मिळविली. विद्यार्थ्यांत कला, शास्त्र, वाणिज्य, अभियांत्रिकी, विधी, कृषी, शिक्षण, गृहशास्त्र व वैद्यक अशा विद्याशाखांतील विद्यार्थ्यांचा समावेश केला होता. विद्यार्थ्यांना प्रश्नावली दिल्या होत्या. त्याचबरोबर त्यांच्या मुलाखतीही घेतल्या होत्या. प्राध्यापक व पालक यांचे विचार जाणून घेण्यासाठी मात्र फक्त मुलाखतीच घेतल्या. व्यक्तिमत्त्वविकासासाठी विद्यार्थी कोणते उपक्रम करतात ? कोणते उपक्रम त्यांना करावेसे वाटतात पण करता येत नाहीत ? यांतले कोणते उपक्रम अभ्यासक्रमाबरोबर असावेत ? ते तसे का असावेत ? ह्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा व त्या प्रश्नांकडे पाहण्याचा विद्यार्थी, पालक, प्राध्यापक यांचा दृष्टिकोन जाणून घेण्याचा इथे प्रयत्न आहे. माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण करताना विद्यार्थी-विद्यार्थिनी, अभ्यासातील विद्यार्थ्यांचा दर्जा आणि विद्यार्थ्यांचा आर्थिक स्तर यावर लक्ष ठेवले होते. अभ्यासातील दर्जा ठरवताना ६० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणारे; ४५ ते ६० टक्क्यांच्या दरम्यान गुण मिळविणारे व ४५ टक्क्यांपेक्षा कमी गुण मिळविणारे, असे विद्यार्थ्यांचे विभाग केले होते. वार्षिक रु. २०,००० किंवा त्याहून जास्त उत्पन्न असलेल्या घरातील विद्यार्थी; दहा ते वीस हजार रुपये वार्षिक उत्पन्न असलेल्या घरातील विद्यार्थी आणि वार्षिक रुपये १० हजारांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या घरांतून येणारे विद्यार्थी, असेही विद्यार्थ्यांचे गट केले होते. या लेखात ' बहुतांश विद्यार्थी ', ' काही विद्यार्थी ' व ' थोडे विद्यार्थी ' असे शब्दप्रयोग केले आहेत. त्यांचा टक्केवारीत अर्थ सांगायचा तर अनुक्रमे ६० ते ८० टक्के, ४० ते ६० टक्के, व २० ते ४० टक्क्यांपर्यंत, असा गृहीत धरला आहे.

**शरीरस्वास्थ्य** – शरीरस्वास्थ्यासाठी विद्यार्थी-विद्यार्थिनी करीत असलेल्या उपक्रमांचे दोन भाग होतात : (१) विविध व्यायामप्रकार, व (२) विविध प्रकारचे खेळ. बहुतांश विद्यार्थी दंड-बैठका, डबलबार, वेटलिफ्टिंग, सूर्यनमस्कार असा व्यायाम करतात. काही विद्यार्थी क्रिकेट, कुस्ती, खोखो, कबड्डी, बास्केट बॉल, टेबलटेनिस, बॅडमिन्टन आदि खेळ खेळतात. थोडे विद्यार्थी धावणे, योगासने, पोहणे, ट्रेकिंग, गिर्यारोहण, बागकाम, सायक्लिंग आदि उपक्रमांद्वारा शरीराचे संगोपन व संवर्धन करण्याचा प्रयत्न करतात. विद्यार्थिनी खोखो, कबड्डी, टेबलटेनिस खेळतात. त्याचबरोबर काही विद्यार्थिनी योगासने, सूर्यनमस्कार, पोहणे, फिरणे यांच्याद्वारा शरीरस्वास्थ्य मिळविण्याचा व टिकविण्याचा प्रयत्न करतात.

**मानसिक स्वास्थ्य** – मानसिक स्वास्थ्यासाठी विद्यार्थ्यांकडून हाती घेतले जाणारे उपक्रम दोन गटात विभागता येतात : (१) भौतिक; (२) अध्यात्मिक. भौतिक कार्यक्रमात करमणूक (नाटके, चित्रपट, दूरदर्शन, मैफिली, इ. इ.), वाचन, छंद जोपासणे, वगैरेंचा समावेश होतो. अध्यात्मिक मार्गात धार्मिक ग्रंथांचे वाचन, योगासने, पूजापाठ, देवदर्शन, प्रार्थना इत्यादींचा समावेश होतो.

**बौद्धिक विकास** – बौद्धिक विकासासाठी निवडक वाचन, स्पर्धा-परीक्षा देणे, विशेष प्रकारचे खेळ खेळणे (बुद्धिबळे), प्रश्नोत्तर-कार्यक्रम पाहणे व क्वचित त्यात भाग घेणे, विविध मंडळांचे सभासदत्व स्वीकारणे, लोकांच्या गाठीभेटी घेऊन त्यांच्याशी चर्चा करणे, इत्यादी उपक्रम विद्यार्थी हाती घेतात. याच्या जोडीला शहरात होणाऱ्या विविध व्याख्यानांना, परिसंवादांना, सांस्कृतिक कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचाही विद्यार्थी प्रयत्न करतात.

**सामाजिक जाणीव** –सामाजिक परिस्थितीचा परिचय व्हावा आणि त्यातील समस्यांची उकल होण्यास आपलाही हातभार लागावा यासाठी विद्यार्थी व विद्यार्थिनी एन्. एस्. एस्., एन्. सी. सी. अगर महाविद्यालयांतील व महाविद्यालयांबाहेरील संघटनांत प्रवेश घेतात. शिक्षण, समाज-

कल्याण, आरोग्य, करमणूक, इत्यादी क्षेत्रांत उपेक्षितांसाठी जे कार्यक्रम संघटित होतात त्यात भाग घेऊन या संदर्भातील आपल्या ऊर्मींची पूर्तता करून घेण्याचा प्रयत्न विद्यार्थी करीत असतात.

### फरक व अडचणी

महाविद्यालयांत व महाविद्यालयांबाहेर वर्णन केलेल्या विविध उपक्रमांत भाग घेताना लिंग-भेदामुळे, घरच्या आर्थिक स्तरामुळे किंवा अभ्यासातील दर्जांमुळे फार मोठा फरक पडतो असे आढळून आले नाही. श्रीमंत घरांतून येणारे विद्यार्थी परदेशी खेळ व खर्चाची साधने वापरू शकतात हे मात्र जाणवते. आर्थिक स्थिती बेताची असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उपक्रम-निवडीवर साहजिकच परिणाम होतो. कित्येक आवडत्या कार्यक्रमात इच्छा असूनही आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना भाग घेता येत नाही असेही विद्यार्थ्यांकडून कळले. कित्येक वेळा विद्यार्थी बुजरेपणामुळे या कार्यक्रमात समाविष्ट होत नाहीत असेही दिसते.

### विद्यार्थ्यांचे विचार

वर ओझरते चर्चिलेले उपक्रम महाविद्यालयात किंवा त्यापलीकडे समाजात संघटित होत असतात. पण त्यांना आवडणाऱ्या या व यासारख्या उपक्रमांचे महत्त्व नीट ओळखून हे उपक्रम व्यवस्थितपणे व पद्धतशीरपणे महाविद्यालयांत संघटित व्हावेत असे विद्यार्थी-विद्यार्थिनींना वाटते. त्यामुळे त्यात सातत्य राहील व जे एकेकटयाने करणे शक्य होत नाही तेही विद्यार्थ्यांच्या आटोक्यात येईल. काहींच्या मते असे कार्यक्रम ऐच्छिक असावेत तर काहींच्या मते ते सक्तीचे असावेत. या उपक्रमांत मार्गदर्शनाची व शिकविण्याची व्यवस्था असावी असेही विद्यार्थ्यांना वाटते. या कार्यक्रमांसाठी आवश्यक ती साधने व सोयी महाविद्यालयांत पुरेशा प्रमाणात उपलब्ध असाव्यात असे विद्यार्थ्यांचे मत आहे. सध्याचे उपक्रम निकृष्ठ दर्जाचे असून या उपक्रमांकडे असावे तेव्हढे कुणाचेच लक्ष नसते, असे विद्यार्थ्यांना जाणवते. विशेष म्हणजे या उपक्रमांत भाग घेण्यास पुष्कळदा पालकांचा विरोध असतो. हे उपक्रम व्यक्तिमत्व-विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असले—नव्हे तसे ते असतीलही—पण ते अभ्यासक्रमाचा भाग नसल्यामुळे, त्यामुळे अधिक गुण मिळण्याची शक्यता कमी असल्यामुळे, पालकांचे या सहभागाला प्रोत्साहन मिळत नाही. या उपक्रमांना परीक्षार्थी मूल्य नाही म्हणून पालक आणि शिक्षक या दोघांचे या कार्यक्रमांकडे दुर्लक्ष होते आहे असाही विद्यार्थ्यांचा समज आहे. हे उपक्रम आनंद, समाधान, उत्साह देणारे तसेच प्रेरणा व आत्मविश्वास देणारे असतात म्हणून ते अभ्यासाबरोबर असावेत असेही विद्यार्थ्यांना वाटते. विशिष्ट अभ्यासक्रम एव्हढा खर्च करून घ्यायचे तर आपल्या पाल्याने इतर उपक्रमांत भाग घेऊन अभ्यासाचा वेळ वाया घालवू नये असे पालकांच्या दृष्टीकोनाचे दर्शन मुलाखतीतून झाले. महाविद्यालयातील अभ्यासक्रमात चांगली गुणवत्ता मिळविली तर व्यक्तिमत्वाचे विविध पैलू आपोआप विकसित होतील अशीही पालकांची समजूत दिसली. सेमीस्टर पद्धतीमुळे अभ्यासक्रमावर अधिक लक्ष द्यावे लागते. सतत परीक्षांमुळे विद्यार्थ्यांचा इतर उपक्रमातला रस कमी झाला आहे. उत्स्फूर्तपणे विद्यार्थी अशा अभ्यासेतर व अभ्यासक्रमानुवर्ती उपक्रमात भाग तर घेत नाहीतच, पण आग्रह जरी केला तरी टाळाटाळ करतात

### महाविद्यालयांतून काय होत असते ?

महाविद्यालयांतून होणारे अभ्यासानुवर्ती व अभ्यासेतर उपक्रम विविध मंडळांमार्फत चालतात. या मंडळांचे उपविभागही असतात. कुठे कुठे विषयवार अभ्यासमंडळेही आहेत. संघटित होणाऱ्या विविध उपक्रमांत वक्तृत्व-स्पर्धा, गायनाच्या बैठकी, नाट्यवाचन, एकांकिका सादर करणे, मासिक वा त्रैमासिक काढणे, क्रीडा-स्पर्धा घेणे, सहली, असे उपक्रम चालतात. विद्यार्थी-

प्रतिनिधी व सल्लागार प्राध्यापक विचारविनिमय करून कार्यक्रम आखतात व पार पाडतात बाहेरच्या स्पर्धांत भाग घेण्यासाठी विद्यार्थ्यांची निवड करणे, त्यांना पूर्वतयारीस मदत करणे आदि गोष्टी कराव्या लागतात. होतातही.

## निष्कर्ष व सूचना

या साऱ्या पूर्वचर्चेच्या आधारे काही निष्कर्ष हाती आले ते व काही सूचना पुढे दिल्या आहेत :

१. आपली शारीरिक, मानसिक, बौद्धिक व सामाजिक क्षमता वाढावी म्हणून अभ्यासेतर व अभ्यासानुवर्ती उपक्रमांत आपापल्या कुवतीप्रमाणे, ज्यात आर्थिक कुवतीचाही समावेश होतो, महाविद्यालयात व महाविद्यालयाबाहेरच्या समाजातही विद्यार्थी धडपड करीत असतात. अशा उपक्रमांची गरज आहे ह्याची जाणीव विद्यार्थ्यांना आहे, अशा कार्यक्रमांना विद्यार्थ्यांच्या जगात महत्त्वाचे स्थान आहे.

२. या उलट, पालक व शिक्षक यांच्या लेखी या अभ्यासेतर व अभ्यासानुवर्ती कार्यक्रमांना फारसे महत्त्व नाही. अभ्यासेतर व अभ्यासानुवर्ती कार्यक्रमांच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वविकासातील महत्त्वाच्या योगदानाची पालक शिक्षकांना जाणीव आहे; तरीही असल्या उपक्रमांना प्रोत्साहन देण्याची पालक शिक्षकांची तयारी नाही.

३. अभ्यासक्रमाबाहेरील व अभ्यासक्रमानुवर्ती उपक्रमांबाबत विद्यार्थीवर्गाचे विचार व पालकांचे व शिक्षकांचे विचार यात तफावत आहे. या उपक्रमांबद्दल विद्यार्थीवर्ग वाटतो तेव्हढा उदासीन नाही. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमांसंबंधी काही आवडीनिवडी व अपेक्षा आहेत. त्या समजून घेऊन हे उपक्रम संघटित व्हावेत. अभ्यासातच हे उपक्रम समाविष्ट झाले तर अधिकच चांगले होईल. विद्यार्थी अभ्यासाबाहेरील उपक्रमांबद्दल उदासीन आहेत ही संबंधितांची गैरसमजूत आहे असे आढळून आले.

महाविद्यालयीन अभ्यासक्रमाचा भार अतिशय असल्यामुळे आणि सेमिस्टरपद्धती, गृह-पाठ (टयुटोरियल्स), प्रात्यक्षिक काम (प्रॅक्टिकल वर्क) यामुळे इतर उपक्रमांत भाग घेण्यास वेळच मिळत नाही अशी विद्यार्थ्यांची तक्रार आहे. हे उपक्रम अभ्यासेतर न करता अभ्यासाचा एक भाग म्हणून संघटित व्हावेत. सध्याच्या परीक्षार्थी शिक्षण युगात आजच्या अभ्यासेतर व अभ्यासानुवर्ती उपक्रमांना महत्त्व येण्यासाठी या उपक्रमांतील विद्यार्थी-सहभागाला गुण ठेवावेत. असे झाले तर पालक व शिक्षक यांची अशा उपक्रमांबाबतची उदासीनता दूर होण्याचा संभव दिसतो.

विविध उपक्रमांबद्दलचे विद्यार्थ्यांचे कल विचारात घेऊन त्यांचे गट बनवावेत आणि या गटांस योग्य ते अभ्यासानुवर्ती व अभ्यासेतर उपक्रम द्यावेत.

उपक्रमांचे आजचे स्वरूप वर्षानुवर्षे चालत आलेले आणि निःसत्व व अनाकर्षक झालेले दिसते या उपक्रमात नाविन्य आणण्याची वाढती गरज आहे.

आपल्या आवडीचे अभ्यासेतर व अभ्यासानुवर्ती उपक्रम वैयक्तिक पातळीवर कसेबसे होत असतात; पण सगळेच कार्यक्रम आर्थिकदृष्टया सर्वच विद्यार्थ्यांना पेलतात असे नाही. शिवाय काही उपक्रमांचे स्वरूप सामूहिकच असते. म्हणून असे उपक्रम महाविद्यालयांतूनच संघटित करावेत. महाविद्यालयांनीच त्यासाठी लागणारी साधने व साहित्य उपलब्ध करून द्यावे.

■ ■

# १३ मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रश्न

विलास वाघ

मागासवर्गीय विद्यार्थी महाविद्यालयात जेव्हा प्रवेश घेतात तेव्हा सामाजिक विषमतेचे ओझे मनावर घेऊनच प्रवेश घेत असतात; पण त्याच वेळी महाविद्यालयीन उच्च शिक्षण घेणार असल्याने भावी आयुष्याची स्वप्नेही रंगवत असतात. शिवाय हे वयही असामान्य शक्ती दाखविण्याचे असते. या वयातच तरुणांना योग्य तो वाव मिळण्याची आवश्यकता असते. अशा वेळी त्यांना जर योग्य संधी मिळाली नाही तर उमेद खच्ची होते. अशी वाव देणारी परिस्थिती हवी आहे; परंतु मागासवर्गीय विद्यार्थी मानसिक दबावाखालीच महाविद्यालयात वावरत असतात. खुल्या मनाने ते शिक्षण घेऊ शकत नाहीत. ते आपली मागासवर्गीय जात कुणाला कळू नये म्हणून काळजी घेतात. जातीमुळे आपणाला हीन लेखले जाईल याची त्यांना चिंता वाटत असते. सवर्ण विद्यार्थ्यांकडून चांगली वागवणूक मिळणार नाही ह्याची काळजी वाटते. सवर्ण मुलींशी ओळख झाली तर जातीमुळे त्या दूर जातील की काय याची भीती वाटत असते. अशा अनेक कारणांनी मागासवर्गीय विद्यार्थी महाविद्यालयात मोकळेपणाने वागू शकत नाही.

महाविद्यालयात प्रवेश घेणारा मागासवर्गीय विद्यार्थी बहुतेककरून ग्रामीण भागातून आलेला असतो. ग्रामीण भागातील शालेय शिक्षण संपले की महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांच्यापैकी काहींना मोठ्या शहरांमध्ये यावे लागते. खेड्यातील आणि शहरातील वातावरणात खूपच फरक असतो. शहरी वातावरणाची अशा विद्यार्थ्याला सवय नसते. तो शहरात थोडाफार दबकूनच वागतो. हळूहळू त्याला शहरी वातावरणाची सवय होते.

### शिक्षणाचा प्रसार व वाढत्या समस्या

दिवसेंदिवस मागासवर्गीयांमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे. आतापर्यंत शिक्षणात फारशी प्रगती नसणाऱ्या जातींची मुलेही शिकू लागली आहेत. उदाहरणार्थ : भटक्या व विमुक्त जातीतही शिक्षणाचे प्रमाण वाढू लागले आहे. तसेच शहरातील मागासवर्गीय विद्यार्थीही निरनिराळ्या महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत आहेत. आता मागासवर्गीय विद्यार्थी निरनिराळ्या विद्याशाखांमध्ये प्रवेश घेत आहेत. उदाहरणार्थ : वृत्तपत्रविद्या, सी.ए., फार्मसी, वगैरे. महाविद्यालयीन शिक्षण, घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या वाढते आहे, त्यांचे प्रश्नही विविध स्वरूपात पुढे येत आहेत.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी माफ झाली किंवा त्यांना शिष्यवृत्ती मिळाली म्हणजे त्यांचे प्रश्न संपले असे नाही. त्यांची राहाण्या-जेवणाची सोय झाली म्हणजे त्यांचे शिक्षण सुखकर झाले असे नाही. काही विद्यार्थी ग्रामीण भागातील महाविद्यालयांमध्ये तर काही शहरी महाविद्यालयां-

मध्ये शिकतात. शहरात शिकणारे विद्यार्थी आणि ग्रामीण भागात शिकणारे विद्यार्थी यांच्या अडचणीत काही अंशी फरक आहे.

मागासवर्गीय विद्यार्थी-विद्यार्थिनींचे प्रश्न समजावून घेण्यासाठी ग्रामीण आणि शहरातील विद्यार्थी-विद्यार्थिनींशी चर्चा केली. त्यांच्याशी समक्ष बोललो. जे समजले ते पुढे मांडले आहे.

सवर्ण विद्यार्थ्यांप्रमाणे मागासवर्गीय विद्यार्थी विज्ञानशाखेकडे वळतात. विज्ञानशाखेकडे गेल्यानेच पुढे वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षणासाठी प्रवेश मिळतो. राखीव जागांच्या नियमांमुळे ठराविक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश नक्की मिळतो. विज्ञान, वैद्यकीय, अभियांत्रिकी विभागात प्रवेश मिळाल्यावर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. मुळातच दर्जेदार शालेय शिक्षण त्यांना मिळालेले नसते. आर्थिक परिस्थितीमुळे पालक त्यांना चांगल्या शाळेत घालू शकलेले नसतात. बहुतेकांचे आई-वडील निरक्षर असतात. ते आपल्या मुलांना अभ्यासाबाबत मार्गदर्शन करू शकत नाहीत. त्यांच्या कौटुंबिक वातावरणाचा चांगल्या अभ्यासासाठी उपयोग होऊ शकत नाही.

कलाविभागातील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम फारसा जड जात नाही. वाणिज्य अभ्यासक्रमातही मुले तग धरतात. परंतु विज्ञान, वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमांत इंग्रजीमुळे विद्यार्थ्यांचे फार नुकसान होते. गणित विषयापेक्षाही इंग्रजीमुळे फार फटका बसतो. इंग्रजीच्या अडचणीमुळे काही विद्यार्थी अभ्यासक्रम सोडून देतात. काही अनेक वेळा नापास होतात. तसेच बऱ्यापैकी इंग्रजी जाणणाऱ्या मुलांत मागासवर्गीय मुले मिसळू शकत नाहीत. इंग्रजीमुळे अभ्यासक्रम अर्धवट सोडून दिल्याने वेळ आणि पैसा वाया जातो.

### मित्रमंडळी

काही झाले तरी सवर्ण आणि मागास विद्यार्थी यांत काही ना काही तरी फरक असतो. सामान्यज्ञान, धीटपणा, भाषा, कपडे, स्वच्छता, वागण्याची पद्धत, सवयी, वगैरेंबाबत फरक आढळून येतो. सवर्ण मुलांमध्ये धीटपणा असतो. ते भाषा शुद्ध बोलतात. मागासवर्गीय मुलांत आपण मागास जातीतील आहोत हा न्यूनगंड निर्माण होतो. आपल्यात काही तरी कमी आहे असे तो गृहीत धरूनच चालतो. काही वेळा तो आत्मविश्वास गमावून बसतो. जात कळल्यावर सवर्ण मुलांचाही त्याच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. हा बदल अप्रत्यक्षपणे जाणवतो. मागासवर्गातील विद्यार्थी आपल्या जातीतील किंवा त्याच्या जातीतील नसलेल्या पण मागासलेल्या जातीतील मित्र मिळवितो. त्याला सवर्ण मित्र फार कमी असतात. सवर्ण मित्र मिळाला तरी त्यांचे संबध वरवरचे असतात. महाविद्यालयातील बहुतेक विद्यार्थ्यांना एकमेकांची जात माहीत असते. मागासवर्गीय विद्यार्थीसुद्धा आपल्या स्वतःच्या जातीबाबत सावध असतात, कारण आपल्याच जातीतील मित्रमंडळीत ते जास्त वेळ राहातात.

### शैक्षणिक सवलती

आपल्याला शैक्षणिक सवलती मिळतात हे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना माहीत असते. परंतु किती स्कॉलरशिप मिळते ? स्कॉलरशिपचे नियम काय असतात ? याची त्यांना फारशी माहिती नसते. अलीकडे शिष्यवृत्ती मिळण्याचे नियम कडक झाले आहेत. त्यामुळे सर्व नियमांची व कागदपत्रांची पूर्तता करून शिष्यवृत्ती मिळविणे एक दिव्य झाले आहे. नको ती शिष्यवृत्ती असे वाटते. महाविद्यालयातील कार्यालयात आणि समाज कल्याण विभागात त्यांना चांगली वागवणूक मिळेलच याची खात्री नाही. शिष्यवृत्तीचा फॉर्म भरणे मोठे जिकिरीचे काम असते. विद्यार्थ्याला स्वतःचा फोटो लावावा लागतो. जातीचा दाखला मिळवावा लागतो. त्यासाठी अनेक पुरावे गोळा करावे लागतात. प्राचार्य आणि निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या सह्या घ्याव्या लागतात. हे

सर्व करीत असताना काही महिने निघून जातात; तरी स्कॉलरशिप वेळेवर मिळेल याची खात्री नसते.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून आगाऊ फी घेऊ नये असे सर्व महाविद्यालयांना समाज कल्याण विभागाचे परिपत्रक आहे. तरीपण शहरी विभागातील मोठी महाविद्यालये प्रवेशाच्या वेळी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फीचा काही भाग किंवा संपूर्ण फी भरायला सांगतात. शासनाकडून तुमची फी मंजूर झाली म्हणजे तुमचे पैसे परत देऊ असे सांगतात. त्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे हाल होतात. त्यांना मानसिक त्रास होतो. मागासलेल्या जातीत जन्माला आल्याचे दुःख काय असते त्याचा त्यांना अनुभव येतो. नवबौद्ध विद्यार्थ्यांना महाराष्ट्राशिवाय इतर राज्यांत शिष्यवृत्ती मिळत नाही. नोकरीत मध्यवर्ती शासनाने बौद्धांना राखीव जागा ठेवलेल्या नाहीत.

शासन शिष्यवृत्त्यांचे नियम दिवसेंदिवस कडक करीत आहे. उदाहरणार्थ पालकाचे उत्पन्न सहा हजारांपेक्षा जास्त असल्यास शिष्यवृत्ती मिळत नाही. दोन वेळा नापास झालेल्या विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती मिळत नाही. एकाच पालकाच्या फक्त दोनच मुलांना शिष्यवृत्ती मिळते. अभ्यासक्रम बदलल्यास शिष्यवृत्ती मिळत नाही. एकाच व्यावसायिक अभ्यासक्रमाला शिष्यवृत्ती मिळते. अशा प्रकारे शासन दरवर्षी निरनिराळे नियम करून शिष्यवृत्त्यांवर बंधने आणीत असते. पुण्यातील एका महाविद्यालयात एका पालकाची तीन मुले शिकत होती. पैकी एकाला शिष्यवृत्ती मिळाली नाही. ५०० रुपयांपेक्षा जास्त पगार असणाऱ्या पालकांच्या मुलांना शिष्यवृत्ती मिळत नाही. म्हणून सरसकट, सर्वत्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळते असे नाही.

जी शिष्यवृत्ती मिळते तीही पुरेशी नसते. शिष्यवृत्तीच्या पैशातून पुस्तकेसुद्धा विकत घेता येत नाहीत. कपडे, वह्या, जेवणाचा खर्च, वगैरेसाठी पालकांना खर्च करावा लागतोच. केवळ शिष्यवृत्तीवर शिक्षण घेणे अशक्य आहे. वाचनालयातून वेळेवर पाहिजे ते पुस्तक मिळेलच याची खात्री नाही.

ग्रामीण भागातील काही महाविद्यालये शिष्यवृत्ती मिळण्यापूर्वी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पैसे देतात. एका महाविद्यालयाने सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे बँकेत खाते उघडले आहे. मंजूर होऊन आलेली शिष्यवृत्ती बँकेत त्यांच्या खात्यावरच जमा केली जाते, परंतु मोठी महाविद्यालये स्कॉलरशिपबाबत अतिशय बेफिकीर असतात. त्यांचा कर्मचारीवर्गही नीट वागवणूक देत नाही.

### राहाण्याच्या जागेची सोय

बहुतेक शहरांमध्ये राहाण्याच्या जागेची गैरसोय असते. विद्यार्थ्यांबाबत तर फारच गैरसोय असते. विद्यार्थ्यांना कोणतीही जागा राहाण्यास मिळून चालत नाही. अभ्यासासाठी योग्य अशी जागा आवश्यक असते. त्यातल्या त्यात मागासवर्गीय विद्यार्थ्यांची तर परिस्थिती जागेबाबत अतिशय गंभीर आहे. जातीमुळे त्यांना सवर्ण वस्तीत जागा मिळत नाही. त्यांना आपल्याच जातीच्या वस्तीत जागा शोधावी लागते. घरून महाविद्यालयात येणारे विद्यार्थी थोडे असतात. खेडेगावातून आलेल्या विद्यार्थ्याला राहाण्यासाठी जागा शोधावीच लागते. पुणे जिल्ह्यात माध्यमिक शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ८० वसतिगृहे आहेत. परंतु महाविद्यालयीन मागासवर्गीय विद्यार्थ्यांची पुणे शहरात फक्त तीन वसतिगृहे आहेत. पैकी एक मुलींचे आहे; मुलांच्या दोन वसतिगृहांपैकी एक-दोन वर्षांपूर्वीच सुरू करण्यात आले आहे. एकूण वसतिगृहातील जागेची तीव्र टंचाई आहे. खाजगी संस्थांची मागासवर्गीय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे नाहीत. विद्यार्थी साहाय्यक समितीसारख्या एखाद्या संस्थेने काही मागासवर्गीय विद्यार्थी सामावून घेतले आहेत. म्हणजे मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या संख्येच्या मानाने वसतिगृहांची सोय

अतिशय कमी आहे. परिस्थितीमुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना टर्म-बेसिसवर जागा घेता येत नाही. पर्यायाने त्यांना झोपडपट्टीत नातेवाइकांकडे राहावे लागते. पुण्यातील झोपडपट्ट्यांमध्ये शेकडो महाविद्यालयीन विद्यार्थी राहातात. झोपडपट्टीत राहिल्याने त्यांचा अभ्यास कसा होत असेल याची कल्पना केलेली बरी. ज्यांना वसतिगृहात प्रवेश मिळतो त्यांना वसतिगृहात सर्व सोयी उपलब्ध असतातच असे नाही. अनेक वेळा विद्यार्थ्यांना गैरसोयीमुळे संप करावे लागतात.

ग्रामीण भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जागेची फारशी अडचण भासत नाही. बरेचसे विद्यार्थी आसपासच्या गावातून येऊन जाऊन शिक्षण घेतात. शिवाय महाविद्यालयांची वसतिगृहे असतात. तेथे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकतो. वसतिगृहात जागा मिळाली नाही तरी गावात थोडया भाडयाने जागा मिळू शकते.

काही मागासवर्गीय विद्यार्थी स्वतःच्या घरात राहून शिक्षण घेत असतात; परंतु घरात अभ्यासाला योग्य असे वातावरण नसते. त्याचा अभ्यासावर परिणाम होतो. झाडाखाली, बागेत किंवा ग्रंथालयात जाऊन त्यांना अभ्यास करावा लागतो.

वसतिगृहात येणारे विद्यार्थी ग्रामीण भागातील निरक्षर पालकांची मुले असतात. त्यांची आर्थिक परिस्थिती गरीबीची असते. त्यांना बऱ्याच प्रमाणात शिष्यवृत्तीवर अवलंबून राहावे लागते. शिवाय शिष्यवृत्ती पुरेशी आणि वेळेवर मिळत नाही; परंतु वसतिगृहातील मुलांना अभ्यासाला जास्त वेळ मिळतो. शिवाय ते घरातील अडचणींपासून दूर असतात. त्यांना आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शनही मिळू शकते.

### वाचन

बहुतेक मागासवर्गीय विद्यार्थी दैनिके वाचतात. त्यामानाने विद्यार्थिनी दैनिके वाचतातच असे नाही. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे अवांतर वाचन अतिशय कमी आहे. काही विद्यार्थ्यांना पुण्यातून प्रसिद्ध होणाऱ्या सर्व दैनिकांची नावेसुद्धा सांगता आली नाहीत. इतकेच नव्हे तर काहींना एकाही साप्ताहिकाचे आणि मासिकाचे नाव सांगता आले नाही. शहरातील मागासर्गीय विद्यार्थ्यांचे वाचन थोडे जास्त आहे. बरेच विद्यार्थी एकापेक्षा जास्त दैनिके वाचतात, काही मासिके आणि साप्ताहिकेहि त्यांच्या वाचनात येतात.

### अभ्यासेतर कार्यक्रम

महाविद्यालयात अनेक कार्यक्रम सतत होत असतात. वक्तृत्वस्पर्धा, स्नेहसंमेलन, सहल, नाटक, खेळ, वगैरे. या सर्वांत मागासवर्गीय विद्यार्थी मोकळेपणाने भाग घेत नाहीत, मुलीसुद्धा फारसा भाग घेत नाहीत. भाषेमुळे नाटक, भाषण, वगैरेत ते फारसा भाग घेत नाहीत. महाविद्यालयात होणाऱ्या निवडणुकांतही उमेदवार म्हणून हे विद्यार्थी क्वचितच भाग घेतात. निवडणुकीस उभे राहिले तर निवडून येतीलच याची खात्री नसते. तेथेही जातीयवाद असतो. काही विद्यार्थी खेळ, सहल, यांसारख्या उपक्रमांत थोडाफार भाग घेतात.

### ‘ मनात घर करून राहिलेली जातीची जाणीव ’

मागासवर्गीय विद्यार्थी सवर्ण मुलांचे घरी जातात तेव्हा त्यांच्यावर मानसिक दडपण असते. दोन्ही जातीत सामाजिक आणि सांस्कृतिक अंतर असते. सवर्ण मुलांच्या घरातील माणसे मोकळेपणाने वागवतीलच याची खात्री नसते. जातीमुळे आपला कोणता तरी अडाणीपणा दिसून येईल की काय अशी मनात भीती असते. भाषा, राहाणी, वगैरेबाबत आपण दर्जाने कमी आहोत अशी शंका मनात घर करून असते; म्हणून सवर्ण मुलाच्या घरात मागासवर्गीय विद्यार्थ्याला मोकळेपणाने वागता येत नाही.

### प्रतिष्ठेच्या शोधात

शिक्षणाने दर्जा वाढतो हे मागासवर्गीय विद्यार्थी मानतो. म्हणून तो व्यवसाय मिळवून देणारा अभ्यासक्रम निवडतो. आपला सामाजिक व आर्थिक दर्जा वाढावा म्हणून तो प्रयत्न करतो. विशेषतः निरक्षर पालकांची मुले जास्त शिक्षण घेण्याचा प्रयत्न करतात. शिकत असताना नोकरीकडेही त्यांचा ओढा असतो. किती तरी मुले शिकत असताना नोकरी लागली तर शिक्षण सोडून देतात. नोकरी करून आपण मध्यमवर्गीय पांढरपेशे व्हावे अशी त्यांची इच्छा असते. परंपरेने चालत आलेला पालकांचा व्यवसाय करायला त्यांना आवडत नाही. ज्या व्यवसायात प्रतिष्ठा आहे असा व्यवसाय शोधण्याचा प्रयत्न ते करीत असतात. तरी पण शिक्षणाने नोकरी शक्यतो सरकारी मिळाली तर आधी पसंत करतात.

### विद्यार्थिनींबद्दल थोडेसे

ग्रामीण भागातील किंवा निरक्षर कुटुंबातील मुली सहसा महाविद्यालयात प्रवेश घेत नाहीत. शक्यतो सुशिक्षित कुटुंबातील मुली महाविद्यालयात प्रवेश घेतात. त्यासाठीही पालकांचा पाठिंबा असावा लागतो. विद्यार्थिनी अभ्यासेतर कार्यक्रमात सहसा भाग घेत नाहीत. कदाचित कुटुंबियांची त्यांच्यावर जास्त देखरेख असावी.

मुलांइतक्या मुली मोकळेपणाने महाविद्यालयात वागत नाहीत. त्यांच्या प्रश्नांचा स्वतंत्रपणे विचार झाला पाहिजे.

विशेष म्हणजे बरेचसे मागासवर्गीय विद्यार्थी आंतरजातीय विवाहाला तयार असतात. स्वतःच्या जातीत लग्न करायची त्यांची इच्छा नसते. मागासवर्गीय विद्यार्थिनी मात्र आंतरजातीय विवाहाला सहसा तयार नसतात; कदाचित् घरच्यांचे त्यांच्यावर दडपण असावे. इतकेच नव्हे तर काही विद्यार्थ्यांनी सांगितले की आई-वडिलांनी सुचविलेल्या मुलीशी लग्न करूच असे नाही.

अशा रीतीने मागासवर्गीयांचे शिक्षणाने सामाजिक परिवर्तन होऊ घातले आहे. मागासवर्गीयांचा सामाजिक दर्जा वाढतो, म्हणून ते शिक्षण घेऊ लागले आहेत. ज्ञानाची अनेक क्षेत्रे त्यांनी व्यापली आहेत. विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे. त्यामुळे त्यांच्यापुढील समस्याही वाढत आहेत.

मागासवर्गीयांना दर्जेदार शिक्षण मिळून ते सवर्णांची बरोबरी करतील त्या वेळी त्यांना खऱ्या अर्थाने शिक्षण मिळू लागले असे म्हणता येईल. त्यासाठी प्रगतीचा खूप मोठा पल्ला गाठावयाचा आहे. नियोजनकर्त्यांपासून सर्वांनी प्रयत्न करावयाचा आहे. वरील अडचणी दूर झाल्या तर बुद्धिमत्तेत कुठेही कमी नसणारे मागासवर्गीय विद्यार्थी आणखी चमकतील याची खात्री आहे.

■ ■

अतिशय कमी आहे. परिस्थितीमुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना टर्म-बेसिसवर जागा घेता येत नाही. पर्यायाने त्यांना झोपडपट्टीत नातेवाइकांकडे राहावे लागते. पुण्यातील झोपडपट्ट्यांमध्ये शेकडो महाविद्यालयीन विद्यार्थी राहातात. झोपडपट्टीत राहिल्याने त्यांचा अभ्यास कसा होत असेल याची कल्पना केलेली बरी. ज्यांना वसतिगृहात प्रवेश मिळतो त्यांना वसतिगृहात सर्व सोयी उपलब्ध असतातच असे नाही. अनेक वेळा विद्यार्थ्यांना गैरसोयीमुळे संप करावे लागतात.

ग्रामीण भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जागेची फारशी अडचण भासत नाही. बरेचसे विद्यार्थी आसपासच्या गावातून येऊन जाऊन शिक्षण घेतात. शिवाय महाविद्यालयांची वसतिगृहे असतात. तेथे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकतो. वसतिगृहात जागा मिळाली नाही तरी गावात थोड्या भाड्याने जागा मिळू शकते.

काही मागासवर्गीय विद्यार्थी स्वतःच्या घरात राहून शिक्षण घेत असतात; परंतु घरात अभ्यासाला योग्य असे वातावरण नसते. त्याचा अभ्यासावर परिणाम होतो. झाडाखाली, बागेत किंवा ग्रंथालयात जाऊन त्यांना अभ्यास करावा लागतो.

वसतिगृहात येणारे विद्यार्थी ग्रामीण भागातील निरक्षर पालकांची मुले असतात. त्यांची आर्थिक परिस्थिती गरीबीची असते. त्यांना बऱ्याच प्रमाणात शिष्यवृत्तीवर अवलंबून राहावे लागते. शिवाय शिष्यवृत्ती पुरेशी आणि वेळेवर मिळत नाही; परंतु वसतिगृहातील मुलांना अभ्यासाला जास्त वेळ मिळतो. शिवाय ते घरातील अडचणींपासून दूर असतात. त्यांना आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शनही मिळू शकते.

### वाचन

बहुतेक मागासवर्गीय विद्यार्थी दैनिके वाचतात. त्यामानाने विद्यार्थिनी दैनिके वाचतातच असे नाही. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे अवांतर वाचन अतिशय कमी आहे. काही विद्यार्थ्यांना पुण्यातून प्रसिद्ध होणाऱ्या सर्व दैनिकांची नावेसुद्धा सांगता आली नाहीत. इतकेच नव्हे तर काहींना एकाही साप्ताहिकाचे आणि मासिकाचे नाव सांगता आले नाही. शहरातील मागासर्गीय विद्यार्थ्यांचे वाचन थोडे जास्त आहे. बरेच विद्यार्थी एकापेक्षा जास्त दैनिके वाचतात, काही मासिके आणि साप्ताहिकेहि त्यांच्या वाचनात येतात.

### अभ्यासेतर कार्यक्रम

महाविद्यालयात अनेक कार्यक्रम सतत होत असतात. वक्तृत्वस्पर्धा, स्नेहसंमेलन, सहल, नाटक, खेळ, वगैरे. या सर्वांत मागासवर्गीय विद्यार्थी मोकळेपणाने भाग घेत नाहीत, मुलीसुद्धा फारसा भाग घेत नाहीत. भाषेमुळे नाटक, भाषण, वगैरेत ते फारसा भाग घेत नाहीत. महाविद्यालयात होणाऱ्या निवडणुकांतही उमेदवार म्हणून हे विद्यार्थी क्वचितच भाग घेतात. निवडणुकीस उभे राहिले तर निवडून येतीलच याची खात्री नसते. तेथेही जातीयवाद असतो. काही विद्यार्थी खेळ, सहल, यांसारख्या उपक्रमांत थोडाफार भाग घेतात.

### ‘ मनात घर करून राहिलेली जातीची जाणीव ’

मागासवर्गीय विद्यार्थी सवर्ण मुलांचे घरी जातात तेव्हा त्यांच्यावर मानसिक दडपण असते. दोन्ही जातीत सामाजिक आणि सांस्कृतिक अंतर असते. सवर्ण मुलांच्या घरातील माणसे मोकळेपणाने वागवतीलच याची खात्री नसते. जातीमुळे आपला कोणता तरी अडाणीपणा दिसून येईल की काय अशी मनात भीती असते. भाषा, राहाणी, वगैरेबाबत आपण दर्जाने कमी आहोत अशी शंका मनात घर करून असते; म्हणून सवर्ण मुलाच्या घरात मागासवर्गीय विद्यार्थ्याला मोकळेपणाने वागता येत नाही.

## प्रतिष्ठेच्या शोधात

शिक्षणाने दर्जा वाढतो हे मागासवर्गीय विद्यार्थी मानतो. म्हणून तो व्यवसाय मिळवून देणारा अभ्यासक्रम निवडतो. आपला सामाजिक व आर्थिक दर्जा वाढावा म्हणून तो प्रयत्न करतो. विशेषत: निरक्षर पालकांची मुले जास्त शिक्षण घेण्याचा प्रयत्न करतात. शिकत असताना नोकरीकडेही त्यांचा ओढा असतो. किती तरी मुले शिकत असताना नोकरी लागली तर शिक्षण सोडून देतात. नोकरी करून आपण मध्यमवर्गीय पांढरपेशे व्हावे अशी त्यांची इच्छा असते. परंपरेने चालत आलेला पालकांचा व्यवसाय करायला त्यांना आवडत नाही. ज्या व्यवसायात प्रतिष्ठा आहे असा व्यवसाय शोधण्याचा प्रयत्न ते करीत असतात. तरी पण शिक्षणाने नोकरी शक्यतो सरकारी मिळाली तर आधी पसंत करतात.

## विद्यार्थिनींबद्दल थोडेसे

ग्रामीण भागातील किंवा निरक्षर कुटुंबातील मुली सहसा महाविद्यालयात प्रवेश घेत नाहीत. शक्यतो सुशिक्षित कुटुंबातील मुली महाविद्यालयात प्रवेश घेतात. त्यासाठीही पालकांचा पाठिंबा असावा लागतो. विद्यार्थिनी अभ्यासेतर कार्यक्रमात सहसा भाग घेत नाहीत. कदाचित कुटुंबियांची त्यांच्यावर जास्त देखरेख असावी.

मुलांइतक्या मुली मोकळेपणाने महाविद्यालयात वागत नाहीत. त्यांच्या प्रश्नांचा स्वतंत्रपणे विचार झाला पाहिजे.

विशेष म्हणजे बरेचसे मागासवर्गीय विद्यार्थी आंतरजातीय विवाहाला तयार असतात. स्वत:च्या जातीत लग्न करायची त्यांची इच्छा नसते. मागासवर्गीय विद्यार्थिनी मात्र आंतरजातीय विवाहाला सहसा तयार नसतात; कदाचित् घरच्यांचे त्यांच्यावर दडपण असावे. इतकेच नव्हे तर काही विद्यार्थ्यांनी सांगितले की आई-वडिलांनी सुचविलेल्या मुलीशी लग्न करूच असे नाही.

अशा रीतीने मागासवर्गीयांचे शिक्षणाने सामाजिक परिवर्तन होऊ घातले आहे. मागासवर्गीयांचा सामाजिक दर्जा वाढतो, म्हणून ते शिक्षण घेऊ लागले आहेत. ज्ञानाची अनेक क्षेत्रे त्यांनी व्यापली आहेत. विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे. त्यामुळे त्यांच्यापुढील समस्याही वाढत आहेत.

मागासवर्गीयांना दर्जेदार शिक्षण मिळून ते सवर्णांची बरोबरी करतील त्या वेळी त्यांना खऱ्या अर्थाने शिक्षण मिळ लागले असे म्हणता येईल. त्यासाठी प्रगतीचा खूप मोठा पल्ला गाठावयाचा आहे. नियोजनकर्त्यांपासून सर्वांनी प्रयत्न करावयाचा आहे. वरील अडचणी दूर झाल्या तर बुद्धिमत्तेत कुठेही कमी नसणारे मागासवर्गीय विद्यार्थी आणखी चमकतील याची खात्री आहे.

■ ■

# १४

# अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांचा मानसशास्त्रीय अभ्यास*

अशोक रंगारी

जातिसंस्था हे भारतीय समाजाचे ठळक वैशिष्टय आहे. इतिहासात अनेक बदल होऊन गेले तरी जात हे भारतीय सामाजिक जीवनाचे एक महत्त्वपूर्ण अंग म्हणून टिकून राहिले.

सुरुवातीला जात ही सामाजिक स्तरीकरणाची मुक्त पद्धत होती; परंतु कालांतराने तिचे रूपांतर सामाजिक भेदभावाच्या श्रेणीबद्ध पद्धतीत झाले. उच्च जातींतील लोक स्वतःला केवळ जन्मामुळे श्रेष्ठ समजू लागले. खालच्या जातींतील व्यक्ती कितीही बुद्धिमान, परिश्रमी व प्रामाणिक असली तरी तिला कनिष्ठ समजण्यात येऊ लागले.

व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी उद्दीपक वातावरण ही प्राथमिक बाब आहे. सामाजिक भेदभावाच्या श्रेणीबद्ध पद्धतीने खालच्या जातीतील लोकांना ह्या उद्दीपक वातावरणापासून वंचित केले गेले. एवढेच नव्हे तर, वांशिक भेदभावाप्रमाणे, तिचे खालच्या जातीतील लोकांच्या व्यक्तिमत्त्वावर व वर्तनावर हानिकारक परिणाम झाले आहेत.

अनुसूचित जाती ह्या भारतीय जाति-संस्थेतील सर्वांत खालची पायरी आहे. त्यांना अस्पृश्य म्हणून संबोधले जात होते. त्यांना दलित किंवा कनिष्ठ समजले जाते. त्यांच्यावर आर्थिक गुलामगिरी लादण्यात आली होती. अमेरिकेतील निग्रोंप्रमाणे त्यांच्यावर सर्वांत कनिष्ठ सामाजिक दर्जा लादण्यात आला होता. त्यांना सापत्नभावाने वागविण्यात आले. त्यांना शतकानुशतके आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, इत्यादि बाबतींत वंचित ठेवण्यात आले होते. ह्या वंचिततेचे मानसशास्त्रीय परिणाम अनुसूचित जातींच्या लोकांच्या व्यक्तिमत्त्वावर व वर्तनावर फार खोलवर झालेले आहेत.

अमेरिकेतील निग्रोंप्रमाणे अनुसूचित जाती हा भारतीय समाजातील प्रमुख समूह आहे. १९७१ च्या शिरगणतीनुसार अनुसूचित जातींची संख्या एकूण भारतीय लोकसंख्येच्या १४.६ टक्के आहे तर निग्रोंची संख्या १९७० मधील अमेरिकन लोकसंख्येच्या ११ टक्के आहे. (राव, १९७८, पान २१४). वंचित समूह हे सामाजिक शास्त्रज्ञांसाठी—प्रामुख्याने मानववंशशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ व सामाजिक मानसशास्त्रज्ञ यांच्यासाठी—संशोधनाचे प्रमुख विषय बनलेले आहेत. भारतातील अनुसूचित जातींच्या समस्यांची विविध स्वरूपे आहेत. अमेरिकेतील निग्रोंच्या तूलनेत भारतातील अनुसूचित जातींवर सामाजिक मानसशास्त्रज्ञांनी फार थोडे संशोधन केले आहे. दोन्ही देशांच्या ऐतिहासिक संदर्भातील फरक लक्षात घेऊन देखील, अमेरिकन निग्रो व

* प्रस्तुत लेख, लेखकाने प्रा. म. न. पलसाने यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यावाचस्पती पदवी-साठी केलेल्या संशोधनावर आधारित आहे.

भारतातील अनुसूचित जाती यांच्या समस्येत बरेच साम्य आढळते. प्रस्तुत संशोधनात अनुसूचित जाती व इतर जातींतील (अनुसूचित जमाती व अन्य अविकसित जाती सोडून) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची स्व-धारणा (अस्मिता), आंतरवैयक्तिक संबंध, व्यक्तिमत्त्व समायोजन, बुद्धिमत्ता व शैक्षणिक प्राप्ती (प्रगति), या मानसशास्त्रीय बाबींसंबंधी तुलनात्मक अभ्यास करण्यात आला. किंबहुना या बाबतीत अनुसूचित जाती व इतर जातींत फरक आहेत काय हा या अभ्यासाचा विषय होता.

प्रस्तुत अभ्यासात अनुसूचित जाती व इतर जातींतील विद्यार्थ्यांची तुलना त्यांचा सामाजिक-आर्थिक दर्जा, लिंग व निवास-विभाग (शहरी–ग्रामीण) हे नियंत्रित करून करण्यात आली.

प्रस्तुत अभ्यासासाठी औरंगाबाद शहरातील वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी निवडण्यात आले होते. भारतीय घटनेचे शिल्पकार व दलितांचे सर्वश्रेष्ठ नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रस्थापित केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई, या संस्थेची औरंगाबादेत कला, विज्ञान, व्यापार व विधी अशी स्वतंत्र चार महाविद्यालये आहेत. या महाविद्यालयांतून जवळपास ५,००० मागासवर्गीय विद्यार्थी शिक्षण घेतात. भारतातील हे मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे सर्वांत मोठे केंद्र असावे. ह्या केंद्रात महाराष्ट्रातील सर्वच भागांतून व कर्नाटक, आंध्रप्रदेश व मध्यप्रदेश ह्या शेजारील राज्यांतून, विद्यार्थी शिकण्यास येतात. या कारणामुळे औरंगाबाद शहर हे अभ्यासासाठी निवडण्यात आले.

### अभ्यासलेल्या विद्या-शाखा व निवडलेली महाविद्यालये

प्रस्तुत अभ्यासासाठी कला, विज्ञान व वाणिज्य या तीन विद्या-शाखांतून प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षांचे विद्यार्थी निवडण्यात आले. एकूण सात महाविद्यालये अभ्यासासाठी निवडण्यात आली होती. अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांची व इतर जातींच्या विद्यार्थ्यांची बहुसंख्या असलेली अशी प्रत्येकी तीन महाविद्यालये होती. औरंगाबादेत महाविद्यालयीन विद्यार्थिनींची संख्या कमी असल्यामुळे एक महिला महाविद्यालय निवडण्यात आले. या निवडलेल्या महाविद्यालयांची नावे खालीलप्रमाणे आहेत :

(१) मिलिंद कला महाविद्यालय,
(२) मिलिंद विज्ञान महाविद्यालय,
(३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय,
(४) सरस्वतीभुवन शिक्षणसंस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय,
(५) सरस्वतीभुवन शिक्षणसंस्थेचे विज्ञान महाविद्यालय,
(६) विवेकानंद कला व सरदार दलीपसिंग वाणिज्य महाविद्यालय आणि
(७) डॉ. सौ. इंदिराबाई पाठक महिला कला-महाविद्यालय.

महाविद्यालये नंबर १ ते ३ मध्ये अनुसूचित जातीचे विद्यार्थी बहुसंख्य होते तर महाविद्यालये नंबर ४ ते ७ मध्ये इतर जातींचे विद्यार्थी बहुसंख्य होते.

अभ्यासात भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या १,१९७ होती. त्यापैकी अनुसूचित जातींचे विद्यार्थी ६७६ होते तर इतर जातींचे विद्यार्थी ५२१ होते. यामध्ये ज्यांनी सर्व चाचण्या पूर्णपणे दिल्या असेच विद्यार्थी घेण्यात आले.

प्रस्तुत संशोधनात, जोगावार यांची स्व-धारणा सूचि, शूझची फीरो-बी चाचणी, पलसाने यांची समायोजन सूची, नाफडे यांची बुद्धिमत्ताचाचणी, कुप्पूस्वामींची सामाजिक-आर्थिक दर्जाश्रेणी (शहरी) व पारीख आणि त्रिवेदींची सामाजिक-आर्थिक दर्जाश्रेणी (ग्रामीण), वापरण्यात आल्या. शैक्षणिक प्रगती पाहण्यासाठी संशोधकाने स्वतः एक प्रपत्र तयार केले. सर्व

# १४

# अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांचा मानसशास्त्रीय अभ्यास*

अशोक रंगारी

जातिसंस्था हे भारतीय समाजाचे ठळक वैशिष्टय आहे. इतिहासात अनेक बदल होऊन गेले तरी जात हे भारतीय सामाजिक जीवनाचे एक महत्त्वपूर्ण अंग म्हणून टिकून राहिले.

सुरुवातीला जात ही सामाजिक स्तरीकरणाची मुक्त पद्धत होती; परंतु कालांतराने तिचे रूपांतर सामाजिक भेदभावाच्या श्रेणीबद्ध पद्धतीत झाले. उच्च जातींतील लोक स्वतःला केवळ जन्मामुळे श्रेष्ठ समजू लागले. खालच्या जातींतील व्यक्ती कितीही बुद्धिमान, परिश्रमी व प्रामाणिक असली तरी तिला कनिष्ठ समजण्यात येऊ लागले.

व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी उद्दीपक वातावरण ही प्राथमिक बाब आहे. सामाजिक भेदभावाच्या श्रेणीबद्ध पद्धतीने खालच्या जातीतील लोकांना ह्या उद्दीपक वातावरणापासून वंचित केले गेले. एवढेच नव्हे तर, वांशिक भेदभावाप्रमाणे, तिचे खालच्या जातीतील लोकांच्या व्यक्तिमत्त्वावर व वर्तनावर हानिकारक परिणाम झाले आहेत.

अनुसूचित जाती ह्या भारतीय जाति-संस्थेतील सर्वांत खालची पायरी आहे. त्यांना अस्पृश्य म्हणून संबोधले जात होते. त्यांना दलित किंवा कनिष्ठ समजले जाते. त्यांच्यावर आर्थिक गुलामगिरी लादण्यात आली होती. अमेरिकेतील निग्रोंप्रमाणे त्यांच्यावर सर्वांत कनिष्ठ सामाजिक दर्जा लादण्यात आला होता. त्यांना सापत्नभावाने वागविण्यात आले. त्यांना शतकानुशतके आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, इत्यादि बाबतींत वंचित ठेवण्यात आले होते. ह्या वंचिततेचे मानसशास्त्रीय परिणाम अनुसूचित जातींच्या लोकांच्या व्यक्तिमत्त्वावर व वर्तनावर फार खोलवर झालेले आहेत.

अमेरिकेतील निग्रोंप्रमाणे अनुसूचित जाती हा भारतीय समाजातील प्रमुख समूह आहे. १९७१ च्या शिरगणतीनुसार अनुसूचित जातींची संख्या एकूण भारतीय लोकसंख्येच्या १४.६ टक्के आहे तर निग्रोंची संख्या १९७० मधील अमेरिकन लोकसंख्येच्या ११ टक्के आहे. (राव, १९७८, पान २१४). वंचित समूह हे सामाजिक शास्त्रज्ञांसाठी–प्रामुख्याने मानववंशशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ व सामाजिक मानसशास्त्रज्ञ यांच्यासाठी–संशोधनाचे प्रमुख विषय बनलेले आहेत. भारतातील अनुसूचित जातींच्या समस्यांची विविध स्वरूपे आहेत. अमेरिकेतील निग्रोंच्या तूलनेत भारतातील अनुसूचित जातींवर सामाजिक मानसशास्त्रज्ञांनी फार थोडे संशोधन केले आहे. दोन्ही देशांच्या ऐतिहासिक संदर्भातील फरक लक्षात घेऊन देखील, अमेरिकन निग्रो व

---

* प्रस्तुत लेख, लेखकाने प्रा. म. न. पलसाने यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यावाचस्पती पदवी-साठी केलेल्या संशोधनावर आधारित आहे.

भारतातील अनुसूचित जाती यांच्या समस्येत बरेच साम्य आढळते. प्रस्तुत संशोधनात अनुसूचित जाती व इतर जातींतील (अनुसूचित जमाती व अन्य अविकसित जाती सोडून) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची स्व-धारणा (अस्मिता), आंतरवैयक्तिक संबंध, व्यक्तिमत्त्व समायोजन, बुद्धिमत्ता व शैक्षणिक प्राप्ती (प्रगति), या मानसशास्त्रीय बाबींसंबंधी तुलनात्मक अभ्यास करण्यात आला. किंबहुना या बाबतीत अनुसूचित जाती व इतर जातींत फरक आहेत काय हा या अभ्यासाचा विषय होता.

प्रस्तुत अभ्यासात अनुसूचित जाती व इतर जातींतील विद्यार्थ्यांची तुलना त्यांचा सामाजिक-आर्थिक दर्जा, लिंग व निवास-विभाग (शहरी–ग्रामीण) हे नियंत्रित करून करण्यात आली.

प्रस्तुत अभ्यासासाठी औरंगाबाद शहरातील वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी निवडण्यात आले होते. भारतीय घटनेचे शिल्पकार व दलितांचे सर्वश्रेष्ठ नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रस्थापित केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई, या संस्थेची औरंगाबादेत कला, विज्ञान, व्यापार व विधी अशी स्वतंत्र चार महाविद्यालये आहेत. या महाविद्यालयांतून जवळपास ५,००० मागासवर्गीय विद्यार्थी शिक्षण घेतात. भारतातील हे मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे सर्वांत मोठे केंद्र असावे. ह्या केंद्रात महाराष्ट्रातील सर्वच भागांतून व कर्नाटक, आंध्रप्रदेश व मध्यप्रदेश ह्या शेजारील राज्यांतून, विद्यार्थी शिकण्यास येतात. या कारणामुळे औरंगाबाद शहर हे अभ्यासासाठी निवडण्यात आले.

### अभ्यासलेल्या विद्या-शाखा व निवडलेली महाविद्यालये

प्रस्तुत अभ्यासासाठी कला, विज्ञान व वाणिज्य या तीन विद्या-शाखांतून प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षांचे विद्यार्थी निवडण्यात आले. एकूण सात महाविद्यालये अभ्यासासाठी निवडण्यात आली होती. अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांची व इतर जातींच्या विद्यार्थ्यांची बहुसंख्या असलेली अशी प्रत्येकी तीन महाविद्यालये होती. औरंगाबादेत महाविद्यालयीन विद्यार्थिनींची संख्या कमी असल्यामुळे एक महिला महाविद्यालय निवडण्यात आले. या निवडलेल्या महाविद्यालयांची नावे खालीलप्रमाणे आहेत :

(१) मिलिंद कला महाविद्यालय,
(२) मिलिंद विज्ञान महाविद्यालय,
(३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय,
(४) सरस्वतीभुवन शिक्षणसंस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय,
(५) सरस्वतीभुवन शिक्षणसंस्थेचे विज्ञान महाविद्यालय,
(६) विवेकानंद कला व सरदार दलीपसिंग वाणिज्य महाविद्यालय आणि
(७) डॉ. सौ. इंदिराबाई पाठक महिला कला-महाविद्यालय.

महाविद्यालये नंबर १ ते ३ मध्ये अनुसूचित जातींचे विद्यार्थी बहुसंख्य होते तर महाविद्यालये नंबर ४ ते ७ मध्ये इतर जातींचे विद्यार्थी बहुसंख्य होते.

अभ्यासात भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या १,१९७ होती. त्यापैकी अनुसूचित जातींचे विद्यार्थी ६७६ होते तर इतर जातींचे विद्यार्थी ५२१ होते. यामध्ये ज्यांनी सर्व चाचण्या पूर्णपणे दिल्या असेच विद्यार्थी घेण्यात आले.

प्रस्तुत संशोधनात, जोगावार यांची स्व-धारणा सूचि, शूझची फीरो-बी चाचणी, पलसाने यांची समायोजन सूची, नाफडे यांची बुद्धिमत्ताचाचणी, कुप्पूस्वामींची सामाजिक-आर्थिक दर्जाश्रेणी (शहरी) व पारीख आणि त्रिवेदींची सामाजिक-आर्थिक दर्जाश्रेणी (ग्रामीण), वापरण्यात आल्या. शैक्षणिक प्रगती पाहण्यासाठी संशोधकाने स्वतः एक प्रपत्र तयार केले. सर्व

चाचण्या ५०–६० विद्यार्थ्यांच्या गटांवर देण्यात आल्या. या सर्व चाचण्यांसाठी जवळजवळ तीन तासांचा कालावधी लागला. यामध्ये १० मिनिटांच्या मध्यन्तराचा समावेश आहे. मिळालेल्या फलितांचे काही संख्याशास्त्रीय तंत्रांचा अवलंब करून विश्लेषण करण्यात आले व त्यांची संभाव्य कारणमीमांसा करण्यात आली.

### स्व-धारणा (अस्मिता)

अस्मिता म्हणजे व्यक्तीच्या स्वतःचे सामर्थ्य, अभिवृत्ती, प्रवृत्ती, अभिरुची, भावना, इत्यादि विषयी असलेल्या स्वतःच्या कल्पना, इतरांच्या तिच्याविषयी असलेल्या कल्पनांविषयी तिचे संवेदन आणि स्वतः कशा प्रकारची व्यक्ती व्हावे याविषयी तिच्या असलेल्या कल्पना, होत. प्रस्तुत संशोधनात अस्मितेच्या तीन परिमितींचा अभ्यास करण्यात आला. त्या परिमिती म्हणजे संवेदित स्वत्व, सामाजिक स्वत्व आणि आदर्श स्वत्व, ह्या होत. संवेदित स्वत्व व्यक्तीला स्वतः-विषयी काय वाटते हे दर्शविते. सामाजिक स्वत्व व्यक्तीच्या तिच्याविषयी असलेल्या इतरांच्या कल्पनेचे तिचे संवेदन दाखविते. आदर्श स्वत्व व्यक्तीने कोणत्या प्रकारची व्यक्ती व्हावे हे दाखविते.

वंचित समूह प्रामुख्याने निग्रो व अ-वंचित समूह यांचे अनेक तूलनात्मक अभ्यास करण्यात आले. यापैकी बहुसंख्य अभ्यासांनी असा कल दाखविला की, अ-वंचित समूहापेक्षा वंचित समूहांची स्व-धारणा निकृष्ट किंवा नकारात्मक असते. प्रस्तुत अभ्यासात खालीलप्रमाणे निष्कर्ष आढळले आहेत.

### निष्कर्ष

अनुसूचित जातींच्या एकूण विद्यार्थ्यांचे संवेदित स्वत्व इतर जातींच्या एकूण विद्यार्थ्यां-पेक्षा कमी होते. सामाजिक-आर्थिक दर्जा नियंत्रित केला असता, पाच सामाजिक-आर्थिक पातळ्यांपैकी कोणत्याही एका पातळीवर, अनुसूचित जातींच्या व इतर जातींच्या विद्यार्थ्यांमध्ये संवेदित स्वत्वाच्या बाबतीत फरक आढळला नाही. अनुसूचित जातींच्या व इतर जातींच्या विद्यार्थ्यांची, लिंग व निवास विभाग याप्रमाणे पोट-विभागणी करण्यात आली. शहरी पुरुष व स्त्रिया, आणि ग्रामीण स्त्रिया यांनी संवेदित स्वत्वाच्या बाबतीत, जातींमुळे कोणताही फरक दाखविला नाही. ग्रामीण पुरुषांमध्ये, इतर जातींच्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत, अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे संवेदित स्वत्व कमी होते.

अनुसूचित जातीच्या एकूण विद्यार्थ्यांचे सामाजिक स्वत्व इतर जातींच्या एकूण विद्यार्थ्यांपेक्षा कमी होते. सामाजिक-आर्थिक दर्जा नियंत्रित केला असता, पाच सामाजिक-आर्थिक पातळ्यां-पैकी कोणत्याही एका पातळीवर, अनुसूचित जातींच्या व इतर जातींच्या विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक स्वत्वाच्या बाबतीत फरक आढळला नाही. शहरी पुरुष व स्त्रिया आणि ग्रामीण पुरुष व स्त्रिया यांनी सामाजिक स्वत्वाच्या बाबतीत, जातींमुळे कोणताही फरक दाखविला नाही.

अनुसूचित जातींच्या एकूण विद्यार्थ्यांचे आदर्श स्वत्व इतर जातींच्या एकूण विद्यार्थ्यांपेक्षा कमी होते. सामाजिक-आर्थिक दर्जा नियंत्रित केला असता, पाचांपैकी चार सामाजिक-आर्थिक दर्जा-वर्गांमध्ये–वर्ग १, २, ३ व ५ मध्ये–अनुसूचित जातींच्या व इतर जातींच्या विद्यार्थ्यांमध्ये, आदर्श स्वत्वाच्या बाबतीत फरक आढळले नाहीत. सामाजिक-आर्थिक दर्जा-वर्ग चारमध्ये–कनिष्ठ मध्यम वर्गात–अनुसूचित जातींचे विद्यार्थी इतर जातींच्या विद्यार्थ्यांपेक्षा आदर्श स्वत्वाच्या बाबतीत कमी होते. ग्रामीण व शहरी पुरुषांमध्ये, अनुसूचित जातीचे विद्यार्थी इतर जातींच्या विद्यार्थ्यांपेक्षा आदर्श स्वत्वाच्या बाबतीत कमी होते. ग्रामीण व शहरी स्त्रियांमध्ये अनुसूचित जातीच्या व इतर जातींच्या विद्यार्थ्यांमध्ये आदर्श स्वत्वाच्या बाबतीत फरक नव्हता.

## आंतरवैयक्तिक संबंध

आंतरवैयक्तिक संबंध किंवा वर्तन म्हणजे व्यक्तींची एकमेकांशी होणारी परस्परक्रिया होय. प्रस्तुत संशोधनात आंतरवैयक्तिक संबंध शूझच्या तीन - परिमितिसिद्धान्ताद्वारे तपासण्यात आले. शूझने (१९६०) आंतरवैयक्तिक वर्तनाच्या तीन परिमिती सांगितल्या. त्या तीन परिमिती म्हणजेच समावेशन, नियंत्रण व प्रेम ह्या होत. समावेशन म्हणजे लोकांशी परस्परक्रिया व साहचर्य प्रस्थापित करणे व टिकवून ठेवणे होय. नियंत्रण म्हणजे लोकांशी नियंत्रणविषयक व सत्ताविषयक संबंध प्रस्थापित करणे होय. प्रेम म्हणजे लोकांशी प्रेमाचे व जिव्हाळयाचे संबंध प्रस्थापित करणे होय. शूझने आंतरवैयक्तिक वर्तनाच्या प्रत्येक परिमितीच्या दोन बाजू सांगितल्या. ह्या दोन बाजू म्हणजेच 'अभिव्यक्त' आणि 'वांछित' होत. अभिव्यक्त वर्तन हे व्यक्तीचे इतरांप्रत व्यक्त केलेले वर्तन होय; तर वांछित वर्तन हे व्यक्तीचे इतरांकडून अपेक्षित असलेले वर्तन दर्शविते. ह्या तीन परिमिती व त्यांच्या दोन बाजूंच्या आधारे, आंतर वैयक्तिक वर्तनाचे पुढील सहा पोटप्रकार पडतात : १. अभिव्यक्त समावेशन, २. वांछित समावेशन, ३. अभिव्यक्त नियंत्रण, ४. वांछित नियंत्रण, ५. अभिव्यक्त प्रेम व ६. वांछित प्रेम. अभिव्यक्त समावेशन हे व्यक्ती दुसऱ्याबरोबर कितपत सहभागी होते हे दर्शविते तर वांछित समावेशन व्यक्ती दुसऱ्याबरोबर कितपत संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करते हे दाखविते. अभिव्यक्त नियंत्रण हे इतरांवर व्यस्ती कितपत नियंत्रण करते, त्यांचे कितपत नेतृत्व करते हे दाखविते; तर वांछित नियंत्रण हे दुसऱ्याकडून व्यक्ती कितपत नियंत्रण, मार्गदर्शन व नेतृत्व मिळविण्याचा प्रयत्न करते हे दर्शविते. अभिव्यक्त प्रेम हे व्यक्ती दुसऱ्याप्रत कितपत प्रेम दाखविते हे दर्शविते. वांछित प्रेम हे व्यक्ती दुसऱ्याकडून कितपत प्रेम मिळविण्याचा प्रयत्न करते हे दाखविते.

वंचित लोकांना सर्व क्षेत्रांत सापत्नभावाची वागणूक देण्यात येते. याचा विपरीत परिणाम त्यांच्या तिन्ही आंतरवैयक्तिक गरजांवर व त्यांच्या दोन बाजूंवर होण्याची दाट शक्यता असते. प्रस्तुत संशोधनात खालीलप्रमाणे निष्कर्ष आढळले.

## निष्कर्ष

अनुसूचित जातींच्या व इतर जातींच्या एकूण विद्यार्थ्यांमध्ये त्याचप्रमाणे सामाजिक-आर्थिक दर्जा नियंत्रित केला असताना देखील, एकूण आंतरवैयक्तिक वर्तनाच्या बाबतीत फरक आढळले नाहीत. अनुसूचित जातींच्या व इतर जातींच्या विद्यार्थ्यांची लिंग व निवास-विभाग याप्रमाणे विभागणी करण्यात आली. ग्रामीण पुरुष व स्त्रिया आणि शहरी पुरुष यांनी एकूण आंतरवैयक्तिक वर्तनाच्या बाबतीत, जातीमुळे कोणताही फरक दाखविला नाही. फक्त शहरी स्त्रियांमध्ये, इतर जातींच्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत, अनुसूचित जातींच्या विद्यार्थिनी, एकूण आंतरवैयक्तिक वर्तनात मागे होत्या.

अभिव्यक्त समावेशनाच्या बाबतीत अनुसूचित जातीच्या व इतर जातींच्या एकूण विद्यार्थ्यांमध्ये महत्त्वपूर्ण फरक आढळले नाहीत. सामाजिक-आर्थिक दर्जा नियंत्रित केला असताना, दोन्ही समूहांत पाचपैकी चार वर्गांत—वर्ग २, ३, ४ व ५ मध्ये—महत्त्वपूर्ण फरक आढळले नाहीत. पहिल्या वर्गात म्हणजेच वरिष्ठ वर्गात अनुसूचित जातींचे विद्यार्थी इतर जातींच्या विद्यार्थ्यांच्या मागे होते. शहरी पुरुष व स्त्रिया आणि शहरी पुरुष यांनी जातींमुळे कोणतेही फरक दाखविले नाहीत. फक्त शहरी स्त्रियांमध्ये, अनुसूचित जातींच्या विद्यार्थिनी इतर जातींच्या विद्यार्थिनींच्या मागे होत्या.

वांछित समावेशनाच्या बाबतीत अनुसूचित जातींच्या व इतर जातींच्या एकूण विद्यार्थ्यांमध्ये महत्त्वपूर्ण फरक आढळले नाहीत. सामाजिक-आर्थिक दर्जा नियंत्रित केला असताना, दोन्ही

समूहांत पाचपैकी तीन वर्गांत–वर्ग १, ३, व ५–मध्ये अनुसूचित जातींचे विद्यार्थी इतर जातींच्या विद्यार्थ्यांच्या मागे होते. दुसऱ्या व चवथ्या वर्गांत दोन्ही समूहांमध्ये फरक आढळले नाहीत. ग्रामीण पुरुष व स्त्रिया, आणि शहरी पुरुष यांनी जातींमुळे कोणताही फरक दाखविला नाही. फक्त शहरी स्त्रियांमध्ये, अनुसूचित जातींच्या विद्यार्थिनी इतर जातींच्या विद्यार्थिनींच्या मागे होत्या.

एकूण समावेशनाच्या बाबतीत, अनुसूचित जातींच्या व इतर जातींच्या एकूण विद्यार्थ्यांमध्ये महत्त्वपूर्ण फरक आढळले नाहीत. सामाजिक-आर्थिक दर्जा नियंत्रित केला असताना, दोन्ही समूहांत पाचपैकी चार वर्गांत–वर्ग २, ३, ४ व ५ मध्ये–महत्त्वपूर्ण फरक आढळले नाहीत. फक्त पहिल्या वर्गात–वरिष्ठ वर्गात–अनुसूचित जातींचे विद्यार्थी इतर जातींच्या विद्यार्थ्यांच्या मागे होते. ग्रामीण पुरुष व स्त्रिया आणि शहरी पुरुष यांनी जातींमुळे कोणतेही फरक दाखविले नाहीत. फक्त शहरी स्त्रियांमध्ये, अनुसूचित जातींच्या विद्यार्थिनी इतर जातींच्या विद्यार्थिनींच्या मागे आढळल्या.

अभिव्यक्त नियंत्रणाच्या बाबतीत अनुसूचित जातींचे एकूण विद्यार्थी इतर जातींच्या एकूण विद्यार्थ्यांच्या पुढे होते. सामाजिक-आर्थिक दर्जा नियंत्रित केला असताना, दोन्ही समूहांत पाचपैकी चार वर्गांत–वर्ग १, २, ३ व ५ मध्ये–महत्त्वपूर्ण फरक आढळले नाहीत. फक्त चवथ्या वर्गात–कनिष्ठ मध्यम वर्गात–अनुसूचित जातींचे विद्यार्थी इतर जातींच्या विद्यार्थांच्या पुढे होते. ग्रामीण पुरुष आणि शहरी पुरुष व स्त्रिया यांनी जातींमुळे कोणतेही फरक दाखविले नाहीत. फक्त ग्रामीण स्त्रियांमध्ये अनुसूचित जातींच्या विद्यार्थिनी इतर जातींच्या विद्यार्थिनींपेक्षा पुढे होत्या.

वांछित नियंत्रणाच्या बाबतीत, अनुसूचित जातींचे एकूण विद्यार्थी इतर जातींच्या एकूण विद्यार्थ्यांच्या पुढे होते. सामाजिक-आर्थिक दर्जा नियंत्रित केला असताना, दोन्ही समूहांत पांचपैकी चार वर्गांत–वर्ग १, ३. ४ व ५ मध्ये–महत्त्वपूर्ण फरक आढळले नाहीत. फक्त दुसऱ्या वर्गात–उच्च मध्यम वर्गात–अनुसूचित जातींचे विद्यार्थी इतर जातींच्या विद्यार्थ्यांच्या मागे होते. ग्रामीण पुरुष आणि शहरी पुरुष व स्त्रिया यांच्यात जातींमुळे कोणतेही फरक दिसून आले नाहीत. फक्त ग्रामीण स्त्रियांमध्ये, अनुसूचित जातींच्या विद्यार्थिनी इतर जातींच्या विद्यार्थिनींपेक्षा पुढे होत्या.

एकूण नियंत्रणाच्या बाबतीत, अनुसूचित जातीचे एकूण विद्यार्थी इतर जातींच्या एकूण विद्यार्थ्यांच्या पुढे होते. तसेच सामाजिक-आर्थिक दर्जा नियंत्रित केला असतानादेखील दोन्ही समूहांत फरक आढळले नाहीत. ग्रामीण पुरुष आणि शहरी पुरुष व स्त्रिया यांच्यात जातींमुळे कोणतेही फरक आढळले नाहीत. फक्त ग्रामीण स्त्रियांमध्ये अनुसूचित जातींच्या विद्यार्थिनी इतर जातींच्या विद्यार्थीनींपेक्षा पुढे होत्या.

अभिव्यक्त प्रेमाच्या बाबतीत अनुसूचित जातींच्या आणि इतर जातींच्या एकूण विद्यार्थ्यांमध्ये महत्त्वपूर्ण फरक आढळले नाहीत. सामाजिक-आर्थिक दर्जा नियंत्रित केला असताना, दोन्ही समूहात पांचपैकी चार वर्गांत–वर्ग १,२, ४ व ५ मध्ये–महत्त्वपूर्ण फरक आढळले नाहीत. फक्त तिसऱ्या वर्गात–मध्यम वर्गात–अनुसूचित जातींचे विद्यार्थी इतर जातींच्या विद्यार्थ्यांच्या मागे होते. ग्रामीण स्त्रिया, आणि शहरी पुरुष व स्त्रियात, अनुसूचित जातींचे लोक इतर जातींच्या लोकांपेक्षा मागे होते. परंतु ग्रामीण पुरुषांनी जातींमुळे महत्त्वपूर्ण फरक दाखविले नाहीत.

वांछित प्रेमाच्या बाबतीत, अनुसूचित जातींच्या व इतर जातींच्या एकूण विद्यार्थ्यांमध्ये, त्याचप्रमाणे सामाजिक-आर्थिक दर्जा नियंत्रित केला असतानादेखील, महत्त्वपूर्ण फरक आढळले

नाहीत. शहरी पुरुषांमध्ये अनुसूचित जातीचे लोक पुढे होते तर शहरी स्त्रियांमध्ये इतर जातींचे लोक पुढे होते. ग्रामीण पुरुष व स्त्रिया यांनी जातींमुळे महत्त्वपूर्ण फरक दाखविले नाहीत.

एकूण प्रेमाच्या बाबतीत, अनुसूचित जातींच्या व इतर जातींच्या एकूण विद्यार्थ्यांमध्ये, त्याचप्रमाणे सामाजिक-आर्थिक दर्जा नियंत्रित केला असताना देखील, महत्त्वपूर्ण फरक आढळले नाहीत. ग्रामीण पुरुष व स्त्रिया आणि शहरी पुरुष यांनी जातींमुळे महत्त्वपूर्ण फरक दाखविले नाहीत. शहरी स्त्रियांमध्ये मात्र, अनुसूचित जातींच्या विद्यार्थिनी इतर जातींच्या विद्यार्थिनींपेक्षा मागे होत्या.

एकूण अभिव्यक्त वर्तनाच्या बाबतीत, अनुसूचित जातींच्या व इतर जातींच्या एकूण विद्यार्थ्यांमध्ये, त्याचप्रमाणे सामाजिक-आर्थिक दर्जा नियंत्रित केला असतानादेखील, महत्त्वपूर्ण फरक आढळले नाहीत. ग्रामीण पुरुष व स्त्रिया आणि शहरी पुरुष यांनी जातींमुळे महत्त्वपूर्ण फरक दाखविले नाहीत. शहरी स्त्रियांमध्ये, अनुसूचित जातींच्या व्यक्ती इतर जातींच्या व्यक्तींपेक्षा मागे होत्या.

एकूण वांछित वर्तनाच्या बाबतीत, अनुसूचित जातींच्या व इतर जातींच्या एकूण विद्यार्थ्यांमध्ये, त्याचप्रमाणे सामाजिक आर्थिक दर्जा नियंत्रित केला असतानादेखील, महत्त्वपूर्ण फरक आढळले नाहीत. शहरी पुरुषांमध्ये अनुसूचित जातींचे लोक पुढे होते तर शहरी स्त्रियांमध्ये इतर जातींच्या व्यक्ती पुढे होत्या. ग्रामीण पुरुष व स्त्रिया यांनी जातींमुळे महत्त्वपूर्ण फरक दाखविले नाहीत.

### व्यक्तिमत्व समायोजन

व्यक्तिमत्त्व समायोजन म्हणजे व्यक्तिमत्त्व व वातावरण यामध्ये गतिमान समतोल प्रस्थापित करण्याची प्रक्रिया होय. प्रस्तुत संशोधनात घराप्रती व कौटुंबिक समायोजन, सामाजिक समायोजन, वैयक्तिक व भावनिक समायोजन, शैक्षणिक समायोजन आणि आरोग्यविषयक समायोजन अशा व्यक्तिमत्त्व समायोजनाच्या पाच विभागांचा अभ्यास करण्यात आला. घराप्रती व कौटुंबिक समायोजन हे व्यक्तीचे आई-वडील, भावंडे व घरातील इतर मंडळींशी असलेले संबंध दाखविते. सामाजिक समायोजन हे व्यक्तीचे इतर व्यक्ती व सामाजिक संस्थांशी असलेले समायोजन दर्शविते. वैयक्तिक व भावनिक समायोजन हे व्यक्तीचा वैयक्तिक व भावनिक समतोल दाखविते. शैक्षणिक समायोजन हे व्यक्तीचा शैक्षणिक क्षेत्रातील समायोजन दर्जा, तिचे शैक्षणिक परिसरातील असलेल्या सर्व व्यक्तींशी असलेले संबंध दाखविते. आरोग्यविषयक समायोजन हे व्यक्तीची आरोग्यविषयक स्थिती व समस्या दर्शविते.

वंचिततेचा परिणाम म्हणून वंचित व्यक्तीचे समायोजन बिघडण्याची शक्यता असते व तसे काही अभ्यासांनी दाखवून दिले आहे. प्रस्तुत संशोधनात खालीलप्रमाणे निष्कर्ष निघाले.

### निष्कर्ष

घराप्रती व कौटुंबिक समायोजनांत अनुसूचित जातींचे एकूण विद्यार्थी इतर जातींच्या एकूण विद्यार्थ्यांपेक्षा कमी प्रतीचे होते. सामाजिक-आर्थिक दर्जा नियंत्रित केला असताना, पाचपैकी चार वर्गात–वर्ग १, २, ४ व ५ मध्ये–अनुसूचित जातींचे विद्यार्थी इतर जातींच्या विद्यार्थ्यांपेक्षा कमी प्रतीचे होते. फक्त तिसऱ्या वर्गात–मध्यम वर्गात–दोन्ही समूहांमध्ये महत्त्वपूर्ण फरक आढळले नाहीत. दोन्ही समूहांची पोट-विभागणी लिंग व निवास-विभाग याप्रमाणे करण्यात आली. ग्रामीण व शहरी पुरुषांत आणि ग्रामीण व शहरी स्त्रियांत अनुसूचित जातींचे लोक इतर जातींच्या लोकांपेक्षा कमी प्रतीचे होते.

सामाजिक समायोजनांत, अनुसूचित जातींचे एकूण विद्यार्थी इतर जातींच्या एकूण विद्यार्थ्यांपेक्षा कमी प्रतीचे होते. सामाजिक-आर्थिक दर्जा नियंत्रित केला असताना, पाचपैकी तीन वर्गात –वर्ग २, ३ व ५ मध्ये–दोन्ही समूहांत महत्त्वपूर्ण फरक आढळले नाहीत. वर्ग १ व ४ मध्ये अनुसूचित जातींचे विद्यार्थी इतर जातींच्या विद्यार्थ्यांपेक्षा कमी प्रतीचे होते. ग्रामीण व शहरी पुरुषांत आणि ग्रामीण व शहरी स्त्रियांत, अनुसूचित जातींच्या व्यक्ती इतर जातींच्या व्यक्तींपेक्षा कमी प्रतीच्या होत्या.

वैयक्तिक व भावनिक समायोजनात, अनुसूचित जातीचे एकूण विद्यार्थी, त्याचप्रमाणे सामाजिक-आर्थिक दर्जा नियंत्रित केला असताना, पाचही वर्गांत इतर जातींच्या विद्यार्थ्यांपेक्षा कमी प्रतीचे होते. ग्रामीण व शहरी पुरुषांत आणि शहरी स्त्रियांत, अनुसूचित जातींच्या व्यक्ती इतर जातींच्या व्यक्तींपेक्षा कमी प्रतीच्या होत्या. फक्त ग्रामीण स्त्रियांनी जातींमुळे महत्त्वपूर्ण फरक दाखविले नाहीत.

शैक्षणिक समायोजनात, अनुसूचित जातींचे एकूण विद्यार्थी, त्याचप्रमाणे सामाजिक-आर्थिक दर्जा नियंत्रित केला असताना, पांचही वर्गांत इतर जातींच्या विद्यार्थ्यांपेक्षा कमी प्रतीचे होते. ग्रामीण पुरुषात आणि ग्रामीण व शहरी स्त्रियांत अनुसूचित जातींच्या व्यक्ती इतर जातींच्या व्यक्तींपेक्षा कमी प्रतीच्या होत्या. ग्रामीण पुरुषांनी जातींमुळे महत्त्वपूर्ण फरक दाखविले नाहीत.

आरोग्यविषयक समायोजनांत अनुसूचित जातींचे एकूण विद्यार्थी इतर जातींच्या एकूण विद्यार्थ्यांपेक्षा कमी प्रतीचे होते. सामाजिक-आर्थिक दर्जा नियंत्रित केला असताना, पाचपैकी चार वर्गांत–वर्ग १, २, ३ व ५ मध्ये दोन्ही समूहांत महत्त्वपूर्ण फरक आढळले नाहीत. चवथ्या वर्गात–कनिष्ठ मध्यम वर्गात–अनुसूचित जातींचे विद्यार्थी इतर जातींच्या विद्यार्थ्यांपेक्षा कमी प्रतीचे होते. ग्रामीण व शहरी पुरुषांत आणि ग्रामीण स्त्रियांत इतर जातींचे विद्यार्थी पुढे होते, तर शहरी स्त्रियात अनुसूचित जातीच्या व्यक्ती पुढे होत्या.

## बुद्धिमत्ता

बुद्धिमत्ता ही एक संकीर्ण मानसिक प्रक्रिया आहे. भिन्न मानसशास्त्रज्ञांनी बौद्धिक कार्याच्या वेगवेगळ्या बाजूंवर भर देऊन वेगवेगळ्या व्याख्या केल्या आहेत. सर्व व्याख्या विचारात घेतल्या असता बुद्धिमत्तेत परिसराशी समायोजन करणे, शिकणे, अमूर्त पातळीवर विचार करणे, हेतुपूर्वक कृति करणे, विशिष्ट दिशा घेणे व टिकवून ठेवणे, आत्मटीका करणे, तार्किक विचार करणे, इत्यादी गोष्टींचा अन्तर्भाव होतो.

अनेक अभ्यासांनी, प्रामुख्याने निग्रोंवरील अभ्यासांनी, दाखवून दिले आहे की, वंचिततेचा अनिष्ट परिणाम व्यक्तीच्या बौद्धिक विकासावर होतो. प्रस्तुत संशोधनात या संबंधात पुढील निष्कर्ष निघाले आहेत.

## निष्कर्ष

अनुसूचित जातींचे एकूण विद्यार्थी इतर जातींच्या एकूण विद्यार्थ्यांपेक्षा बुद्धिगुणांत कमी होते. सामाजिक-आर्थिक दर्जा नियंत्रित केला असतांना, पांचपैकी तीन वर्गांत–वर्ग १, २ व ५ मध्ये दोन्ही समूहांच्या बुद्धिगुणात महत्त्वपूर्ण फरक आढळले नाहीत. तिसऱ्या–मध्यम वर्ग–व चवथ्या–कनिष्ठ मध्यमवर्ग–वर्गांत अनुसूचित जातींचे विद्यार्थी इतर जातींच्या विद्यार्थ्यांपेक्षा बुद्धिगुणात कमी होते. दोन्ही समूहांची पोट-विभागणी लिंग व निवास-विभाग याप्रमाणे करण्यात आली. ग्रामीण व शहरी पुरुषांत आणि शहरी स्त्रियांत, अनुसूचित जातींचे विद्यार्थी इतर जातींच्या विद्यार्थ्यांपेक्षा बुद्धिगुणात कमी होते. ग्रामीण स्त्रियांनी जातींमुळे बुद्धिगुणात महत्त्वपूर्ण फरक दाखविले नाहीत.

## शैक्षणिक प्राप्ती : शैक्षणिक प्रगती

व्यक्तीची शैक्षणिक प्राप्ती किंवा प्रगती हे तिचे शैक्षणिक क्षेत्रातील निर्वर्तन किंवा कर्तृत्व दाखविते. प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्राप्ती लागोपाठच्या तीन वार्षिक परीक्षात त्यांनी मिळविलेल्या गुणांच्या टक्केवारीच्या सरासरीवरून पाहण्यात आली.

अनेक अभ्यासांवरून–प्रामुख्याने निग्रोंवरील अभ्यासांवरून–असे आढळले की, वंचिततेचा विपरीत परिणाम वंचित व्यक्तींच्या शैक्षणिक प्राप्तीवर किंवा प्रगतीवर होत असतो. प्रस्तुत संशोधनात पुढीलप्रमाणे निष्कर्ष निघाले आहेत.

### निष्कर्ष

अनुसूचित जातींचे एकूण विद्यार्थी इतर जातींच्या एकूण विद्यार्थ्यांपेक्षा शैक्षणिक प्राप्तीत मागे होते. सामाजिक-आर्थिक दर्जा नियंत्रित केला असताना अनुसूचित जातींचे विद्यार्थी इतर जातींच्या विद्यार्थ्यांपेक्षा वर्ग २,३ व ५ मध्ये शैक्षणिक प्राप्तीत मागे होते तर चवथ्या वर्गात–कनिष्ठ मध्यमवर्गात–ते पुढे होते. पहिल्या, म्हणजेच वरिष्ठ वर्गात, दोन्ही समूहांच्या शैक्षणिक प्राप्तीत महत्त्वपूर्ण फरक आढळला नाही. दोन्ही समूहांची पोट-विभागणी लिंग व निवास-विभाग याप्रमाणे करण्यात आली. ग्रामीण व शहरी पुरुषांत आणि शहरी स्त्रियांत अनुसूचित जातींचे विद्यार्थी इतर जातींच्या विद्यार्थ्यांपेक्षा शैक्षणिक प्राप्तीत मागे होते. ग्रामीण स्त्रियांनी जातींमुळे शैक्षणिक प्राप्तीत महत्त्वपूर्ण फरक दाखविला नाही.

प्रस्तुत अभ्यासाच्या फलितांवरून काही गोष्टी सूचित होतात. निष्कर्ष लक्षात घेतले असता उपाययोजना म्हणून खालील सूचना करता येतील.

### उपाय-योजना

१. ह्या अभ्यासाची फलिते दाखवितात की, सामाजिक-आर्थिक दर्जा समान असताना, अनुसूचित जातींच्या व इतर जातींच्या विद्यार्थ्यांमधील संवेदित स्वत्व, सामाजिक स्वत्व, आदर्श स्वत्व, अभिव्यक्त नियंत्रण, वांछित नियंत्रण, एकूण नियंत्रण, वांछित प्रेम, घराप्रती व कौटुंबिक समायोजन, सामाजिक समायोजन, बुद्धिमत्ता व शैक्षणिक प्राप्ती यातील फरक कमी झाले आहेत. म्हणून सरकारी व बिनसरकारी संघटनांनी अनुसूचित जाती व इतर जातींच्या सामाजिक-आर्थिक दर्जामधील तफावत कमी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. काही विशिष्ट कालावधीकरिता अनुसूचित जातींना विशेष हक्क, प्रामुख्याने शैक्षणिक व नोकरीविषयक सवलती दिल्या गेल्यामुळे त्यांचा सामाजिक-आर्थिक दर्जा निश्चितच वाढला; परंतु हा उपाय अनुसूचित जातींना इतर जातींच्या पातळीवर आणण्यासाठी पुरेसा नाही. या उपायाशिवाय, अनुसूचित जाती व इतर जातींच्या सामाजिक-आर्थिक दर्जातील दरी कमी करण्यासाठी अधिक जालीम उपाय व व्यापक उपाययोजना मोठ्या प्रमाणावर करण्याची गरज आहे. राज्य सरकार, भारत सरकार, सामाजिक व राजकीय संघटना, यांनी या दिशेने ठोस उपाय केले पाहिजेत व त्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखला पाहिजे. युनेस्को, जागतिक बँक व जागतिक आरोग्य-संघटना यांसारख्या आंतरराष्ट्रीय संघटनादेखील भारतातील सर्वांत मोठा वंचित समूह असलेल्या अनुसूचित जातींची स्थिती सुधारण्याच्या उपक्रमात मदत करू शकतात. सुधारक, राजकीय पुढारी, शिक्षणशास्त्रज्ञ, कायदेमंडळांचे सभासद व प्रशासक या सर्वांनी या प्रश्नाचा पाठपुरावा सर्व पातळ्यांवर करावा.

२. शिक्षक तयार करण्याचे कार्यक्रम आवश्यक आहेत. ह्या कार्यक्रमांचा हेतू अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांमध्ये स्व-जाणीव व स्व-स्वीकृति वाढीस लावणे हा असला पाहिजे. स्व-स्वीकृतीची भावना अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांची स्व-धारणा सुधारील आणि महाविद्या-

लयीन परिसरात समावेशन, नियंत्रण व प्रेम या तीन प्रांतांतील त्यांच्या आंतरवैयक्तिक संबंधांच्या वाढीचा वेग वाढविण्यास मदत करील. शिक्षक हा व्यक्तीच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तींपैकी एक समजला जातो. शिक्षकांच्या वर्गातील वर्तनाचा विद्यार्थ्यांच्या स्व-धारणेवर परिणाम होण्याची शक्यता असते. शिक्षण-प्रशिक्षण कार्यक्रमात वंचित व मागासलेल्या वर्गांची मानवी वाढ व विकास, स्व-धारणेच्या विकासावर व महत्त्वावर भर देणारे व्यक्तिमत्त्व सिद्धान्त, व्यक्तिमत्त्व विकास आणि बौद्धिक विकास, यांवरील अभ्यासक्रमांचा समावेश असला पाहिजे.

३. भरती-कार्यक्रमांच्याद्वारे सर्व महाविद्यालयांत बहुवंश-जातवाद वाढीस लावला पाहिजे. महाविद्यालयांत सर्व जाती, वंश, धर्म यांचे लोक असले पाहिजेत. शिक्षणाचे ध्येय हे केवळ बुद्धीचा विकास करणे हे न ठेवता, आंतरवैयक्तिक संबंध व व्यक्तिमत्त्व-समायोजन वृद्धिंगत करणे, त्या-बावतीत बांधिलकी निर्माण करणे, हे देखील असले पाहिजे.

४. अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांच्या ध्येयांची तपासणी करणे हे त्यांच्यातील सुप्त शक्तींचा जास्तीत जास्त विनियोग करण्यासाठी, त्यांना प्रेरित करण्यासाठी, आवश्यक आहे. पुष्कळदा विद्यापीठाने ठरविलेले आदर्श मानदंड अनुसूचित जातींच्या काही विद्यार्थ्यांसाठी वास्तववादी राहात नाहीत किंवा काही अभ्यासक्रमांच्या ध्येयांचा उपयोग त्यांना त्यांच्या संस्कृतीत परतल्या-वर होत नाही. विद्यार्थ्याने त्याच्यातील जास्तीतजास्त कार्यक्षमता पातळी गाठली तर ती निश्चितच चांगली स्व-धारणा वाढीस लावील आणि इतर विद्यार्थी व शिक्षकांबरोबरचे आंतर-वैयक्तिक संबंध वृद्धिंगत करील. त्यामुळे व्यक्तिमत्त्व-समायोजन सूकर होईल, बौद्धिक विकास वाढेल व शैक्षणिक प्रगती उंचावेल.

५. जेथे अनुसूचित जातींचे विद्यार्थी शिकतात त्या महाविद्यालयांच्या परिसरात सल्लागारांची (counsellors) गरज आहे. हे सल्लागार त्यांना स्वत्वाविषयीच्या भावना शब्दरूप करण्यासाठी उत्तेजन देऊ शकतात, आंतरवैयक्तिक संबंध वाढविण्यासाठी धनात्मक दृढीकरण पुरवू शकतात आणि समायोजन-समस्या व शैक्षणिक समस्या समजण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत करू शकतात.

६. स्वोन्नति व आंतरवैयक्तिक आकर्षणावर भर देणाऱ्या शैक्षणिक प्रक्रियेचा अवलंब केला तर अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना त्यांच्यातील सुप्त शक्तींचा जास्तीत जास्त उपयोग करण्या-साठी प्रेरित करता येते.

७. अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना आई-वडील, समवयस्क व समाजनेते यांच्यामधून वर्तन-नमुन्याची गरज आहे. त्यांच्या आईवडिलांना असे शिक्षण व मार्गदर्शन दिले पाहिजे की, ज्यामुळे ते त्यांच्या मुलांसाठी चांगले वर्तन-नमुने ठरतील.

८. नियंत्रण अभिव्यक्त करण्यासाठी, अनुसूचित जातींच्या लोकांना भारतीय समाजात सत्ता व अधिकारात सहभागी होण्याची पुरेपूर संधी मिळाली पाहिजे. पुरेपूर अभिव्यक्त वर्तनासाठी अनु-सूचित जातींच्या व्यक्तींनी समाजाच्या प्रमुख प्रवाहात जास्तीत जास्त मिसळण्याची गरज आहे.

९. वैयक्तिक व भावनिक समायोजन उंचावण्यासाठी, अनुसूचित जातींच्या विरुद्ध होत अस-लेले असमर्थनीय भेदभाव थांबविले पाहिजेत. शैक्षणिक समायोजन उंचावण्यासाठी, अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना शिक्षक, सहकारी विद्यार्थी व शैक्षणिक प्रशासक यांच्याकडून योग्य स्वीकृती मिळण्याची गरज आहे.

१०. आहाराचा बुद्धिमत्तेवर परिणाम होण्याची शक्यता असल्यामुळे, अनुसूचित जातींच्या मुलांना विकासकाळात पुरेसा योग्य आहार मिळण्याची गरज आहे. गिलफोर्डने (१९६७, पान ३९६) व्यक्तीचा बौद्धिक दर्जा सुधारण्यासाठी काही वातावरणीय घटक सुचविलेत. हे घटक

म्हणजेच बालपणी लहान मुलाचे उद्दीपन व उत्तेजन, पुरेसे अवधान, चांगल्या बौद्धिक नमुन्यांची उपलब्धता आणि चांगल्या शैक्षणिक संधी हे होत. अनुसूचित जातींच्या मुलांचा बौद्धिक दर्जा सुधारण्यासाठी त्यांना हे सर्व वातावरणीय घटक उपलब्ध करून देण्याची गरज आहे.

११. शैक्षणिक प्राप्ती उंचावण्यासाठी, शैक्षणिक स्व-धारणा व प्राप्तीची गरज अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांमध्ये रुजविली पाहिजे. काट्झने ( १९७०, पानें १९८–२०६ ) काही परिस्थितिजन्य घटक जे वंचित समूहाच्या विशेषेकरून अमेरिकन निग्रोंच्या शैक्षणिक प्रगतीला हानिकारक ठरू शकतात, ते सांगितले. हे घटक म्हणजे सामाजिक धमकी, सामाजिक नकार, वेगळेपणा, बहुसंख्य समूहाशी स्पर्धा करण्याची भीती, पूर्वप्रशिक्षणाचा अपुरेपणा, आणि अवास्तव कनिष्ठतेची भावना, हे होत. हे घटक अनुसूचित जातीच्या लोकांना देखील लागू पडण्याची शक्यता आहे. म्हणून अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती उंचावण्यासाठी या घटकांचा परिणाम त्यांच्यावर होणार नाही यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. ■ ■

## संदर्भ


Boykin, L. L. The adjustment of 2,078 Negro Students. *Journal of Negro Education*, 1957. **26**, 75–79.

Brody, E. B., and Brody, N. *Intelligence : Nature, determinants, and consequences*. New York ; Academic Press, 1976.

Crow, L. D. *Psychology of Human Adjustment*. New York : Alfred A. Knopf, 1974.

Ghurye, G. S. *Caste, Class, and Occupations*, Bombay : Popular Book Depot, 1961.

Guilford, J. P. *The Nature of Human Intelligence*, New York : McGrow Hill Book Company, 1967.

Jensen, A. R. *Educability and Group Differences*, New York : Harper and Row, 1973.

Katz, I. Some motivational Determinants of racial differences in intellectual achievement. Goldschmid, M. L. ( Ed. ), *Black Americans and White Racism : Theory and Research*, New York : Holt, Rinehart and Winston, Inc., 1970.

Lott, A. J., and Lott, B. E. *Negro and White Youth : A Psychological Study in a Border-State Community*. New York : Holt, Rinehart and Winston, Inc., 1963.

Myrdal, Gunnar. *An American Dilemma : The Negro Problem and Modern Democracy*, New York : Harper and Brothers Publishers, 1944.

Pettigrew, T. F. *A Profile of the Negro American*. Princeton, N. J. : D. Van Nostrand, 1964.

Rao, M. S. A. (Ed.) *Social Movements in India :* Volume One. New Delhi : Manohar Publications, 1978.

Schutz, W. C. FIRO : *A Three-Dimensional Theory of Interpersonal Behaviour*. New York : Holt, Rinehart and Winston, Inc., 1960.

Wilcox, R. C. *The Psychological Consequences of Being a Black American : A Source book of Research by Black Psychologists*. New York : John Wiley and Sons, Inc., 1971.


—

# १५ मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या समस्या – एक अभ्यास

शि. श्री. काळे

असमानता व मागासपणा दूर करण्याचा अमोघ अंतिम उपाय समान पात्रता व समान संधी निर्माण करणे हा आहे. हा उपाय अमलात आणण्यासाठी मागासवर्गीय व्यक्तींचा, विशेषत: उमलत्या तरुण-तरुणींच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास घडवून आणला पाहिजे. या व्यक्तिमत्त्व विकासात बौद्धिक विकासाला, मानसिक व भावनिक विकासाला, अग्रक्रम मिळाला पाहिजे. हा विचार मान्यता पावला पाहिजे, बळावला पाहिजे.

परंपरागत विचारसरणीप्रमाणे बौद्धिक विकास घडवून आणण्याचे कार्य शिक्षणक्षेत्राचे असे मानण्यात येते आणि म्हणूनच शिक्षणक्षेत्रात असमानता व मागसलेपण दूर करण्याचे सामुदायिक उपक्रम केले जाऊ लागले. याबद्दलच्या शासकीय कृतीत प्रामुख्याने (१) प्रवेशात राखीव जागा ठेवणे, (२) शिष्यवृत्त्या देणे, (३) पुस्तके, वह्या विकत घेण्याकरता व भोजनाकरिता आर्थिक मदत देणे, (४) वसतिगृहे चालविणे व त्याकरिता अनुदान देणे, अशा स्वरूपाचे उपक्रम मोठ्या प्रमाणात व हिरीरीने केले जाऊ लागले.

## महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थी

एका महाविद्यालयातील पाहणीच्या आधारे हा लेख लिहिला आहे. पाहणीच्या वर्षी त्या महाविद्यालयात १६३ मागासवर्गीय विद्यार्थी (विद्यार्थिनी धरून) अभ्यासास उपलब्ध झाले. या सर्वांपैकी १०० जणांचे पत्ते व्यवस्थित मिळू शकले.

फक्त १०० मागासवर्गीय विद्यार्थीच प्रत्यक्ष पुणे शहराचे परिसरात राहात होते. उरलेल्या ६३ विद्यार्थी-विद्यार्थिनींशी पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात ते राहात नसल्याने संपर्क साधता आला नाही. त्यामुळे ही पाहाणी फक्त १०० विद्यार्थी-विद्यार्थिनींचीच झाली.

## पाहाणीतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे जमातीने व शिक्षणस्तराने वर्गीकरण

या १०० विद्यार्थ्यांपैकी ५८, मागास जातीतील, ४ मागास जमातीतील, १९ भटक्या जमातीपैकी, ७ विमुक्त, ६ नवबुद्ध व ६ इतर, असे होते. या १०० विद्यार्थ्यांपैकी ३२ विद्यार्थी (२७ विद्यार्थी व ५ विद्यार्थिनी) कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणारे, ५८, ज्येष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणारे (५३ विद्यार्थी व ५ विद्यार्थिनी) व १० पदव्युत्तर शिक्षण घेणारे होते.

## पहाणीतील विद्यार्थ्यांची निवास-व्यवस्था

या १०० विद्यार्थ्यांपैकी ३९ विद्यार्थी निरनिराळ्या वसतिगृहात, छात्रालयात राहणारे व ६१ विद्यार्थी वसतिगृहाव्यतिरिक्त इतर राहात होते. या ६१ विद्यार्थ्यांपैकी २२ विद्यार्थी आई-वडील

किंवा अन्य पालकांबरोबर राहात होते, १२ विद्यार्थी इतरत्र नातेवाईकांबरोबर, ५ विद्यार्थी भाड्याने घेतलेल्या जागेत, व ९ विद्यार्थी मित्रांबरोबर रहात होते. ३ विद्यार्थ्यांची वरील निवासस्थानाव्यतिरिक्त रहाण्याची व्यवस्था होती. २ विद्यार्थ्यांचा स्वतःचा संसार होता व स्वतःच्या कुटुंबाबरोबर ते रहात होते. ८ विद्यार्थ्यांनी माहिती दिली नाही. यातच झोपडपट्टीत रहाणारे ४८ विद्यार्थी अन्तर्भूत असून ते वर उल्लेखिलेल्या सर्व गटात समाविष्ट झालेले आहेत.

वसतिगृहात रहाणाऱ्या ३९ विद्यार्थ्यांपैकी, ४ महाविद्यालयाने चालविलेल्या वसतिगृहात, २८ सरकारी वसतिगृहात, व ५ खाजगी वसतिगृहात रहात होते. २ विद्यार्थ्यांनी माहिती दिली नाही. या वसतिगृहात रहाणाऱ्यापैकी एकालाही एकट्याला स्वतंत्र खोली नव्हती, ४ विद्यार्थी एका खोलीत दोघेजण असे रहात होते. एका खोलीत तिघे जण किंवा त्यापेक्षाही अधिक असे ३३ विद्यार्थी रहात होते. २ विद्यार्थ्यांकडून माहिती मिळाली नाही. ५ व्यक्तींच्या अनुभवाचा अपवाद वगळता विभिन्न जातीतील विद्यार्थ्यांनी एकत्र राहून जातिमुक्त सहजीवनाचा अनुभव इतर विद्यार्थ्यांना मिळत नसल्याचे आढळले.

एकूण १०० विद्यार्थ्यांपैकी वसतिगृहात रहाणारे ३९ विद्यार्थी, ज्यांची उल्लेखिलेल्या निवासाव्यतिरिक्त व्यवस्था आहे असे ३ व ज्यांची माहिती मिळाली नाही असे ८ अशा एकूण ५० व्यक्ती वगळता, उरलेल्या ५० विद्यार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था अत्यंत असमाधानकारक होती. या ५० पैकी २२ जण आई-वडील-पालकांबरोबर व १२ नातेवाईकांबरोबर अशी ३४ जण होती. त्यातच २ विद्यार्थिनी होत्या. ज्या कुटुंबात हे विद्यार्थी राहात त्या कुटुंबात किमान ५ व्यक्ती राहात आहेत असे आढळले. भाड्याची खोली घेऊन रहाणाऱ्या व मित्रांबरोबर रहाणाऱ्या विद्यार्थ्यांची परिस्थिती फारशी निराळी नव्हती. या ५० पैकी ४८ जण झोपडपट्टीच्या गलिच्छ वस्तीत राहतात असे आढळले.

### पाहाणीतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या पालकांचे शिक्षण

कुटुंबप्रमुखांच्या शिक्षणाबद्दल जी अत्यंत ढोबळ स्वरूपाची माहिती संकलित केली त्यात असे आढळले की, एकूण १०० कुटुंबप्रमुखांपैकी ८ निरक्षर होते, १० जणांना फक्त लिहिता-वाचता येत होते, २२ कुटुंबप्रमुखांचे प्राथमिक शिक्षण झाले होते. ४१ जणांचे माध्यमिक शिक्षण, महाविद्यालयीन व उच्च शिक्षण फक्त १३ जणांना मिळाले होते. ६ विद्यार्थ्यांकडून माहिती मिळाली नाही. निरक्षरात प्रामुख्याने भटक्या व विमुक्त जमातींतील कुटुंबप्रमुख होते. नवबुद्ध कुटुंबांतील प्रमुख सुशिक्षित होते व त्यांत माध्यमिक व महाविद्यालयीन उच्च शिक्षण मिळालेले कुटुंबप्रमुख होते. सर्व विद्यार्थिनींचे पालक सुशिक्षित व सुविद्य होते.

### मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या कुटुंबांची आर्थिक स्थिती

कुटुंबांच्या आर्थिक स्थितीबद्दलही अत्यंत ढोबळ अशी माहिती संकलित केली होती. फक्त समाधानकारक आर्थिक परिस्थिती, बरी आर्थिक स्थिती व अत्यंत बिकट गंभीर स्थिती असे तीन गट कल्पिले होते. याबद्दल ढोबळ माहिती अशी की, पहिल्या समाधानकारक आर्थिक स्थितीच्या गटात १९% कुटुंबे होती. बऱ्यापैकी परिस्थिती २४% कुटुंबांची होती, तर ४८% कुटुंबांची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट होती. ९ कुटुंबांबाबत माहिती मिळाली नाही.

ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबांची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट होती ते विद्यार्थी भटक्या जमातींचे व विमुक्त जमातींचे होते.

### आर्थिक ओढाताण

१. विद्यार्थ्यांकरिता कराव्या लागणाऱ्या खर्चाची तोंडमिळवणी करता येत नाही असे प्रत्यक्ष मुलाखतींत ४८ कुटुंबप्रमुखांनी सांगितले.

२. वसतिगृहात रहाणाऱ्या विद्यार्थ्यांकडून कळले की, त्यांच्या जेवणाचा आकारला जाणारा खर्च त्यांच्या कुवतीपेक्षा फार अधिक आहे. एका माणसाचा डबा मागवून त्यात २।३ विद्यार्थी पाळीपाळीने जेवतात असे आढळले.

३. खोली घेऊन अथवा मित्रांकडे रहाणाऱ्या काही विद्यार्थ्यांचे पालक राज्य परिवहनाच्या बसने (S. T.) बाहेरगावांहून डबा पाठवितात व काही कारणामुळे ज्या दिवशी तो येत नाही त्या दिवशी चणेफुटाणे खाऊन दिवस उलटावा लागतो.

४. प्रत्येक विद्यार्थ्याला आवश्यक पाठ्यपुस्तके घेण्यास लागणारा पुरेसा पैसा नसतो. खेदाची बाब अशी की, प्रामुख्याने ही पाठ्यपुस्तके नसतात ती गाईडस् व प्रश्नपेढीऐवजी उत्तरपेढीच्या स्वरूपाची मार्गदर्शक पुस्तके असतात. परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या दृष्टीने ही पुस्तके वाचणे–किंबहुना येवढीच पुस्तके वाचणे आवश्यक – अपरिहार्य असते व ही अपरिहार्य आवश्यक पुस्तके विकत घेण्यास पुरेसा पैसा नसतो, असे विद्यार्थी व बऱ्याच पालकांचे म्हणणे होते.

५. वाणिज्य अभ्यासक्रमात अकौन्टस् हा एक अनैच्छिक अपरिहार्य (Compulsory) विषय असतो. उत्तीर्ण होण्याकरिता या विषयाची गणिते सोडविण्याचा सराव करावा लागतो. महाविद्यालयाच्या शिकविण्याच्या पद्धतीत या विषयाचा पुरेसा सराव व्हावा अशी पर्याप्त व समाधानकारक व्यवस्था नसल्याने खाजगी वर्गाची शिकवणी अपरिहार्यपणे लावावी लागते. याकरिता कुवतीपेक्षा किती तरी अधिक खर्च करावाच लागतो. याला पर्याय नाही. हा खर्च भागविता येत नाही. ह्या आवश्यक खर्चाची तरतूद शासनाने करावयास पाहिजे अशी अनेकांची सूचना आहे.

६. महाविद्यालयांच्या परिसरात, जवळ अशी वसतिगृहे नाहीत. महाविद्यालयांची अधिकृत व पुरस्कृत वसतिगृहे महागडी आहेत व त्या वसतिगृहांकरिता करावा लागणारा अधिक खर्च सरकार देत नाही. नजिकच्या परिसरात वसतिगृह नसल्याने महाविद्यालयात पायी येण्यास ४-६ मैल अथवा त्याहीपेक्षा अधिक अन्तराची रपेट करावी लागते. त्यात फार वेळही जातो. बस दोन वेळा तरी बदलावी लागते. सैनिकी शाळेतील विद्यार्थ्यास ज्याप्रमाणे सायकल दिली जाते तशी सायकल तरी दिली जावी अथवा खर्च करावे लागणारे सायकलभाडे विशेषत: दूर अंतरावर असणाऱ्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना तरी देण्याची व्यवस्था व्हावी, अशी सूचना अनेक विद्यार्थ्यांनी केलेली आहे.

७. भटक्या व विमुक्त जमातींतील काही पालकांनी मुलांना सिगरेटचे व्यसन लागू लागल्याची (त्यांना आता कमी खर्चाची खाकी विडी चालत नाही !) व मुलींना छानछोकीची चटक लागू लागल्याची तक्रार केली. आपल्याला परवडत नाही तर जाडेभरडे ओबड-धोबड कपडे वापरण्यास लाज का वाटावी ? टेरीकॉट-टेरिलिनचे कपडेच का हवेत ? ते अस्वच्छच का असावेत ? कपड्यावर होणारा अमाप खर्च कमी व्हावा याकरिता मागासवर्गीय विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे गणवेश द्यावेत व त्या गणवेशाबद्दल शरम वाटण्याऐवजी अभिमान वाटावा अशी परिस्थिती निर्माण व्हावयास हवी.

**कुटुंबातील व सभोवतालचे वातावरण व त्याची शैक्षणिक अनुकूलता** – अनेक विद्यार्थ्यांच्या निवासस्थानी प्रत्यक्ष गेलो त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या पालकांबरोबर, परिवारातील इतर कुटुंबियांबरोबर, प्रत्यक्ष बोललो. त्यामुळे कुटुंबातील एकूण वातावरणाबद्दल बरीच उद्बोधक व विचारांना चटका लावणारी माहिती मिळाली. अर्धपोटी राहून, फाटकेतुटके कपडे घालून इतर सर्व प्रकारची तोशीस सहन करणारे, आपल्या मुलांचे भविष्य उज्ज्वल व्हावे याकरिता, त्याच्या उच्च शिक्षणाकरिता सर्व प्रकारचा त्याग करणारे पालक ज्याप्रमाणे आढळले, त्याचप्रमाणे

स्वतःच निर्माण केलेल्या मोठ्या कुटुंबाच्या मुलाबाळांच्या लेंढारात मादक द्रव्यसेवनाने सतत बेहोष असणारे व मुलाबाळांच्या भवितव्याबद्दल बेसुमार बेजबाबदार पालकही आढळले. येथे मोजक्या फक्त दोनच प्रतिक्रिया व्यक्त करतो. (अ) पालकाचे बरोबर घरी राहाणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यास योग्य आणि अनुरूप पर्याप्त जागा नाही; व (आ) शिक्षण-अभ्यासाला अनुकूल व उत्तेजक असे घरचे वातावरण नाही. छोटयाशा जागेत अदलीबदली (Shift) ने अनेक व्यक्ती रहातात. सभोवताली अस्वच्छता, गलिच्छपणा, दुर्गन्धी. सतत चाललेला ट्रांझिस्टरचा आवाज व क्वचित्प्रसंगी मादक द्रव्यसेवनानंतर घरच्या पत्नीबरोबर झालेली शिवीगाळ,अपशब्द, मारामारीचे, लहान मुलाच्या रडण्या-भेकण्याचे ध्वनिप्रदूषण. याव्यतिरिक्त घरच्या एकूण वातावरणाबद्दल काही विद्यार्थी-विद्यार्थिनींनी व्यक्त केलेल्या प्रतिक्रिया नमूद करतो. (अ) घरच्या कौटुंबिक व्यक्तींबरोबर माझे संबंध 'सर्वसाधारण' आहेत. (आ) घरातील प्रत्येक बाबीबद्दल माझे माझ्या आई-वडिलांबरोबर मतभेद आहेत. (इ) माझे आई-वडील मला समजू शकत नाहीत. त्यांच्या अपेक्षांचा मी भंग करतो याची मला जाणीव आहे. तथापि त्यांच्या अपेक्षाच चुकीच्या, कालबाह्य झालेल्या आहेत हे त्यांना का कळत नाही ? (ई) वडील निरर्थक वाद घालतात, रागावतात. आता (थप्पड) मारणे कमी झाले आहे. तथापि, घाणेरडचा शिव्या आईवरून देतात. ते सहन होत नाही; पण काही करता येत नाही म्हणून वादविवादाचे प्रसंगच नव्हे तर वडिलांनाच मी मुद्दाम टाळतो. (उ) जेव्हा जेव्हा मी महाविद्यालयाबद्दल, अभ्यासाबद्दल त्यांना सांगावयाचा प्रयत्न करतो तेव्हा तेव्हा माझ्या सांगण्यात, माझ्या विषयात त्यांना गोडी, रुची नसल्याचे दिसते. अभ्यासाबद्दल काही बोलावयाचे म्हटले तर त्यांचा विश्वास बसत नाही. म्हणून आता प्रत्यक्ष विचारल्याशिवाय बोलावयाचे नाही असे ठरविले आहे. (ऊ) इतर व्यक्तींची उदाहरणे देऊन माझ्यावर टीका करतात. (ए) अनेक गोष्टी आवश्यक असून त्या विकत घेतल्या जात नाहीत, त्याऐवजी निरर्थक गोष्टींवर उगाच पैसा खर्च होतो. (ऐ) घरी एक ट्रान्झिस्टर आहे. तो लावल्याने अभ्यास करता येत नाही. हे अनेक वेळा अनेक पद्धतींनी सांगून झाले. तरीही सर्व व्यक्ती सर्व काळ फार मोठ्या आवाजात तो वाजवतात. (ओ) घरच्या व्यक्तींच्या विचित्र सवयींमुळे एखादे वेळी इतका त्रास आणि मनस्ताप होतो की घरून पळून कुठे तरी नाहीसे व्हावे असे वारंवार वाटते. (औ) घरचे वातावरण सर्वसाधारण सामान्य चार-चौघांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला पोषक तर नाहीच, अनुकूल नाही; प्रतिकूल आहे.

**समवयीन मित्र-मैत्रिणी**

"मला फारशी मित्रमण्डळी नाहीत. माझ्या अवतीभोवती माझ्या जमातीमधील किती तरी परिचित व्यक्ती आहेत. तथापि त्यांना मित्र म्हणता येणार नाही. त्या व्यक्ती फारशा शिकलेल्या नाहीत. त्यांचे समाजात वावरण्याचे नियम निराळे, माझे शिष्टाचाराचे नियम निराळे. त्यामुळे त्यांच्याबरोबर मिसळावे असे मनापासून वाटत नाही. इतर जातींतील सुशिक्षित व्यक्तींबरोबर ओळख आहे, तथापि त्यांचे रीतीरिवाज मला कळत नाहीत व परवडतही नाहीत. माझ्याजवळ चांगले कपडे नाहीत म्हणूनही त्यांच्याबरोबर वावरावयाची मला शरम वाटते. आत्मविश्वासाने मी त्यांच्याबरोबर व्यवहार करू शकत नाही. इतके असूनही त्या सर्वांचे माझ्याबद्दल फार गैरसमज आहेत. आत्मप्रौढीने व तिरसटपणे मी वागतो; मलाच मित्र नकोत, मी माणूसघाणा आहे, असे माझ्या अनेक परिचित मित्रांनी इतरांजवळ बोलून दाखविले आहे. मला त्यांचे गैरसमज दूर करता येत नाहीत. विद्यार्थिनींबरोबर ओळख करून घ्यावी अशी ओढ मनात असते; पण आम्ही चांगले तलम कपडे घालत नसल्याने व सधन-श्रीमंत नसल्याचे लक्षात आल्याने, त्यांच्यातर्फे स्नेहाचा ओलावा कधी आढळत नाही. त्यांच्याबरोबर बोलण्यात आम्ही गोंधळतो व त्यामुळे क्षणिक मनरंजन झाले तरी नंतर कोणताही प्रतिसाद मिळत नाही.

### मानसिक-भावनिक स्थिती

"मनात व डोक्यात विचारांची गर्दी असते. चार-चौघांना आपले विचार सांगावे असे वाटते; पण चारचौघांसमोर मी आपले विचार मांडू शकत नाही. अनोळखी माणसासमोर मला बोलणे जमत नाही. पुष्कळ वेळा मी निष्कारण घाबरतो. मला वाटते माझा स्वभावच भित्रा आहे.

"लोकांनी आग्रह केला म्हणून मी कॉलेजला आलो. येथे मी अगदी एकाकी आहे. आजूबाजूची परिस्थिती व रोज येणारे अनुभव यामुळे अभ्यासाला बसल्यावर नाहीनाही त्या गोष्टी मनात येतात. कुणालाही न कळविता मला माझ्या गावी पळून जावे असे फार वाटते. भविष्यकाळाबद्दल काही विचार करत बसणे फायद्याचे नाही, निरुपयोगी आहे; म्हणून मी आता विचार करणेच सोडून देणार आहे.

"येणारी संकटे, हालअपेष्टा तोंड बंद ठेवून सहन करणे येवढेच आता शिल्लक आहे." हे एका विद्यार्थ्याचे आत्मनिवेदन. प्रातिनिधिक वाटते.

### शैक्षणिक प्रगतीचे मूल्यमापन

**मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबद्दलची पारंपरिक पद्धतीची पहाणी**—पारंपरिक पद्धतीप्रमाणे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे मूल्यमापन त्यांच्या परीक्षा फळावरून व परीक्षेत त्याला विविध विषयांत मिळणाऱ्या गुणांवरून (Marks) केले आहे.

ही पद्धत अमलात आणण्याचे दृष्टीने सर्व १०० विद्यार्थ्यांकडून त्यांना निरनिराळ्या सार्वजनिक परीक्षांमध्ये ( Public Examinations ) मिळालेल्या गुणांचे तक्ते मिळविले. त्याचप्रमाणे या परीक्षांबद्दल सर्वसाधारण गुणवत्तेबद्दलची वारवारितासारणी मिळवली ( Normal distribution of Marks at relevant public Examinations). गुणवत्तासारणी-बरोबर तूलना करण्याकरिता १०० मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी संबंधित परीक्षेत मिळविलेल्या गुणांचे सारणीपत्रक समोर ठेवले. या माहितीच्या आधारावर आकृतिबन्ध (Diagrams) तयार केले. त्यावरून निघणारे निष्कर्ष पुढे दिले आहेत.

इतर विद्यार्थ्यांच्या मानाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्गात उत्तीर्ण होणे फारच कमी (अपवादात्मक) आहे असे आढळले. दुसऱ्या वर्गात उत्तीर्ण होणाऱ्यांचेही प्रमाण समाधान-कारक नाही. इतर सर्वसामान्य विद्यार्थ्यांचे मानाने तिसऱ्या वर्गामध्ये (Pass class) उत्तीर्ण होणाऱ्यांचे प्रमाण बरेच जास्त.

भाषा, इंग्रजी, अकौन्टस, स्टॅटिस्टिक्स, कॉस्टिंग, लॉ, इकॉनॉमिक्स या विषयांत इतर विद्यार्थ्यांच्या मानाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांना गुण कमी पडतात. इतकेच नव्हे तर ते अधिक प्रमाणात नापास होतात. एकाच वर्गात एकापेक्षा अधिक वर्षे लागण्याची वारंवारिता, इतर सर्वसाधारण विद्यार्थ्यांच्या तुलनेत मागासवर्गीय विद्यार्थ्यांबाबत अधिक आहे.

### मागासवर्गीय विद्यार्थी व त्यांचे वाणिज्य शिक्षण

**मागासवर्गीय विद्यार्थ्यांची वाणिज्य शिक्षणविषयक प्रेरणा** – या प्रेरणेबद्दलची पहाणी या विद्यार्थ्यांनी वाणिज्यविषयक अभ्यासक्रम कसा निवडला? हा अभ्यासक्रम निवडण्याची प्रमुख कारणे कोणती ? वाणिज्य अभ्यासक्रमाची निवड करणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या प्रमुख महत्त्वाकांक्षा काय आहेत ? या विद्यार्थ्यांच्या अभ्यास करण्याबद्दलच्या विशेष प्रेरणा कोणत्या ? या प्रश्नांच्या आधाराने व सहाय्याने केली आहे.

वाणिज्य-अभ्यासक्रम-निर्णयप्रक्रियेबाबत ७ विद्यार्थ्यांनी प्रतिक्रिया नमूद केल्या नाहीत. हा अभ्यासक्रम निवडावा असा निर्णय १९ विद्यार्थ्यांच्या पालकांनी केलेला होता. त्याचप्रमाणे

३८ विद्यार्थ्यांबद्दलचा हा निर्णय त्यांच्या नातेवाइकांच्या सल्ल्यामुळे व २८ विद्यार्थ्यांबाबत जमातीतील लोकांनी आग्रह केला म्हणून हा निर्णय केला गेल्याचे आढळले. क्षणभर, ' मित्रानी गळ घातली ती गळ विद्यार्थ्याने मान्य केलेली असल्याने तो विद्यार्थ्यांच्या स्वयंनिर्णयाचा एक प्रकार मानला तरी फक्त ८ विद्यार्थ्यांनी (५+३) वाणिज्यविषयक अभ्यासक्रमाबद्दल स्वयंनिर्णय केल्याचे आढळते. सारांश इतकाच की, दर १० मागासवर्गीय विद्यार्थ्यांपैकी धड एकाचाही वाणिज्य-अभ्यासक्रम निवडण्याचा स्वयंनिर्णय नाही अशी वस्तुस्थिती आहे असे आढळले.

या अभ्यासक्रमनिवडीची जी कारणे सांगण्यात आली त्यात नोकरी-रोजगारी त्वरित मिळेल ही आशाच अत्यंत प्रमुख कारण असल्याचे आढळले. मागासवर्गीय ३६ विद्यार्थ्यांनी त्वरित नोकरी मिळेल म्हणून हा पाठ्यक्रम निवडला. व्यापारव्यवसाय करण्याची, स्वयंरोजगारी व स्वावलंबन साधण्याची पात्रता प्राप्त व्हावी म्हणून फक्त ७ मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी हा अभ्यासक्रम निवडल्याचे नोंदविले. वाणिज्य विषयात पारंगत झाल्याची पदवी मिळाली म्हणजे समाजात (विशेषतः लग्नाच्या बाजारात) प्रतिष्ठा वाढेल म्हणून काहींनी हा पाठ्यक्रम निवडला, तर ४ मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी आपल्या जमातीची प्रतिष्ठा वाढावी म्हणून हा पाठ्यक्रम निवडला असे सांगितले.

विज्ञान, वैद्यक, स्थापत्य यांसारखा आवडीचा अभ्यासक्रम शिकण्याकरिता प्रवेश मिळाला नाही म्हणून वाणिज्य अभ्यासक्रम ९ मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी निवडला. हा अभ्यास व पाठ्यक्रम सोपा आहे; हा पाठ्यक्रम घेणाऱ्या विद्यार्थ्यांना खूप मोकळा वेळ मिळतो म्हणून निवडल्याचे, १२ मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी नमूद केले आहे.

अभ्यासक्रम मनापासून आवडत असल्याने ४ विद्यार्थ्यांनी निवड केली तर ज्ञानार्जन व्हावे म्हणून निवड केल्याचे ५ विद्यार्थ्यांनी नोंदविले आहे. याचा अर्थ असा की, १० मागासवर्गीय विद्यार्थ्यांपैकी फक्त एका विद्यार्थ्याला हा विषय मनापासून आवडतो व खरोखर ज्ञानार्जन करण्याची इच्छा आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रमुख महत्त्वाकांक्षा काय आहेत याबद्दल चौकशी केली तेव्हा असे आढळले की, ८ मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी प्रतिक्रिया नोंदविली नाही तर २ विद्यार्थ्यांनी स्वतःच्या भविष्यकाळाबद्दल फारसा विचार केला नसल्याचे म्हटले आहे. या विद्यार्थिनी होत्या. बहुसंख्य १०० पैकी ५५% मागासवर्गीय विद्यार्थ्यांची महत्त्वाकांक्षा सरकारी नोकरी करणे व ७ विद्यार्थ्यांची महत्त्वाकांक्षा व्यावसायिक संस्थेत ( उच्च स्तरीय ) नोकरी करण्याची. म्हणजे ५५+७=६२% विद्यार्थी नोकर होऊ इच्छितात. याचाच अर्थ असा की, स्वयंरोजगारी, स्वयंनिर्भरता, उद्योजकत्व, ही वाढावीत म्हणून वाणिज्यअभ्यासक्रम मूलतः योजलेले असले तरी १० पैकी ६ मागासवर्गीय विद्यार्थी हे त्वरित नोकरी मिळण्याच्या महत्त्वाकांक्षेने या अभ्यासक्रमाचा विचार करतात. स्वतःचा व्यवसाय असावा ही प्रेरणा—महत्त्वाकांक्षा—१० पैकी फक्त एकाच विद्यार्थ्याची आहे. (यातच Chartered Accountant होण्याची महत्त्वाकांक्षा कोणाही मागासवर्गीय विद्यार्थ्याची नसल्याचे आढळले हे मुद्दाम आवर्जून उल्लेखावयास हवे.

स्वतःच्या जमातीचे नेतृत्व करणे, मध्यमवर्गीयाप्रमाणे आर्थिक स्थिरतेचे जीवन जगणे, समाजसेवक होणे, शिक्षक बनणे, या प्रेरणा मागासवर्गीय विद्यार्थ्यांत अत्यंत क्षीण असल्याचे आढळले.

अभ्यासाच्या प्रमुख प्रेरणा कोणत्या याबद्दल विचारणा करता असे आढळले की, ८१% विद्यार्थी येन केन प्रकारेण परीक्षेमध्ये यश मिळवून कसेबसे उत्तीर्ण व्हावे व पदवी पदरात पाडून घ्यावी या उद्देशाने अभ्यास करतात. ज्ञानार्जन करणे, जिज्ञासेचे समाधान करणे, याकरिता फक्त ८ विद्यार्थी अभ्यास करतात; तर फक्त ९% विद्यार्थी सुसंस्कृत नागरिक व्हावे या व्यापक हेतूने अभ्यास करतात.

## वाणिज्य शिक्षणव्यवस्थेतील सद्य:स्थितीबद्दल विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया

**अभ्यासाला आवश्यक पुस्तके, वह्या, इतर साधनांची पर्याप्तता–** मागास वर्गीय विद्यार्थ्यांना लागणारी सर्व पुस्तके, वह्या व इतर साधने मिळतात काय या प्रश्नाच्या प्रतिक्रियेत ३ विद्यार्थ्यांनी उत्तर दिले नाही. सर्व साहित्य, पुस्तके मिळतात असे फक्त ८ विद्यार्थ्यांनी नमूद केले. काही पुस्तके व साहित्य मिळते असे ४६ विद्यार्थ्यांनी नमूद केले तर साहित्यसाधने मिळत नसल्याची नोंद ४३ विद्यार्थ्यांनी केली. मथितार्थ उघड आहे की, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अभ्यासाची साधने पर्याप्त प्रमाणात उपलब्ध नाहीत.

**अभ्यासाला योग्य उपयुक्त जागा –** ५ विद्यार्थ्यांनी प्रतिक्रिया नोंदविली नाही. फक्त १२ विद्यार्थ्यांना उपयुक्त जागा मिळत असल्याचे आढळले. १० विद्यार्थ्यांनी सांगता येत नाही असा उल्लेख केला व त्याहीपेक्षा अधिक म्हणजे ७३ विद्यार्थ्यांनी उपयुक्त जागा मिळत नसल्याचे नमूद केले. यात गलिच्छ वस्तीत, झोपडपट्टीत, मित्रांबरोबर रहाणारे विद्यार्थी अधिक प्रमाणात आहेत.

**शैक्षणिक-प्रयोजन, प्रेरणा, परिस्थिती, प्रक्रिया-पद्धती यांबद्दलच्या अडचणी–** वाणिज्य शिक्षणाच्या प्रयोजनाची जाणीव, प्रेरणा, या शिक्षणाबद्दलची सद्य:स्थिती, उपलब्ध सोयी-सवलती, परिस्थिती, वाणिज्य शिक्षणाची प्रक्रिया व शिक्षणाची पद्धत या सर्व बाबींसंबंधी काही अडचणी आहेत काय या प्रश्नाच्या उत्तरात फक्त २९ जणांनी अडचणी नाहीत अशी प्रतिक्रिया व्यक्त केली, तर २५ विद्यार्थ्यांनी अडचणी आहेत व ३८ विद्यार्थ्यांनी अडचणी आहेत / नाहीत असे निश्चित सांगता येत नसल्याचे नमूद केले. या विद्यार्थ्यांमध्ये ज्या अडचणी आहेत त्यांची जाणीव नसल्याची वस्तुस्थिती बहुसंख्य विद्यार्थ्यांबाबत आढळली. ८ विद्यार्थ्यांनी प्रतिक्रिया नोंदविल्या नाहीत.

**वाणिज्य शिक्षणाची उद्दिष्टे अथवा प्रयोजन–** याबद्दल सुस्पष्ट कल्पना नसल्याची प्रतिक्रिया ३६ मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी नोंदविली तर २९ विद्यार्थ्यांनी प्रयोजन, उद्दिष्ट, स्पष्ट आहे असे निश्चितपणे सांगता येत नाही असे सांगितले. फक्त २५ विद्यार्थ्यांना वाणिज्यविषयक शिक्षणक्रमाच्या उद्दिष्ट व प्रयोजनाबद्दल जाणकारी असावी असे दिसले.

**मन व चित्तवृत्तीचे केंद्रीकरण करण्याची आवश्यकता–** अभ्यासपद्धतीत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे, मन लावून अभ्यास करावा, असे ४२ विद्यार्थ्यांना वाटत नाही असे आढळले. त्यांपैकी अनेक जणांचे मन लावून अभ्यास करण्याची गरज / आवश्यकता असल्याचे मत आढळले. फक्त २९ विद्यार्थ्यांना मन लावून अभ्यास करावा असे वाटले.

**अभ्यासपद्धती–** त्याचप्रमाणे ५५% विद्यार्थ्यांनी ते अनुसरत असलेल्या अभ्यासपद्धतीत कोणतीही सुधारणा करण्याची आवश्यकता नसल्याचे जे मत व्यक्त केले आहे ते चिंतनीय आहे. यापैकी बऱ्याचजणांनी सध्याच्या पद्धतीने भागते–पास होता येते–मग उगाच सुधारणा कशाकरता ? असा प्रश्न विचारला आहे.

**विषयाची दुर्बोधता–**वाणिज्यअभ्यासक्रमात शिकवले जाणारे विषय रुक्ष आणि दुर्बोध असल्याचे ५३% मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे मत आहे असे आढळले.

अभ्यासाच्या पद्धतीत स्वावलंबी, स्वयंनिर्भर कसे व्हावयाचे याबद्दलची माहिती ७४% मागासवर्गीय विद्यार्थ्यांना नसल्याचे आढळले.

**अभ्यासाबद्दलच्या वेळेचे समय-नियोजन–**मागासवर्गीय विद्यार्थ्यांपैकी ६३% विद्यार्थी ठराविक वेळी अभ्यास करीत नाहीत व ५२% विद्यार्थ्यांना आम्ही ठराविक वेळी अभ्यास करतो असे

सांगता येत नाही. अभ्यास करावयास अधिक वेळ देऊ शकत नाही याचे एकच प्रमुख कारण नमूद करावयास सांगितले असता 'फक्त पास व्हावयाचे आहे व पास होण्याकरिता अधिक अभ्यास करण्याची गरज–आवश्यकता–नाही.' अशी प्रतिक्रिया ६०% मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी नोंदविली आहे. वर्गात विषय शिकवले जाण्यापूर्वी ६४% मागासवर्गीय विद्यार्थी पूर्वतयारी करीत नाहीत.

**ग्रंथालय**–६५% विद्यार्थी वेळ मिळाला तरी ग्रंथालयात जात नाहीत. ग्रंथालयात जाण्याची त्यांना गरजच भासत नाही.

**परीक्षा व पूर्वतयारी**–परीक्षेपूर्वी अपेक्षित प्रश्नाची पूर्वतयारी करण्याची ६९% मागासवर्गीय विद्यार्थ्यांची पद्धत नाही. ६८% विद्यार्थी परीक्षेच्या काही थोडे दिवस आधी उत्तरपेढ्यांची पुस्तके (Answer books. Questions & Answers Guides) आणतात आणि या पुस्तकांतील उत्तरे तोंडपाठ करण्याची धडपड करतात. याव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्या अभ्यासपद्धतीची जाण व गरज नसल्याची प्रतिक्रिया अनेक विद्यार्थ्यांनी नोंदली आहे.

**शिक्षकांचे मार्गदर्शन**–शिक्षक नीट रितीने विषय समजावून सांगत नाहीत व त्यांची भाषा दुर्बोध असल्याची तक्रार ५१% मागासवर्गीय विद्यार्थ्यांची आहे. कोणत्याही अडचणी-शंकांचे निरसन करण्याकरिता ४६% विद्यार्थी शिक्षकांकडे (मार्गदर्शनाकरिता) जात नसल्याचे आढळते.

**खाजगी वर्ग**–४९% विद्यार्थ्यांनी खाजगी वर्गात (Coaching class) प्रवेश घेतलेला असून ६१% विद्यार्थ्यांना खाजगी वर्गाचे मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे व अत्यावश्यक वाटते. यापैकी काहीजणांनी आर्थिक ऐपत नसल्याने खाजगी वर्गात प्रवेश घेऊ शकलो नाही असे नमूद केले आहे.

### शिक्षकांबद्दलची मते

अ) काही एक-दोन प्राध्यापकांचे अपवाद वगळल्यास विषय समजला नाही असे सांगितले असता तो समजावून सांगण्यास आवश्यक तो वेळ प्राध्यापक देत नाहीत. त्यांना मोकळा फुरसतीचा वेळ ते फार कामात असल्याने नसतो असे म्हणतात.

आ) मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक व्यक्तिगत अडचणींकडे लक्ष देण्यास त्यांना फुरसत नसते व विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक–व्यक्तिगत–अडचणींकडे प्राध्यापकाने लक्ष द्यावे ही अपेक्षाच चुकीची आहे असे ते म्हणतात.

इ) काही शिक्षक 'ज्या काही अडचणी-शंका असतील त्या वर्गातच विचारा म्हणजे इतरांनाही त्या चर्चेचा फायदा होईल,' असे सांगतात. वर्गात प्रश्न विचारण्याचे धैर्य आम्हाला नाही हे त्यांना माहीत आहे. आम्ही तसे त्यांना सांगितलेही आहे. तरी देखील ते मनावर घेत नाहीत. आमच्या अडचणी-शंका समजून घेण्याचे ते का टाळतात ते कळत नाही.

ई) काही प्राध्यापकांना शैक्षणिक अडचणी सांगितल्या तर त्यांनी त्यांचा काही विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर करण्याकरिता खासगी वर्ग भरतो तेव्हा येण्यास सांगितले. मागासवर्गीय विद्यार्थी असल्याने शिकवणीचे पैसे देण्याची कुवत नाही असे सांगितले तेव्हा 'तुम्ही मागासवर्गीय विद्यार्थी सरकारचे जावई, माझे नाही', असे त्यांनी सुनावले!

उ) काही प्राध्यापकांच्या मनात, प्रत्यक्ष व्यवहारात व्यक्त करण्याचे त्यांनी प्रयत्नपूर्वक टाळले तरी, सुप्त अशी उच्च-नीचतेची दृढ भावना आहे, याचा अनेक पद्धतीने आम्हाला अनुभव येतो. अशा प्रकारच्या प्राध्यापकांच्या सान्निध्यात आम्हाला गुदमरल्यासारखे होते व अशा पक्षपाती प्राध्यापकांकडे जाण्याचे प्रयोजन आम्हाला वाटत नाही.

ऊ) महाविद्यालयात थोडे मोजके प्राध्यापक असे आहेत की, जे तत्परतेने मनापासून आमच्या अडीअडचणींची चौकशी करतात, आमच्या शैक्षणिकच नव्हे तर वैयक्तिक अडचणी शांतपणे समजून घेऊन गाजावाजा न करता आम्हाला सर्व प्रकारचे, आर्थिक देखील, सहाय्य करतात. आमच्या कर्तव्यात चूक झाली की रागावतात, निर्भर्त्सना करतात. चूक दुरुस्त करण्याचे कबूल करीपर्यंत अबोला धरतात; पण या प्राध्यापकांचा आम्हाला विश्वास व आधार वाटतो.

**शिक्षणप्रक्रियेबद्दल मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया**

अ) या वर्षीच्या अभ्यासक्रमांतील प्रमुख विषय व आनुषंगिक विषय, पाठ्यपुस्तके, वाचावयाचे प्रमुख संदर्भग्रंथ, यांबद्दलची तपशीलवार माहिती एखाद्या पूर्वप्रबोधन (orientatin) कार्यक्रमाद्वारे शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी वेळीच दिली जात नाही. काही त्रोटक माहिती वर्गात प्राध्यापक कधी तरी सांगतात. ती फक्त एका विशिष्ट विषयाशी संबंधित व त्रोटक असते व ती माहिती आम्ही ऐकतो; त्या माहितीची नोंद घेत नाही. सूचनाफलकावरही समग्र माहिती नसते. सूचनाफलकावरील जागा अपुरी, त्यामुळे तीही त्रोटक असते व ती वाचावयास त्रास पडतो. ग्रंथालयातूनही ती माहिती नीट रीतीने व आस्थापूर्वक पुरविली जात नाही. शेवटी ती मार्गदर्शिके (guide) मधून मिळवावी लागते पण तेथेही ती पूर्णतः मिळत नाही.

आ) वर्गातील उपस्थिती, गृहपाठ, टचुटोरिअल्स, सत्रपरीक्षा, वर्षाच्या कामाचे वेळापत्रक, विद्यार्थ्यांतर्फे अपेक्षित प्रतिक्रिया, विद्यार्थ्यांची कर्तव्ये, कोणत्या वेळी नेमके काय करावयाचे व ते केले न गेल्यास होणाऱ्या परिणामाची सुस्पष्ट जाणीव, ही आम्हाला वस्तुनिष्ठ रीतीने ( objectively ) व सरळ ( Directly ) कधीच करून देण्यात येत नाही. प्रारंभीच्या काळी किती तरी दिवस 'सूचनाफलक' या संपर्कमाध्यमाचे महत्त्वच आम्हाला कळलेले नसते. सहकारी विद्यार्थी व आमच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांतील वरच्या वर्गातील ज्येष्ठ विद्यार्थ्यांबरोबर गप्पा होतात तेव्हा खूप उशीरा व काही वेळेला विपर्यस्तपणे हे कळते.

इ ) ग्रंथालयाचा उपयोग कसा करावयाचा याबद्दल सूचनाफलकावर लावलेल्या सूचना आम्हाला समजतच नाहीत. त्यांची इंग्रजी, मराठी, लई 'तेज' असते ! ग्रंथपालाकडे जाऊन 'कडमडावयाचे' मानसिक धैर्य आम्हाला नाही. त्यामुळे तिकडे आम्ही फिरकतच नाही.

ई ) पाठ्यक्रमाला आनुषंगिक अशा शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडाविषयक व मनोरंजनात्मक प्रवृत्तींबरोबर सामुदायिक उपक्रम ( Co-curricular and extra–curricular activities ) महाविद्यालयात चालतात. या प्रवृतींबद्दल संपूर्ण माहिती देणे, या प्रवृतींत भाग घेण्यासाठी आम्हाला प्रेरणा देणे, उद्युक्त करणे, भाग पाडणे, हे कधीच होत नाही. आमच्यापैकी काही वरील वर्गातील विद्यार्थी, 'दादा' लोक, माहिती सांगतात. या कार्यक्रमात सक्रीय भाग घ्यावा सम्मीलित व्हावे असे कोठेच आवाहन नसते. उच्च जातीय इतर विद्यार्थ्यांना या कार्यक्रमात आम्ही भाग घ्यावा, पुढाकार घ्यावा, असे वाटतही नसावे ! आम्ही मागासवर्गीय सामुदायिक रितीभाती कळत नाहीत त्यामुळे उपेक्षित असतो व आपण होऊन दूर रहातो. त्यामुळे या प्रवृतीत सामुदायिक भाग घेतला तर तो अपवादच आहे. आम्ही सक्रीय भाग घेत नाही.

उ ) व्याख्याने कशी ऐकावयाची; पुस्तके वाचून टिपणे कशी तयार करावयाची; अभ्यासात चित्त एकाग्र कसे करावयाचे; विचार-शक्ती कशी प्रगल्भ करावी याची; चिकित्सक व विधायक दृष्टीने विचार कसा करावयाचा; एखाद्या समस्येचे, स्थितीचे परीक्षण, अध्ययन कसे करावयाचे व निर्णय कसे घ्यावयाचे; स्वाध्यायात स्वावलंबी कसे व्हावयाचे; बौद्धिक बाबतीत स्वयंनिर्भर कसे बनावयाचे; याबद्दल कशाही प्रकारची माहिती आम्हाला आमच्या महाविद्यालयात कधीच पुरविली जात नाही. आमच्या शालेय जीवनात गृहपाठाच्या अनुषंगाने हे थोडेबहुत सांगितले जात होते, येथे तसले काही शतांशही सांगितले जात नाही. त्यामुळे आम्ही निराधार,

उपेक्षित आहोत असे वाटते. अनामिकपणा जाणवतो.

ऊ ) वर्गांत हजर असणे अनिवार्य नसते त्यामुळे आम्ही 'उंडारतो', वर्गांत बसत नाही. तथापि जेव्हा केव्हा बसतो तेव्हा असे जाणवते की, काही अपवाद सोडले तर विषय शिकविण्याची सखोल पूर्वतयारी प्राध्यापकांची नसते.

पहिल्या सत्राच्या अखेरपर्यंत प्राध्यापक जी भाषा वापरतात ती भाषा आम्हाला फारशी कळत नाही. आमच्या 'डोक्यावरून' जाते. त्यावेळी विषयाची मांडणी मुद्देसूद समाधानकारक आहे अथवा नाही हे आम्हाला कळत नाही. व्याख्यानाचे वेळी कोणते मुद्दे टिपून घ्यावयाचे ते कळत नाही. मग वह्यात काही तरी लिहीत, चित्रे काढीत आम्ही बसतो !

काही थोडे प्राध्यापक व्याख्यानांचा सारांश, भावार्थ सांगतात ते अपवादात्मक असतात. पण मग या प्राध्यापकांना वर्षभर वेळ पुरत नाही. हे प्राध्यापक सोडले तर आम्हाला प्रश्न विचारून आम्हाला काही समजले आहे काय याची चाचणी घेण्याच्या भानगडीत कोणी प्राध्यापक फारसे पडत नाहीत. प्रश्न विचारणाऱ्या प्राध्यापकाच्या तासाला प्रश्न विचारले जाणार आहेत असे कळले तर आम्ही त्या तासाला 'दांडी' मारतो. हजेरी अपरिहार्य नाही त्यामुळे काहीच बिघडत नाही. गैरहजर विद्यार्थ्यांचे परीक्षाअर्ज थोपवून धरले जात नाहीत. वर्गातील गैरहजेरीमुळे पुष्कळ वेळा महत्त्वाची चांगली व्याख्याने आम्ही गमावतो. परंतु या बाबतीत खडसावून स्पष्टीकरण विचारण्याची आस्था प्राध्यापकांना नाही व आत्मविश्वास आम्हाला नाही. त्यामुळे प्राध्यापकही 'चूप' व आम्हीही 'चूप' असतो.

(ए) अलीकडे सत्रपद्धती सुरू करण्यात आली आहे. तेव्हापासून परीक्षेत संभाव्य (Probable) प्रश्न व त्यांची उत्तरे या अनुरोधाने प्राध्यापक विषयांची मांडणी करतात. अपेक्षित प्रश्नांच्या उत्तरांपलीकडे ती मांडणी जात नाही.

कितीतरी प्राध्यापक सर्व तास (Period) भर आम्हाला अपेक्षित प्रश्नांची उत्तरे लिहून देतात. अपेक्षित प्रश्नांची उत्तरे जे प्राध्यापक लिहून देतात त्या प्राध्यापकांचे तासाला आम्ही बसतो.

किती तरी वेळा ही उत्तरे बाजारात कमी किंमतीला मिळणाऱ्या मार्गदर्शक चोपड्यातूनही (Guide) लिहून दिली जात आहेत असे काही अभ्यासू मुलामुलींच्या लक्षात येते. मग कुजबूज होते. मग ह्या प्राध्यापकाच्या वर्गाला ते टिपणे लिहून देत असले तरी आम्हाला जावेसे वाटत नाही.

(ऐ) नव्याने सुरू करण्यात आलेल्या सत्रपद्धतीमुळे, महाविद्यालयीन उच्च शिक्षणाचा अर्थ, अपेक्षित प्रश्नांची वर्गात लिहून घेतलेली अथवा मार्गदर्शक चोपड्यात वाचावयास मिळणारी टिपणे पाठ करणे व परीक्षेच्या वेळी पाठांतराच्या सरावामुळे स्मरणात असलेल्या टिपणांना उत्तरपत्रिकेत उतरवून काढणे एवढाच महाविद्यालयीन वाणिज्य उच्च शिक्षणाचा अर्थ उरलेला आहे. याला अपवाद फक्त अकौंटन्सी हा विषय आहे. या विषयाची गणिते सोडवून सराव करावा लागतो. या सरावाची व्यवस्था महाविद्यालयात नसते व त्याकरिता खाजगी शिकवणीवर्गात दाखल व्हावे लागते. त्याकरिता भरमसाट फी द्यावी लागते. ही फी सरकारकडून मिळत नाही.

(ओ) शतकानुशतके आम्हाला शिक्षणापासून वंचित केले गेले, आम्ही उपेक्षित राहिलो, हे गतकालचे पाप धुतले जावे, शिक्षणाची सोय व्हावी, व्यक्तिमत्त्वविकासाची समान संधी मिळावी, मागासवर्गीय विद्यार्थी-विद्यार्थिनींना शिक्षणाकरिता उत्तेजन, प्रेरणा मिळावी, म्हणून शासनाने राखीव जागा व आर्थिक सहाय्य देण्याचे धोरण स्वीकारले व अमलात आणले. या राखीव जागांच्या सोयी-सवलती मिळाव्यात, आर्थिक सहाय्याचा फायदा घेता यावा, म्हणून

महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा व पगारपटावर नाव दाखल करून घ्यावयाचे. अपेक्षित प्रश्नांच्या उत्तरांची टिपणे पाठ करणे व उत्तरपत्रिकेत भल्याबुऱ्या मार्गाने ती उतरविणे यापलिकडे या सर्व उपक्रमाला काही अर्थ नाही. कागदोपत्री काहीही नमूद असले तरी प्रत्यक्षात आम्ही वर्गात हजर असतो अथवा नाही, ग्रंथालयात जातो व तेथे पुस्तके वाचतो अथवा नाही, वेळच्या वेळी टच्युटोरिअल्स देतो अथवा नाही, महाविद्यालयातील विविध प्रकारच्या शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, मनोरंजन या उपक्रमात सहभागी होतो अथवा नाही याबद्दल कोणत्याच प्रकारची दखल घेतली जात नाही. त्यामुळे प्रवेश घेऊन एकदा हजेरीपटावर नाव लावून घेणे, टच्युटोरिअल्स, सत्रपरीक्षा केव्हा हे जाणण्याकरिता मधून मधून महाविद्यालयात चक्कर टाकणे (काही सन्मित्रांनी विश्वासार्ह माहिती घरी येऊन दिली तर हेही अनावश्यक असल्याने करीत नाही.), अपेक्षित प्रश्न कोणते आहेत याचा मागोवा घेत राहणे व अपेक्षित प्रश्नांची चोपड्यांमधून मिळणारी उत्तरे पाठ करणे एवढेच आमच्या अनुभवाचे सार आहे.

याचा अर्थातच राष्ट्राच्या आर्थिक विकासावर व सामाजिक परिवर्तनावर दूरगामी अनिष्ट परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाही.

तेव्हा तात्कालीन वरच्यावर दिखावू उपायांनी पात्रता-विषमता व तज्जन्य विकृतींचे निराकरण होणार नाही हे उघड आहे. हे उघडपणे कोणी बोलत नाही; प्रकट करीत नाही; एवढेच.

याकरिता स्वतंत्र पद्धतीने व वस्तुनिष्ठ पद्धतीने विचार, निदान प्रयोग व कृती करावयास हवी. त्यासाठी काही सूचना :

(अ) शिक्षणाच्या अभ्यासविषयकेन्द्रित (Subject-centred) दृष्टीऐवजी मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता विद्यार्थी केन्द्रित (Student-centred) दृष्टी ठेवावयास हवी.

(आ) प्रत्येक मागासवर्गीय विद्यार्थी हे एक स्वतंत्र समस्या–आव्हान–असे मानावयास हवे.

(ई) प्रत्येक विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्वविकासाच्या व विशेषतः शैक्षणिक प्रगतीच्या आढाव्यावर त्या विद्यार्थ्याच्या शैक्षणिक गरजांचे निदान व्हावयास हवे.

(इ) ज्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाची स्थिती व शैक्षणिक गरजांचे निदान समान होईल त्यांचा शैक्षणिक सौकर्याकरिता स्वतंत्र गट करावयास हरकत नाही. तथापि गट करणे व सामुदायिक शिकवणे या प्रक्रियेत विद्यार्थ्यांच्या व्यक्तिनिष्ठ शैक्षणिक गरजांकडे कधीही दुर्लक्ष होणार नाही याबद्दलची सतत दक्षता घ्यावयास हवी.

(उ) प्रत्येक शिक्षणाकरिता स्वतंत्र पद्धती शोधून काढावी लागेल. ही प्रशिक्षणपद्धती अधिक वास्तववादी, वस्तुनिष्ठ, जास्त सखोल, सघन, शैक्षणिक-त्रुटी परिहरक व पूरक स्वरूपाची असावी (objective, intensive, remedial and Complementary).

(ऊ) प्रारंभी प्रत्येक पद्धती प्रयोगात्मक असेल आणि म्हणून प्रत्येक संशोधनशुद्ध शैक्षणिक पद्धतीच्या परिणामाचे व्यक्तिनिष्ठ मूल्यमापन वारंवार व्हावे लागेल.

पुन्हा मागासपणाचे निदान, उपायांबाबत प्रयोग, ही प्रक्रिया चालवावी लागेल. सध्याच्या शैक्षणिक अनुक्रमापेक्षा निदान-अनुभव स्वीकारावा. यातून बौद्धिकदृष्टचा मागास अशा विशेष गटाचे मागासपण दूर करणारी संशोधन-प्रयोगावर आधारलेली, बौद्धिक मागासपण निराकरणाची शास्त्रशुद्ध पद्धत निर्माण होईल.

(ए) याकरिता मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी वसतिगृहातच रहावे असे नियम करावे लागतील व छात्रनिवासयुक्त शैक्षणिक उपक्रम करावे लागतील.

(ऐ) या सर्व कार्याकरिता अधिक प्रमाणात फक्त शिक्षक-प्राध्यापक नेमावे लागतील. इतकेच नव्हे तर विशेष पात्रतेचे शैक्षणिक मानसशास्त्र विद्यार्थी कल्याण कार्यातील तज्ज्ञ नेमावे लागतील.

(ओ) पालकांचे, समाजाचे व शिक्षणपरिवारातील विविध घटकांचे जाणिवेचे सहकार्य मिळवावे लागेल.

(औ) प्रकल्पाच्या नियोजनाचा निराळ्या पद्धतीने विचार करावा लागेल.

(अं) या सर्वांचा अर्थ असा की, शैक्षणिक व्यवस्थापनयंत्रणेचा नव्याने विचार करावा लागेल.

(अः) एकूण प्रकल्पाचा व्ययफलप्राप्तिविचारही वारंवार करावा लागेल. दीर्घकालीन विश्लेषण केल्यास मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे बौद्धिक व पात्रतेतील मागासपण दूर करण्याच्या उपक्रमात सध्या जास्त पैसा खर्च करावा लागेल, असाही अनुभव येण्याची शक्यता आहे. ही विद्यार्थीनिष्ठ पद्धती परिणामकारक किंबहुना ही एवढी एकच पद्धत परिणामकारक व निश्चित फलदायी होईल असे वाटते.

■ ■

# १६ महाविद्यालयीन विद्यार्थिनींचे प्रश्न

सुमन करंदीकर

पुणे विद्यापीठाच्या प्रथम पदवीच्या विद्यार्थ्यांचा एक अभ्यास या लेखिकेने १९६८–६९ साली केला. त्या अभ्यासात विद्यार्थिनींना स्वतःच्या प्रश्नांची जाणीव व विशेषतः स्त्रिया म्हणून येणाऱ्या प्रश्नांची जाणीव फारच कमी असल्याचे आढळून आले. त्यानंतरच्या गेल्या तेरा वर्षांत व्यवसायाच्या निमित्ताने विद्यार्थिनींचे निरीक्षण करण्याची संधी मिळाली. त्या निरीक्षणातही, विद्यार्थिनींच्या वर्तनात शिक्षणाचे हेतू समजावून घेऊन, काही करण्याची वृत्ती वा त्यांच्या स्वतःच्या भूमिकेचा विचारपूर्वक स्वीकार, या गोष्टी आढळल्या नाहीत.

तसेच आजूबाजूला वावरणाऱ्या उच्च शिक्षण घेतलेल्या स्त्रियांच्या वर्तनात प्रामुख्याने पुढील गोष्टी आढळत राहिल्या. उच्च शिक्षण पूर्ण झाले की बहुतेकजणी विवाहबद्ध होऊन संसार-मांडणीत गुंग होतात. अर्थार्जनाची जरुरी असेल तर नोकरी वा व्यवसाय करण्याचे ठरवितात. नोकरी वा व्यवसाय करताना संसारिक जबाबदारींना अग्रक्रम देतात. त्यामुळे नोकरी वा व्यवसायात पदवी वा पदव्युत्तर शिक्षणाने मिळविलेल्या विशेष ज्ञानाचा उपयोग करून, तेथील गोष्टीमध्ये जास्त लक्ष घालणाऱ्या, आवडीने काम करणाऱ्या, स्त्रिया कमीच आढळतात.

उच्च शिक्षण घेतलेल्या स्त्रियांकडून समाज मात्र खूपच मोठ्या अपेक्षा ठेवतो. या स्त्रियांनी सामाजिक प्रश्नांमध्ये लक्ष घालावे, ते सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, स्वतःच्या क्षमतांचा विकास साधून समाजालाही समृद्ध करावे, असे समाजाला वाटत असते.

उच्च शिक्षण घेतलेल्या स्त्रियांचे वर्तन व त्यांच्याकडूनच्या अपेक्षा यातील तफावतीची कारणे काय याचा विचार होणे आवश्यक आहे. त्या तफावतीचे एक कारण कदाचित या विद्यार्थिनींची स्वतःच्या प्रश्नांबद्दलची असलेली अपुरी जाणीव हे असावे असे वाटते. तथापि, विद्यार्थिनींना त्यांच्या प्रश्नांची जाणीव नाही हे खरे आहे का हे अभ्यासणे आवश्यक होते. म्हणून हा अभ्यास.

### कोणते प्रश्न ?

या अभ्यासामध्ये विद्यार्थिनींचे त्या विद्यार्थिनी म्हणून येणारे प्रश्न फक्त त्यांची व्याप्ती समजावी एवढ्याच हेतूने ध्यानात घेण्याचे ठरविले. स्त्रिया म्हणून त्यांना जे प्रश्न येतात त्यावर लक्ष केंद्रित करण्याचे ठरविले. तसेच, स्त्री म्हणून काय करावे ? काय करू नये ? याबद्दल समाजाचे जे रूढ संकेत आहेत, त्या संकेतांनी निर्माण होणारी बंधनेही काही प्रश्न निर्माण करतात. त्या प्रश्नांचाही अभ्यास करावयाचे ठरविले.

या साऱ्या अभ्यासाचा हेतू विद्यार्थिनींना स्त्रिया म्हणून येणाऱ्या स्वतःच्या प्रश्नांची जाणीव किती आहे हे समजावे हा ठेवलेला आहे. त्याच्या आधारे, उच्च शिक्षण घेतलेल्या व्यक्तींची

भूमिका पार पाडण्यामध्ये त्यांना अडचणी कोणत्या येतात हे स्पष्ट होऊ शकेल.

**विद्यार्थी-प्रश्नाची एक बाजू–** विद्यार्थिनींच्या प्रश्नाचा अभ्यास हा विद्यार्थी साहाय्यक समितीच्या 'विद्यार्थ्यांच्या प्रश्नां'बाबत हाती घेतलेल्या प्रकल्पात समाविष्ट करणे, अतिशय आवश्यक वाटले. कारण विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची एक स्वतंत्र बाजू नजरेसमोर येण्यास त्यामुळे मदत होणार आहे.

**अभ्यास-मर्यादा–** विद्यार्थिनींच्या प्रश्नांचा विचार करताना आणखीही काही गोष्टी ध्यानात घेतल्या. कोणताही प्रश्न हा निर्भेळ व एकदेशीय नसतो. प्रश्नांची उगमस्थानेही विविध. विद्यार्थिनींच्या प्रश्नांचा अभ्यास करताना 'विद्यार्थीदशेमुळे' येणाऱ्या आणि व्यक्तिगत स्वरूपाच्या अडचणी या विचारात घ्यावयाच्या नाहीत असे ठरविले. कारण, या साऱ्या अडचणी परिस्थितिजन्य आहेत व विद्यार्थ्यांच्या प्रश्नांतून त्यांची विस्तृत चर्चा होणारच आहे. तथापि शिक्षणक्रम पुरा करताना स्त्री म्हणून कोणती बंधने येतात? त्यामुळे त्यांना कोणत्या अडचणी येतात? शिक्षणक्रमाची निवड करताना त्यांनी काय विचार केला? त्यात स्त्री म्हणून स्वतःच्या भूमिकेचा विचार करून निर्णय घेतला का? या व अशांसारख्या गोष्टींची चर्चा विद्यार्थिनींच्या प्रश्नात करावयाची ठरविले.

## अभ्यास पद्धती

**साधन-वैशिष्ट्ये–** विद्यार्थिनींचे प्रश्न समजण्यासाठी त्यांच्याबरोबर चर्चा करणे क्रमप्राप्तच होते. या चर्चांना एक दिशा यावी, त्यात वस्तुनिष्ठता यावी या दृष्टीने उपयुक्त होईल अशी एक प्रश्नावली तयार केली. विद्यार्थिनींची मते, त्यांचे विचार स्पष्ट होतील अशा प्रकारचे प्रश्न, त्यामध्ये विचारले. हो / नाही एवढ्या मर्यादित प्रतिक्रियांच्या पलीकडे त्यांनी जावे व स्वतःच्या प्रश्नांचा विचार काय झाला हे त्यांनी मांडावे अशी प्रश्नरचना केली. प्रश्न प्रामुख्याने पुढील गोष्टींसंबंधी विचारले. त्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती, त्यांना जाणवलेले प्रमुख प्रश्न, त्यांपैकी स्त्री म्हणून जाणवणारे प्रश्न, त्यांचा महाविद्यालयीन शिक्षण घेण्याचा हेतू, अभ्यासक्रम-निवडीवरील बंधने, त्यांना येणाऱ्या अडचणींवर त्यांनी केलेली उपाययोजना, उच्च शिक्षणाने निर्माण झालेल्या त्यांच्या विशेष अपेक्षा व आकांक्षा, त्यांची समाजविकासातील कार्यक्षेत्रे व त्यांतील त्यांची भूमिका.

**सांख्यिकी चर्चा गौण**–नागपूर विद्यापीठ व शेतकी विद्यापीठे वगळता इतर सर्व विद्यापीठांतील काही विद्यार्थिनींना प्रत्यक्ष वा पत्ररूपाने भेटून त्यांच्या प्रतिक्रिया गोळा केल्या. या प्रतिक्रियांच्या आधारे कोणताही सांख्यिकी स्वरूपाचा निष्कर्ष काढावयाचा नव्हता; उलट, विद्यार्थिनींच्या प्रश्नांचे सर्वसामान्य स्वरूप निदर्शनाला यावे, हा या अभ्यासाचा हेतू होता. त्यामुळे प्रतिसादिकांच्या संख्येपेक्षा त्यांच्यातील विचारांची विविधता जाणून घेणे महत्त्वाचे होते. या हेतूनेच या अभ्यासात ग्रामीण व शहरी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व सुस्थित, व्यावसायिक व सामान्य अभ्यासक्रम पुरे करणाऱ्या, ११ वी–१२ वीत शिकणाऱ्या, पदविकेचे शिक्षण घेणाऱ्या ते पदव्युत्तर आणि संशोधन करणाऱ्या, अशा विविध प्रकारच्या विद्यार्थिनींचा समावेश करण्याचा प्रयत्न केला.

**इतर घटकांशी चर्चा**–विद्यार्थिनींच्या प्रतिक्रिया मिळवत असतानाच प्राध्यापक–प्राध्यापिका, पालक व स्त्री-शिक्षणाबद्दल आस्था असणाऱ्या व्यक्ती यांच्याशीही या विषयांबद्दल चर्चा केल्या. या चर्चांमुळे विद्यार्थिनींच्या प्रश्नांचे स्वरूप समजण्यास मदत झाली. 'विद्यार्थिनींचे प्रश्न' हे त्यांच्या प्रश्नांबरोबर समाजातील इतर घटकांचे व इतर घटकांनी निर्माण केलेले आहेत याची जाणीव अधिकाधिक स्पष्ट होत गेली. उरलेल्या लेखाची मांडणी खालील विभागात केली आहे :

१. प्रश्नावलीतील माहितीचा अर्थबोध,
२. विद्यार्थिनींच्या प्रश्नांचे स्वरूप,
३. अपुऱ्या जाणिवेची कारणमीमांसा–प्राध्यापक, प्राध्यापिका व पालक यांचे वर्तन,
४. उपायांची जरूरी, आणि
५. उपायांचे स्थूल स्वरूप

## प्रश्नावलीतील माहितीचा अर्थबोध

**सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा परिणाम**–विद्यार्थिनींमध्ये प्रामुख्याने दोन गट आढळले. एक, कनिष्ठ आर्थिक परिस्थितीतून आलेल्या विद्यार्थिनींचा गट व दुसरा आर्थिकदृष्टचा सुस्थितीतील विद्यार्थिनींचा गट. या दोन्हीही गटांची काही वैशिष्ठ्ये नजरेसमोर आली. आर्थिक दृष्टचा कमकुवत असणाऱ्या विद्यार्थिनी या आर्थिकदृष्टचा चांगल्या विद्यार्थिनींपेक्षा शैक्षणिकदृष्टचा मागासलेल्या आढळल्या. त्याचबरोबर या विद्यार्थिनींच्या मनामध्ये स्वतःच्या परिस्थितीची एक सततची खंत जाणवली व त्याचा परिणाम त्यांच्या वर्तनातही आढळला. त्या स्वतःची तुलना सतत त्यांच्याबरोबर वावरणाऱ्या आर्थिकदृष्टचा सुस्थितीतून येणाऱ्या व त्याचबरोबर शैक्षणिकदृष्टचाही अधिक गुणवान असणाऱ्या विद्यार्थिनींशी करत राहातात. या तूलनेमुळे त्यांच्या मनामध्ये कळत नकळत स्वतःबद्दलचा एक हीनगंड तयार होतो. त्यामुळे त्या स्वतःचे प्रश्न, परिस्थिती व प्रयत्न यांची सांगड घालू शकत नाहीत. उलट, त्यांच्यापैकी बऱ्याचजणी आर्थिकदृष्टचा व सामाजिकदृष्टचा बऱ्या असणाऱ्या विद्यार्थिनींशी संपर्क कसा साधता येईल याचा विचार करत राहतात. या प्रयत्नामध्ये त्यांना यश येण्याची शक्यता फारच कमी राहाते. कारण आर्थिकदृष्टचा व सामाजिकदृष्टचा बऱ्या असणाऱ्या विद्यार्थिनी या कनिष्ठ गटातून येणाऱ्या विद्यार्थिनींबरोबर संपर्क ठेवायला सहसा राजी नसतात. कनिष्ठ गटाच्या दारिद्र्याबाबत सुस्थित विद्यार्थिनींना आपण काहीच करू शकणार नाही असे वाटते. उलट, या संपर्काने निष्कारण त्रास होण्यापलीकडे दुसरे काही शक्य होत नाही असेच सुस्थित विद्यार्थिनींना वाटते.

स्वतःच्या क्षमतांचा वापर इतरांच्यासाठीही करावा ही प्रेरणा मिळावी ही उच्च शिक्षणाकडूनची अपेक्षा. सुस्थित विद्यार्थिनींनी पुढाकार घेऊन इतर दुर्बल स्थितीतील विद्यार्थिनींना मदत करावी ही अपेक्षा वास्तवात उतरणे अवघड दिसते.

## महत्त्वाचे प्रश्न

विद्यार्थिनींच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणारे प्रश्न खाली दिले आहेत. या प्रश्नांचे स्वरूप सर्वसामान्य विद्यार्थी म्हणून येणाऱ्या प्रश्नांशी किती मिळते-जुळते आहे हे सहज लक्षात येते.

**आर्थिक**–विद्यार्थिनींना पुढील आर्थिक प्रश्न महत्त्वाचे वाटले आहेत : वह्या, पुस्तके न घेता येणे, काटकसर करावी लागणे, कमी उत्पन्न, महागाई व कुटुंबातील शिकणाऱ्यांची जास्त संख्या. आर्थिक प्रश्न, सामान्यतः उच्च शिक्षणाला लागणारा खर्च वा वाढती महागाई यांच्यामुळे आलेले दिसत आहेत. आर्थिक अडचणींमुळे मानसिक स्वास्थ्य कमी होते असाही विचार त्यांनी व्यक्त केला आहे.

**कौटुंबिक** – घरच्या वडील मंडळींशी होणारे मतभेद, घरातील व्यक्तींची परस्परांबद्दलची उदासीनता, घरच्या माणसांच्या संख्येमुळे वाढलेले घरकाम, सुविधांचा अभाव, या त्यांच्या कौटुंबिक अडचणी आहेत.

**भावनिक**–विद्यार्थिनींना जाणवलेल्या भावनिक अडचणी त्यांना स्पष्ट शब्दांमध्ये व्यक्त करता आलेल्या नाहीत. पुढच्या आयुष्याबद्दलची अनिश्चितता या एका गोष्टीचा ओझरता उल्लेख त्यांच्या भावनिक अडचणींमध्ये विशेष आलेला आहे. तसेच आर्थिक अडचणींमुळे निर्माण

होणारे तणाव हेही भावनिक अडचणींत फार मोठ्या प्रमाणावर सांगितलेले आहेत. या त्यांच्या प्रतिक्रियांवरून, भावनिक अडचणींबद्दल मोकळेपणाने इतरांबरोबर बोलण्यासाठी लागणारी मोकळी वृत्ती त्यांच्यामध्ये अतिशय कमी प्रमाणामध्ये आढळली. त्यांना स्वतःच्या अडचणी कोणत्या आहेत व त्यातील भावनिक तणाव कोणते आहेत, याचे पृथःकरण करता आलेले नाही. कदाचित म्हणूनही त्यांना स्वतःच्या भावनिक अडचणी मांडता आल्या नसाव्यात असे जाणवते.

ऐन तारुण्यामध्ये पदार्पण केलेल्या या विद्यार्थिनींना, स्वतःच्या व्यक्तिगत आयुष्यामध्ये अनेक निर्णय घ्यावे लागणार आहेत. त्या निर्णयांसाठी इतरांबरोबर विचारविनिमय करावा लागणार आहे. त्या विचारविनिमयामध्ये वेळप्रसंगी संघर्ष निर्माण होणार आहेत. तथापि, अशा प्रकारच्या विचारविनिमयाला व त्यामधून निर्माण होणाऱ्या वैचारिक व भावनिक तणावांना सामोरे जाण्यासाठी स्वतःची निर्णय घेण्याची तयारी ठेवावी लागते. बहुसंख्य विद्यार्थिनींनी आपले भावी जीवनाबद्दलचे सारे निर्णय हे घरच्या वा आजूबाजूच्या वडील मंडळींवर सोपवून स्वतःची त्या त्रासातून मुक्तता करून घेतलेली दिसते. अर्थात या परिस्थितीला विद्यार्थिनीच जबाबदार आहेत असे म्हणता येणार नाही. आपल्या संस्कृतीतील वरिष्ठांनी निर्णय घेण्याच्या परंपरेचाच तो एक भाग म्हणूनही विद्यार्थिनींच्या या वर्तनाकडे पाहावे लागेल. स्वतःच्या भावनिक अडचणी स्पष्ट न होण्याचे हे कारणही विचारात घ्यावे लागेल.

**शैक्षणिक**—इतर प्रकारच्या अडचणी सांगत असताना विद्यार्थिनींना स्पष्ट विवेचन करता आलेले नाही. तथापि, त्यांच्या शिक्षणविषयक अडचणी मांडताना त्यांच्या विवेचनात बरीच स्पष्टता आढळली. त्यांनी सांगितलेले शैक्षणिक प्रश्न प्रामुख्याने पुढील क्षेत्रांशी संबंधित आहेत : अभ्यासक्रम-निवड, प्राध्यापकांचे सहकार्य, सोयी-सवलती, शिक्षणाचे माध्यम, अभ्यासातील मार्गदर्शन व परीक्षांचे निकाल. अभ्यासक्रम-निवडीमध्ये मार्गदर्शन न मिळाल्यामुळे चुकीची निवड झाल्याबद्दल पश्चात्ताप व्यक्त करणाऱ्या विद्यार्थिनी आढळल्या. प्राध्यापकांचे बाबतीत त्यांच्या बऱ्याच अडचणी आहेत. विशेषतः व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींनी या अडचणी प्रकर्षाने मांडल्या आहेत. त्यांच्या मते शिक्षक मूल्यमापन करताना पक्षपाती असतात. शिक्षकांना त्यांच्यातील त्रुटी जाणून घेण्याची इच्छा नसते. ते प्रेरणा देत नाहीत. त्यामुळे वैफल्य निर्माण होणे, नैराश्य येणे, विषयांची तयारी अपुरी राहाणे, असे होणारे काही परिणाम त्यांनी नोंदविलेले आहेत. अभ्यासासाठी जागा, वेळ व पुस्तके यांच्या अभावाने निर्माण होणारे प्रश्न आर्थिकदृष्ट्या कमी गटातील विद्यार्थिनींनी प्रमुख प्रश्न म्हणून सांगितले आहेत.

**सामाजिक**—पालक, शिक्षक, बरोबरचे विद्यार्थी व समाजातील इतर व्यक्ती, यांच्याकडून त्यांना मिळणाऱ्या वागवणुकीमुळे विद्यार्थिनींना सामाजिक स्वरूपाचे प्रश्न निर्माण होतात. त्या प्रश्नांपैकी त्यांनी दिलेले प्रश्न पुढीलप्रमाणे आहेत : स्त्री-पुरुष संबंधातून निर्माण होणारे प्रश्न—उदाहरणार्थ मुलांशी मोकळेपणाने बोलता न येणे, नव्यानेच दाखल झालेल्या तरुण प्राध्यापकाशी वागताना विनाकारण मनावर दडपण येणे, आता घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग भावी जीवनात करणार नाही व विद्यार्थ्यांची एक जागा अडवून ठेवणार या समजुतीने विद्यार्थ्यांनी केलेल्या टीकेला तोंड देणे, इत्यादी.

स्त्री असल्यामुळे खेळामध्ये मनमोकळेपणाने भाग घेत नाही; आजूबाजूचे विद्यार्थी टिंगल करतात; घरी व बाहेर सतत 'स्त्री' म्हणून एक प्रकारचे दडपण अनुभवावे लागते; मुलीच्या जातीने काम केलेच पाहिजे या भूमिकेतून अभ्यासाला पुरेसा वेळ देण्याकडे घरच्या लोकांचे दुर्लक्ष होते; एकाच घरातील मुलाला व मुलीला फरकाने वागविले जाते; 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' या सूत्रावर विश्वास ठेवूनच सारे वागतात, त्याचाही त्रास होतो; असेही काही विद्यार्थिनींनी सूचित

केले. विद्यार्थिनींना त्यांच्या साऱ्या हालचाली वा कार्यक्रम करत असताना, स्त्रियांनी काय करणे योग्य आहे या संबंधीचे सामाजिक संकेत सतत डोळ्यांसमोर ठेवावे लागतात. त्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारचा मोकळेपणा, निःसंकोचपणा, उपभोगता येत नाही व त्याचा परिणाम मानसिक कुचंबणा निर्माण होण्यात होतो हे विद्यार्थिनींशी बोलताना जाणवत होते. याच दृष्टिकोनातून विद्यार्थिनींनी सांगितलेल्या गोष्टी पाहिल्या पाहिजेत.

तथापि, विद्यार्थिनींना स्वीकारावी लागणारी दुय्यम भूमिका बहुसंख्य विद्यार्थिनींनी सामाजिक चौकटीचा अनिवार्य परिणाम म्हणून स्वाभाविकपणे व सहजपणे स्वीकारलेली आढळली. त्यांना जाणवलेली त्यांच्या सामाजिक प्रश्नांतील अस्वस्थता ही त्या दृष्टीने अगदीच वरवरच्या स्वरूपाची दिसली. लोकशाही समाजरचनेमध्ये सर्व व्यक्तींना समान सामाजिक दर्जा मिळाला पाहिजे, या मूल्याची जाणीव व त्यांना मिळत असलेली गौण दर्जाची वागणूक यामधील फरक विद्यार्थिनींना अस्वस्थ करताना दिसली नाही.

**भावी जीवनासंबंधी निर्णय**—विद्यार्थिनींचे प्रश्न बहुधा भावी जीवनासंबंधीच्या निर्णयाचे असतील अशी एक स्वाभाविक अपेक्षा होती. कारण उच्च शिक्षण घेतल्यानंतर स्वतः काय करावयाचे आहे, व्यावसायिक क्षेत्रामध्ये कोणती भूमिका घ्यावयाची आहे, शिक्षणाने व्यक्तिगत जीवनात, तसेच सामाजिक जीवनात योग्य निर्णय घेण्यासाठी कोणती जाणीव निर्माण केली आहे, अशा साऱ्या प्रश्नांची मनात गर्दी होणे उच्च शिक्षणाचा एक परिणाम म्हणून अपेक्षिले होते. तथापि, विद्यार्थिनींच्या प्रतिक्रियांमधून त्यांच्या मनात भावी जीवनासंबंधी निर्णय घेताना काही प्रश्न उपस्थित होताना दिसले नाहीत. उलट त्यांनी त्या भावी जीवनात काय करणार आहेत ह्या गोष्टी सांगितल्या आहेत. लग्न व नोकरी या दोन गोष्टींशी संबंधितच त्यांचे निर्णय आहेत. काहींनी कोणताच निर्णय घेता येण्याची असमर्थता व्यक्त केलेली आहे. नोकरीसाठी वशिल्याची जरुरी याही अडचणीचा उल्लेख त्यांनी केला. ज्यांनी भावी जीवनासंबंधी निर्णय घेताना कोणतेही प्रश्न नाहीत असे सांगितले आहे, त्यांना प्रत्यक्षामध्ये कोणतेही निर्णय घेणे कठीण जात असेल असे वाटले. हे म्हणण्यास कारण आहे. लग्न हा भावी जीवनातील निर्णय निश्चित केलेल्या विद्यार्थिनीला लग्नच का करायचे ? ते कोणाशी करायचे ? कोणी सांगितले म्हणून करायचे ? वगैरेसारख्या प्रश्नांची उत्तरे देणे अवघड गेले. या चर्चेच्या वेळी विद्यार्थिनींनी आणखीही एक गोष्ट सहजपणे बोलून दाखविली. ती म्हणजे निर्णय वगैरे साऱ्या गोष्टी पुरुषांच्या हातात असतात. त्यांना स्वतःला कोणत्याच गोष्टीचे स्वातंत्र्य नाही.

भावी जीवनासंबंधी निर्णय घेताना अडचणी जाणवण्यासाठी, निर्णय घेण्यासाठी, लागणारा विचार व करावयाची कृती या संबंधी जाणीवपूर्वक विचार झालेला असणे आवश्यक होते. तथापि त्यांची सध्याची परिस्थिती अशा विचारांचा अभाव असल्याचे दर्शविते.

**आरोग्य व आहार**—या संदर्भामध्ये विद्यार्थिनींना काही विशेष प्रश्न आहेत असे आढळले नाही. आहाराकडे शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहाण्याची सवय झाल्याशिवाय आहारविषयक त्रुटी व त्यातील अडचणी नजरेसमोर येणे हे अवघड जाते. तसेच आरोग्य उत्तम राखण्यासाठी ज्या सवयी निर्माण होणे आवश्यक आहे त्या सवयींचा विचार हा समाजामध्ये रूढ होणे जरुरीचे आहे. आज आपल्या सामाजिक जीवनात आरोग्य व आहार यांच्याकडे शास्त्रीय दृष्टिकोनातून बघण्याची सवय निर्माण झालेली दिसत नाही. कदाचित, त्यामुळे विद्यार्थिनींनाही स्वतःला या क्षेत्राबाबत काही अडचणी आहेत हे ध्यानातही आले नसण्याची शक्यता वाटते.

निवासासंबंधीच्या अडचणीमध्ये अभ्यासास जागा नसणे व घर महाविद्यालयापासून लांब असणे अशा प्रकारच्या सर्वसामान्य अडचणींची नोंद त्यांनी केली आहे.

छंद, व्यायाम व करमणूक या बाबतीत विद्यार्थिनींना कोणत्याच प्रकारच्या प्रमुख अडचणी

येताना दिसत नाहीत. स्वतंत्र जिमखाना नसणे, छंदाला लागणारा वेळ व पैसा नसणे, मुलगी म्हणून रात्री उशीरापर्यंत सांस्कृतिक कार्यक्रमांना थांबता न येणे, अशा अडचणी विद्यार्थिनींनी दिल्या आहेत. छंद जोपासणे, व्यायाम करणे, स्वतःच्या फावल्या वेळाचा आनंद निर्माण करण्यासाठी वापर करणे, या साऱ्या गोष्टींसाठी व्यक्तीला कष्ट घ्यावे लागतात. एखादी गोष्ट करण्याचा निश्चय टिकविणे किती अवघड आहे यासारखा अनुभव छंदोपासनेमधून अनुभवास येणे शक्य आहे; परंतु विद्यार्थिनींना स्वतःच्या छंद, व्यायाम व करमणूक या बाबतींमध्ये असे कोणतेच महत्त्वाचे प्रश्न जाणवल्याचे आढळून आले नाही.

वर चर्चा केलेल्या सर्व प्रश्नांमधून, शिक्षण घेत असताना विद्यार्थिनींना जाणवणाऱ्या प्रमुख अडचणी कोणत्या आहेत याचा बोध होतो. या सर्व अडचणी पाहिल्यानंतर विद्यार्थिनींना बरोबरच्या विद्यार्थ्यांपेक्षा शिक्षण घेताना येणाऱ्या आर्थिक, शैक्षणिक वगैरे सर्वच समस्या तूलनात्मकदृष्टचा कमी गंभीर आहेत ही पूर्वीच्या (१९६८ च्या) अभ्यासात ध्यानात आलेली गोष्ट याही अभ्यासात पुन्हा ध्यानात आली; परंतु, या प्रश्नांपैकी त्यांना स्त्री म्हणून येणाऱ्या विशिष्ट अडचणी कोणत्या हे जाणून घेणे हा या अभ्यासाचा प्रधान हेतू होता. म्हणून विद्यार्थिनींना त्यांच्या प्रमुख अडचणींपैकी कोणत्या अडचणी स्त्री म्हणून येतात हे विचारले.

### स्त्री म्हणून येणाऱ्या अडचणी

स्वतःला स्त्री म्हणून येणाऱ्या प्रमुख अडचणींच्यासंबंधी विद्यार्थिनींनी अगदी कमी विचार केलेला आढळला. काही वेगळ्या अडचणी त्या केवळ स्त्रिया आहेत म्हणून येतात, या गोष्टीची दखलही त्यांनी घेतलेली आढळली नाही. त्यांच्या उत्तरांतून व्यक्त झालेल्या अडचणींचे स्वरूप हे विद्यार्थिनींच्या या अपरिपक्व जाणीवेचे निदर्शक वाटते. त्यांच्या या अडचणींचे त्यांनी दिलेले स्वरूप पुढीलप्रमाणे आहे. स्त्री म्हणून येणाऱ्या या प्रमुख प्रश्नांमध्ये, सामाजिक प्रश्नांचा उल्लेख केलेला आहे. त्या प्रश्नांमध्ये त्यांनी खालील गोष्टी उल्लेखिलेल्या आहेत : घरचे काम, स्त्री म्हणून मोकळेपणाने वावरता न येणे, बरोबरीच्या विद्यार्थ्यांशी मोकळेपणाने संबंध ठेवता न येणे, ठराविक वेळेपूर्वी घरी परत येणे वगैरे स्वरूपाची बंधने व अभ्यासेतर गोष्टींमध्ये मनाप्रमाणे भाग घेता न येणे.

सामाजिक प्रश्नांमध्ये त्यांनी स्वतःला आवडणारी गोष्ट करताना येणाऱ्या अडचणींचा उल्लेख केलेला आहे. परंतु अशा प्रकारच्या बंधनांमधून स्वतः व्यक्ती म्हणून वावरताना दुय्यम स्थान स्वीकारावे लागते; आणि ही दुय्यम भूमिका अस्वीकारार्ह गोष्ट आहे ही कल्पना त्यांच्या मनामध्ये रुजलेली आढळली नाही. त्यांनी स्त्री म्हणून येणाऱ्या अडचणींचा केलेला अतिशय मर्यादित स्वरूपाचा हा उल्लेख, त्यांना न उमगलेल्या समस्येचा निदर्शक ठरतो. तो प्रश्न म्हणजे स्त्रीला समाजामध्ये समान सामाजिक दर्जा मिळाला पाहिजे व तो न मिळणे ही संपूर्ण स्त्री वर्गाची एक मूलभूत समस्या आहे. परंतु या विचाराचा या विद्यार्थिनींना परिचयच झालेला नसावा.

**उच्च शिक्षणाचा हेतू –** या संदर्भात विद्यार्थिनींच्या उच्च शिक्षण घेण्याच्या हेतूची चर्चा ही अतिशय उपयोगी ठरली. विद्यार्थिनींनी त्या महाविद्यालयीन शिक्षण का घेतात याची दिलेली उत्तरे पुढीलप्रमाणे आहेत : स्वावलंबन, लग्नाला आवश्यक म्हणून पदवी, पदवीचा विम्यासारखा उपयोग, ज्ञानात भर, उत्तम व्यावसायिक होणे, वैचारिक स्वावलंबन व व्यावसायिक पात्रता मिळवा, या हेतूच्या जवळपासही बहुसंख्य विद्यार्थिनी जाताना आढळल्या नाहीत. स्वावलंबन असा हेतू देणाऱ्या विद्यार्थिनींच्या मनात स्वावलंबनाची कोणती कल्पना आहे हे विचारून घेतले. त्या वेळेस स्वावलंबनामध्ये आर्थिक स्वावलंबन हा प्रधान हेतू ध्यानामध्ये आला. उच्च शिक्षण घेण्याचे त्यांचे हेतू समजावून घेतल्यामुळे उच्च शिक्षणाने वैचारिक स्वावलंबन व विकास घडून

केले. विद्यार्थिनींना त्यांच्या साऱ्या हालचाली वा कार्यक्रम करत असताना, स्त्रियांनी काय करणे योग्य आहे या संबंधीचे सामाजिक संकेत सतत डोळ्यांसमोर ठेवावे लागतात. त्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारचा मोकळेपणा, निःसंकोचपणा, उपभोगता येत नाही व त्याचा परिणाम मानसिक कुचंबणा निर्माण होण्यात होतो हे विद्यार्थिनींशी बोलताना जाणवत होते. याच दृष्टिकोनातून विद्यार्थिनींनी सांगितलेल्या गोष्टी पाहिल्या पाहिजेत.

तथापि, विद्यार्थिनींना स्वीकारावी लागणारी दुय्यम भूमिका बहुसंख्य विद्यार्थिनींनी सामाजिक चौकटीचा अनिवार्य परिणाम म्हणून स्वाभाविकपणे व सहजपणे स्वीकारलेली आढळली. त्यांना जाणवलेली त्यांच्या सामाजिक प्रश्नांतील अस्वस्थता ही त्या दृष्टीने अगदीच वरवरच्या स्वरूपाची दिसली. लोकशाही समाजरचनेमध्ये सर्व व्यक्तींना समान सामाजिक दर्जा मिळाला पाहिजे, या मूल्याची जाणीव व त्यांना मिळत असलेली गौण दर्जाची वागणूक यामधील फरक विद्यार्थिनींना अस्वस्थ करताना दिसली नाही.

**भावी जीवनासंबंधी निर्णय**—विद्यार्थिनींचे प्रश्न बहुधा भावी जीवनासंबंधीच्या निर्णयाचे असतील अशी एक स्वाभाविक अपेक्षा होती. कारण उच्च शिक्षण घेतल्यानंतर स्वतः काय करावयाचे आहे, व्यावसायिक क्षेत्रामध्ये कोणती भूमिका घ्यावयाची आहे, शिक्षणाने व्यक्तिगत जीवनात, तसेच सामाजिक जीवनात योग्य निर्णय घेण्यासाठी कोणती जाणीव निर्माण केली आहे, अशा साऱ्या प्रश्नांची मनात गर्दी होणे उच्च शिक्षणाचा एक परिणाम म्हणून अपेक्षिले होते. तथापि, विद्यार्थिनींच्या प्रतिक्रियांमधून त्यांच्या मनात भावी जीवनासंबंधी निर्णय घेताना काही प्रश्न उपस्थित होताना दिसले नाहीत. उलट त्यांनी त्या भावी जीवनात काय करणार आहेत ह्या गोष्टी सांगितल्या आहेत. लग्न व नोकरी या दोन गोष्टींशी संबंधितच त्यांचे निर्णय आहेत. काहींनी कोणताच निर्णय घेता येण्याची असमर्थता व्यक्त केलेली आहे. नोकरीसाठी वशिल्याची जरुरी याही अडचणीचा उल्लेख त्यांनी केला. ज्यांनी भावी जीवनासंबंधी निर्णय घेताना कोणतेही प्रश्न नाहीत असे सांगितले आहे, त्यांना प्रत्यक्षामध्ये कोणतेही निर्णय घेणे कठीण जात असेल असे वाटले. हे म्हणण्यास कारण आहे. लग्न हा भावी जीवनातील निर्णय निश्चित केलेल्या विद्यार्थिनीला लग्नच का करायचे ? ते कोणाशी करायचे ? कोणी सांगितले म्हणून करायचे ? वगैरेसारख्या प्रश्नांची उत्तरे देणे अवघड गेले. या चर्चेच्या वेळी विद्यार्थिनींनी आणखीही एक गोष्ट सहजपणे बोलून दाखविली. ती म्हणजे निर्णय वगैरे साऱ्या गोष्टी पुरुषांच्या हातात असतात. त्यांना स्वतःला कोणत्याच गोष्टीचे स्वातंत्र्य नाही.

भावी जीवनासंबंधी निर्णय घेताना अडचणी जाणवण्यासाठी, निर्णय घेण्यासाठी, लागणारा विचार व करावयाची कृती या संबंधी जाणीवपूर्वक विचार झालेला असणे आवश्यक होते. तथापि त्यांची सध्याची परिस्थिती अशा विचारांचा अभाव असल्याचे दर्शविते.

**आरोग्य व आहार**—या संदर्भामध्ये विद्यार्थिनींना काही विशेष प्रश्न आहेत असे आढळले नाही. आहाराकडे शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहाण्याची सवय झाल्याशिवाय आहारविषयक त्रुटी व त्यातील अडचणी नजरेसमोर येणे हे अवघड जाते. तसेच आरोग्य उत्तम राखण्यासाठी ज्या सवयी निर्माण होणे आवश्यक आहे त्या सवयींचा विचार हा समाजामध्ये रूढ होणे जरुरीचे आहे. आज आपल्या सामाजिक जीवनात आरोग्य व आहार यांच्याकडे शास्त्रीय दृष्टिकोनातून बघण्याची सवय निर्माण झालेली दिसत नाही. कदाचित, त्यामुळे विद्यार्थिनींनाही स्वतःला या क्षेत्राबाबत काही अडचणी आहेत हे ध्यानातही आले नसण्याची शक्यता वाटते.

निवासासंबंधीच्या अडचणीमध्ये अभ्यासास जागा नसणे व घर महाविद्यालयापासून लांब असणे अशा प्रकारच्या सर्वसामान्य अडचणींची नोंद त्यांनी केली आहे.

छंद, व्यायाम व करमणूक या बाबतीत विद्यार्थिनींना कोणत्याच प्रकारच्या प्रमुख अडचणी

येताना दिसत नाहीत. स्वतंत्र जिमखाना नसणे, छंदाला लागणारा वेळ व पैसा नसणे, मुलगी म्हणून रात्री उशीरापर्यंत सांस्कृतिक कार्यक्रमांना थांबता न येणे, अशा अडचणी विद्यार्थिनींनी दिल्या आहेत. छंद जोपासणे, व्यायाम करणे, स्वतःच्या फावल्या वेळाचा आनंद निर्माण करण्यासाठी वापर करणे, या साऱ्या गोष्टींसाठी व्यक्तीला कष्ट घ्यावे लागतात. एखादी गोष्ट करण्याचा निश्चय टिकविणे किती अवघड आहे यासारखा अनुभव छंदोपासनेमधून अनुभवास येणे शक्य आहे; परंतु विद्यार्थिनींना स्वतःच्या छंद, व्यायाम व करमणूक या बाबतींमध्ये असे कोणतेच महत्त्वाचे प्रश्न जाणवल्याचे आढळून आले नाही.

वर चर्चा केलेल्या सर्व प्रश्नांमधून, शिक्षण घेत असताना विद्यार्थिनींना जाणवणाऱ्या प्रमुख अडचणी कोणत्या आहेत याचा बोध होतो. या सर्व अडचणी पाहिल्यानंतर विद्यार्थिनींना बरोबरच्या विद्यार्थ्यांपेक्षा शिक्षण घेताना येणाऱ्या आर्थिक, शैक्षणिक वगैरे सर्वच समस्या तूलनात्मकदृष्टचा कमी गंभीर आहेत ही पूर्वीच्या (१९६८ च्या) अभ्यासात ध्यानात आलेली गोष्ट याही अभ्यासात पुन्हा ध्यानात आली; परंतु, या प्रश्नांपैकी त्यांना स्त्री म्हणून येणाऱ्या विशिष्ट अडचणी कोणत्या हे जाणून घेणे हा या अभ्यासाचा प्रधान हेतू होता. म्हणून विद्यार्थिनींना त्यांच्या प्रमुख अडचणींपैकी कोणत्या अडचणी स्त्री म्हणून येतात हे विचारले.

## स्त्री म्हणून येणाऱ्या अडचणी

स्वतःला स्त्री म्हणून येणाऱ्या प्रमुख अडचणींच्यासंबंधी विद्यार्थिनींनी अगदी कमी विचार केलेला आढळला. काही वेगळचा अडचणी त्या केवळ स्त्रिया आहेत म्हणून येतात, या गोष्टीची दखलही त्यांनी घेतलेली आढळली नाही. त्यांच्या उत्तरांतून व्यक्त झालेल्या अडचणींचे स्वरूप हे विद्यार्थिनींच्या या अपरिपक्व जाणीवेचे निदर्शक वाटते. त्यांच्या या अडचणींचे त्यांनी दिलेले स्वरूप पुढीलप्रमाणे आहे. स्त्री म्हणून येणाऱ्या या प्रमुख प्रश्नांमध्ये, सामाजिक प्रश्नांचा उल्लेख केलेला आहे. त्या प्रश्नांमध्ये त्यांनी खालील गोष्टी उल्लेखिलेल्या आहेत : घरचे काम, स्त्री म्हणून मोकळेपणाने वावरता न येणे, बरोबरीच्या विद्यार्थ्यांशी मोकळेपणाने संबंध ठेवता न येणे, ठराविक वेळेपूर्वी घरी परत येणे वगैरे स्वरूपाची बंधने व अभ्यासेतर गोष्टींमध्ये मनाप्रमाणे भाग घेता न येणे.

सामाजिक प्रश्नांमध्ये त्यांनी स्वतःला आवडणारी गोष्ट करताना येणाऱ्या अडचणींचा उल्लेख केलेला आहे. परंतु अशा प्रकारच्या बंधनांमधून स्वतः व्यक्ती म्हणून वावरताना दुय्यम स्थान स्वीकारावे लागते; आणि ही दुय्यम भूमिका अस्वीकारार्ह गोष्ट आहे ही कल्पना त्यांच्या मनामध्ये रुजलेली आढळली नाही. त्यांनी स्त्री म्हणून येणाऱ्या अडचणींचा केलेला अतिशय मर्यादित स्वरूपाचा हा उल्लेख, त्यांना न उमगलेल्या समस्येचा निदर्शक ठरतो. तो प्रश्न म्हणजे स्त्रीला समाजामध्ये समान सामाजिक दर्जा मिळाला पाहिजे व तो न मिळणे ही संपूर्ण स्त्री वर्गाची एक मूलभूत समस्या आहे. परंतु या विचाराचा या विद्यार्थिनींना परिचयच झालेला नसावा.

**उच्च शिक्षणाचा हेतू –** या संदर्भात विद्यार्थिनींच्या उच्च शिक्षण घेण्याच्या हेतूची चर्चा ही अतिशय उपयोगी ठरली. विद्यार्थिनींनी त्या महाविद्यालयीन शिक्षण का घेतात याची दिलेली उत्तरे पुढीलप्रमाणे आहेत : स्वावलंबन, लग्नाला आवश्यक म्हणून पदवी, पदवीचा विम्यासारखा उपयोग, ज्ञानात भर, उत्तम व्यावसायिक होणे, वैचारिक स्वावलंबन व व्यावसायिक पात्रता मिळवा, या हेतूच्या जवळपासही बहुसंख्य विद्यार्थिनी जाताना आढळल्या नाहीत. स्वावलंबन असा हेतू देणाऱ्या विद्यार्थिनींच्या मनात स्वावलंबनाची कोणती कल्पना आहे हे विचारून घेतले. त्या वेळेस स्वावलंबनामध्ये आर्थिक स्वावलंबन हा प्रधान हेतू ध्यानामध्ये आला. उच्च शिक्षण घेण्याचे त्यांचे हेतू समजावून घेतल्यामुळे उच्च शिक्षणाने वैचारिक स्वावलंबन व विकास घडून

येण्याबाबत त्या काहीच अपेक्षा ठेवत नाहीत हे ध्यानात आले. स्त्री म्हणून अनुभवावी लागणारी दुय्यम गौण भूमिका त्यांना त्रासदायक का ठरत नसावी याचा उलगडा झाला.

विद्यार्थिनींनी शिक्षणाकडून ज्या अपेक्षा ठेवल्या आहेत त्या पाहता उच्च शिक्षणाने साधावयाचा व्यक्तिविकास, त्यातून घडावयाचा समाजविकास, या दोन्हीही गोष्टी प्रत्यक्षामध्ये येणे किती कठीण आहे याचा प्रत्यय आला.

उच्च शिक्षणाने ज्या गोष्टी साधावयाच्या त्याची स्पष्ट कल्पना या विद्यार्थिनींमध्ये रुजलेली आढळली नाही. स्वाभाविकपणेच त्यांना स्त्री म्हणून येणारी बंधने, त्या बंधनांचे पारंपरिक स्वरूप, व्यक्ती म्हणून वावरत असता निर्माण होणारा सहज संघर्ष समजणे त्यांना अवघड जात असले पाहिजे. पदवीमुळे लग्न होण्यात सुलभता येते किंवा बऱ्या कर्तबगारीचा वर मिळविणे अधिक शक्य होते असा विचार पदवी घेण्यामध्ये ठेवणे हे त्यांना गैर वाटत नाही. कदाचित समाजात स्त्रीने विवाह करणे व त्या विवाहामध्ये कुटुंबियांचे मत मानणे या गोष्टींसंबंधी जे काही संकेत रूढ झालेले आहेत त्या संकेतांपलीकडे जाणे आवश्यक आहे व उच्च शिक्षणाचा तो एक स्वाभाविक परिणाम आहे हे त्यांच्या नजरेस येत नसावे.

विद्यार्थिनींचे व पालकांचे शिक्षण घेण्यातील हेतू एकच आहेत की भिन्न आहेत या गोष्टीचीही चर्चा या संदर्भात केली. त्यामधून असे ध्यानात आले की, बहुसंख्य मुलींना लग्न व आवश्यक वाटल्यास नोकरी यासाठी पदवीची जरूरी वाटते व त्यांच्या पालकांच्याही उच्च शिक्षणाकडून याच अपेक्षा असतात. क्वचित काहीजणींच्या बाबतीमध्ये शास्त्रशाखा घ्यावी वाटली तर पालकांनी त्यांना विरोध केला; व पुढील आयुष्यामध्ये शास्त्रशाखेच्या अभ्यासाचा कोणताही उपयोग नाही असा विचार मांडला. पालकांच्या या विचाराचा विद्यार्थिनींनी सहजपणे स्वीकार केलेला आढळला. पालकांचे वेगळे मत हे फारसे काही चुकीचे नव्हते, शास्त्र-शाखा न घेतल्यामुळे काहीही बिघडले नाही अशा प्रकारचे मत मुलींनी व्यक्त केले आहे. अशा प्रकारच्या प्रतिक्रियांमधून दोन गोष्टी स्पष्ट होतात : १) उच्च शिक्षण घेण्याचे निश्चित करताना भावी आयुष्यामध्ये काय करावयाचे आहे हे ठरविलेले नसते; २) पालकांच्या मताला विद्यार्थिनींच्या निर्णयामध्ये विलक्षण महत्त्व असते. पालकांचे म्हणणे चुकीचे असू शकेल अशी शंकाही घेणे मुलींना अवघड जाते.

विद्यार्थिनींच्या अभ्यासक्रमनिवडीवर आलेली बंधने ही प्रामुख्याने खर्चाच्या व जास्त मुदतीचा अभ्यासक्रम नको, या दृष्टीकोनातूनच आलेली आढळली. विवाहाचे बाबतीमध्ये शिक्षणाने वय वाढल्यामुळे येणाऱ्या अडचणी, वा विशिष्ट व्यवसायामुळे वर मिळावयास अडचण निर्माण होऊ नये असाच दृष्टीकोन पालकांनी ठेवलेला आढळला. विद्यार्थिनींना अशा बंधनांबद्दल काय वाटले हे विचारले असता त्यांनी दिलेली उत्तरे मोठी बोलकी आहेत. त्यापैकी नमुना म्हणून एका विद्यार्थिनीचे म्हणणे पाहा : ' पहिल्यांदा खूप वाईट वाटले. त्रास झाला. डॉक्टर होता येणार नाही म्हणून वाईटही वाटले. पण करणार काय ? पालकांच्या आधाराशिवाय शिक्षण घेणे हे शक्यच नाही. तसेच आता घेत असलेल्या शिक्षणाचाही पुढे उपयोग होणारच आहे. तेव्हा पालकांनी माझा निर्णय बदलायला सांगितला यात गैर काहीच केले नाही.' पालकांचा आणि स्वतःचा होणारा मतभेद दूर करावयाची अतिशय सोपी व संघर्षरहित युक्ती त्या वापरतात. पालक म्हणतात ते सारे स्वतःच्या हिताचेच असते असे मान्य करून, स्वतःच्या विचाराप्रमाणे वागण्याचे धाडस, त्यातल्या संभाव्य चुका, वगैरे त्रासाला सामोरे जाणे त्या टाळतात.

विद्यार्थिनींनी सध्याच्या अभ्यासक्रमाबाबत व त्यांच्या गरजांबाबत कोणता विचार केलेला आहे हे जाणून घेण्यासाठी त्यांना काही प्रश्न विचारले होते. त्यामध्ये स्त्री-पुरुषांना समान अभ्यासक्रम असावेत की भिन्न असावेत असा एक प्रश्न होता. या प्रश्नाचा हेतू प्रामुख्याने विद्या-

र्थिनी स्वतःकडे कोणकोणत्या दृष्टीकोनातून पाहतात व स्त्री व पुरुष यातील भेदांचा विचार कोणत्या दृष्टीकोनातून करतात हे जाणून घेण्याचा होता. स्त्री-पुरुषांना स्वतंत्र अभ्यासक्रम हवेत काय याचे उत्तर बहुसंख्य मुलींनी नकारात्मक दिलेले आहे. त्या नकारात्मक उत्तराचे कारणही त्यात नोंदविलेले आहे. त्यांच्या मते कायद्याने व निसर्गाने एकच अपवाद वगळता स्त्री व पुरुष इतर सर्व क्षमतात समान आहेत हे ध्यानात घेता, वेगळ्या अभ्यासक्रमाची कल्पना गैरलागू ठरते. बहुसंख्य विद्यार्थिनींना अभ्यासक्रमाचा व त्यांनी या शिक्षणाकडून डोळ्यांसमोर ठेवलेल्या हेतूंचा असलेला संबंध स्पष्ट झालेला दिसला नाही. हे म्हणण्याचे कारण असे की, बहुसंख्य विद्यार्थिनी शिक्षण संपल्याबरोबर विवाह करणार व कौटुंबिक जबाबदारी संभाळणार हे मान्य करतात. तसेच सध्याच्या सर्वसामान्य अभ्यासक्रमामधून व व्यावसायिक अभ्यासक्रमामधून कौटुंबिक जबाबदाऱ्या पूर्ण पार पाडण्यासाठी लागणारी कौशल्ये दिली जात नाहीत, ती त्यांना स्वतःला नंतर शिकावी लागतात. या दृष्टीने पदवी शिक्षणाचा संसारिक जबाबदाऱ्यात फारच दूरान्वयाने उपयोग होतो असेही म्हणताना आढळल्या. परंतु अभ्यासक्रमातील असणाऱ्या उणिवा व स्वतःची भूमिका यामधील निश्चित संबंध यांचा विचार करायला त्यांना जमले नाही. पदवीच्या शिक्षणापेक्षा छोटे व्यवसाय-अभ्यासक्रम उपयोगी पडतील किंवा विवाहानंतर कुटुंबाच्या कल्याणासाठी घरचे काम करून, उरलेल्या वेळात अर्थार्जनास मदत करता येईल व स्वतःलाही घराबाहेर वावरण्याची संधी मिळवून घेता येईल; असे काही अभ्यासक्रम मिळावेत असा विचारही त्यांच्या पैकी कोणी मांडतांना आढळले नाही. कोणता अभ्यासक्रम निवडायचा याबद्दलच्या मार्गदर्शनाची जरूरीही या निमित्ताने पुन्हा ध्यानात आली. उलट अभ्यासक्रमातील भेद हे स्त्री-पुरुषवर्गातील असमानता जोपासतील व ते गैर आहे असा कोठे तरी समज त्यांच्या मनामध्ये तयार झालेला आढळला. कायद्याने दिलेल्या समानतेचा व अनेकदृष्ट्या क्षमतांमध्ये असलेली स्त्री-पुरुष समानता, प्रत्यक्षात आणण्यासाठी अभ्यासक्रमात विविध पर्यायी अभ्यासक्रम असणे अगत्याचे आहे; व त्यांपैकी स्वतःला निवड करताना, आपल्या भावी जीवनातील भूमिकेचा विचार करून अभ्यासक्रम निवडला पाहिजे, ही गोष्ट विद्यार्थिनींना समजलेली दिसली नाही. त्यामुळे भिन्न अभ्यासक्रम असमानता पोसतात असा विचार त्या करताना आढळतात.

अतिशय उल्लेखनीय अशाही काही प्रतिक्रिया या संदर्भामध्ये नजरेत आल्या. काही विद्यार्थिनींनी स्त्री-पुरुषांसाठी अभ्यासक्रम वेगळे हवेत असे मत मांडले आहे. तसेच त्याची कारणेही त्यांनी दिलेली आहेत. ती अशी : १. स्त्री-पुरुष यांच्या सामाजिक भूमिका भिन्न आहेत. तेव्हा त्या त्या भूमिका वठवायला उपयोगी पडणारा अभ्यासक्रम असावा. २. स्त्रीला प्रामुख्याने घर, मुले या बाबतीत जबाबदारी स्वीकारावी लागते. तेव्हा ती जबाबदारी स्वीकारायला मदत करणारा असा अभ्यासक्रम तिला देणे उचित ठरते. या प्रकारच्या प्रतिक्रिया विवाहित विद्यार्थिनींनी दिल्या ही बाब लक्षात ठेवली पाहिजे. विवाहानंतरचा अनुभव त्यांना याबाबत काही वेगळा विचार करायला लावताना दिसला.

**समस्यांवर विद्यार्थिनींचे उपाय**– स्वतःच्या अडचणींवर त्या कोणते उपाय योजतात व स्वतःचे प्रश्न सोडवण्याचे कसे प्रयत्न करतात हे पाहणे आवश्यक होते. विद्यार्थिनींना स्त्री म्हणून काही स्वतंत्र प्रश्न आहेत, असे जाणवलेले नसल्याने बहुसंख्य विद्यार्थिनींनी उपाययोजनांसंबंधी फारसा काही विचार न करणे स्वाभाविक ठरते. सामाजिक स्वरूपाच्या समस्या ज्यांना आहेत अशा विद्यार्थिनींनी उपायांचा काही विचार केला आहे का हे पाहिले. त्यांच्या प्रतिक्रियांमधून पुढील गोष्टी स्पष्ट झाल्या :

१) या विद्यार्थिनींना स्वतःच्या प्रश्नाला स्वतः विचार करून काही उत्तरे शोधता येतात व स्वतःच्या प्रयत्नातूनच इतरांची मदत मिळविणे सोपे जाते हा विचार करता आलेला नाही.

२) आपल्या प्रश्नांच्या निराकरणासाठी आपल्याप्रमाणेच इतर विद्यार्थिनींना अशा प्रकारची अडचण जाणवत असेल, संघटनात्मकरीत्या स्वतःच्या अशा सर्वसामान्य अडचणींना तोंड देता येईल, अशा पद्धतीचा विचार व कृती करण्याची शक्ती त्यांच्यामध्ये आलेली दिसत नाही. अगदी साध्या गोष्टीची चर्चा त्यांच्याबरोबर केली. उदाहरणार्थ, मुले मुलींची चेष्टा करतात, ती टाळण्यासाठी या मुली स्वीकारतात तो मार्ग म्हणजे त्या मुलांना टाळून वावरत राहाणें. या ठिकाणी, या त्रास देणाऱ्या मुलांना काही शासन घडावे म्हणून सर्व विद्यार्थिनींनी एकत्र येणे, महाविद्यालयाच्या प्राचार्यांना या संदर्भामध्ये योग्य ती माहिती देणे, वगैरे गोष्टी कराव्यात असे त्यांना वाटत नाही. अशा प्रकारे काही पुढाकार घेऊन स्वतःचे साधे साधे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणे त्या का टाळतात, यालाही त्यांच्या प्रतिक्रियांतून कारण मिळाले. अनेकदा त्यांच्या बोलण्यावर व त्यांनी निदर्शनाला आणलेल्या गोष्टींसंबंधी त्यांचे पालक, प्राचार्य-प्राध्यापक ही मंडळी त्यांना असा सल्ला देतात की, तुम्ही मुली आहात, तेव्हा तुम्ही स्वतः संभाळून रहा, इतरांना तुमची खोडी काढण्याची संधी देऊ नका.

विद्यार्थिनींना उच्च शिक्षणामुळे विशेष काही आकांक्षा व अपेक्षा निर्माण झाल्या आहेत काय ? समाजविकासामध्ये त्या कोणती भूमिका घेऊ इच्छितात ? हे शोधण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये विद्यार्थिनींनीं दिलेली उत्तरे ही त्यांच्या शिक्षणाच्या हेतूशी अतिशय सुसंगत अशीच आढळली. बहुसंख्य विद्यार्थिनींना शिक्षणामुळे स्वतःचे जीवन सुखी करण्याची अपेक्षा व आकांक्षा आहे. शिक्षणाने जीवन सुखी करणे या त्यांच्या विचाराचा पाठपुरावा केला तेव्हा काही विशिष्ट गोष्टी नजरेस आल्या. त्यांच्या मते उत्तम सुखी जीवन म्हणजे आर्थिकदृष्टचा संपन्न जीवन. उच्च शिक्षणामुळे मिळणारा वर हा सुस्थितीतील मिळण्याची शक्यता अधिक व म्हणून उच्च शिक्षणाने संपन्नता मिळणे अधिक शक्य आहे, हे गणित त्यांच्यापैकी काहींनी मांडले. त्याच्याच जोडीला पदवीमुळे नोकरी वा व्यवसाय करता येण्याची शक्यता यामुळेही आर्थिक संपन्नता वाढेल ही बाब त्यांनी स्पष्ट केली. विशेषतः आर्थिकदृष्टचा दुर्बल गटातील विद्यार्थिनींना नोकरी ही या दृष्टीने महत्त्वाची वाटली. उच्च शिक्षणामुळे सुसंस्कारित जीवन जगता येईल असाही एक विचार मांडला गेला. तथापि, सुसंस्कारित जीवनाची कल्पना स्पष्ट करणे त्यांना अवघड गेले. उच्च शिक्षणामुळे निर्माण झालेल्या त्यांच्या अपेक्षांमध्ये प्रामुख्याने व्यक्तिगत सुखनिर्मितीचाच विचार केलेला आढळला. उच्च शिक्षणाने कोणत्या विशेष अपेक्षा व आकांक्षा निर्माण केल्या याबद्दलचा त्यांचा विचार जाणून घेण्यापूर्वी दोन गोष्टी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या : १) उच्च शिक्षण घेणाऱ्यांची अल्पसंख्या; २) उच्च शिक्षणावर होणारा प्रचंड खर्च. या दोन गोष्टी नजरेस आणून देण्यामागे एक हेतू होता. समाज या थोड्या व्यक्तींवर प्रचंड पैसा खर्च करतो; तेव्हा या व्यक्तींनी शिक्षणानंतर स्वतःच्या कर्तृत्वाचा लाभ हेतुपूर्वक समाजास दिला पाहिजे. पर्यायाने समाजविकासाची जबाबदारी या उच्च शिक्षितांवर येऊन पडते. ती जबाबदारी त्यांना पटली आहे काय हे पाहणे अगत्याचे होते.

या संबंधीच्या त्यांच्या मतांचा मागोवा घेण्यासाठी त्यांना समाजविकासासाठी काय करावेसे वाटते व त्यामध्ये कोणती भूमिका त्या घेऊ इच्छितात याबद्दल विचारले होते. त्या संदर्भात समाजासाठी काही करावे याबद्दलच्या त्यांच्या कल्पना अतिशय अस्पष्ट आढळल्या. त्यांच्या उत्तरात प्रामुख्याने कुटुंबनियोजन, अस्पृश्यतानिर्मूलन, निरक्षरतानिर्मूलन, अपंगांचे पुनर्वसन, दलित स्त्रियांवरील अन्याय दूर करणे, या कार्यक्रमांचा उल्लेख आहे. क्वचित एखाद-दुसऱ्या विद्यार्थिनीने अंधश्रद्धा व रूढी यांच्या उच्चाटनासाठी काम केले पाहिजे असेही म्हटले आहे. विद्यार्थिनींना ही विशिष्ट कार्यक्षेत्रे का सुचली याचा अधिक विचार करता पुढील संभाव्य कारणे दिसली : राष्ट्रीय सेवा योजना (एन्. एस्. एस्.) सारख्या कार्यक्रमांमधून या प्रकारच्या कार्यक्षेत्रामध्ये

काही ना काही काम करण्याचा महाविद्यालयात चाललेला प्रयत्न विद्यार्थिनींच्या डोळ्यासमोर होता. तसेच सध्या ज्वलंत सामाजिक प्रश्नांमध्ये जी कार्यक्षेत्रे मोडतात ती त्यांच्या जाणिवेत असतात. स्वाभाविकपणेच आपणही असेच काही करावे वा करु शकू असे त्यांना वाटू लागते.

तथापि या कार्यक्षेत्रांची निवड फारशी विचारपूर्वक केलेली नसावी असे वाटते. असे म्हणण्याचे कारण या साऱ्या सामाजिक प्रश्नांकडे पाहता विद्यार्थिनींनी जी भूमिका स्वीकारलेली आहे त्या भूमिकेमध्ये सापडते. कौटुंबिक व सामाजिक जबाबदारीमध्ये कोणत्या जबाबदारीला अग्रक्रम द्याल ? या प्रश्नाचे उत्तर कौटुंबिक जबाबदारीला अग्रक्रम देऊ असेच आलेले आहे. या त्यांच्या अग्रक्रमाचे समर्थनही विद्यार्थिनींनी केलेले आहे. त्या समर्थनामध्ये पुढील विचार विद्यार्थिनी व्यक्त करतात : काहींच्या मते सामाजिक प्रश्न सोडविणे म्हणजे लष्करच्या भाकरी भाजणे होय. लष्करच्या भाकरी भाजताना स्वतःच्या कुटुंबाकडे दुर्लक्ष होणे स्वाभाविक आहे. पर्यायाने यामुळे पुन्हा सामाजिक प्रश्नात भर घालणे आहे. असे विचार त्या विशेष जोर देऊन मांडतात. इतर काही विद्यार्थिनींच्या मते समाज हा अनेक कुटुंबांनी बनलेला. तेव्हा त्या स्वतःच्या कुटुंबाची उत्तम रीतीने देखभाल करून सामाजिक प्रश्न सोडवण्याचे कार्य करू शकतील असा युक्तिवाद मांडतात. या विद्यार्थिनींशी बोलताना आणखी एक गोष्ट जाणवली ती म्हणजे संपूर्ण समाजाचे व त्या वावरतात त्या विशिष्ट सामाजिक गटांचे एकमेकांशी असलेले नाते त्यांच्या ध्यानामध्ये आलेले दिसले नाही. उच्च शिक्षण घेतलेल्यांची संख्या मुळातच मर्यादित आहे. या व्यक्तींनी व विशेषतः स्त्रियांनी केवळ स्वतःच्याच कुटुंबाचा विचार केला तर, त्यांच्या शिक्षणावर समाजाने केलेल्या खर्चातून समाजाला मिळणारी परतफेड ही अतिशय कमी राहील. किंबहुना ती फरतफेड फक्त त्यांच्याच उत्कर्षासाठी सीमित राहाण्याचा धोका त्यांच्या लक्षामध्ये येताना दिसत नाही.

### विद्यार्थिनींच्या प्रश्नांचे स्वरूप

विद्यार्थिनींबरोबर केलेल्या चर्चांतून त्यांना जाणवलेल्या त्यांच्या स्त्री म्हणून येणाऱ्या अडचणींचे स्वरूप अतिशय मर्यादित आहे असे आढळले. स्वतःच्या आवडीच्या गोष्टी करताना येणारी बंधने व त्यामुळे होणारा तात्पुरता त्रास एवढ्याच दृष्टीने विद्यार्थिनी त्यांच्या या स्वरूपाच्या प्रश्नांकडे पाहताना आढळल्या. तथापि, पालक, शिक्षक, बरोबरीचे विद्यार्थी व आजूबाजूचा समाज, स्त्रियांकडून ज्या चाकोरीबद्ध जीवनक्रमाची अपेक्षा ठेवतो त्या अपेक्षात त्यांना फारसे गैर असे काही आढळत नाही. परंपरेने स्त्रीला दिलेला गौण दर्जा हा त्यांना त्रासदायक होताना आढळत नाही. त्यांचे निर्णय घेताना त्यांना अधिकांशरीतीने पालक व समाज यांच्यावर अवलंबून राहावे लागते, याची फारशी खंत त्यांना जाणवत नाही. किंबहुना कुटुंबातील सर्वांची देखभाल करणारी, स्वतःचे व्यक्तिमत्त्व बाजूला ठेवून इतरांच्या आनंदात आनंद व दुःखात दुःख मानणारी अशी स्त्रीबद्दलची कल्पना त्यांनाही कुठे तरी मनोमन पटत असावी असे दिसते. याचमुळे कौटुंबिक जबाबदारी सांभाळण्याची प्रमुख जबाबदारी स्वीकारण्याची तयारी त्या निःसंकोचपणे स्वीकारतात. त्या भूमिकेतील सहजसिद्ध अपुरेपणा त्यांना बोचत नाही. कदाचित अशी दुय्यम पण ज्ञात भूमिका स्वीकारणे हे अज्ञात नव्या भूमिकेपेक्षा सोपे वाटते की काय असाही एक विचार मनात येऊन जातो.

विद्यार्थिनींना स्वतःला जाणवलेल्या प्रश्नांचे स्वरूप हे एका अर्थाने अतिशय जुजबी आढळले. तथापि त्यांच्या या प्रतिक्रियांमधून नजरेसमोर येणारे, त्यांना न जाणवलेले प्रश्न फारच महत्त्वाचे व उच्च शिक्षणाच्या परिणामकारकतेबद्दल विचार करायला लावणारे असे आहेत.

**विद्यार्थिनींना न जाणवलेले प्रश्न** — आपण उच्च शिक्षण का घ्यावे ? त्या शिक्षणाने स्वतःमध्ये कोणते बदल झाले पाहिजेत ? याबद्दल विद्यार्थिनींच्या मनात कोणतीही कल्पना स्पष्टपणे

तयार झालेली जाणवली नाही. कदाचित विद्यार्थ्यांच्या बाबतीतही हीच गोष्ट आढळून येईल. तथापि विद्यार्थिनींच्या बाबतीत उच्च शिक्षणाने त्यांच्याकडून केलेल्या विशेष अपेक्षा ध्यानात घेता, उच्च शिक्षणाने काय दिले पाहिजे हे स्पष्ट होणे महत्त्वाचे आहे. त्याबाबतीत विद्यार्थिनींना कोणत्याही प्रकारे जाणीव निर्माण झालेली आढळत नाही.

स्वतः स्त्री म्हणून उच्च शिक्षण घेतल्यानंतर निवडायच्या कार्यक्षेत्राबाबतीतही जाणीवपूर्वक विचार करताना त्या आढळल्या नाहीत. यामुळे त्यांच्या उच्च शिक्षणाने विकसित होणाऱ्या क्षमतांचा लाभ समाजाला कोणत्या पद्धतीने देता येईल याबद्दल त्यांनी जवळजवळ विचारच केलेला आढळत नाही. स्वतःच्या कुटुंबाची जबाबदारी उत्तमपणे सांभाळणे म्हणजेच समाज-विकासामध्ये सहभाग घेणे इतकी मर्यादित कल्पना त्या स्वीकारतात.

स्त्री एक व्यक्ती म्हणून तिला समान सामाजिक दर्जा मिळणे आवश्यक आहे. याबाबतीतही या विद्यार्थिनींनी विचार केलेला आढळत नाही. कोणतीही कृती करताना ती स्त्रीने सामाजिक संकेतांच्या चाकोरीतच केली पाहिजे, हा विचार त्या सहजपणे स्वीकारताना दिसतात. चाकोरी-पलीकडे जाण्यासाठी स्वतःवर, स्वतःच्या क्षमतांवर, व्यक्तीचा विश्वास असावा लागतो. असा आत्मविश्वास बहुसंख्य विद्यार्थिनींजवळ अभावानेच आढळला. स्वतःचा निर्णय घेताना निर्णयाची जबाबदारी स्वतःवर घेणे ही गोष्ट त्यांना विचाराच्या पातळीवरही अवघड वाटते. कुटुंबियांच्या आधाराशिवाय जगणे हे कल्पनेतही असंभवनीय वाटल्याने, स्वयंनिर्णयावर आधा-रित कृती व वेळ पडल्यास कुटुंबियांपासून अलग होण्याची शक्यता त्यांना फारच त्रासदायक वाटते. किंबहुना असे काही करणे हे फक्त लोकविलक्षण व्यक्तींनाच जमते असा त्यांचा समज आहे. उच्च शिक्षणाने अशी निर्णय-क्षमता द्यावयाची आहे व मनाचे प्रगल्भीकरण स्वतंत्र विचा-रातून व कृतीतून होऊ शकते हा विचार त्यांच्यापर्यंत पोहचलेला नाही.

उच्च शिक्षणाने व्यक्तीत सामाजिक प्रश्नांची जाण निर्माण करावी असा एक परिणाम अपेक्षिला जातो. याबाबतीत विद्यार्थिनींना जाणवलेले सामाजिक प्रश्न व त्या प्रश्नांची त्यांची वरवरची समजूत लक्षात घेता, उच्च शिक्षणाने सामाजिक प्रश्न समजण्यासाठी काही भरघोस असा अनुभव त्यांच्या पदरात टाकला असे म्हणता येत नाही. अर्थात विद्यार्थिनींचे सामाजिक प्रश्नांबद्दलचे वरवरचे ज्ञान हा केवळ त्यांना न समजलेला प्रश्न एवढ्याच मर्यादित अर्थाने त्याकडे पाहता येत नाही. उच्च शिक्षण देताना ज्या पद्धतीने ते दिले जाते त्यातील अनुभवांचा फोलपणा हाही या प्रश्नांमध्ये नजरेला आला आहे. त्याचबरोबर उच्च शिक्षण देण्यासाठी तयार केलेले अभ्यासक्रम, त्या अभ्यासक्रमामध्ये दिले जाणारे ज्ञान, ते ज्ञान देण्याच्या पद्धती, त्या ज्ञानाचे आकलन मोजण्याच्या पद्धती, या साऱ्या घटकांचा पुनर्विचार होणे आवश्यक वाटते.

### अपुऱ्या जाणीवेची कारणमीमांसा

**प्राध्यापक** – या दृष्टीने विद्यार्थिनींना न जाणवलेल्या प्रश्नांचे बरेचसे उत्तरदायित्व त्यांचे प्राध्यापक, सध्याची उच्च शिक्षणाची पद्धती या व अशा इतर घटकांकडे जाते. यामध्ये प्राध्या-पकांचा विचार थोडा अधिक करणे हे विद्यार्थिनींचे प्रश्न समजण्यासाठी महत्त्वाचे ठरते. विद्यार्थिनींना उच्च शिक्षणाची मूल्ये समजण्यासाठी व शिक्षित स्त्री या दृष्टीने विशेष जबाबदारी स्वीकारण्यासाठी त्यांची स्वतःची करावयाची तयारी याबद्दल विशेष जाणीव निर्माण करणे हे प्राध्यापकांच्या इतर कामांपैकी एक काम आहे. तथापि, बहुसंख्य प्राध्यापक व प्राध्यापिका विद्यार्थिनींना त्यांच्या विशेष जबाबदारीची जाणीव होईल असे काही अनुभव देताना आढळत नाहीत. या संदर्भात काही प्राध्यापक व प्राध्यापिका यांच्याशी झालेल्या चर्चेत व्यक्त झालेली मते मोठी ध्यानात घेण्याजोगी आहेत. प्राध्यापकांच्या मते, त्यांचे काम अभ्यास-विषय

विद्यार्थ्यांना सोपा व सुलभ करून सांगणे हे आहे. त्याव्यतिरिक्त विद्यार्थिनींच्याकडे विशेष असे लक्ष पुरविण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकणे हे बरोबर होणार नाही. तसेच त्यांच्या मते अशा साऱ्या गोष्टी प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या क्षमतांनुसार व प्रयत्नांतून मिळवावयाच्या असतात. उच्च शिक्षणाचा तो एक सहज परिणाम आहे. त्यासाठी शिक्षकांनी वेगळे काही प्रयत्न केले पाहिजेत हे त्यांना आवश्यक वाटत नाही. सध्या प्रत्येक गोष्टीसाठी शिक्षण घेत असताना विशेष लक्ष दिले पाहिजे असा आग्रह धरला जातो हेही त्यांना बरोबर वाटत नाही. त्यामुळे अभ्यास-क्रमातील विषयांचे अध्यापन बाजूला राहून इतर अनेक हेतू अध्यापनात समाविष्ट होतात; उच्च शिक्षणाने मिळणाऱ्या ज्ञानाचा कस आणखीनच कमी होण्याची शक्यता राहते, असे त्यांना वाटते. अगदी थोड्या प्राध्यापकांचा विद्यार्थिनींना स्वतःच्या प्रश्नांची जाणीव करून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत यावर विश्वास आहे.

प्राध्यापकांशी झालेल्या चर्चांतून एक महत्त्वाची गोष्ट जाणवली ती म्हणजे उच्च शिक्षणाचे अपेक्षित हेतू साध्य होण्यासाठी सध्याच्या परिस्थितीत महत्त्वाचा बदल हा त्या ठिकाणी काम करीत असणाऱ्या मानवी घटकांमध्ये होण्याची जरुरी आहे. प्राध्यापकांना त्यांचे काम करीत असताना विद्यार्थिनींसाठी वा इतरही दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांची तयारी वाढ-विण्यासाठी करावे लागणारे प्रयत्न हे ते सध्या करीत असलेल्या त्यांच्या कामापेक्षा निश्चितच जास्त जाणीवपूर्वक असले पाहिजेत. विद्यार्थ्यांना शिकविणे म्हणजे स्वतःजवळ असलेले ज्ञान अभ्यासक्रमाच्या चौकटीत मोजून-मापून विद्यार्थ्यांच्या पदरात टाकणे इतकाच अर्थ अनेकदा घेतला जातो. अन्य संदर्भात (परीक्षा सुधार समितीच्या कार्यक्रमांच्या निमित्ताने) ध्यानात आलेले शिक्षकवर्गातील 'का शिकवायचे ?' याबद्दलचे असलेले अस्पष्ट ज्ञान व जाणीव, यामधून शिक्ष-कांची अपुरी व्यावसायिक तयारी दृष्टोत्पत्तीस आली आहे. त्यांनी सामाजिक गरजांचा विचार फारच अपुरा केलेला दिसतो. शिक्षकाची भूमिका ही सामाजिक संदर्भ लक्षात घेऊन ठरवावी लागते. त्या भूमिकेमध्ये समोरच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी आयुष्यातील निर्णय घेण्यासाठी योग्य ती वैचारिक शिदोरी द्यावयाची जबाबदारी स्वीकारण्याची तयारी हवी. त्याचबरोबर कोणते सामाजिक प्रश्न आहेत ? त्या प्रश्नांवर मात करण्यासाठी कोणत्या प्रकारची मानसिक तयारी होणे आवश्यक आहे ? अशा प्रकारचा विचार शिक्षकाने विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे आवश्यक आहे. समाजाचे वैचारिक आधारस्तंभ, या बुद्धिवंतांच्या सामाजिक भूमिकेचा आव-श्यक अर्थ शिक्षकांच्या वर्तनात प्रत्ययाला आला पाहिजे. तथापि, अशा प्रकारची क्रियाशील भूमिका प्राध्यापक स्वीकारताना आढळत नाहीत. कदाचित इतर अनेक क्षेत्रात वाव न मिळा-ल्याने, दुसरे काहीही न जमल्याने, शिक्षक म्हणून काम करणे स्वीकारावे लागते या सामाजिक परिस्थितीमध्ये ही शिक्षकांच्या भूमिकेच्या अपुऱ्या समजुतीचे मूळ असण्याची खूप शक्यता आहे. उच्च शिक्षणामधून प्राप्त व्हावयाच्या सामर्थ्याचा प्राध्यापकांद्वारे येणारा अपुरा प्रत्यय हा विद्या-र्थिनींच्या प्रश्नांच्या निमित्ताने नजरेला आलेला दुसरा एक प्रश्न.

**प्राध्यापिका –** उच्च शिक्षण घेतलेल्या स्त्रिया समाजामध्ये काही विशेष जबाबदारी स्वीकारू शकतात याचा प्रत्यय येण्याची आणखी एक शक्यता प्राध्यापिकांच्या सामाजिक सहभागाने दृष्टीसमोर येणे शक्य आहे. विद्यार्थिनींना या दृष्टीने कोणता अनुभव मिळतो हे पाहिले. बहुसंख्य प्राध्यापिका संसार करणे ही प्रथम गरज मानणाऱ्या दिसल्या. उरलेल्या वेळामध्ये शक्य झाले म्हणून अध्यापनाचे काम स्वीकारले अशा भूमिकेत त्यांच्या कामाकडे त्या पाहताना दिसतात. त्यांच्या स्वतःच्याच दिनक्रमामध्ये स्त्रीची पारंपरिक गौण भूमिकाही त्या विनासंकोच स्वीकारीत असाव्यात असे जाणवते. त्यांचा सामाजिक कार्यामधील वाटा विद्या-र्थिनींच्या नजरेस येईल व त्यांना काही प्रेरणा मिळेल इतका लक्षणीय आढळत नाही. तसेच

त्यांच्याशी केलेल्या चर्चेतून बहुसंख्य प्राध्यापिका या स्वतःला उच्च शिक्षणामुळे मिळालेल्या संधीचा फायदा समाजविकासासाठी करावयाचा आहे व अल्पशिक्षित समाजातील उच्च शिक्षित स्त्रीची भूमिका जाणीवपूर्वक पार पाडली पाहिजे याचा गंभीरपणे विचार करताना आढळत नाहीत. त्यांच्याही मते विद्यार्थिनींनी शिक्षणातून विषयाचे सखोल ज्ञान मिळविण्याकडे प्रथम लक्ष द्यावे. त्याचा सहज परिणाम म्हणून त्यांच्या आजूबाजूचे प्रश्न समजणे विद्यार्थिनींना शक्य होईल. तथापि, या प्रश्नांबाबत प्रत्यक्ष काही काम स्त्रियांनी करावे, ती त्यांची जबाबदारी आहे, याबाबत त्यांचा फारसा आग्रह नाही. कारण त्यांच्या मते सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी एकट्या-दुकट्या व्यक्तीने समोर येऊन प्रश्न सुटत नाहीत. तसेच प्रश्न सोडविण्यासाठी द्यावयास लागणारा वेळ, शक्ती व नेतृत्व या साऱ्या गोष्टी आपल्या समाजात स्त्रीला शक्य नाहीत. कारण स्त्री ही समाजाचा विरोध पत्करून किती मर्यादेपर्यंत काम उभे करू शकेल याबद्दल त्यांच्या मनामध्ये पूर्णपणे साशंकता आहे. विद्यार्थिनींच्या परिचयात येणाऱ्या या अशा विचार-सरणीच्या प्राध्यापिका, विद्यार्थिनींना त्यांची भूमिका समजावून घेऊन काम करायला कितीशी समर्थ प्रेरणा देऊ शकतील याबद्दल काही अंदाज व्यक्त करणे अवघडच आहे.

**पालक** — जन्मापासून सतत संस्कार करणारे क्रियाशील घटक म्हणून पालकांचा विचार विद्यार्थिनींच्या प्रश्नांचे स्वरूप समजण्यासाठी करणे अपरिहार्य ठरते. बहुसंख्य पालकांच्या मते स्त्री ही कुटुंबावरील एक जबाबदारी, एक ओझे, म्हणूनच तिच्याकडे पाहिले जाते. तिला सतत एका विशिष्ट प्रकारचे संरक्षण देणे, तिच्या उदरनिर्वाहाच्या गरजा भागविणे व विवाह होईतो शक्य तितके शिक्षण देणे इतक्या सीमित अर्थाने घरच्या मुलीचा विचार होतो. या शिक्षणामधून विवाहानंतरच्या जबाबदाऱ्या पूर्ण करावयास लागणारे कौशल्य तिने निरीक्षणातून व कल्पनेतून मिळवावे आणि तसे ते करणे तिला शक्य आहे, अशी सर्वसामान्य समजूत ठेवली जाते. त्यामुळे उच्च शिक्षण घेण्याची संधी देताना व उच्च शिक्षणाच्या होणाऱ्या परिणामांचा पालकांच्या मनातील विचार फारच क्षीण स्वरूपाचा आढळतो. पालक मुलींना पदवीपर्यंतचे शिक्षण द्यायला राजी होतात, याचे कारण शिक्षणाने त्यांच्या विवाहाचा प्रश्न सोडविणे काहीसे सुलभ होणार आहे, हे त्यांना समाजाच्या बदलत्या अपेक्षांनी नजरेला आणून दिलेले आहे हे. उच्च शिक्षणाने मुलीचे मन प्रगल्भ व्हावे हा हेतू त्यांच्या मनात बहुधा अभावानेच आढळतो.

महाविद्यालयात शिक्षण घेणे म्हणजे मनाला स्वतंत्र विचार करायला शिकविणे, हे अनुभवाला येणे विद्यार्थिनींच्या दृष्टीने फारच कठीण दिसते. कारण त्यांना शिक्षण देणारे प्राध्यापक वा पालक या दोन्हीही प्रभावक्षेत्रातून या दृष्टीने जाणीवपूर्वक प्रयत्न होताना आढळत नाहीत.

पालकांच्या वर्तनातून विद्यार्थिनींवर अनेक प्रकारची दडपणे येतात. त्यांच्या विवाहाची जबाबदारी ही पूर्णपणे पालकांनीच स्वीकारल्यामुळे अत्यंत वैयक्तिक अशा महत्त्वाच्या व आयुष्याला कलाटणी देणाऱ्या गोष्टींचा निर्णय पालकांवर सोपवून विद्यार्थिनी स्वस्थ राहातात. याला कारण स्त्रीने प्रत्येक वेळेला कोणत्या तरी बंधनातच वावरले पाहिजे, हा समज. त्या दृष्टीने विवाहानंतर पालकांची तिच्या बाबतची जबाबदारी संपून ते त्यातून मोकळे व्हावयास धडपडत असतात. योग्य वयामध्ये मुलीचा विवाह उरकणे हे पालकांना त्यांच्या कर्तव्यांपैकी श्रेष्ठ कर्तव्य वाटत राहाते. असे वाटण्यामागे समाजाचे पालकांवर येणारे दडपण हेही विचारात घेतले पाहिजे. जे पालक मुलीला विवाहाबद्दल तिच्या अपेक्षा व तिची आवड यांना प्राधान्य देऊन वर-संशोधनाला स्वातंत्र्य देतात त्या पालकांना समाजामध्ये टीकेला तोंड द्यावे लागते. स्वतःची जबाबदारी पार पाडण्यास असमर्थ आहेत, मुलीचा पैसा हा त्यांना मोहात टाकतो आहे, असे काही बोलणे त्यांना प्रत्यही ऐकावे लागते. अशा सामाजिक टीकेला तोंड देणे हे सामान्य पालकांना कठीण जाते. साऱ्याचा परिणाम म्हणून विद्यार्थिनींना शिकवण्यापाठीमागे अतिशय

मर्यादित असे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवले जाते. पालकांचा हा मर्यादित दृष्टिकोन विद्यार्थिनींच्या स्वतंत्र विचारात अडसर निर्माण करतो. आपल्या घरामध्ये मोकळेपणाने एकमेकांशी बोलणे, मते व्यक्त करणे, मतांमधील फरक समजावून घेणे व निर्णयाला येताना असा सारासार विचार करणे, ही गोष्ट क्वचितच होते. आपल्या सामाजिक वर्तनामध्ये प्रत्येकाने कसे बोलावे व काय करावे हे आखून दिले असल्यामुळे अशा मोकळ्या चर्चा या अप्रस्तुतच ठरतात. मुलींनी शिकावे परंतु स्वतःचा विचार न करता, पालकांना त्यांनी जे करावे असे वाटेल तेवढेच करण्याचे स्वातंत्र्य घ्यावे, असे कौटुंबिक वातावरण आहे. ही सर्वसामान्य परिस्थिती आहे. अशा वातावरणामध्ये विद्यार्थिनींना स्वतःच्या विचारांना कसे विकसित करावयाचे हे समजणे अवघडच जाते. हा त्यांचा दोष म्हणणे योग्य होणार नाही. स्वतंत्र विचार व स्वतंत्र कृती यांच्या जोपासनेसाठी व्यक्तीला चुका करण्याची मुभा असावी लागते. ती मुभा आपल्या पारंपरिक समाजरचनेत वस्तुतः कोणालाच मिळत नाही.

वर उल्लेखिलेल्या आपल्या सामाजिक परिस्थितीत आपल्या विद्यार्थिनींना चुका करण्यास वाव मिळणे अशक्यच दिसते. त्याचा स्पष्ट परिणाम त्यांच्या सर्व वर्तनावर होताना दिसतो. ज्ञानाचा वर्तनामध्ये वापर न करणे, केवळ परीक्षेसाठी गुण मिळवण्यापुरता त्या ज्ञानाचा उपयोग करणे, एरवी परंपरेने आखून दिलेल्या मर्यादेत वावरत राहाणे व त्या वावरण्याचा कोणताही मानसिक त्रास स्वतःला न जाणवेल अशा पद्धतीने वागणे, अशी सवय त्यांनाही नकळत लागून जाते.

### उपायांची जरूरी

उच्च शिक्षणाने अपेक्षित असलेला विचार, विकास व स्वभूमिकेची जाणीव, विद्यार्थिनींमध्ये फारच कमी आढळली, ही समाजस्वास्थाच्या दृष्टीने चिंता निर्माण करणारी गोष्ट आहे.

विद्यार्थिनींमध्ये आढळलेल्या या उणीवा दूर करण्यासाठी त्या स्वतः, त्यांच्यावर प्रभाव असणारे प्राध्यापक व प्राध्यापिका, पालक, या घटकांमध्ये जरूर ते बदल घडवून आणण्याची आवश्यकता आहे. हे बदल घडवून आणणे कसे शक्य होईल याचा विचार करीत असताना ज्या गोष्टींचा उपयोग होईल असे जाणवले, त्या गोष्टी स्थूल मानाने खाली देत आहे.

### उपायांची स्थूल योजना

विद्यार्थिनींमध्ये समाजाचे प्रश्न, त्यांची भूमिका, यांची जाणीव निर्माण करण्यासाठी प्रेरणा देण्याचे काम प्राध्यापक-प्राध्यापिकांनाच करावे लागणार आहे. त्या दृष्टीने प्राध्यापक व प्राध्यापिका यांना विशेष उद्‌बोधन देण्याची यंत्रणा निर्माण केली पाहिजे. त्यामध्ये स्त्री-समस्यांबाबत विशेष काम करणाऱ्या संस्था व व्यक्ती या सार्‍यांनी, कोणत्या गोष्टींनी स्वभूमिकांची जाणीव जागृती निर्माण होऊ शकते, याचा प्रत्यक्ष अनुभव प्राध्यापक-प्राध्यपिकांच्या नजरेस आणणे आवश्यक आहे.

याच्याच जोडीला प्रत्यक्ष अभ्यासक्रमामध्ये स्त्रियांच्या प्रश्नांसंबंधी, त्यांच्यावरील सामाजिक अन्यायाची व्याप्ती स्पष्ट करणारे व त्यातून बाहेर येण्याच्या मार्गांचा विचार करणारे छोटे छोटे कार्यक्रम समाविष्ट करून घेतले पाहिजेत.

प्रत्यक्ष विद्यार्थिनींना त्यांच्या भूमिकेचा स्पष्ट विचार करायला लावणारे अध्ययन-अनुभव देण्याचा विचार या कार्यक्रमांमधून झाला पाहिजे.

विद्यार्थिनींना स्त्रिया म्हणून त्यांच्यावर शिक्षणाने येणारी जबाबदारी समजण्यासाठी, सतत चर्चासत्रे, प्रकल्प, यासारख्या कार्यक्रमांनी विचार व कृती, या दोन्ही पातळींवर क्रियाशील ठेवले

पाहिजे. विद्यार्थिनींनी आपण होऊन हे करावे असा दृष्टिकोन न ठेवता त्यांना ह्या दृष्टीने प्रेरणा देण्याची जबाबदारी त्यांच्यापेक्षा जास्त प्रबोधन झालेल्या वर्गाची, पर्यायाने त्यांच्यासाठी शिक्षणक्रमांची योजना करणाऱ्या सर्वांची आहे, हे मान्य करावयास हवे. आणि या प्रकारच्या कार्यक्रमात पुढाकार घेऊन, विद्यार्थिनींना त्यासाठी तयार करण्याचे काम संथ गतीने होणार हेही ध्यानात ठेवून या कार्यक्रमांचे आयोजन केले पाहिजे.

विद्यार्थिनींच्या पालकांना हे सारे समजणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने महाविद्यालये, तसेच स्त्री-समता प्रस्थापित करावी या हेतूने काम करणाऱ्या वेगवेगळ्या संस्था या साऱ्यांनी पालकांशी संपर्क साधणे महत्त्वाचे आहे. प्राध्यापक-प्राध्यापिका व पालक यांच्यात संवाद प्रस्थापित होण्यासाठी शिक्षक-पालक संघटनेसारखी एखादी योजना कार्यान्वित करता येईल काय हे पाहिले पाहिजे. या दृष्टीने ग्रामीण भागात, तालुक्याच्या ठिकाणी काम करणारी महाविद्यालये व पालक यांच्यात अनेक कारणांनी येणाऱ्या प्रत्यक्ष संबंधाचा उपयोग कसा करून घेता येईल हेही पाहावे लागेल.

विद्यार्थिनींचे प्रश्न म्हणजे एका अर्थाने साऱ्या समाजाचे प्रश्न आहेत. ते सोडविण्यासाठी आतापर्यंत झालेले प्रयत्न कमी ठरले आहेत. तेव्हा श्रम, शक्ती, वेळ या साऱ्यांचा योजनाबद्ध मेळ घालून शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्यांनी प्रामुख्याने पुढाकार घेऊन या प्रश्नांकडे लक्ष पुरविण्यानेच विद्यार्थिनींच्या प्रश्नांची उकल होऊ लागेल. एरवी आणखी कित्येक पिढ्या या साऱ्या प्रश्नांचे ओझे बाळगत राहातील आणि तेही अगदी अजाणतेपणी.

■ ■

# १७ बहि:स्थ व नोकरी करणारे विद्यार्थी

शालिनी जोगळेकर

शिक्षणाची ओढ आज सर्व थरांतील लोकांना जाणवू लागली आहे. पालकांना व स्वत: पाल्यांनाही शिक्षणाबाबत अभिलाषा व महत्त्वाकांक्षा निर्माण होऊ लागली आहे. त्याचबरोबर गरजेपोटी शिक्षण हेही सूत्र पुढे आले आहे. शिक्षणाविना नोकरी नाही, नोकरीशिवाय पैसा नाही, पैशाविना उदरनिर्वाह कसा व्हावा, ही विवंचना उभी आहे. तेव्हा शिक्षणासाठी धडपड हवीच. या समस्येपोटीच मिळेल तेवढी, मिळेल तशी नोकरी पत्करून, शिक्षणासाठी पैसा उभा करून, शिक्षण घेणारा विद्यार्थीवर्ग निर्माण झाला आहे. महाराष्ट्र सरकारने आर्थिकदृष्टचा मागासलेल्या वर्गासाठी शैक्षणिक सवलती १९६० पासून राबविण्यास सुरुवात केली आहे. तरी त्यामुळे सर्व प्रश्न सुटत नाहीत. कनिष्ठ मध्यमवर्ग या सवलतीत बसत नाही, पण त्यांच्याजवळ उच्च शिक्षणासाठी पैसा नसतो. स्वत: विद्यार्थ्याने आपली कमाई केली व वापरली तर शिक्षण चालू राहाते. किंबहुना स्वत:चे शिक्षण व कुटुंबाला थोडा हातभार त्याला त्याच्या नोकरीच्या पैशातून लावावा लागतो. पुष्कळ विद्यार्थ्यांना कुटुंबाला पोसण्याची जबाबदारी स्वत:वर घ्यावी लागते.

**एक सोय**

असे मिळवून शिकणारे विद्यार्थी भारतात, तसेच महाराष्ट्रात सर्वत्र विखुरले आहेत. या विद्यार्थ्यांचे प्रश्न नव्याने निर्माण झाले असल्याने याबाबत विशेष लक्ष घालून संशोधन झालेले नाही. लेख लिहिले गेले आहेत. विचार मांडले गेले आहेत. त्यांचा मागोवा घेऊन तसेच पश्चिम महाराष्ट्रातील, विशेषत: पुणे शहर व त्याच्या परिसरातील, विद्यार्थ्यांकडून माहिती मागवून हा लेख लिहिला आहे.

नोकरी करून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची सोय भारतातील काही विद्यापीठांनी करून दिली आहे. या विद्यार्थ्यांना, ' बहि:स्थ विद्यार्थी असे संबोधून, महाविद्यालयात प्रवेश न घेता विशिष्ट अटींवर बाहेरून परीक्षेला बसू दिले जाते. महाराष्ट्रातही काही विद्यापीठात ही सोय आहे. तसेच गृहिणीची जबाबदारी पार पाडून शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या महिलांना विद्यापीठांच्या परीक्षांना बाहेरून अभ्यास करून बसू दिले जाते. पत्ररूपाने अध्यापनाचेही काही प्रयोग चालू आहेत. या प्रकारे परीक्षांना बसता येते.

बहि:स्थ विद्यार्थ्यांना परीक्षेत यशस्वी होण्यात अनेक अडचणी उभ्या राहतात. त्यातील काही अडचणी (उदाहरणार्थ विषयाच्या योग्य मार्गदर्शनाचा, परीक्षांच्या वेळापत्रकाबाबत बिनचूक व आगाऊ माहितीचा अभाव, इत्यादी) टाळण्यासाठी अनेक विद्यार्थ्यांना वाटते की, आपण महाविद्यालयात हजेरी भरून नियमित विद्यार्थी म्हणून दाखल व्हावे व उरलेल्या वेळात पूर्ण वेळ अगर अंश वेळ नोकरी करून आर्थिक जबाबदारीही सांभाळावी.

महाविद्यालयातून विद्यार्थीसंख्या वाढल्याने वर्ग पुरे पडत नाहीत. दुबारवर्ग भरवावे लागतात. अशाप्रकारे जागेअभावी सकाळ व दुपार अशा दोन पाळचांत अनेक महाविद्यालये चालतात. या दुबार वर्गांमुळे नोकरी करूनही नियमित विद्यार्थी म्हणून अनेकांना शिक्षण घेणे शक्य झाले आहे. मागासवर्गीयांना मिळणाऱ्या आर्थिक परिस्थितीवर आधारलेल्या व इतर अनेकविध शिष्यवृत्त्यांमुळे काहींचा महाविद्यालयीन शुल्काचा प्रश्न सुटला तरी इतर खर्चाचे मुद्दे असतातच (उदाहरणार्थ पाठ्यपुस्तके, परीक्षा-फी). त्यामुळे एक बराच मोठा वर्ग नोकरी करून शिकणाऱ्यात मोडू लागला आहे. पालकांचा नाईलाज असतो. शिक्षण सोडून नोकरी करण्याचा सल्ला व सक्ती ते आपल्या पाल्यांवर करू शकतात.

महाविद्यालयीन शिक्षणासाठी खेडेगावच्या मुलांना शहरात यावे लागते. तेथे नोकऱ्या उपलब्ध होऊ शकतात. तरीही राहण्याची जागा मिळविणे, जेवणखर्च व इतर खर्चाची व्यवस्था करणे, राहत्या जागेपासून महाविद्यालयात जाण्यायेण्याचा प्रश्न सोडविणे, या समस्या असतातच. शिवाय नोकरी शोधून ती चालू ठेवण्याची खटपट करावयाची व शिक्षणही घ्यावयाचे, या सर्वांमुळे त्यांना अनेक अडचणी भेडसावतात.

### पाश्चिमात्यांचा अनुभव

अंश वेळ नोकरी करून आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग पाश्चिमात्य विद्यार्थ्यांनी पूर्वीपासूनच चोखाळला आहे. पैसे मिळविण्यासाठी कोणतेही काम हे विद्यार्थी हलके मानीत नाहीत. पाश्चिमात्य आणि भारतातील संस्कृतीत आणखी एक फरक असा आहे की, पाश्चिमात्य विद्यार्थ्यांना पैसा मिळविणे महत्त्वाचे वाटते. मग तो कसा, कोणाकडून मिळतो, हा मुद्दा येत नाही. आईबापांकडूनही त्यांचे काही काम करून पैसे घेण्यामध्ये त्यांना वावगे वाटत नाही. आई-बाप मुलाला 'तुझ्या-शिक्षणाचा खर्च तुझा तू चालव' असे स्पष्ट सांगतात. विद्यार्थी स्वावलंबनाने शिक्षण घेतो. उच्च शिक्षणासाठी तो आई-बापांवर अवलंबून नसतो. विद्यापीठागणिक विद्यार्थी-संघटना विद्यार्थ्यांना नोकरीबाबत मार्गदर्शन देतात. नोकरी पुरविणाऱ्या संस्थाही उपलब्ध आहेत. अशी स्वतःच्या कमाईने शिकणारी मुले अनुभवाने संपन्न बनतात. धंद्यातील प्राथमिक गोष्टी समजल्याने पुढे नोकरी-व्यवसायाला लागल्यावर लौकरच आपल्या कामात ती वाकबगार होतात. हे विद्यार्थी इतरांच्या अडी-अडचणी जाणू शकतात.

### अभ्यास-पद्धती

सध्याच्या परिस्थितीची माहिती प्रस्तुत लेखात आधारभूत व्हावी याकरिता पुण्यातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचे अनुभव विचारात घेतले. पूर्ण वेळ नोकरी करून शिकणारे विद्यार्थी, तसेच थोडावेळ नोकरी करून शिकणारे विद्यार्थी घेतले. सुट्टीत काम करून शिकणारे काही विद्यार्थी निवडले. नोकरी करून नियमित कॉलेजात जाऊन शिकणारे विद्यार्थी घेतले; तसेच बाहेरून परीक्षेला बसणारे विद्यार्थीही घेतले. बाहेरून बसणारांपैकी काही स्वतंत्रपणे स्वतःचा अभ्यास स्वतः करणारे, तर काही खाजगी वर्गांना जाऊन आपल्या परीक्षा-विषयांचे मार्गदर्शन घेणारे विद्यार्थी घेतले. हे विद्यार्थी निरनिराळ्या संस्थांतील आहेत. निरनिराळ्या वयांचे आहेत. निरनिराळ्या जाती-जमातींचे आहेत. पहिल्या वर्षात शिकणारे आहेत, तसेच पीएच्. डी. करणारेही आहेत.

लेखाचा मुख्य आधार, विद्यार्थ्यांनी प्रश्नावली भरून दिल्यानंतर गोळा झालेल्या माहितीचा आहे. त्याशिवाय संस्था-प्रमुख, ग्रंथालयांचे ग्रंथपाल व काही प्रौढ व्यक्ती, ज्यांनी पूर्वी नोकरी करून शिक्षण घेतले व आता व्यवसायात ज्या स्थिर झाल्या आहेत, त्यांची मनोगते मुलाखत पद्धतीने मिळविण्याचा प्रयत्न केला. तीन-चारशे प्रश्नावली प्रसृत केल्या. भरून परत मिळालेल्या

प्रश्नावलींची संख्या पावपट आहे. सुमारे शंभर व्यक्तींच्या अनुभवाच्या निवेदनाचे सार तयार झाले आहे. १९७८ ते १९८१ या वर्षात शिकणारे विद्यार्थी निवडले आहेत. प्रौढांच्या अनुभवांचा कालावधी १९५० ते १९७० हा आहे.

### धडपड कशासाठी ?

आर्थिक दृष्टचा सवलत मिळालेले (शुल्कात सवलत किंवा शिष्यवृत्ती) विद्यार्थी, या पाहणीतील विद्यार्थ्यात तुलनेने कमी आढळले. पाहणी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये बहुसंख्य विद्यार्थी कसलीही सरकारी आर्थिक सवलत वा लाभ न मिळालेले आहेत. थोडक्यात, मध्यमवर्गीय विद्यार्थीही धडपड करताना आढळले आहेत. हा वर्ग समाजात आपली प्रतिष्ठा राखण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. वस्तुत: ही मुले १७–१८ वर्षांची होताच त्यांना कमविणे भाग असते व म्हणून ते नोकरीला लागतात. परंतु हे विद्यार्थी मनातून कॉलेज-शिक्षणासाठी आसुसलेले असतात. पूर्ण वेळ नोकरी असली तरीही सकाळच्या कॉलेजांना नियमितपणे जाऊन अगर संध्याकाळच्या वा रात्रीच्या खाजगी वर्गांना गर्दी करून, मार्गदर्शन मिळवून, बाहेरून परीक्षेला बसतात. पदवी-परीक्षेपर्यंतचा कॉलेजचा अभ्यासक्रम ते अशा प्रकारे रेटतात. पदवी मिळविण्यामागचा हेतू नोकरीतील पदोन्नतीपेक्षा समाजातील आपली प्रतिष्ठा, आपला मान, राखण्यासाठीचाच असतो. थोडावेळ नोकरी करणारे विद्यार्थी आई-बापांवरील आर्थिक भार थोडा सुसह्य करीत, पदवी-परीक्षेपर्यंत मजल मारतात. समाजामध्ये उच्च शिक्षिताला असणारा मान त्यांना महत्त्वाचा वाटतो.

अगदी अत्यल्प प्रमाणातील विद्यार्थी पालकांजवळ शिक्षणासाठी पैसा उपलब्ध असूनही तो नाकारून, अंश वेळ नोकरी करून आपला शिक्षणखर्च भागवितात. यामागील हेतू अर्थातच स्वतंत्र वृत्ती जोपासण्याचा व स्वावलंबनाचे तत्त्व राबविण्याचा आहे. आपल्या धडपडीबाबत हे विद्यार्थी समाधान व्यक्त करताना आढळले. ‘स्वाभिमानाने, जिद्दीने व स्वावलंबनाने शिक्षण पार पाडले याचा आम्हाला आनंद वाटतो.’ असे ते म्हणतात, तर काही खंत व्यक्त करणारे उद्गार आहेत : ‘मौजमजेचे कोवळे वय हाला-तापात काढतो. काय-काय सोसले, आमचे आम्हालाच माहीत !’ वगैरे.

प्रौढांच्या मुलाखतीत असे आढळले की, ‘आयुष्यात स्थिर झाल्यावर मागे वळून पाहिले तर स्वत:चा अभिमान वाटतो. दिवस-रात्र न बघता अभ्यास केला, श्रम केले. आता शक्तीप्रमाणे जे कोणी असे धडपडत असतील त्यांना मदत करू, त्यांच्याकडे सहानुभूतीने बघू.’

### अडचणी

पहाणीमध्ये आढळलेला सर्वात मोठा वयोगट २० ते ३० वर्षे वयाच्या दरम्यान आहे. वास्तविक १६ ते २० वर्षे या वयोगटातील विद्यार्थी महाविद्यालयीन शिक्षण घेण्यास योग्य वयाचे असतात; परंतु नोकरी करून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे अनेक प्रश्न वय वाढण्यास कारणीभूत होतात. काही एक वर्ष नोकरी, एक वर्ष शिक्षण, असे करीत असतात. खंडित शिक्षण चालू असते, वय वाढत जाते. पूर्ण वेळ नोकरी करणाऱ्यांना कामाचा ताण अधिक असतो. इतरही घरगुती अडचणी असतात (उदाहरणार्थ,आजारपण). नोकरीवरून घरी जाण्या-येण्याच्या, जेवणा-खाण्याच्या अडचणी असतात; श्रम अधिक होतात. वेळ अपुरा पडतो; अभ्यासाला कमी वेळ मिळाल्याने अगर थकल्यामुळे अभ्यास करीत असता लक्ष लागत नाही. कॉलेज अगर क्लास बुडवावा लागणे, पाठ्यपुस्तके व संदर्भ पुस्तके मिळण्यात अडचणी असणे, परीक्षेच्या अगोदर चार-दोन दिवसही रजा न मिळणे वगैरे कारणांनी परीक्षेत उत्तरे नीट लिहिली जात नाहीत. मार्गदर्शनाचा अभाव, अभ्यासाला अपुरा वेळ, शारीरिक व मानसिक थकवा, गोंधळलेली मन:स्थिती इत्यादी कारणां-

मुळे अपयश पदरी घ्यावे लागते व चार-पाच वर्षांच्या अभ्यासक्रमास सात-आठ वर्षे लागतात व वय वाढत जाते.

### संकोच : समज

याशिवाय असेही आढळले की, या वयोगटातील विद्यार्थ्यांनी प्रस्तुत पाहणीच्या प्रश्नावली मागून घेतल्या; पण त्या पाठविण्याकडे दुर्लक्ष केले, आळस केला. त्यांना असेही वाटले असावे (मुलाखतीतून हे लक्षात आले) की, प्रश्नावली भरून दिल्या तर आपले नाव जाहीर होईल व कदाचित नोकरी देणारे संचालक चिडतील. यापैकी थोड्या विद्यार्थ्यांनी प्रश्नावली भरून दिल्या.

२० ते ३० वयोगटातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रश्नावली भरून दिल्या. आपले अनुभव सविस्तर लिहिले. कारण असेही असावे की, थोडे अधिक वय असल्याने, समज आलेली असते. आपल्या नावाचा दुरुपयोग होणार नाही हे आश्वासन पटले असावे. आपल्या अडचणी लोकांसमोर याव्यात असेही वाटले असावे. ३० ते ४० व ४० ते ५० या वयोगटांतील विद्यार्थ्यांनी काही प्रमाणात प्रश्नावली भरून दिल्या. या मोठ्या वयोगटांतील व्यक्तींनी आस्थेने प्रश्नावली भरून दिल्या व सहकार्य दिले. हे सर्व विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षण घेणारे आढळले. जीवनात सुस्थिर झाल्यावर केवळ ज्ञान वाढवावे म्हणून अगर छंद म्हणून या व्यक्ती शिक्षण घेत आहेत. काही विद्यार्थ्यांनी असेही नमूद केले आहे की, समाजाला आपल्या ज्ञानाचा उपयोग करून द्यावा या हेतूने ते पदवी मिळवीत आहेत. (उदाहरणार्थ, कायदाविषयक पदवी घेऊन गरीब वर्गाला आपल्या ज्ञानाचा फायदा करून द्यावा, कामगारबंधूंना मदत करावी.) समाजशास्त्र, मानसशास्त्र, तंत्रज्ञान, इतिहास वगैरे ज्ञानशाखांत पदव्युत्तर शिक्षण घेणारे विद्यार्थीही आपल्या ज्ञानाचा काही विशेष उपयोग करावा अशी इच्छा बाळगणारे आढळले.

### वय आणि स्मरणशक्ती

लहान वयात स्मरणशक्ती तल्लख असते. एक-दोनदा वाचल्यानेही समजते. आयत्यावेळी टिपणे वाचून परीक्षेत प्रश्नांची उत्तरे सफाईने देता आल्याने मुले यशस्वी होऊन जातात; परंतु मोठ्या वयात बुद्धीची झेप चांगली असली, विषय समजत असला तरी, स्मरणशक्ती दगा देते. मेहनत जास्त करावी लागते. शारीरिक व मानसिक थकवा लौकर येतो. तरुण वयाप्रमाणे रात्रभर जागून वाचन होत नाही, म्हणून परीक्षेसाठी हे वय योग्य नसते. तरी नोकरी करून शिकणारे मोठ्या वयाचे विद्यार्थी बरेच आढळतात. नेटाने व जिद्दीने परीक्षा देऊन ते पदवी मिळवितात. महत्त्वाकांक्षी व्यक्ती मानसन्मान व प्रतिष्ठा प्राप्त करण्याच्या हेतूने अगर पदोन्नतीसाठी आपले प्रयत्न चालू ठेवतात. या गटातील विद्यार्थ्यांना आर्थिक अडचण तशी नसते.

२० ते ३० वयोगटातील विद्यार्थी सर्वाधिक प्रमाणात आढळले व त्यांच्याच अडचणींचा आपल्याला विचार करावयास हवा.

### विषयनिवडीतील अडचणी

पुणे शहरातील बहुतेक सर्व महाविद्यालयांत नोकरी करून शिक्षण घेणारे विद्यार्थी आढळले. अर्थात व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांत नोकरी करून शिकण्यास प्रतिबंध असल्यामुळे व विज्ञानशाखेकडे कॉलेजला भरपूर वेळ द्यावा लागत असल्यामुळे, नोकरी करणारे विद्यार्थी तेथे संख्येने कमी आहेत; पण तेथेही हे विद्यार्थी गुपचुप पळवाटा काढून, नोकरी करून शिकत राहतात. यामागे आर्थिक कारणच असते. ज्या महाविद्यालयात 'कमवा-शिका' योजना राबविल्या जातात, तेथे अंश वेळ नोकरी करून शिकणारे विद्यार्थी अधिक आढळले. पूर्ण वेळ नोकरी करणारे विद्यार्थी मानव्य विद्याशाखेकडे वळलेले आहेत. पाहणीतील ५० टक्के विद्यार्थी या शाखेत

पदवी-शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांना नोकरी करून अभ्यास करताना मानव्य विद्या-शाखेचे विषय, सोपे वाटतात. वर्गातील व्याख्याने इतर शाखांच्या तुलनेने कमी असतात. स्वतः आपला आपण अभ्यास करून विषय समजावून घेऊ अशी आशा वाटते. त्याशिवाय एक कारण असे आहे की महाविद्यालये दुबार वेळ चालत असल्यामुळे, मानव्य विद्या-शाखा सकाळच्या वेळेत चालते आणि म्हणून सकाळच्या वर्गास जाऊन पूर्ण वेळ नोकरी करणे शक्य होते. विज्ञानशाखेकडे गेल्यास प्रात्यक्षिकांच्या वेळा व नोकरी दोन्ही संभाळणे शक्य होत नाही. काही विद्यार्थ्यांनी अशीही खंत व्यक्त केली आहे की, विज्ञानाची गोडी असूनही, नोकरी संभाळण्यासाठी मानव्य-विद्याशाखा घेणे भाग पडले आहे. मानव्य विद्या-शाखेची का होईना पदवी मिळवावी म्हणून या शाखेकडे वळावे लागले. या शाखेच्या खालोखाल वाणिज्य शाखेकडे वळणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पाहणीत आढळली. वाणिज्य शाखेचे आकर्षण, दुसरी नोकरी सुलभतेने मिळविणे किंवा अधिक पगाराची नोकरी मिळणे शक्य आहे, या हेतूने वाढले आहे. उदाहरणार्थ बँकेमध्ये नोकरी मिळावी म्हणून अंश वेळ काम करून ह्या शाखेचे पदवीधर होण्यासाठी धडपडणारे विद्यार्थी आढळतात.

पाहणीतील २८ टक्के विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षण व व्यवसायात्मक शिक्षणातील पदव्या मिळविताना आढळले. उदाहरणार्थ, एम्. ए., एम्. कॉम्., एम्. एड्., बी. एड्., एल्एल्. बी., पीएच्. डी., व्यवसाय-व्यवस्थापन, वगैरे. यांची उद्दिष्टे, असलेल्या नोकरीत कायम होणे, पदोन्नती मिळविणे, स्वतंत्र व्यवसाय करणे, वगैरे आहेत. हा गट बहुतांशी आर्थिकदृष्ट्या अडचणीत नाही; अधिक महत्त्वकांक्षी खचितच आहे.

### नोकरी : पूर्ण वेळ, अंश वेळ

**पूर्ण वेळ**—या पाहणीतील बहुसंख्य विद्यार्थी पूर्ण वेळ नोकरी करून महाविद्यालयात जात होते, किंवा खाजगी-वर्ग वगैरेंचे मार्गदर्शन घेऊन बहिःस्थ विद्यार्थी म्हणून परीक्षा देणारे आढळले. अल्पसंख्य विद्यार्थी अंश वेळ काम करणारे व महाविद्यालयात नियमित जाणारे होते. फार थोडे विद्यार्थी सुट्टीत काम करणारे व नंतर महाविद्यालयात नियमित जाणारे होते. हे विद्यार्थी जास्त संख्येने मिळू शकले नाहीत. कारण ते विस्कळित असल्याने त्यांना गाठून माहिती मिळविणे जमले नाही. तथापि, पाश्चिमात्य देशांच्या तुलनेने, सुट्टीत काम करून व त्या कमाईवर शिक्षणाचा खर्च चालवू शकणारे विद्यार्थी भारतात फार कमी दिसतात. याचे कारण एक तर नोकऱ्यांची अनुपलब्धता असेल आणि दुसरे कारण नोकरीत पैसा बेताचाच मिळतो व तो महाविद्यालयाच्या एका सत्राचा व इतर खर्च भागेल एवढा नसतो. आधीच उपलब्ध कामांची संख्या बेताची व त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या कामाच्या पद्धतीचा अनुभव फारसा उत्साहकारक नसतो. काम देणारी मंडळी शिकाऊ विद्यार्थ्यांना कामावर घेण्यास फारशी उत्सुक नसतात. तसेच विद्यार्थ्यांना योग्य नोकऱ्यांबाबत माहिती व सल्ला देणाऱ्या संस्था व संघटना नाहीत. असल्यास अत्यल्प आहेत. आपल्या ज्ञानशाखेला पूरक होतील अशा संस्था (उदाहरणार्थ, विद्यापीठे) आणि कारखाने व तेथे उपलब्ध असणाऱ्या नोकऱ्या यांचे विद्यार्थ्यांना ज्ञान नसते. त्यामुळे कोठेही, कशीही व मिळेल ती नोकरी ते पत्करतात.

थोडा वेळ काम करणारे असोत की पूर्ण वेळ काम करणारे असोत, पैशाची अत्यंत निकड असल्यानेच विद्यार्थी नोकरी पत्करतात. केवळ स्वावलंबन म्हणून नोकरी करणारा विद्यार्थी अपवादादाखल सापडतो. शिकल्यानंतर बढती मिळेल, आर्थिक परिस्थिती सुधारेल, समाजात मान मिळेल, आपली लायकी वाढेल, असे त्यांना वाटते. शिक्षणाशिवाय चांगली नोकरी नाही ही त्यांची धारणा आहे. अंश वेळ काम करणारे विद्यार्थी, एकतर पूर्ण वेळ नोकरी मिळत नाही म्हणून ही नोकरी पत्करतात, किंवा महाविद्यालयात नियमित विद्यार्थी म्हणून शिकणे

आधिक पसंत असल्यामुळे अशी नोकरी घेतात. महाविद्यालयीन जीवनाचा आनंद व अनुभव चाखण्यासाठी आर्थिक अडचण सोसूनही हे विद्यार्थी थोडा वेळ काम पत्करतात. विज्ञानशाखेकडे किंवा इतर व्यावसायिक शिक्षणाकडे वळणारांना थोडा वेळच नोकरी करता येते. खेड्यातून शहरात आलेले, वसतिगृहात वगैरे ठिकाणी राहाणारे विद्यार्थी, शैक्षणिक शुल्कात सवलत असली तरी, इतर खर्च भागविण्यास मदत व्हावी म्हणून दोन-तीन तासांची नोकरी पत्करतात. क्वचित एक तासाचीही नोकरी स्वीकारतात.

थोडा वेळ नोकरी करून शिकणारे विद्यार्थी लहान वयोगटातील (१६ ते २४) आढळले, तर पूर्ण वेळ नोकरी करून शिकणारे साधारणतया मोठ्या वयोगटातील (२५ ते ४०) आढळले.

पूर्ण वेळ नोकरी करणारे लहान वयाचे विद्यार्थी आपल्याला परिस्थितीमुळे नोकरी करावी लागते म्हणून चिडलेले आढळले, मनातून असंतुष्ट वाटले. महाविद्यालयीन जीवनातील मौजमजा पूर्णतया अनुभवता येत नाही याची त्यांना खंत वाटते. फुलपाखरी जीवनाची त्यांना ओढ आहे. ते उदास आहेत. खंतावून नशीबाला बोल लावणारेही आढळले. यातील काही अपवाद म्हणूनच श्रमप्रतिष्ठेला महत्व देणारे आहेत. स्वावलंबनाचा अभिमान बाळगणारे, जिद्दीने काम करणारे, आनंदी वृत्तीने परिस्थितीशी टक्कर देणारेही तरूण आढळले. सर्वसाधारणपणे विद्यार्थीदशेत व कोवळ्या वयात नोकरीचे जू पसंत नसते. श्रमाची थोडी नावडच आढळते.

**अवधी** : पाहणीतील बहुसंख्य विद्यार्थ्यांना नोकरी लागून वर्ष-दोन वर्षांचा काळ लोटलेला आहे. नुकतीच नोकरी लागलेले विद्यार्थी अल्प प्रमाणात आहेत. काही प्रमाणात विद्यार्थी, बरीच वर्षे नोकरी केल्यावर आणि नोकरीत व जीवनात सुस्थिर झाल्यावर, छंदापायी किंवा महत्वाकांक्षा म्हणून शिकत आहेत. समाजात मानमान्यता मिळावी व योग्यता वाढावी या इच्छेने नोकरी करीत असूनही पुढे शिकतात. मोठ्या वयोगटाच्या महिला नोकरी संभाळून हौसेने शिकतात व बहि:स्थ विद्यार्थी म्हणून परीक्षेस बसतात.

### नोकरी व महाविद्यालय यांच्या वेळा

जे विद्यार्थी पूर्ण वेळ नोकरी करतात त्यांना अर्थातच महाविद्यालयाच्या व्याख्यानांना पूर्णतया वेळ देणे जमत नाही. मानव्य विद्या-शाखेत विद्यार्थी शिकत असतील व महाविद्यालय सकाळच्या वेळात भरत असेल तर त्यांना सकाळी व्याख्यानांना जाऊन दुपारची नोकरी करता येते. पाहणीत असे आढळले की या विद्यार्थ्यांनादेखील आठवड्यात तीन-चार व्याख्याने बुडवावी लागतात. कारण वेळेवर नोकरीच्या जागी पोचण्यासाठी व त्यापूर्वी जेवण वगैरे घेण्यासाठी महाविद्यालयाचा शेवटचा तास बऱ्याच वेळा बुडविणे भाग पडते. उदाहरणार्थ, एम्. एड्. चा विद्यार्थी शाळेत नोकरी करतो. सकाळच्या व्याख्यानांपैकी शेवटचे व्याख्यान त्याला सोडावेच लागते. उत्तरपत्रिका, वह्या तपासणे, कार्यालयाचे काम घरी आणून करणे, तेथे अधिक काळ बसावे लागणे, वगैरे प्रकार असतातच. या सर्वांमुळे महत्वाची वाटणारी व्याख्याने बुडवावी लागल्याची खंत त्यांच्या उद्‌गारातून स्पष्ट जाणवते, आणि नाईलाजाने नोकरीला अधिक प्राधान्य द्यावे लागल्याचे ध्यानी येते.

अंश वेळ नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील व्याख्यानांना व्यवस्थित जाता येते. तरीही त्यांना संध्याकाळचे फिरणे, खेळणे, करमणूक, किंवा छंद, यांस अनुकूल असलेल्या वेळात बंद जागेत बसून काम करावे लागल्याची जाणीव असते व त्याचे मनाला दु:ख असते. कधी असाही प्रसंग येतो की अंश वेळ काम असूनही जास्त वेळ बोलावतात; लौकर जावे लागते, निघण्यास उशीर होतो; व अभ्यासास वेळ मिळत नाही. अशा अडचणी येतातच. महाविद्यालयाचे सर्व कार्यक्रम व्यवस्थित पार पाडून नोकरीला दांड्या मारणे त्यांना परवडणारे नसते.

नोकरीवरून काढल्यास होणारी गैरसोय त्यांना भेडसावते. काही भिडस्त स्वभावाचे विद्यार्थी आपण नोकरी करतो ही गोष्ट गुप्त ठेवतात. गृहपाठ अगर इतर वैयक्तिक अभ्यासाचे लिखाण वेळेवर न दिल्यामुळे प्राध्यापक रागावतात. त्यांची बोलणी हे विद्यार्थी सोसतात; पण नोकरीची गोष्ट चोरून ठेवतात.

बहि:स्थ विद्यार्थी खाजगी वर्गांना जात असतात. त्यांना नोकरीचे तंत्र सांभाळण्यासाठी वर्ग बुडविण्याची पाळी येते. अर्थात नोकरी न करता नियमित विद्यार्थी म्हणून महाविद्यालयाला जाणारे तरुणही पुष्कळदा तासाला बुट्टया मारतात. प्राध्यापकांचे शिकविणे आवडत नाही, समजत नाही, अशा तऱ्हेच्या विविध कारणांनी मुले तासाला अनुपस्थित राहतात. परंतु अशी विनाकारण तास बुडविण्याची चैन नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना जमणारी नसते. तो अभ्यास इतर वेळी करण्यासाठी केवळ महाविद्यालयातील शिक्षण घेणारे विद्यार्थी सवड काढू शकतात. नोकरी करणाऱ्यांना वेळेचे भान ठेवावेच लागते. वेळ वाया दवडता येत नाही. तसेच जेवढे व जसे मिळेल तसे ज्ञान गोळा करायचे हा मधमाशीचा गुण परीक्षेत यशस्वी होण्यास त्यांना उपयोगी पडण्यासारखा असतो. नोकरी करून शिकणारे विद्यार्थी प्रामाणिक व आधिक आस्थेचे वाटतात. तसेच ते गरजेपोटी शिकत आहेत याची त्यांना जाणीव असते, असे आढळले. महाविद्यालयाचे एखादे वर्ष बुडविणे, वगैरे गोष्टी त्याना भावत नाहीत. परिणामी काम करणारे विद्यार्थी व्याख्यानांकडे अधिक लक्ष देतात, टिपणे काढतात व नियमित अभ्यास करतात असे आढळले. बहि:स्थ विद्यार्थ्यांबद्दल प्राध्यापकही असेच बोलताना आढळले. प्राध्यापक अशा विद्यार्थ्यांना थोडी सवलत देतात व जिव्हाळ्याची वागवणूक देतात.

'दोन्हीकडचा पाहुणा उपाशी' या म्हणीसारखी कधीकधी या विद्यार्थ्यांची गत होते. नोकरीत काटेकोरपणा संभाळता येत नाही, व महाविद्यालय प्रमुखांना खूष ठेवता येत नाही. दोन्हीकडे जीव सारखाच ओढतो. त्यामुळे शारीरिक धावपळ व मानसिक ताण सोसणे त्यांना अपरिहार्य असते.

### बहि:स्थ की नियमित ?

नोकरी करणारे विद्यार्थी महाविद्यालयाकडून मिळणाऱ्या मार्गदर्शनाला अधिक महत्त्व देतात. पाठ्यपुस्तके व संदर्भ पुस्तके नीट कळतात, बाजारात उपलब्ध नसलेली पाठ्यपुस्तके महाविद्यालयाच्या ग्रंथालयात मिळू शकतात; अभ्यासक्रम, फी भरण्याची व परीक्षेची वेळापत्रके या बाबतीत वेळेवर व व्यवस्थित माहिती मिळते; यामुळे नोकरीच्या संचालकांना आगावू सांगून रजा मिळण्याची नीट सोय करता येते.

बहि:स्थ विद्यार्थी म्हणून परीक्षेला बसणारे तरुण मार्गदर्शनासाठी खाजगी वर्गांची मदत घेतात. या वर्गांच्या वेळाही नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना जमवता येतील अशाच ठेवल्या जातात. हे वर्ग बहुधा संध्याकाळी ७ चे सुमारास भरतात व रात्री ९–१० वाजेपर्यंत चालतात. त्यामुळे वर्ग की नोकरी ही समस्या उभी राहत नाही. त्यांच्या समस्या शारीरिक थकव्यासंबंधी असतात. दिवसभर नोकरी करून थकल्यावर वर्गात जाऊन व्याख्याने ऐकताना लक्ष लागत नाही, झोपही येते. तसेच खेळ, इतर छंद, करमणूक व गप्पा, यांच्यासाठी कधीच सवड काढता येत नाही. अर्थात ही गोष्ट या मुलांनी गृहित धरली आहे. तरीही त्याची बोच शिल्लक असते व त्यामुळें अभ्यासाकडे लागावे तसे लक्ष लागत नाही. फी भरण्याच्या वेळा, परीक्षेचे वेळापत्रक, वगैरेसाठी या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात अगर विद्यापीठात जावे लागते. वेळ मोडतो; एका वेळी काम होत नाही; त्यामुळे हेलपाटे पडतात, असे या विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. आम्हाला सापत्नभावाची वागणूक मिळते, पक्षपात होतो, आमच्या पेपर्सकडे नीट लक्ष दिले जात नाही, परीक्षक

तुच्छतेचा अगर अवहेलनेचा दृष्टीकोन ठेवतात, आम्हाला न्याय मिळत नाही, असे त्यांना वाटत राहते, व त्याची खंत ते आपल्या उद्‌गारात व्यक्त करतात.

**पाठ्यपुस्तके व संदर्भ पुस्तके**

या पाहणीत असे आढळले की, बहुतांश विद्यार्थी पाठ्यपुस्तके स्वतः खरेदी करून तीच वापरतात. अंश वेळ नोकरी करणारे काही विद्यार्थी पाठ्यपुस्तकेदेखील वाचनालयात बसूनच वाचतात. ती खरेदी करता आली तर किती बरे होईल असे त्यांना वाटते. त्यांची आर्थिक परिस्थिती पुस्तके खरेदीच्या आड येते. विद्यार्थ्यांचा कल असा दिसून आला की, स्वतःजवळ पुस्तके असल्यास अधिक आश्वस्त वाटते. जेव्हा इच्छा होईल तेव्हा, जेव्हा सवड होईल तेव्हा त्यांना पुस्तके उपलब्ध होतात. केवळ पुस्तके जवळ असणे हे मानसिक समाधानच आपला अभ्यास व्यवस्थित होणार असा दिलासा त्यांना देते.

रात्रीच्या वाचनालयांचा फायदा फारच थोडे विद्यार्थी घेताना आढळले. काहींनी लिहिले आहे की, रात्रीच्या वाचनालयाची सोय असते हे आम्हाला माहीतच नव्हते. अशी वाचनालये व त्यांचा पत्ता कळला तर आम्ही त्यांचा जरूर फायदा घेऊ. काहींना वाचनालयाबद्दल माहिती आहे; पण रात्रीचे बाहेर व तेही ग्रंथालयात जावेसे त्यांना वाटत नाही. आपल्या विषयाची पुस्तके तेथे उपलब्ध होतीलच, आपल्याला हवे ते नेमके पुस्तक मिळेलच याची त्यांना खात्री नसते. त्यापेक्षा घरी असलेले पुस्तक वाचणे ते पसंत करतात

संदर्भ पुस्तके आवर्जून वाचणारे फारच थोडे आढळले. रात्री जागून संदर्भ पुस्तके ग्रंथालयात जाऊन चाळावीत असे वाटलेले जाणवले नाही. मोठमोठ्या ग्रंथांतून नेमके काय हवे ते शोधून तेवढेच वाचणे जमत नाही. पुस्तक घेतले की अनावश्यक वाचनातच वेळ मोडतो. मूळ अभ्यास बाजूला पडतो व असा वेळ घालवणे परवडत नाही असे काहींनी म्हटले आहे. संदर्भ पुस्तकांची नावे व त्यांतील नेमक्या मजकुराची पाने ही जरी प्राध्यापकाने टिपून दिली तरीही त्याचा फायदा घेतला जात नाही. आयती टिपणे मिळावीत असे वाटते. वेळ कमी पडतो हे खरे असले तरी परीक्षार्थी वृत्ती असते असे जाणवते.

**महाविद्यालयांचे सहकार्य**–नोकरी करून शिकणारे विद्यार्थी, महाविद्यालयातील ग्रंथपाल व प्राध्यापक यांजकडून मिळणाऱ्या सहकार्याबद्दल समाधानी दिसले. ग्रंथपाल व प्राध्यापकांच्या मते हे विद्यार्थी वेळेचा सदुपयोग करतात. संदर्भ-पुस्तके उपलब्ध करून देणे, नव्याने आलेल्या पुस्तकांची माहिती देणे, नियमांच्या चौकटीत बसून जास्तीत जास्त सवलती देणे या गोष्टी महाविद्यालयांचे ग्रंथपाल या विद्यार्थ्यांकरिता करतात. प्राध्यापकांकडून विषयातील अडचणी सोडवणे, अन्य वैयक्तिक साहाय्य यांमध्ये या विद्यार्थ्यांना मदत होते.

**मित्रांचे सहकार्य**–आपल्या धडपडीत मित्रांचे व त्यांच्या वडीलधाऱ्यांचेही आम्हाला बहुमोल साह्य होते असे या विद्यार्थ्यांनी लिहिले आहे. मित्रांचे वडील योग्य सल्ला देऊन मदत करतात याची उदाहरणे काही विद्यार्थ्यांनी दिली आहेत. महाविद्यालयीन जीवनात मित्र हाच सर्वांत अंतरंग जाणून घेणारा जिवलग स्नेही असतो. अंतःकरणातील सुखदुःखे प्रकट होतात. अभ्यासात मदत होते. आर्थिक अडचणीत साह्य मिळते. मित्र कसे लाभतात यावर सर्व अवलंबून आहे. पालकांपेक्षा मित्रांजवळ मुले अधिक बोलकी होतात.

**नोकरीतील संचालकांचा दृष्टिकोन**–नोकरी करून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकडे संचालकांचा पाहण्याचा दृष्टिकोन सामान्यतः सहानुभूतीपूर्ण आहे. काही विद्यार्थ्यांना अधूनमधून ताकीद मिळण्याची वेळ येते. मानापमानाच्या कल्पनेने कदाचित खरे उत्तर लिहिले गेलेच नसेल, स्वच्छ सांगण्याची लाज वाटत असेल किंवा हे विद्यार्थी स्वत्वाला अधिक जपत असल्याने जिवापाड

धडपड करून नियमबाह्य वागतच नसतील. नोकरी करून शिकणारा विद्यार्थी अधिक जागरूक राहून आपल्या बाजूने प्रमाद घडणार नाही याची दक्षता घेत असेल. विनाकारण उशीर करणे, दांड्या मारणे वगैरे करणाऱ्यांच्या वर्गात हे विद्यार्थी मोडत नसतील.

**महाविद्यालय-प्रमुखांचा दृष्टिकोन**–महाविद्यालय-प्रमुखांचे विचार ऐकल्यावर लक्षात येते की, गरजू विद्यार्थी अधिक प्रामाणिक असतो. त्याला अभ्यासाची ओढ असते व आपली पात्रता वाढविण्याची इच्छा असते. त्याचे शिक्षण हेतुपूर्ण असते. शिक्षण त्याच्यावर कोणी लादलेले नसते आणि म्हणूनच ते शिक्षण दिशाहीन होत नाही. ती स्वतः हौसेने करावयाची गोष्ट बनते. हे विद्यार्थी परीक्षेतही चांगले यश मिळवतात असा अनुभव आहे. प्रौढांच्या मुलाखतींमधूनही हे स्पष्ट झाले आहे की, खडतर आयुष्य घालवून नोकरी व शिक्षण दोन्ही सांभाळणारे विद्यार्थी पुढे उच्च पदाला पोचले आहेत.

### प्रौढांचे मनोगत

आपल्या तरुण वयात परिश्रम करून शिक्षण घेतलेल्या या व्यक्ती आता आयुष्यात सुस्थिर झाल्या आहेत. मागे वळून पाहिल्यावर, अपार परिश्रम घेऊन आपण शिकलो याचे त्यांना समाधान आहे. धडपडणारे विद्यार्थी भेटल्यास त्यांना मदत करण्याची या मंडळींची इच्छा असते. त्यांच्या अनुभवांवरून त्यांना वाटते की, स्वतःच्या पायावर उभे राहून शिकण्याने विद्यार्थ्यांच्या अंगी चिकाटी व जिज्ञासा बाणली जाते आणि जीवनात काही तरी करण्याची, संकटांना तोंड देण्याची, मनाची तयारी होते. स्वकष्टार्जित पैशांवर शिकल्यामुळे आता माझ्याजवळ दुसऱ्याला सांगण्यासारखे खूप काही आहे असे काही म्हणतात. जिद्द, दृढ निश्चय व कष्टांची तयारी हे गुण असतील तर कुणालाही पदवीधर होणे अशक्य नाही. स्वावलंबनाच्या धड्यामुळे व योग्य संस्कारांमुळे आपण जीवनात यशस्वी झालो असेही ते म्हणतात. कष्टांचा पुढील आयुष्यात फार उपयोग होतो, गोष्टींचे सम्यक् ज्ञान मिळते व व्यक्तिव्यवहार कळतात. सुरुवातीच्या कष्टांचा प्रकृतीवर काहीही वाईट परिणाम होत नाही. अभ्यासावर तर मुळीच होत नाही. उलट, पैशाची व वेळेची किंमत कळल्यामुळे अभ्यास व्यवस्थित होऊन परीक्षेत यश लाभते.

### निष्कर्ष

उपयुक्त व स्वावलंबी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत जाणार आहे. त्यामुळे बहिःस्थ वा अंश वेळ काम करून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे गांभीर्य वाढत जाणार आहे.

अंश वेळाची कामे मिळण्याच्या संधी वाढत जाणार आहेत. अशी कामे मिळवून देऊ शकतील अशा संघटनांची आवश्यकता आहे.

महाविद्यालयातून 'कमवा-शिका' योजना राबविल्या जातात. त्याचा प्रतिसाद व फलित अल्प आहे.

'कमवा-शिका' योजनेची सुरुवात जी महाविद्यालये व विद्यापीठे यातून झाली होती, त्या संस्थांच्या प्रयत्नांची सांगोपांग माहिती जमविण्याचे काम उपयुक्त होईल.

आपल्या देशात नोकऱ्यांची उपलब्धता, विशेषतः सुट्टीमध्ये कामाची उपलब्धता, फारच कमी आहे. शिवाय या कामाचा मोबदला फार तुटपुंजा मिळतो. त्यामुळे सुट्टीतील कामाच्या मिळालेल्या पैशांतून महाविद्यालयाचा आंशिक खर्च भागविणेही कठीण आहे.

कोणतेही काम पैसा मिळवून देत असेल तर ते क्षुद्र वा हलके नाही हे मानण्याकडे अद्यापि आमच्या तरुणांची मनोवृत्ती दिसून येत नाही. हळूहळू हेही चित्र बदलत चालले आहे.

■ ■

## परिशिष्ट १

## पुणे विद्यापीठातील ' कमवा-शिका ' योजना

विद्यार्थ्यांनी अंशतः स्वावलंबी असावे याकरिता अनेक ठिकाणी विद्यापीठे व महाविद्यालये यांच्यातर्फे उपक्रम करण्यात येत आहेत. हे उपक्रम व त्यांचे फलित यांचे केवळ संकीर्ण स्वरूप कुठेकुठे निवेदनांतून आढळते. या प्रयत्नांचे पद्धतशीर इतिवृत्त प्रसिद्ध व्हावयाचे आहे. शिक्षण-संस्थांच्या स्तरावर उभारलेल्या कामाचा नमुना म्हणून पुणे विद्यापीठाने घेतलेल्या उपक्रमांची माहिती या परिशिष्टात दिली आहे.

विद्यार्थ्यांनी काही प्रमाणात अर्थार्जन करीत उच्च शिक्षण घ्यावे या उद्दिष्टाची योजना पुणे विद्यापीठामध्ये गेल्या वीस वर्षांपासून प्रगत आहे. ज्या व्यवसायांच्या आधारे विद्यार्थी थोडीबहुत कमाई करू शकतील, अशा व्यवसायांची यादी पुणे विद्यापीठाने प्रसिद्ध केली होती. १९७२ पासून ' कमवा-शिका ' योजनेची सुरुवात विद्यापीठाने केल्याचे दिसते.

काही वर्षांपूर्वी, महाविद्यालयीन व विद्यापीठांतर्गत अशा दोन्ही प्रकारच्या विद्यार्थ्यांना स्वावलंबनाने थोडी कमाई करता यावी असा प्रयत्न झाला. सध्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांनाच या योजनेखाली सहाय्य देण्यात येत आहे. विद्यापीठाच्या आवारामध्ये व काही प्रमाणात बाहेर पुढील कामे मिळवून देण्यात आली. पिशव्या शिवणे, दिवाळीच्या दिवसांत फटाके-विक्रीचे दुकान चालविणे, शुभेच्छापत्रांची विक्री, आइसक्रीम विक्री, दूधकेंद्रावरील कामे, पाकिटे बनवणे, इत्यादि. त्याचप्रमाणे विद्यापीठ-कार्यालयांत लेखनिकाची व आवारातील वृक्षसंवर्धनाची कामे विद्यार्थ्यांकरिता मिळवून देण्यात आली. या कामात गेल्या (८०–८१) वर्षात, बैठ्या कामां करिता सुमारे १५ विद्यार्थी व वृक्षसंवर्धनाच्या कामाकरिता सुमारे ४० विद्यार्थी भाग घेत होते. या कामाचा मोबदला म्हणून विद्यार्थ्यांना मासिक रु. ७०–८० देण्यात येतात. एवढा मोबदला देण्यामध्ये सहाय्याचा भाग अर्थातच आहे.

कारखाने, बँका व अन्य ठिकाणी विद्यार्थ्यांना अंश वेळाची कामे मिळावीत अशी योजनेमध्ये अपेक्षा होती. विद्यापीठाच्या आवाराबाहेर मिळणाऱ्या कामांविषयींच्या अनेक मर्यादांमुळे आवारातील कामांवर, विशेषतः वृक्षसंवर्धनाच्या कामावर गेली २-३ वर्षे भर देण्यात येत आहे. या कामापेक्षा लेखनिकाचे काम विद्यार्थी अधिक पसंत करतात. अनुभवान्ती असा निर्णय घेण्यात आलेला आहे की, वृक्षसंवर्धनाचे काम कमीत कमी तीन महिने केल्यावर विद्यार्थ्यास लेखनिकाचे बैठे काम देण्याचा विचार होतो.

विद्यापीठाच्या आवारात विद्यार्थ्यांना कामे पुरविता यावीत याकरिता मुद्रणालय, हस्तोद्योग केंद्र व यंत्रशाळा वगैरे सुविधा निर्माण करण्याचा योजनेमध्ये विचार आहे.

—

## परिशिष्ट २

## विद्यार्थी करीत असलेली कामे

पाहाणीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाची जंत्री अनायासे तयार झाली. ती पुढील-प्रमाणे आहे. यातील अनेक कामे विशेषतः मोठ्या सुट्टीत करण्यासारखी आहेत. वृक्षसंवर्धन, रेल्वेच्या झाडांचे रक्षण, टेलिफोन-ऑपरेटर, शासकीय कार्यालयात कारकुनी, शाळा-महाविद्यालयातील खेळांची मैदाने तयार करणे, संस्कार केंद्र चालविणे, मुले सांभाळणे, मुलांची शाळेत ने-आण करणे, इमारतीचे बांधकाम, कापडगिरणी, कागदकारखाने येथील कामे, व्यापारी संघटनांचे प्रतिनिधी व वितरक, सहकारी गृहसंस्थांमध्ये रखवालदारी, प्रवाशांच्या जागा आरक्षणाची तिकिटे काढणे, प्राप्तीकर वा अन्य कार्यालयातील बिले भरणे, मंगल-कार्यालयात काम, दवाखाने, दुकाने, बसकंडक्टर, वेटर, आलेपाक, बटाटेवडा, तूप, फटाके, सुगंधी तेले, साबण, भेटकार्डे विकणे, मिठाईच्या पेट्या बनविणे, चौकटी वगैरे बनविणे, लायब्ररी चालविणे, रिक्षा चालविणे.

—

# १८ विद्यार्थी-शिक्षक संबंध

हेमंत देवस्थळी

शिक्षणप्रक्रियेमधील विद्यार्थी व शिक्षक या दोन महत्त्वाच्या घटकांमधील संबंधांच्या गुणवत्तेवर शिक्षणक्षेत्राची उत्पादकता (Productivity) वा अनुत्पादकता मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. किंबहुना शिक्षणाची व्यापक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विद्यार्थी-शिक्षक संबंधांना अग्रस्थान देणे अत्यंत आवश्यक आहे. या दृष्टिकोनातून या निबंधात विद्यार्थी-शिक्षक-संबंधाचा केलेला अभ्यास सादर करण्याचा प्रयत्न केला आहे.

या निबंधाचे मुख्यतः तीन भाग केले आहेत. पहिल्या भागात शिक्षणाची सर्वसाधारण उद्दिष्टे स्पष्ट केली आहेत. दुसऱ्या भागात विद्यार्थी-शिक्षक संबंधांची सध्याची स्थिती स्पष्ट केली आहे. आदर्श विद्यार्थी-शिक्षकसंबंध प्रस्थापित करण्याच्या मार्गात कोणकोणते घटक अडचणी निर्माण करतात त्या घटकांचा विचार शिक्षणाच्या उद्दिष्टांच्या संदर्भात या भागात केला आहे. तिसऱ्या भागात विद्यार्थी-शिक्षक संबंधांमध्ये सुधारणा करण्यासाठी करता येणाऱ्या उपाय-योजना व सूचना मांडल्या आहेत.

१. 'औपचारिक' व 'अनौपचारिक' शिक्षण हे शब्दप्रयोग या निबंधात विशिष्ट अर्थाने वापरलेले आहेत. परीक्षेसाठी शिफारस केलेल्या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी शाळा-महाविद्यालयांतील शिक्षकांतर्फे जी व्याख्याने व टीपा देण्यात येतात, त्यांच्यापुरता 'औपचारिक शिक्षण' हा शब्दप्रयोग वापरला आहे. या उलट, या प्रकारच्या औपचारिक शिक्षणाला पूरक अशी व्याख्याने, चर्चा, अभ्यास-सहली किंवा इतर उपक्रम, यांचा समावेश अनौपचारिक शिक्षणात केला आहे; परंतु 'अनौपचारिक शिक्षण' हा शब्दप्रयोग अभ्यासक्रमाबाहेरील अभ्यास-उपक्रमांच्या संदर्भात मुख्यतः वापरला आहे. औपचारिक शिक्षणाची व्याख्या व्यापक केली तर शाळा-महाविद्यालयांनी हाती घेतलेल्या सर्व शिक्षणकार्यक्रमांचा औपचारिक शिक्षणात समावेश करता येईल. त्या अर्थी हा शब्दप्रयोग या निबंधात वापरलेला नाही.

२. अनौपचारिक शिक्षण-कार्यक्रमांमध्ये विद्यार्थी-शिक्षक संबंधांमध्ये अधिक जवळीक निर्माण होते आणि ही जवळीक शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्यास उपयुक्त आहे, या गृहीतावर निबंधामधील चर्चा आधारित आहे.

३. कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयांमधील अनुभवांवर मुख्यतः या निबंधामधील अनुमाने आधारित आहेत.

## शिक्षणाची सर्वसाधारण उद्दिष्टे

विद्यार्थी-शिक्षक संबंधांचा अभ्यास करताना प्रथमतः शिक्षणाची उद्दिष्टे काय असावीत याचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. अर्थात शिक्षणाची उद्दिष्टे कोणती असावीत हे संपूर्णपणे

व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोनावर अवलंबून आहे आणि म्हणून शिक्षणाच्या उद्दिष्टांचे स्पष्टीकरण करताना व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोनाचा परिणाम अपरिहार्य आहे. ही गोष्ट लक्षात घेता शिक्षणाची सर्वसाधारण उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील :

**स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची घडण करणे–** शाळा किंवा महाविद्यालयांमधील औपचारिक शिक्षणाने किंवा या संस्थांबाहेरील अनौपचारिक शिक्षणाने विद्यार्थ्याने स्वतंत्र विचार करण्याच्या उद्दिष्टाला अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे. भारतासारख्या परंपरा आणि रूढिग्रस्त समाजामध्ये तर या उद्दिष्टाला सर्वाधिक महत्त्व देण्याची गरज आहे. अर्थात कोणत्याही गोष्टीचा स्वतंत्रपणे विचार करणे याचा अर्थ इतर व्यक्तींच्या मतांचा अनादर करणे असा होत नाही. किंबहुना इतर व्यक्तींची मते स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असणाऱ्या व्यक्तीने लक्षात घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे असे म्हणता येईल. आयुष्यातील कोणत्याही घटनेकडे किंवा समस्येकडे बुद्धिवादी दृष्टिकोनातून पाहणे व त्या घटनेच्या किंवा समस्येच्या संदर्भात स्वतःला पटेल ती कृती करणे, हा स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा विशेष गुण आहे. या अर्थाने सुशिक्षित व्यक्तीच्या जीवनातील संदर्भ-बिंदू (Reference point) त्या व्यक्तीची बुद्धी हाच असला पाहिजे. म्हणून स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असलेल्या व्यक्तीच्या जीवनात त्या व्यक्तीच्या जन्मापूर्वीच निर्माण झालेल्या संदर्भ-बिंदूंना स्थान असू नये. जेवढा समाज अधिक परंपरावादी व रूढिग्रस्त असेल तेवढी व्यक्तीच्या जन्मापूर्वी निर्माण झालेल्या संदर्भ-बिंदूंची संख्या अधिक असते. त्यामुळे अशा समाजातील व्यक्ती आयुष्यातील प्रत्येक समस्येवर उपाय शोधण्यासाठी किंवा आयुष्यातील प्रत्येक घटनेकडे पहाण्यासाठी या संदर्भ-बिंदूंचा आधार घेते. धर्म, जात, जमात, परंपरा, आई-वडील किंवा कुटुंबातील इतर व्यक्ती, या संदर्भ-बिंदूंमध्ये मोडतात. व्यक्तीच्या जन्मापूर्वीच निर्माण झालेल्या अशा संदर्भ-बिंदूंचे व्यक्तीच्या आयुष्यातील महत्त्व कमी करणे व व्यक्तीला स्वतंत्रपणे स्वतःच्या आयुष्यातील निर्णय घेण्यास पात्र करणे हे शिक्षणाचे सर्वांत महत्त्वाचे उद्दिष्ट असले पाहिजे.

**व्यक्तीच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे–** प्रत्येक व्यक्ती समाजाचा अविभाज्य भाग आहे व म्हणून सामाजिक प्रश्नांबद्दल प्रत्येक व्यक्तीमध्ये किमान आस्था निर्माण करणे हे शिक्षणाचे दुसरे प्रमुख उद्दिष्ट सांगता येईल. किंबहुना आयुष्यातील स्वतःच्या प्रत्येक कृतीकडे सुशिक्षित व्यक्तीने सर्वसमावेशक दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. याचाच अर्थ स्वतः करीत असलेली कृती समाजहिताविरुद्ध आहे किंवा नाही, याचा विचार करण्याची वृत्ती व्यक्तीमध्ये निर्माण करणे, हे शिक्षणाचे एक प्रमुख उद्दिष्ट असले पाहिजे. दुसऱ्या शब्दांत, व्यक्तीच्या आत्मकेन्द्रित वृत्तीस शिक्षणाने आळा घातला पाहिजे. अर्थात याचा अर्थ स्वार्थत्याग किंवा सेवाभाव यासारख्या कल्पना शिक्षणप्रक्रियेत वारंवार व्यक्तीच्या मनावर ठसविल्या गेल्या पाहिजेत असा होत नाही. किंबहुना बऱ्याच वेळा या कल्पनांचा विपर्यास केला जातो. यासाठी शिक्षणाने सामाजिक जाणिवेची अपरिहार्यता विद्यार्थ्यांच्या मनांवर ठसविली पाहिजे. समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या अस्तित्वाचा सामाजिक प्रश्नांशी संबंध असतो म्हणून सामाजिक प्रश्नांसंबंधीची व्यक्तीच्या मनातील उदासीनता शिक्षणाने कमी झाली पाहिजे.

**व्यक्तीमध्ये स्वतःचे मूल्यांकन करण्याची पात्रता निर्माण करणे–** स्वतःच्या मर्यादा काय आहेत, त्याचप्रमाणे स्वतःच्या सामर्थ्याचा कशा प्रकारे उपयोग करता येईल, याची योग्य समज सुशिक्षित व्यक्तीला येणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे स्वतःच्या कृतीमुळे होणारी फसगत व्यक्तीला टाळता येईल. तसेच स्वतःमधील सुप्त पात्रतेचा पर्याप्त उपयोग व्यक्तीला करता येईल. स्व-मूल्यांकन करू शकणाऱ्या व्यक्तीला इतर व्यक्तींचे देखील मूल्यांकन करता येईल व त्यामुळे त्यांच्या संबंधांमधून निर्माण होणाऱ्या कृतीदेखील व्यक्ती जास्त आत्मविश्वासाने व यशस्वीपणे करू शकेल.

परंतु स्व-मूल्यांकन करू शकणाऱ्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व स्वतंत्र असेलच असे म्हणता येणार नाही. स्व-मूल्यांकन करू शकणाऱ्या व्यक्तीला स्वतः एखादी कृती करू शकू किंवा नाही, याचा अंदाज असतो; परंतु ही कृती बुद्धिवादी दृष्टिकोनातून योग्य असेलच असे म्हणता येणार नाही. म्हणून स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची घडण करणे आणि व्यक्तीमध्ये स्वतःचे मूल्यांकन करण्याची पात्रता निर्माण करणे ही शिक्षणाची दोन वेगवेगळी उद्दिष्टे आहेत.

**व्यक्तीमध्ये अर्थोत्पादनासाठी पात्रता निर्माण करणे–** प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या व स्वतःच्या कुटुंबाच्या काही किमान गरजा भागवता आल्या पाहिजेत. या किमान गरजा व्यक्तीने भागविल्या की, व्यक्तीला योग्य राहणीमान उपभोगणे शक्य होईल असे गृहीत धरले तर इतकी किमान पात्रता व्यक्तीमध्ये निर्माण करणे हेही शिक्षणाचे उद्दिष्ट आहे असे म्हणण्यास काहीच हरकत नाही. अर्थात हा प्रश्न केवळ शैक्षणिक क्षेत्रापुरताच मर्यादित राहू शकत नाही. कारण व्यक्तीमध्ये असलेली अर्थोत्पादनाची पात्रता नेहमी अर्थव्यवस्थेच्या रोजगारक्षमतेच्या संदर्भात तपासली जाते. त्यामुळे अर्थव्यवस्थेमध्ये विपुल रोजगारक्षमता असेल तर सापेक्ष अर्थाने कमी पात्रतेच्या व्यक्तीही समाजातील निरनिराळ्या क्षेत्रांत सर्वक्षमतेने काम करू शकतील; पण अर्थव्यवस्थेमध्ये जर रोजगारक्षमताच कमी असेल तर उच्च शिक्षित व्यक्तींनाही रोजगार मिळणे अवघड होऊन बसेल. शिक्षणाचे उद्दिष्ट व्यक्तीला रोजगारपात्र करणे हे आहे, व्यक्तीला रोजगार मिळवून देणे हे नाही, ही महत्त्वाची गोष्ट या ठिकाणी लक्षात घेतली पाहिजे.

## विद्यार्थी-शिक्षक संबंध : वर्तमान परिस्थिती

शिक्षणाची वरील उद्दिष्टे जर मोठ्या प्रमाणात साध्य होत असतील तर विद्यार्थी-शिक्षक संबंध उत्पादक आहेत असे म्हणावयास हरकत नाही. कारण कोणत्याही शिक्षणप्रक्रियेत शिक्षक व विद्यार्थी हे दोन घटक मूलभूत असतात आणि त्यांच्यामधील संबंधांच्या गुणवत्तेवरच वर उल्लेखलेली शिक्षणाची उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य होऊ शकतात, हे अवलंबून असते. भारतातील सध्याची शैक्षणिक परिस्थिती पाहता ही उद्दिष्टे काही किमान प्रमाणात तरी साध्य होऊ शकतात किंवा नाही असा प्रश्न उपस्थित होतो. म्हणजेच ही उद्दिष्टे साध्य करण्यात भारतातील शिक्षणक्षेत्राला विशेष यश आलेले नाही ही गोष्ट उघड आहे. अर्थात हे अपयश केवळ विद्यार्थी-शिक्षक संबंधांच्या असमाधानकारक स्थितीमुळेच निर्माण झालेले आहे असे म्हणणे चुकीचे होईल. विद्यार्थी-शिक्षक संबंधांच्या क्षेत्राच्या बाहेर असणारे अनेक घटक शिक्षणक्षेत्राच्या अनुत्पादकतेला जबाबदार आहेत; पण या घटकांचा प्रतिकूल परिणाम परत विद्यार्थी-शिक्षक संबंधांवर होतो. म्हणून, विद्यार्थी-शिक्षक संबंधांची असमाधानकारक स्थिती हे आजच्या शैक्षणिक दुरवस्थेचे एक प्रमुख कारण आहे, असे म्हटल्यास चूक होणार नाही.

या संदर्भात लेखकाने अनेक प्राध्यापक व विद्यार्थी-गटांशी अनौपचारिक चर्चा केल्या. या चर्चांमधून दोन्ही पक्षांचे विद्यार्थी-शिक्षक संबंधांवरील विचार करण्यास खूपच मदत झाली. त्यामधील काही प्रतिक्रिया प्रथमतःच उद्धृत करतो.

**विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया –** १. शिक्षक नेहमी व्यवहारच पाहतात. काही विचारायला गेले असता वेळ नाही असे सांगतात. २. शिक्षकही माणूस आहे. त्यालाही संसार आहे. त्याला वेळ कमी पडतो. ३. शिक्षकाने चांगले कपडे घातले पाहिजेत. ४. शिक्षकाला आदर दिलाच पाहिजे. त्याचे चूक असेल कसे ? विद्यार्थी-शिक्षक संबंध खराब झाले आहेत, याला शिक्षक जबाबदार नाहीत. ५. शिक्षकांमध्ये शिस्त नाही. ६. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त नाही. ७. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामधील तणाव कमी झाले पाहिजेत. ८. शांतिनिकेतनसारख्या बंधनमुक्त शिक्षणपद्धतीमुळे संबंध सुधारतील. ९. विद्यार्थ्यांना खाजगी शिकवण्यांच्या आधारे विषय शिकता येतो. त्यामुळे

विद्यार्थी-शिक्षक संबंध बिघडतात. १०. इतर मार्गांनी शिक्षकाला पैसा मिळविता येतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना चांगले शिकवण्यात त्यांना रस नसतो. १६. शिक्षक अकार्यक्षम आहेत.

**प्राध्यापकांच्या प्रतिक्रिया** – १. विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडविणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे. २. विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन पातळीवर सामाजिक जाणीव द्यायची काही गरज नाही. ३. शिक्षण आणि विद्यार्थ्यांमध्ये अंतर असलेच पाहिजे. ४. विद्यार्थ्यांनी शिक्षकांशी काही वैयक्तिक प्रश्नांची चर्चा देखील करावयास हरकत नाही. ५. आपले काम म्हणजे केवळ 'पाटया टाकणे' हे आहे. ६. विद्यार्थ्यांना कसे शिकायचे हे शिकविले पाहिजे. ७. सध्याच्या शिक्षणपद्धतीत विद्यार्थ्यांना केवळ नोकरीसाठी तयार केले जाते. ८. एखाद्या शिक्षकाचे विद्यार्थ्यांशी संबंध सुधारले की, व्यवस्थापन व सहकाऱ्यांना ते पाहवत नाही. ९. विद्यार्थी-शिक्षकांमध्ये अनौपचारिक संबंध निर्माण झाले की, विद्यार्थी त्यांचा गैरफायदा घेतात. १०. कॉलेजमधील वातावरण हे समाजामधील वातावरणाचे प्रतिबिंब आहे. ११. शिक्षकांचे पालकांशी संबंध प्रस्थापित होणे आवश्यक आहे. १२. मागासवर्गीय विद्यार्थ्यांबाबत शिक्षक उदासीन आहेत.

विद्यार्थी-शिक्षक संबंधांवर जे घटक प्रतिकूल परिणाम करतात व ज्या घटकांमुळे वर उल्लेखलेली शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करता येत नाहीत, त्या घटकांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

**शिक्षकांजवळ असलेला अपुरा वेळ**– विशेषत: ज्या विद्यापीठांनी सत्रपरीक्षापद्धतीचा स्वीकार केला आहे त्या विद्यापीठांमध्ये ही अडचण प्रामुख्याने दिसून येण्याची शक्यता आहे. सत्रपरीक्षा-पद्धतीमुळे परीक्षांची संख्या वाढते व प्राध्यापकाला प्रत्येक सत्राचा अभ्यासक्रम विशिष्ट काल-मर्यादेत पूर्ण करणे भाग असते. यामुळे औपचारिक शैक्षणिक कार्यातच त्याचा मोठ्या प्रमाणात वेळ जातो. विद्यार्थ्यांचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व शिक्षकाला घडवायचे असेल तर त्यासाठी शिक्षकाच्या डोक्यावर औपचारिक शिक्षणाची जबाबदारी पार पाडण्याचे फार जड ओझे असता कामा नये शिक्षणपद्धतीत औपचारिक भागालाच जर अवास्तव महत्त्व दिले गेले तर त्यामुळे वर उल्लेख-लेली पहिली तीन उद्दिष्टे कधीच साध्य होणार नाहीत. सध्याच्या शिक्षणपद्धतीत औपचारिक शिक्षणक्रमालाच अवास्तव महत्त्व दिले गेले आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्षातील शिक्षकांचा शैक्षणिक संस्थेतील बहुतेक वेळ विद्यार्थ्यांकडून परीक्षेची तयारी करून घेण्यातच जातो व त्यामुळे अभ्यास-माव्यतिरिक्तच्या कार्याला शिक्षकाला पुरेसा वेळ मिळत नाही.

पण याचा अर्थ असा होत नाही की, औपचारिक शिक्षण देण्याचे काम शिक्षणसंस्थेमध्ये अत्यंत कार्यक्षमतेने पार पाडले जात आहे. विद्यार्थ्यांची परीक्षेसाठी चांगल्याप्रकारे तयारी करून घेण्यासाठी त्यांना आवश्यक ती माहिती पुरविणे, इतके औपचारिक शिक्षणाचे मर्यादित उद्दिष्ट ठेवले तर हे काम आहे त्या कालमर्यादेत शिक्षक करीत आहेत असे म्हणता येईल; पण औप-चारिक शिक्षण असले तरी त्याचे उद्दिष्ट इतके मर्यादित ठेवणे हास्यास्पद आहे. यावरून हे स्पष्ट होते की, शैक्षणिक क्षेत्रातील अभ्यासक्रम पूर्ण करण्याची कालमर्यादा हे औपचारिक व अनौप-चारिक शिक्षणाच्या आड येणारे एक प्रमुख कारण आहे. विशेषत: शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वविकासात भाग घ्यावा अशी अपेक्षा असेल तर त्यासाठी विद्यार्थी-शिक्षक संबंधां-मध्ये अनौपचारिकता व जवळीक निर्माण होणे आवश्यक आहे; परंतु विद्यार्थी-शिक्षक संबंधांमध्ये अशा प्रकारची जवळीक निर्माण होण्यासाठी शिक्षकाने अभ्यासक्रमाबाहेर जाण्याची आवश्यकता आहे व त्यासाठी त्याचा औपचारिक शिक्षणामध्ये कमी वेळ जाणे आवश्यक आहे.

**विद्यार्थ्यांची प्रतिकूल मनोवृत्ती**– वर उल्लेख केलेली पहिली तीन उद्दिष्टे साध्य करण्यासाठी

अनौपचारिक शिक्षणावर भर दिला पाहिजे ही गोष्ट स्पष्ट असली तरी या बाबतीत विद्यार्थ्यांचे सहकार्य मिळत नाही, ही गोष्ट देखील नजरेआड करून चालणार नाही. अर्थात या बाबतीत विद्यार्थ्यांना दोष देणे योग्य होणार नाही. कारण, अर्थोत्पादन हे शिक्षणाचे सर्वांत महत्त्वाचे उद्दिष्ट आहे, ही गोष्ट समाजानेच विद्यार्थीवर्गाच्या मनावर बिंबवली असल्याकारणाने औपचारिक शिक्षणाच्या पलीकडे जाता येते व गेले पाहिजे हे सध्याच्या बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या मनोवृत्तीशी विसंगत आहे आणि त्यामुळे शाळा किंवा महाविद्यालयांमधील अनौपचारिक शिक्षणाच्या कार्यक्रमांना विद्यार्थ्यांचा उल्लेखनीय प्रतिसाद कधीच नसतो. त्यामुळे कालमर्यादा लक्षात घेऊनही शिक्षकाने विद्यार्थ्यांशी काही प्रमाणात अनौपचारिक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला तर त्या शिक्षकाला विशेष यश लाभत नाही, असा अनुभव आहे. यामुळे दुर्दैवाने अनेक महाविद्यालयातील निरनिराळ्या संघटनादेखील औपचारिकपणेच काम करीत असतात. या संघटना वस्तुतः महाविद्यालयातील अनौपचारिक शिक्षणाच्या प्रयोगाचा एक अविभाज्य भाग होणे आवश्यक आहे; परंतु त्यांची औपचारिक कार्यपद्धती व त्या कार्यपद्धतीला आलेले कर्मकांडाचे स्वरूप लक्षात घेता या संघटनांद्वारे शिक्षक-विद्यार्थी संबंधांमध्ये अनौपचारिकता निर्माण होते असे म्हणणे कठीण आहे. राष्ट्रीय सेवायोजनेला आलेले अपयश या योजनेचे अध्वर्यूही मान्य करतात. हीच गोष्ट महाविद्यालयातील इतर संघटनांच्या बाबतीतही खरी असते.

केवळ अभ्यासक्रमातील शिक्षणाचा जरी विचार केला तरीही विद्यार्थ्यांची ही मनोवृत्ती स्पष्ट दिसते. अत्यंत हुषार विद्यार्थ्यांचे ध्येयही केवळ परीक्षा उत्तम रीतीने उत्तीर्ण होणे हेच असते. म्हणजे एखादा विषय खरोखर समजून घेण्याची प्रवृत्ती हुषार विद्यार्थ्यांमध्येही आढळत नाही. त्यामुळे बहुतेक विद्यार्थ्यांच्या बाबतीत परीक्षा म्हणजे स्मरणशक्तीचीच परीक्षा असते. विद्यार्थ्यांच्या या प्रतिकूल मनोवृत्तीमुळे शिक्षकही शिक्षकी व्यवसायाकडे मर्यादित भूमिकेतूनच पहात असतात.

**शिक्षकांची शिक्षणाबद्दलची उदासीनता –** ज्याप्रमाणे विद्यार्थीवर्ग हा समाजाचा एक घटक आहे, त्याचप्रमाणे शिक्षकवर्गही समाजाचाच एक घटक आहे ही गोष्ट विसरून चालणार नाही. यामुळे शिक्षकवर्गाच्या वागणुकीतही समाजाच्या गुणदोषांचे प्रतिबिंब पडलेले आहे. ज्याप्रमाणे औपचारिक शिक्षणाच्या पलीकडे जाण्याची विद्यार्थ्यांना गरज वाटत नाही, त्याचप्रमाणे ही गरज आज बहुसंख्य शिक्षकांनाही वाटेनाशी झालेली आहे. किंबहुना अभ्यासक्रमाबाहेर जाऊन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व-विकसनात शिक्षकाने भाग घ्यावा, ही कल्पनाही काही शिक्षकांना मान्य नसते. शिक्षकीपेशा हा एक सेवा-उद्योग आहे असेही काही शिक्षक प्रतिपादन करतात. त्यामुळे शिक्षकांवरच सर्व नीतिमत्तेचा बोजा का, हा या शिक्षकांचा प्रश्न असतो.

अर्थातच औपचारिक शिक्षणाच्या बाहेर जायचे नाकारणाऱ्या शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना सामाजिक जाणीव मिळू शकेल ही अपेक्षा करणे भाबडेपणाचे ठरेल. याच संदर्भात शिक्षकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या इतर प्रतिकूल पैलूंचा विचार करणेही योग्य होईल. शिक्षकवर्ग हाही समाजाचाच एक भाग असल्याने समाजातील परंपरा व रूढी यांचे वर्चस्व शिक्षकाच्याही व्यक्तिमत्त्वावर राहतेच. आणि म्हणून, स्वतः शिक्षकाच्या जीवनातही बुद्धीशिवाय इतर अनेक संदर्भबिंदू तयार होतात. त्यामुळे अर्थातच धर्म, जात, जमात, परंपरा, वर्ग, इत्यादींच्या परिणामांपासून त्यालाही मुक्त होता येत नाही. अर्थातच अशा शिक्षकांकडून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची स्वतंत्र घडण होऊ शकणार नाही. असा शिक्षक विद्यार्थ्यांबरोबर मित्रत्त्वाचे नातेही प्रस्थापित करू शकणार नाही. किंबहुना त्याच्या विषयांच्या मर्यादांमध्येही असा शिक्षक विद्यार्थ्यांच्या चौकस बुद्धीला प्रोत्साहन देणार नाही. प्रत्येक शिक्षकाची मनोवृत्ती अशी नसली तरी भारतीय समाजाच्या परंपराग्रस्ततेचे प्रतिबिंब शिक्षकांच्या मनोवृत्तीतून स्पष्टपणे पडलेले आढळते.

असे रूढीबद्ध शिक्षक स्वतःचे मूल्यांकन करण्यास असमर्थ आणि अनिच्छ असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षकाचे मूल्यांकन करण्याची कल्पनाच त्यांना रुचत नाही. असे शिक्षक अर्थातच विद्यार्थ्यांमध्येही स्वतःचे मूल्यांकन करण्याची पात्रता निर्माण करू शकत नाहीत. यावरून हे स्पष्ट होते की, जर शिक्षकाने विद्यार्थ्यांचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व घडवावे किंवा विद्यार्थ्यांच्या मनात त्याने सामाजिक जाणीव निर्माण करावी किंवा विद्यार्थ्यांमध्ये स्वतःचे मूल्यांकन करण्याची पात्रता निर्माण करावी अशी अपेक्षा असेल तर प्रथमतः शिक्षकाचे स्वतःचे व्यक्तिमत्व तसे असले पाहिजे. तसेच शिक्षणप्रक्रिया व प्रबोधन यावर त्याचा विश्वास असला पाहिजे. आज असे शिक्षक कमी दिसतात. त्यांच्या स्वतःच्या विषयाच्या चौकटीतही व्याख्यान व टीपा-पद्धतीवरच शिक्षक भर देतात. अर्थात यासाठी केवळ शिक्षकालाच दोष देणे अयोग्य होईल. परंतु इतर सर्व घटक अनुकूल धरले तरी किती शिक्षक वर उल्लेखलेली शिक्षणाची पहिली तीन उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न करतील ?

**विद्यार्थ्यांची प्रचंड संख्या–** विशेषतः शहरी भागामध्ये हा घटक फारच महत्त्वाचा होऊन बसला आहे. विद्यार्थ्यांच्या मोठ्या संख्येमुळे विद्यार्थी-शिक्षक संबंधांच्या गुणवत्तेवर खचितच प्रतिकूल परिणाम होतो. या परिणामांची चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल.

**विद्यार्थी-शिक्षक संबंधातील औपचारिकतेत भर –** शिक्षक-विद्यार्थी यांचे प्रमाण जर प्रतिकूल असेल तर त्यामुळे अर्थातच विद्यार्थी-शिक्षक संबंधांमध्ये आधिकाधिक औपचारिकता निर्माण होते. शिक्षकाला विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष पुरविणे किंवा किमान आवश्यक तेवढे तरी लक्ष पुरविणेही अवघड जाते. ही औपचारिकता उत्तरपत्रिकांच्या मूल्यांकनातही दिसते. विद्यार्थी-संख्या कमी असेल तर शिक्षकाला उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन केव्हाही अधिक चांगल्याप्रकारे करता येते. एवढेच नव्हे तर विद्यार्थ्याला त्याच्या उत्तरपत्रिकेच्या साहाय्याने त्याच्या चुका समजावून सांगता येतात. परंतु विद्यार्थ्यांच्या अत्यंत मोठ्या संख्येमुळे उत्तरपत्रिका तपासणे म्हणजे केवळ नाटक होऊन बसते. काही महाविद्यालयात विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका परत देणेही जमत नाही. यामुळे उत्तरपत्रिकेवर आवश्यक ते शेरे मारण्याचे बंधनही शिक्षकांवर राहात नाही.

अर्थात याचा अर्थ असा मुळीच होत नाही की, विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली की, विद्यार्थी-शिक्षक संबंध लगेच अनौपचारिक होऊ लागतील. मानसशास्त्र, तत्त्वज्ञान किंवा यांसारख्या विषयांच्या बाबतीत विद्यार्थी-संख्या कमी असते. पण तेथेही संबंध फार अनौपचारिक असतात असे दिसत नाही. अर्थात विद्यार्थी-शिक्षक संबंध अनौपचारिक असणे आवश्यक आहेच का, असा मूलभूत प्रश्नही या ठिकाणी उपस्थित केला जाण्याचा संभव आहे. परंतु विद्यार्थी-शिक्षक संबंधांमधील अनौपचारिकता हा शब्दप्रयोग या ठिकाणी मर्यादित अर्थानेच वापरला आहे, हे येथे स्पष्ट केले पाहिजे. विद्यार्थी व शिक्षकांमध्ये त्यांच्या विषयाच्या संबंधात व काही प्रमाणात त्यांच्या विषयाबाहेरही वारंवार चर्चा व वादविवाद व्हावेत आणि हे वादविवाद विचारविनिमयाच्या स्वरूपात व्हावेत, या मर्यादित अर्थाने 'अनौपचारिक' हा शब्दप्रयोग येथे वापरण्यात आला आहे, हे सुरुवातीस सांगितलेच आहे.

**अंतर्गत व्यवस्थापनाचा प्रश्न –** वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या वाढली की, आपोआपच वर्गातील अंतर्गत व्यवस्थापन अधिकाधिक कठीण होत जाते. यातूनच विद्यार्थ्यांमधील बेशिस्तपणाचे प्रश्न उद्‌भवतात. शिक्षकांच्या मर्यादित वेळेपैकी अधिकाधिक भाग वर्गातील अंतर्गत व्यवस्थापनावरच खर्च होऊ लागतो. वर्ग मोठे होऊ लागले की, अर्थातच झुंडप्रवृत्ती (mob-psychology) ला प्रोत्साहन मिळते. यामुळे चांगल्या शिक्षकाची व्याख्याच बदलते. या नव्या घटकांना यशस्वीपणे तोंड देण्यासाठी शिक्षकाला स्वतःचे मूल्यांकन वेगळ्या दृष्टीकोनातून करणे भाग पडते. त्यामुळे विषयाची खोली किंवा मांडणीची पात्रता हे चांगल्या शिक्षकाचे गुण बऱ्याच वेळेस मागे

पडतात; व शिक्षकाचे वक्तृत्व, शिक्षकाची भाषा, त्याचे वरपांगी व्यक्तिमत्त्व व वर्गामध्ये शिस्तीचे वातावरण ठेवण्याची त्याची पात्रता या कमी गुणांना अधिक महत्त्व येऊ लागते. या सर्व घटकांमुळे शैक्षणिक क्षेत्राबद्दल खऱ्या अर्थी कार्यक्षम शिक्षकांना तिटकारा वाटल्यास नवल नाही.

वर्गातील बेशिस्तपणावर नियंत्रण घालण्याच्या पात्रतेला महत्त्व येऊ लागले की, शिक्षक या दृष्टीकोनातूनच काम करू लागतो. याचा परिणाम साहजिकच व्याख्यान व टीपा-पद्धतीवर भर देण्यामध्ये होतो. कित्येक शिक्षकांना या पद्धती मान्य नसूनही त्यांना या पद्धतींचे अवलंबन करावे लागते. यामुळे अर्थातच विद्यार्थी-शिक्षक संबंधांमध्ये यांत्रिकपणा येऊ लागतो.

**शिक्षकाच्या बेजबाबदार वृत्तीला वाव** – विद्यार्थ्यांची संख्या वाढली की स्वतःच्या कामाकडे गंभीरतेने न पहाण्याची प्रवृत्ती शिक्षकांमध्ये निर्माण होते. यामुळे खऱ्या अर्थाने शिक्षक म्हणून शिक्षकाच्या जबाबदारीत घट होते. उत्तरपत्रिकांच्या मूल्यांकनात हलगर्जीपणा निर्माण होतो व शिक्षक सर्व कामे यांत्रिक पद्धतीने करत राहतो. अनेक शिक्षक तास घेणे याला 'पाट्या टाकणे' हा शब्दप्रयोग वापरतात किंवा शिक्षकाचा पेशा हा एक 'सेवा-उद्योग' आहे असे म्हणतात यामागील मुख्य कारण विद्यार्थ्यांची महाविद्यालयांमधील प्रचंड संख्या हेच आहे.

**शिक्षक-व्यवस्थापन तणाव** – शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनातील व्यक्तींच्या शिक्षक व शिक्षणाबद्दलच्या दृष्टीकोनाचा विद्यार्थी-शिक्षक संबंधांवर निश्चितच परिणाम होतो. अनेक महाविद्यालयांमधून प्राध्यापक व व्यवस्थापन यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणावर तणाव आढळतात. अनेक शिक्षणसंस्थांचा कारभार एकाधिकारशाही मार्गाने चालतो. तर पुष्कळ शिक्षणसंस्थांच्या व्यवस्थापनात जातीयवादी प्रवृत्ती आढळते. या शिक्षणसंस्थांमध्ये घेतलेले निर्णयही त्यामुळे लोकशाही मार्गाने घेतले जातात असे आढळून येत नाही. विशेषतः शिक्षकाला नोकरीमध्ये असुरक्षित ठेवण्याचा प्रघात अनेक महाविद्यालयांमध्ये आढळतो. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी आवश्यक कार्य करण्यास शिक्षकाला प्रोत्साहन मिळत नाही. याचे कारण म्हणजे बहुसंख्य महाविद्यालयांनी आपले कार्यक्षेत्र औपचारिक शिक्षणापुरतेच मर्यादित ठेवले आहे, आणि औपचारिक शिक्षणाच्या बाबतीतही व्यवस्थापनाचा दृष्टिकोन फार रचनात्मक असतो असे म्हणता येत नाही.

शिक्षक व व्यवस्थापक अशा दोन बाजू बहुतेक शिक्षणसंस्थांमध्ये निर्माण झाल्यामुळे या शिक्षणसंस्थांमध्ये व्यवस्थापनाच्या बाजूचे व विरुद्ध असे शिक्षकांमध्ये दोन गटही पडल्याचे दिसते. त्यामुळे बहुतेक शिक्षणसंस्थांमध्ये गट-राजकारण आपोआपच निर्माण होते. त्यामुळे शिक्षक आपली शक्ती बऱ्याच वेळेस स्वेच्छेने किंवा अनिच्छेने गट-राजकारण खेळण्यातच खर्च करतो. या सर्व वातावरणात आदर्श विद्यार्थी-शिक्षक संबंधाची कल्पना मागे पडते.

वर उल्लेख केल्याप्रमाणे अनेक शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापनात विद्यार्थी-कल्याणाबाबतच्या विधायक किंवा रचनात्मक कल्पनांचा अभाव आढळतो. विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडविण्यात शैक्षणिक संस्था उपयुक्त काम करू शकतात, ही भूमिका शिक्षणसंस्थांमध्ये अजून रुजलेली नाही आणि म्हणूनच वर पाहिल्याप्रमाणे व्यवस्थापनाकडून शिक्षकवर्गास अशा प्रकारचे विधायक कार्य करण्यास प्रोत्साहन मिळत नाही.

शिक्षणसंस्थांच्या व्यवस्थापनातील एकाधिकारशाही दृष्टिकोन भारतीय समाजाच्या गुणविशेषांशी सुसंगत असाच आहे. भारतीय समाजरचनेवरील धर्मश्रद्धांचा पगडा व त्यातून निर्माण झालेली जातिव्यवस्था किंवा इतर सामाजिक प्रश्न यांकडे पाहिले असता भारतीय समाजरचनेमधील लोकशाहीविरोधी प्रक्रिया स्पष्ट होतात. भारतात विविध क्षेत्रात ज्या संस्था उल्लेखनीय कार्य करीत आहेत त्या संस्थांच्या मागे एका कोणत्या तरी व्यक्तीचाच प्रभाव प्रामुख्याने आहे

असे दिसते. म्हणून असे म्हणतात की, भारतामध्ये थोर व्यक्ती निर्माण झाल्या आहेत; पण समाजाचे खऱ्या अर्थाने लोकशाहीकरण होण्यासाठी आवश्यक असलेल्या संस्था मात्र निर्माण झाल्या नाहीत. त्याचेच प्रतिबिंब शिक्षण-संस्थांमध्येही पडलेले दिसते. अर्थातच अशा संस्थांमध्ये आदर्श विद्यार्थी-शिक्षक संबंध आढळणार नाहीत. कारण, या संस्थांच्या प्रशासनामधील दोन थरांचे प्रतिबिंब या संस्थांच्या शैक्षणिक कार्यातही पडलेले दिसते.

**शिक्षकांची व विद्यार्थ्यांची सामाजिक व आर्थिक प्रतिष्ठा** – ग्रामीण भागातील शिक्षक व प्राध्यापक शिक्षणसंस्थेच्या बाहेरही मोठ्या प्रमाणावर ओळखले जातात. अनेक ग्रामीण भागांमधील शिक्षणसंस्थांवर काही प्रतिष्ठित व्यक्तींचे किंवा गटांचे किंवा जातींचे वजन असते, असे दिसून येते. अशा परिस्थतीत त्या शिक्षणसंस्थांमधील शिक्षक किंवा इतर कर्मचाऱ्यांना काही प्रतिष्ठित व्यक्तींच्या, गटांच्या किंवा जातींच्या दबदब्याखाली रहावे लागते. शहरांमधील महाविद्यालयांमध्ये ही गोष्ट त्या शिक्षणसंस्थांपुरतीच मर्यादित राहते; पण ग्रामीण भागांमध्ये शिक्षणसंस्थांमधील ही एकाधिकारशाही शिक्षणसंस्थांच्या मर्यादेत रहात नाही. यामुळे अर्थातच या एकाधिकारशाहीचा शिक्षकांच्या सामाजिक प्रतिष्ठेवर व त्यामुळे विद्यार्थी-शिक्षक संबंधांवरही प्रतिकूल परिणाम होतो.

शहरी विभागातील महाविद्यालयांमध्येही प्राध्यापक कधी कधी विद्यार्थ्यांच्या आर्थिक व सामाजिक पार्श्वभूमीची स्वतःच्या पार्श्वभूमीशी तुलना करताना आढळतात व त्याचा परिणाम विद्यार्थीवर्गातील निरनिराळ्या घटकांना शिक्षकांकडून वेगवेगळ्या प्रकारची वागवणूक मिळण्यात होतो. शहरी महाविद्यालयांमध्ये सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांमधील विद्यार्थ्यांची संख्या दुर्लक्षणीय नसते; पण ही महाविद्यालये या घटकांसाठी विशेष प्रयत्न करीत आहेत असे मात्र दिसत नाही. शहरी महाविद्यालयांमध्ये संपन्न व कमकुवत असे विद्यार्थ्यांचे दोन गट स्पष्टपणे दिसतात. विशेषतः ग्रामीण भागांमधून आलेले विद्यार्थी शहरी वातावरणात एकदम सामावले जात नाहीत. या विद्यार्थ्यांना इंग्रजीचीही अडचण भासते. अशा मागासलेल्या विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी लक्षात घेऊन त्यांच्यासाठी औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणाचे मुद्दाम प्रयत्न करणे आवश्यक आहे; पण असे प्रयत्न आज होत आहेत असे दिसत नाही. याचे एक कारण म्हणजे या वर्गासाठी महाविद्यालयाने काही विशेष प्रयत्न केले तर त्याचा महाविद्यालयाची प्रतिष्ठा वाढवण्यासाठी काहीच उपयोग होत नाही. कारण या वर्गासाठी कितीही प्रयत्न केले तरी हे विद्यार्थी विशेष यश केवळ अपवादात्मकरीत्याच संपादन करू शकतात. त्यामुळे असे दिसते की, शिक्षणसंस्थेची साधनसंपत्ती ही बहुधा हुषार विद्यार्थ्यांवरच अधिक खर्च होते. हुषार मुलांवर परिश्रम घेतले तर त्यांच्या विशेष यशसंपादनामुळे शिक्षणसंस्थेच्या नावाला प्रसिद्धी मिळू शकते. शहरी भागातील शाळांच्या बाबतीत तर हे स्पष्टपणे दिसते; परंतु यामुळे मागासलेल्या जातीजमातींच्या किंवा ग्रामीण विद्यार्थी व शिक्षक यांच्यामध्ये कधीच जवळीक निर्माण होत नाही. शिक्षणसंस्थेमधील शिक्षकांच्या पात्रतेचा फायदा सर्व विद्यार्थ्यांना मिळू शकत नाही.

**विद्यार्थी व शिक्षकांची अपरिपक्व मनोवृत्ती** – विद्यार्थी-शिक्षक संबंधांमध्ये अनौपचारिकता व जवळीक निर्माण करण्यासाठी विद्यार्थी व शिक्षक या दोघांच्याही मनोवृत्तीत परिपक्वता असावी लागते. काही शिक्षकांच्या दृष्टिकोनातून भारतीय विद्यार्थी व शिक्षक या दोघांनाही अनौपचारिक विद्यार्थी-शिक्षक संबंधांना आवश्यक असणारी मनोवृत्तीतील परिपक्वता आलेली नाही. यामुळे विद्यार्थी-शिक्षक संबंधामधील अनौपचारिकतेचे दुष्परिणामच होतील असे मत व्यक्त केले जाते. असे अपरिपक्व मनोवृत्तीचे विद्यार्थी व शिक्षक यांच्यामध्ये जवळीक निर्माण झाली तर त्याचा परिणाम विद्यार्थ्याने शिक्षकांकडून अनेक प्रकारच्या गैरसवलती मागण्यातच

होतो व त्यामुळे आहेत ते विद्यार्थी-शिक्षक संबंध अधिकच अनुत्पादक होतात असे दिसते. विशेषतः सत्रपरीक्षापद्धतीतील अंतर्गत चाचणीच्या बाबतीत विद्यार्थी-शिक्षक संबंधांमधील अनौपचारिकतेचा असा गैरफायदा घेतला जाऊ शकतो.

### विद्यार्थी-शिक्षक संबंधांमध्ये सुधारणा करण्यासाठी काही सूचना

पहिल्या भागात शिक्षणाची जी व्यापक उद्दिष्टे पाहिली आणि दुसऱ्या भागात ही व्यापक उद्दिष्टे साध्य का होत नाहीत याची विद्यार्थी-शिक्षक संबंधांच्या संदर्भात जी कारणमीमांसा केली, त्याच्याच आधारे विद्यार्थी-शिक्षक संबंधांमध्ये सुधारणा करण्यासाठी ज्या सूचना करता येतील त्यांचा विचार पुढे केला आहे.

**कालमर्यादेच्या संदर्भात अभ्यासक्रमांची पुनर्रचना** – शिक्षणाची वर उल्लेखलेली चारही उद्दिष्टे साध्य करायची असतील तर शिक्षकाला त्याच्या विषयाचा अभ्यासक्रम त्याला दिलेल्या कालमर्यादेत व्यवस्थितपणे संपवता आला पाहिजे. म्हणजेच एखादा विषय व तो समजावून सांगण्यासाठी लागणाऱ्या व्याख्यानांची संख्या यांच्यामध्ये सुसंगती असली पाहिजे. यासाठी अभ्यासक्रमाची पुनर्रचना करावी लागेल किंवा शिक्षकांना द्याव्या लागणाऱ्या व्याख्यानांच्या संख्येत वाढ करावी लागेल. यामध्ये विषयानुसार लवचिकता ठेवावी लागेल. कोणता अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी किती व्याख्यानांची आवश्यकता लागेल यासंबंधीचे निर्णय त्या त्या महाविद्यालयाला घेता येतील.

**अनौपचारिक शिक्षणावर भर –** पहिली तीन उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शिक्षण-संस्थांना अनौपचारिक शिक्षणावर मोठ्या प्रमाणात भर द्यावा लागेल. महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या ज्या निरनिराळ्या संघटना चालविल्या जातात, त्या संघटनांचे काम अधिक गांभीर्याने करण्याचे प्रयत्न महाविद्यालयांना करावे लागतील. आज महाविद्यालयांची प्रतिष्ठा किती विद्यार्थी परीक्षेत उत्तम यश मिळवितात यावर बहुतांशी अवलंबून असते. त्यामुळे आज सर्व महाविद्यालयीन शिक्षणामध्ये औपचारिक शिक्षणाला अवास्तव महत्त्व देण्यात आले आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे अनौपचारिक शिक्षणाच्या कोणत्याही प्रयोगाला विद्यार्थी किंवा प्राध्यापक यांच्याकडून योग्य तो प्रतिसाद मिळत नाही. उदाहरणार्थ, राष्ट्रीय सेवायोजनेतील अंगभूत दोष जरी वगळले तरी या योजनेमध्ये असलेले किंवा नसलेले विद्यार्थी व प्राध्यापक या सर्वांचीच या योजनेबद्दल उदासीनता दिसून येते. इतर संघटनांच्या बाबतीतही हे कमी-अधिक प्रमाणात खरे आहे.

औपचारिक व अनौपचारिक शिक्षणप्रक्रिया एकमेकांविरुद्ध आहेत असा मात्र याचा अर्थ होत नाही. औपचारिक शिक्षणक्रमातील अभ्यासक्रमांनाच पूरक असे अनेक कार्यक्रम महाविद्यालयांना हाती घेता येतील. उदाहरणार्थ, अर्थशास्त्राच्या किंवा व्यवस्थापनाच्या वर्गात केवळ व्याख्याने देण्याऐवजी एखाद्या कारखान्याला मुलांची भेट आयोजित करता येईल. किंबहुना ही भेट औपचारिक अभ्यासक्रमाचाच एक भाग होऊ शकेल. अशा प्रकारचे उपक्रम महाविद्यालयांमध्ये सध्या होत नाहीत असे नाही; परंतु या उपक्रमांवर सध्या कमी भर आहे किंवा अनेक वेळा हे उपक्रम केवळ उपचार म्हणून पार पाडले जातात. जर महाविद्यालयांनी अनौपचारिक शिक्षणात स्वतंत्र किंवा पूरक प्रयोगांची यशस्वीपणे अंमलबजावणी केली तर त्यामुळे विद्यार्थी-शिक्षक संबंध निश्चितच अधिक उत्पादक (productive, fruitful, useful) होऊ शकतील.

**विद्यार्थी व शिक्षक यांचे प्रबोधन–** अनौपचारिक शिक्षणक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी विद्यार्थी व शिक्षक या दोन्ही घटकांचे उत्स्फूर्त सहकार्य अपेक्षित आहे. अनौपचारिक शिक्षणक्रमात विद्यार्थी व शिक्षक यांच्यामध्ये जवळीक निर्माण होते व या अनौपचारिकतेसाठी विद्यार्थी व शिक्षक

२५

यांची मनोवृत्ती परिपक्व असणे आवश्यक आहे याचा उल्लेख वर केला आहेच. शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये जवळीक असावी या दृष्टिकोनाचे प्रयोजन दोन्ही घटकांना समजणे अत्यंत आवश्यक आहे. कारण विद्यार्थी-शिक्षक संबंधामधील अनौपचारिकतेची इष्टानिष्टता त्या अनौपचारिक संबंधांमधून निर्माण होणाऱ्या फलितांवर अवलंबून आहे. विद्यार्थी-शिक्षक संबंधांमध्ये केवळ अनौपचारिकतेसाठी अनौपचारिकता आणायचा प्रयत्न केला तर त्याचेही अनिष्ट परिणाम होतील. यासाठी अर्थातच विद्यार्थी आणि शिक्षकवर्ग या दोन्ही गटांचे विद्यार्थी-शिक्षक संबंधांबाबत प्रबोधन करावे लागेल. या दोन्ही घटकांच्या शिक्षणव्यवस्थेबद्दलच्या दृष्टिकोनामध्ये आमूलाग्र बदल करावे लागतील. म्हणून अनौपचारिक शिक्षणक्रमाच्या अंमलबजावणीकडे केवळ प्रशासकीय दृष्टिकोनातून पाहून चालणार नाही, तर त्यासाठी विद्यार्थी व शिक्षकवर्गाच्या विचारात बदल करावे लागतील. दुसऱ्या शब्दांत, या संदर्भात शिक्षकाचे शिक्षण करावे लागेल; परंतु यासाठी विद्यार्थी-शिक्षक संबंधांवर शैक्षणिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात चर्चा होणे आवश्यक आहे आणि अशा चर्चा किंवा वादविवादांमध्ये शिक्षणसंस्थांच्या प्रमुखांचा सक्रीय सहभाग असला पाहिजे. शिक्षक व विद्यार्थीवर्गाच्या या प्रबोधनामुळेच विद्यार्थी व शिक्षकांची अनौपचारिक शिक्षणप्रक्रियेबद्दलची उदासीनता कमी करता येईल.

**विद्यार्थी-संख्येचा प्रश्न–** महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या प्रचंड संख्येमुळे विद्यार्थी-शिक्षक संबंधांमधील औपचारिकता, वर्गातील व्यवस्थापनाचे प्रश्न व शिक्षकांचा हलगर्जीपणा हे तीन प्रश्न उद्‌भवतात हे वर पाहिले. या तिन्ही प्रश्नांचे मूळ लोकसंख्येचा प्रश्न व अर्थव्यवस्थेतील रोजगारक्षमतेचा प्रश्न यामध्ये आहे. या दोन मूळ प्रश्नांवरील उपायांची चर्चा प्रस्तुत निबंधाच्या मर्यादेत करता येणार नाही. लोकसंख्येच्या समस्येचा परिणाम अर्थव्यवस्थेतील सर्व क्षेत्रांवर होत असतो; परंतु लोकसंख्यावाढीच्या मानाने अर्थव्यवस्थेची रोजगारक्षमता मात्र वाढू शकत नसल्याने महाविद्यालयीन शिक्षणाकडे रोजगाराला एक पर्याय म्हणून पाहण्यात येते. यामुळे साहजिकच महाविद्यालयातील विद्यार्थी-संख्येत वाढ होत जाते व त्यामुळे वर उल्लेखलेले प्रश्न निर्माण होतात.

शिक्षणसंस्थांवरील विद्यार्थीसंख्येचे दडपण कमी व्हावे यासाठी लोकसंख्या कमी झाली पाहिजे किंवा अर्थव्यवस्थेची रोजगारक्षमता वाढली पाहिजे, हे अर्थातच दीर्घ मुदतीचे उपाय झाले. तावडतोबीच्या दृष्टिकोनातून पुढील सूचना करता येईल :

विद्यार्थ्यांच्या मानाने शिक्षकांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. हे प्रमाण वाढविल्यास विद्यार्थी-शिक्षक संबंध सुधारण्यास खूपच मदत होईल. एका वर्गात कोणत्याही परिस्थितीत ४० पेक्षा अधिक विद्यार्थी असता कामा नयेत. यासाठी शिक्षकांचे प्रमाण वाढविले पाहिजे. कमीत कमी उत्तरपत्रिकांचे ओझे शिक्षकांवर पडू नये म्हणून प्रपाठक (Reader) तरी नेमणे आवश्यक आहे. यासाठी अर्थातच शासनाला वित्तीय बोजा उचलावा लागेल.

जर मोठ्या वर्गाचे लहान लहान गट पाडून शिक्षकांनी या गटांशी विषयासंबंधी किंवा विषयबाह्य नियमित चर्चा केली तर त्यामुळे विद्यार्थी-शिक्षक संबंधांमधील औपचारिकता कमी होण्यास बरीच मदत होऊ शकेल. अर्थात हे जर संपूर्ण महाविद्यालयासाठी करावयाचे ठरविले तर या योजनेच्या प्रशासकीय सुलभतेचाही विचार करावा लागेल. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांना अशा योजनेसाठी अधिक वेळ द्यावा लागेल, ही गोष्ट येथे लक्षात घेणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांच्या मोठ्या प्रमाणावरील संख्येमुळे वर्गात बेशिस्तपणाचे वातावरण निर्माण होऊ शकते व त्यामुळे वर्गातील व्यवस्थापन कठीण होते, हे वर पाहिलेच आहे. जोपर्यंत विद्यार्थ्यांची वर्गातील संख्या मोठ्या प्रमाणावर कमी होत नाही, तोपर्यंत या परिस्थितीत बदल करता यायचा नाही. विद्यार्थी स्वतः व्यक्तिशः बेशिस्त असतो, हे बेशिस्तीचे कारण नसून तो वर्गातील झुंड-

प्रवृत्तीमुळे बेशिस्त वागतो हे आहे. म्हणून सध्याच्या परिस्थितीत तरी दुर्दैवाने शिक्षकाला या प्रवृत्तीशी सामना करणे भाग पडणार आहे व त्यामुळे वक्तृत्वकला किंवा इतर वरपांगी गुणांनाच त्याला महत्त्व द्यावे लागणार आहे. अर्थात, हा प्रश्न केवळ विद्यार्थीसंख्येचा नसून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचापण आहे.

**शिक्षणसंस्थांचे लोकशाहीकरण–** विद्यार्थी-शिक्षक संबंधांच्या विकासात शिक्षक आणि व्यवस्थापन यांच्यामधील तणाव येणार नाहीत, यासाठी शिक्षणसंस्थांचे लोकशाहीकरण होणे आवश्यक आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे आज अनेक शिक्षणसंस्थांवर विशिष्ट जातींचे, गटांचे किंवा व्यक्तींचे वर्चस्व आहे. वस्तुतः शिक्षणक्षेत्रात स्वतःचे मत मांडण्याचे स्वातंत्र्य इतर कोणत्याही क्षेत्रापेक्षा अधिक प्रमाणात असावयास पाहिजे; परंतु प्रत्यक्षात शिक्षकांच्या दृष्टिकोनाला व्यवस्थापन विशेष महत्त्व देत नाही. यासाठी शिक्षकांनीच एकत्र येऊन संघर्ष करणे आवश्यक आहे. या संघर्षाच्या यशामुळे कालान्तराने का होईना विद्यार्थी-शिक्षक संबंधावर निश्चितच हितकारक परिणाम होतील; निदान व्हावेत.

**मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रयत्न–** सामाजिकदृष्टचा मागासलेल्या वर्गांसाठी शहरी किंवा ग्रामीण महाविद्यालयांमधून विशेष प्रयत्न होणे आवश्यक आहे. महाविद्यालयांमध्ये अनुसूचित जातींमधून बऱ्याचशा प्रमाणात विद्यार्थी येत असतात. या विद्यार्थ्यांची एकंदरीत पार्श्वभूमी लक्षात घेता, त्यांच्यासाठी शिक्षकवर्गाने मुद्दाम प्रयत्न करणे आवश्यक आहे. किंबहुना या वर्गाचे प्रश्न समजावून घेण्यासाठी महाविद्यालयात प्राध्यापक व विद्यार्थी यांची एक समिती असणे आवश्यक आहे. या संदर्भात प्राध्यापक व विद्यार्थी या दोघांची वेगवेगळी पार्श्वभूमी लक्षात घेणे आवश्यक आहे व त्या दृष्टिकोनातून त्या दोघांमध्ये समन्वय साधण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. बऱ्याच वेळा मागासवर्गीय किंवा ग्रामीण विद्यार्थी महाविद्यालयातील प्राध्यापकांकडे भीतियुक्त आदराने पहात असतात. त्यांचा हा बुजरेपणा शिक्षकवर्गच घालवू शकेल. यासाठी महाविद्यालयातील निरनिराळ्या संघटनांना ग्रामीण व दलित विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर त्या विद्यार्थ्यांच्या सहभागाने चर्चा व वादविवाद घडवून आणावे लागतील.

**औपचारिक शिक्षणपद्धतीत सुधारणा–** महाविद्यालयात शिकविण्यात येणाऱ्या विषयांचे शिक्षण अधिक अर्थपूर्ण करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. यासाठी महाविद्यालयीन पातळीवर विद्यार्थी-शिक्षक संबंधांच्या विकासात जे घटक अडथळा आणतात, ते घटक लक्षात घेऊन नवीन शिक्षणतंत्रे उपलब्ध करता येतील का, याचा विचार झाला पाहिजे. जर अशा प्रकारची काही तंत्रे उपलब्ध झाली, तर महाविद्यालयीन शिक्षकांसाठी सुटीच्या काळात प्रशिक्षणवर्ग काढून शिक्षणप्रक्रियेची गुणवत्ता सुधारता येईल. अर्थात हे प्रशिक्षणवर्ग केवळ उपचार म्हणून राबविले जाण्याची शक्यता आहे. तो धोका टाळला पाहिजे.

## भविष्यातील विद्यार्थी-शिक्षक संबंध

विद्यार्थी-शिक्षक संबंधांच्या विकासात अडथळा आणणारे सर्व घटक लक्षात घेता विद्यार्थी-शिक्षक संबंधांबाबत भविष्यातील परिस्थिती फार आशादायक आहे असे म्हणता येणार नाही. त्याचप्रमाणे महाविद्यालयीन पातळीवरील शिक्षणप्रक्रिया सुधारावी यासाठी करण्यात येणारे प्रयत्न मूळ समस्येला स्पर्श करत नाहीत असे दिसते. उदाहरणार्थ, सत्रपरीक्षापद्धती ज्या प्रकारे राबविण्यात येते ती पद्धती सत्रपरीक्षापद्धतीच्या उद्दिष्टांशी संपूर्णपणे विसंगत आहे असे दिसते. यामुळे सत्रपरीक्षापद्धतीने शिक्षणाची गुणवत्ता वाढण्याऐवजी कमीच होत आहे, हे प्राध्यापक, विद्यार्थी आणि शिक्षण-प्रशासक हे सर्वच मान्य करतात.

एका बाबतीत विद्यार्थी-शिक्षक संबंधांच्या इष्ट विकासाला अनुकूल परिस्थिती निर्माण होते

आहे असे वाटते. शिक्षक-प्राध्यापक यांच्या संघटना अधिक सामर्थ्यवान होत चालल्या आहेत असे दिसते. त्यामुळे शिक्षक-व्यवस्थापन तणाव हा विद्यार्थी-शिक्षक संबंधांवर प्रतिकूल परिणाम करणारा घटक कमी महत्त्वाचा होईल असे वाटते. तसेच या संघटनांनी अधिक बळकट झाल्यावर शिक्षकांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न केल्यास शिक्षणक्षेत्रात भविष्यामध्ये या संघटनांची केवळ संघर्षात्मक भूमिका न राहता विधायक भूमिकाही राहील अशी आशा वाटते. शिक्षणक्षेत्रातील प्रश्नांवर उपाययोजना शोधण्यासाठी केवळ शिक्षकांनी प्रयत्न करून चालणार नाही, तर त्यासाठी शिक्षणक्षेत्रातील निरनिराळ्या घटकांना प्रयत्न करावे लागतील. या दृष्टिकोनातून एक प्रयोग म्हणून 'शैक्षणिक परिवार' या कल्पनेचे स्वागत करण्यास हरकत नाही.

# १९ महाराष्ट्रातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची आंदोलने

विलास चाफेकर

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर आजतागायत महाराष्ट्रात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची लहानमोठी अनेक आंदोलने झाली. विशेषतः १९७१ ते १९७५ या काळात बरीच आंदोलने झाली. या आंदोलनांचा प्रत्यक्ष अभ्यास केला असता विद्यार्थ्यांच्या मूळ समस्या कोणत्या होत्या, आंदोलनामागील प्रेरणा कोणत्या होत्या, उद्दिष्टे कोणती होती, त्यातून काय निष्पन्न झाले, विद्यार्थ्यांच्या असंतोषाची कारणे कोणती होती, इत्यादींची माहिती मिळू शकते. म्हणजे प्रश्न, असंतोष, आंदोलने यांचा परस्पर संबंध कळण्यासाठी या अभ्यासाचा उपयोग होईल.

या लेखात ज्या आंदोलनांचा उल्लेख केला आहे त्या आंदोलनांची प्रत्यक्ष माहिती प्रस्तुत लेखकास आहे, कारण त्यातील अनेक आंदोलनांच्या काळात एक अभ्यासक या नात्याने लेखक तिथे गेलेला होता. आंदोलनांशी संबंधित विविध घटकांना भेटून माहिती गोळा केली होती. सर्वच आंदोलनांच्या संदर्भात विद्यापीठाने वा शासनाने अधिकृत चौकशी करून तयार केलेले अहवाल उपलब्ध झाले असे नाही. कारण सर्वच आंदोलनांची अधिकृत चौकशी झाली असे नाही व त्यावेळी ते अहवाल लगेच तयार होणेही शक्य नव्हते. म्हणून आंदोलनांच्या विविध बाजू समजून घेण्यासाठी विविध व्यक्ती, संस्था, संघटना व स्थानिक आणि राज्यपातळीवरील मराठी भाषेतील वृत्तपत्रे यांचा आधार घेतला. अ-मराठी भाषेतील व भारतीय स्तरावरील वृत्तपत्रे आंदोलन उग्र झाल्यावाचून त्याची फारशी दखल घेत नसल्याने त्यांचा फारसा उपयोग करून घेतलेला नाही. जास्तीत जास्त परिपूर्ण माहिती जमा करून अधिकात अधिक सत्य ज्या आंदोलनांच्या संदर्भात मिळाले त्यांचीच माहिती प्रस्तुत लेखात दिली आहे. तरीही संपूर्ण सत्य समजले असा दावा करता येणार नाही.

प्रस्तुत लेखाच्या मर्यादेचा विचार करता केवळ दहा आंदोलनांची अगदी थोडक्यात माहिती दिलेली आहे. मात्र ही दहा आंदोलने महाराष्ट्रातील निरनिराळ्या विद्यापीठांच्या क्षेत्रात झालेली असल्याने त्यातून एकूण महाराष्ट्राचे चित्र डोळ्यासमोर येण्यास मदत होईल.

### १. सामूहिक कॉपी प्रकरण

(नागपूर विद्यापीठ, मार्च–एप्रिल १९७२)

१९७२ च्या मार्च-एप्रिल महिन्यात घेण्यात आलेल्या नागपूर विद्यापीठाच्या परीक्षेत नागपूर-मधील जवळजवळ सर्वच केंद्रात सामूहिक कॉपी झाली. जवळ जवळ सर्व विद्यार्थ्यांनी कॉपी केली. पर्यवेक्षकांनी कॉपी करणाऱ्यांकडे कानाडोळा केला किंवा त्यांना प्रोत्साहन दिले. या प्रकाराची

वृत्तपत्रांमार्फत जाहीर वाच्यता झाल्यावर मेडिकल कॉलेजच्या डीननी कॉपी प्रकरणातील विद्यार्थ्यांना प्रवेश कसा द्यावा, याबाबतची अडचण स्पष्ट केली. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी झाली व सामूहिक कॉपी झाल्याचे उघडकीस आले. तेव्हा त्यावेळचे कुलगुरु डॉ. वि. भि. कोलते यांनी फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. फेरपरीक्षा घेण्यास विद्यार्थी नेत्यांनी आक्षप घेतला. कॉपी हे प्रस्थापित जुनाट शिक्षणपद्धती व परीक्षा पद्धती यांचा निषेध करण्याचे साधन आहे, अशी तात्त्विक भूमिका त्यांनीं मांडली. कुलगुरूंना घेराव घातला. न्यायालयात धाव घेतली परंतु न्यायालयाने कुलगुरूंचा अधिकार मान्य केला. पोलिसांनी दंगल करणाऱ्या विद्यार्थ्यांना अटक केली. याचवेळी विद्यार्थ्यांना प्रस्तुत प्रकरणात पाठिंबा देणाऱ्या विदर्भातील प्रख्यात नेते जांबुवंतराव धोटे यांनाही अटक झाली. पोलीस संरक्षणात फेरपरीक्षा झाल्या. बहुसंख्य विद्यार्थी फेरपरीक्षेला बसले व त्यांचे पालक त्यांना धीर द्यायला केन्द्रांवर गेले. अशा रीतीने या प्रकरणा-वर पडदा पडला.

## २. पोषाख स्वातंत्र्यासाठी आंदोलन

(सोमैया महाविद्यालय, मुंबई विद्यापीठ, जुलै १९७२)

मुंबईतील विद्याविहारच्या सोमैया कला व विज्ञान महाविद्यालयात दि. १७ जुलै १९७२ रोजी एक घटना घडली. प्रॅक्टिकल्स चालू असताना अचानक प्राचार्यांच्या सूचनेवरून असे सांगण्यात आले की, ज्या मुलांच्या पँटचा बॉटम लहान आहे व मुलींच्या स्कर्टची लांबी गुडघ्याच्या वर आहे त्यांनी वर्ग सोडून जावे. (त्यावेळी नॅरो बॉटम पँट व मिनी स्कर्ट अशी फॅशन होती.) प्रथम मुले गोंधळली. नंतर संपाची कल्पना निघाली. विद्यार्थ्यांची कृति समिती नेमण्यात आली. दोन दिवस प्राचार्यांबरोबर वाटाघाटी झाल्या. त्यातून काहीच निष्पन्न झाले नाही. त्यावेळी विद्यार्थी परिषद व युवक कॉंग्रेसने विद्यार्थ्यांना आपला पाठिंबा जाहीर केला. पण डाव्या संघटनांचे कार्यकर्ते प्रत्यक्ष विद्यार्थ्यांनाच जाऊन भेटले. संप पुढे कसा न्यावा हे न कळलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांचे नेतृत्व मान्य केले. प्राचार्यांना घेराव घालण्यात आला. पोलीस आले. घेराव उठला. संप चालूच राहिला. नंतर डाव्या संघटनांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील विद्यार्थ्यांचा विधानसभेवर मोर्चा नेण्यात आला. पण अचानक मोर्चा विद्यापीठाकडे वळला. मुलांनी कुलगुरूंना घेराव टाकला. मोडतोड केली. अर्वाच्य शब्द वापरले. पोलीस आले. घेराव संपला. काही दिवसांनी कॉलेज व विद्यार्थी यात तडजोड झाली व हे प्रकरण संपले.

विद्यार्थ्यांचा कॉलेजवर अनेक कारणांनी राग होता. अत्यंत जाचक नियम, ते मोडले तर लगेच दण्ड, वॉटर कूलर अपुरे, कँटीन घाणेरडे, इत्यादी ती कारणे होती. प्रत्यक्षात मात्र संप पोषाख-स्वातंत्र्यासाठी झाला. विद्यार्थ्यांना १४ इंच बॅाटम व गुडघ्याच्या थोड्या वरपर्यंतच्या स्कर्टची परवानगी मिळाली व कँटीनही सुधारले. विद्यार्थ्यांना पाठिंबा देणाऱ्या एका प्राध्यापकाला मात्र नोकरी गमवावी लागली.

## ३. कॅपिटेशन फी विरोधी आंदोलन

(मालेगाव, पुणे विद्यापीठ, डिसें. १९७२ ते जाने. १९७३)

१९७२ मध्ये महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात दुष्काळ पडला. ग्रामीण भागातील सर्वसामान्य विद्यार्थ्यांनाही याची झळ जाणवली. नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथील म. गांधी विद्यामंदीरच्या बी. एड्. कॉलेजच्या मुलांनी रु. ६० /– फॉर्म फी रद्द व्हावी व आर्थिक मदत मिळावी असे निवेदन विद्यार्थी प्रतिनिधींमार्फत प्राचार्य, संस्थाचालक, शासन व विद्यापीठ यांना दिले. त्यावर काहीच न घडता नोव्हेंबर १९७२ मध्ये विद्यार्थ्यांनी ताबडतोब फॉर्म फी भरावी अशी

सूचना प्राचार्यांनी काढली. विद्यार्थ्यांना चार महिने विद्यावेतनही मिळाले नव्हते. विद्यार्थ्यांनी कृतिसमिती स्थापन करून तिच्या मार्फत असे निवेदन दिले की, प्रवेश देताना बिनपावतीची जी रु. ५०१ /– ही देणगी घेण्यात आली आहे ती मधून फॉर्म फी घ्यावी व उरलेले पैसे आम्हास परत करावेत. वास्तविक या प्रकरणाच्या चार महिन्यांपूर्वीच सोलापूरच्या मेडिकल कॉलेजमध्ये कॅपिटेशन फी विरोधी उग्र आंदोलन झाले होते. कॅपिटेशन फी बाबत चौकशी समिती नेमलेली होती. पण मालेगावला बी. एड्. कॉलेजमध्यें त्या एकूण प्रकरणाचा काही परिणाम झाला नव्हता. कॅपिटेशन फी घेण्याची या बी. एड्. कॉलेजची परंपरा होती. प्राचार्यांनी फॉर्म फीचा तगादा लावला. विद्यार्थ्यांनी घेराव, मोर्चा, दगडफेक, हे प्रकार केले. म.गांधी विद्यामंदीरचे संचालक एका राजकीय पक्षाचे होते. त्यांच्या विरोधात असणारे त्यांच्याच पक्षातील लोक व विरुद्ध पक्षातील लोक विद्यार्थ्यांना सामील झाले. आंदोलन चिघळू लागले.संस्थाचालक श्री. हिरे यांनी विद्यार्थी गुंडांचे सहकार्य घेत असल्याचा आरोप केला. विद्यार्थी आणखो चिडले. आंदोलन चालूच राहिलें. पण त्यास गती येईना. तेव्हा त्यांनी सोलापूरच्या कॅपिटेशन फी आंदोलनात गाजलेले त्यावेळच्या युक्रांदचे प्रमुख कार्यकर्ते डॉ. कुमार सप्तर्षी यांना जानेवारी ७३ मध्ये बोलावले. पोलिसांनी १४४ कलम पुकारले. डॉ. सप्तर्षींना अटक केली. वातावरण बिघडले. विद्यार्थ्यांच्या मोर्च्यावर पोलिसांनी भयंकर लाठीमार केला. मालेगावला जातीय दंगलींची पार्श्वभूमी असल्यानें पोलिसांना आंदोलन वाढायला नको होते. अनेक विद्यार्थ्यांना अटक झाली. अखेरींस चौकशी समिती नेमली गेली. कॅपिटेशन फी घेतली जाते हे सिद्ध झाले. शासनाने कॅपिटेशन फी परत करण्याचा आदेश दिला. तेव्हा आंदोलन शमले.

### ४. पशुवैद्यक विद्यार्थ्यांचे आंदोलन

(पशुवैद्यक महाविद्यालय, मुंबई; कोकण कृषि विद्यापीठ, डिसेंबर १९७३ ते जानेवारी १९७४)

जिथे प्रायोगिक कामास वाव आहे तिथेच महाविद्यालय असावे, पदवीधारकांना अधिक वेतन मिळावे, बेकार पदवीधारकांना नोकरीची हमी द्यावी, प्रायोगिक कामासाठी गुरांचा पुरवठा व्हावा, प्रमाणपत्रावर 'मुंबई'चा ते जगन्मान्य असल्याने उल्लेख करावा, विद्यापीठ कार्यकारिणीवर प्रतिनिधित्व द्यावे, प्राध्यापकांच्या रिकाम्या जागा भराव्यात, डेअरी सायन्स, पोल्ट्री सायन्स,इत्यादी विषयात पदव्युत्तर कोर्सेस सुरू करावेत, लेदर टेक्नॉलॉजी इ. नवीन विषय सुरू करावेत, इत्यादी मागण्यांसाठी मुंबईतील पशुवैद्यक महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दीर्घकाळ आंदोलन केलेले आहे. पूर्वी हे महाविद्यालय मुंबई विद्यापीठाशी संलग्न होते. कोकण कृषि विद्यापीठाच्या स्थापनेनंतर ते त्यास जोडण्यात आले. शासनाने महाविद्यालय दापोलीस (जि. रत्नागिरी) हालविण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आंदोलनास अधिकच गती मिळाली. १९७१ मध्ये विद्यार्थ्यांनी ७७ दिवसांचा संप केला होता. पण त्यावेळी फक्त आश्वासने मिळाली. प्रत्यक्ष काही घडले नाही. म्हणून या विद्यार्थ्यांनी ८ डिसेंबर १९७३ रोजी लाक्षणिक संप केला. त्यानंतर ११ डिसेंबर पासून त्यांचा दीर्घ मुदतीचा संप सुरू झाला. त्या दिवशी कॉलेजच्या डीनना त्यांनी ५॥ तास घेराव घातला. १४ डिसेंबर रोजी त्यांनी पंतप्रधानांनी मॉरिशसला भेटीदाखल देऊ केलेल्या १०० बोकडांना घेराव घातला. प्रायोगिक कार्यासाठी पशू मिळत नाहीत, हे जनतेच्या निदर्शनास आणण्याचा त्यांचा हेतू होता. २१ डिसेंबरला गुरांच्या दवाखान्याचा गोदाम म्हणून उपयोग होऊ देणार नाही, ही भूमिका घेऊन मालमोटारी अडवल्या व गोदाम अधिकाऱ्यांना घेराव घातला. १०५ विद्यार्थ्यांना अटक झाली. २२ डिसेंबरला कृतिसमितीने त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांना भेटून मागण्या कळवल्या. २३ डिसेंबरला त्यावेळचे कृषिमंत्री श्री शंकरराव चव्हाण यांना भेटून संपात हस्तक्षेप करण्याची विनंती केली. २७ डिसेंबरला दापोलीचे विद्यार्थीही सहानुभूती

म्हणून संपावर गेले. २९ डिसेंबर रोजी त्यावेळचे आमदार प्रमोद नवलकर यांच्या मध्यस्थीने अटकेत असलेल्या विद्यार्थ्यांची सुटका झाली. १९ जानेवारी १९७४ रोजी कृषिमंत्र्यांच्या पुढाकारामुळे विद्यार्थ्यांच्या बऱ्याच मागण्या मान्य करण्यात आल्या व विद्यार्थ्यांनी ४२ दिवसांचा संप मागे घेतला.

विद्यार्थ्यांच्या या आंदोलनाचे वैशिष्टच असे की, विरोधी पक्षाच्या राजकीय नेत्यांनी संपात भाग घेण्याचा प्रयत्न करूनही विद्यार्थ्यांनी त्यांचे सहकार्य घेतले नाही. दुसरे वैशिष्टच असे की पशुवैद्यकचे बहुतेक सर्व विद्यार्थी संपात सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांची एकजूट असली तरी विद्यार्थ्यांनी अनेकदा प्रशासनातील अनेकांना अशोभनीय वागवणूक दिली. स्थानिक विद्यार्थी नेते डॉ. वाळिंबे यांचे म्हणणे असे की, 'हिंसा ही आमची प्रवृत्ती नाही, पण आतताई मार्गावाचून कोणी ऐकणारच नसेल तर तेही करण्यास आम्ही तयार आहोत.' विद्यार्थ्यांचा हा विचार गंभीर करणारा असला तरी विद्यार्थ्यांनी त्यांच्या मागणीपत्रात ज्या अनेक सूचना केलेल्या होत्या, त्या विधायक व व्यापक दृष्टिकोन दर्शविणाऱ्या आहेत, यात संशय नाही.

## ५. म. फुले कृषि विद्यापीठ आंदोलन

(राहुरी, डिसेंबर १९७३ ते जानेवारी १९७४)

नोव्हेंबर १९७२ मध्ये राहुरी येथे नव्याने उभारलेल्या भव्य इमारतीत या विद्यापीठाचे काम सुरू झाले. १७५ विद्यार्थी तिथे रहात होते. भव्य इमारती व क्रीडांगणे याशिवाय फारशा सोयी नव्हत्या. राहुरी कृषि विद्यापीठ नगरपासून २१ मैलांवर व राहुरीपासून ४ मैल अलिकडे आहे. इथे एस. टी. थांबत नसे. अधिकृतपणे मागणी करूनही उपयोग झाला नाही. तेव्हा विद्यार्थ्यांनी डिसेंबर ७३ मध्ये एक दिवस सर्व एस. टी. गाड्या तीन तासपर्यंत अडवून ठेवल्या. तेव्हा नगर डेपोचे कंट्रोलर आले. त्यांनी आश्वासन दिले. विनंती थांब्याची पाटी लागली. तरी गाड्या थांबेनात. विद्यार्थी बाहेर जात असत. कण्डक्टर एस. टी. थांबवण्यासाठी दोन रुपये मागतो, असे विद्यार्थ्यांचे म्हणणे. त्यामुळे कण्डक्टर व विद्यार्थी यात नेहमीच भांडणे होत. विद्यार्थी कण्डक्टरला टपल्याही मारीत.

१६ जानेवारी १९७४ ला काही विद्यार्थी नगरला जायला निघाले. एस. टी. थांबली नाही म्हणून विद्यार्थ्यांनी दगड फेकले. तेव्हा एस. टी. थांबली. कंण्डक्टरने मुलांना बोलावले. कण्डक्टर व मुले यांच्यात बाचाबाची झाली. इतक्यात एस. टी. तील पोलीस पार्टीने दोन मुलांना पकडले. दोन मुले पळून गेली. पोलीसांनी मुलांना मारहाण केली व त्यांना नगरला नेले. त्यांच्यावर खटले झाले.

इकडे मुलांनी कृतिसमिती स्थापन करून राहुरी व नगरकडच्या सर्व एस. टी. गाड्या अडवल्या व चाकातील हवा काढून टाकली. प्रवाशांचा खोळंबा होऊ नये म्हणून मालमोटारी व खाजगी गाड्यांतून त्यांची पाठवणी केली. पोलीस आले. इन्स्पेक्टर आले. विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांना नगरहून मुलांना सोडवून आणणे जमले नव्हते. ते या मुलांच्या कृतीमुळे जमले. परंतु मुलांवरचे खटले काढून घेतले नाहीत. विद्यार्थ्यांनी उपोषण सुरू केले. विद्यापीठाच्या कुलगुरूंनी विद्यार्थ्यांना दोष दिला. त्यामुळे विद्यार्थी नाराज झाले. ते मंत्र्यांपर्यंत गेले. अखेर त्यावेळच्या जनसंघाचे नेते श्री. उत्तमराव पाटील व मुंबईतील समाजकार्यकर्त्या सौ. विचारे यांनी मध्यस्थी केली. उपोषण संपले. तोंडी दिलगिरी व्यक्त केली. पोलिसांनीही विद्यार्थ्यांचे रेकॉर्ड खराब होऊ न देण्याचे मान्य केले.

या काळात विद्यार्थ्यांनी इतर कृषि महाविद्यालयांचा पाठिंबा मिळवला. स्थानिक शेतमजुरांचे साह्य मुलांनी मागितले. पण त्यांच्या लाल निशाण गटाच्या युनियनच्या अटी मुलांना मानवल्या नाहीत म्हणून मुलांनी त्यांचा नाद सोडला.

### ६. आयुर्वेद विद्यार्थ्यांचे आंदोलन

(संपूर्ण महाराष्ट्र, जानेवारी ते एप्रिल १९७४)

१९७१ ला महाराष्ट्रात शुद्ध आयुर्वेदाचा अभ्यासक्रम सुरू झाला. यास तज्ज्ञांच्या समित्यांची संमती नव्हती. विद्यार्थ्यांना मिश्र आयुर्वेदाचा अभ्यासक्रम हवा होता. मुंबईत विद्यार्थ्यांनी १९७१ ला या प्रश्नावर आंदोलन केले होते. त्याचा उपयोग झाला नाही. १९७३ ला थोडेफार फेर-बदल करून शुद्ध आयुर्वेदावरच शिक्कामोर्तब करण्यात आले. तेव्हा ११ जानेवारी १९७४ ला एक दिवसाचा लाक्षणिक संप करून आयुर्वेदाच्या विद्यार्थ्यांनी 'आयुर्वेदाला मॉडर्न मेडिसिनची जोड असावी.' अशी मागणी केली. महाराष्ट्र आयुर्वेद विद्यार्थी परिषद अस्तित्वात आली व महा-राष्ट्रातील सर्व आयुर्वेद महाविद्यालयात आंदोलन सुरू झाले. मागण्या, निवेदने, मोर्चा, घेराव, उपोषण, महाविद्यालयांवर पोलिस पहारा, इत्यादी सर्व गोष्टी झाल्या. पुण्यात तर विद्यार्थ्यांनी पी. एम. टी. च्या बसेस पळवून त्यातून विद्यापीठावर मोर्चा नेला. कुलगुरूंना घेराव घालण्यात आला. या प्रकरणी पोलीस हजर होते. पण त्यांनी सर्व प्रकरण अतिशय संयमाने हाताळले.

एकूण तीन महिने आंदोलन चालले पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. विद्यार्थ्यांनी परीक्षांवर बहिष्कार टाकला आणि अखेरीस नवीन शैक्षणिक वर्षाबरोबर आंदोलन शमले.

आयुर्वेदाची महाविद्यालये थोडी. त्यातीलही ज्युनिअरचे विद्यार्थीच आंदोलनात सामील झालेले. त्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या कमी. अन्य महाविद्यालयांचा पाठिंबा नाही. नेतृत्वाचा अभाव होता. राजकारण्यांचे साह्य घेण्यास विद्यार्थ्यांची तयारी नव्हती. केवळ युक्रांदचे नेते डॉ. कुमार सप्तर्षी यांचेच साह्य मुलांनी घेतले. मुख्य म्हणजे शासनाची भूमिका ठाम होती. 'शुद्ध आयुर्वेद नको असेल तर एम्. बी. बी. एस्. ला जा.' असे अनेकांचे म्हणणे होते. यामुळे आंदोलनातून काही निष्पन्न झाले नाही.

पण एक गोष्ट महत्त्वाची होती. आयुर्वेदाला समाजात प्रतिष्ठा नाही. आयुर्वेद विशारदाला नोकरी मिळत नाही. मिळाली तरी एम्. बी. बी. एस्. च्या तुलनेने वेतन फारच कमी. या विद्यार्थ्यांच्या अडचणी मूलभूत असल्याने आंदोलन पुन्हा होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

एम्. बी. बी. एस्. च्या शर्यतीत 'मेडिकल'ला प्रवेश मिळवता येत नाही, म्हणून विद्यार्थी आयुर्वेदाला येत असतील तर 'शुद्ध आयुर्वेद नको' ही मागणी कशी टिकणार हाही प्रश्नच आहे.

### ७. दलित शिष्यवृत्ती वाढ आंदोलन

(मराठवाडा विद्यापीठ, जानेवारी–फेब्रूवारी १९७४)

केन्द्रशासनातर्फे दलित विद्यार्थ्यांना दिली जाणारी शिष्यवृत्तीची रक्कम ही वाढत्या महा-गाईच्या दृष्टीने फारच अपुरी आहे, ती वाढवून द्यावी, असे शासनानेच नेमलेल्या विविध समित्यांनी म्हटले होते. पण अंमलबजावणी होत नव्हती. १९७२ पासून दलितांच्या संघटना यासाठी प्रयत्न करीत होत्या. पण त्यांना ते जमले नाही. जानेवारी १९७४ मध्ये युक्रांदचे नेते डॉ. सप्तर्षी औरंगाबादेत गेले. त्यांनी आंदोलनाची तयारी केली. २६ जानेवारी १९७४ ला औरंगाबादेत विद्यार्थ्यांचा प्रचंड मोर्चा निघाला, त्यात १२,००० विद्यार्थी होते. ही ताकद पाहताच आंदोलनात युक्रांदच्या साह्याला रिपब्लिकन स्टूडन्टस् फेडरेशन, दलित युवक आघाडी, मराठवाडा युनिव्हर्सिटी स्टूडण्टस् अॅसोसिएशन (मुसा) इत्यादी सर्व संघटना आल्या. मराठवाड्यातील विख्यात नेते श्री. गोविंदभाई श्रॉफ, श्री. भाऊसाहेब वैशंपायन, पत्रकार श्री.

अनंत भालेराव, इत्यादींच्या पुढाकारानें नागरिक कृती समिती स्थापन करण्यात आली. समितीने विद्यार्थी आंदोलनास पाठिंबा दिला. कॉलेज-बंद, सत्याग्रह, अटक करवून घेणे, मोर्चा, हे कार्यक्रम सर्व मराठवाडाभर सुरू झाले. मराठवाड्याबाहेरील राजकीय व सामाजिक नेत्यांनीही या आंदोलनास पाठिंबा दिला. त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांची भेट घेण्यात आली. केन्द्राकडून मान्यता येईपर्यंत त्यांनी तातपुरती मदत म्हणून रक्कम मंजूर केली व दोन महिने चाललेले आंदोलन संपले.

या आंदोलनाचे वैशिष्टच असे की क्वचित एखादा नांदेडचा अपवाद वगळता, सत्याग्रह शांततामय होता. विद्यार्थ्यांची एक घोषणाच अशी होती की, 'पोलीस हमारे दोस्त है, उनके साथ रहना है.' पोलीसही संयमाने वागले. मराठवाड्यातील जातीय तणाव बाजूला ठेवून सर्व जातींचे लोक एकत्र आले. डॉ. सप्तर्षींनी 'मुक्त विद्यापीठ' सुरू करून लोकशिक्षणाचेही काम केले. मात्र डॉ. सप्तर्षींचे आंदोलनातील नेतृत्व अनेकांना खटकत होते. खुद्द डॉ. सप्तर्षीही शिष्यवृत्ती प्रश्न महत्त्वाचा मानत नव्हते तर 'दलित आता क्रांतीचे हत्यार आहेत.' हे मानून त्यांच्यात आले होते.

### ८. पूर्वपरीक्षाविरोधी आंदोलन

(मुंबई विद्यापीठ, जानेवारी–फेब्रुवारी १९७४)

२८ जानेवारी १९७४ ला मुंबईतील विविध महाविद्यालयातील सुमारे सहा हजार विद्यार्थी 'पूर्व परीक्षा नको, सर्वांना फॉर्म द्या.' असे म्हणून संपावर गेले. त्यापूर्वी काही महाविद्यालयात संप सुरू झालेलाच होता. विद्यार्थ्यांनी अपप्रकारही केलेले होते. 'समान धोरण ठरवा' अशी प्राचार्यांकडून मागणी आल्यामुळे विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. त्र्यं. कृ. टोपे यांनी प्राचार्यांची सभा २९ जानेवारी १९७४ रोजी बोलावली. ही बातमी विद्यार्थ्यांना कशी समजली कोण जाणे, परंतु विद्यापीठाच्या आवारात सभेच्या वेळेआधीपासून विद्यार्थी जमू लागले. सुमारे पाच हजार विद्यार्थ्यांचा जमाव जमला होता. घोषणा, ढकलाढकली, जाळपोळ, इत्यादी सुरू झाले. आवाराबाहेर पोलीस उभे होते. पण कुलगुरूंनी त्यांना हस्तक्षेप करण्यास नकार दिल्याने अनर्थ टळला. पूर्वपरीक्षा ऐच्छिक ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला व जितके झटपट आंदोलन उभे राहिले तितकेच झटपट शमले.

हा निर्णय प्राध्यापकांना मान्य नव्हता. त्यांनी नाराजीचे सह्यापत्रक कुलगुरूंना दिले. विद्यार्थ्यांनाही हा निर्णय मान्य नव्हता. पूर्वपरीक्षा फेब्रुवारी १९७४ ला झाल्या व विद्यार्थी त्यात बहुसंख्येने सहभागी झाले. विचारवंतांनाही पूर्वपरीक्षांबाबतचा निर्णय मान्य नव्हता. कुलगुरूंनी दडपणाखाली तो निर्णय घेतला असे त्यांचे मत पडले. कारण, त्यावेळी परिस्थिती फारच स्फोटक होती.

विद्यार्थ्यांच्या एका गटाची ही मागणी होती. रेव्होल्युशनरी स्टूडन्टस् फ्रंट नावाच्या संघटनेने त्यापूर्वीच्या तीन वर्षात काही महाविद्यालयांचा अभ्यास करून परीक्षेतील भ्रष्टाचार मांडलें होते व किती विद्यार्थ्यांना फॉर्म नाकारून अंतिम परीक्षेत अडवणूक केली जाते तेही मांडले होते. महाविद्यालयाच्या पातळीवर संपाचा प्रयत्न झाला होता. पण त्यांना ते जमले नव्हते. २९ जानेवारीला अचानक आंदोलन पेटले व ते यशस्वी झाले. हे असे घडू शकेल, असे त्या संघटनेच्या नेत्यांनाही वाटले नव्हते.

### ९. दन्तवैद्यक विद्यार्थ्यांचे आंदोलन

(नागपूर, नागपूर विद्यापीठ, फेब्रुवारी-मार्च १९७४)

नोकरीची शाश्वती पाहिजे व जुनाट परीक्षा पद्धती बदलली पाहिजे या मागण्यांसाठी अखिल

भारतीय दन्तवैद्यक विद्यार्थी संघटनेने देशभरातील दन्तवैद्यक महाविद्यालयांना संदाची हाक दिली होती. त्याचाच एक भाग म्हणून नागपूरच्या दन्तवैद्यक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी २० फेब्रुवारी १९७४ रोजी आंदोलन सुरू केले. विद्यार्थ्यांच्या काही स्थानिक मागण्याही होत्या. डीन-चा हुकुमशाही कारभार नको, प्रतिनिधित्व हवे, वसतिगृह हवे, प्रयोगासाठी साहित्य हवे, असे त्या मागण्यांचे स्वरूप होते. विद्यार्थ्यांनी कॉलेज बंद पाडले. चक्रीउपोषण सुरू केले. एक विधायक उपक्रम म्हणून तात्पुरते रुग्णालय एका तंबूत सुरू करून रोग्यांची सेवा केली. पण अन्य विद्यार्थ्यांचा पाठिंबा नव्हता, अन्य संघटनांचे वा राजकीय नेत्यांचे सहकार्य त्यांनी मागितले नाही व त्यांचे स्वतःचे बळ अपुरे होते म्हणून सुमारे दीड महिना अत्यंत शांततापूर्ण आंदोलन चालू-नही कोणीच त्याची दखल घेतली नाही व आंदोलन बारगळले. जनता, वृत्तपत्रे, इत्यादींनीही त्याची दखल घेतली नाही.

## १०. मराठवाडा आंदोलन

### (मराठवाडा, मार्च ते मे १९७४)

२७ मार्च १९७४ ला वसमत मध्ये एक घटना घडली. त्यादिवशी कॅनॉल इन्स्पेक्टरच्या १०० जागांसाठी १,८०० उमेदवारांना एकाच वेळी मुलाखतीसाठी पाचारण करण्यात आले होते. मुलाखत घेणारे हजर नव्हते. नंतर मुलाखती रद्द करण्यात आल्या. अफवा उठल्या. वातावरण तापले तहसीलदारांना घेराओ, दगडफेक, इत्यादी प्रकार झाले. पोलीस आले. गोळीबार झाला. दोन माणसे दगावली.

या घटनेचे प्रतिसाद विद्यार्थ्यांत उमटले. ४ एप्रिल १९७४ रोजी परभणी व नांदेड येथील विद्यार्थ्यांनी परीक्षांवर बहिष्कार घातला. वसमत प्रकरणी त्यावेळेचे गृहराज्यमंत्री श्री. शरद पवार यांचा राजिनामा मागितला. नंतर अतिशय जलद घटना घडू लागल्या. सर्व महाविद्यालयांत आंदोलन पोचले. विद्यार्थ्यांनी 'मराठवाडा विद्यार्थी समन्वय समिती' स्थापन केली. त्यात विद्यार्थ्यांच्या सर्व संघटना सामील झाल्या. 'मराठवाड्याचा विकास व भ्रष्टाचार निर्मूलन' या विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागण्या होत्या. विद्यार्थ्यांनी गाढवांच्या गळ्यात मंत्र्यांच्या नावाच्या पाट्या लटकावून धिंड काढली, मोर्चे काढले, मूक मिरवणुकी काढल्या. घेरओ घालून नगरसेवकांपासून मंत्र्यापर्यंत अनेकांचे राजिनामे मागितले. मागण्यांवर सह्या गोळा केल्या.

मराठवाड्याच्या विकासाचा प्रश्न असल्याने आंदोलन पसरले, व्यापक झाले. प्रख्यात स्वातंत्र्य-सैनिक श्री. गोविंदभाई श्रॉफ यांच्या नेतृत्वाखाली 'नागरिक कृति-समिती' स्थापन झाली. तिने विद्यार्थी आंदोलनास पाठिंबा दिला. मराठवाड्यातील सर्व विरोधी पक्ष आंदोलनात सामील झाले.

आंदोलन उग्र बनू लागले. त्यावेळचे महाराष्ट्राचे कृषिमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांच्याशी चर्चा झाली. सत्ताधारी पक्षाच्या इतर नेत्यांशीही चर्चा झाली. काही पदरात पडेना तेव्हा जमाव उग्र बनला. जाळपोळ, दगडफेक सुरू झाली. पोलिसांनी गोळीबार केला. हे सत्र व्यापक बनले. सगळा मराठवाडा पेटून उठला.

अखेर ४ जून १९७४ रोजी श्री. गोविंदभाई श्रॉफ उपोषणास बसले. त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी मराठवाड्याच्या विकासाच्या अनेक योजना मंजूर केल्या, तेव्हा आंदोलन शमले. व्यापक मागण्यांसाठी केलेले विद्यार्थ्यांचे हे अभूतपूर्व आंदोलन होते असे म्हटले पाहिजे.

महाराष्ट्रातील मराठवाडा हा विभाग दीर्घकाळ फारच मागास राहिलेला आहे. याची जाणीव मराठवाड्यातील विद्यार्थ्यांत होती व आहे. इतर विभागांच्या तुलनेत मराठवाड्यातील विद्यार्थी

राजकीयदृष्टचा जागरूक आहेत. जनतेलाही आपल्या दुःस्थितीची बोच होती. त्यामुळे लहान मुले, स्त्रिया, शिक्षक, पत्रकार, लेखक, विचारवंत, इत्यादी सर्वांचाच विद्यार्थ्यांच्या आंदोलनास पाठिंबा मिळाला. विद्यार्थ्यांचे आंदोलन हे जनतेचे आंदोलन झाले. म्हणून तर 'मराठवाडा बंद' व 'शासन बंद' हे कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडले. आंदोलनाचे नेतृत्व विद्यार्थ्यांच्या व नागरिकांच्या कृति-समितीने केले.

आंदोलनाच्या काळात जमावाकडून हिंसाचार खूप झाला. पोलिसांकडूनही अत्याचार झाले. मराठवाड्याच्या विकासाच्या योजना व त्यासंबंधातील आकडेवारी वारंवार मागणी करूनही शासन विविध चर्चांच्या वेळी सादर का करू शकली नाही हा मोठाच प्रश्न आहे.

विद्यार्थ्यांनी परीक्षांवरही बहिष्कार घालून आंदोलन चालू ठेवले. पण परीक्षा त्यांना नको होत्या असे नाही. आंदोलनानंतर विद्यार्थ्यांनी परीक्षा घ्याव्यात असे म्हटले व त्याप्रमाणे ते परिक्षात सामीलही झाले. मराठवाड्यातील हे व्यापक आंदोलन अनेक दृष्टींनी अभ्यासण्याजोगे आहे.

## निष्कर्ष

महाराष्ट्रातील विविध विद्यापीठ क्षेत्रात घडलेल्या दहा आंदोलनांचा अभ्यास केल्यानंतर काही निष्कर्ष मिळू शकतात.

या दहा आंदोलनांपैकी मराठवाडा आंदोलनाचा अपवाद वगळता बाकी सर्व आंदोलने शिक्षणक्षेत्राशी संबंधित अशा प्रश्नांवर झालेली आहेत. राहुरी कृषि विद्यापीठ, सोमय्या महाविद्यालय येथील आंदोलने स्थानिक प्रश्नांतून निर्माण झालेली आंदोलने आहेत. या आंदोलनांचे स्वरूप अत्यंत सीमित असे होते. बाकी आंदोलने शैक्षणिक प्रश्नांशी निगडीत आहेत. या आंदोलनांचे स्वरूपही फारसे व्यापक नाही. मराठवाड्याचे आंदोलन मात्र मूलभूत महत्त्वाच्या समस्या असलेले व बरेच व्यापक जाणिवेतून निर्माण झालेले आहे. या सर्व आंदोलनांचा विचार केला असता प्रथमच एक गोष्ट नजरेत भरते ती अशी की, मराठवाडा आंदोलन वगळता विद्यार्थ्यांनी त्यांच्या मूलभूत समस्या आंदोलनांच्याद्वारे मांडलेल्या नाहीत. गंभीर विचारांची पार्श्वभूमी या आंदोलनांना नाही. उदाहरणार्थ सोमय्या महाविद्यालयात असंतोष होता त्याची कारणे उपहारगृह, विश्रामगृह, स्वच्छतागृह, इत्यादी सोयी अपुऱ्या व असमाधानकारक होत्या, ही आहेत. परंतु आंदोलन झाले ते मात्र पोषाख-स्वातंत्र्यासारख्या अत्यंत शुल्लक कारणावरून. मालेगाव येथील कॅपिटेशन फीच्या प्रश्नात फार मोठा भ्रष्टाचार दडलेला आहे की काय, याचा विचार व्हायला हवा होता. मुंबई येथील पूर्वपरीक्षेबाबतच्या प्रश्नात परीक्षा पद्धती, फॉर्म देण्याची पद्धती, समान न्याय, इत्यादी मूलभूत गोष्टींचा विचार व्हायला हवा होता. मुंबईतील पशुवैद्यक महाविद्यालयातील आंदोलनात मात्र विद्यार्थ्यांनी मूलभूत प्रश्न हाताळला होता असे लक्षात येते. परंतु एकंदरीत पहाता विद्यार्थ्यांत असंतोष असला तरी तो नेमका कशासाठी आहे ते मूळ कारणच विद्यार्थ्यांच्या लक्षात आलेले दिसत नाही. त्याचप्रमाणे विद्यार्थीवर्ग हा समाजापासून काहीसा अलग, व्यापक सामाजिक जाणिवेचा अभाव असलेला, असा वाटतो. आपले प्रश्न व समाजाचे प्रश्न कोणते आहेत, त्यात काही साम्य आहे का, त्यावर कोणता उपाय योजावा, इत्यादी विचाराबाबत विद्यार्थी पूर्णतः अनभिज्ञ असल्याचे जाणवते.

नेमका हाच दोष मोठ्या व्यक्तींमध्येही असल्याचे दिसून येते. प्राचार्यांपासून शिक्षणतज्ज्ञांपर्यंत बहुतेकांमध्ये व्यापक सामाजिक जाणिवेचा अभाव आहे की काय अशी शंका येते. इतकेच नव्हे तर विद्यार्थ्यांच्या असंतोषाची मूलभूत कारणे काय आहेत याचा विचार करून त्यादृष्टीने उपाययोजना अंमलात आणल्याचे दिसून येत नाही. नागपूर येथील कॉपी प्रकरणामधून कॉपी का

होते ? त्यात विद्यार्थ्यांचा, प्राध्यापकांचा व व्यवस्थापनाचा कितपत दोष आहे ? परीक्षा पद्धतीच सदोष आहे काय ? इत्यादी अनेक प्रश्न निर्माण होतात. फेरपरीक्षा घेतली हे चांगले झाले. पण मूलभूत प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला का ? मुंबई विद्यापीठातील पूर्वपरीक्षा आंदोलन झाले त्यावर्षी परीक्षा ऐच्छिक ठेवण्यात आल्या. हा उपाय तात्पुरता झाला. फॉर्म देण्याची पद्धत, परीक्षा पद्धती, इत्यादींबाबत काही मूलभूत सुधारणा करण्याचा प्रयत्न झाला काय ? आजची समस्या सुटली. आजचे मरण उद्यावर गेले. या वृत्तीतून खरा आनंद मिळू शकेल काय ? मूलभूत समस्या सोडविल्याचे श्रेय मिळेल काय ? वरवरची उपाय-योजना करून वा मलमपट्टी करून समाधान मानण्यापेक्षा गरज पडली तर शस्त्रक्रिया करण्याचे धाडस वरिष्ठांनी दाखवायला पाहिजे.

या आंदोलनातून आजच्या विद्यार्थ्यांचे जे दर्शन घडले तेही विचार करावयास लावणारे आहे. अपवादात्मक विद्यार्थ्यांना अभ्यास, रचनात्मक काम, यांची ओढ आहे. अशा विद्यार्थ्यांनाही संधी मिळत नाही म्हणून ते नाराज असतात, असे पशुवैद्यक महाविद्यालयाच्या आंदोलनावरून दिसून येतें. बहुसंख्य विद्यार्थ्यांना आपले प्राध्यापक, प्राचार्य, कुलगुरु,इत्यादींबद्दल आदरच असतो. त्या आदराचे प्रकटीकरण करण्याचे मार्ग कदाचित बदललेले असतील.बहुसंख्य विद्यार्थी अलिप्ततावादी, शांततावादी, थोडेफार भित्रे, अतिरिक्त सहनशील, असतात. त्यामुळेच रास्त गाऱ्हाणी मांडण्यासाठी ते पुढे येत नाहीत. कोणीतरी आंदोलन केल्यावर आपले प्रश्न परस्पर सुटत आहेत, याचाच आनंद त्यांना वाटत असतो. बहुसंख्य विद्यार्थी शक्यतो आंदोलनास सहानुभूती असली तरी आंदोलनापासून दूर राहातात. जेव्हा आंदोलनात ते उतरतात तेव्हाच त्यांच्यात 'समूहा'-चेच गुण-दोष दिसून येतात. मग त्यांच्या कृतीत विवेक असत नाही. मुंबईच्या पूर्वपरीक्षेबाबतच्या आंदोलनात विद्यार्थ्यांनी कुलगुरूंशी जे वर्तन केले ते व्यक्तिशः त्यांना लज्जास्पद वाटते, तरी ते घडले ही वस्तुस्थिती आहे. बहुसंख्य विद्यार्थ्यांत अनेक दोष आढळून येतात. कमी कष्टात फायदा मिळवणे, स्वार्थ साधणे, प्रलोभनांना बळी पडणे, इत्यादी दोष त्यांच्यात आहेत. कॉपी करणे अयोग्य हे व्यक्तिशः मान्य असूनही नागपूरमध्ये बहुसंख्य विद्यार्थ्यांनी कॉपी केली, हा इतिहास आहे. वाटेल ते झालें तरी चालेल, मी कॉपी करणार नाही, असे ठामपणे कोणी म्हटले नाही. सद्प्रवृत्त विद्यार्थी समर्थ नसतात वा संघटित नसतात. त्यामुळे अयोग्य वाटणाऱ्या मुद्यांवर ते ठामपणे विरोध करायला उभे राहात नाहीत. विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन जीवनाविषयी काही कल्पना असतात, त्यांची काही स्वप्ने असतात. त्यामुळे ते एका वेगळ्याच वातावरणात राहात असतात. त्यास तडा गेला की, त्यांचा मानसिक तोल बिघडतो. विद्यार्थी गैरशिस्त व बेजबाबदार आहेत, असे मात्र म्हणता येणार नाही. राहुरीला वाहने बंद पाडल्यावर विद्यार्थ्यांनी लोकांची नेण्या-आणण्याचीही व्यवस्था केली. नागपूरच्या दन्तवैद्यक विद्यार्थ्यांनी आंदोलनकाळात मोफत रुग्णालये चालविली. या गोष्टी उपेक्षून चालणार नाहीत. विद्यार्थ्यांत जातीयतेचा रोग थोड्याफार प्रमाणात आहे हेही मराठवाड्यातील बहुतेक सर्व आंदोलनांवरून दिसून येते. बऱ्याचदा विद्यार्थ्यांना त्यांच्या तरुण वयानुरूप त्यांच्या शक्तीचे प्रदर्शन करावेसे वाटत असते. साहस करावेसे वाटत असते. काहीतरी अलौकिक करण्याचे समाधान (थ्रिल) अनुभवायचे असते. त्यामुळेही बऱ्याचदा विद्यार्थ्यांच्या हातून काही विशिष्ट कृती होत असतात. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांत विद्यार्थी वर्ग म्हणून स्वाभाविकपणे जी एकी असायला हवी तिचे दर्शन मात्र घडत नाही. निरनिराळ्या कारणांमुळे विद्यार्थी अलग अलग गटात विभागले गेलेले आहेत. त्यामुळे विशिष्ट प्रश्नांबाबत कृती करण्यासाठी त्यांना संघटित करावे लागते. ते स्वभावतःच संघटित होतात असे नाही. महाराष्ट्रात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या विद्यार्थ्यांच्या मानाने कमी असली तरी विद्यार्थिनींमध्येही जागरूकता येऊ लागली आहे व

त्याही आंदोलनात सहभागी होऊ लागल्या आहेत. प्रस्तुतच्या बहुतेक आंदोलनात विद्यार्थिनींचा सहभाग होताच. मालेगाव आंदोलनाचे तर नेतृत्व विद्यार्थिनींनी केले, ही एक लक्षणीय घटना आहे. बेकारी, नोकरीची समस्या, शिक्षण पोटाची समस्या सोडविण्यास पात्र आहे की नाही या बाबतची शंका, एकूणच अंधकारमय भवितव्य या मूलभूत समस्यांची विद्यार्थ्यांना फारशी जाणीव आहे असे दिसत नाही. वास्तविक महाराष्ट्रातील समस्या या आर्थिक समस्येतून (कॅपिटेशन-फी आंदोलन, दलित शिष्यवृत्ती वाढ आंदोलन, मराठवाडा आंदोलन,) व काही मूलभूत शैक्षणिक प्रश्नांतून (पशुवैद्यक आंदोलन, आयुर्वेदिक विद्यार्थ्यांचे आंदोलन, इत्यादी) निर्माण झालेल्या आहेत. जेव्हा या गोष्टींची जाणीव विद्यार्थ्यांना होते तेव्हा ते निराशेतून काहीही करावयास तयार होतात. (उदाहरणार्थ मराठवाडा आंदोलन) परंतु बहुसंख्य विद्यार्थ्यांना अंधुकपणे असे जाणवते की, त्यांच्यासमोर हताश भवितव्य आहे. पण त्याचे नेमके स्वरूप त्यांना कळू शकलेले नाही.

विद्यार्थ्यांच्यासाठी काम करणारी प्रभावी व व्यापक संघटना जवळ जवळ नाही. ज्या व्यापक विद्यार्थी संघटना महाराष्ट्रात आहेत त्या विशिष्ट विचारसरणीशी संबंधित आहेत. त्यामुळे या संघटनांच्या विद्यार्थ्यांत काही प्रतिमा तयार झालेल्या आहेत. उदाहरणार्थ, विद्यार्थी परिषद म्हणजे सांस्कृतिक कार्यक्रम करणारी संघटना, युक्रांद म्हणजे आंदोलने करणारी संघटना व युवक कांग्रेस म्हणजे सरकारी संघटना. मराठवाड्याच्या आंदोलनात सर्वच संघटना एकत्र येऊन आंदोलन चालवीत होत्या. उरलेल्या नऊ आंदोलनांपैकी दलित शिष्यवृत्ती वाढीचे आंदोलन व थोड्या प्रमाणात मालेगावचे आंदोलन युक्रांदने चालविले. बाकी सर्व आंदोलने स्थानिक विद्यार्थी संघटनांनी व काही तर काही गटांनी चालविली. मोठ्या व व्यापक संघटना जेव्हा विद्यार्थ्यांत आंदोलनासाठी उतरतात तेव्हा त्यांना विद्यार्थ्यांचे व त्यांच्या समस्यांचे अपरूप असते असे नव्हे तर त्यांना त्यांचे काही संघटना म्हणून स्वार्थ असतात. उदा. दलित शिष्यवृती वाढ आंदोलन चालविण्यात युक्रांदचा उद्देश दलितांची ताकद उभी करण्याचा, स्वतःची शक्ती अजमवण्याचा व स्वतःची प्रतिमा निर्माण करण्याचा होता; असे त्या संघटनेच्या प्रमुखांच्या सांगण्यावरून लक्षात येते व केवळ विद्यार्थ्यांसाठी रचनात्मक व आंदोलनात्मक कार्य करणाऱ्या, विद्यार्थ्यांबद्दल मनापासून प्रेम असणाऱ्या संघटना अभावात्मकच आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे व्यापक शिक्षण होत नाही व त्यांच्या समस्या नीटपणे मांडण्याचा मार्गही त्यांना सापडत नाही. स्थानिक संघटना हे कार्य करतात, पण त्यांना व्यापक वैचारिक पाया नसतो, म्हणून त्यांचा म्हणावा तितका प्रभाव पडू शकत नाही. स्थानिक नेतृत्व त्यामुळेच खऱ्या अर्थाने व्यापक जाणिवांनी परिपूर्ण असत नाही. विधायक कार्यक्रम, अभ्यास, अन्यायाचा प्रतिकार करण्याची क्षमता, या सर्वांचाच अभाव जाणवतो. नागपूरच्या स्थानिक नेतृत्वाने कॉपीला क्रांतीचे हत्यार बनविण्याचा हास्यास्पद प्रकार केला. मराठवाड्यातील स्थानिक नेतृत्वात निरनिराळ्या कारणांमुळे गट पडलेले आहेत.

विद्यार्थ्यांच्या ज्या समस्या आहेत, त्या त्यांनी मांडण्याअगोदर वास्तविक म्हणजे वरिष्ठांकडून त्यांचा विचार व्हायला पाहिजे. पण प्रस्तुत आंदोलनांच्या अभ्यासातून असे दिसून येते की, विद्यार्थ्यांच्या समस्या त्यांनी मांडल्या तरी त्याकडे लगेच कोणी लक्ष पुरवीत नाही. अतिशय उपेक्षावृत्तीच सर्वत्र पसरलेली दिसून येते. त्यामुळे विद्यार्थ्यांची अशी भावना होते की, शक्तीचे प्रदर्शन केले नाही तर, कोणीही त्यांच्याकडे लक्ष देत नाही. आयुर्वेद विद्यार्थ्यांचे आंदोलन, नागपूरच्या दन्तवैद्यक विद्यार्थ्यांचे आंदोलन महिनोनमहिने चालले. पशुवैद्यक विद्यार्थ्यांचे आंदोलनही प्रदीर्घ काळ चालू होते. परंतु त्यांची उपेक्षाच केली गेली.

वास्तविक महाराष्ट्रातील आंदोलनांचे स्वरूप मुख्यतः स्थानिक आहे. उपेक्षावृत्ती सोडून संबंधित अधिकाऱ्यांनी वेळीच विद्यार्थ्यांच्या समस्यांचा विचार केला तर आंदोलनांची पाळी येणार

नाही. परंतु असे दिसून येते की, संबंधित अधिकारी उदासीन राहतात, तटस्थ राहतात. आंदोलन सुरू झाले की भयभीत होतात. विद्यार्थ्यांचे वर्तन अयोग्य असेल तर प्राचार्यांनी वा कुलगुरुंनी त्याचा कडकपणे बंदोबस्त करायला पाहिजे. नागपूरच्या कॉपी प्रकरणात फेरपरीक्षा घेण्याचा कणखरपणा जो उशिरा दाखविण्यात आला, तो कॉपीस आळा घालण्यासाठी वेळीच दाखविता आला नसता का ? पूर्वपरीक्षा नको म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रश्न मुंबईतील प्राचार्यांना कणखरपणे का हाताळता आला नाही ? कुलगुरुंच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत पूर्वपरीक्षा रद्द करण्याचा निर्णय का घेण्यात आला ? तो शैक्षणिक दृष्टचा कितपत बरोबर होता ? कुलगुरुंनी महाविद्यालयांच्या अधिकारातील प्रश्नासाठी प्राचार्यांची एकत्र सभा घेणे विद्यापीठाच्या संहितेबरहुकूम होते काय ?

वास्तविक प्राचार्य, कुलगुरु, शिक्षण संस्थांचे चालक व शासन या सर्वांनीच विद्यार्थ्यांच्या प्रवृत्ती ध्यानी घेऊन त्यांना समजून घेतले पाहिजे, इतकेच नव्हे तर त्यांना विश्वासात घेऊन निर्णय घेतले पाहिजेत. आवश्यक तिथे कणखरपणा दाखविला पाहिजे. आवश्यक तिथे समस्या उग्र स्वरूप धारण करण्यापूर्वीच विचारात घेतल्या पाहिजेत. दिरंगाईचे व वेळकाढूपणाचे धोरण बरोबर नाही.

शासनाचा महाविद्यालयांशी प्रत्यक्ष संबंध नसतो. कारण विद्यापीठे स्वायत्त संस्था आहेत; असे म्हटले जाते. पण ज्या समस्यांमध्ये शासनाचा संबंध येतो, त्या अभ्यासक्रमाबाबत निर्णय घेताना त्याची जाणीव विद्यार्थ्यांना दिली होती का ? की वयात आलेल्या विद्यार्थ्यांना लहान समजून कोणीतरी दुसऱ्यानेच त्यांच्यासाठी निर्णय घेणे उचित आहे ? कॅपिटेशन फीचा प्रश्न वा मराठवाड्याचा प्रश्न याबाबत शासनाने दिरंगाईचे धोरण अवलंबिले नव्हते का ? याचा विचार होण्याची गरज आहे.

महाराष्ट्रातील प्राध्यापक वर्ग हा बराचसा तटस्थ, अलिप्त व उदासीन वाटतो. विद्यार्थ्यांचे चुकत असेल तर त्याला समजावून देण्याचे काम त्यांचे आहे. विद्यार्थ्यांच्या समस्या पटत असतील तर मार्ग शोधण्याचाही प्रयत्न त्यांनी केला पाहिजे. परंतु मराठवाड्याचा अपवाद वगळता बाकीच्या आंदोलनात प्राध्यापकांना काही भूमिकाच नव्हती. विद्यार्थी व प्राध्यापक यांमध्ये दरी असल्याचेच यातून स्पष्ट होते.

शिक्षण संस्थाचालकांचा वास्तविक पाहता विद्यार्थ्यांशी संबंध येण्याचे काहीच कारण नाही. पण बऱ्याच शिक्षण संस्था राजकारणी व्यक्तींच्या हाती असतात. या संस्थांमधून गटबाजीचे राजकारण चालू असते. या राजकारणाचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष असा परिणाम विद्यार्थ्यांना भोगावा लागतो. मालेगावच्या म. गांधी विद्या मंदिर संस्थेत अशा प्रकारचे वातावरण होते. त्यामुळे तेथील आंदोलनास राजकीय वळण लागले. शिक्षण संस्था चालकांचे वर्तन हे देखील सुजाण असायला हवे. विद्यार्थ्यांचे म्हणणे वावगे असले तरी त्यांची समजूत काढणे हे प्राचार्यांप्रमाणेच त्यांचे काम आहे. सोमय्या महाविद्यालयातील आंदोलनात संस्था चालकांनी थोडी फार समजूतीची भूमिका घेतली असती, तर तेथील आंदोलनास अनिष्ट वळण लागले नसते.

प्राचार्य, कुलगुरु, शासन या सर्वांनीच आंदोलनाच्या काळात पोलिसी कारवाई करत असताना पुनः पुन्हा विचार करायला हवा. मुंबई विद्यापीठात तेथील कुलगुरुंनी पोलिसांना बोलविले नाही. त्यामुळे पुढचा भीषण प्रकार टळला. याबाबतीत मुंबईच्या कुलगुरुंचे वर्तन अत्यंत स्वागतार्ह होते. नागपूरला फेरपरीक्षा घेताना कुलगुरुंनी पोलिसांचे साहय घेतले. पण पोलिसी सामर्थ्याचा गैर उपयोग करून घेतला नाही. ही गोष्टही आनंदनीय आहे. परंतु मालेगाव व मराठवाडा येथील आंदोलनात पोलिसी कारवाई मोठ्या प्रमाणात केली गेली. त्याची आवश्यकता

होती काय ? निरनिराळ्या राज्यातील व देशातील आंदोलनांचा इतिहास असे सांगतो की, दमन करून आंदोलने शमत नाहीत. उलट फोफावतात. गुजराथचे १९७४ मधील आंदोलन या गोष्टीचेच प्रतीक आहे. विद्यार्थी म्हणजे चोर वा दरोडेखोर नव्हेत, गुन्हेगार नव्हेत, हे जाणूनच पोलिसी कारवाई व्हायला हवी. त्यातही कमीत कमी बळाचा वापर केला गेला पाहिजे. जिथे प्रश्न शांतता व सुव्यवस्थेचा असेल तिथे मात्र आवश्यक पोलिसांचे साह्य घ्यायला पाहिजे. मात्र विवेक सुटू देणे कोणाच्याच हिताचे नाही.

महाराष्ट्रातील या आंदोलनात जनतेची वा समाजाची भूमिका काय होती ? मराठवाड्यात विद्यार्थ्यांचे व जनतेचे प्रश्न एक झाले होते, म्हणून जनता आंदोलनात उतरली. बाकी सर्वत्र जनता तटस्थ होती, अलिप्त होती, हे असे का ? विद्यार्थी म्हणजे जनतेची मुले नाहीत का ? निषेध वा स्वागत, अशी जी योग्य असेल ती भूमिका जनतेने घ्यायला हवी. ती भूमिका मांडण्यासाठी कार्यक्षम यंत्रणा निर्माण करायला हवी.

वृत्तपत्रे मात्र जागरुक आहेत असे जाणवते. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर वृत्तपत्रे आपली भूमिका मांडून लोकशिक्षणाचे कार्य करीत असतात. मराठवाड्यातील भ्रष्टाचाराचा प्रश्न वृत्तपत्रांनी मांडला, मुंबईतील परीक्षेबाबतचा निर्णय वा नागपुरातील कॉपी प्रकरण, यावर वृत्तपत्रांनी कठोर टीकाही केली. काही अपवादात्मक वृत्तपत्रे सनसनाटी बातमी देण्यासाठी कोणतीही छोटी घटना सुद्धा अवास्तव महत्त्व देऊन छापतात. पण बहुसंख्य वृत्तपत्रे विवेकाने लोकशिक्षणाचे कार्य करतात. महाराष्ट्रात वृत्तपत्रांची उज्ज्वल परंपरा अखंड असल्याचेच हे प्रतीक आहे.

महाराष्ट्रातील राजकीय पक्षांना मात्र विद्यार्थ्यात स्थान नाही. विद्यार्थ्यांना राजकारण व राजकीय पक्ष आणि नेते याबद्दल घृणा आहे. याची कारणे निरनिराळी असतील. आयुर्वेद, पशुवैद्यक, दन्तवैद्यक, इत्यादींच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या आंदोलनात राजकीय पक्षांना प्रवेश करू दिला नाही. मुंबईत राजकीय पक्षांनी मदत देऊ केली होती, तरी विद्यार्थ्यांनी त्यांना बोलावले नाही. तेव्हा राजकीय पक्ष आंदोलने घडवून आणतात, ह्या म्हणण्यात अर्थ नाही. (विद्यार्थ्यांनी आंदोलने केली, यालाच राजकारण म्हणावयाचे असेल तर गोष्ट निराळी.) परंतु काही वेळा विद्यार्थी अननुभवी असतात, त्यांची ताकद कमी पडते, म्हणून ते राजकीय पक्षांचे साह्य घेतात. उदाहरणार्थ, मालेगाव येथील आंदोलन. एकदा एक राजकीय पक्ष आला की, इतरही राजकीय पक्ष त्यात येतात. बऱ्याचदा शासनकर्त्या पक्षातीलही विरोधी गट त्यात येतात. एकदा आंदोलनात **प्रवेश** केल्यावर मात्र ते त्यांचे व्यक्तिगत व पक्षगत स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करतात. मग मात्र आंदोलन विद्यार्थ्यांच्या हातातून निसटू लागते. महाराष्ट्रात विरोधी पक्षांना फारसे स्थान नाही. म्हणून अशा आंदोलनांमधून ते शासन विरोधी लढा लढण्याची भाषा करतात. मराठवाड्याच्या आंदोलनात अनेक विरोधी पक्ष याच भूमिकेतून शिरले. मात्र तिथे विद्यार्थी राजकीय दृष्ट्या जागरूक व आंदोलनांचा अनुभव असलेले असल्यामुळे शासन उलटविण्यासाठी लढा असे त्यास स्वरूप येऊ शकले नाही. तेथें आंदोलन पक्षनिरपेक्ष भूमिकेवरच चालवावे लागले. सामान्यतया विरोधी पक्ष व शासनकर्त्या पक्षातील विविध गट हे मात्र विद्यार्थ्यांच्या आंदोलनात वाटा मिळाल्यास स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करतात, ही वस्तुस्थिती आहे.

मराठवाड्यातील आंदोलनाचा विचार थोडा स्वतंत्रपणे करणे आवश्यक आहे. या आंदोलनात शैक्षणिक प्रश्नांपेक्षा मराठवाड्याच्या विकासाचे, आर्थिक प्रश्नच महत्त्वाचे होते. विद्यार्थ्यांचे व समाजाचे प्रश्न एक झाले होते. त्यामुळे या आंदोलनास जनतेचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळाला. व्यापक सामाजिक हिताच्या जाणिवेतून विद्यार्थ्यांनी लढा उभारला, हे या आंदोलनाचे मोठे वैशिष्टय आहे.

सत्ताधारी पक्षातील गटबाजी व विद्यापीठातील भ्रष्टाचार यामुळे विद्यार्थी असंतुष्ट झालेले होते. त्यातच त्यांच्या मूलभूत प्रश्नांची त्यांना जाणीव झाली.

आंदोलनाच्या उद्दिष्टांबाबत मात्र विद्यार्थ्यांच्या मनात गोंधळ होता. त्यामुळे पुढे विद्यार्थ्यांची एकी टिकू शकली नाही. विद्यार्थ्यांमध्ये फूट पडली. आंदोलनाची व्यापकता व तीव्रता कमी झाली.

कोणतीही एक विद्यार्थी संघटना वा विरोधी राजकीय पक्ष समर्थ नसल्याने सर्वांना एकत्र येऊनच आंदोलन चालवावे लागले.

विद्यार्थ्यांना त्यांच्या शक्तीची जाणीव झालेली होती. ती शक्ती काय करू शकते याचे प्रत्यंतर विद्यार्थ्यांनी आणून दिले.

नागरिक समितीचा आंदोलनात महत्त्वाचा वाटा असला तरी, वर्चस्व विद्यार्थ्यांचेच होते.

समाजातील बहुतेक सर्व स्तर सामील झालेले व इतके व्यापक बनलेले हेच महाराष्ट्रातील पहिले विद्यार्थी आंदोलन होय.

■ ■

# २० वसतिगृहांतील विद्यार्थ्यांचे प्रश्न

शांता मालेगावकर

शालांत परीक्षा संपली की, पुढील शिक्षणासाठी कुठल्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा हा प्रश्न विद्यार्थ्यांना सतावू लागतो. त्याच्याच जोडीला, खेडयापाडयांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांना आणखीही एका प्रश्नाला तोंड द्यावे लागते. उच्च शिक्षण घेताना राहावयाचे कोठे ? या प्रश्नाचे उत्तर मिळणे आज अधिकाधिक अवघड होत चालले आहे. अनेक प्रकारच्या निवास-व्यवस्था विद्यार्थ्यांना विचारात घ्याव्या लागतात. त्यापैकी महाविद्यालयांनी चालविलेली वसतिगृहे ही सर्वच विद्यार्थ्यांना अधिक सोईची व पसंतीची वाटत असतात.

लेखाच्या शेवटी दिलेल्या परिशिष्टांमध्ये, नमुन्यादाखल, पुणे विद्यापीठाच्या कक्षेतील महाविद्यालयांच्या वसतिगृहातील उपलब्ध जागांची संख्या दिलेली आहे. ती पाहिली की दोन गोष्टी स्पष्टपणे नजरेसमोर येतात : पहिली, विद्यार्थ्यांची संख्या व वसतिगृहांतील जागा यामध्ये बरीच तफावत आहे. दुसरी, याचा परिणाम म्हणून सर्वच इच्छुक विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन वसतिगृहांत प्रवेश मिळणे अवघड जाते. त्यामुळे बऱ्याच विद्यार्थ्यांना पर्यायी व्यवस्था कराव्य लागतात. स्वतंत्र खोली घेऊन राहाणे, एखाद्याच्या घरी पैसे देऊन राहाणे, खाजगी वसतिगृहांत जागा मिळविणे, इत्यादी. या पर्यायी व्यवस्थांवर विद्यापीठाचे कोणतेच नियंत्रण राहू शकत नाही. त्यामुळे निवास व भोजन या अतिशय निकडीच्या गरजांच्या बाबतीत किमान आवश्यक दर्जा सांभाळला जाईल अशी शक्यता या पर्यायी व्यवस्थेत गृहीत धरता येत नाही. तथापि, प्रस्तुत लेखात या पर्यायी व्यवस्थांमुळे येणाऱ्या अडचणींचा विचार केलेला नाही. त्यासंबंधीची माहिती मिळविणेही उपलब्ध वेळात शक्य झाले नाही. त्यामुळे घर सोडून विद्येसाठी बाहेर पडणाऱ्या व प्रामुख्याने महाविद्यालयांशी संलग्न असणाऱ्या वसतिगृहांत राहाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अडचणींचा विचार करण्याचे येथें ठरविले आहे.

## अभ्यासाचे हेतू

वसतिगृहांतील विद्यार्थ्यांचे प्रश्न समजून घेण्यामध्ये काही विशिष्ट हेतू मनामध्ये बाळगले आहेत. ते पुढील प्रमाणे आहेत :

१. वसतिगृहात राहाणारे विद्यार्थी स्वतःचे घर सोडून आलेले असतात. त्यांना अभ्यासासाठी लागणारे पोषक वातावरण, भावनिक स्थैर्य, निवासासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी, या सुविधा पुरविण्याची जबाबदारी वसतिगृहाच्या चालकांवर येऊन पडते. त्यासाठी चालकांना पर्यायाने अनेकविध भूमिका वठवणे क्रमप्राप्त ठरते. कुटुंबातील वडीलधाऱ्या माणसाची भूमिका

त्यांना वठवावयाची असते, त्याचबरोबर समवयस्क व्यक्तीची, मित्रत्वाची भूमिकाही वठवावयाची असते; शिवाय वसतिगृहातील सोयी-सवलती विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देताना, अपेक्षित अशा प्रशासकांच्या भूमिकेचा मेळ चालकांना वरील गोष्टींशी घालावा लागतो. व्यवस्थापनाच्या मर्यादा व त्याबरोबर, या भूमिका न समजल्याने विद्यार्थ्यांचे अनेक प्रश्न निर्माण होतात.

२. अनेक विद्यार्थी एका ठिकाणी राहात असल्यामुळे निर्माण झालेल्या परस्पर संबंधांतून काही प्रश्न उद्भवतात. अनेकदा भिन्न आर्थिक व सामाजिक स्तरातील विद्यार्थी वसतिगृहात एकत्र येतात. त्यामुळे त्यांच्यातील संबंधांत तणाव निर्माण होण्याची शक्यता असते. या तणावांचे ज्ञान विद्यार्थ्यांमधील सलोखा वाढविण्याकरिता उपयुक्त होईल.

३. वसतिगृहात राहाणाऱ्या बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या बाबतीत घरातील शैक्षणिक वातावरण विशेष पोषक नसते. या विद्यार्थ्यांसाठी कोणते कार्यक्रम वसतिगृहात आखले जातात हे पाहिले पाहिजे. या कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमधील कमतरता व अनेक अनावश्यक अडचणी दूर करणे शक्य आहे.

४. शिक्षणकाळात विद्यार्थ्यांना वसतिगृह हे आपले घर आहे असा अनुभव येणे आवश्यक आहे. या दृष्टीने वसतिगृहातील सोयी, जेवण, आरोग्य या सर्व व्यवस्थेत कोणत्या गोष्टी लक्षात घेतल्या जाव्यात, व घराचा आपुलकीचा संस्कार विद्यार्थ्यांना अनुभवण्यास कसा मिळेल याचा विचार उचित आहे.

५. समवयस्कांच्या सहवासात राहाण्याने विद्यार्थ्यांना होणारा फायदा विचारात घेऊन वसतिगृहाच्या रचनेचा विचार करणेही योग्य होईल.

या सर्व हेतूंनी वसतिगृहांत राहाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नांबद्दल माहिती मिळविणे आवश्यक वाटते. ही माहिती मिळविण्यासाठी वसतिगृहांचे निरीक्षण करणे आणि वसतिगृह व्यवस्थापक, वसतिगृहात राहिलेले व राहाणारे विद्यार्थी, तसेच याबद्दल विचार केलेल्या व्यक्ती, या सर्वांशी चर्चा करणे आवश्यक होते. या चर्चा काही मुद्द्यांच्या आधारे केल्या. त्यांतील प्रमुख अडचणींचे मुद्दे पुढीलप्रमाणे होते : प्रवेश, आर्थिक स्थिती, आरोग्य, जेवण-खाण, अभ्यास व वैयक्तिक सवयी, सहवासी विद्यार्थी, सुविधा, नियम, व्यवस्थापन व व्यवस्थापकांचा दृष्टिकोन. महाराष्ट्रातील अनेक ठिकाणच्या वसतिगृहांतील विद्यार्थ्यांचा व व्यवस्थापकांचा अनुभव समजून घेण्याचा प्रयत्न, सप्टेंबर १९७८ च्या 'मैत्रीच्या पलीकडे' या नियतकालिकाच्या वसतिगृहावरील खास अंकासाठी करण्यात आला होता. या निरीक्षणाला जोड म्हणून, प्रस्तुत लेखाच्या निमित्ताने, पुन्हा नव्याने संबंधित घटकांशी चर्चा केल्या व वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे स्वरूप जास्तीत जास्त बाजूंनी पाहाण्याचा प्रयत्न केला.

**लेखाची मांडणी**

विद्यार्थ्यांच्या अडचणींची चर्चा पुढील क्रमाने केलेली आहे :

–अडचणींची उगमस्थाने : प्रवेश, आर्थिक स्थिती, सुविधा, जेवण, आरोग्य, वैयक्तिक सवयी, व्यवस्थापन, अभ्यास, विकास, सहवास, सहभागाची जाण

–विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन

–वसतिगृहांचे अपेक्षित कार्य

–सद्य:स्थितीत वसतिगृहात चालू असलेले विद्यार्थी विकासाचे कार्य व त्यातील त्रुटी

–वसतिगृहे ही समर्थ विकास केन्द्रे होण्यासाठी कोणते बदल हवे आहेत ?

उच्च शिक्षणार्थ दुसऱ्या गावी आल्यानंतर, तेथील महाविद्यालयामध्ये प्रवेश मिळविणे विद्यार्थ्यांना एकवेळ सोपे जाते; परंतु तेथे राहाण्याची जागा शोधणे व त्यातही महाविद्यालयाच्या वसतिगृहात प्रवेश मिळविणे ही गोष्ट अतिशय अवघड झालेली आहे. याची कारणे विविध आहेत. महाविद्यालयाच्या वसतिगृहातील प्रवेशासाठी प्रामुख्याने मागील परीक्षेचे गुण विचारात घेतले जातात. दुसरे म्हणजे पैशाअभावी विद्यार्थ्यास परगावी पाठविण्याचा निर्णय पालकांकडून अनेकदा उशिरा घेतला जातो, व त्यावेळी वसतिगृहातील उपलब्ध जागांची संख्या कमी झालेली असते. शिवाय नावाजलेल्या महाविद्यालयांच्या वसतिगृहांतील प्रवेशाचे निकष काही अडचणी निर्माण करतात. परंतु सर्वसाधारणपणे वशिला, ओळख इत्यादी गोष्टी अडचणी म्हणून अनुभवास येत नाहीत.

तथापि, ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश घेताना भासणाऱ्या अडचणी इतरही अनेक गोष्टींवर प्रकाश टाकतात. शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये इष्ट तो बदल घडून आलेला नाही, याचा प्रत्यय विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या अडचणींचे स्वरूप पाहताना येत होता. वसतिगृहाच्या प्रवेशासाठी भरावयाचे अर्ज, त्या सोबत जोडावयाची कागदपत्रे, वसतिगृहाच्या विविध नियमांचा अन्वयार्थ, या सर्व गोष्टी विद्यार्थ्यांना अडचणीच्या भासतात. याचे निदर्शक म्हणजे गाववाले विद्यार्थी एकमेकांच्या आधाराने बिचकत बिचकत वसतिगृहांच्या कार्यालयात चकरा मारत राहिलेले दिसतात. या विद्यार्थ्यांचा बुजरेपणा केवळ नव्या ठिकाणचा परिचय नाही इतक्याच अर्थाने तात्पुरता नसतो. या विद्यार्थ्यांपैकी काहींनी सांगितलेला अनुभव त्यांच्या परिस्थितीचा निदर्शक आहे.

" वसतिगृहाच्या कार्यालयाची इमारत, मोठ्या आवाजात बोलणारे तेथील कर्मचारी, रांगेमधील पुढील व मागील प्रचंड गर्दी पाहून भांबावल्यामुळे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देताना लागणारा वेळ, या सर्व गोष्टी ही माझ्या अडचणींची एक बाजू. काहीही विचारले तरी, 'हो' किंवा 'नाही' व ते सुद्धा अगदी तोंडातल्या तोंडात बोलून वेळ मारून न्यायची. या बुजरेपणामुळे माझी अडचण, माझे प्रश्न, समोरच्या व्यक्तीला मला कधी सांगताच आले नाहीत. अजूनही हा बुजरेपणा मला फार त्रास देतो." ही प्रतिक्रिया दाखविणारा विद्यार्थी बुद्धीने हुशार व काही निश्चित हेतू ठेवून शिक्षण घेणारा आहे. अकरावी-बारावीत वसतिगृहात राहायला येणाऱ्या विद्यार्थ्यांना, इतरांबरोबर बोलणे संभाषण करणे, जमत नाही. त्यामुळे साध्या-साध्या किरकोळ शंका प्रचंड वाटतात, व त्यांचे ओझे वागवत व अंगभूत बुजरेपणा संभाळीत वागणे हा या विद्यार्थ्यांचा एक वर्तन-विशेष बनून राहातो. स्वच्छतागृह कोठे आहे हे शोधणेसुद्धा अवघड जाते असाही अनुभव एकाने सांगितला.

प्रवेशासंबंधीची दुसरी महत्त्वाची अडचण ही पैशाची असते. वसतिगृहाचे ठरलेले प्रवेश शुल्क भरणे आवश्यक आहे या गोष्टीची समजूत विद्यार्थ्यांना जणू येत नसावी. पैसे भरण्यासाठी मुदत वाढ मिळावी म्हणून व्यवस्थापकांना ते जी गळ घालतात त्यावरून हे दिसून येते. ही अडचण दुर्बल आर्थिक परिस्थितीतून येते, हे मान्य करूनसुद्धा व्यवस्थापकांनी याबाबत नोंदविलेले अनुभव विचार करण्याजोगे आहेत : प्रवेशाचे वेळी भरावयाच्या शुल्काची रक्कम प्रवेशाचा अर्ज व जोडीचे माहिती पत्रक यामध्ये देऊनसुद्धा विद्यार्थ्यांबरोबर येणारी पालक मंडळी 'त्यात काही कमी करा.' किंवा 'सवडीने देण्याची सवलत द्या.' अशा तऱ्हेची विनंती करीत राहातात. या विनंतीला मान्यता देणे अशक्य असते ही गोष्ट ते समजून घेऊ शकत नाहीत. पालकांच्या या वागण्याचा थोडासा खोलात शिरून विचार केला तर आपली सार्वजनिक वर्तणूक-

ही या पाठीमागे असावी असे वाटते. आतापर्यंत त्यांना त्यांच्या पैशाच्या व्यवहारात पुढे-मागे करून चाललेले असते. त्यामुळे वसतिगृहातही अशी चालढकल चालेल असे ते समजतात. आपल्या पाल्याच्या मनावर या चालढकलीचा काही विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे हेही त्यांच्या मनात येत नसावे. त्यांच्या बरोबर वावरणारा त्यांचा मुलगा किंवा त्यांची मुलगी यांनाही आपल्या पालकांनी अशा पद्धतीने चालकांशी बोलावे यात प्रथमदर्शनी तरी काही गैर आहे असे जाणवत नसावे. आपल्या आर्थिक अडचणींचा पाढा वाचून दाखविणे गैर आहे अशी जाणीव क्वचित दिसते.

मुलाला शिकण्यासाठी परगावी ठेवण्याच्या निर्णयाबरोबर त्याकरिता लागणाऱ्या खर्चाची योजना न करता काही पालक, शालांत परीक्षेचे निकाल हाती आल्यानंतर सावकाश, जमेल तसे आणि जमेल तेवढ्या काळापुरते, मुलाला शिकायला पाठवितात. याला अपवाद म्हणजे बऱ्या आर्थिक स्थितीतील घरातून, तसेच मोठ्या शहरांतून येणाऱ्या पालकांचा असतो. त्यांना वस्तुस्थितीचे आकलन झालेले असते, व त्या दृष्टीने नियोजन करून आपल्या पाल्याच्या प्रवेशाची व त्याचबरोबर त्याला दरमहा लागणाऱ्या खर्चाची व्यवस्था ते करीत राहातात.

## आर्थिक अडचणी

बहुसंख्य विद्यार्थी आर्थिकदृष्टया कनिष्ठ व मध्यम परिस्थितीच्या कुटुंबातील असतात. वर सांगितल्याप्रमाणे अशा विद्यार्थ्यांचे पालक आपल्या पाल्याच्या शिक्षणाचा खर्च नियोजनबद्ध करीत नाहीत. त्यामुळे निवास, भोजन व महाविद्यालयाचे शुल्क या गोष्टी भागविल्यानंतर या विद्यार्थ्यांच्या हातात दैनंदिन खर्चासाठी जवळपास काहीच पैसा उरत नाही. वह्या-पुस्तके यांसारख्या आवश्यक गोष्टी घेण्यासाठी सुद्धा सतत पालकांकडे पैशाची मागणी त्यांना करावी लागते. त्यामुळे आर्थिक विवंचनेतून निर्माण होणारा मानसिक ताण सहन करीत हे विद्यार्थी शिक्षण घेत राहातात. बँका वा अन्य संस्थांकडून कर्ज घेण्याची कल्पनाही त्यांना व त्यांच्या पालकांना मान्य होत नाही. त्या ऐवजी एखाद्या व्यक्तीकडून हातउसने पैसे घेणे त्यांना बरे वाटते.

स्वतः श्रम करून आर्थिक अडचणींवर काही प्रमाणात तोड काढण्याचा विचार करणारा विद्यार्थी सहसा आढळत नाही. 'कमवा-शिका' योजनांमध्ये समाविष्ट झालेले थोडे विद्यार्थी स्वावलंबनानेच शिक्षण पुरे करावयाचे आहे अशी खूणगाठ बांधून महाविद्यालयात येतात. पण अशा योजना व त्यांचा लाभ घेणारे विद्यार्थी यांची संख्या अतिशय मर्यादित आहे. उलटपक्षी, शिक्षणाच्या काळामध्ये आपल्याला पैसा पुरविणे हे पालकांचे कर्तव्य आहे अशी बहुसंख्य विद्यार्थ्यांची धारणा असते. त्यामुळे पालकांनी पैसा वेळेवर पाठविला नाही तर खंत करीत बसणे, कुरकुरणे, आणि पर्यायाने स्वतःच्या कार्यक्षमतेचा ऱ्हास करून घेणे, अशी वाटचाल करण्यात बहुसंख्य विद्यार्थ्यांना काही गैर वाटत नाही. वसतिगृहात राहण्याचा खर्च किती येईल हे माहीत असूनही त्याची व्यवस्था जाणीवपूर्वक करण्याची जरूरी पालकांना व विद्यार्थ्यांना वाटू नये हा सामाजिक त्रुटीचा एक भाग आहे.

मनीऑर्डरकडे डोळे लावून बसणारे, महिन्याच्या शेवटी तासंतास खोलीत झोपून जाणारे, जवळचे पैसे संपल्यानंतर मित्राजवळ पैसे मागणारे विद्यार्थी अपवादात्मक नाहीत. वसतिगृहाचा खर्च भागविण्यासाठी शासकीय सहाय्य घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही या परिस्थितीला तोंड द्यावे लागते. कारण नेहमीचेच असते : हे सहाय्य वेळेवर हाती येत नाही, व अनेकदा आलेले पैसे कुटुंबियांच्या काही प्राथमिक गरजा पुऱ्या करण्यासाठी देण्याची गळ पालक घालतात. परिणामी ज्या हेतूने

समाजाने वा शासनाने शिक्षणासाठी पैसा उपलब्ध करून दिलेला असतो, तो हेतू बाजूला राहातो; व आर्थिक टंचाईचा विचार करीत विद्यार्थी पुन्हा स्वतःला दूषणे देत वावरत राहातात.

## सुविधा

बहुसंख्य वसतिगृहांतील खोल्यांत टेबल, खुर्ची, दिवा या गोष्टींची व्यवस्था केलेली दिसते. तथापि, काही महाविद्यालयांच्या वसतिगृहांमध्ये अपुरे दिवे, टेबल-खुर्चीसारख्या गोष्टी जवळपास नसणे, असेही दृश्य आढळून आले. काही वसतिगृहामध्ये पाणी कमी-अधिक प्रमाणात असते. काही ठिकाणी तर झोपायला निश्चित जागा देणे एवढीच वसतिगृह व्यवस्थापनाची जबाबदारी असावी असे आढळले. त्याचे कारण या व्यवस्थापनास महाविद्यालयातील वसतिगृहाच्या शैक्षणिक भूमिकेचे उद्‌बोधन कोणत्याच प्रकारे झालेले नसावे असे असू शकेल.

उपलब्ध असलेल्या सुविधांचा विचार विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून करताना प्रामुख्याने खालील गोष्टी निदर्शनास आल्या. ‘आमच्या घरी असलेल्या सोयीपेक्षा कितीतरी अधिक चांगली सोय होत आहे. आम्हाला घरी स्वतःसाठी स्वतंत्र अशी जागा कधी नव्हतीच; उलट येथे वसतिगृहातील खोली ही आपल्याकरिता आहे हा अनुभव वेगळा व अभ्यासाच्या दृष्टीने घरच्या तुलनेत उजवा आहे.’ या दृष्टिकोनातून पाहाणाऱ्या विद्यार्थ्यांना वसतिगृहातील काही सुविधांच्या अभावी अभ्यासात व्यत्यय येतो असे दिसले नाही.

आर्थिकदृष्टचा चांगल्या स्थितीतील विद्यार्थी-विद्यार्थिनींना अभ्यासासाठी लागणाऱ्या सुविधांशी परिचित असल्याने हा गट वसतिगृहामध्ये मिळणाऱ्या सुविधांवर टीका करताना आढळतो. विशेषतः मुंबईसारख्या ठिकाणी खोलीमध्ये पंखा नसणे, प्यायला गार पाणी नसणे, चोवीस तास पाण्याची सोय नसणे, अशा सारख्या गोष्टी त्यांच्या कार्यक्षमतेत अडथळे आणतात. व्यवस्थापक अशा गोष्टींकडे फारच दिरंगाईने लक्ष पुरवितात असा अनुभव विद्यार्थ्यांनी सांगितलेला आहे.

अभ्यासासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधांच्या जोडीला करमणूक, छंद, वगैरेंच्या जोपासनेसाठी वसतिगृहात कोणत्या सुविधा असतात याचा विचार केला. बहुसंख्य वसतिगृहांतून विद्यार्थ्यांना या दृष्टीने उपयोगी ठरतील अशा गोष्टी पुरविलेल्या आढळल्या नाहीत. विद्यार्थ्यांनीही स्वतंत्र ग्रंथालये वा खेळांच्या सोयी वसतिगृहात असाव्यात अशी मागणी केलेली नाही. किंबहुना वसतिगृह व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांच्या फावल्या वेळाची दखल विधायक पद्धतीने घ्यावयाची आहे हा विचार विद्यार्थ्यांमध्ये अभावानेच आढळला.

## जेवण

विद्यार्थ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय म्हणजे वसतिगृहातील जेवणाची व्यवस्था. निवाऱ्याच्या जोडीस वेळेवर होणारी, बऱ्यापैकी जेवणाची सोय ही नित्याची गरज असते. तथापि, वसतिगृहातील जेवणाबद्दल समाधान कोणत्याही विद्यार्थी गटाने व्यक्त केले नाही. त्यांच्या मते, द्यावा लागणारा पैसा व मिळणारे जेवण यांच्यात गुणवत्तेच्या दृष्टीने फारच तफावत आढळते. काही वसतिगृहात विद्यार्थ्यांकडून अल्प आकार घेऊन ठराविक जेवण विद्यार्थ्यांना देण्याची व्यवस्था होते. या जेवणाबद्दल विद्यार्थ्यांच्या काही रास्त अडचणी आढळल्या. हे जेवण ठराविक चवीचे असल्याने, विद्यार्थ्यांच्या वयोगटाचा विचार करता, या पद्धतीचा त्यांना कंटाळा येणे स्वाभाविक आहे.

जेवणाच्या संदर्भात आणखीही काही गोष्टी नजरेस आल्या : स्वयंपाक व जेवण याकरिता वापरली जाणारी भांडी स्वच्छ असणे, भोजनगृहांची व मोऱ्यांची सफाई, पाण्याची विपुलता अशा गोष्टींकडे वसतिगृहाच्या व्यवस्थापनाचे बारकाईने लक्ष हवे. प्रत्यक्षात अशा प्रकारची व्यवस्था

क्वचित आढळते. त्यामुळे जेवणासारख्या आवश्यक गोष्टींबाबत व्यवस्थापनासंबंधी विद्यार्थ्यांची तक्रार अनुभवास आली. वसतिगृहातील त्रासदायक वाटणाऱ्या व घरची आठवण वारंवार करून देणाऱ्या गोष्टींमध्ये अग्रक्रम जेवणास देता येईल असे विद्यार्थ्यांनी सांगितले.

बहुसंख्य वसतिगृहांतून मध्यान्ह व रात्र या दोन वेळी जेवण असते. सकाळी व दुपारी न्याहारीची व्यवस्था विद्यार्थ्यांना वेगळी करावी लागते. या व्यवस्थेची जबाबदारी पूर्णपणे विद्यार्थ्यांवरच पडते. विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती व खाद्यपदार्थांची वाढती किंमत लक्षात घेता विद्यार्थ्यांना सकाळी व दुपारी न्याहारी करणे अवघड आहे.

## आरोग्य

बहुसंख्य वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांकरिता आजारीपणात वैद्यकीय मदत उपलब्ध करून दिली जाते. या सुविधेमधून आरोग्य कसे राखावे, व्यायाम कसा व केव्हा करावा, स्वतःची व निवासस्थानाची स्वच्छता कशी राखावी, सामुदायिक आरोग्य राखण्यासाठी कोणती खबरदारी घ्यावी-यासारख्या गोष्टींबद्दलचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळत नाही. अर्थात वसतिगृह व्यवस्थापनाकडून असे काही मार्गदर्शन मिळावे अशी विद्यार्थ्यांचीही अपेक्षा आढळली नाही. विद्यार्थ्यांच्या काही सवयी वसतिगृहास विशोभनीय व आरोग्य विघातक ठरतात; उदाहरणार्थ तंबाखू खाणे व थुंकणे, मिश्री लावणे. सवयींच्या दुष्परिणामाचा अनुभव येऊनही विद्यार्थी त्यासंबंधी काही करताना दिसले नाहीत. ग्रामीण भागातील एका महाविद्यालयाच्या वसतिगृह-व्यवस्थापकाने केलेला पुढील प्रयोग उल्लेखनीय आहे. बहुसंख्य विद्यार्थ्यांत तंबाखू खाणे, मिश्री लावणे आणि कुठेही थुंकणे या सवयी आढळल्या. विशेषतः भिंतीचे व जिन्यातील कोपरे अशा ठिकाणी विद्यार्थ्यांना थुंकताना पाहून व्यवस्थापकांनी अनेकदा सूचना दिल्या. कोणताच बदल दिसला नाही, तेव्हा व्यवस्थापकांनी त्या ठिकाणी आदर्श नेत्यांच्या व देवादिकांच्या प्रतिमा लावाव्यात की काय याचा विचार सुरू केला. पण याचा उपयोग ही सवय जाण्यासाठी होईल काय, याबद्दलही साशंकता बाळगणारे काही विद्यार्थी व व्यवस्थापक आढळले.

## अभ्यास

वसतिगृहातील विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या संदर्भात कोणत्या विशेष अडचणी येतात या प्रश्नाबाबत पुढील प्रतिक्रिया व्यक्त झाल्या : बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या मते, घराच्या तुलनेत वसतिगृहात अभ्यासाला पोषक अशी जागा मिळते. प्रकाश व्यवस्था, आजबाजूला समवयस्क व वर्गातील काही सहाध्यायी, जवळच असणारे महाविद्यालयाचे वाचनालय यासारख्या गोष्टींमुळे अभ्यास करावयाचे ठरविले की त्यात अडचणी येत नाहीत. वसतिगृहात गुणानुक्रमे प्रवेश दिल्याने बरेचसे विद्यार्थी अभ्यास करणारे असतात. परंतु काही ठिकाणी, अभ्यासास लागणारी शांतता नाही ही तक्रार आढळली. संपूर्ण वेळाचे नियोजन करणारे विद्यार्थी फार कमी आढळले. संपूर्ण वेळाचे नियोजन करणारे विद्यार्थी फार कमी आढळले. अभ्यासाला केव्हा बसावे, व्यायाम केव्हा करावा, महाविद्यालयातील आवश्यक अशा इतर गोष्टी केव्हा पूर्ण कराव्यात,समवयस्क मित्रांशी बोलण्यात किती वेळ घालवावा, यासारख्या गोष्टींची योजना करण्याचे काम त्यांना सुरूवातीच्या काळात तरी अवघड गेल्याचे आढळले. स्वतःच्या वेळाचा वापर काही उद्दिष्टे ठेवून करावयाचा आहे व वसतिगृहात राहिल्यामुळे मिळालेल्या स्वातंत्र्याचा उपयोग करून वेळेचे नियोजन केले पाहिजे हा विचार करणारे विद्यार्थी अगदी तुरळक आढळले. अनेक वसतिगृहांतून अभ्यासाचे तास आखून दिलेले असतात, व तेवढ्या काळापुरती व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांना एकमेकांच्या खोल्यांमध्ये जाण्याची बंदी केलेली असते. अशा प्रकारच्या बाह्य नियंत्रणाची जरुरी यावी हे विद्यार्थ्यांच्या अकार्यक्षम पद्धतीचे द्योतक आहे.

वसतिगृहातील विद्यार्थ्यांना अभ्यास कसा करावा, अभ्यासातील अडचणींचे निराकरण कसे करावे, संदर्भ पुस्तके कोठून मिळवावीत, वगैरे बाबींमध्ये काही विशेष लक्ष पुरविले पाहिजे असे वाटल्याचे आढळले नाही.

बहुसंख्य वसतिगृहांतून परीक्षेपूर्वीच्या थोड्या काळात परीक्षेपुरता अभ्यास करणारे परीक्षार्थीच आढळतात. तेथे मिळणाऱ्या स्वातंत्र्याचा व समवयस्क विद्यार्थ्यांचा लाभ घेऊन व परीक्षेच्या पलीकडे जाऊन अभ्यास विषय हाताळावेत असे प्रयत्न होताना दिसले नाहीत. अभ्यासाची जपणूक ही इतकी वरवर केली जाते की, त्याच्या जोडीला, स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक त्या गोष्टी करण्याची सवय लावून घेण्याचा हेतुपूर्वक प्रयत्न करणारे विद्यार्थी आढळले नाहीत. वसतिगृह-निवास हा व्यक्तिमत्वामध्ये बदल घडवून आणावयास पोषक ठरू शकतो, असा अनुभव आल्याचे किंवा तशी अपेक्षा असल्याचेही आढळले नाही. त्यामुळे स्वतःच्या विकासासाठी परिस्थितीचा उपयोग करण्याकरिता लागणारे स्वावलंबन क्वचित प्रसंगी दाखविले जाते. भावी आयुष्यात सुजाण व सुक्षम नागरिक या नात्याने वावरण्यासाठी तयारी करण्याचा कालखंड म्हणून वसतिगृहांतील वास्तव्याचा उपयोग केला पाहिजे, अशा प्रकारची प्रेरणा बहुसंख्य विद्यार्थ्यांत आढळली नाही.

विद्यार्थ्यांच्या या वागण्याचे कारण असे असावे की, त्यांना वसतिगृह-निवास कोणत्या पद्धतीने फलदायी करून घेता येतो याचे मार्गदर्शन कोणत्याच वेळी मिळालेले नाही. व्यवस्थापनालाही, वसतिगृहांतील विद्यार्थ्यांचे असे काही विशेष प्रबोधन करणे ही आपली जबाबदारी आहे असे वाटलेले नाही.

## सहवास

वसतिगृहाचे आकर्षण वाटण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे विद्यार्थ्याला मिळणारा समवयस्कांचा सहवास. पण हा सहवास नेहमीच हितकरी असेल असे नाही. स्वतःच्या खोलीतील तसेच वसतिगृहातील सर्व विद्यार्थ्यांशी येणारा संबंध विद्यार्थ्यास अनेक गोष्टी न कळत शिकवून जातो. या दृष्टीने समयवयस्कांच्या सहवासामुळे कोणते प्रश्न निर्माण होतात याचा विचार करणे अगत्याचे ठरले. विद्यार्थ्यांनी नजरेला आणून दिलेल्या काही गोष्टी पुढीलप्रमाणे आहेत : अयोग्य सोबती, सहनिवासी विद्यार्थ्यांच्या वाईट सवयींचा उपद्रव, गप्पांमध्ये वेळ जाणे वगैरे, इतर विद्यार्थ्यांच्या दडपणामुळे त्यांना अनिच्छेने अनेक गोष्टी कराव्या लागतात, अशी तक्रार बहुतेक सर्वच विद्यार्थ्यांनी केली. ही तक्रार मांडत असताना विद्यार्थ्यांच्या बोलण्यातून काही गोष्टी स्पष्ट झाल्या. व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या व शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांना मोकळा वेळ थोडा मिळतो. उलट कला व वाणिज्य शाखांच्या विद्यार्थ्यांना मोकळा वेळ बराच मिळतो. या मोकळ्या वेळाचा योग्य उपयोग करण्यासाठीं कोणताही जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची सवय लागलेली नसते. त्यामुळे एकमेकांच्या क्षुल्लक चेष्टा करणे, दुसऱ्यावर टीका करणे, महाविद्यालयातील प्राध्यापक-प्राध्यापिका आणि बरोबरीच्या विद्यार्थिनी यांच्याविषयी चर्चा करत बसणे, अशासारख्या गोष्टी करण्यात वेळ घालवला जातो. यामुळे वसतिगृहातील काही विद्यार्थ्यांच्या खोल्या या गप्पांचे अड्डे बनून राहातात. या गप्पांमध्ये, इतर अनेक विषयांबरोबर, विद्यार्थी मुलींविषयी व विद्यार्थिनी मुलांविषयी एकमेकांना वाटणाऱ्या नैसर्गिक आकर्षणामुळे, मनात येणारे विचार बोलत राहातात. अशा गोष्टी मोकळेपणाने बोलण्याचा संकोच वाटल्याने त्यांच्यापैकी काहीजण त्या गटापासून मनाने लांब राहातात. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांचा एक प्रकारे मानसिक कोंडमारा होतो. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल, शारीरिक दृष्ट्या कुरूप, किंवा बौद्धिक दृष्ट्या असमर्थ असलेल्या विद्यार्थ्यांच्या मनातील न्यूनगंड, वसतिगृहातील असल्या मनमोकळ्या चर्चासत्रांतून कमी होण्याऐवजी

वाढण्याची शक्यता अधिक असते. याचे कारण या गप्पांमध्ये भाग घेण्यास लागणारे धारिष्ट या दुर्बल विद्यार्थ्यांमध्ये नसल्याने ते श्रोत्यांची भूमिका बजावीत राहतात. वसतिगृहातील विद्यार्थ्यांमधील मानसिक घडामोडींचा शास्त्रशुद्ध विचार करण्याची गरज या निमित्ताने जाणवू लागली आहे. समवयस्कांचा सहवास कोणत्या गोष्टींना प्रेरणा देतो, याचा विचार केला तर महाविद्यालयीन वसतिगृहांत राहणाऱ्या विद्यार्थ्यांना समवयस्कांच्या सहवासामधून काही विशेष अनुभूती मिळतात असे जाणवले नाही.

वरील अनुभवास आणखीही एका गोष्टीमुळे पुष्टी मिळते. वसतिगृहातील विद्यार्थी फुरसतीच्या वेळात कोणते उपक्रम करतात, या उपक्रमांचे वैयक्तिक व सामुदायिक स्वरूप कोणत्या प्रकारचे आहे, या गोष्टींची चर्चा विद्यार्थ्यांबरोबर केली. विद्यार्थ्यांचा एखादा गट स्वतः पुढाकार घेऊन काही उपक्रम चालवत असल्याचे दृश्य अभावानेच आढळते. एकत्र सहलींसारखे उपक्रम देखील अतिशय तुरळक स्वरूपात आढळले. जात्या कलानिपुण असलेल्या एखाद्या विद्यार्थ्याच्या कलेचा आस्वाद घेण्याकडें काहींचा कल दिसतो. तथापि, स्वतः आपल्या मित्रांकडून काही शिकावे असा प्रयत्न होताना आढळत नाही. बहुतेक विद्यार्थ्यांचा वेळ अगदीच क्षुल्लक गोष्टी बोलण्यात खर्च होताना आढळतो. चांगल्या पुस्तकांचे वाचन व त्यावर चर्चा, वर्तमानपत्रांतील लिखाणाच्या संदर्भात देवघेव या वा अशासारख्या, विचारप्रक्रियेला मदत करणाऱ्या उपक्रमात रस घेणारे विद्यार्थी अल्पसंख्य दिसलें.

### सहभाग

वसतिगृहात अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. तेथील दैनंदिन देखभालीत विद्यार्थी भाग घेतात का, तसेच व्यवस्थापन, विद्यार्थ्यांचा सहभाग यामध्ये अपेक्षिते काय, या प्रश्नांवर विद्यार्थ्यांशी चर्चा केली. या संदर्भात काही महत्त्वाचे विचार व्यवस्थापन व विद्यार्थी यांनी मांडले. विद्यार्थ्यांच्या मते, 'वसतिगृहांच्या व्यवस्थापनात भाग घेण्यास आम्हाला सवड नाही, व आम्ही भाग घ्यावा अशी व्यवस्थापनाची अपेक्षाही नाही.' काही महाविद्यालयांतील वसतिगृहांतून नियमपालनाच्या संदर्भात विद्यार्थ्यांवर लक्ष ठेवण्याकरिता विद्यार्थी प्रतिनिधी निवडले जातात. विद्यार्थ्यांच्या मते बहुधा विद्यार्थी प्रनिनिधीची निवड करताना, तो स्वतः शिस्तप्रिय आहे हे पाहिले जाते; तथापि, इतर विद्यार्थ्यांचे प्रश्न समजूण घेणे वा एखादा नियम भंग झाला असल्यास त्याची कारण मीमांसा करणे विद्यार्थी प्रतिनिधींना जड जाते. व्यवस्थापनाच्या बाजूने मात्र, विद्यार्थी प्रतिनिधीने असा काही पुढाकार घ्यावा अशी अपेक्षा असत नाही. उलट विद्यार्थ्यांच्या शासनयोग्य अशा सर्व वर्तनांची नोंद करणारा आपला हस्तक म्हणून विद्यार्थी प्रतिनिधी कडे व्यवस्थापन पहाते, असाही तक्रारीचा सूर विद्यार्थ्यांच्या बोलण्यातून आला. विद्यार्थ्यांचे विचार ऐकत असताना एक महत्त्वाची गोष्ट जाणवत होती ती म्हणजे, वसतिगृहाचे दैनंदिन काम चालविण्याची ज़बाबदारी आपल्याला पार पाडणे शक्य आहे काय याचा विचार विद्यार्थी क्वचितच करीत. उलटपक्षी व्यवस्थापन अशी संधीच देत नाही, हे पालुपद मांडण्यामध्ये ते रस घेत होते. जबाबदारी स्वीकारण्यासाठी अधिक कष्ट करण्याची जाणीवपूर्वक तयारी हवी. ही तयारी फार कमी प्रमाणात विद्यार्थ्यांमध्ये आढळली. या पाठीमागें, पैशाने सर्व विकत घेता येते ही कल्पना तर नाही ना असाही विचार मनात येऊन गेला. सोयी–सुविधांचा विचार पैशाच्या मोबदल्यात करण्याची सवय आर्थिकदृष्टचा बऱ्या घरांतून आलेल्या मुला-मुलींत अधिक प्रमाणात जाणवली, व त्यांनाच सहभागातून येणारी जबाबदारी स्वीकारणे अवघड जात असावे.

### व्यवस्थापन

घर आणि वसतिगृह या दोन्हीत अनेक महत्त्वाचे फरक आहेत. वसतिगृहाला नियमांची सर्वसामान्य चौकट आवश्यक असते, तर घरांमध्ये काही अलिखित नियम असतात. विद्यार्थी स्वतःची

घरे सोडून वसतिगृहात राहाण्यास येतात त्या वेळेस, वसतिगृहाच्या नियमांची चौकट अंगवळणी पडण्यास थोडा वेळ लागणे व त्रास होणे अपरिहार्य आहे. तथापि, वसतिगृहाचे नियम जाचक वाटून तेथे राहाणे त्रासदायक होत असेल तर वसतिगृहाचा मूळ हेतूच संपून जाईल. या संदर्भात विद्यार्थ्यांचा अनुभव जाणून घेतला. त्या आधारे पुढील गोष्टी निदर्शनास येतात :

१. विद्यार्थ्यांच्या नातेवाईकांना वसतिगृहात एक दिवसही राहाण्याची परवानगी व्यवस्थापन देत नाही. त्यामुळे विद्यार्थी कोणत्या वातावरणात राहातो आहे हे पालकांना समजू शकत नाही. तसेच लांबून येणाऱ्या पालकांना ठराविक वेळेत अगदी औपचारिकपणे पाल्यांची भेट घ्यावी लागते. आमच्या पालकांवर इतका अविश्वास का दाखविला जातो याचे कारण समजत नाही, असे काही विद्यार्थ्यांनी सांगितले.

२. वसतिगृहाचे विविध नियम, विशेषत: वसतिगृहात संध्याकाळी ठराविक वेळेच्या आत परत येण्याचा नियम, हा व्यावसायिक व शास्त्र शाखांच्या विद्यार्थ्यांना मोठा जाचक वाटतो. तरीही या नियमांचे पालन होते की नाही यासंबंधी व्यवस्थापन फारसे कडक धोरण स्वीकारताना दिसत नाही. ' सुरक्षिततेच्या दृष्टीने काही नियम आवश्यक आहेत. तथापि, थोडे फार स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना दिले तर वसतिगृहाची शिस्त संपेल असे नाही, ' असेही मत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.

३. वसतिगृहातील विविध सोयी-सुविधा, त्यांचा वापर आणि स्वच्छता यांचेकडे व त्यातील त्रुटी वा मोडतोड विकोपाला जाईपर्यंत फारसे लक्ष दिले जात नाही.

४. वसतिगृहांचे पर्यवेक्षक त्यांच्या कामाकडे, परिस्थितीने लादलेली जबाबदारी म्हणून अनेकदा पाहात असतात. वसतिगृहातील विद्यार्थ्यांशी त्यांचा परिचय जुजबी असतो. त्यामुळे एखादा विशेष प्रसंग निर्माण झाला तरच विद्यार्थ्यांची वा त्यांच्या प्रश्नांची माहिती पर्यवेक्षक नाईलाज म्हणून गोळा करतात.

५. पर्यवेक्षक व विद्यार्थी यांच्यातील औपचारिक संबंध नित्य अनुभवास येतात. याचा परिणाम असा होतो की पर्यवेक्षकांकडे जाऊन एखादी अडचण विद्यार्थ्याने स्वत: होऊन सांगणे व त्यांच्याकडून आस्थापूर्वक वागवणुकीची अपेक्षा करणे हे सामान्यपणे घडत नाही. काही ठिकाणी पर्यवेक्षक विद्यार्थ्यांशी अतिशय तुटकपणे वागतात. त्यामुळे त्यांच्याबद्दल कोणत्याच प्रकारचा जिव्हाळा वा प्रेम निर्माण होऊ शकत नाही.

विद्यार्थी नियम पाळण्याबाबत किती जागरूक असतात याची चर्चा पर्यवेक्षकांशी केली. या संदर्भात त्यांची मते पुढीलप्रमाणे आहेत :

१. वसतिगृहात राहाणाऱ्या विद्यार्थ्यांत स्वच्छतेचे नियम व सार्वजनिक सुविधा वापरताना घ्यावयाची काळजी या संदर्भातले ज्ञान फारच कमी आढळते. त्यामुळे नळ गळणे, विजेची बटणे खराब होणे, टेबल-खुर्चीची नादुरुस्ती, स्वच्छतागृहे, व्हरांडे इत्यादी ठिकाणचा केरकचरा, यासारख्या गोष्टी नित्याच्या होऊन बसतात. याबाबत सूचना देऊनही विद्यार्थी स्वत:च्या सवयींमध्ये फारसा बदल करताना आढळत नाहीत.

२. घर आणि वसतिगृह या भिन्न प्रकारच्या संस्था आहेत, व तेथील शिस्तीत फरक असणारच. वसतिगृहातील नात्यात औपचारिकपणा अपेक्षित आहे, हे बरेचसे विद्यार्थी समजून घेत नाहीत. त्यामुळे आपल्या बारीकसारीक अडचणी पर्यवेक्षकांनी सोडवाव्यात अशी अपेक्षा विद्यार्थी बाळगतात. आर्थिक अडचणींमध्येही पर्यवेक्षकाने लक्ष घातले पाहिजे अशीही काही विद्यार्थ्यांची अपेक्षा राहाते.

३. विद्यार्थ्यांकडे येणाऱ्या परगावच्या नातेवाईकांना वसतिगृहात राहू द्यावे अशी मागणी बरेच विद्यार्थी करतात. तथापि अशा सवलतींमुळे मुळातच अपुरी असलेली स्वच्छता व अन्य व्यवस्था

या बिघडून जातील, हा विचार अनेक विद्यार्थ्यांना पटत नाही. त्याचप्रमाणे वसतिगृहात राहणाऱ्या नातेवाईकांमुळे इतर विद्यार्थ्यांना त्रास होईल याचा विचार विद्यार्थी करीत नाहीत.

व्यवस्थापन व विद्यार्थी या दोघांशी चर्चा केल्यावर लक्षात येते की, विद्यार्थ्यांचे वसतिगृह-विषयक प्रश्न हे विद्यार्थी व व्यवस्थापक या दोघांच्या भिन्न अपेक्षांतून निर्माण होतात. त्यासाठी विद्यार्थी व व्यवस्थापक अडचणींकडे कोणत्या दृष्टिकोणातून पाहतात हे अभ्यासणे महत्त्वाचे आहे.

### अडचणींकडे पाहण्याचा विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन

उच्च शिक्षण होईतो राहावयाचे ठिकाण या दृष्टीने विद्यार्थी वसतिगृहाकडे पाहात असतात. त्या काळामध्ये वसतिगृह पर्यवेक्षकाने, घरी भागविल्या जाणाऱ्या त्यांच्या अडचणी किंवा गरजा काही प्रमाणात पुऱ्या कराव्यात अशी एक महत्त्वाची अपेक्षा विद्यार्थी बाळगतात. त्यामुळे आपल्या अडचणींकडे पर्यवेक्षक लक्ष देत नाहीत ही बाब त्यांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण करते. विशेषतः लहान गावातून मोठ्या शहरात आलेल्या विद्यार्थ्यांना हा अनुभव येतो.

वसतिगृहातील निवास, जेवण व अभ्यास या सारख्या बाबींबद्दल येणाऱ्या किरकोळ अडचणी आढळतात. परंतु या किरकोळ अडचणी स्वतः होऊन दूर करण्याचा प्रयत्न विद्यार्थी करीत नाहीत. घरापेक्षा काही वेगळे संस्कार वसतिगृहातील निवास करील, व त्यामुळे आपल्या व्यक्तिमत्त्व विकासाला मदत होईल अशी अपेक्षा विद्यार्थी बाळगत नाहीत. म्हणून, आपल्या क्षमतांचा विकास होईल अशा पद्धतीचा अभ्यास, तसेच फावल्या वेळाचे नियोजन, यासारख्या गोष्टींमध्ये मार्गदर्शनाची गरज विद्यार्थ्यांना जाणवलेली नाही. त्यामुळे वसतिगृहांकडून अशा प्रकारची मूलभूत सेवा दिली जात नसूनही, त्या संदर्भात कोणताही प्रश्न विद्यार्थी उपस्थित करीत नाहीत. वसतिगृहातील अडचणींकडे पाहण्याचा विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन हा अतिशय संकुचित झालेला आहे. बरे जेवण व झोपायला जागा, इतक्याच मर्यादित अपेक्षा व त्या बाबतीत त्यांना जाणवणाऱ्या अडचणींचे तपशील, विद्यार्थ्यांच्या बोलण्यात येत राहतात.

### व्यवस्थापनाचा दृष्टिकोन

घरासारखी अनौपचारिक वागवणूक वसतिगृहामध्ये मिळावी या अपेक्षेतून विद्यार्थ्यांच्या अडचणी निर्माण होतात असा विचार व्यवस्थापनाचा दिसतो. वसतिगृहाकडून काय अपेक्षिले पाहिजे याचा विचार करावयास विद्यार्थ्यांना शिकवण्याची गरज आहे, व त्यासाठी काही प्रयत्न केला पाहिजे, याची जाणीव व्यवस्थापनामध्ये आढळत नाही. आर्थिक दौर्बल्य व नियमांचे पालन करण्यातील चुकारपणा यातून विद्यार्थ्यांच्या जेवण, निवास वगैरे बद्दलच्या अडचणी उद्भवतात असे व्यवस्थापनाचे मत दिसले. या व्यतिरिक्त इतर काही विशेष अडचणी निर्माण होतात असे जाणवलेले व्यवस्थापक कमी दिसले. विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्यामध्ये उपयोगी ठरणारे असे व्यक्तिमत्त्व वसतिगृह विकसित करू शकेल व त्या दृष्टीने नियोजित कार्यक्रम आखण्याची जबाबदारी वसति गृह संस्थेने स्वीकारली पाहिजे हा विचार व्यवस्थापक मंडळींना अद्याप तरी जाणवलेला आढळल नाही.

### वसतिगृहांचे अपेक्षित कार्य

उच्च शिक्षण घेणारे व प्रामुख्याने लहान गावातून शिक्षणासाठी आलेले विद्यार्थी एकत्र येण्याचे ठिकाण म्हणजे वसतिगृह. म्हणून वसतिगृहाकडून काही महत्वाच्या गोष्टी अपेक्षिणे रास्त ठरते. बहुसंख्य विद्यार्थी आर्थिक तसेच सामाजिकदृष्टया कनिष्ठ परिस्थितीतून आलेले असतात. शिक्षणाचा अनुभव घेणारी, त्यांच्या घरातील त्यांचीच पहिली पिढी असते. शालेय शिक्षणाची

आजची अवस्था लक्षात घेता, योग्य शैक्षणिक वातावरणास वंचित असलेल्या या विद्यार्थ्यांसाठी काही विशेष उपक्रम योजून त्यांना इष्ट ते अनुभव दिले जाण्याची शक्यता सध्या तरी दिसत नाही. याचा परिणाम म्हणून, उच्च शिक्षणासाठी दाखल झालेले हे विद्यार्थी अभ्यास कसा करावा, विविध विषयांवर आवश्यक ती माहिती कोठून मिळवावी, ग्रंथालयाचा फायदा कसा घ्यावा या सारख्या गोष्टींबाबत अननुभवीच राहतात. त्याचप्रमाणे अत्यावश्यक संभाषण कौशल्य, इतरां-बरोबर विचार विनिमय करण्याइतके ज्ञान, स्वतःचे विचार इतरांपुढे मांडण्याचे धाडस, आपली अडचण सोडविण्यासाठी कोणता प्रयत्न केला पाहिजे याची जाण, वगैरे आवश्यक गोष्टी कर-ण्याची त्यांची तयारी झालेली नसते. वर्गातील परीक्षेपुरते दिलेले माहितीवजा ज्ञान प्रयत्नपूर्वक पाठ करून उत्तम प्रकारे परीक्षेत उत्तीर्ण होणे, इतकीच बौद्धिक सवय घेऊन बहुसंख्य विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी येतात. त्यांच्या प्रत्येक अडचणीची दखल घेणे व्यवस्थापनास शक्य नसते. प्रत्येक प्रश्नासाठी इतरांवर अवलंबून राहण्याची सवय विद्यार्थ्यांमध्ये अनेक प्रकारचे मानसिक तणाव उत्पन्न करते.

ज्या प्रकारचे संस्कार विद्यार्थी घेऊन येतात ते लक्षात घेता, वसतिगृहाची जबाबदारी कोणती आहे याचा उलगडा होणे सोपे जाते. उच्च शिक्षणाने समोर ठेवलेली उद्दिष्टे व स्वतःचा वैयक्तिक विकास आपल्या कुवतीनुसार, वसतिगृहातील काळात विद्यार्थी पूर्ण करतील व त्याबरोबर स्व-तःचा उपयोग समाजासाठी कसा होईल याची जाणीव ते बाळगतील या दिशेने विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे आवश्यक आहे. वसतिगृहात एकत्र येणारे विद्यार्थी, स्वतःच्या वैयक्तिक क्षमतांचा विकास साधण्याच्या दृष्टीने लागणाऱ्या मूलभूत सवयींमध्ये कमी आहेत ही वस्तुस्थिती ध्यानात घेणे व त्याकरिता वसतिगृहात आवश्यक ते शैक्षणिक वातावरण निर्माण करणे ही व्यवस्था-पनाची महत्त्वाची जबाबदारी ठरते. याबद्दल व्यवस्थापनाचे उद्बोधन झालेले असणे आवश्यक ठरते.

## सध्यस्थिती व बदल

बहुसंख्य वसतिगृहे राहण्या-जेवण्याची सोय असलेली ठिकाणे इतक्या मर्यादित अर्थाने काम करणाऱ्या संस्था झालेल्या आहेत. उचित शैक्षणिक व विकासार्थ संस्कार यापासून सर्व-सामान्य विद्यार्थी वर्ग वंचित राहिलेला आहे. त्यामुळे उच्च शिक्षणाचे हेतू सफल होण्यात अडचणी येतात, हे समजून घेऊन त्या दिशने प्रत्यक्ष कृती करणारी वसतिगृहे अपवादात्मक आहेत.

महाविद्यालयीन प्रशासनाची सोय म्हणून एखाद्या प्राध्यापकाला वसतिगृहाचे पर्यवेक्षक कर-ण्यात येते. हे व्यवस्थापन कुणी करावे याबद्दल अधिक विचार होणे आवश्यक ठरावे. पर्यवेक्षकाच्या जागी ज्या व्यक्तीने या पदास अनुस्युत असलेल्या जबाबदारीचा विचार व आचार थोडा फार केला आहे अशा व्यक्तीची निवड व्हावी. उच्च शिक्षणाचे हेतू लक्षात घेता त्यासाठी विद्यार्थ्यांना योग्य सवयी लावण्याचा प्रयत्न करणे व या कामासाठी इतर ठिकाणच्या व्यक्तींचा सहभाग मिळविणे या गोष्टींमध्ये ज्यांना रस असेल अशांना वसतिगृह पर्यवेक्षकांचे काम देणे योग्य होईल. अशा पर्यवेक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विकासाची जबाबदारी पाड पाडणें वसतिगृहांना शक्य होईल.

वसतिगृहांकडून राहण्या-जेवण्यापलीकडील अपेक्षा विद्यार्थ्यांत निर्माण होण्यासाठी त्यांच्या उद्बोधनाची आवश्यकता आहे. उच्च शिक्षितांकडून कोणत्या अपेक्षा केल्या जातात, त्या अपे-क्षांच्या पूर्तीसाठीं कोणते आचार-विचार व कोणत्या सवयी लावून घेण्याची धडपड केली पाहिजे, वगैरे माहिती देणे हा विद्यार्थ्यांच्या उद्बोधनाचा प्रमुख भाग असेल. ज्या प्रमाणात विद्यार्थ्यांची स्वतःबद्दलची कल्पना स्पष्ट होईल त्या प्रमाणात ते, वसतिगृहातील त्यांच्या अनुभवातून स्वतःचा

विकास साधण्यासाठी एखादा उपक्रम सुरू करणे व चालू असलेल्या उपक्रमांत भाग घेणे या गोष्टी जाणीवपूर्वक करू लागतील. यासाठी आवश्यक ते प्रयत्न करण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळावी असा बदल वसतिगृहातील सध्याच्या व्यवस्थेत होणे आवश्यक आहे. तरच विद्यार्थ्यांना त्यांचे न जाणवलेले व म्हणूनच अधिक गंभीर बनलेले प्रश्न समजतील, आणि स्वतःच्या भूमिकेची अस्पष्ट जाण असलेल्या बहुसंख्य वसतिगृह पर्यवेक्षकांना योग्य जाण येऊन वसतिगृहे ही समर्थ व क्रियाशील केंद्रे म्हणून काम करतील.

या संदर्भात वसतिगृह पर्यवेक्षकांकरिता एखादा अल्प मुदतीचा प्रशिक्षण कार्यक्रम आखून, त्याद्वारे पर्यवेक्षकांच्या कामाबद्दल काही अनुभव देण्याची शक्यता अजमावता येईल. हे काम निकडीचे आहे असे प्रस्तुत अभ्यासाच्या निमित्ताने प्रकर्षाने जाणवले आहे.

विद्यार्थ्यांमधील कमतरतेची जाणीव व सुधारणेची आवश्यकता पटवून देणारा संस्कार त्यांच्यावर करावयाची जबाबदारी वसतिगृह व्यवस्थापनाने स्वीकारली पाहिजे. वसतिगृह हे चैतन्य केंद्र बनविण्याची आकांक्षा साऱ्या संबंधित घटकांमध्ये निर्माण व्हावी असा विचार मनात येत असताना, सध्याच्या परिस्थितीत असे काही अपेक्षिणे म्हणजे स्वप्ने बाळगणे आहे, याची जाणीव आहे. तथापि स्वप्ने रंगविल्याने अपेक्षित बदलांची दिशा सुचण्याची शक्यता असते. हे ध्यानात घेऊन वरील प्रकारचे आवश्यक ते बदल वसतिगृह व्यवस्थापनात व विद्यार्थ्यांच्या उद्‌बोधनात व्हावेत असे म्हटल्याशिवाय राहवत नाही.

■ ■

परिशिष्ट

## पुणे विद्यापीठाच्या क्षेत्रातील महाविद्यालयांची वसतिगृहे व विद्यार्थी

(गटानुसार विद्यार्थ्यांच्या संख्या अग्रभागी व वसतिगृहांच्या संख्या कोष्टकांत दिलेल्या आहेत)

### कोष्टक १ : पुणे शहराबाहेरील महाविद्यालये

| महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या | वसतिगृह नाही | वसतिगृहातील विद्यार्थी (संख्या गट) १-२५ | २६-५० | ५१-७५ | ७६-१०० | १०१-१५० | १५१-२०० | एकूण महाविद्यालये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १-१०० | १ | – | १ | – | – | – | – | २ |
| १०१-२०० | ११ | ४ | ३ | ३ | – | – | – | २१ |
| २०१-३०० | ८ | ३ | ७ | – | १ | – | – | १९ |
| ३०१-६०० | ३ | ७ | ३ | २ | २ | २ | १ | २० |
| ६०१-९०० | १ | – | १ | १ | – | – | १ | ४ |
| ९०१-१२०० | ३ | – | १ | – | १ | – | – | ५ |
| १२०१-१५०० | – | २ | – | – | – | ३ | १ | ६ |
| १५०१-१८०० | – | – | – | – | – | १ | – | १ |
| १८०१-२१०० | – | – | – | – | १ | – | – | १ |
| एकूण | २७ | १६ | १६ | ६ | ५ | ६ | ३ | ७९ |

टीप : तीन वसतिगृहांत, अनुक्रमे दोनशे, सहाशे व आठशे यापेक्षा अधिक विद्यार्थी आहेत.

## कोष्टक २ : पुणे शहरातील महाविद्यालये

| महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या | वसतिगृह नाही | वसतिगृहातील विद्यार्थी (संख्या गट) १–२५ | २६–५० | ५१–७५ | ७६–१०० | १०१–१५० | १५१–२०० | एकूण महाविद्यालये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १–१०० | २ | – | – | – | – | – | – | २ |
| १०१–२०० | १ | – | १ | – | – | – | – | २ |
| २०१–३०० | १ | – | – | – | – | – | १ | २ |
| ३०१–६०० | २ | ३ | १ | – | – | – | – | ६ |
| ६०१–९०० | – | १ | – | – | – | – | – | १ |
| ९०१–१२०० | – | – | – | – | १ | – | – | १ |
| १२०१–१५०० | – | १ | – | – | – | १ | – | २ |
| १५०१–१८०० | – | १ | १ | – | १ | १ | १ | ५ |
| १८०१–२१०० | – | – | १ | – | – | – | १ | २ |
| एकूण | ६ | ६ | ४ | – | २ | २ | ३ | २३ |

टीप : तीनशेपेक्षा अधिक निवासी विद्यार्थी असणारे एक महाविद्यालय आहे; चारशेपेक्षा अधिक निवासी विद्यार्थी असणारी दोन महाविद्यालये आहेत; व सहाशेपेक्षा अधिक निवासी विद्यार्थी असणारे एक महाविद्यालय आहे.

सोबतच्या कोष्टकांच्या आधारे स्पष्ट होणाऱ्या माहितीपैकी काही तपशील पुढीलप्रमाणे आहे :

–१०९ महाविद्यालयांपैकी पुणे शहरातील २१ व पुण्याबाहेरील ५५ महाविद्यालयांना संलग्न वसतिगृहे आहेत.

–वसतिगृहे नसणारी महाविद्यालये ३३ आहेत. त्यापैकी पुण्यात ६ आहेत.
बहुतेक वसतिगृहांमध्ये २०० पेक्षा कमी विद्यार्थी राहतात.

–२५ पेक्षा कमी निवासी विद्यार्थी असणारी महाविद्यालये पुणे शहरात ६ व पुण्याबाहेर १६ आहेत.

–२६ ते ५० संख्येमध्ये निवासी विद्यार्थी असणारी महाविद्यालये पुण्यात ४ तर पुण्याबाहेर १६ आहेत.

–बहुसंख्य ग्रामीण महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची संख्या ६०० पेक्षा कमी आहे. या महाविद्यालयांशी संलग्न वसतिगृहे लहान असून त्यामध्ये ५० पेक्षा कमी विद्यार्थी राहतात. संलग्न वसतिगृह नसणारी महाविद्यालये ग्रामीण भागात सर्वाधिक आहेत.

––

२८८८
२३८०६
निबंध ११/८/८३
(स्थळ प्रत)

# २१

## वसतिगृह फक्त चार भिंतीच

भालचन्द्र फडके

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे आणि समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेचे एक अविभाज्य अंग आहे हे विचारसूत्र स्वतंत्र भारतातील शिक्षणतज्ज्ञ मोकळेपणाने मान्य करीत नाहीत. उलट शिक्षणाने व्यक्तिविकास व्हावा, त्याला अर्थार्जनाची वाट मोकळी करून द्यावी हा विचार बळावत चालल्यामुळे आपल्यापुरते पाहण्यात, 'करीअर' मागे धावण्यात, आज विद्यार्थी गर्क आहे. त्यामुळे वसतिगृहात विद्यार्थी आपापल्या खोल्यात राहतात; पण क्वचितच एकमेकांची सुखदु:खं जाणण्याचा प्रयत्न करतात. प्रत्येकाचे विश्व स्वतंत्र असते. त्यामुळे तरुण मनात 'संवाद' साधण्याचा प्रयत्न दिसत नाही.

### एक डबा, जेवणारे चार

मला अजून आठवतं. विद्यापीठाच्या वसतिगृहाचा प्रमुख म्हणून जवळजवळ सात-आठ वर्षे काम पाहतो. यापूर्वी महाविद्यालयाच्या वसतिगृहाचा प्रमुख म्हणून दहा-बारा वर्षांचा अनुभव होताच; पण असा दिवस कधी अनुभवला नाही. रात्रीची दहा-साडेदहाची वेळ. एका खोलीत पार्टी रंगलेली आणि अगदी शेजारच्याच खोलीत एका डब्यात चारजण जेवत होते. ते चित्र पाहून डोळ्यांत पाणी उभं राहिलं. अस्वस्थ झालो. मनात आलं की, ही सगळी मागासवर्गातली दरिद्री मुलं कशी जगत असतील ?

### विपरीत वागवणूक

वसतिगृहातील मागासवर्गीय गरीब मुलांचा प्रश्न अतिशय गुंतागुंतीचा आहे. एक तर या विद्यार्थ्यांच्याकडं तुच्छतेनं पाहिलं जातं आणि वसतिगृहातील अन्य सवर्ण विद्यार्थ्यांचा ती सतत कुचेष्टेचा विषय बनलेली असतात. त्यांना 'सरकारचे जावई' म्हणून सतत हिणवलं जातं आणि त्यांची 'जात' कुणी विसरू शकत नाही. आपल्याला मिळणाऱ्या या वागवणुकीनं ती सतत दबलेली असतात. या देशातील जातिप्रथेनं त्यांना मुख्य प्रवाहात कधी सामावून घेतलं नाही. तसं पाहिलं तर सरकार त्यांना जगण्यापुरतेही पैसे देत नाही आणि त्यांना ते वेळेवर मिळतातच असही नाही. पदवीनंतरच्या अभ्यासक्रमाची निवड करताना त्यांना कुणी मार्गदर्शन करीत नाही.

### ९०० रुपयांत वर्ष काढायचे

मी या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या प्रश्नाचा अभ्यास करून ते प्रश्न सोडवण्याचा मार्ग शोधला. या देशात प्रश्नांचा अभ्यास होतो आणि शिफारशींचे व चर्चांचे अहवाल रद्दी म्हणून कुठल्या तरी कार्यालयात पडून असतात. 'गरिबी हटाव' ही घोषणा देऊन टाळ्या मिळवायच्या हे राज्यकर्त्यांचं काम. त्यांना मुळात गरिबी हटवायचीच नाही. या मागासवर्गीय मुलाला मिळतात

वर्षाला साधारणतः ९००/– रु. त्यातून वसतिगृहाचे दोन्ही सत्रांचे भाडे व दिवाबत्ती, सफाई, पाणी, इ. खर्चापोटी ४००/– रु. जातात. राहिलेल्या ५००/– रुपयांत वर्षभर दोन वेळचं जेवण तरी शक्य आहे का ? इतर खर्च तर सोडाच! त्यामुळे एक वेळ जेवून किंवा उपाशी राहून खर्च भागवावा लागतो. मागासवर्गीय विद्यार्थी प्रामुख्याने शेतमजुरी करणाऱ्या कुटुंबांतून येतात. त्यामुळे त्यांचे आर्थिक बळ तोकडे असते. त्यांच्याजवळ पुरेसे कपडे नसतात, पुस्तकं नसतात आणि मुख्य म्हणजे त्यांना कुणी आस्थेनं वागवीत नाही. म्हणून असं ठरवलं, की या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना एकत्र आणायचं. कमीत कमी खर्चात जेवण कसं मिळेल ते पाह्यचं. स्वतःच स्वयंपाकाची व अन्य कामं करायची. ही योजना यशस्वी झाली; पण काही काळ. तीन वर्षे कार्यकर्ते मिळाले. जिद्दीनं त्यांनी काम केलं. जिथं महिन्याकाठी जेवणखर्च १२५/– रु. येई तिथं ७५/– रु. आला. उपाशी राहावं लागण्याचे दिवस कमी झाले. मग 'कमवा व शिका' योजना राबवून काही रक्कम उभी केली; पण नंतर यात राजकारणानं प्रवेश केला आणि चांगलं काम हा हा म्हणता जमीनदोस्त झालं! मागासवर्गीय मुलं उपाशी राहतात याच सोयरसुतक कुणाला असणार ? गरिबांनी शिकावंच कशाला ? त्यापेक्षा नोकऱ्या धराव्या असं ज्यांची पोटं भरली आहेत ते म्हणू लागले !

### उदासीन शिक्षक : कलहनिर्माते राजकारणी

मला वाटतं की, शिक्षकाचा व्यवसाय करणारे बहुसंख्य शिक्षक वेतनश्रेणी, बढत्या, भत्ते इत्यादी चर्चेत गुंग असतात. आपण समाजाचं काही देणं लागतो या जाणिवेची वाढ शिक्षकांच्या मनात व विद्यार्थ्यांच्या मनातही होणे आवश्यक आहे; पण जो तो आपल्यापुरतं पाहतो. वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांविषयी, त्यांच्या अडीअडचणींविषयी शिक्षक उदासीन असतात. नियम, कायदेकानू, यांच्यावर बोट ठेवून वागायचं असं ठरविल्यामुळं विद्यार्थी व शिक्षक यांच्यात विश्वासाचं वातावरणच नसतं. विद्यार्थ्यांच्या मनात कलहाची बीजं पेरणारे राजकारणी नेते असतात तसे शिक्षकही असतात !

### वसतिगृह–प्रमुख, पालक ?

वस्तुतः वसतिगृहप्रमुख हा विद्यार्थ्यांचा पालक. त्यानं विद्यार्थ्यांनी मागितली तरच मदत द्यायची नसते. त्यांना अधूनमधून भेटून त्यांच्या मनात विश्वास उत्पन्न करायचा असतो. मला एक प्राचार्य आठवतात. त्यांनी उपोषण केलं होतं. ते म्हणत मला विद्यार्थ्यांनी भेटायला यावं. मी वेळ ठेवली आहे. विद्यार्थी त्यांच्याकडे फिरकत नसत. कारण त्यांना वाटे की जाऊन आपण काय करणार ? आपल्या प्रश्नात त्यांना रस नाही. ते टागोर–गांधीजींच्या विचारांचा मारा करणार आणि उपदेश करीत राहणार !

### खोपटाची लाज : घराकडे पाठ

मला सहज एक प्रसंग आठवतो. दररोज रात्री मी खोल्याखोल्यांत जाऊन विद्यार्थ्यांशी बोलत राही. त्यांची मतं जाणून घेई. त्यांच्या अंगच्या गुणांचा शोध लागे. एक दिवस मी कार्यालयात होतो. माझं घर व कार्यालय एकच. मिलिन्द कॉलेजच्या वसतिगृहात प्रमुखाला स्वतंत्र बंगला नव्हता. विद्यार्थ्यांप्रमाणे सलग तीन खोल्या एकीकडे दिलेल्या. मला वाटतं सुटीचा दिवस होता. दुपारच्या जेवणानंतर खोल्यांतून गप्पा रंगलेल्या. कुठे आरडाओरडा. कुठे तारस्वरातली गाणी. इतक्यात एक माणूस चौकशी करीत करीत माझ्या खोलीत आला. त्याला बसा म्हटलं तरी तो उभाच; अंगावर फाटके कपडे, पाय धुळीनं माखलेले. चेहरा ओढलेला. समोरचा पाण्याचा तांब्या त्यानं तोंडाला लावला. पाणी प्याल्यानंतर त्याला थोडी हुशारी वाटली. मी म्हटलं, 'कोन तुमी ? कोण्या गावचं ?

'ते राहू द्या साहेब, माझा पोरगा दंगल्या मेला हाय की जिता हाय ते पाह्यला आलोय !' त्याचा पारा चढला होता. त्याचं सर्वांग थरथरत होतं. दरम्यान त्याच्या मुलाला बोलावून घेतलं. तो आला. अंगात रंगीबेरंगी टेरिलिनचा शर्ट, नॅरोबॉटमची पँट. इतक्यात पोराचा बाप गरजला,

'आलात, लई उपकार झालं !'

'कशापायी आलास ?'

'तू मेला हाईस की जिता हाईस ?'

त्याचं असं झालं. दंगल प्रथम वसतिगृहात आला तेव्हा बापाचीच अवस्था त्याची होती. तो बदलला होता. पहिल्या सुटीत घराकडं गेला होता. अधूनमधून पत्र धाडत होता. मग पत्र धाडीनासा झाला. बाप मनिऑर्डरनं चारपाच रुपये पाठवी. परवाच्या मनिऑर्डरवर पोराचा अंगठा पाहून बाप भडकला होता.

'सायब, हा कागद पाठवीना. त्याची पावतीवर सही पाहून त्याची खुशाली कळे. परवा यानं अंगठा उठवला. अरं, तुम्हाला बाबासाहेबाच्या साळंत घातलं ते अंगठा उठवाया ?'

या निमित्तानं एक वेगळा प्रश्न उभा राहिला. अभावग्रस्त स्तरातला विद्यार्थी वसतिगृहात राह्यला. त्याचा वेष बदलला. काळाबरोबर असं व्हायलाच हवं. पुस्तकं वाचू लागला. सोबत्यात रमला; पण तो आपल्या घरापासून आई-वडिलांपासून तुटत चालला होता. त्याला आपल्या निरक्षर आई-बापाची, अडाणी भावंडांची, खेड्यातल्या खोपटाची लाज वाटत होती. दंगल गतजीवनाचे बंद तोडू पाहात होता; वसतिगृहात राहून तो नवा माणूस म्हणून जगू पाहात होता. पण त्याचं चित्त आपली नातीगोती, आपली माती विसरू पाहात होतं. शिक्षणामुळं माणूस असा तुटणं कितपत योग्य आहे ? बाबासाहेब म्हणत, 'तुम्ही इथं शिकलात तर तुमच्यामुळं मी झोपडीत एक दिवा लावला. तुमचं काम आहे आजूबाजूच्या झोपड्यांतून प्रकाश पसरवण्याचं !'

### वसतिगृह – केवळ एक सोय

वसतिगृह म्हणजे खरं म्हटलं तर संस्कारकेंद्र ! पण आमची महाविद्यालये, विद्यापीठे, वसतिगृह म्हणजे एक सोय असं मानतात. विद्यार्थ्यांनी यावं, नियम पाळावेत, शिकावं आणि एक दिवस पदवी घेऊन जावं ! लो. टिळक म्हणत की, आमची विद्यापीठे म्हणजे पदवी देणाऱ्या कंपन्या. आजही तेच आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा असा कार्यक्रमच नसतो. विद्यार्थ्यांना 'परीक्षार्थी' बनवून टाकलंय. वसतिगृहात एवढे विद्यार्थी असतात; पण क्रीडांगणावर खेळताना दहा-बारा जण दिसतात. वर्तमानपत्रं वाचीत नाहीत की अभ्यासाव्यतिरिक्त पुस्तकं वाचीत नाहीत. एकदा अनेकांनी दिलेल्या पुस्तकांतून वसतिगृहात छोटं वाचनालय सुरू केलं. सुरुवातीला थोडा प्रतिसाद मिळाला. हळूहळू सर्व थंडावलं. पुस्तकं बिचारी आपल्या जागी धूळ खात गप्प राहिली. वसतिगृहातील उदासीनता मला भयावह वाटते. एक वेळ या ना त्या कारणानं उफाळलेले प्रक्षोभ बरे वाटतात. संघर्षामुळं कार्यशक्तीला आव्हान तरी मिळतं; पण विद्यार्थ्यांची उदासीनता जीवघेणी आहे. भारतात जवळजवळ १२५ विद्यापीठे आहेत; पण ज्यांनी समाजोपयोगी कामं चालवली आहेत अशी विद्यापीठे फक्त २२ ! साडेचारहजार महाविद्यालयांपैकी ७५ टक्के महाविद्यालयांना मुळी दर्जाच नाही ! बहुसंख्य महाविद्यालयांना वसतिगृहेच नाहीत ! वसतिगृह म्हणजे इमारत नव्हे. तेथे एक कुटुंब जगत असते.

### चार भिंती मिळाल्या : एकही मित्र नाही

मला सोपान नावाचा विद्यार्थी आठवतो. एका खडी-फोडणाराचा मुलगा. सकाळी दूधवाटप

करून पैसे मिळवी. पैसे पुरत नसत म्हणून रात्री हॉटेलात वेटरचे काम करी. अशी लढत देऊन तो 'फर्स्ट क्लास 'मध्ये आला ! एका मोठ्या कारखान्यात चार आकडी पगार मिळवीत राहिला. ऐटीत मोटर घेऊन फिरत राहिला. तो एकदा म्हणाला, 'सर, हॉस्टेलचे दिवस आठवतात. तुमचे शब्द आठवतात. त्या चार भिंती मला मिळाल्या; पण चार मित्र काही जोडता आले नाहीत ! आता क्लबात जातो; पण असतो एकटा !' या त्याच्या उद्‌गारात व्यथा आहे, सांस्कृतिकदृष्ट्या आपण उपाशी राह्यलो याची. वसतिगृहातील खोलीला आपण एकच खिडकी ठेवतो आणि विद्यार्थ्यांचं जग बंदिस्त करतो.

■ ■

# २२ अपंग विद्यार्थ्यांचे प्रश्न

वा. ना. तुंगार

वाढते औद्योगीकरण व त्यामुळे शहरांची होणारी बेसुमार वाढ, रोगराई, दैनंदिन जीवनातील जीवघेणी धावपळ, त्या अनुषंगाने होणारे अपघात, या व यासारख्या अनेक कारणांनी अपंगांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. मूकबधिर, मतिमंद, अंध, पंगू, कुष्ठरोगी असे अपंगांचे ढोबळ वर्गीकरण करता येईल. 'अपंगत्व हे गेल्या जन्मीच्या पापाचे फळ आहे.' यासारख्या भ्रामक समजुती आजही समाजात आढळतात. त्यामुळे अपंगांच्या अडचणी वाढतात. अपंगत्व ही एक उणीव असून त्यामुळे संबंधित व्यक्तीच्या हालचालींवर, कार्यक्षमतेवर, काही प्रमाणात मर्यादा येतात. प्रत्येक व्यक्तीलाच मर्यादा असतात, त्या सहजतेने वागविल्या जातात; परंतु दुर्दैवाने अपंगांच्या शारीरिक मर्यादांवरच जास्त भर दिला जातो. उदाहरणार्थ, मुका मनुष्य टेलिफोन ऑपरेटरचे काम करू शकणार नाही; परंतु एखाद्या लेथवर तो काम करू शकेल. यावरून एक गोष्ट लक्षात येईल की अपंगांचे प्रश्न हे त्यांच्या व्यंगाचा प्रकार व त्याची तीव्रता यावर अवलंबून असतात. अपंग कोणाला म्हणावे? अपंगत्वाचे प्रकार, त्यांची संख्या, त्यांच्या गरजा, इत्यादी संबंधीची विश्वसनीय आकडेवारी आपल्या देशात उपलब्ध नाही. त्यामुळे अपंगांना उपलब्ध करून द्यावयाच्या संधींची नीट आखणी करणे अवघड झाले. तरीही केंद्र व राज्य सरकारांनी काही सोयी-सवलती जाहीर केल्या आहेत. त्यात शिष्यवृत्त्या, शैक्षणिकदृष्टचा फार महत्त्वाच्या आहेत. काही अपंगांना त्यामुळे शिक्षण, उच्च शिक्षण, व्यवसायशिक्षण घेणे शक्य झाले आहे.

जन्मापासून किंवा आजार, अपघात, यासारख्या कारणांनी ज्यांचे हात, पाय यासारखे अवयव कमजोर, निकामी, किंवा अकार्यक्षम झाले आहेत, अशा **विकलांग** विद्यार्थ्यांचाच विचार या शोध-निबंधात केलेला आहे.

### शिक्षणाचे महत्त्व

शिक्षण हे अपंगांना वरदान असून, व्यंगावर मात करण्याचे ते एक प्रभावी साधन आहे. कित्येकदा केवळ शारीरिक मर्यादेमुळे किंवा शिक्षणाची खास सोय नसल्याने अपंगांना शिक्षण घेता येत नाही. अगदी बालवयात जर पोलिओसारख्या आजाराने मूल अपंग झाले तर वैद्यकीय उपचारातच एक दोन वर्षांचा कालावधी सहज निघून जातो. त्यानंतर शिक्षण कोठे द्यावयाचे? कसे द्यावयाचे? त्याचा उपयोग काय? यांसारखे प्रश्न पालकांना भेडसावीत असतात. दरम्यानच्या काळात अपंग व्यक्तीच्या समान वयाची सुदृढ मुले एक-दोन वर्षांनी पुढे जातात. एवढे करून मूल शाळेत गेले तर शाळेतील परिस्थितीशी त्याला जमवून घेता येतेच असे नाही. उदाहरणार्थ शाळा लांब अंतरावर असणे, किंवा शाळेपर्यंत जाण्यासाठी वाहनाची व्यवस्था

नसणे, शाळेतील बसण्याची व्यवस्था सोयीची नसणे, यातून अपंगाच्या अडचणी निर्माण होतात. त्या अडचणी पुढे उच्च शिक्षण घेतानाही कमी अधिक प्रमाणात ताप देत राहतात. शिक्षक, सहाध्यायी, शिक्षणसंस्थेतील व्यवस्थापन व अखेर सर्व समाज, इत्यादींच्या सहकार्याने अडचणींवर मात होऊ शकते, शिक्षण सुरू होते व पुढे चालूही राहते.

पालकांनी अशा मुलांना उत्तेजन द्यावे लागते. कित्येकदा अज्ञान, आर्थिक परिस्थिती, दैनंदिन जीवनातील धावपळ, यामुळे पालकांना अपंग पाल्यांकडे लक्ष देण्यास पुरेसा वेळ मिळत नाही. काही पालक अशा मुलांना कित्येकदा वाजवीपेक्षा जास्त संरक्षण देऊन अधिक दुर्बल बनवतात. काही ठिकाणी पालक अजिबात लक्षच देत नाहीत. या दोन्हींमुळे अपंगांचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष-रित्या नुकसानच होत असते.

### शिक्षण कोणते ? सर्वसामान्य की वेगळे ?

अस्थि, सांधे, स्नायु, यामुळे अपंग झालेल्या मुलांच्या हालचालींवर मर्यादा येतात हे खरे आहे. त्यांना भरभर चालता येत नाही. काठी किंवा कुबडीचा वापर करावा लागतो. बाकावर जास्त वेळ बसल्यावर कंबर दुखते. या अडचणी दिसून येत नाहीत, परंतु त्यांचा त्रास मात्र अपंगांना होत असतो.

अपंगत्वामुळे हालचालीवर मर्यादा आल्याने पालकांपुढे मोठा प्रश्न उभा राहतो. या मुलाला-मुलीला कोणते शिक्षण द्यावे ? त्याचे भवितव्य काय ? अशा मुलांना शिक्षणाबरोबरच वैद्यकीय मदतीचीही कित्येकदा वारंवार गरज असते. यांना सर्वसामान्य शाळेत घालून इतरांप्रमाणेच शिक्षण द्यावे की त्यांच्यासाठी स्वतंत्र अभ्यासक्रम असावा ? याबाबत तज्ज्ञांत एकमत नाही. अशा व्यक्तींच्या भविष्य काळाचा विचार करता त्यांना सर्वसामान्य शिक्षणाबरोबर व्यावसायिक शिक्षण देणे अधिक उपयुक्त आहे; याबद्दल कोणाचेही दुमत नाही. यातून एक प्रश्न उपस्थित होतो, तो असा की, अशा तऱ्हेचे शिक्षण कोठे व्हावे ? सर्वसामान्य शाळा, महाविद्यालयात की खास शाळेत वा विद्यालयात ? सर्वसामान्य शाळा कॉलेजात या अपंगांना सामावून घेता येईल का ? त्यांच्यासाठी काही विशेष सोयी करणे शक्य आहे का ?

इतर सामान्य मुलांच्या तुलनेने आपल्यात काहीतरी कमतरता आहे ही न्यूनगंडाची भावना अपंगाच्या मनात तयार होण्याची भीति असते. पण त्यांच्या भोवतीच्या मंडळींच्या समजूतदार-पणाने ती आटोक्यात आणता येते, ठेवता येते, पुष्कळदा नाहीशीही करता येते.

अपंगांच्या शिक्षणाचा विचार करताना अनेक समस्या पुढे येतात. प्रत्येक अडचणीत थोडे फार सत्य आहे, तथ्य आहे. परंतु अपंगांना समाजातच राहावयाचे असल्याने त्यांना समाजापासून वेगळे ठेवणे योग्य होणार नाही. आपण शारीरिकदृष्टया थोडेफार कमजोर असलो तरी बौद्धिकदृष्टया इतरांप्रमाणेच समर्थ आहोत, संधी मिळाली तर आपण सर्वसामान्य मुलांबरोबरीने कोणतीही गोष्ट करू शकतो, ही आत्मविश्वासाची भावना अपंगात वाढीस लागली तरच त्यांच्या भावी जीवनाला वेगळे पण हितकर वळण लागेल.

### पालकांची जबाबदारी

अपंग मुलाला स्वावलंबी बनविण्याची जबाबदारी पालकांची आहे. आपले मूल अपंग आहे याची अनेकांना लाज वाटते. उलट अशा मुलांना घरातून जास्तीत जास्त उत्तेजन मिळाले पाहिजे. कित्येक पालक आपल्या इतर सर्वसामान्य मुलांच्या बरोबर अशा मुलाची तूलना करतात. शारीरिक मर्यादेमुळे इतर भावंडांपेक्षा बौद्धिक व अन्य क्षेत्रात हे मूल जर थोडे कमी असेल तर त्याचा संबंध त्याच्या शारीरिक व्यंगाशी लावला जातो. वाढते औद्योगीकरण, शहरांची होणारी

बेसुमार वाढ, त्यामुळे निर्माण झालेली जागेची टंचाई, व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पना, यासारख्या अनेक कारणांनी पूर्वीची एकत्र कुटुंबपद्धती लोप पावत आहे. सध्याच्या विभक्त कुटुंब पद्धतीमध्ये घरातील अपंग माणूस हा एक समस्याच होतो. कित्येक पालकांना अशा मुलांसाठी वैद्यकीय उपचार कोठे उपलब्ध आहेत, त्यांच्यासाठी अस्तित्वात असलेल्या शैक्षणिक सुविधा, शासनाच्या योजना, इत्यादींबद्दल माहिती नसते. यासारख्या अनेक कारणांनी अगदी बाल्यावस्थेपासून अपंग बालकाचे शिक्षण प्रत्यक्ष किवा अप्रत्यक्षरित्या डावलले जाते. ह्यातून वाट काढून काही विद्यार्थी व विद्यार्थिनी जिद्दीने महाविद्यालयीन शिक्षण आज महाराष्ट्रात घेत आहेत. त्यांची संख्या अगदी कमी आहे, पण ती वाढणार आहे. त्यांच्या प्रश्नांचा विचार व्हायला पाहिजे.

## अपंगांच्या शिक्षणात शिक्षकाचे स्थान

विद्यार्थी व शिक्षक यांचे संबंध अधिक सलोख्याचे असावेत असा प्रयत्न सध्याच्या शिक्षण-पद्धतीत चालू आहे असे म्हणतात. अपंग विद्यार्थी व शिक्षक यासंबंधात तर शिक्षकावर मोठी जबाबदारी असते. अपंग विद्यार्थ्यांच्या सहाध्यायांवर, शिक्षण संस्थेतील प्रशासनावर, खूप काही अवलंबून असते. प्रत्येक विद्यार्थ्याचे प्रश्न त्याचे शारीरिक व्यंग, कौटुंबिक वातावरण, बौद्धिक पातळी, यांवर अवलंबून असल्याने प्रत्येक विद्यार्थ्याला आवर्जून परिस्थितीनुरूप वागवणूक द्यावी लागते.

हेलेन केलर या अंध व मूक-बधिर होत्या. त्यांना त्यांची शिक्षिका ॲन सुलिव्हन मॅसी यांनी जीवनोपयोगी शिक्षण अत्यंत कष्ट घेऊन दिले. आपल्या जीवनातील यशाचे सर्व श्रेय हेलेन केलरनी आपल्या शिक्षिकेला दिले आहे. यावरून अपंग विद्यार्थ्यांच्या, जीवनात शिक्षकाला किती महत्त्वाचे स्थान आहे, हे आपल्या लक्षात येईल.

## खेळ व मनोरंजन

एकदा एका पंगू मुलाने पळण्याच्या शर्यतीत भाग घेण्याची इच्छा दर्शविली. त्यावर सर्वजण हसले व त्याची अवहेलना केली ! जबर इच्छाशक्ती व कष्ट यामुळे अपंगत्वावर मात करता येते हे सर्वांनीच लक्षात घ्यायला हवे. पत्ते, बुद्धिबळे, कॅरम, व्यापार, सोंगट्या, यांसारखे बैठे खेळ अपंग मुले सहज खेळू शकतात. या उलट हुतूतू, लंगडी, भालाफेक, अडथळ्यांची शर्यत, यांसारखे मैदानी खेळदेखील अपंग मुले सहज खेळू शकतात हे पुष्कळांना ठाऊक नाहीसे दिसते. अपंगांच्या एका तुकडीने नुकतीच हिमालयाची मोहीम यशस्वी केली.

सामान्य मुलांप्रमाणे याही मुलांना व्यक्तिविकासाकरिता खेळ, नाटच, संगीत, चित्रकला, नृत्य, चित्रपट यांची आवश्यकता असते ही गोष्ट अपंगांचे पालक, शिक्षक व शिक्षणसंस्था सोयीस्करदृष्टचा विसरतात हे दुर्दैव आहे.

## महाराष्ट्र शासनाच्या योजना

शारीरिक वैगुण्य असलेल्या समाजाच्या कमकुवत वर्गासाठी महाराष्ट्र शासनाने आपल्या समाज कल्याण खात्यात अपंग शिक्षण व पुनर्वसन नावाचा एक स्वतंत्र विभाग सुरू केलेला आहे (१९५७–५८). या विभागातर्फे अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या दिल्या जातात. इथून केंद्र सरकार व इतर केंद्रीय संस्था ह्यांच्या मदतीचा व शिष्यवृत्त्यांचाही व्यवहार चालतो.

## एक अभ्यास

अपंगांच्या शैक्षणिक समस्या या विषयावर अनेक चर्चासत्रे, व्याख्याने आयोजित केली गेली, परंतु नीट व उपयुक्त संशोधन झालेले नाही. अलीकडे मी ४०० रुग्णांमध्ये १०० व्यक्ती निवडून एक अभ्यास केला.

निवड केलेल्या १०० प्रतिसादकांशी संपर्क साधला. एक व्यापक प्रश्नावली तयार करून प्रतिसादकांच्या सवडीने त्यांना सोयीची असलेली वेळ ठरवून घेतली व प्रश्नावलीच्या साहाय्याने मुलाखती घेतल्या. मुलाखती घेत असताना जास्तीत जास्त मनमोकळे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला. प्रश्नावली खेरीज जीवनात येणाऱ्या विशेष अडीअडचणी, त्यावर केलेली मात, वैयक्तिक प्रश्न, इत्यादींसंबंधी माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला.

या खेरीज संस्थांमध्ये काम करणारे कार्यकर्ते, समाजसेवक, शिक्षणतज्ज्ञ, वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ, अपंगांचे पालक, शासकीय अधिकारी, यांच्याशी चर्चा करून अधिक माहिती गोळा केली. पाहाणीतील १०० प्रतिसादकांची विभागणी खालील प्रमाणे,

पुरूष — ८०
स्त्रिया — २०
१००

बहुतेक सर्व प्रतिसादक ४५ वर्षे वयाच्या आत होते.

### कौटुंबिक प्रश्न

राहण्याची जागा अपुरी, तोकडे उत्पन्न, शिक्षणासंबंधी अनास्था, आईवडिलांमधील मतभेद, लहानसहान चुकीबद्दल व्यंगाचा उच्चार करुन टाकून बोलणे, इतर सदृढ भावंडांशी तुलना व वाजवी पेक्षा अधिक अपेक्षा, या अडचणी ६७ टक्के लोकांना आल्या; तर २३ टक्के लोकांनी अडीअडचणींचा पाढा वाचण्याचे कटाक्षाने टाळले. १० टक्के लोकांनी अशा अडचणी मोठया प्रमाणात न आल्याचे सांगितले. ज्या प्रतिसादकांना कौटुंबिक अडीचणींना तोंड द्यावे लागले त्या कुटुंबांचे सरासरी मासिक उत्पन्न रु. ७५० होते. विशेषतः प्रौढ वयात अपघाताने अपंग झालेल्यांना कुटुंबात पुन्हा सामावून घेणे फार अवघड गेले. मुलींच्या विवाहाचा प्रश्न व मुलांच्या नोकरीची समस्या यामुळे बहुतेक कुटुंबात चिंतेचे वातावरण आढळून आले.

### सामाजिक समस्या

अपंगत्वाच्या कारणाबद्दलचे अज्ञान, रुढी-प्रियता, रिती-रिवाज, धार्मिक कल्पना, अंध श्रद्धा, सुदृढ शारिराबद्दलचे मोठे आकर्षण, अपंगांच्या कार्यक्षमतेबद्दलची साशंकता, इत्यादि अडचणी ७० टक्क्यांपेक्षा अधिकजणांनी व्यक्त केल्या. तर ३० टक्के लोकांनी आपण या अडीअडचणींची पर्वा करीत नसल्याचे सांगितले.

### वैद्यकीय साह्याची गरज

६४ टक्के लोकांना पोलिओमुळे अपंगत्व आलेले आढळले, बहुतेकांना हा आजार १ ते ८ वर्षांच्या कालावधीत झाला. १८ टक्के लोक जन्मापासून अपंग होते, असे आढळले (उदाहरणार्थ हाताची बोटे नसणे, पाय अखूड असणे, इत्यादि). वाहतूक, व दैनंदिन जीवनातील धावपळीमुळे झालेल्या अपघाताने १८ टक्के लोक अपंग झालेले आढळले.

कृत्रिम अवयव, कुबडचा, बिशिष्ट तऱ्हेचे बूट, यांचा वापर ४४ टक्के लोक करताना आढळले तर २० टक्यांना अशा तऱ्हेच्या साधनांची गरज भासत नसल्याचे निष्पन्न झाले. ३६ टक्के लोकांना गरज असूनही आर्थिक व इतर अडचणींमुळे ही आयुधे विकत घेता आली नाहीत.

अपंगत्व आल्यावर वैद्यकीय उपचार प्रत्येकाने आपल्या कुवतीनुसार केले. अपघात झाल्यावर योग्य त्या उपचाराची सोय नसल्याने किंवा चांगल्या उपचाराची सोय कोठे आहे याविषयी योग्य ती माहिती नसल्याने, नुकसान झालेल्या काही घटना आढळून आल्या.

## शैक्षणिक प्रश्न

अपंगत्वामुळे शिक्षणात अडथळा आला का ? शिक्षकांकडून आणि पालकांकडून शिक्षणासाठी मिळालेले उत्तेजन, शिक्षणासाठी उपलब्ध असलेल्या सोयी व त्यातील उणीवा, अभ्यासक्रमाचा जीवनाशी संबंध नाही असे वाटणे, शासकीय योजनांबद्दलची माहिती, यांबद्दल चौकशी केली.

अभ्यासाकरिता निवडलेल्या १०० लोकांपैकी एकही निरक्षर किंवा अशिक्षित नव्हता.

१६% दहावी परीक्षा उत्तीर्ण झालेले होते.

४४% उच्च माध्यमिक परीक्षा अुत्तीर्ण झालेले आढळले.

२२% पदवीधर होते.

१०% पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेले.

८% तांत्रिक शिक्षण घेतलेले.

दीर्घकालीन अजार, शारीरिक अकार्यक्षमता यामुळे ४६ टक्के लोकांची शैक्षणिक वर्षे वाया गेली; तर १४ टक्के व्यक्तींना कोणत्याही तऱ्हेची अडचण भासली नाही. ४० टक्के लोकांना अपंगत्वामुळे आपल्या आवडीचा अभ्यासक्रम निवडता आला नाही. ७० टक्के लोकांना शिक्षक, पालक, यांचे संपूर्ण सहकार्य मिळाले, तर ३० टक्के लोकांनी अशा तऱ्हेचे सहकार्य मिळाले नसल्याची तक्रार केली.

७६ टक्के लोकांनी सर्वसामान्य शिक्षण संस्थांचा लाभ घेताना इमारतीमधील गैरसोयी जाणवल्या बाकावर बसण्यात अडीअडचणी आल्याचे सांगितले.

१४ टक्के लोकांनी उपलब्ध सुविधांशी तडजोड करून आपले शिक्षण पूर्ण केले; तर १० टक्के लोकांनी तक्रारी करून काय उपयोग अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

६८ टक्के लोकांनी सर्वसामान्य अभ्यासक्रम अपंगांना उपयुक्त नसल्याचे निक्षून सांगितले तर २० टक्के लोकांना हा अभ्यास उपयुक्त वाटला. १२ टक्के लोकांनी आपली कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही.

अपंगांना शिक्षण देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने ज्या काही योजना, सवलती; जाहीर केलेल्या आहेत, त्याबद्दल ६४ टक्के लोकांना काहीही माहिती नसल्याचे आढळले. फक्त ३६ टक्के लोकांना या योजनांबद्दलची माहिती असल्याचे आढळून आले.

ज्यांना या योजनांचा लाभ मिळाला त्यांनी खालील तक्रारी केल्या. शिष्यवृत्तीसाठी करावयाचा अर्ज व त्यासाठी करावी लागणारी धावपळ अपंगांना त्रासदायक होते. शिष्यवृत्तीची रक्कम अपूरी असल्याने अपंगांना या सुविधांचा लाभ घेणे शक्य नसते. वाढती महागाई, वाहतुकीचे वाढलेले दर, इत्यादींमुळे शिष्यवृत्तीच्या रक्कमेचा फेरविचार करण्याची गरज भासत आहे.

## आर्थिक परिस्थिती

कुटुंबाची आर्थिक परिस्थिती वाईट असल्यामुळे शिक्षण पूर्ण करता आले नाही. घर खर्च भागत नसल्याने चित्रपट, नाटके व इतर मनोरंजनाच्या कार्यक्रमास जाता येत नाही. नोकरीसाठी अर्ध वेळ, पूर्ण वेळ, प्रयत्न करुनही यश नाही. परावलंबी जिण्याची लाज वाटते. अंतर्गत प्रवास करण्यासाठी आर्थिक खर्च करण्याची कुवत नाही. अभ्यासाकरिता निवडलेल्या बहुतेकांना वरील अडचणी प्रामुख्याने भासल्या.

## सामान्य अडी-अडचणी

अपंगांकडे पाहण्याचा सर्वसामान्यांचा व समाजाचा दृष्टिकोन निकोप नाही. उपकाराच्या भावनेने मदत करण्याची वृत्ती वाढत आहे. घरामध्ये वावरताना उंबरा, जिने, सार्वजनिक न्हाणी-

गृह, संडास, इत्यादींचा वापर करताना त्रास होतो. अभ्यासाकरिता लागणारे वातावरण व इतर सुविधा घरात उपलब्ध नाहीत. घर शिक्षणसंस्थेपासून दूर आहे. शिक्षण पूर्ण झाल्यावर नोकरी कोण देणार ? ह्या दैनंदिन जीवनातील अडीअडचणींचा शासन, सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था, महानगरपालिका यांनी विचार करावा, अशा सूचना बहुतेकांनी केल्या.

अपंग सहाय्याच्या सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी, शिक्षकांनी, त्यागमय भूमिकेतून हा पेशा स्वीकारल्याचे सांगितले. संस्था-चालक, शासन व समाज यांच्याकडून आपली उपेक्षा होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. बहुतेक सर्व पालक आपल्या पाल्याच्या भवितव्या-बद्दल साशंक होते. वाढती महागाई, जातीयवाद, राजकीय पुढाऱ्यांचे वर्चस्व, यासारख्या अनेक कारणांनी दानशूर लोकांकडून मिळणाऱ्या देणग्यांच्या प्रमाणात घट झाली आहे. संस्थांच्या कारभारात हस्तक्षेप करण्याची राजकीय पुढाऱ्यांची तऱ्हा, नोकरशाहीचे वर्चस्व, संस्थेत काम करणाऱ्या सेवकांची बेपर्वाई व सेवाभावी वृत्तीचा अभाव, यामुळे दिवसेंदिवस संस्था चालविणे अशक्य झाले आहे; अशी व्यथा संस्था-चालकांनी व्यक्त केली.

## सामान्य निष्कर्ष

अपंग विद्यार्थ्यांच्या विविध समस्यांचा उगम त्यांच्या कौटुंबिक वातावरणातून होतो. त्यांच्या अडीअडचणींचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना सहाय्य व प्रोत्साहन देण्याची विशेष गरज आहे.

अपंगत्वाची कारणे, अपंगांच्या अंगातील कार्यक्षमतेबद्दलची साशंकता, दैनंदिन व्यवहारात त्यांना येणाऱ्या अडीअडचणी, याबद्दल समाजात जागृति निर्माण करण्याची गरज आहे.

आवश्यक ती वैद्यकीय सेवा कोठे मिळते ? शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची कशी काळजी घ्यावी ? कृत्रिम अवयव व इतर साधने यांची उपयुक्तता आणि त्यांचा वापर कसा करावा याबद्दलची माहिती संबंधीतांना देणे आवश्यक आहे.

शिक्षणासाठी योग्य अशी परिस्थिती असेल तर अपंग लोक सर्वसामान्यांबरोबर शिक्षण घेऊ शकतात. परंतु भावी जीवनाचा विचार करता त्यांना सर्वसामान्य शिक्षणाबरोबरच धंदे-शिक्षण देण्याची गरज आहे. अपंगांच्याबद्दलच्या शासकीय योजनांची माहिती समाजातील सर्व थरांपर्यंत पोहोचावयास पाहिजे. त्यासाठी सध्यातरी फारच तोकडे प्रयत्न केले जातात. वृत्त-पत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन, भित्ती-पत्रे, चित्रपट, व्याख्याने, या माध्यमांचा वापर या कामासाठी मोठ्या प्रमाणात व्हावयास पाहिजे.

अपंगांसाठी असलेली वसतिगृहे, व्यवसाय मार्गदर्शन केंद्रे, इत्यादी सर्व सुविधा फक्त शहरातूनच उपलब्ध आहेत. ग्रामीण भागातील अपंगांकरिता तालुका पातळीवर अशा तऱ्हेच्या सुविधा उपलब्ध करून देण्याची नितांत गरज आहे.

या विद्यार्थ्यांचे मानसशास्त्र, त्यांचे शैक्षणिक व वैद्यकीय प्रश्न, त्यांची मनोरंजनाची समस्या, इत्यादींबद्दल पालक व शिक्षक यांना योग्य ते मार्गदर्शन करण्याची गरज आहे.

आज महाराष्ट्रात महाविद्यालयीन शिक्षण घेणारे अपंग विद्यार्थी किती आहेत याची नेमकी माहिती नाही. पण संख्या थोडी आहे. महाविद्यालयात अपंग विद्यार्थी तुरळक दिसतात. पण ते थोडे आहेत म्हणून त्यांच्या प्रश्नांची उपेक्षा होता कामा नये. त्यांच्या अडीअडचणींवर जाणीव-पूर्वक उपाय योजायला हवेत.

या लेखात जी अपंगाची – विकलांग व्यक्तीची – व्याख्या आरंभी दिली आहे, तशी अपंग असलेली सुमारे २५० विद्यार्थी मंडळी – विद्यार्थी व विद्यार्थिनी – मोठ्या जिद्दीने महाराष्ट्रातील

महाविद्यालयात शिकत आहेत. महाविद्यालयातून शिक्षण घेणारे सुमारे ४० अंध विद्यार्थी असावेत. अपंगांकडे पाहण्याची दृष्टी बदलत आहे, बदलली आहे, असे म्हटले जाते. असे असताही महाविद्यालयांचे प्रमुख अपंग विद्यार्थ्यांना प्रवेश द्यायला राजी नसतात, खळखळ करतात. पुण्यामुंबईतही असा अनुभव येतो! अपंगांसाठी शासनाच्या केंद्र व राज्य पातळीवर, विविध सवलती आहेत. पण या साऱ्या सोयी सवलतींची संपूर्ण माहिती शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षक, अध्यापक, प्रशासक यांनाही पुष्कळदा नसते! अपंग विद्यार्थ्यांचे पालक त्यांच्या पाल्यांच्या भवितव्याच्या काळजीत असतात. त्यांना धीर देणारांची आवश्यकता असते. शिक्षण क्षेत्रातील अध्यापक-प्राध्यापक हे काम चांगल्या तऱ्हेने करू शकतील. अपंग विद्यार्थ्यांचे पालक व शिक्षक यांच्यात सुसंवाद निर्माण झाला तर तो अपंग विद्यार्थ्यांना उपकारक ठरेल. इथे पालक शिक्षक संघासारख्या संस्थेची गरज तीव्रतेने भासते आहे. महाविद्यालयातील अनेक प्राध्यापकांना अपंग विद्यार्थ्यांबद्दल सहानुभूती असते. पण अपंगांसाठी नेमके काय करावे हे त्यांना माहीत नसते. अशा प्राध्यापकांसाठी सुटीच्या काळात 'अपंगांच्या शैक्षणिक समस्या' यासारख्या विषयावर अंशकालीन उद्‌बोधन-अभ्यासक्रम आयोजित करायला हवेत. अपंगांचे शिक्षण अपंगत्वाचे स्वरूप ध्यानात घेऊन व नोकरी-व्यवसायाची शक्यता अंदाजून, आखण्यात आले तर ते अधिक इष्ट ठरते. तेव्हा सर्व सामान्य शिक्षणाबरोबर तंत्रज्ञानविषयक अभ्यासक्रम त्यांना उपलब्ध करून देण्याचीही गरज आहे. अशी दक्षता घेतली तर ते लवकर स्वावलंबी होण्यास मदत होईल. पण या साऱ्या गरजांकडे दिले जावे तसे लक्ष दिले जात नाही. ग्रामीण भागातील अपंग विद्यार्थ्यांसाठी कोणत्याही खास सोयी नाहीत. शहरातील अपंगांना, ज्यात विद्यार्थीही आले, स्वस्त सार्वजनिक वाहतूक सेवेचा फायदा घेता येत नाही, होत नाही. त्यामुळे लांब असलेल्या शिक्षणसंस्थेचा अभ्यासक्रम आकर्षक आणि उपयुक्त असला तरी अपंगांना आपल्या मनाला आवर घालावा लागतो.

उपेक्षित अपंग-वर्ग उच्च शिक्षणाच्या अंगणात येऊन दाखल झाला आहे. त्याच्या अडचणींचे निराकरण झपाट्याने झाले पाहिजे.

■ ■

# २३ अंध विद्यार्थ्यांचे प्रश्न

अरूण दीक्षित

मी स्वत: एक अंध प्राध्यापक आहे. माझे स्वतःचे सर्व शिक्षण मी अंध असतानाच घेतले आहे व अजूनही घेत आहे. म्हणून अंध विद्यार्थ्यांचे प्रश्न या विषयावर, प्रामुख्याने स्वतःच्या अनुभवांवर आधारलेले, काही विचार मांडावे हा प्रस्तुत लेखाचा उद्देश आहे.

### विषयाची व्याख्या व व्याप्ती

ज्याला दोन्ही डोळयांनी दिसत नाही त्याला अंध असे म्हणतात. विद्येची इच्छा करणाऱ्याला विद्यार्थी असे म्हणतात. अंधाच्या विद्येच्या इच्छेबाबत काहीसा उपहासाचा दृष्टिकोन आपल्याला काही प्राचीन सुभाषितांतून आढळतो. ' यस्य नास्ति स्वयं प्रज्ञा शास्त्र तस्य करोति किं ? लोचनानाम् विहीनस्य दर्पणे किं प्रयोजनम् ?' असे एक पंडित म्हणतो, तर 'अंधस्य दीपेन किं ?' असा शेरा एक व्याकरणाचार्य मारतो. परंतु चर्मचक्षु नसलेले पण प्रज्ञाचक्षूने जीवनाचा अर्थ शोधून काढणारे होमर व मिल्टन यांच्यासारखे महाकवी, सूरदासासारखे भक्त, के. सी. डे यांच्यासारखे गायक, हे सर्व अंध होते. डॉ. राजेन्द्र व्यास व डॉ. वडगावकर यांच्यासारखे निष्णात कायदेपंडित हे अंध आहेत, ही गोष्ट विद्वान सोयिस्करपणे विसरलेले असतात.

### अंधांची ज्ञानाची साधने

मनुष्य हा एक बुद्धिवादी व विचारशील प्राणी आहे असे प्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्ता ॲरिस्टॉटल म्हणतो. अंध हा एक मनुष्य आहे व म्हणून बुद्धिवाद व विचारशीलता ही माणसाची दोन्ही लक्षणे त्याच्या ठिकाणी असणे हे स्वाभाविक आहे. आपल्या बुद्धीने व विचारशक्तीने अंध मनुष्य ज्ञान ग्रहण करू शकतो व पचवू शकतो. मात्र हे ज्ञान प्राप्त करत असताना त्याच्यावर काही मर्यादा पडत असल्याने त्याच्यासमोर काही प्रश्न निर्माण होतात. माणसाला प्राप्त होणाऱ्या एकूण ज्ञानापैकी सुमारे ८० टक्के ज्ञान डोळयाने प्राप्त होते. हे महत्त्वाचेच ज्ञानेंद्रिय काम करीत नसल्यामुळे अंधाच्या ज्ञान मिळविण्याच्या क्षमतेला साहजिकच मर्यादा पडतात. वाचन, लेखन व गणित या शिक्षणाच्या तीनही प्रमुख अंगांच्या बाबतीत त्याला कमी - जास्त प्रमाणात इतरांवर अवलंबून राहावे लागते. असे असले तरी **कार्यक्षम असलेली आपली इतर चार ज्ञानेंद्रिये, इतरांचे योग्य सहकार्य व आधुनिक विज्ञानातील प्रगती, यांच्या समन्वयाने अंध आपल्यावरील मर्यादा काही प्रमाणात तरी निश्चितपणे कमी करू शकतो.**

### अंध विद्यार्थ्यांसमोरील समस्यांचे गटवार वर्गीकरण

पुस्तकी शिक्षणाचे प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण असे तीन विभाग पडतात. पुस्तकेतर शिक्षणात धंदेशिक्षण, क्रीडा, कला व संस्कार, यांचा समावेश करता येईल. या सर्व

विभागांत अध्ययन करीत असताना **अंध विद्यार्थ्यांसमोर वेगवेगळ्या प्रकारचे प्रश्न निर्माण होतात.** शिक्षण घेताना अंधांनी स्वतंत्रपणे शिकावे का इतर विद्यार्थ्यांबरोबर शिक्षण घ्यावे हाही एक महत्त्वाचा प्रश्न आहे. या सर्व प्रश्नांचा आपण आता क्रमशः विचार करू.

### प्राथमिक शिक्षण

सामान्यतः विद्यार्थी ५ ते १२ या वयात प्राथमिक शिक्षण घेत असतो. ३ ते ५ या वयातील शहरी विभागातील अनेक मुले बालकमंदिरात पूर्वप्राथमिक शिक्षण घेत असतात. अंध विद्यार्थ्यांच्या बाबतीत पूर्वप्राथमिक शिक्षण त्यांच्या आई-वडिलांनी त्यांना घरी देणे योग्य असे मला वाटते. एक तर बालकमंदिरातील लहान **मुलांना अंध विद्यार्थ्यांशी समरस होणे कठीण** पडते व दुसरे असे की, तेथील शिक्षक अथवा **शिक्षिकेला अशा मुलांकडे वेगळे लक्ष द्यायला पुरेसा वेळ नसतो.** वरील दोन्ही गोष्टी मी अनुभवल्या आहेत. प्राथमिक शिक्षणाचे सामान्यतः आपणास दोन उप-विभाग करता येतील. पहिली ते चौथी हा पहिला उपविभाग व पाचवी ते सातवी हा दुसरा उपविभाग होय.

### मूलभूत प्राथमिक शिक्षण

५ ते ९ या वयात पहिली ते चौथी या इयत्तांमध्ये विद्यार्थी मूलभूत प्राथमिक शिक्षण घेतो. या काळात लेखन, वाचन व गणित या शिक्षणातील तीन अत्यावश्यक गोष्टींशी त्याचा चांगला परिचय होतो. आपल्या मातृभाषेशी त्याची ओळख होते. इतिहास, भूगोल व सामान्य विज्ञान या विषयांचे त्याला प्राथमिक ज्ञान होते. तो चित्रकला व शारीरिक शिक्षणाचीही ओळख करून घेतो. या सर्व ज्ञानाची प्राप्ती करून घेत असताना त्याच्यासमोर काही अडचणी येतात. अंध विद्यार्थ्यांना तर त्यातील काही विषय शिकताना फार त्रास होतो, आणि काही विषय ते शिकू शकत नाहीत.

### वाचन

गेल्या शतकापर्यंत डोळे नसल्यामुळे स्वतः वाचन करणे ही गोष्ट अंधाच्या बाबतीत अशक्य होती; परंतु गेल्या शतकात लुई ब्रेल या अंध इंग्रज पंडिताने सहा टिंबांच्या मदतीने लिहिता वाचता येईल अशा एक नव्या लिपीचा शोध लावला व म्हणून त्या लिपीला ब्रेल लिपी असे सार्थ नाव देण्यात आले आहे. आपल्या महान कार्याने लुई ब्रेलने अंध विद्यार्थ्यांसाठी **ज्ञानाची दारे खुली** केली; परंतु **ब्रेल लिपीतील पुस्तके महाग असल्यामुळे ती सामान्य अंध विद्यार्थ्यांना परवडणे कठीण** आहे. तसेच या लिपीसाठी वापरल्या जाणाऱ्या खास कागदावरील टिंबे सुमारे दोन वर्षांनंतर पुसट होऊ लागतात व त्यामुळे **या लिपीतील पुस्तकाच्या उपयोगाला काल-मर्यादा पडते.**

वाचनाच्या बाबतीत अंध विद्यार्थ्याला इतरांच्या **सहकार्यावर बऱ्याच प्रमाणात अवलंबून रहावे लागते यात शंका नाही.** म्हणूनच **चांगला वाचक** मिळाल्यास **अंध विद्यार्थ्याला विशेष आनंद होतो. ध्वनिमुद्रित पुस्तकांचा** अशा विद्यार्थ्यांना **चांगल्या प्रकारे उपयोग** होऊ शकतो; परंतु ही पुस्तके अंध विद्यार्थ्याला व्यक्तिशः घेता येतीलच असे नाही. अंधांसाठी असलेल्या खास शिक्षणसंस्थांतून त्यांना अशी पुस्तके पुरवली जातात; परंतु अन्यत्र शिक्षण घेणाऱ्या अंध विद्या-र्थ्यांना **वाचकांवर अवलंबून रहावे लागते.** जर सरकारने अंध विद्यार्थी असलेल्या संस्थांस या बाबतीत काही अनुदान दिले तर ही समस्या सुटण्यास थोडीशी मदत होईल. गेली काही वर्षे अक्षराचे आवाजात रूपांतर करून **बोलकी पुस्तके** तयार करण्याबाबतचे प्रयोग अनेक प्रगत देशात चालू आहेत. ते जर यशस्वी झाले तर अंध विद्यार्थ्यांना स्वतः वाचन करणे जास्त सोपे जाईल असे वाटते.

## लेखन

अंध शाळांतून अंध विद्यार्थ्यांना ब्रेल लिपी शिकवून त्यांचा लेखनाचा प्रश्न सोडविला जातो. सामान्य शाळांमध्ये अंध विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वेळी उत्तरपत्रिका लिहिण्यासाठी स्वतंत्र लेखनिक दिला जातो; परंतु माझ्या मते या दोनही पद्धतीत काही महत्त्वाच्या अडचणी आहेत. ब्रेल लिपीत अंध विद्यार्थ्याने लिहिलेला मजकूर ती **लिपी** माहीत नसणाऱ्या सामान्य वाचकाला वाचता येणार नाही. यामुळे अंधाचे विचार दुसऱ्यापर्यंत सहजपणे पोचू शकणार नाहीत.

दुसऱ्या पद्धतीमध्ये **लेखनिकाशी** जमवून घेणे प्रत्येक अंध विद्यार्थ्याला सोपे जाईलच असे नाही. तसेच लेखनिक विद्यार्थ्यापेक्षा कमी शिकलेला असल्यामुळे त्याच्या हातून चुका होणे अशक्य नाही. यासाठी माझ्या मते अंध विद्यार्थ्यांना **टंकलेखन शिकविणे अधिक योग्य ठरेल.** टंकलिखित मजकूर दुसऱ्याला सहजपणे वाचता येत असल्यामुळे अंधांचे विचार इतरांना लवकर समजू शकतील. टंकलेखनाच्या आदर्श पद्धतीला Blind Method असे म्हणतात. या पद्धतीत टंकलेखन शिकणारा **विद्यार्थी केवळ स्पर्शाच्या मदतीने लेखन करीत असतो**. अंधांचे स्पर्शेन्द्रिय इतरांपेक्षा अधिक संवेदनाक्षम असल्यामुळे त्याला **सामान्य टंकलेखन शिकणे कठीण पडणार नाही.** विशेषतः जर त्याला असे टंकलेखन लहानपणी शिकवले गेले तर ते जास्त चांगले होईल. आपल्या उत्तरपत्रिका टंकलिखित केल्यास लेखनिकाच्या मदतीचीदेखील फारशी गरज रहाणार नाही. माझ्या वडिलांनी हा प्रयोग माझ्याबाबतीत यशस्वीपणे केला असल्यामुळे मी वरील विचार अनुभवातून मांडत आहे. प्रयत्नाने अंध विद्यार्थी स्वतःची सही करू शकेल. त्याला लेखन शिकवताना अक्षरांच्या आकाराची कल्पना पुठ्ठे किंवा माती अगर प्लॅस्टिकची अक्षरे तयार करून द्यावी असे मला वाटते.

## गणित

अंध विद्यार्थ्यांना गणितातील चार मूलभूत कृत्ये शिकवताना वस्तूंची मदत घ्यावी. तसेच अंकांच्या आकाराची कल्पना द्यावी. भूमितीतील महत्त्वाच्या आकृत्यांची कंपासपेटीतील साधने व पुठ्ठे यांच्या मदतीने कल्पना द्यावी. एकदा या मूलभूत कल्पना आल्यावर हे **शास्त्रांचे शास्त्र** विद्यार्थी चांगल्या प्रकारे शिकू शकेल. **गणित-पाटीचाही** याबाबत उपयोग करतात अशी माहिती मला मिळाली आहे.

## इतर विषय

इतिहासात अंध विद्यार्थी सहजपणे रस घेऊ शकतो. भूगोल शिकताना मात्र त्याला काही अडचणी जाणवतात. अक्षांश, रेखांश, पर्वत, पठार, त्रिभुज प्रदेश, इत्यादी कल्पना समजणे अंधाला काहीसे कठीण जाते. जर त्याला पृथ्वीचा गोल दाखवला व उठावांच्या साहाय्याने तयार करण्यात आलेले नकाशे समजावून सांगितले तर त्याच्या या अडचणी कमी होतील. सामान्य विज्ञानातील शक्य असतील ते प्रयोग वस्तू दाखवून त्याला समजावून सांगावे लागतात. पहिली ते चौथी या शिक्षणक्रमात सामान्यतः तोंडी परीक्षा असल्यामुळे अंध विद्यार्थी आपल्या स्मरण-शक्तीच्या जोरावर यश मिळवू शकतो. माझे स्वतःचे प्राथमिक शिक्षण घरी झाले आहे. वरील विचार मी मालवण येथील शासकीय अंध शाळेतील विद्यार्थ्यांशी झालेल्या चर्चेवर आधारलेले आहेत.

## उच्च प्राथमिक शिक्षण

९-१२ या वयात विद्यार्थी पाचवी ते सातवीपर्यन्त उच्च प्राथमिक शिक्षण घेत असतो. या वेळी आपल्या मातृभाषेखेरीज इतर भाषांशी (इंग्रजी व हिंदी) त्याची प्रथमच ओळख होते. या भाषा शिकत असताना अंध विद्यार्थ्याला इतर विद्यार्थ्यांपेक्षा अधिक प्रमाणात पाठांतरावर

अवलंबून रहावे लागते. इंग्रजी शब्दांचे स्पेलिंग नजरेच्या साह्याने व लिहिण्याच्या सरावाने लक्षात ठेवणे सोपे जाते असे डोळस लोक सांगतात. अंध विद्यार्थ्यांना या बाबतीत पाठांतराखेरीज दुसरा पर्याय नसतो. **समाज-जीवन व नागरिक-शास्त्र या विषयांत** अंध विद्यार्थी **सहाध्यायी चांगले असल्यास उत्तम रस घेऊ शकतो.**

## माध्यमिक शिक्षण

८ वी ते १० वी इयत्तेपर्यन्त १२-१५ या वयात विद्यार्थी माध्यमिक शिक्षण घेतो. या वेळी संस्कृत व बीजगणित हे नवे विषय त्याला प्रथमच अभ्यासावे लागतात. संस्कृतमध्ये इतरांप्रमाणेच अंध **विद्यार्थीदेखील पाठांतरावर भर देतो**. बीजगणित हा अमूर्त विषय आहे. जर **अंकगणिताची अंध विद्यार्थ्याला चांगली कल्पना आली असेल तर बीजगणिताची तो चांगल्या प्रकारे तयारी करू शकतो**. उणे या वस्तूची (–३, –७ इत्यादी) कर्जाच्या व्यवहाराने त्याला कल्पना दिल्यास विषय समजणे त्याला सोपे जाते. सामान्यत: ज्या मूर्त वस्तूंचे व विषयांचे ज्ञान दृष्टीच्या मदतीशिवाय इतर ज्ञानेंदियांच्या साह्याने होऊ शकते त्या मूर्त वस्तूंचे व विषयांचे ज्ञान त्या त्या ज्ञानेंद्रियांच्या मदतीने सावकाशपणे जर अंध विद्यार्थ्याला करून दिले गेले तर **मूर्ताकडून अमूर्ताकडे** जाण्याची प्रक्रिया त्याला सोपी जाते.

## महाविद्यालयीन शिक्षण

अंध विद्यार्थ्याला **विज्ञान**शाखेकडे जाता येत नाही व **वाणिज्य**शाखेचा अभ्यास करणे सहसा जमत नाही. म्हणून त्याला कलाशाखेकडे जावे लागते. या शाखेमधील निरनिराळया भाषा, इतिहास, राज्यशास्त्र, तत्त्वज्ञान, प्राचीन संस्कृति, इत्यादि अमूर्त विषय अंध विद्यार्थ्याला चांगले जमतात. भूगोल, अर्थशास्त्र व मानसशास्त्र हे विषय समजणे त्याला त्या मानाने कठीण जाते. **महाविद्यालयात अशा विद्यार्थ्यांकडे जर वैयक्तिक लक्ष दिले गेले तर तो चांगली प्रगती करू शकतो.**

## व्यावसायिक शिक्षण

शिक्षण हे व्यवसायाभिमुख असावे व त्याने माणसाला **आर्थिकदृष्टया स्वावलंबी करावे हा शिक्षणाकडे पाहण्याचा एक दृष्टिकोन आहे**. अंध विद्यार्थ्याला त्याच्या आवडीच्या व त्याला करता येण्याजोग्या व्यवसायाचे शिक्षण देण्याचा प्रयत्न अंधांसाठींच्या स्वतंत्र शिक्षण संस्था करत असतात. वेत-काम, लहान यंत्रे तयार करणे, संगीत, इत्यादीं अनेक विषय अंधांना या दृष्टीने तेथे शिकविले जातात. संगीत हा विषय तर या बाबतीत फारच चांगला आहे. कारण संगीताच्या मदतीने उपजीविका करताना दुसऱ्याची व्यवसायासाठी फारशी मदत घ्यावी लागत नाही. **वकिली** हा व्यवसाय काही विशिष्ट परिस्थितीत अंधाला करता येईल. तसेच **महाविद्यालयात अध्यापनाचे कार्यही** त्याला जमू शकेल; परंतु यासाठी बऱ्याच अनुकूल गोष्टींची आवश्यकता असल्यामुळे त्याचा विचार मी येथे करत नाही. टेलिफोन-ऑपरेटरचा व्यवसाय योग्य प्रशिक्षण दिल्यास अंध मनुष्य करू शकतो.

## क्रीडा

मुलाला खेळाच्या पद्धतशीर शिक्षणाची अनेक कारणांसाठी गरज आहे. चांगले आरोग्य, उत्तम मनोरंजन, सांघिक भावनेची वाढ व खिलाडू वृत्तीची जोपासना असे खेळाचे अनेक फायदे होतात. अंध शाळेतून हुतूतू, लंगडी, क्रिकेट इत्यादी मैदानी खेळांचे अंधांना प्रशिक्षण दिले जाते. त्याचबरोबर बौद्धिक कौशल्य असलेले बैठे खेळ अंधांना शिकविले जातात. अंधांना **खेळांचे शिक्षण देताना** त्यांना **इतरांची कमीत कमी मदत घ्यावी** लागेल याकडे लक्ष दिले गेले पाहिजे.

## कला

संगीत ही कला अंधांना उत्तम प्रकारे शिकता येते याचा उल्लेख मागील एका परिच्छेदात येऊन गेला आहे. कंठ-संगीत व वाद्य-संगीत या दोन्हींवर असे विद्यार्थी उत्तम प्रभुत्व मिळवू शकतात. अंधशाळांचे उत्तम वाद्यवृंद असतात. वाङ्मय या कलेत अशा विद्यार्थ्यांना काही प्रमाणात रस घेता येतो. नभोनाट्य अंध विद्यार्थी चांगल्या प्रकारे समजू शकतो. रेडिओ या साधनाचा अंध विद्यार्थ्यांच्या शिक्षणात फार मोठा उपयोग होऊ शकतो. तसेच **टेपरेकॉर्डरचा**-ही त्याला चांगला उपयोग होतो. या दोन माध्यमांनी ज्ञान व मनोरंजन होते. साहित्य, संगीत व नाट्य या कलांचा आस्वाद त्याला घेता येतो. व भर्तृहरीच्या व्याख्येप्रमाणे तो सुसंस्कृत मानव होऊ शकतो.

## संस्कार

माणसाच्या लहानपणापासून कळत-नकळत घरात, कुटुंबात व समाजात त्याच्यावर अनेक संस्कार होत असतात. या संस्कारांमध्ये आपले पालक, शिक्षक, नातलग, मित्र-परिवार व समाज यांचा मोठा वाटा असतो. अंध विद्यार्थ्यांवर संस्कार करीत असताना संस्कार करणाऱ्या व्यक्तींनी काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतात.

अंध विद्यार्थ्यांना त्यांच्या मर्यादांची जाणीव जरूर करून द्यावी; परंतु असे करीत असताना त्यांच्या मनात **न्यूनगंड निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी.** हे काम त्यांचे पालक, नातलग व शिक्षक यांना करावे लागते. जर अशा विद्यार्थ्यांची **भावंडे समंजस असतील** तर हे काम होण्यास फार मोठी मदत होते.

अंध विद्यार्थ्यांच्या मनात परमेश्वराविषयी आदर, विश्वास व श्रद्धा निर्माण करणे फार महत्त्वाचे आहे. अनेक वेळा अशा मुलाचे अंधत्व हा त्याला मिळालेला **परमेश्वराचा शाप** असून त्याच्या पूर्वजन्मातील **पापाचे ते फळ** आहे, अशा प्रकारचे उद्‌गार त्याच्या समोर काढले जातात. **तसेच** परमेश्वराने त्याच्यावर **घोर अन्याय** करून ठेवला आहे अशी कल्पना **त्याच्या मनात भरवून दिली जाते**; परंतु हा दृष्टिकोन बरोबर नाही. परमेश्वर दयाळू व न्यायी आहे. अंधाचे एक ज्ञानेंद्रिय कमजोर करीत असताना तो त्याच्या इतर ज्ञानेंद्रियांची शक्ती वाढवतो. परमेश्वराचे चिंतन करण्यासाठी लागणारी एकाग्रता अंधांना इतरांपेक्षा लवकर साध्य होऊ शकते. संतश्रेष्ठ गुलाबरावमहाराज अंध होते; परंतु त्यांचा अध्यात्मक्षेत्रातील अधिकार मोठा होता. तेव्हा ' उद्धरेत् आत्मना आत्मानम् ' हे भगवद्‌गीतेतील वचन लक्षात ठेवून, परमेश्वरावर दृढ श्रद्धा ठेवून आपल्या जवळ जे नाही त्याबद्दल खेद करीत न बसता किंवा खंत न बाळगता आपल्याजवळ जे आहे त्याचा जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे कसा उपयोग करून घेता येईल याचा विचार अशा विद्यार्थ्यांनी करावा व त्यांच्या पालकांनी, नातलगांनी, शिक्षकांनी व मित्रांनी त्याला यासाठी जास्तीत जास्त मार्गदर्शन व मदत करावी असे मला वाटते. सुदैवाने मला स्वतःला या बाबतीत सर्वांकडून उत्तम सहकार्य मिळत आले आहे.

## अंध विद्यार्थी व समाज

अंध विद्यार्थ्यांना स्वतंत्र शिक्षणसंस्थांतून शिकवावे का इतर विद्यार्थ्यांबरोबर सामान्य शिक्षणसंस्थांतून शिकवावे हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. माझ्या मते अंध विद्यार्थ्याला पूर्व-प्राथमिक शिक्षण त्याच्या पालकांनी घरीच द्यावे. प्राथमिक शिक्षणातून इयत्ता चौथीपर्यन्तचे शिक्षण प्रामुख्याने स्वतंत्र शिक्षणसंस्थांतून द्यावे. इयत्ता ५ वीपासून मात्र हळूहळू अंध विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यांबरोबरच सामान्य शिक्षणसंस्थांतून शिकवावे. **महाविद्यालयीन पातळीवर अंध विद्यार्थ्यांसाठी** वेगळ्या शिक्षणसंस्थांची माझ्या मते गरज नाही. महाराष्ट्र सरकारने सुरू

केलेली **एकात्म शिक्षण** योजना या बाबतीत खरोखरच चांगली आहे. **अंध विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या अधिक जवळ आल्यास, शिक्षकांनी योग्य मार्गदर्शन केल्यास, या विद्यार्थ्यांमध्ये चांगले संबंध निर्माण होऊ शकतात.** बहुसंख्य मुलांची अशा विद्यार्थ्यांना मदत करण्याची तयारी होते. माझे स्वतःचे शिक्षण इयत्ता ८ वी पासून सामान्य विद्यार्थ्यांबरोबरच झाले व बहुसंख्य विद्यार्थ्यांचे मला चांगले सहकार्य मिळाले. **समाजाने अंध विद्यार्थ्यांबाबतचा योग्य दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे.** अशा विद्यार्थ्यांची केवळ कीव न करता किंवा त्यांना नुसती सहानुभूती न दाखवता ते विद्यार्थी स्वावलंबी बनून समाजाचे उपयुक्त घटक व देशाचे आणि जगाचे कार्यक्षम नागरिक कसे होऊ शकतील याचा विचार समाजाने, सरकारने व आंतरराष्ट्रीय संघटनांनी केला पाहिजे. सुदैवाने आज या दिशेने प्रयत्न सुरू झाले आहेत. जस्टिस बीमन (Justice Beeman) व डॉक्टर हेलन केलर यांनी आपल्या अपंगत्वावर मात करून जागतिक कीर्ती संपादन केली आहे.

ज्ञानप्राप्तीच्या ध्येयाकडे स्वतःच्या **निर्धाराने व इतरांच्या सहकार्याने** विद्यार्थ्यांनी वाट चालू ठेवावी.

■ ■

# २४ वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे विशेष प्रश्न

संजीव गोखले

वैद्यकीय अभ्यासक्रमातले विद्यार्थ्यांचे प्रश्न प्रवेश घेण्यापासून सुरू होतात. सध्याच्या काळात विद्यार्थी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी : [१] अतिशय बुध्दिमान, किंवा [२] अनुसूचित जाती-जमातीतला, किंवा [३] देणगीदार असावा लागतो. जी मुले वरीलपैकी कुठल्याच वर्गवारीत बसत नाहीत त्यांनी कॉलेजच्या दुसऱ्या वर्षी 'B' ग्रुप घेण्यापूर्वी दोनदा विचार करणे आवश्यक असते. कारण एकदा 'B' ग्रुप घेतला की वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळाला नाही तर बी. एस्‌सी. शिवाय कुठलेही दार त्यांना उघडे नसते व सरासरी बघता एकूण मुलांपैकी फक्त १५ ते २०टक्के मुलांनाच वैद्यकीय महाविद्यालयांत प्रवेश मिळतो.

### रॅगिंग

कुठल्याही महाविद्यालयात हल्ली आढळून येणारा एक त्रासाचा, क्वचित प्रसंगी धोकादायक, प्रकार म्हणजे " रॅगिंग ". हा मला वैद्यकीय महाविद्यालयात अभावानेच आढळून आला व जेव्हा आढळला तेव्हा तो अतिशय सौम्य स्वरूपाचा होता. त्याचे कारण बहुधा डॉक्टर होण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची विचारसरणी सर्वसाधारण विद्यार्थ्यांपेक्षा वेगळी असावी.

### पुस्तके व साधने फार खर्चाची

वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतरची पहिली अडचण खर्चाची. सुरुवात शरीर-शास्त्राच्या (Anatomy) शरीरविच्छेदनाच्या हत्यारांची पेटी (Dissection Box) पासून होते. आमची पुस्तकेसुद्धा सर्वसाधारण पुस्तकांपेक्षा पुष्कळ महाग असतात. पहिल्या वर्षाच्या पुस्तकांची किंमत अंदाजे ६०० ते ७०० रुपये. दुसऱ्या वर्षाच्या पुस्तकांची किंमत ४०० ते ५०० रुपये व तिसऱ्या वर्षीच्या पुस्तकांची किंमत ४०० ते ५०० रुपये असते. ह्याच्याशिवाय Stethoscope, Hammer, Measuring tape, Torch, Aprons, इत्यादी बारीकसारीक खर्च असतात. पुस्तके बहुतेक परदेशी लेखकांची असल्यामुळे किंमती महाग असतात. ही पुस्तके अगदी रोजच्या रोज लागत असल्यामुळे प्रत्येकाकडे व स्वतःची असणे जरुरीचे असते. त्यामुळे वाचनालयात बसणे विशेष सहाय्यभूत होत नाही.

### इंग्रजी माध्यम

विद्यार्थ्यांना भासणारी दुसरी अडचण म्हणजे इंग्रजी या विषयाची. वैद्यकीय शिक्षण हे मुळातच दुर्बोध व बोजड शब्दांनी भरलेले. त्यातून ते इंग्रजी माध्यमातून शिकणे सर्वसाधारण मुलांना जड जाते. ह्यासंबंधी विद्यार्थ्यांना जाणवणाऱ्या अडचणी दोन प्रकारच्या असतात. इंग्रजी भाषेतून वाचणे व समजावून घेणे अवघड व त्याहून महत्वाची अडचण म्हणजे इंग्रजीत संभाषण करणे.

वैद्यकीय महाविद्यालयात मौखिक परीक्षेला प्राधान्य दिले जाते. त्यामानानें लेखी परीक्षेला गौण स्थान असते. विद्यार्थ्यांना खरी अडचण तोंडी परीक्षेच्या वेळी येते. रोग्याला रोगामुळे होणारा त्रास, रोगाची लक्षणे, तुमचे स्वतःचे रोगनिदान, त्याची कारणे व त्यावरील उपाययोजना, ह्या सर्वांची परीक्षकांशी सविस्तर चर्चा करावी लागते. ह्यासाठी सफाईदार इंग्रजी लागते. जे विद्यार्थी असे बोलू शकतात त्यांना थोडे जास्त गुण देण्याकडे परीक्षकांचा साहजिक कल असतो. अंतिम M.B.B.S. च्या परीक्षेनंतर पदव्युत्तर शिक्षणासाठी ज्या विद्यार्थ्यांना संधी दिली जाते त्यांचे सर्व वर्षांचे गुण लक्षात घेतले जातात. ह्या दृष्टीने प्रत्येक वर्षाच्या गुणांना महत्व असते.

## विच्छेदनासाठी प्रेतांची टंचाई

वरील अडचणी ह्या विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक अडचणी आहेत. ह्याशिवाय महाविद्यालयांना येणारी एक अडचण, ज्यामुळे पर्यायाने मुलांचे नुकसान होते ती म्हणजे प्रेतांची टंचाई. ही दिवसें-दिवस वाढू लागली आहे. परिणामी एक प्रेत जवळजवळ ३६ मुलांना वाटून दिले जाते. त्यामुळे प्रत्येकाला विच्छेदनाची (Dissection) संधी समान प्रमाणात मिळू शकत नाही. शरीरशास्त्र हा विषय मुळातच थोडाफार कंटाळवाणा व त्यातून प्रत्यक्ष विच्छेदन न करता नुसतेच वाचणे हे तर अतिशय निरस होते.

## एक विसंगती

वैद्यकीय महाविद्यालयातील एक विसंगती म्हणजे पहिल्या व तिसऱ्या वर्षी नापास झालेली मुले ही सहा महिने मागे पडतात. परंतु दुसऱ्या वर्षी नापास झालेल्या मुलांना A.T.K. T. मिळते. त्यापैकी पहिल्या वर्षी नापास झालेल्या मुलांची अवस्था फार विचित्र होते. कारण ही मुले बरोबरच्या मुलांच्या सहा महिने पाठीमागे व आपल्यापेक्षा एक वर्षाने पाठीमागे असलेल्या मुलांच्या सहा महिने पुढे असतात.

त्यामुळे ती मुख्य प्रवाहामधून बाहेर पडतात. त्यांना Casual Batch ह्या नावाने ओळखले जाते. त्यांच्यासाठी सर्व वर्ग वेगळे घेतले जातात. ही १५ ते २० मुलांची बॅच पुढील चार वर्षे खड्यासारखी वेगळी ठेवली जाते. त्यांमुळे त्यांच्यात एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण होतो. ह्यापैकी फारच थोडी मुले पुढे पदव्युत्तर शिक्षणासाठी गेलेली आढळतात. बहुतेक मुले M.B.B.S. नंतर General Practice करतात. पहिल्या, दुसऱ्या वर्षी नापास झालेल्या मुलांतील हा भेदभाव आश्चर्यजनक व खेदकारक आहे.

## शैक्षणिक वर्षे : एक वादाचा मुद्दा

वैद्यकीय महाविद्यालयातील शैक्षणिक वर्षे हा सुद्धा एक वादाचा मुद्दा आहे. ह्या बाबतीत माझे वैयक्तिक मत असे आहे की पहिले व दुसरे शैक्षणिक वर्ष प्रत्येकी एक वर्षाचे असावे. ते प्रत्येकी दीड वर्ष असण्याची बिलकुल आवश्यकता नसते. प्रथमवर्षी Anatomy व Physiology हे विषय व दुसऱ्या वर्षी Pharmacology, Pathology, हे विषय शिकविले जातात. हे विषय Basic Sciences [मूलभूत शास्त्रे] मध्ये मोडतात. ह्यांच्यामुळे तिसऱ्या वर्षी कराव्या लागणाऱ्या General Medicine, General Surgery, Gynaecology ह्या विषयांच्या अभ्यासाला मदत होते. पहिल्या दोन शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या संकल्पना स्पष्ट व्हायला मदत होते. त्या विषयातील बारकाव्यांची व सूक्ष्म तपशीलाची जरूर नसते. ही जरूर ज्यांना पदव्युत्तर शिक्षण घ्यायचे असते त्यांना असते; व अशी मुले एकूणपैकी फक्त २० टक्के असतात. त्यांच्यासाठी सर्व १०० टक्के मुलांनी तीन वर्षाच्या शिक्षणक्रमातून जाण्याची गरज नाही, असे मला वाटते. चर्चेनंतर पुष्कळ मुलांचे हेच मत असल्याचे मला आढळून आले.

तृतीय वर्षी मात्र शैक्षणिक वर्ष, दीड वर्षाचे असावे. ह्या वर्षी विद्यार्थ्यांचा रोग्याशी प्रत्यक्ष संबंध येतो व रोगनिदान, रोगचिकित्सा व त्यावरील उपाय, हे ह्या दीड वर्षात शिकविले जातात. प्रत्यक्ष व्यवहारात, डॉक्टर म्हणून रोग्यांना बरे करताना ह्या शिक्षणाचा उपयोग होतो. म्हणून हे दीड वर्ष असणे जरुरीचे आहे.

तिसऱ्या वर्षाच्या शेवटी परीक्षेनंतर ८० टक्के मुले General Practice करतात, व २० टक्के मुलांना पदव्युत्तर शिक्षणाची संधी त्यांच्या परीक्षेतील गुणांमुळे मिळते. हे २० टक्के विद्यार्थी रुग्णालयात निवासी डॉक्टर म्हणून पुढील तीन वर्षे काम करतात.

### खेळांचे गुण – प्रोत्साहन की अडचण ?

ह्या परीक्षेतील एकूण गुणांच्या बेरजेमध्ये विद्यापीठाच्या धोरणाप्रमाणे खेळांचे गुण वाढवले जातात. माझ्या मते हे एक अनावश्यक व अयोग्य रीतीने दिलेले प्रोत्साहन आहे. ह्यासंबंधी बरेच प्रश्न मनात येतात.

अ ] विद्यापीठाच्या ह्या धोरणामुळे खेळांना प्रोत्साहन मिळते का ? खिलाडूवृत्ती वाढीस लागते का ? ज्यांना खेळांची आवड असते त्यांना निःसंशय प्रोत्साहन मिळते; पण त्याचबरोबर पुष्कळ मुले केवळ गुणांसाठी खेळांच्या पाट्या टाकतात. ह्यापैकी एक टक्कासुद्धा मुले तो खेळ परीक्षेनंतर खेळत नाहीत. ह्याचे कारण परीक्षेपुरते गुण मिळवण्याचे काम, झालेले असते. खिलाडूवृत्ती ती हीच का ?

आ ] समजा क्षणभर गृहीत धरले की ह्या धोरणामुळे खिलाडूंना प्रोत्साहन मिळते, तर मग असा प्रश्न पडतो की विद्यापीठाचे धोरण काय ? जे उत्तम खेळाडू आहेत असे डॉक्टर निर्माण करणे; का उत्तम डॉक्टर निर्माण करणे ?

इ ] ह्या धोरणामुळे कोणावर अन्याय होतो का ? ह्याचे उत्तर होकारार्थी द्यावे लागेल. हुशार परंतु खेळात प्राविण्य नसलेल्या मुलांवर ह्यामुळे निःसंशय अन्याय होतो.

ह्या प्रश्नांचा विचार करता काही सूचना कराव्याशा वाटतात.

अ ] खेळांतील प्राविण्याबद्दल विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रके, बक्षिसे, ढाली, कप, पदके, इत्यादी जरूर द्यावीत.

आ ] सर्व विषयांत समान गुण असलेल्या दोन विद्यार्थ्यांपैकी एकाची निवड जर करायची असेल तर त्याच्या खेळातील प्राविण्याचा विचार व्हावा.

इ ] ज्या विद्यार्थ्याला दुसऱ्यापेक्षा गुण जास्त आहेत, त्या विद्यार्थ्याला विषयात अग्रक्रम मिळावा व खेळांच्या अभावामुळे तो डावलला जाऊ नये.

विषयाचे ज्ञान कमी असलेल्या एखादया डॉक्टरकडून रोग्याचे जर नुकसान झाले तर रोग्याने स्वतःची अशी समजूत घालावी का ? " माझे जे नुकसान झाले आहे ते अशा डॉक्टरकडून की जो गुणवत्तेत कमी असला तरी खिलाडूवृत्तीचा आहे. " तथाकथित खिलाडूवृत्तीसाठी रोग्यांना नुकसान सोसावे लागू नये एवढाच माझा उद्देश आहे.

### परीक्षा आणि पक्षपात

वैद्यकीय परीक्षेत परीक्षकांकडून आपल्या महाविद्यालयातील मुलांसाठी केलेला पक्षपात हा तर परीक्षेचा अविभाज्य भाग बनला आहे व तो विद्यार्थ्यांनी अटळ म्हणून स्वीकारला आहे. ह्यामुळे ज्या महाविद्यालयाचा परीक्षक, त्या महाविद्यालयाचे जास्तीस जास्त विद्यार्थी पास होणार हे ठरून गेले आहे. त्यामुळे फक्त बाहेरगावच्या परीक्षकांनीच, जे निःपक्षपाती राहू शकतात,

परीक्षा घ्यावी का असाही एक विचार मनात येतो. दुसरा विचार असा की विद्यार्थ्यांची एकंदरीत तीन वर्षांत दिसलेली प्रगती ही टप्प्याटप्प्यांनी, म्हणजे दरमहा घेतलेल्या परीक्षकांनी, अजमवावी व त्याची एकंदर बेरीज म्हणजेच अंतिम निर्णय समजावा.

**पदव्युत्तर अभ्यासाची संधी व आर्थिक अडथळा**

M. B. B. S. झाल्यानंतर लगेच येणारी एक मोठी अडचण आर्थिक स्वरुपाची असते. ज्यांना पदव्युत्तर शस्त्रक्रियेचे शिक्षण घ्यायचे असते, त्यांना तर ती प्रसंगी अनुल्लंघनीय असते. कित्येक हुशार मुलांना उत्तम गुणांमुळे चालून आलेली पदव्युत्तर शिक्षणाची संधी केवळ आर्थिक अडचणीं-मुळे लाथाडावी लागते व उर्वरित आयुष्य General Practitioner म्हणून काढावे लागते.

वरील अडचणींचा पाढा ही एकूण अडचणींची केवळ एक चुणुक आहे. परगावच्या मुलांना येणाऱ्या भावनिक व मानसिक अडचणी ह्या इतर कुठल्याही महाविद्यालयातील मुलांपेक्षा वेगळ्या असण्याचे काही कारण नाही. त्यामुळे त्यासंबंधी काही लिहिलेले नाही.

■ ■

# २५

## अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे विशेष प्रश्न

वि. रा. देशपांडे

भारतामध्ये सध्या अभियांत्रिकी शिक्षणामध्ये प्रामुख्याने खालील चार स्तरांवर शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध आहेत :

| क्रमांक | शिक्षणसंस्थेचे स्वरूप | अभ्यासक्रमाचे स्वरूप |
|---|---|---|
| १. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था | प्रमाणपत्र परीक्षा अभ्यासक्रम (Certificate Courses) |
| २. | तंत्रनिकेतने | पदविका अभ्यासक्रम (Diploma Courses) |
| ३. | अभियांत्रिकी महाविद्यालये | पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम (Degree & post-graduate courses) |
| ४. | इंडियन इन्स्टिटयूटस् ऑफ टेक्नॉलॉजी व विशेषसंस्था | पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम |

स्वातंत्र्योत्तर काळांत वरील अभ्यासक्रमांच्या शिक्षणसंस्थाची व विद्यार्थ्यांची प्रवेशसंख्या मोठ्या प्रमाणावर वाढली. खरगपूर, मुंबई, दिल्ली, कानपूर व मद्रास या ठिकाणी प्रगत देशांच्या सहकार्याने इंडियन इन्स्टिटयूटस् ऑफ टेक्नॉलॉजी स्थापन करण्यात आल्या व त्यामध्ये दरवर्षी १,५०० विद्यार्थ्यांना विविध शाखांच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश देण्यात येत आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयांमधून २८,००० विद्यार्थी व तंत्रनिकेतनातून ५०,००० विद्यार्थी दरवर्षी प्रवेश घेत आहेत. बहुतेक मोठ्या जिल्हयांच्या ठिकाणी तंत्रनिकेतने आहेत. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून २,००,००० विद्यार्थी दरवर्षी प्रवेश घेतात.

महाराष्ट्रात थोड्या खाजगी संस्था सोडल्या तर अधिकतर तांत्रिक शिक्षण संस्था शासकीय आहेत. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील अभ्यासक्रम काही शालांत परीक्षेनंतरचे व काही ८ वी नंतरचे आहेत; काही १ वर्ष व काही २ वर्षे मुदतीचे आहेत. प्रवेशासाठी तीव्र स्पर्धा असते व हजारो अर्ज प्रवेशासाठी येत असतात. निवड प्रामुख्याने गुणवत्तेनुसार असली तरी ग्रामीण विभागातील विद्यार्थ्यांना अग्रक्रम दिला जातो. निवडपध्दतीबद्दल विद्यार्थ्यांना व पालकांना कल्पना नसल्याने टर्नर, मोटार मेकॅनिक, इलेक्ट्रीशियन, ड्राफ्टस्‌मन, अशा विशिष्ट अभ्यासक्रमांनाच अर्ज मोठ्या प्रमाणात येतात व त्यामानाने मोल्डर, पॅटर्नमेकर, सुतार, प्लंबर, अशा अभ्यासक्रमांना मात्र विद्यार्थी स्वखुषीने येताना आढळत नाहीत. ज्या अभ्यासक्रमामध्ये शारीरिक कष्ट आहेत अशा अभ्यासक्रमांना न येण्याची प्रवृत्ती विद्यार्थ्यांमध्ये दिसून येते. ग्रामीण विभागा-

मध्ये व विशेषकरून शालेय स्तरावर या व्यावसायिक अभ्यासक्रमांची सविस्तर माहिती नसते. त्यासाठी शाळांनी मुलांना व पालकांना व्यवसाय मार्गदर्शन देण्याचे प्रयत्न करणे हिताचे होईल. तंत्रनिकेतनांतून पदविका अभ्यासक्रमाची सोय प्रामुख्याने स्थापत्य, यंत्र, विद्युत्, अभियांत्रिकी शाखांची असून याखेरीज विशिष्ट अभ्यासक्रम काही ठराविक संस्थांमध्येच आहेत. प्रवेशासाठी तीव्र स्पर्धा असून, शालांत परिक्षेत ८० टक्के गुण असणाऱ्या विद्यार्थ्यालाच प्रवेश मिळतो आहे. अर्जदारांपैकी केवळ दहा टक्के लोकांनाच प्रवेशाची संधी उपलब्ध आहे.

पुणे व मुंबई या ठिकाणी नोकरीमध्ये असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सायंकाळचे पदविका अभ्यासक्रम आहेत. तसेच पत्रव्यवहारद्वारेसुद्धा हा अभ्यासक्रम तंत्रज्ञांना पुरा करता येतो. मात्र एक महिना प्रात्यक्षिकांसाठी संस्थेमध्ये यावे लागते. पदविका अभ्यासक्रम पूर्ण करून पदवी अभ्यासक्रमांसाठी जाण्याची तरतूद आहे, पण अभियांत्रिकी महाविद्यालयातून ही सोय फार अल्प प्रमाणात आहे. त्यासाठी पुणे, मुंबई, औरंगाबाद, नागपूर, अशा ठिकाणी नोकरीमध्ये असणाऱ्या पदविकाधारकांसाठी सायंकाळचे अर्धवेळ (Part-time) पदवी अभ्यासक्रम सुरू होणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे हुशार व अभ्यासू विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणाच्या संधी मिळतील.

गेली ३-४ वर्षे असा अनुभव येतो आहे की शालांत परीक्षेचे निकाल लागले तरी कित्येक दिवस पदविका किंवा पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश-अर्जच छापून उपलब्ध नसतात व साधे अर्ज मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना संस्थांकडे हेलपाटे घालावे लागतात. प्रवेश निश्चित होण्यास दोनतीन महिने लागतात. व त्या अवधीत विद्यार्थ्यांना शास्त्र शाखेकडे प्रवेश घेऊन ठेवावा लागतो व फी भरावी लागते. त्याशिवाय शास्त्रशाखेकडील काही जागा नंतर वाया जातात ते निराळेच. त्यासाठी पदविका व पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश-अर्ज दरवर्षी १५ मे पूर्वी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाच्या संबंधित खात्याची आहे व ती त्यांनी नीट पार पाडण्याची गरज आहे.

पदविका अभ्यासक्रम सामान्यपणे मध्यम कुवतीच्या व बुद्धिमत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी आहे. तथापि अभ्यासक्रम ३ वर्षांचाच व नोकरीच्या संधी चांगल्या असल्याने, आवड नसतानाही कित्येक वेळा काही विद्यार्थी हा अभ्यासक्रम घेताना दिसतात.

हल्ली जिल्ह्याच्या ठिकाणी राहण्याच्या जागांचा प्रश्न फार अवघड झाला आहे. शिक्षणसंस्थातून वसतिगृहांची सोय फार मर्यादित प्रमाणात आहे. त्यामुळे संस्थेमध्ये प्रवेश मिळूनही राहण्याची सोय न झाल्याने कित्येक विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम पूर्ण करणे कठीण जाते. काही सामाजिक संस्था यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करीत आहेत. पण गरजेच्या तुलनेने सुविधा अत्यल्प आहेत.

अभियांत्रिकी महाविद्यालयातून पदवी अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्रात आठ अभियांत्रिकी महाविद्यालयातून सोय असली तरी विद्यार्थ्याला पहिल्या वर्षी प्रवेश देताना शाखा ठरविली जात नाही. पहिल्या वर्षाच्या गुणवत्तेवर दुसऱ्या वर्षी शाखा ठरविली जाते. पण यामध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचीच शाखा मिळेल याची शाश्वती नसते.

इंडियन इन्स्टिटयूटस् ऑफ टेक्नालॉजीमधून सुमारे १५ अभियांत्रिकी शाखांचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत व प्रवेशासाठीं प्रवेशपरीक्षा दरवर्षी मे महिन्यात सर्व भारतभर घेतली जाते. पण स्पर्धा तीव्र असल्याने ग्रामीण व अविकसित भागातील विद्यार्थ्यांना अभावानेच प्रवेश मिळतो. त्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी विशेष मार्गदर्शन केंद्रे सुरू करणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांची अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी मागणी वाढत आहे व सुविधा मात्र मर्यादित आहेत. या उलट, शेजारच्या एका राज्यात भरमसाट देणगी देऊन खाजगी संस्थातून प्रवेश मिळविण्यासाठी विद्यार्थी बऱ्याच संख्येने जात आहेत. यासाठी राज्यातच नवीन संस्था सुरु करणे गरजेच्या व विकासाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

अलिकडे मुक्त विद्यापीठ या संकल्पनेनुसार पुणे, ठाणे व कोल्हापूर या ठिकाणी अभियांत्रिकी शाखेतील पदवी अभ्यासक्रम कारखान्यांच्या सहकार्याने सुरू झाले आहेत. शिक्षणातील हा अभिनव प्रयोग असल्याने विद्यार्थ्यांमध्ये व पालकांतही साशंकता आहे. तरीपण या प्रकल्पाला व प्रयोगाला विद्यार्थ्यांनी व कारखान्यांनी सहकार्य केले तर पुढील काळात शिक्षणक्रमातील हा नवीन उपक्रम रूढही होईल. मर्यादित साधनसामुग्री व आर्थिक तरतूद असताना समाजाच्या गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने असे प्रयोग अत्यावश्यकच मानावे लागतील.

अभियांत्रिकी अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर, विद्यार्थी बहुधा नोकरीच्या क्षेत्रात उतरतो. अभ्यासक्रमामध्ये व्यक्तिमत्वाच्या विकासाचे किंवा सामाजिक दृष्टीकोन निर्माण करण्याचे क्वचितच प्रयत्न होतात. त्यामुळे या अभ्यासक्रमातील बरेच विद्यार्थी संकुचित वृत्तीचे किंवा व्यक्तिनिष्ठ आढळून येतात. यासाठी विशेष प्रयत्न करून बदल घडवून आणला पाहिजे.

तंत्रज्ञांना लघुउद्योग सुरू करण्यासाठी राज्यामध्ये लघुउद्योग विकास महामंडळे, विभागीय महामंडळे, वित्त महामंडळ, राज्य औद्योगिक महामंडळ, बँका, इत्यादींतर्फे अनेक सुविधा व साह्य देण्याचे उपक्रम सुरू करण्यात आलेले आहेत. विशेषेकरून तंत्रज्ञ जर अविकसित किंवा मागास जिल्ह्यात लघुउद्योग सुरू करीत असेल तर विशेष सवलती उपलब्ध आहेत. याखेरीज अविकसित देशामध्ये मोठ्या पगारावर नोकरीच्या संधी आहेत. परंतु वरील गोष्टींबाबत पुरेशी माहिती व मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळत नाही असे दिसते.

■ ■

# २६ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे आरोग्य

मु. कृ. गोडबोले

जगात आरोग्य ही एकच चीज अशी आहे की जी दुसऱ्याकडून उसनी घेता येत नाही, आणि दुसऱ्याला उसनी देता येत नाही. आपल्या 'शरीर संपदेची शिदोरी' ज्याची त्याने कमवावी लागते आणि टिकवावीही लागते; एवढेच नव्हे तर आयुष्यभर पुरवावी लागते. फक्त दुसऱ्याचे मार्गदर्शन लाभल्यास 'आरोग्य' संपादणे सोपे जाते, एव्हढेच. आपल्या आरोग्याचा संचय आपल्या बालपणात आणि तरुणपणात करायला हवा. सुदृढ शरिरातच सुदृढ मनाची वाढ होऊ शकते.

## विद्यार्थी आरोग्य योजनांचा इतिहास

महाराष्ट्रांत विद्यापिठांच्या वाढीबरोबरच महाविद्यालयांचीही संख्या सतत वाढत राहिली, आणि जुनी महाविद्यालये सतत विस्तार पावली. १९७९–८० साली महाराष्ट्रात एकूण ६४६ उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था होत्या व त्यात ५,४७,००० विद्यार्थी शिक्षण घेत होते.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचा सर्वांगिण विचार करतांना, त्यांचे आरोग्य विषयक प्रश्न आणि विद्यार्थी आरोग्य सेवा योजना ह्यांचा विचार न केल्यास साऱ्या विद्यार्थी जीवनाचा अभ्यासच अपुरा ठरेल.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणक्रमामध्ये शारीरिक शिक्षणाचा, खेळांचा, प्रथम युओटिसीचा आणि नंतर छात्रसेनेचा अंतर्भाव, ही विद्यार्थ्यांच्या आरोग्याविषयी आस्था दाखवणारी शासनाने आणि शिक्षण तज्ज्ञांनी अवलंबलेली पहिली कृती होय. शारीरिक शिक्षणापाठोपाठ शारीरिक तपासणी आणि वैद्यकीय उपचारांचे, मार्गदर्शनाचे क्षितिज शासनाच्या, शिक्षण तज्ज्ञांच्या आणि वैद्यकीय तज्ज्ञांच्या दृष्टिपथात यायला मात्र फार वेळ लागला, आणि आरोग्यविषयक प्रशिक्षणापासून तर आपण अद्याप फारच दूर आहोत.

भारतातील 'विद्यार्थी आरोग्य योजनेंची' सुरुवात १९०९ साली बडोदा येथे महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यापीठांत झाली. मुंबई विद्यापीठामधील पहिली आरोग्यविषयक तपासणी १९३९–४० साली सुरू झाली.

## भारतातील कार्याची पाहणी

१९६५ साली 'वर्ल्ड युनिव्हर्सिटी सर्व्हिस' आणि भारताचा 'राष्ट्रीय शिक्षण आयोग' (Indian Education Commission) ह्यांनी संयुक्तपणे साऱ्या भारतीय विद्यापीठांमधील निरनिराळ्या विद्यार्थी कल्याण योजनांची पाहणी केली, आणि आपला विस्तृत अहवाल प्रसिद्ध केला. भारतीय विद्यापीठातील आरोग्य योजनांविषयीच्या ह्या अहवालात पुढील प्रमाणे नोंद आली आहे:

" विद्यापीठामधील विद्यार्थी, शिक्षक, इतर सेवक वर्ग आणि त्यांचे कुटुंबीय, ह्या साऱ्यांसाठी कार्यवाहित असलेल्या योजनांविषयीची माहिती आयोगातर्फे मागविण्यात आली होती. त्याला त्यावेळच्या ७० विद्यापीठांपैकी फक्त ५० विद्यापीठांनी योग्य प्रतिसाद दिला आणि आपणाकडील माहिती पुरवली. ... आरोग्य तपासणीविषयी पुणे विद्यापीठाशिवाय इतर कुठल्याही विद्यापीठाने सविस्तर माहिती पाठवलेली नव्हती."

चार निरनिराळ्या राज्यामधील ह्या विद्यापीठांकडून जी काही माहिती उपलब्ध झाली तिचा विशेष असा की त्या सर्वांच्या पाहणीमध्ये विद्यार्थ्यांमध्ये आढळणाऱ्या निरनिराळ्या शारीरिक दोषांच्या आणि रोगांच्या प्रकारांमध्ये आणि शेकडा प्रमाणामध्येही फारच साधर्म्य सापडले. ह्या विद्यार्थ्यांमधील २७ ते ३० टक्के विद्यार्थ्यांमध्ये निरनिराळे लहान मोठे आजार आढळले. त्यामध्ये डोळ्यांच्या आणि दातांच्या विकारांचे प्रमाण जास्तीत जास्त होते."

अहवालांत पुढे नमूद केले आहे की " पुणे विद्यापीठाशिवाय इतर कोणत्याही विद्यापीठाने वैद्यकीय तपासणी व नंतरचा पाठपुरावा ह्यांची निश्चित पद्धती स्विकारलेली नाही. कर्नाटक आणि पुणे विद्यापीठाशिवाय इतरत्र वैद्यकीय तपासणीद्वारा आढळलेल्या रोगांवरील आणि दोषांवरील इलाजांचा पाठपुरावा (Follow up) करण्याची काहीही शिस्तबद्ध योजना कार्यवाहीत नाही."

विद्यार्थी आरोग्य योजनांविषयी निरनिराळ्या सूचना मांडताना अहवालाने सुचवले आहे की " भारतातील सर्व विद्यापीठांनी पुणे विद्यापीठाच्या ' विद्यार्थी आयोग्य सेवा योजने 'च्या कामाच्या पद्धती, परिक्षापद्धती आणि योजनेतर्फे वापरली जाणारी नोंदणीपत्रके, ह्यांचा अभ्यास करावा आणि शक्यतो त्यांचा स्वीकारही करावा."

## पुणे विद्यापीठाची आरोग्य योजना

पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी आरोग्य सेवा योजनेची सुरवात ११६२ साली झाली. प्रथमत: काही वर्षे ही योजना पुण्यातील सर्व महाविद्यालयांतील वसतिगृहांमधील विद्यार्थिविद्यार्थीनींना लागू करण्यात आली. प्राथमिक वैद्यकीय परीक्षा आणि नंतरचा पाठपुरावा ह्यासाठी वसतीगृहातला विद्यार्थी सहज उपलब्ध होऊ शकतो आणि वसतिगृहाचा अधिकारी वर्ग ह्या कामासाठी उत्तम संपर्क माध्यमही ठरतो हा ह्या मागचा उद्देश होता.

१९६५ साली पुणे विद्यापीठाच्या पुण्याबाहेरील काही विद्यालयातील वसतिगृहातील विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्याचा दुसरा टप्पा योजनेने गाठला.

१९६७ साली विद्यापीठातील आणि इतर सर्व वसतिगृहांतील भोजनालयात काम करणाऱ्या सर्व सेवकांची वैद्यकीय तपासणीही योजनेतून सुरू झाली.

१९६९ साली पुणे विद्यापीठाच्या परिसरांत शिक्षण घेणाऱ्या सर्व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आरोग्य योजना लागू करण्याचा आणखी एक टप्पा गाठण्यात आला.

ह्या काळातच अभियोजना (Master Plan) तयार करण्यांत आली. योजनेच्या मूळ उद्देशांना बाध न येता, योजनेचा योजनाबद्ध विस्तार व्हावा, योजनेच्या कार्याची क्षमता आणि प्रत सतत वाढत राहावी हाच हेतू पुढे ठेवून हा आराखडा तयार करण्यात आला होता.

## आदर्श विद्यार्थी आरोग्य योजना

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी असणारी आरोग्य योजना आदर्श ठरायची असल्यास ती पुढील शास्त्रीय पातळीवर कार्यरत असणारी हवी :

(अ) विद्यार्थ्यांच्या नैमित्तिक आजारांवरील उपचार.

(आ) वार्षिक वैद्यकीय तपासणी आणि आढळलेल्या दोषांचा पाठपुरावा.
रोग प्रतिबंधक लस देण्याचा कार्यक्रम.
मानसिक विकारांवरील उपाय योजना.

(इ) आरोग्यविषयक प्रशिक्षण.

## विद्यार्थ्यांच्या नैमित्तिक आजारांवरील उपचार

प्रत्येक महाविद्यालयांत एक आजारी विद्यार्थ्यांसाठीची खोली (Sick Room) आणि छोटा दवाखाना असावा. महाविद्यालयाच्या जवळचेच एखादे डॉक्टर विद्यार्थ्यांच्या सोयीच्या वेळी आठवड्यांतून कमितकमी ३ वेळा तरी ह्या दवाखान्यास भेट देण्यास यावेत. ताप, आंव, सर्दी, पडसे, इ. किरकोळ आजारांचे इलाज अशा ठिकाणी होऊ शकतील. शक्यतो अशा दवाखान्यांत माफक शुल्क भरून शिक्षकवर्ग, इतर सेवक वर्ग आणि त्यांचे कुटुंबीय, ह्यांच्यासाठीही वैद्यकीय सेवा उपलब्ध असावी. गेली अनेक वर्षे चालू असलेला पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयातील दवाखाना हे ह्याचे उत्तम उदाहरण आहे.

विद्यापीठाच्या आवारात मात्र विद्यापीठ अनुदान मंडळाच्या अनुदानाच्या साहाय्याने उभारलेली आरोग्य केन्द्राची इमारत असावी. ह्या इमारतीत दैनंदिन उपचारांसाठी असलेल्या दवाखान्या-शिवाय विद्यार्थी आरोग्य योजनेच्या प्रमुखांचे कार्यालय आणि योजनेच्या दप्तरासाठी विस्तीर्ण जागा असावी. केन्द्रात रोज निरनिराळ्या शाखांमधील प्रशिक्षित वैद्यकीय तज्ज्ञांच्या भेटीची सोय असावी. क्ष किरण यंत्रणा, वैद्यकीय प्रयोगशाळा, शल्यचिकित्सा, इत्यादी सर्व प्राथमिक सुवि-धांनी हे केन्द्र परिपूर्ण असावे. माफक दरामध्ये 'टॉन्सिल'सारख्या छोट्या शस्त्रक्रियांची तेथे सोय असावी. कुटुंब कल्याणकेन्द्र ह्या केन्द्रातच अंतर्भूत असावे.

जास्त आजारी विद्यार्थ्यांच्या उपचारांसाठी तालुक्याच्या, जिल्ह्याच्या ठिकाणी आणि मोठ्या शहरातील वैद्यकीय महाविद्यालयांना संलग्न असलेल्या रुग्णालयांमधून, विद्यार्थ्यांसाठी राखीव खाटा उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक आहे.

## विद्यार्थ्यांची वार्षिक वैद्यकीय तपासणी

प्रत्येक विद्यार्थ्याची दरवर्षी संपूर्ण वैद्यकीय तपासणी करून त्याची नोंद एका मोठ्या परि-पत्रकावर करण्यात यावी. हेच परिपत्रक विद्यार्थी विद्यापीठामध्ये शिक्षण घेत असेपर्यंत वापरले जावे. महाविद्यालय बदलल्यास, परिपत्रकही दुसऱ्या महाविद्यालयाचे दप्तरामधे पाठवणे आवश्यक आहे. तपासणीद्वारा आढळलेले दोष विद्यार्थ्यांच्या नजरेला आणण्यात यावेत आणि पत्रद्वारे पालकांनाही कळवण्यात यावेत. दरवर्षी त्याच परिपत्रकावर नोंद ठेवणे सर्वोत्तम. त्यामुळे विद्या-र्थ्याचे आधिच्या वर्षी न आढळलेले अथवा दुसऱ्या वर्षी नव्याने निर्माण झालेले दोष ध्यानांत येतात. आधीच्या वर्षी आढळलेल्या दोषांविषयी विद्यार्थ्याने काय उपाय योजना केली अथवा केली नसल्यास का केली नाही हेही समजू शकते. विद्यार्थ्यांच्या प्राथमिक तपासणीच्या नोंदणी प्रमाणेच त्याच्या दोषांचे पृथक्करण, दोषांचा सातत्याने केलेला पाठपुरावा आणि त्याच्या नोंदी मळ परिपत्रकावरच वेळोवेळी करणे हे पाठपुरावा करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याचे महत्वाचे कर्तव्य ठरते. योजनेचे यश अथवा अपयश अशा पाठपुराव्यावरच अवलंबून असते. पाठपुराव्यामुळे विद्यार्थी आणि वैद्यकीय अधिकारी ह्यांच्यात निर्माण होणारा संवाद (Rapport) विद्यार्थ्यास योग्य ते उपचार करून घेण्यास उद्युक्त करणारा ठरलेला आहे.

विद्यार्थ्यांच्या शारीरिक तपासणीच्या वेळी ध्यानात न येणारे, अथवा वैद्यकीय तपासणी वर्षाच्या

सुरवातीस होत असल्यामुळे न जाणवणारे अनेक मानसिक आजार विद्यार्थ्यांमध्ये आढळतात. ग्रामीण भागातून शहरात आल्यामुळे होणारा राहणीमधील बदल, आर्थिक अडचणी, घरची ओढ (Home Sickness), वरच्या वर्गातील मुलाकडून होणारा शारीरिक आणि मानसिक छळ, (Ragging) अशा अनेक कारणांमुळे विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आजार आणि मानसिक तणाव आढळतात. ह्या उपाधींवरील योग्य मार्गदर्शन आणि मानसोपचार हा अशा वैद्यकीय योजनेचा अत्यावश्यक भाग आहे.

विद्यार्थ्यांच्या दोषांविषयीचा पाठपुरावा करत असताना जरूर त्या विद्यार्थ्यास वैद्यकीय महाविद्यालयातील विशेष उपचार सेवा उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांच्या आर्थिक अडचणींचा अभ्यास करून त्यास शक्य तेवढी आर्थिक मदत उपलब्ध करून देणे, इत्यादी अनेक गोष्टी योजनेचा अधिकारी करू शकतो. विद्यार्थ्याचे भले व्हावे आणि त्यासाठी आपण धडपडावे अशी अंतरीची तळमळ असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्याच्या आणि योजनेच्या सेवक वर्गाच्या सहकार्यावरच विद्यार्थी आरोग्य योजनेचे यश अवलंबून असते.

विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय तपासणीच्या वेळीच स्थानिक स्वराज्य संस्थांनी विद्यार्थ्यांना जरूर त्या साऱ्या रोगप्रतिबंधक लशी उपलब्ध करून द्याव्यात. त्या लशी देण्याची निशु:ल्क व्यवस्था करणे सहज शक्य आहे.

## आरोग्य प्रशिक्षण

आरोग्यविषयक प्रशिक्षण (Health Education) हा विद्यार्थी आरोग्ययोजनेचा सर्वात महत्त्वाचा पण अत्यंत उपेक्षित राहिलेला भाग आहे. विद्यापीठांची दुर्बल आर्थिक स्थिती आणि योग्य व्यक्तीची वाण, ह्या दोन गोष्टींमुळे ह्या क्षेत्रातली प्रगती खुंटलेली आहे. दृकश्रवण साधनांच्या साहाय्याने आणि उत्तम वक्तृत्व अंगी असलेल्या वैद्यकीय तज्ज्ञांच्या भाषणांद्वारे, आणि छोटया छोटया विद्यार्थी-गटांशी आयोजिलेल्या चर्चासत्रांतून विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक उत्तम शिक्षण देता येईल. आपण सारे जेवणानंतर हात धुतो पण जेवणाच्या आधी हात धुण्यास आपण केव्हां शिकणार ? आपल्या महाविद्यालयीन आरोग्य शिक्षणास इतक्या प्राथमिक अवस्थेपासून सुरवात करण्याची आवश्यकता आहे.

आज आपणाकडे कशाची कमतरता असेल तर ती आरोग्यविषयक जाणिवेची. नुसता आजार नसणे म्हणजे आरोग्य नव्हे. आजार नसणे ही आरोग्याची एक बाजू झाली. पण असलेल्या आजारावर वेळीच उपचार करणे, अनेक अजार आता टाळता येणे शक्य झाले आहे, ते कसे टाळावे, आपल्या स्वैराचारातून आणि स्वैरवर्तनातून समाजाच्या आरोग्यास बिघाड येऊ नये म्हणून कसे वागावे, अशा अनेक दृष्टींनी विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक शिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक प्रशिक्षण इतके उत्तम दिले गेले पाहिजे की जेव्हा विद्यार्थी स्वतःच्या खेडयात परत जातील तेव्हां आपल्या खेडयातील लोकांना हे ज्ञान त्यांना प्रदान करता आले पाहिजे. वैद्यकीय ज्ञानाच्या अशा प्रसारामुळेच खेडयांतील अज्ञानाचा अंधार मावळण्यास मदत होईल, आणि अंगारे, धुपारे, कोंबडी कापणे, बकरे बळी देणे अशा देवदेवस्कीवर आणि अंधश्रद्धेवर आधारलेल्या इलाजांपासून खेडयांतील माणूस बचावेल. तो वैद्यकीय उपचार करून घेण्यास उद्युक्त होईल.

## विद्यार्थी आरोग्य योजनेचे व्यवस्थापन आणि अर्थव्यवस्था

विद्यार्थी आरोग्य सेवा योजनेचे व्यवस्थापन केन्द्रीय पातळीवरून विद्यापीठाच्या ह्या योजनेच्या प्रमुख अधिकाऱ्याकडेच असावे. त्यामुळे सततच्या अभ्यासांतून आणि अनुभवांतून वापरली जाणारी

नोंदणीपत्रके आणि कार्यपद्धती ह्यामध्ये वेळोवेळी योग्य सुधारणा करणे शक्य होते. योजनेच्या मध्यवर्ती नियंत्रणामुळेच विद्यापीठाच्या कक्षेतील निरनिराळ्या गावांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये चालू असलेल्या योजनेच्या कार्यात 'सुसूत्रता' सांभाळणे शक्य होते. तपासणीची एकच पद्धती, एकाच प्रकारची पाठपुराव्याची पद्धती आणि एकाच प्रकारची नोंदणी पत्रके ह्यांमुळे जमा झालेली माहितीच पुढील संशोधनाचे दृष्टीने विश्वासार्ह आणि उपयुक्त ठरते.

विद्यार्थ्यांची प्राथमिक शारीरिक तपासणी वर्षाच्या पहिल्या सत्रात संपवणे योग्य ठरते. ह्या कार्यासाठी स्थानिक डॉक्टरांची मदत सहज उपलब्ध होऊ शकते. दुपारी २ ते ४ ह्यावेळांत ही डॉक्टर मंडळी निरनिराळ्या महाविद्यालयामध्ये येऊन तपासणीचे कामास उत्तम सहकार्य देतात. त्यांचा येण्याजाण्याचा इंधन खर्च निघेल एवढे मानधन तरी विद्यापिठाने त्यांना द्यावे.

निरनिराळे दोष आढळलेल्या विद्यार्थ्यांची पुढील तपासणी करण्यासाठी वैद्यकीय तज्ज्ञाची मदतही अल्पशा मानधनात उपलब्ध होऊ शकते. शक्यतो विद्यापिठाच्या केन्द्रात त्यांच्या भेटीच्या वेळा निश्चित करणे उत्तम. अन्यथा विद्यार्थ्यांना तज्ज्ञांच्या खाजगी व्यवसायाचे ठिकाणीही पूर्वनियोजित वेळी पाठवणे शक्य होते.

तज्ज्ञांचा सल्ला घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या दोषावरील आणि रोगांवरील पुढील उपचार होणेही महत्त्वाचे आहे. आर्थिक अडचणीमुळे पुढील उपाययोजना करूं न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य आर्थिक मदत उपलब्ध करून देणे आवश्यक ठरते. जरूर तेथे वैद्यकीय महाविद्यालयांत अथवा मुंबईसारख्या प्रगत शहरांतील विशेष केंद्रांमध्येही विद्यार्थ्यांना उपचारासाठी पाठवण्याची आवश्यकता निर्माण झाल्यास विद्यार्थ्यास तशी मदत योजनेमधून उपलब्ध करून देणेही आवश्यक ठरते.

योजनेच्या यशस्वी कार्यवाहीसाठी मुख्य अधिकाऱ्याशिवाय, लघुलेखक, लिपिक, दप्तर सांभाळणारा सेवकवर्ग (Record Keepers) अशा निरनिराळ्या साहाय्यकांची आवश्यकता असते. आरोग्य केन्द्रातील दैनंदिन कामासाठी ह्याशिवाय वेगळाच सेवकवर्ग आवश्यक ठरतो. आरोग्यकेंद्राच्या विस्ताराप्रमाणे तेथे प्रयोगशाळा साहाय्यक, क्ष किरण यंत्रणेचा साहाय्यक, औषधे देण्यासाठी मिश्रक (Compounder), परिचारिका, आया, शिपाई, इत्यादी सर्व साहाय्यकांची आवश्यकता असते. योग्य वेतन दिले जाणारा आणि योग्य ज्ञान आणि अनुभव असलेला सेवकवर्ग उपलब्ध असल्याशिवाय योजनेच्या कार्यात सुसूत्रता सांभाळणे अवघड ठरते.

विद्यार्थ्यांनाच काय पण कुणालाही कुठलीही गोष्ट संपूर्णपणे निःशुल्क मिळू नये. फुकट मिळणाऱ्या गोष्टीचे मूल्य कितीही मोठे असले तरी संबंधिताना ते जाणवत नाही. अशा योजनेसाठी विद्यार्थ्यांसाठी सध्या वार्षिक रु. ५ हे शुल्क आहे. ते काही जास्त नाही. सेवक वर्गाचे वेतन, योजनेतील डॉक्टर मंडळींचे मानधन, छपाई खर्च, आरोग्यविषयक शिक्षणाच्या सुविधा, इत्यादी गोष्टींच्या खर्चाची तरतूद अशा अनेक बाबींचा अंतर्भाव योजनेच्या अंदाजपत्रकांत असावा. ह्याशिवाय राज्य आणि केंद्र सरकारकडून सतत वाढत जाणारे अनुदान योजनेस उपलब्ध असणे आवश्यक आहे. ते असले तरच योजनेचा विस्तार होऊ शकेल.

### एक तपाचे अनुभव : सुरवातीचा असहकार आणि सहकार

पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी आरोग्य योजनेच्या सुरवातीच्या काळापासून योजनेची जडण घडण पाहण्याचा व १२ वर्षे तिची कार्यवाही करण्यापाहण्याचा योग लेखकाला आला होता. ही योजना राबवण्यासाठी काय अडचणी निर्माण झाल्या, त्यावर मात करुन पुढे कसे जावे लागले, ह्याचा इतिहास उद्बोधक आहे. योजनेच्या माझ्या बारा वर्षांच्या कार्यवाहीच्या काळात अनेक बरेवाईट, भले बुरे अनुभव माझ्यापाशी जमा झाले. योजनेविषयी अलिप्तता

दाखवणाऱ्या विद्यार्थ्यांपासून योजनेविषयी अत्यंत कृतज्ञता वाटणारेही विद्यार्थी भेटले. त्या संबंधीचे काही विचार ह्या लेखामध्ये ग्रथित केले आहेत.

वस्तुत: " विद्यार्थी आरोग्य सेवा योजना " ही विद्यार्थी कल्याण योजनेतील सर्वात महत्त्वाची बाब असली तरीही ही योजना सुरु करताना पुण्यातील निरनिराळ्या महाविद्यालयांचे प्राचार्य आणि वसतिगृहांचे अधिकारी ह्यांनी केलेला विरोध कधीही विसरता येणे शक्य नाही. महाविद्यालयांतील वसतिगृहातले विद्यार्थी सुदृढ असतात, ते सधन असतात. त्यामुळे गरज पडली तर ते खाजगी उपचार घेऊ शकतात. आमच्या महाविद्यालयाला नियमित भेट देणारे डॉक्टर आहेत. ते मुलांची काळजी घेतातच. अशा लंगड्या सबबी पुढे करण्यात आल्या. विशेष म्हणजे वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्राचार्यांनीही अशा योजनेस मदतीचा हात पुढे करण्याऐवजी योजनेवर घणाघाती हल्ला करुन ती आपल्या महाविद्यालयामध्ये सुरुच होऊ नये असा प्रयत्न करावा हे खरे दुर्दैव होते. त्यावेळच्या पुण्यांतील एका ज्येष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी असे प्रतिपादन केले की १९४० साली मुंबई विद्यापीठाच्या वैद्यकीय परिक्षेच्या वेळी कांही मुलांची उंची आधी जास्त आणि नंतर कमी भरली. अशी चूक होऊ शकणारी योजना काय कामाची ? वैद्यकीय परिक्षेच्या वेळी वापरले जाणारे कापडी टेप चुकीचे असतात, उंची मोजण्यासाठी चांगल्या दर्जाचे लोखंडी टेप वापरल्यास अशी चूक होणे शक्य नाही हे सदर प्राचार्यांना पटवून द्यावे लागले.

पहिल्या वर्षी सुमारे ३० टक्के विद्यार्थ्यांमधे काही दोष आढळले. सबंधित विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना हे कळवण्यात आले. दुसऱ्या एका महाविद्यालयाचे एक प्राचार्य म्हणाले " तुम्ही फक्त ३० टक्के मुलांमध्ये असलेले दोष दाखवता. त्यांच्याकडून तपासणी फी घेतली ते ठीक. पण बाकीच्याकडूनही फी का घेता ?"

उत्तर दिले, " आपण म्हणता त्याप्रमाणे ७० टक्के मुलामध्ये काही दोष नाहीत हे वैद्यकीय तपासणी करुन आम्ही सांगितले ह्याला काहीच खर्च आला नाही कां ? आणि ह्याची काहीच किंमत नाही काय ? " असा हा विरोध व विपर्यास ! पण जसजसा काळ जाऊ लागला तसतशी ह्या योजनेची उपयुक्तता महाविद्यालयीन यंत्रणेला आणि विद्यार्थ्यांना पटू लागली. असहकाराचे वारे हळूहळू लोप पावले. पुण्यातील महाविद्यालयांना मिळणारा योजनेचा फायदा इतर शहरांतील आणि ग्रामिण भागांतील विद्यार्थ्यांनाही मिळावा ह्या हेतुने ह्या योजनेच्या विस्ताराची मागणी बाहेरील महाविद्यालयांच्या प्राध्यापकांकडूनच येऊ लागली. त्यामुळेच योजनेचे पुढील टप्पे वेगाने गाठणे शक्य झाले. वैद्यकीय महाविद्यालयांचाही विरोध मावळला. त्यांनीही आपल्या सुविधांच्या आणि डॉक्टरांच्या साहाय्याने वैद्यकीय तपासणी करुन विद्यापीठाकडे अहवाल पाठवण्यास दरवर्षी सुरवात केली. फक्त वसतीगृहातीलच नव्हे तर महाविद्यालयाच्या सर्वच विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी बी. जे. मेडिकल कॉलेजच्या प्रिव्हेंटिव्ह व सोशल मेडिसिन विभागातर्फे सुरू करण्यात आली.

## तपासणी-पद्धतीमधील बदल आणि सुधारणा

पहिली सात वर्षे विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी प्रथम एका मोठ्या हॉलमध्ये होत असे. प्रथम विद्यार्थी आपले नोंदणी पत्रक घेऊन त्यातील स्वत: करायच्या नोंदी पूर्ण करीत. नंतर त्यांची वजने, मापे, उंची, इत्यादी डॉक्टरच घेत. तीन ते चार डॉक्टर छाती आणि पोटाची तपासणी करीत. दोघेजण रक्त दाब तपासीत. दोघे जण नाक, कान, घसा, आणि दात तपासीत. दोघे जण डोळे तपासीत तर दोघे जण बंद खोलीमध्ये विद्यार्थ्यांच्या गुप्तेंद्रियांची तपासणी करीत. शेवटी लघवीची तपासणी होई. सर्व तपासणी झाल्यावर, सर्व नोंदी पाहून विद्यार्थ्यांचे नोंदणीपत्र पुढील कारवाईसाठी परत घेण्यांत येई.

विद्यार्थ्यास निरनिराळ्या शरीर संस्थांची तपासणी करुन घेण्यासाठी प्रत्येक केंद्राजवळ अकारण थांबावे लागे. त्यामुळे पुढे डोळ्यांची आणि दातांची तपासणी सोडून बाकी सर्व तपासणी एकाच डॉक्टरांकडून बंद खोलीत करण्याची पद्धत सुरू केली. एका डॉक्टरांनी सुमारे १२ ते १५ मिनिटे बंद खोलीत तपासणी केल्यामुळे विद्यार्थ्यांना डॉक्टरांशी मोकळेपणाने बोलतां येऊ लागले. त्यांच्यामध्ये थोडा कांही संवाद (Rapport) निर्माण होऊ लागला. डॉक्टरांनाही विद्यार्थ्यास त्याचे तब्येतीबद्दलच्या महत्वाच्या सूचना देण्यास वेळ मिळू लागला.

वैद्यकीय तपासणीचे वेळीच दाताचे डॉक्टरांना बोलावून त्यांच्याकडूनच दातांची तपासणी करणेही विद्यार्थ्यांच्या फायद्याचे ठरले आहे. दातांचे दोष त्यामुळे जास्त प्रमाणात उघडकीस येतात, आणि विद्यार्थ्यांना दातांच्या डॉक्टरांचा सल्ला जागेवरच मिळाल्यामुळे पुढील उपाय योजनेवरही त्याचा अनुकूल परिणाम होतो.

कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी महाविद्यालयात करण्याचे टाळून त्यांना नोंदणी पत्रके देऊन खाजगी डॉक्टरांचे दवाखान्यात तपासणीसाठी पाठवणे ही कारवाई योजनेच्या मुळावर घाव घालणारी ठरेल. असा प्रयोग पुणे विद्यापीठाने केला. या योजनेची आजची अवस्था सुस्पष्ट नाही.

सात वर्षे सर्व विद्यार्थ्यांची लघवीची तपासणी करुन ह्या योजनेद्वारा फक्त दोन मधुमेहाचे रुग्ण सापडले. लघवीच्या तपासणीवर होणारा पैसा आणि वेळ ह्यांचा अपव्यय लघवीची तपासणी बंद करुन वाचवण्यात आला. ही रक्कम जरुर त्या विद्यार्थ्यांच्या रक्त, लघवी, शौच, थुंकी अशा जरुर त्या साऱ्या तपासण्या करुन घेण्यासाठी अंदाज पत्रकात राखून ठेवण्यांत आली. आणि अशा तपासण्यांचा पुढे अनेक विद्यार्थ्यांना फारच फायदाही झाला.

### वैद्यकीय तपासणीचे फायदे

विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी अत्यंत आवश्यक आहे. हे सापडणाऱ्या दोषांच्या आणि रोगांचे प्रकारांवरून आणि प्रमाणांवरून कोणालाही सहज पटेल. पुणे विद्यापीठाप्रमाणेच भारतातील इतर विद्यापिठांमध्ये आणि ब्रिटन सारख्या प्रगत देशामध्येही ३० टक्के विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक दोष आढळतात. आपल्याकडे निकस आणि निकृष्ट आहारामुळे दाताचे रोग आढळतात. तर ब्रिटनसारख्या थंड हवेच्या देशात खाल्यानंतर दांत स्वच्छ न धुतल्यामुळे आणि चॉकोलेट खाल्यामुळे दांताचे विकार मोठ्या प्रमाणावर आढळतात. किडलेला दात वेळीच चांदीने भरून घेतल्यास तो वाचतो, अन्यथा त्याच्या मुळाशी गळू होऊ शकते. विद्यापिठाच्या परिक्षेच्या वेळी नेमके असे गळू उद्‌भवल्यास परिक्षा जाते आणि एक वर्षही बुडते. विद्यार्थ्यांनी उपलब्ध सेवांचा आणि सुविधांचा उपयोग करून घेतल्यास असे प्रकार टाळणे सहज शक्य आहे.

वैद्यकीय तपासणीमुळे अनेक मुलामुलीमधील हृदयाचे जन्मापासूनचे विकारही पहिल्या टप्प्यात नजरेस आले होते. वस्तुतः प्राथमिक शाळा, दुय्यम शाळा आणि महाविद्यालये ह्या तीनही स्तरांवर विद्यार्थ्यांची व्यवस्थित वैद्यकीय तपासणी होणे आवश्यक आहे. तसे झाल्यास जन्मापासूनचा हृदयविकार, पोटाचे आतच जन्मानंतरही राहिलेले वृषण, इत्यादी रोगांवर वेळेवर इलाज होणे शक्य होईल. विद्यापीठाचे पातळीवरील योजनेवरील कामाचा ताण काही प्रमाणांत कमी होईल. वस्तुतः प्राथमिक शाळेतील विद्यार्थी दुय्यम शाळेत आणि नंतर महाविद्यालयात प्रवेश करताना त्याच्या शाळा सोडल्याच्या दाखल्याबरोबरच त्याचा वैद्यकीय तपासणीचा दाखलाही दिला गेला पाहिजे. महाविद्यालय बदलल्यावरही त्याचे तेच नोंदणीपत्र सतत वापरले गेले पाहिजे. त्यासाठी ते जुन्या महाविद्यालयाकडून नव्या महाविद्यालयाकडे त्वरित पाठवण्याची यंत्रणा हवी.

एकाच नोंदणीपत्रकावर विद्यार्थ्याची नोंदणी सात वर्षे ठेवण्याचा फायदा एका हृदयविकाराच्या विद्यार्थ्याला मिळवून देता आला. त्याच्या नोंदणी पत्रकामुळे व महाविद्यालयीन हजेरीवरून संबंधिक सरकारी यंत्रणेला त्याच्या विकाराची तीव्रता त्याला नोकरीवर न घेण्याएवढी नाही, हे पटवून देता आले. दुसऱ्या एका विद्यार्थ्यास शस्त्रक्रियेची आवश्यकता होती. जागतिक किर्तीच्या हृदयशल्यविशारदाकडून पुण्यामध्येच त्याची हृदयावरील शस्त्रक्रिया पार पाडणे योजनेने पुण्यातील वैद्यकीय संस्थाशी संस्थापिलेल्या मैत्रीच्या संबंधामुळेच शक्य झाले.

योजनेच्या बारा वर्षांचे काळात २७ विद्यार्थ्यांमध्ये प्राथमिक अवस्थेतील कुष्टरोग आढळला. त्यांची त्वचातज्ज्ञाकडून खास तपासणी करून उपाययोजना केली गेली. त्याबाबतची सर्व माहिती गुप्त ठेवण्यात आली. रोगापासून संपूर्ण बरे झाल्याचा दाखलाही त्यातील अनेकांची शिक्षण संपण्यापूर्वीच मिळवला. वेळीच मिळालेले मार्गदर्शन आणि योग्य उपाययोजना ह्यामुळे ह्या विद्यार्थ्यांचे भविष्यात उध्वस्त होऊ पाहणारे जीवन वेळीच सावरले गेले. शब्दांनी व्यक्त न करता येणारी अशा विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील कृतज्ञता ही अशा कामाची बोलकी पावती ठरते.

ह्या जरी अशा योजनेच्या जमेच्या बाजू असल्या तरीही योजनेच्या कार्याला निरूत्साही करणारी दुसरीही बाजू आहे हे विसरून चालणार नाही. ह्यामुळेच विद्यार्थ्यांच्या निरनिराळ्या दोषांचा पाठपुरावा हाही अभ्यासाचा एक मोठा विषय ठरतो. अनेक वेळा डोळ्यांनी लांबचे नीट दिसत असूनही डोळे दुखणे, डोळ्यातून पाणी येणे, असे विकार विद्यार्थ्यांत आढळतात. असे विकार डोळ्यातील Astigmatism ह्या दृष्टिदोषामुळे होतात. योग्य चष्म्याने ही तक्रार दूर होते. ग्रहणाच्या वेळी ग्रहण पाहण्यासाठी काळ्या काचेचा वापर न केल्यामुळे डोळ्यातील दृष्टिपटल जळून त्यास कायमची इजा पोहोचते. त्याची काळजी शिक्षणाने घ्यायला हवी. दरवर्षी अशा अवस्थेत ७–८ विद्यार्थी येतात. विद्यार्थिनींना चष्मा हे संकट वाटते. त्या चष्मा वापरण्याचे टाळतात आणि डोळे जास्त बिघडवून घेतात. 'कॉन्टॅक्ट' लेन्सेस ही आता त्यांना नवी पण खर्चाची सोय उपलब्ध झाली आहे.

नायट्यासारखा साधा त्वचारोग केवळ जांघेत आहे म्हणून तो डॉक्टरांना दाखवून योग्य इलाज करून घेण्याचे अनेक विद्यार्थी टाळतात. आपला आजार हा एखादा गुप्तरोग तर नसेल ना ? अशा गैरसमजुतीतून त्यांच्या मनात भीति निर्माण होते. त्या भीतीचा अभ्यासावरही दुष्परिणाम होतो. अशा विद्यार्थ्यांना वैद्यकीय तपासणीमुळे योग्य मार्गदर्शन मिळू शकते.

वैद्यकीय तपासणी वर्षाच्या सुरवातीला होते आणि तीही चुकवण्याचा कांही विद्यार्थी सतत प्रयत्न करीत असतात. शहरात काही काळ राहिल्यानंतर वसतीगृहातील काही विद्यार्थी निश्चितच प्रलोभनांना बळी पडतात आणि विवाहपूर्व आणि विवाहबाह्य लैंगिक संबंधांमधून गुप्तरोगाला बळी पडतात. विद्यार्थ्यांमधील गुप्तरोगांचे प्रमाणही ह्यामुळे वाढत असले पाहिजे. सर्व विद्यार्थ्यांच्या रक्ताची गुप्तरोगासाठी तपासणी केली तरच गुप्तरोगाचे निश्चित प्रमाण शोधून काढणे शक्य होईल. प्रौढ वयाचे आणि विवाहित विद्यार्थी अनेक वेळा खेड्यातील शेतकऱ्यांच्या सधन कुटुंबातून शहरात आलेले असतात. महाविद्यालयाच्या वसतिगृहांत कमित कमी शुल्क भरून मिळणारी जागा ते शहरातील सुख सोयीसाठीच घेऊन ठेवतात. अशा वसतीगृहामध्ये आणि वसतिगृहांच्या भोवताली वेश्या व्यवसायाचे प्रमाण सतत वाढत चाललेले आहे. वेश्यागमनाबरोबरच दारूचे व्यसनही विद्यार्थ्यांमध्ये सतत वाढते आहे. LSD सारखी गुंगी आणि मदहोश आणणारी औषधे अनेक विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे आयुष्य बरबाद करीत आहेत. सधन कुटुंबातील विद्यार्थी ह्या व्यसनांना लौकर बळी जातात अथवा त्यांच्याकडील संपत्तीमुळे स्वार्थी मंडळी त्यांची शिकार करतात. अर्थातच व्यसनग्रस्त विद्यार्थ्यांमध्ये व्यसन भागवण्यासाठी अवैध मार्गांनी पैसा उभा करण्यासाठी गुन्हेगारीही वाढते. चोर पावलांनी विद्यार्थीजगांत आणि तरुणामध्ये शिरलेल्या पण

झपाटयाने वाढत जाणाऱ्या ह्या विषवल्लीची जाणीव समाजास अद्याप होत नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

विद्यार्थ्यांची साधी वैद्यकीय तपासणी काही रोगांचे निदान करण्यास अपुरी ठरते. सामान्यतः शहरामध्ये रोगांचे प्रमाण वाढत्या लोकसंख्येबरोबर आणि सतत खालावत चाललेल्या सार्वजनिक आरोग्याच्या सुविधांबरोबर वाढत आहे. ते १ टक्क्याहून जास्त आहे. निरनिराळया संशोधकांच्या मते विद्यापीठातील विद्यार्थ्यांमध्ये १ ते ३ टक्के विद्यार्थ्यांमध्ये क्षयरोग आढळतो. Mass Miniature Radiography ( MMR ) म्हणजे मोठया प्रमाणावर सर्व विद्यार्थ्यांचे एका खास क्ष किरण यंत्राने छोटे फोटो काढण्याच्या सुविधेमुळे प्राथमिक अवस्थेतीलही क्षयरोगाचे रोगी शोधून काढणे शक्य होते आणि विद्यार्थ्यांवर वेळीच उपचार केले जातात. आपल्या आर्थिक अडचणीमुळे आपण अशा सुविधांपासून फार दूर आहोत.

## विद्यार्थ्यांची उदासीनता

विद्यार्थ्यांमध्ये स्थूल मानाने आरोग्याविषयी आणि विशेषतः त्यांच्यात आढळणाऱ्या शारीरिक दोषांविषयी अनेक वेळा उदासीन वृत्ती दिसून येते. विद्यार्थ्यांशी चर्चा करताना ते कोणताही आडपडदा न ठेवता खुल्या दिलाने ह्या प्रश्नाची चर्चा करीत. ह्या उदासिनतेला अनेक बाजू आहेत. विद्यार्थ्यांचा आळशीपणा आणि बेपर्वाई, आपल्या दोषाची इतरांकडून टवाळी होईल ही भीती, दैनंदिन जिवनामध्ये अशा दोषांनी काहीही त्रास होत नाही ही भूमिका, अभ्यासाच्या नावाखाली अळंटळम्, अशी अनेक कारणे आहेत. पालकांची वृत्तीही निष्काळजीपणाची आहे. दरवर्षी सुमारे चार ते पांच हजार पालकांना त्यांच्या पाल्यांच्या तब्येतीविषयी पत्रे योजनेमार्फत पाठविली जात. त्यातील वीस ते पंचविस जणाच्या ठायी फक्त पत्राची पोच देण्याचे किंवा योजनेचे आभार मानण्याचे सौजन्य आढळले.

महाविद्यालये साऱ्या विद्यार्थ्यांकडून क्रिडांगणासाठी शुल्क घेतात पण महाविद्यालयाच्या संघामध्ये खेळणाऱ्या खेळाडूंशिवाय इतरांना खेळांच्या कुठल्याही सुविधा उपलब्ध होत नाहीत. नवीन शिकावू विद्यार्थ्यांना उत्तेजन मिळण्याऐवजी चांगल्या खेळाडूंकडून त्यांची उपेक्षा आणि टिंगल होते. विद्यार्थ्यांना खेळाची आणि व्यायामाची भरपूर सोय ही त्यांची शरीरसाधनांची प्राथमिक गरज आहे हे संबंधितांनी ध्यानी घ्यायला पाहिजे.

विद्यार्थ्यांना उपचार करून घ्यायचे म्हटल्यास सार्वजनिक रुग्णालयातील उपाययोजना समाधानकारक नसतात आणि खाजगी रुग्णालयातील उपचार अनेकांच्या आर्थिक कुवती पलिकडचे असतात, हेही मान्य करावेच लागेल.

सर्व प्रश्नांचे मूळ देशाची आर्थिक दुर्बलता आणि लोकसंख्येची उदंड वाढ ह्यातच साठवलेले आहे. तारुण्याच्या उंबरठयावर असलेल्या आपल्या विद्यार्थ्यांच्या पुढील जीवनाचा काळ बेकारीच्या भस्मासुराने ग्रासलेला दिसतो आहे. उद्याची अनिश्चितता त्यांच्यात जीवनाच्या साऱ्याच मूल्यांविषयी बेपर्वाई निर्माण करीत आहे, मग आरोग्यच त्याला एकमेव अपवाद कसे ठरावे ?

अनेक विद्यार्थ्यांना व्यायामासाठी आणि खेळासाठी अर्धा तासही काढता येत नाही. खोटया वैद्यकीय प्रमाणपत्रांच्या साहाय्याने अनेक विद्यार्थी शारीरिक शिक्षण आणि छात्रसेना-प्रशिक्षण चुकवतात. त्यांच्या ह्या वागण्याला पुष्कळदा पालकांचे आणि पैशाचे लोभी बनलेल्या वैद्यकीय व्यावसायिकांचेही पाठबळ लाभते.

## वसतिगृहे : भोजनालये : स्वयंपाकघरे

आपल्याकडे साधारणतः १८ ते २० टक्के विद्यार्थी वसतिगृहात राहतात. सुमारे १० ते १२

टक्के विद्यार्थ्यांना वसतिगृहांबाहेर खाजगी घरांमध्ये जागा शोधून राहावे लागते. ह्या खाजगी जागांमध्ये राहण्यासाठी जब्बर भाडे भरावे लागतेच पण तेथील सुविधांमध्येही अनेक त्रुटि असतात. वाढत्या शिक्षणाबरोबर महाविद्यालयांतील वसतिगृहांची संख्या तेवढीच राहिल्यास, अशा विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढत राहील. ह्या विद्यार्थ्यांवर वसतिगृहांतील अधिकाऱ्यांप्रमाणे कोणाचीही देखरेख नसते. त्यामुळे त्यांचे जीवन जास्तच मुक्त आणि स्वच्छंदी बनण्याची शक्यता असते. वसतिगृहातीलही एकूण परिस्थिती विद्यार्थ्यांच्या आरोग्याला उपकारक अशी नाही.

काही वेळा वसतिगृहे फार मोठी असतात. १०० पेक्षा जास्त विद्यार्थी सामान्यतः तिथे असणे अनिष्टच. वसतिगृहांच्या इमारती आरोग्याला उपकारक पद्धतीने बांधलेल्या नसतात. वसतिगृहे बांधताना बहुतेक ठिकाणी स्वयंपाकघरे व भोजनघरे यांच्याबाबत फार हेळसांड होते. अस्वच्छता निर्माण करणारे जळण वापरतात. मातीच्या जमीनी असतात. त्यावर निवडलेल्या भाज्या पड-लेल्या असतात. माश्या घोंघावत असतात. भोजन पदर्थांवर बसतात. स्वयंपाक घरातील कचरा बाहेर टाकला जातो. तो आठवडेनआठवडे तिथे सडत असतो. महाविद्यालयाच्या वसतिगृहाचे स्वयंपाकघर व जेवणघर कसे नसावे याचा नमूना पुण्याच्या एका अभियांत्रिकी महाविद्यालयात लेखकाने पाहिला आहे. या ठिकाणी सेवकांचे कपडे वाळत असतात. धूम्रपान चालू असते. अन्न शिजविण्याची-वाढण्याची भांडी स्वच्छ घासण्याची व्यवस्था आवश्यक आहे. पिण्याच्या पाण्या-चीही आजच्यापेक्षा अधिक चांगली काळजी घ्यायला हवी आहे. सेवकांना आपल्या कामाचे प्रशिक्षण द्यायला हवे; त्यांची वेळोवेळी वैद्यकीय तपासणीही व्यवस्थितपणे व्हायला हवी. कंत्राटी पद्धतीने दिले जाणारे जेवण विद्यार्थ्यांच्या आहारविषयक गरजा पुऱ्या करते की नाही हे पाहिले पाहिजे.

सर्वच सेवकांना, विशेषतः वाढप्यांना, पांढरा बुशशर्ट, पांढरी पॅन्ट, डोक्याला टोपी असा स्वच्छ पोषाख दिला जावा. केस व नखे वेळेवर कापणे, अन्न वाढण्यापूर्वी हात स्वच्छ धुणे अशा वैयक्तिक स्वच्छतेच्या साध्या गोष्टींचे महत्त्व त्यांना शिकवले गेले पाहिजे. वस्तुतः स्वयंपाकघरांतील आणि भोजनगृहातील सर्व सेवकांना कामाचे आणि कामांतील स्वच्छतेचे प्रशिक्षणच योजनेतून देणे आदर्श ठरेल. त्यांची वैद्यकीय तपासणीही वारंवार व्हावी.

बहुतेक महाविद्यालयीन उपहार गृहे आणि वसतिगृहांची भोजनगृहे कंत्राट पद्धतीने खाजगी व्यावसायिकांकडून चालवली जातात. जास्तीत जास्त नफा मिळवण्यासाठी ते ज्या क्लुप्त्या वापरतात त्यामुळे विद्यार्थ्यांना आणखीनच कमी प्रतीचे आणि बेचव अन्न खावे लागते.

पुण्याच्या वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालयांतील भोजनगृहे विद्यार्थ्यांकडूनच चालवली जातात. त्यामुळे तेथील अन्नाचा दर्जा अद्यापही इतरांपेक्षां खूपच चांगला राहिलेला आहे. ह्या पासून साऱ्याच संबंधितानी बोध घेण्यासारखा आहे.

### वसतिगृहांचा अधिकारी वर्ग

वसतिगृहांचे अधिकारी हे विद्यार्थ्यांचे स्थानिक पालक असतात. ज्या अधिकाऱ्याविषयी विद्यार्थ्यांना आदर वाटतो पण भीति वाटत नाही, असा, आपल्या घरच्या ज्येष्ठ मंडळीप्रमाणेच एक आधार वाटणारा, अधिकारीच वसतिगृहाचा उत्तम अधिकारी ठरतो. पोलिओसारख्या आजारामुळे अपंगत्व आलेल्या विद्यार्थ्यास "तिसऱ्या मजल्यावरची नव्हे तर तळ मजल्याची खोली द्या 'अशी विनंती वसतिगृहाच्या अधिकाऱ्यास करण्याची वेळ वैद्यकीय अधिकाऱ्यावर येऊ नये. आपल्या वसतिगृहीत ' रॅगिंग ' होऊ नये ह्याची आणि ' रॅगिंग ' झाल्यास त्याविषयी अतिशय कठोर भूमिका वसतिगृहाच्या अधिकाऱ्याने घेतली पाहिजे.

## विद्यार्थी आरोग्य योजना आणि शासन

पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी आरोग्य योजनेसंबंधीचा शासनाशी वेळोवेळी केलेला पत्रव्यवहार हा एक निराशाजनक अनुभव ठरलेला आहे. आरोग्य मंत्रालयाने विद्यार्थी आरोग्य हा शिक्षण क्षेत्रातला प्रश्न म्हणून शिक्षण मंत्रालयाकडे बोट दाखवणे आणि आरोग्याचा प्रश्न आरोग्य-मंत्रालयाचे अखत्यारीतलाच आहे असे शिक्षण मंत्रालयाने म्हणणे, पत्रामध्ये चर्चिलेल्या विषयांची आर्थिक जबाबदारी केन्द्रसरकारने राज्यसरकारवर आणि राज्यसरकारने केन्द्रावर टाकणे, ह्यातून टोलवा टोलवी आणि कालाचा अपव्यय ह्याशिवाय काहीही घडत नाही. विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि आरोग्य ह्या दोन गोष्टी परस्परावलंबी आहेत. त्यामध्ये राष्टाचा फार मोठा भांडवली खर्च अडकून पडलेला आहे, ह्याची जाणीव ठेऊन त्यातील कोणती आर्थिक जबाबदारी कोणी पेलायची ह्याचा एक निश्चित कार्यक्रम विद्यापीठे, राज्यशासने, केंद्रशासन आणि विद्यापीठ अनुदान मंडळ ह्या सर्व स्तरावर तयार झाला पाहिजे; आणि त्याची कार्यवाहीही काटेकोरपणाने झाली पाहिजे.

## आपले स्वप्न

विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक रोगांचे निदान करून उपचार करणे हा आरोग्य योजनेचा एक भाग झाला. खरे पाहतां विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे आणि प्रकृतीचे निरनिराळ्या परिक्षांच्या सहाय्याने मूल्यांकन करणे (Evaluation of Health by Physical efficiency tests) आवश्यक आहे. अशा परिपूर्णतेला गेलेल्या 'विद्यार्थी आरोग्य सेवा' योजनेतूनच आजची विद्यार्थ्यांची उत्कृष्ठ पिढी आपण तयार करूं शकलो, तरच त्यातून उद्याचे आरोग्याविषयीचे उदासीनता झटकून टाकलेले, आपल्या पाल्यांची योग्य काळजी घेणारे, पालक निर्माण होतील.

■ ■

# २७ महाविद्यालयीन तरुण-तरुणींच्या लैंगिक व भावनिक समस्या

उल्हास लुकतुके

महाविद्यालयात प्रवेश हीं तरुण-तरुणींच्या जीवनातील महत्त्वाची पायरी आहे. तारुण्यात प्रवेश करण्याची ती नांदी आहे, व या सुमारे पाच वर्षांच्या काळात तारुण्यपूर्व अवस्थेपासून प्रौढत्वाच्या पहिल्या पायरीपर्यन्त प्रवास होतो. आई-वडलांच्या छायेत असलेल्या किशोरावस्थेतून जबाबदार तारुण्यावस्थेत प्रवेश होतो. या काळात जबाबदाऱ्या बदलतात. भूमिका बदलतात. तरुणांची स्वतःकडे व समाजाची त्यांच्याकडे पहाण्याची वृत्ती बदलते. शाळेच्या व महाविद्यालयाच्या वातावरणात खूप फरक असतो. मोकळेपणा जास्त व देखरेख कमी असते. भिन्नलिंगीय व्यक्तींची जवळीक साधण्याची शक्यता वाढते. तारुण्य सुलभ प्रवृत्तीतून याबाबत प्रयोग करण्याकडे विद्यार्थ्यांचा कल असतो. समाज एका बाजूने अशा वागणुकीची नुसती अपेक्षा करत असतो असे नाही तर काही अंशी प्रोत्साहनही देत असतो. पण प्रत्यक्ष लैंगिक वर्तन घडून येत असताना ठराविक चौकटीला थोडाही धक्का लागला तर त्याबद्दल तीव्र नापसंतीही व्यक्त करत असतो. अशी निरनिराळी संक्रमणे घडून येत असताना तरुण-तरुणींपुढे लैंगिक समस्या निर्माण न होतील तरच नवल.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपुढील लैंगिक समस्यांचे स्वरूप जाणून घ्यावे व शक्यतो त्या सोडवण्याचा प्रयत्न करावा म्हणून गेली पाच-सहा वर्षे निरनिराळ्या सामाजिक संस्थांतर्फे लैंगिक शिक्षण शिबिरे भरवली किंवा इतरांनी भरवली तर त्यात भाग घेतला. ही शिबिरे पुण्यासारख्या मोठ्या शहरात, नगर–जळगावसारख्या जिल्ह्यांच्या गावात, तसेच तालुक्यांच्या गावीही झाली. इंग्रजी माध्यमाची, मराठी माध्यमाची, फॅशनेबल व साधी, अशी सगळी महाविद्यालये यांत आली. फक्त तरुणांची, फक्त तरुणींची, व मिश्र श्रोत्यांची अशी ही शिबिरे निरनिराळ्या धाटणीची होती. यातून सुमारे सहा ते आठ हजार विद्यार्थी–विद्यार्थिनींशी संपर्क साधला.

शिबिराची पूर्व तयारी करताना प्रथम हे शिबिर कुठल्या महाविद्यालयात होणार आहे याचा विचार केला. प्राचार्यांशी, विद्यार्थ्यांशी व संबंधित प्राध्यापकांशी बोलून काही प्राथमिक माहिती गोळा केली. नंतर ज्या तरुणतरुणी भाग घेणार आहेत त्यांच्याबाबतची स्थूल माहिती एका पत्रकामध्ये भरून घेतली. विद्यार्थी-विद्यार्थिनींना जे काही प्रश्न लैंगिक जीवनाबद्दल विचारायचे असतात ते वेगळ्या कागदावर गोळा केले. प्रत्यक्ष शिबिरात मनोविकार तज्ज्ञ, मानसशास्त्रज्ज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ, शस्त्रक्रियातज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, समाजशास्त्रज्ञ अशा निरनिराळ्या शाखांच्या अधिकारी तज्ज्ञगटात (पॅनल) मंडळींचा समावेश केला.

या तज्ज्ञांकरवी स्त्री-पुरुष शरीररचना, शरीरक्रिया, स्त्री-पुरुष लैंगिक वर्तन, आरोग्यकारक लैंगिकता, इत्यादींवर छोटी-छोटी भाषणे घडवली. खडू-फळा, चित्राचे तक्ते, पारदर्शिका (स्लाईड्स्), इत्यादींचा वापर केला. मानवी पुनरुत्पादन यावरची अमेरिकन असोसिएशन ऑफ सर्जन्सने बनवलेली फिल्म मराठीत भाषांतर (डबिंग) करून वापरली. श्रोत्यांकडून आधी गोळा केलेल्या प्रश्नांची उत्तरे तज्ज्ञांकडून देवविली. अनेक वेळा छोटचा गट चर्चा घडवून आणल्या. त्यामध्ये चर्चेसाठी सामान्यपणे महाविद्यालयीन जीवनात, अथवा कुटुंबात घडणाऱ्या लैंगिक प्रश्नांवर आधारित असे काही प्रसंग वापरले. त्यातून विद्यार्थी–विद्यार्थिनींच्या लैंगिक अभिवृत्ती समजून आल्या. शिबिराचा अभ्यासक्रम ठरवण्यापूर्वी तज्ज्ञांमध्ये खुलासेवार चर्चा झाल्याशिवाय एकही विषय श्रोत्यांपुढे जाऊ दिला नाही. एवढेच नव्हे तर खुद्द शिबिरात काही सुजाण प्रौढ व काही विद्यार्थी-विद्यार्थिनी निरीक्षक म्हणून नेमले. त्यांची मते शिबिराच्या शेवटी अजमावली. सहभागी तरुण-तरुणींकडूनही शिबिराचे मूल्यमापन करवले व या सर्वांचा उपयोग करून पुढील शिबिराचा अभ्यासक्रम व कार्यपद्धती ठरवली. मुलामुलींनी विचारलेल्या प्रश्नांचे नंतर विश्लेषण केले. त्यांनी व्यक्त केलेल्या मतांचे व विधानांचे सतत परिशीलन केले. यामुळे शिबिराचा अभ्यासक्रम व कार्यपद्धती सतत प्रगतीच्या दिशेने परिवर्तनशील राहिली. सध्या भाषणे, दृक्-श्राव्य उपकरणे, प्रश्नोत्तरे, गटचर्चा, चित्रपट, असा साधारण शिबिराचा साचा असतो. तरुण-तरुणींमधील वर्तणूक सहज व्हावी, सुसंवाद वाढावा, मनोगत व्यक्त करण्याचे कौशल्य वाढावे याबाबत काय करता येईल याचा प्रयत्न सध्या चालू आहे. भूमिका-अभिनय (रोल- प्ले) सुरू करण्याचा प्रयोग चालू आहे.

या सर्वातून कॉलेजमधील तरुण–तरुणींपुढे कोणते लैंगिक प्रश्न उभे आहेत याचे चित्र दोन बाजूने उभे राहिले. पहिल्या भागात खुद्द श्रोत्यांनी विचारलेल्या प्रश्नांवरून जें चित्र उभे राहते ते. हे सामान्यतः त्यांना व्यक्तिगतरीत्या जे प्रश्न सतावतात त्याचे प्रतिबिंब आहे. दुसरे, इतक्या अनुभवानंतर शिबिरांच्या आयोजकांना कॉलेजमधील लैंगिक वातावरण कसे वाटले ते. हे प्रतिबिंब बहुशः काही नमुन्यांचे (प्रोटो टाईप्स) व काही अंशी सामाजिक असे आहे.

## सांख्यिक विश्लेषण

जमा केलेल्या सुमारे सहा हजार पत्रकांचे (फॉर्म्सचे) स्थूल सांख्यिक विश्लेषण पुढीलप्रमाणे आहे :

१) **वयाप्रमाणे विश्लेषण :**

| | |
|---|---|
| १२ वी इयत्ता | १२ % |
| वरिष्ठ महाविद्यालयाचे १ ले वर्ष | ३५ % |
| ,, ,, २ रे ,, | २४ % |
| ,, ,, ३ रे ,, | २४ % |
| पदव्युत्तर वर्ग | ५ % |

२) **लिंगानुसार विश्लेषण**

| | पुरुष | स्त्री |
|---|---|---|
| १२ वी इयत्ता | ५ % | ७ % |
| वरिष्ठ महाविद्यालयाचे १ ले वर्ष | १५ % | २० % |
| ,, ,, २ रे ,, | ११ % | १३ % |
| ,, ,, ३ रे ,, | १० % | १४ % |
| पदव्युत्तर वर्ग | २ % | ३ % |

३) **विचारलेल्या प्रश्नांचे स्थूल वर्गीकरण**

| | |
|---|---|
| १) शरीर रचनेसंबंधी | १७ % |
| २) शरीर क्रियेसंबंधी | १८ % |
| ३) वैद्यकीय | ७ % |
| ४) मानसशास्त्रीय | १५ % |
| ५) मनोविकार शास्त्रीय | ११ % |
| ६) अनुवंश शास्त्रीय | २ % |
| ७) स्त्री रोगांशी संबंधित | १५ % |
| ८) गुप्तरोगांशी संबंधित | ७ % |
| ९) सामाजिक | ३ % |
| १०) शैक्षणिक. | ५ % |

४) **प्रश्नांची विषयवारी साधारणपणे खाली दिल्या प्रमाणे होती :**

| | |
|---|---|
| १) हस्तमैथुन | : त्याबद्दल अज्ञान |
| | : ,, चिंता |
| | : ,, अपराधी भावना |
| | : ,, कुतुहल. |
| २) मासिक पाळी | : त्याबद्दलचे शरीर क्रियाशास्त्र |
| | : पहिली पाळी |
| | : अवेळी येणारी पाळी |
| | : न येणारी पाळी |
| | : पाळीबद्दल चुकीचे मार्गदर्शन अथवा मार्गदर्शनाचा अभाव |
| | : कुतूहल |
| | : रोग |
| | : चिंता अथवा अपराधी भावना. |
| ३) शारीरिक समागम | : समागमाच्या क्रियेबद्दल माहिती |
| | : किती वेळा, केव्हा, किती वेळ समागम करावा, करू नये |
| | : निरनिराळ्या शारीरिक स्थिती |
| | : समागम व गर्भधारणेचा संबंध |
| | : समागमाच्या क्रियेतील अथवा शारीरिक स्थितीमधील बदल व वैचित्र्ये. |
| ४) गर्भावस्था | : नेहमीची, प्राकृत |
| | : वेगळी, विकृत |
| | : गर्भधारणा टाळणे. |

५) बाळंतपण, मूल जन्माला येण्याची प्रक्रिया.

६) गर्भधारणा कशी होते, का होते, केव्हा होते.

७) वैद्यकीय गर्भपात

८) गर्भधारणा टाळणे : पद्धती
: धोके
: निरनिराळ्या पद्धतींची सुरक्षितता
: त्यातील नैतिकता.

९) लैंगिकतेमधील वैचित्रे

१०) गुप्तरोग : प्रकार
: कारणे, तसेच प्रसार कसा होतो याबद्दल माहिती
: धोके
: उपचार
: प्रतिबंध.

११) लैंगिक आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास
(सायको सेक्शुअल डेव्हलपमेंट)

१२) लैंगिक वर्तनातील सामाजिक घटक : स्त्री पुरुषांच्या एकत्र वागण्याबाबत समाज काय म्हणेल ही भीती

१३) लैंगिकतेबद्दल मते व अभिवृत्तो (ॲटिटचूड्स्) : पालकांची
: समाजाची
: सहाध्यायांची

१४) अनुवंशशास्त्रीय : जुळी मुले का व कशी होतात
: न जुळणारे रक्त गट
: रक्ताच्या नात्यांतील विवाहाच्या समस्या
: व्यक्तिमत्वातील गुणावगुणांची अनुवंशिकता
: लैंगिक विकृती

१५) सांस्कृतिक : वेगवेगळ्या समाजांतील लैंगिक वर्तन

५) **तरुण-तरुणींनी विचारलेले प्रश्न सामान्यत:** दोन प्रकारचे म्हणजे फक्त खरी माहिती (इन्फर्मेशन) मिळवण्यासाठी (फॅक्चुअल) किंवा संकल्पनात्मक (कन्सेप्च्युअल), उदाहरणार्थ मानसशास्त्रीय विचारावर आधारित असे होते. त्याचे स्थूल वर्गीकरण पुढीलप्रमाणे :

| | सत्य माहितीपुरते | संकल्पनात्मक |
|---|---|---|
| १२ वी इयत्ता | ७० % | ३० % |
| पदवीपूर्व वर्षे | ६१ % | ३९ % |
| पदव्युत्तर वर्षे | ५२ % | ४८ % |

वाढत्या वयाबरोबर संकल्पनात्मक प्रश्नांचे प्रमाण वाढते. पण पदव्युत्तर वर्षातही निम्म्याहून अधिक प्रश्न माहिती मिळवण्यासाठी होते, पर्यायाने अज्ञानाचे निदर्शक होते. हे गंभीर आहे. स्त्रियांनी जास्त संकल्पनात्मक प्रश्न विचारले. ४० % स्त्रियांनी व फक्त २७ % पुरुषांनी संकल्पनात्मक प्रश्न विचारले. उरलेल्या ३३ % नक्की वर्गीकरण करता आले नाही. स्त्रिया लैंगिक प्रश्नांची चौकशी टाळतात की त्या लवकर प्रौढ होतात हे ठरवणे कठीण आहे पण त्या अशी चौकशी उघड सभेत टाळत असाव्यात असे दिसते. कारण स्त्री तज्ज्ञाभोवती स्त्री श्रोत्यांचाच

गट जर आयोजित केला तर तरुणी बरेच प्रश्न विचारतात किंवा स्त्रीतज्ज्ञ शिबिरानंतर चर्चेसाठी उपलब्ध असेल तर तिच्याभोवती खूप तरुणी प्रश्न विचारायला जमा होतात असे आढळून आले.

**६) लैंगिक शिक्षण**

जमा केलेल्या सर्व फॉर्म्समध्ये लैंगिक शिक्षणाचा समावेश औपचारिक अभ्यासक्रमात हवा की नको असा प्रश्न होता. जवळ-जवळ १०० % विद्यार्थी-विद्यार्थिनींनी असा समावेश असावा असे प्रतिपादन केलें. हे अतिशय महत्त्वाचे आहे आणि दुर्दैवाने दुर्लक्षित आहे.

लैंगिक शिक्षणाचा समावेश अभ्यासक्रमात हवा असे विद्यार्थी-विद्यार्थिनींना का वाटते याची कारणे साधारणपणे पुढे दिलेली आहेत :

| | |
|---|---|
| १) लैंगिकतेची सार्वत्रिकता | ३० % |
| २) लैंगिक सुख अधिक चांगल्या रीतीने घेता यावे म्हणून | ३० ,, |
| ३) अपघात टाळता यावेत म्हणून | १० ,, |
| ४) आपल्या मुलांना मार्गदर्शन करता यावे म्हणून | ५ ,, |
| ५) आपल्या जोडीदाराला अधिक चांगले समजावून घेता येईल म्हणून | १५ ,, |
| ६) लैंगिक व्यवहाराकडे आरोग्यकारक दृष्टीनें बघता यावे म्हणून | १० ,, |

**७) लैंगिक मार्गदर्शन केंद्रातील अनुभव :**

| | |
|---|---|
| १) एकूण केसेस | ६०० |
| पुरुष | ८० % |
| स्त्रिया | २० % |

२) मार्गदर्शनासाठी येण्याची कारणे

| | |
|---|---|
| हस्त मैथुनाबद्दल चिंता अथवा अपराधीपणा | ४६ % |
| गुप्तरोग असणे अथवा आहे अशी भीती | २५ ,, |
| स्वत:च्या पुरुषत्वाबद्दल शंका | १५ ,, |
| वैद्यकीय गर्भपात | १ ,, |
| गर्भधारणा टाळणे | ११ ,, |
| लैंगिक विकृती | २ ,, |

**निष्कर्ष**

महाविद्यालयीन तरुण-तरुणींमध्ये लैंगिक अज्ञान, गैरसमजुती, मोठ्या प्रमाणावर आहेत. सामान्य महाविद्यालयीन तरुण लैंगिक बाबतीत अनभिज्ञ व अननुभवी आहे. भिन्न लिंगीय व्यक्तीबरोबर नीट जबाबदारीने वागूनही हे मैत्रीचे नाते टिकवण्याचे कौशल्य अभावाने आढळते. त्यामुळे भिन्न लिंगीयांबद्दल भीती, त्यांच्या सहवासाबद्दल मनात इच्छा बाळगणे पण प्रत्यक्षत: त्यांना बुजणे व टाळणे हे सामान्य चित्र आहे. यामुळे लैंगिक शिक्षणाची फार आवश्यकता आहे. खरेतर ही विद्यार्थी-विद्यार्थिनींची एकमुखाची मागणी आहे. लैंगिक शिक्षण देताना ते नुसते शारीरिक पातळीवर न ठेवता, मानसिक, सामाजिक व सांस्कृतिक पातळीवर व कुटुंब जीवनाच्या पार्श्वभूमीवर दिले पाहिजे. शारीरिक क्रियांची माहिती जरूर दिली पाहिजे. तो एक महत्त्वाचा भाग आहे, पण लहानसा आहे. जबाबदार लैंगिकत्वाची कल्पना रुजवली पाहिजे. आपण आपले स्त्रीत्व व पुरुषत्व सहजगत्या आपल्या खांद्यावर सांभाळू शकलो पाहिजे याचे शिक्षण आवश्यक आहे.

तरुण-तरुणींनी व्यक्तिगत विचारलेल्या प्रश्नांच्या अनुरोधाने त्यांना कुठल्या लैंगिक समस्या सतावीत आहेत याचा शोध घेता घेता असे आढळते : आजच्या महाविद्यालयीन जीवनातच काय पण समाजातही स्त्री-पुरुषांना मोकळेपणाने वागण्याची सोय नाही. लहानपणापासून मुलांना घरकुल, भातुकली खेळण्याचे शिक्षण आहे. खोटे आई-बाबा ते बनतात. जरा मोठे झाले की भाऊबहीण म्हणून खेळतात. पण स्वतंत्र स्त्री-पुरुष म्हणून वागण्याचे कुठलेही शिक्षण त्यांना मिळत नाही. त्यामुळे तरुण-तरुणी एकमेकांना बुजतात, भितात व टाळतात किंवा खोडया काढतात, अर्वाच्य बोलतात, किंवा लैंगिक स्वैराचार करू लागतात. या शिबिरांत मुले-मुली सुरूवातीला कशी दूरदूर असतात व शेवटी किती मोकळेपणाने वागतात हे पाहणे आनंददायक असते. पण बाहेर पडले की बहुतेक पहिले पाढे पंचावन्न होत असावेत. कारण सातत्याने हे प्रशिक्षण देण्याची काहीही व्यवस्था नाही. नवीन प्रयोग म्हणून, "स्वतःची ओळख अधिक आकर्षकरीत्या करून द्या." हा एक वर्तनशास्त्रीय अध्याय (एक्सरसाईज) शिबिरात सुरू केला; तो खूप लोकप्रिय झाला. त्यानंतर कॉलेजमधील विद्यार्थी विद्यार्थिनी सामान्यपणे एकत्र येतात अशा प्रसंगांवर, उदाहरणार्थ–उपहार गृह, सायकल स्टँड अथवा क्रीडांगणावरील घटनांवर आधारित काही–नाटुकली, रोल प्ले,या स्वरूपात तयार करण्याचे काम चालू आहे.एकमेकांशी बोलावे कसे, चालावे कसे, इथपासून तरुण-तरुणींच्या लैंगिक समस्यांची सोडवणूक करावी लागेल. कारण ही साधी कौशल्येसुद्धा त्यांच्याजवळ नाहीत.

निरनिराळ्या महाविद्यालयांमधून तरुण-तरुणींशी बोलताना, शिबिरे आयोजित करणारे तज्ज्ञ एकंदर सध्या महाविद्यालयातील लैंगिक वातावरण कसे असेल, मुले मुली एकमेकांशी कशी वागत असतील, याचा अंदाज बांधीत असतात. काही चित्रे मनाशी रेखाटत असतात. या तज्ज्ञांकडून हे चित्र शब्दांकित करून घेतले. विद्यार्थ्यांशी सतत सबंध येणाऱ्या शिक्षकांशी चर्चा केली आणि या विषयावरील पुस्तके वाचून त्यात काय प्रतिमा रेखाटलेल्या आहेत याचा शोध घेतला. तेव्हा असे आढळून आले की आजच्या तरुण-तरुणींचा मुख्य प्रश्न आपल्या लैंगिक भावना व विचार व्यक्त कसे करावेत हा आहे. एका बाजूने चांगल्या विश्वसनीय माहितीचा संपूर्ण अभाव आहे. दुसऱ्या बाजूने प्रसिद्धी माध्यमातून चुकीच्या लैंगिक आदर्शांचा प्रभाव वाढत आहे. तिसऱ्या बाजूने पालक काय किंवा शिक्षक काय, यांना आग्रहाने विचारावे, त्यांच्याकडून काही मार्गदर्शन घ्यावे असे तरुण पिढीला वाटत नाही, असे दिसते. त्यांना पुरेशी माहिती नसेल असे तरुणांना वाटत असेल, किंवा तितके मित्रत्वाचे संबंध दोन पिढयांत नसतील, किंवा वडील पिढीची भीति वाटत असेल. आणि सर्वात मोठे कारण म्हणजे ही माहिती विचारण्याचा खुद्द तरुणानाच संकोच वाटत असेल. अशी अनेक कारणे आहेत. चौथ्या बाजूने काळ कोणासाठी थांबत नाही त्यामुळे वयानुसार येणाऱ्या लैंगिक जबाबदाऱ्या तरुण-तरुणींना आपाततः पार पाडाव्या लागत आहेत. त्यात घाईत घाई म्हणजे सामाजिक संदर्भ झपाटयाने बदलत बाहेत. तेव्हा लैंगिक प्रश्नांच्या संदर्भात ऐन तारुण्याच्या उंबरठयावर असलेल्या या पिढीच्या भोवती एकूण वातावरण धूसर, अस्पष्ट आहे.

या परिस्थितीतही ठोकळ मानाने काही नमुने मुलांमुलींमध्ये दृष्टीस पडतात. सामान्य तरुण तरुणी या नमुन्यांचे मिश्रण असतात व आपापल्या आवडी व कुवतीप्रमाणे या नमुन्यांचे आदर्शपालन करण्याच्या प्रयत्नात असतात. पण एकूण परिस्थिती अवघड आहे असे किमान विधान करावेसे वाटते.

तेव्हा आजच्या महाविद्यालयीन विद्यार्थी–विद्यार्थिनींच्या लैगिक समस्या काय आहेत याचे एका वाक्यात उत्तर द्या असा जर प्रश्न मला कोणी विचारला तर मी म्हणेन, की आपल्या लैंगिक भावनांचा, विचारांचा, किती मोठा पगडा आपल्या व्यक्तिमत्वावर आहे याची जाणीवसुद्धा

या वर्गाला नाही. ही सर्वात मोठी समस्या आहे. सर्व लिंगविचार नाकारून टाकायचा किंवा दाबून टाकायचा या सामान्य तत्वावर आजच्या तरुण तरुणी वागू पहात आहेत. अभिव्यक्तीसाठी आतून धडका मारत असलेली लैंगिक शक्ति अशी दाबून टाकण्याचा प्रयत्न केला की ती आचरटपणाच्या चाळ्यांचे रूप धारण करून बाहेर पडते. मुलींची बेसुमार चेष्टा करणे, अर्वाच्य बडबड करणे, मुलींची शारीरिक छेड काढणें, असे ह्या चाळ्यांचे साधारण रूप असते. चाळे दृश्यमान असतात त्यामुळे समाज आणि महाविद्यालयीन अधिकारी शिस्तीचा बडगा दाखवून ते दाबू इच्छितात. हे चाळे वाईट आहेत अशी तरुण तरुणींची मनोमन समजूत होते व ते केल्याशिवाय तर त्यांना राहवत नाही. या कात्रीतून त्यांची सोडवणूक कशी करायची हा खरा प्रश्न आहे.

लैंगिक वर्तनाबद्दल अज्ञान, भीती आणि गैरसमजुती आहेत व भिन्नलिंगीय व्यक्तींबद्दल वाटणारे आकर्षण व्यक्त करण्याची पद्धत माहीत नाही. त्यात काही कौशल्य आहे याची जाणीव नाही. जाणीव झालीच तर तसे कौशल्य आत्मसात करण्याची काहीही शैक्षणिक सोय उपलब्ध नाही. साररूपाने म्हणायचे तर आजच्या तरुण तरुणींची लैंगिक समस्या ही आहे.

### भावनिक प्रश्न

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या इतर भावनिक समस्यांमध्ये बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्यात आलेले अपयश प्रामुख्याने आढळते. खेड्यातून शहरात आलेल्या विद्यार्थ्यांना शहराच्या काही अंशी बिनचेहऱ्याच्या व्यक्तिनिरपेक्ष जीवनपद्धतीशी जमवून घेणे कठीण जाते. शाळा व महाविद्यालय यातील शिक्षणपद्धतीमध्ये मोठी तफावत आहे. चमच्याने भरवणारी शाळेतील शिक्षणपद्धती व दोनशे अडीचशे मुलांना केवळ मार्गदर्शन करणारी महाविद्यालयातील व्याख्यानपद्धती हा सांधा जुळतोच असे नाही. शिवाय व्यावसायिक शिक्षणाची संधी त्यामानाने कमी असल्याने परीक्षेमध्ये खूप गुण मिळवण्याची आवश्यकता विद्यार्थ्यांच्या मनावर फार ताण निर्माण करते. शिक्षणाचा प्रसार झपाट्याने होत आहे. त्यामुळे कित्येक पिढ्यात प्रथमच उच्च शिक्षण घेणारे हजारो तरुण तरुणी महाविद्यालयात आहेत. घरून मार्गदर्शनाचा संपूर्ण अभाव असतो व इतर विद्यार्थ्यांची त्यांना संपूर्ण स्वीकारण्याची तयारी नसते. त्यामुळे न्यूनतेची भावना निर्माण होते. मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये हा गंड साहजिक जास्त आढळतो. मराठीतून इंग्रजी माध्यमाकडे होणाऱ्या वाटचालीमध्येही काही जण आपटी खातात. समाजामधली बदलती मूल्ये, सभोवतालची बदलती परिस्थिती, यांचा ताण विद्यार्थ्यांच्या मनावर पडतो. संधीचा अभाव, वशिलेबाजी, लाचखोरी, परीक्षेतील कॉपीच्या गोष्टी, एकीकडे व आदर्शवादी पण दुपारची भाकरी मिळवून द्यायला असमर्थ असे शिक्षण दुसरीकडे या कात्रीमध्ये अनेक जण कापले जात आहेत असे आढळते.

या वयोगटात प्रामुख्यानें आढळून येणारे मानसिक विकार म्हणजे चितारोग, उदासीनता, व्यसनाधीनता व व्यक्तिमत्व भंग. आजूबाजूच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी आवश्यक ती मानसिक सामग्री जवळ नसेल किवा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा त्यापासून पळ काढायचा असा मनाचा साचा बनला असेल तर महाविद्यालयातील दैनंदिन प्रश्नातूनही कुढेपणा व चिताग्रस्तता निर्माण होते. त्यातून चितारोग येतो. सतत काहीना काही बारीक सारीक शारीरिक तक्रारी असणे, पण वैद्यकीय तपासणीत शरीरात काही दोष न निघणे हे या रोगाचे सामान्यतः आढळणारे रूप आहे. मनात उदासीनता वाटणे, जगणे निरर्थक आहे, असा वारंवार येणारा विचार, भूक, व झोप नीट न लागणे, अभ्यासात लक्ष न लागणे, ही उदासीनतेची लक्षणे आहेत. उदासीनतेचा हा प्रश्न त्रासदायक आहे. कारण पालक मंडळी त्याचा स्वीकार करायला तयार नसतात. कपडे लत्ते, पैसा, हौस-मौज, शिक्षण, पुस्तके, वह्या हे सर्व आम्ही देत आहोत. मग आता कसली चिता, उदासीनता ? असे त्यांना वाटते. किंवा तरुण वयात कसले दुर्मुखले बसला.

जा, खा, प्या, मजा करा, असा सल्ला ते आपला पाल्यांना देतात. मजा करण्याची मनाची उभारी नाहीशी झाली असेल तर मौज कशी मारता येईल हा प्रश्न ते टाळू बघतात किंवा हा प्रश्न त्यांना प्रतीतच होत नाही. व्यक्तिमत्व-भंग हा गंभीर रोग आहे. सामान्य भाषेत ज्याला वेड म्हणतात त्याचे हे शास्त्रीय नाव आहे. अभ्यासात लक्ष न लागणे, चित्ताची एकाग्रता न होणे, निरर्थक विचारांचे थैमान, विचारांचा गुंता होणे किंवा विचार एकदम थांबणे, मनाची शून्य अवस्था होणे, भावनांचा ओलावा सुकणे, दैनंदिन कार्यक्रमातील लक्ष उडणे, अभ्यासावरची पकड जाणे, परीक्षेत वारंवार अपयश येणे, ही या रोगाची प्रारंभीची लक्षणे आहेत. ही उद्भवली तर त्यात गंभीरपणे लक्ष घातले पाहिजे. विद्यार्थ्यांमधील वाढती व्यसनाधीनता हा पालक, शिक्षक व वैद्यक व्यवसायी, या सर्वांना चिंता लावणारा विषय आहे. पाश्चात्य देशात हा प्रश्न जेवढा उग्र आहे तितका आपल्याकडे नाही हे खरे असले तरी त्याचे प्रमाण लक्षात यावे इतके वाढत आहे. धूम्रपान, तंबाखू, पान चघळणे, अफू, चरस, गांजा, भांग, आणि मद्यपान, ही याची निर-निराळी रूपे आहेत. ही सर्व द्रव्ये सहजासहजी उपलब्ध आहेत, काहींची तर जबरदस्त आकर्षक जाहिरात होत असते. मद्यपानासारख्या सवयींना सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होत आहे. आणि कित्येक विद्याशाखांमध्ये विद्यार्थ्यांना खूप मोकळा वेळ आहे. अशा परिस्थितीत व्यसनांचा मोह सहज पडतो. गंमत म्हणून चाखलेले अमली पदार्थ, व्यसन म्हणून शरीरात ठाण मांडतात.

निरनिराळे लैंगिक व भावनिक प्रश्न एका बाजूला, अभ्यासक्रमाचा दाब एका बाजूला, परीक्षेस उत्तम यश मिळण्याची आवश्यकता एका बाजूला आणि मार्गदर्शनाचा अभाव एका बाजूला, या सर्वातून वाट काढणे म्हणजे एक कठीण कर्म होऊन बसले आहे.

■ ■

# २८

# उच्चस्तरांवरील अभ्यासक्रमांचे विश्लेषण

अनंत न. जोशी

'राष्ट्राची गुणवत्ता ही त्या राष्ट्राने अंगीकारलेल्या शिक्षणपद्धतीच्या दर्जावर अवलंबून असते.' हे एक चिरंतन सत्य आहे. शिक्षणपद्धतीची गुणवत्ता मात्र अनेक घटकांवर अवलंबून असते. त्यांमध्ये शिक्षकांचा दर्जा, शैक्षणिक सुविधा, शिक्षणावरील राष्ट्रीय गुंतवणूक, अशा घटकांबरोबरच त्या पद्धतीचा अंगभूत घटक 'अभ्यासक्रम' याचाही समावेश होतो. शिक्षणपद्धतीची कार्यक्षमता व परिणामकारकता ठरविणारा अभ्यासक्रम हा एक प्रभावी घटक आहे. विद्यार्थ्यांतील वर्तन व व्यक्तिमत्त्वातील बदल अभ्यासक्रमांद्वारे घडवून आणले जातात. हे बदल घडवून आणण्यामागचे हेतू व पद्धती यांचा संकीर्ण आराखडा म्हणजेच अभ्यासक्रम असे स्थूलरूपाने म्हणता येईल. विद्यार्थ्यातील बदल व अभ्यासक्रम यांच्यातील साध्य व साधन हा संबंध स्पष्ट झाला तर विद्यार्थ्यांच्या काही समस्या या अभ्यासक्रमाशी निगडित असणार हे मान्य करावे लागेल.

या समस्यांचे वर्गीकरण दोन गटांत करता येईल. अभ्यासक्रम प्रत्यक्ष पूर्ण करत असताना अभ्यासक्रमातील त्रुटी व मर्यादा यामुळे विद्यार्थ्यांसमोर उभ्या राहणाऱ्या काहीशा तात्कालिक स्वरूपाच्या समस्या, हा समस्यांचा पहिला प्रकार; आणि, अभ्यासक्रमातील दोषांमुळे योग्य ते वर्तन बदल व विद्यार्थ्यांचा विकास न झाल्यामुळे पुढील अभ्यासक्रम पूर्ण करताना, किंवा एकंदरीत सर्व शिक्षण पूर्ण झाल्यावर भावी आयुष्यास सामोरे जाताना ज्या दीर्घकालीन स्वरूपाच्या समस्या येतात तो दुसरा प्रकार. माझ्या मते या दुसऱ्या प्रकाराखाली येणाऱ्या समस्या या अधिक महत्त्वाच्या व गंभीर स्वरूपाच्या आहेत. दुर्दैवाची गोष्ट अशी की या समस्या अभ्यासक्रमामुळे निर्माण झाल्या आहेत याची जाण विद्यार्थ्यांना, इतकेच नव्हे तर समाजाला देखील फारशी नसते व नाही. शिवाय या समस्या कधीही केवळ विद्यार्थ्यांच्या समस्या न राहता सामाजिक व राष्ट्रीय समस्यांचे रूप धारण करतात, व मूळ कारण थोडेसे बाजूला पडते, असा अनुभव आहे.

या समस्यांचे नेमके स्वरूप काय आहे, त्यांचा अभ्यासक्रमांशी संबंध कोणता व त्याची जबाबदारी कोणावर, अशा प्रश्नांचा मागोवा घ्यायचा असेल तर अभ्यासक्रमांच्या विश्लेषणापलीकडे जाऊन काही मूलगामी व गंभीर विचार करणे अपरिहार्य ठरते. या दृष्टीनें या लेखाची चार भागांमध्ये विभागणी केलेली आहे. पहिल्या भागात अभ्यासक्रमाची व्याख्या, व्याप्ती, अभ्यासक्रम नियोजनाचे स्वरूप व त्यात होत गेलेली उत्क्रांती, आणि आपल्याकडील अभ्यासक्रम नियोजनाची पद्धती यांची चर्चा आहे. दुसऱ्या भागात अभ्यासक्रम विश्लेषणासाठी आवश्यक निकष व पायाभूत घटक आणि त्या आधारे अभ्यासक्रमांवर टाकलेला प्रकाशझोत आहे. तिसऱ्या भागात अभ्यासक्रमामुळे झालेल्या समस्यांचे स्वरूप; तर चौथ्या भागात निष्कर्ष व उपाययोजनांची चर्चा केलेली आहे.

शिक्षणाच्या गोंडस व्याख्या अनेक आहेत. ती शिक्षणाची एक बाजू झाली. पण शिक्षणाला दुसरीही बाजू असू शकते. ती दुसरी बाजू विचारात घेऊन शिक्षणाची व्याख्या कशी करता येईल ?

'शिक्षण म्हणजे जुनी पिढी नव्या पिढीच्या जीवनाशी खेळत असलेला एक खेळ आहे.' मीं शिक्षणाची, अशी व्याख्या करीन. हा खेळ अनेक पिढ्या चालत आला आहे. शिक्षणाचा आणि अभ्यासक्रम बदलांचा इतिहास आपल्याला हेच सांगतो. उपयुक्ततावादाचा पुरस्कर्ता जॉन ड्युई आणि 'डी-स्कूलिंग'ची कल्पना मांडणारा इव्हॉन इलिच् यांचे अपवाद वगळता, प्लेटोपासून हर्बर्ट स्पेन्सरपर्यंत आणि प्राचीन भारतीय आचार्यांपासून ईश्वरभाई पटेलांपर्यंत सारेच या खेळणाऱ्यांच्या गर्दीत सामील झाले आहेत. त्यात जसे श्रद्धावंत भावूक आहेत तसेच प्रखर बुद्धीवादीही आहेत. शिक्षण प्रक्रियेला दिलेला गोंडसपणाचा मुलामा खरवडून काढला असता जे दिसते ते असे.
माझे हे मत वादग्रस्त ठरणार आहे याची मला पूर्ण कल्पना आहे. शिक्षण व शिक्षणपद्धतीतील बदलांवर या विचारवंतांनी जे विचार मांडले, त्यामागे त्यांची काही तत्त्वज्ञानाची बैठक होती, काही एक विशिष्ट भूमिका होती, म्हणून 'केवळ एक खेळ' असे उपहासाने त्याकडे पाहणे योग्य नाही, असे प्रभावीपणे मांडता येईल. तथापी तो केवळ खेळच होता, हे देखील सबळ पुराव्यानिशी सिद्ध करता येईल. शैक्षणिक तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील या वादाची चर्चा करण्याचा या लेखाचा हेतू नाही. मात्र स्वातंत्र्योत्तर भारतातील शिक्षणपद्धतीची अवस्था पाहिल्यावर मी मांडलेला विचारच दृढमूल व्हायला मदत होईल. शिक्षण-सोपानाच्या निरनिराळ्या स्तरांवरील अभ्यासक्रमांकडे व त्यामधील बदलांकडे टाकलेला एखादा दृष्टिक्षेप देखील अस्वस्थ करणारा आहे.

'अध्ययन अनुभूती' (Learning Experiences) सारख्या शिक्षणशास्त्रातील प्रागतिक कल्पना तत्त्वतः मान्य करूनही आपले अभ्यासक्रम अजूनही पाठ्यवस्तूवर (Content) भर देणारे व विषयाधिष्ठित राहिलेले आहेत. 'करिक्यूलम' या शब्दाला जन्मतः चिकटून बसलेली, झापडे बांधलेल्या घोड्याचा 'धावण्याचा मार्ग' ही कल्पना आम्ही अजूनही त्याज्य ठरवलेली नाही. व्यक्तिनिष्ठता, संदिग्धता, वैचारिक गोंधळ, दिशाहीनता, यांच्या भोवऱ्यात अडकून पडलेली आपल्याकडील अभ्यासक्रम नियोजनाची प्रक्रिया पाहिली की वाटते शिक्षणामुळे शिक्षण क्षेत्रात व शिक्षणक्षेत्राबाहेर जे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत त्यासर्वांमागे अभ्यासक्रमातील हा गोंधळ हेच प्रमुख कारण असावे.

आपली शिक्षणपद्धती ही या स्वतंत्र राष्ट्राच्या समस्या सोडविण्यास पूरक ठरेल असा आशावादी दृष्टिकोन आपण स्वीकारला होता. स्वतंत्र भारताची आदर्शवादी स्वप्ने 'स्वातंत्र्य मिळालेल्या मध्यरात्री' ज्यांनी ज्यांनी पाहिली त्या सर्वांनी ती स्वप्नं साकार करण्याचे एक प्रभावी साधन म्हणून शिक्षणाकडे पाहिले. परंतु आपली शिक्षणपद्धती आणि शिक्षणसंस्थांमधून राबविले जाणारे अभ्यासक्रम या आशा-आकांक्षाशी स्पर्धा करू शकले नाहीत. या मागचे प्रमुख कारण कोणते ?

शिक्षणाचे हे हत्यार समर्थपणे पेलणारा, आणि नवजात राष्ट्राच्या शिक्षणपद्धतीला सतत मार्गदर्शन करणाऱ्या पायाभूत तत्त्वप्रणालीची बैठक देणारा, प्रा जॉन ड्युईसारखा प्रज्ञावंत शिक्षणशास्त्रज्ञ या विशाल देशाला लाभला नाही हे या सर्वामागचे प्रमुख कारण आहे. नव्हे, हे या देशाचे सर्वात मोठे करंटेपण आहे. यामुळे 'कॉमन सेन्स अँड करिक्यूलम' या ग्रंथात रॉबिन

बारो याने वर्णन केलेल्या, कप्तान नसलेल्या जहाजाप्रमाणे आपल्या शिक्षणपद्धतीची अवस्था झालेली आपणास दिसते.

अभ्यासक्रम सुधारणेसाठी व शिक्षणाच्या पुनर्रचनेसाठी आपण जे आयोग किंवा समित्या नेमल्या त्यांच्या अहवालात, विषयतज्ज्ञ, अध्यापक, प्राध्यापक, तत्त्वज्ञ, परदेशी तज्ज्ञ, यांचे विचार मंथन, विद्वत्ता, कल्पना व प्रतिभा यांचा विलास दिसतो. मात्र दिशा दिसत नाही. भारतीय शिक्षणावरील उत्कृष्ट संदर्भ ग्रंथ किंवा कोष असे या अहवालांचे स्वरूप राहिलेले आहे.

या सर्वांचा परिणाम म्हणून आपण 'बेसिक एज्युकेशन'बद्दल सदैव साशंक राहिलो. भाषा, माध्यमाचा प्रश्न आपणाला सोडविता आला नाही. व्यावसायीकरणाभावी उच्च माध्यमिक शिक्षणाची फरफट आपणाला पहावी लागली. हिन्दी वैकल्पिक की सक्तीचे, वाणिज्य शाखेला मराठी असावे की नसावे, पदव्युत्तर शिक्षणाचे माध्यम कोणते, असे प्रश्न वेळोवेळी आपणास भेडसावू लागले. अभ्यासक्रम जड आहेत अशी ओरड झाली की आपण ते पातळ केले. कधी शास्त्र-शाखेतील विषय आपण स्वतंत्र शिकविले, तर कधी एकत्रित. कार्यानुभवाची नीट अंमलबजावणी होण्यापूर्वीच आपण 'समाजोपयोगी उत्पादन कार्य' आणले. सत्र पद्धती आपण घिसाडघाईने राबविली आणि विद्यार्थी आंदोलनानंतर टाकून दिली.

अभ्यासक्रमाची व्यापक व्याख्या गृहीत धरता हे सर्व प्रश्न प्रत्यक्षरीत्या अभ्यासक्रमाचेच प्रश्न ठरतात. या ठिकाणी अभ्यासक्रम हा शब्द 'सिलॅबस' अशा संकुचित अर्थाने न वापरता, 'करिक्यु-लम' या अर्थाने वापरलेला आहे (सिलॅबससाठी पाठ्यक्रम हा शब्द प्रयोग आहे). करिक्युलमची जी व्याख्या या लेखासाठी अभिप्रेत आहे ती अशी : 'शिक्षणाची ध्येये व उद्दिष्टे साध्य करण्या-साठी, संशोधन, गतानुभव, सद्यःस्थिती आणि सैद्धांतिक चौकटी यांच्या आधारे नियोजन केलेल्या शैक्षणिक कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना मिळणारे समग्र अध्ययन अनुभव म्हणजे अभ्यासक्रम होय.'

याच ठिकाणी आणखी दोन शब्दप्रयोगांचे स्पष्टीकरण इष्ट ठरेल आणि, ते म्हणजे अभ्यासक्रम सुधारणा (Improvement of Curriculum) व अभ्यासक्रम बदल (Change in Curriculum).

अभ्यासक्रमाची वर दिल्याप्रमाणे जर एखादी व्यापक व्याख्या आपण मान्य केली असेल तर 'अभ्याक्रमातील बदल,' शैक्षणिक संस्थांसह शिक्षण प्रक्रियेतील सर्व घटकांतील बदल दर्शवितो म्हणजेच अभ्यासक्रमातील बदल हा जवळ जवळ संपूर्ण शिक्षणपद्धतीतील बदल असतो.

या उलट, 'अभ्यासक्रम सुधारणा' हा प्रामुख्याने पाठ्यवस्तूतील किंवा शिक्षणप्रक्रियेतील एक किंवा काहीच घटकांतील बदल दर्शवितो.

म्हणजे यापूर्वी केवळ पाठ्यवस्तू किंवा अन्य काही अनुषंगिक घटकांचे बदल करण्याचे आपण जे प्रयत्न केले, ते अभ्यासक्रम सुधारण्याचे प्रयत्न होते. इतकेच नव्हे तर शिक्षणात आमूलाग्र बदल करण्याची घोषणा करून प्रत्यक्षात पाठ्यवस्तूतील बदलाशिवाय अन्य कोणताच बदल झाला नसेल तर या बदलाची गणना आपल्याला 'अभ्यासक्रम सुधारणा' म्हणूनच करावी लागेल; 'अभ्यासक्रम बदल' म्हणून नव्हे.

हे विस्ताराने स्पष्ट करण्याचा हेतू इतकाच आहे की आपल्या शिक्षणपद्धतीतील तथाकथित बदल हे अभ्यासक्रम सुधारणेपलीकडे जाऊ शकले नाहीत. म्हणजे, अभ्यासक्रमामध्ये बदल कर-ण्यास आपणाला नेहमीच अपयश आले आहे. एका अपयशाकडून दुसऱ्या अपयशाकडे अशीच आपली सदैव वाटचाल आहे. हे असे का घडले ? माझ्या मते त्याची तीन कारणे संभवितात.

यांपैकी पहिले कारण म्हणजे 'अभ्यासक्रम बदल' हा आपला हेतू असला तरी आपण मूलतः किंवा कळत-नकळत अभ्यासक्रम सुधारणेसारख्या संकुचित कल्पनेला चिकटून राहिलेलो होतो. तसे नसते तर आपण 'अभ्यासक्रम निर्मितीची यंत्रणा' व 'अध्यापन यंत्रणा' अभिन्न मानल्या असत्या. पण तसे कधीच घडले नाही. या दोन्ही यंत्रणा पूर्णपणे वेगळ्या आहेत असे गृहीत धरूनच त्या यंत्रणांचे कार्य चालले. त्यामुळे आपले अभ्यासक्रम पहिल्या यंत्रणेचे 'आउट पुट' म्हणून बाहेर पडले आणि दुसऱ्या यंत्रणेने 'इन पुट' म्हणून ते स्वीकारले. त्यापुढे ते दुसऱ्या यंत्रणेने स्वतःच्या खाक्याप्रमाणे राबविले आणि तेथूनच आपल्या अपयशाची सुरूवात झाली.

अभ्यासक्रम बदलातील अपयशाचे दुसरे कारण अभ्यासक्रम नियोजनाच्या (Curriculum Planning) क्षेत्रात गेल्या दोन दशकांत झालेल्या नेत्रदीपक संशोधनाची आणि त्यानुसार विकसित झालेल्या नव्या पद्धतींची नोंद आपण अजूनही घेतलेली नाही. आपल्याकडे अशास्त्रीय अशा जुन्या पद्धतीचाच अवलंब केला जातो. तिची सर्वसाधारण कार्यपद्धती अशी :

अभ्यासक्रम सुधारणेसाठी प्रथम एक तज्ज्ञांची समिती नेमली जाते. त्या तज्ज्ञांनी आपला अनुभव, आवडीचे क्षेत्र व विचारधारा, यांवर आधारित आपली मते व ठोकताळे बसविलेले असतात. या मतांना व अंदाजांना शास्त्रीय संशोधनाचा आधार नसतो. त्यांची सप्रमाणता व विश्वासार्हता अजमावलेली नसते. केवळ तज्ज्ञांची मते म्हणून त्यानुसार आराखडा केला जातो. त्या आराखड्यावर शिक्षणक्षेत्रातील अन्य घटकांची मते मागविण्याचा धूर्तपणा दाखविला जातो व अंतिम आराखडा तयार करून अंमलबजावणीसाठी पाठविला जातो.

या उलट, गेल्या दोन दशकांमध्ये विकसित झालेल्या अभ्यासक्रम नियोजनाच्या पद्धती अधिकाधिक शास्त्रशुद्ध बनत चाललेल्या आहेत. त्यांचा थोडक्यात आढावा घ्यायचा झाला तर अभ्यासक्रम निर्मितीच्या (Curriculum Development) तीन प्रतिकृती (models) आज उपलब्ध आहेत असे दिसते :

१) रीसर्च डेव्हलपमेंट डिफ्यूजन मॉडेल (आर. डी. डी.),

२) सोशल इंटरॲक्शन मॉडेल (एस्. आय.),

३) प्रॉब्लेम सॉल्व्हिंग मॉडेल (पी. एस्.).

आर. डी. डी. मॉडेलमध्ये अभ्यासक्रमांची उद्दिष्टे प्रथम ठरविली जातात. ही उद्दिष्टे साध्य करण्याच्या सर्वोत्कृष्ट पद्धती निश्चित केल्या जातात. तदनुसार पाठ्यवस्तूची रचना केली जाते. योग्य अशा शैक्षणिक साहित्याची निर्मिती करून चाचणी घेतली जाते. चाचणीच्या अनुभवांवरून शैक्षणिक साहित्याची पुनर्रचना करून शिक्षकांना ते उपलब्ध करून दिले जाते.

एस्. आय्. मॉडेलमध्ये शिक्षकांना प्रधान स्थान दिलेले असते. त्यामुळे आर. डी. डी मॉडेलमध्ये शिक्षकाला दिलेल्या गौणस्थानाचा दोष दूर होतो. अभ्यासक्रमाची उद्दिष्टे ठरविण्या पासून योग्य पद्धती व शैक्षणिक साहित्य निवडण्याचे स्वातंत्र्य शिक्षकांना दिलेले असते. यासाठी शिक्षकाला आवश्यक तेथे मार्गदर्शन व शिक्षका-शिक्षकांमधील विचार व कृतींच्या आदान-प्रदानाला वाव दिला जातो.

प्रॉब्लेम सॉल्व्हिंग मॉडेलमध्ये पाठ्यवस्तू शिकविण्यासाठी येणाऱ्या समस्यांना, स्थानिक परिस्थिती, सुविधा, विद्यार्थ्यांचा दर्जा यांचा विचार करून, काही उपाय शोधण्याचे स्वातंत्र्य शिक्षकांना दिलेले असते. या उपायांचे आदान-प्रदान करण्यास सहाय्यही दिले जाते. शिक्षकांनी सुचविलेल्या उपायांची अन्य शिक्षकांनी चाचणी घेतल्यानंतर अनुभवाप्रमाणे या उपायांची तज्ज्ञ

मंडळी अभ्यास करून पुनर्रचना करतात व तो शिक्षकांकडे पुन्हा पाठविला जातो. या तीन मॉडेलांच्या तुलनेत आपल्या अभ्यासक्रम निर्मितीच्या पद्धतीची कालबाह्यता स्पष्ट होईल. कोठारी आयोगाने या दोषावर बोट ठेवले आणि विद्यापीठांनी अभ्यासक्रम संशोधनासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी अशी सूचना केली होती. पण अशा यंत्रणा अजून निर्माण व्हायच्या आहेत.

आपल्या शिक्षणक्षेत्रामध्ये 'उत्तर दायित्वा'च्या तत्त्वाचा स्वीकार आपण केला नाही हे अभ्यासक्रमाची अपेक्षित परिणामकारकता साध्य करण्यास आलेल्या अपयशाचे तिसरे कारण आहे. नवा अभ्यासक्रमाची अंमलबजावणी झाल्यानंतर त्याच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन करण्याचे आपण सोयीस्कररित्या टाळतो. इतकेच नव्हे तर त्या अभ्यासक्रमाच्या यशापयशाची जबाबदारी, शिक्षक, प्रशासक, शासनाच्या आधिपत्याखालील संस्था, अथवा अभ्यासक्रम निर्मिती करणारी समिती, यापैकी कोणाकडेच येणार नाही याची दक्षता घेतली जाते. म्हणूनच सार्वजनिक चर्चेचा देखावा असतो. ही उत्तरदायित्वाची कल्पना शिक्षण शास्त्रात आली तर मला वाटते अभ्यासक्रम सुधार समितीत तज्ज्ञ म्हणून सहभागी होण्याचे धाडस फारच थोडे करतील.

या चर्चेवरून आपल्याला असे म्हणता येईल की अभ्यासक्रम निर्मिती व नियोजन ही जितकी समजली जातें तितकी सोपी प्रक्रिया नाही. अभ्यासक्रम बदलाची जबाबदारी स्वीकारण्यापूर्वी दीर्घकाळ चाललेल्या संशोधनाची बैठक त्यास द्यावी लागेल.

अभ्यासक्रम नियोजन मूल्यमापन या क्षेत्रात आपल्याकडे कितीसे संशोधन झाले आहे? १९४३–१९७८ या पस्तीस वर्षांच्या कालखंडात १,४४० संशोधन प्रकल्प व अभ्यास (संशोधन सर्वेक्षणांच्या आधारे) पूर्ण झाले. यांपैकी ३५ अभ्यास हे अभ्यासक्रमांशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या संबंधित आहेत, आणि फक्त १५ संशोधन अभ्यास प्रत्यक्ष अभ्यासक्रम व अभ्यासक्रम–नियोजन या विषयांवर आधारलेले आहेत. म्हणजे हे प्रमाण एकशतांशाइतके आहे.

अभ्यासक्रम व त्याचे नियोजन हा शिक्षण प्रक्रियेचा आत्मा आहे. पण शिक्षणशास्त्रात संशोधन करणाऱ्यांना, स्वतःला तज्ज्ञ म्हणवून घेणाऱ्यांना हे क्षेत्र आव्हानात्मक वाटू नये हे एक मोठे आश्चर्य नव्हे काय? शिक्षणक्षेत्रातील वाटचाल, अजुनी आपण चाचपडत, अडखळतच का करतो आहोत याचे उत्तर आपणास येथेच सापडेल.

आता दुसरे चित्र पहा. एकोणीसशेसाठनंतर अमेरिका आणि त्यानंतर इतर पाश्चात्त्य देशांत शिक्षणक्षेत्रात एक मोठी क्रांती झालेली आढळते. तो काळ 'स्पुटनिक' चा होता. त्या घटनेने आपण वैज्ञानिक क्षेत्रात मागे पडत चाललो आहोत अशी तीव्र प्रतिक्रिया अमेरिकन समाजात उमटली. विज्ञानाने अवकाशात घेतलेल्या प्रचंड झेपेशी तुलना करता अमेरिकन शैक्षणिक संस्थांमधून दिले जाणारे विज्ञानाचे शिक्षण फारच तोकडे व टाकाऊ आहे या विचाराने समाजात अस्वस्थता पसरली. अमेरिकन शिक्षणसंस्था, पर्यायाने समाज, पुरेसे शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ निर्माण करू शकत नाही या भीतीने विचारवंत राज्यकर्ते भयग्रस्त झाले. म्हणून हॉर्वर्ड विद्यापीठातील विख्यात मानसशास्त्रज्ञ डॉ. जेरोम ब्रुनर यांच्या अध्यक्षतेखाली नामवंत शिक्षणशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ व वैज्ञानिकांची वुडस् होल येथे बैठक घेण्यात आली. त्याची परिणती, डॉ. ब्रुनर यांचे छोटेखानी पुस्तक, 'प्रोसेस ऑफ एज्युकेशन,' ही होय. या नव्वद पानांच्या छोट्या पुस्तकाने शास्त्र शिक्षणाच्या क्षेत्रातच नव्हे सर्वच शिक्षण जगतात, व केवळ अमेरिकेतच नव्हे तर, रशिया, फ्रान्स, जर्मनी, जपान, इंग्लंड, इटली आणि अन्य देशांतही मोठी खळबळ माजविली. 'प्रोसेस' च्या प्रकाशनापूर्वी अभ्यासक्रम नियोजनावर जितका विचार व संशोधन झाले त्याच्या कितीतरी पटीने ते या पुस्तकाच्या प्रकाशनानंतर झालेले आढळते. शास्त्र व अन्य अभ्यासक्रमांच्या पुनर्रचनेची एक प्रचंड लाटच यानंतर उसळून 'डिसकव्हरी लर्निंग,' व 'सृजनशीलतेसाठी अध्यापन' अशा नव्या कल्पनेचा उदय यातून झाला.

हे सर्व नवे अभ्यासक्रम यशस्वी ठरले का ? आजमितीला तरी याचे उत्तर होकारार्थी देता येत नाही. नोकरशाहीची उद्वेगजनक कार्यपद्धती, शिक्षक प्रशिक्षणाचा व पूर्वतयारीचा अभाव, तसेच विद्यार्थ्यांतील प्रेरणा, पूर्वावश्यक क्षमता व बौद्धिक कौशल्ये, ही सामाजिक विषमतेमुळे मुळातच अविकसित राहिल्याने विद्यार्थ्यांतील अपेक्षित बदल दिसून आले नाहीत. मूलतः, हे सर्व अभ्यासक्रम बौद्धिक विचार प्रक्रियेत बदल घडवून आणण्याच्या मर्यादित हेतूने निर्माण केले गेले होते. त्यामुळे सामाजिक विषमता, माणसा-माणसातील दुरावा, सामाजिक बांधिलकीचा अभाव, या व्याधींपासून समाजाची मुक्तता करण्यासाठी, 'माणूस घडविण्याचे' कार्य करण्यात हे अभ्यास-सक्रम अपयशी ठरणार हे आधीच निश्चित झाल्यासारखे होते. परंतु त्यांचे हे अपयश देखील एक यशस्वी अपयश होते, कारण यातूनच अभ्यासक्रम नियोजनाच्या शास्त्रीय पद्धतीचा लाभ आपल्याला झाला. आपल्याकडील अभ्यासक्रम निर्मिती आज जरी निराशेच्या, गोंधळाच्या चक्रात अडकून पडली असली, तरी अभ्यासक्रम निर्मितीच्या क्लिष्ट प्रक्रियेला अशी शास्त्रीय पद्धतीची बैठक दिल्यानेच आपणालाही त्यातून बाहेर पडता येईल. असे शास्त्रशुद्ध अभ्यासक्रम नियोजनाचे कार्य हे मानवी प्रज्ञेला एक आव्हान आहे. म्हणून विद्यापीठ अभ्यास मंडळावर मतपत्रिकेद्वारे निवडून आलेल्या काही मंडळींवर ते सोपवून चालणार नाही. विषय तज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मानव वंशशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ, प्राध्यापक, या सर्वांनी यासाठी एकत्र आले पाहिजेच. परंतु त्याबरोबरच, त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी, एकसूत्रीपणा आणून कार्यवाहीचा आराखडा तयार करण्यासाठी आणि शैक्षणिकदृष्टया योग्य निर्णय घेऊन समतोल राखण्यासाठी तितक्याच तोलामोलाच्या प्रज्ञावान शिक्षणशास्त्रज्ञांचीही गरज आहे. आपल्या दुर्दैवाने असे शिक्षणशास्त्रज्ञ निर्माण करणारे आपले शिक्षणक्रम व त्यांचे अभ्यासक्रम, याबाबतीतही दिवाळखोर ठरलेले आहेत.

## भाग २

कोणत्याही अभ्यासक्रमाचे विश्लेषण हे तीन प्रकारे करता येते :

१. काय, का, व कसे या अभ्यासक्रमाच्या तीन अंगाच्या अनुषंगाने केलेले अभ्यासक्रमाचे विश्लेषण.

२. सलगता, काठिण्यता, लवचिकता, उपयुक्तता, संयुक्तिकता, अशा पूर्वनियोजित निकषांच्या आधारे केलेले विश्लेषण.

३. अभ्यासक्रम नियोजनाच्या चार पायाभूत घटकांच्या संदर्भात केलेले अभ्यासक्रमाचे विश्लेषण. ते चार पायाभूत घटक असे :

अ) सामाजिक प्रेरणा व दबाव

आ) मानवी विकासावस्था

इ) अध्ययनाचे स्वरूप

ई) ज्ञानाचे स्वरूप

अभ्यासक्रम विश्लेषणाची तिसरी पद्धत ही आधुनिक आहे. या चार पायाभूत घटकांच्या सहाय्याने अभ्यासक्रम विश्लेषणासाठी काही निकष-प्रश्न तयार करता येतात. अशा निकष-प्रश्नांच्या मदतीने केलेल्या विश्लेषणात नेमकेपणा येतो. हे निकष प्रश्न पुढीलप्रमाणे मांडता येतील :

१) अभ्यासक्रमाची उद्दिष्टे व ध्येये नेमक्या शब्दांत मांडली आहेत काय ?

२) अभ्यासक्रमाची पाठ्यवस्तू व अध्ययन अनुभूती निवडण्यात उद्दिष्टांचा विचार केलेला आहे काय ?

३) अभ्यासक्रमाची उद्दिष्टे ठरविताना सामाजिक गरजा व प्रेरणांची दखल घेतली गेली आहे काय ?

४) अभ्यासक्रमाची उद्दिष्टे, विद्यार्थ्यांच्या गरजा, रूची व क्षमतेशी सुसंगत आहेत काय ?

५) अध्ययन निष्पत्तीचे मूल्यमापन करण्यासाठी उद्दिष्टांचा निकष म्हणून उपयोग केला जातो काय ?

६) विद्यार्थ्यांतील विकासावस्थेनुसार असलेल्या भेदांना अभ्यासक्रम वाव देतो का ?

७) विद्यार्थ्यांच्या विकासात्मक नियुक्त कार्यांची (Developmental Tasks) नोंद अभ्यासक्रमाने घेतली आहे काय ?

८) विद्यार्थ्यांचे कच्चे पूर्वज्ञान सुधारण्याची संधी, विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमामध्ये प्राप्त होते काय ?

९) पाठ्यवस्तूतील महत्वाच्या संकल्पना, तत्त्वे, व ज्ञानाच्या संरचना शोधून काढण्यास अभ्यासक्रम सहाय्य करतो काय ?

१०) अध्ययन उपपत्तीवर आधारलेल्या अनेक पर्यायी उपागमांचा (alternative approaches) अभ्यासक्रमामध्ये समावेश करण्यात आला आहे काय ?

११)) 'डिस्कव्हरी लर्निंग' अथवा 'अॅडव्हान्स ऑर्गनायझर' अशा आधुनिक संकल्पनेवर अभ्यासक्रमाची रचना आधारलेली आहे काय ?

१२) सामाजिक गरजा व समस्यांवर आधारित आंतर-ज्ञानशाखीय उपागमांचा (Inter-disciplinary approach) अवलंब केला गेला आहे काय ?

असे बारा निकष-प्रश्न विश्लेषणासाठी उपयुक्त ठरतील. पण तत्पूर्वी अभ्यासक्रमावर टाकलेला केवळ एक दृष्टिक्षेप एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करतो. तो असा की, आजच्या उच्च माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमांची इतक्या शास्त्रशुद्ध निकषांच्या सहाय्याने विश्लेषण करूनच निष्कर्ष काढण्याची आवश्यकता आहे काय ? ज्या व्यक्तींना अभ्यासक्रम नियोजनाच्या कोणत्याच तत्त्वांचा गंध नाही, ज्यांना अभ्यासक्रमाचा 'सिलॅबस' असा मर्यादितच (व चुकीचाही) अर्थ माहीत आहे, अशा लोकांनी तयार केलेल्या टाकाऊ अभ्यासक्रमांची शास्त्रीय चिकित्सा करण्याची आवश्यकता काय आहे ?

अभ्यासक्रमाचे जे पायाभूत घटक व निकष-प्रश्न आपण विश्लेषणासाठी वापरणार आहोत ते मुळातच अभ्यासक्रमाची निर्मिती करणाऱ्यांना माहीत नसतील तर त्यासाठी मोठ्या संशोधनाचा आव आणण्याची गरज नाही. त्याऐवजी, अभ्यासक्रमांच्या पायाभूत घटकांचा विचार करून तयार केलेले उच्च दर्जाचे अभ्यासक्रम कसे असू शकतील ? त्यासाठी कितपत वाटचाल करावी लागेल? तशी वाटचाल न केल्यास विद्यार्थ्यांसमोर उभे राहणाऱ्या व राहिलेल्या समस्येचे स्वरूप काय ?

अशा प्रश्नांचा विचार करणे मौलिक ठरेल असे वाटते. म्हणूनच या दुसऱ्या भागातील व पुढील दोन भागांतील चर्चा या अंगांनीच विकसित केलेली आहे. व त्यासाठी उच्च माध्यमिक शिक्षणाचे शास्त्र विषयांचे पाठ्यक्रम व शिवाजी विद्यापीठातील शास्त्रशाखेच्या उच्च शिक्षणाचे पाठ्यक्रम, डोळ्यांसमोर ठेवलेले आहेत.

पाठ्यक्रम हा आजकाल उच्च शिक्षणामध्ये एक अत्यंत महत्त्वाचा दस्तऐवज मानला जातो. या दस्तऐवजात प्रत्येक विषयातील प्रमुख घटकांची व आनुषंगिक उपघटकांची नोंद असते. शास्त्रशाखेच्या पाठ्यक्रमांत प्रॅक्टिकल्सची यादी असते व शेवटी संदर्भग्रंथ व नियमावली असते.

'असोसिअेशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज्'ने केलेल्या एका सर्वेक्षणाच्या निष्कर्षानुसार हे पाठ्यक्रम तयार करण्याची पद्धती फारच उथळ असते.पाठ्यक्रमात एकसंधता नसते. घटकांबाबतचे जे किमान आवश्यक स्पष्टीकरण हवे, त्याचाही स्पष्ट उल्लेख नसतो. आणि पाठ्यक्रम अस्थायी स्वरूपाचेच असतात; असे दिसून आले आहे.

अशा हिणकस पाठ्यक्रमांना समोर ठेऊन पाठ्यपुस्तके (संदर्भ ग्रंथ नव्हे) लिहिली जातात, तर प्राध्यापक या पाठ्यक्रमांना धर्मग्रंथाचे स्थान देऊन त्यानुसार अध्यापन करतात. एक अन्य राज्यातील उच्चमाध्यमिक शिक्षणाच्या पाठ्यक्रमातील विज्ञानातले उदाहरण पाहू. ब्रिटिश मापन पद्धती ही आता एक कालबाह्य व ऐतिहासिक पद्धती मानली जाते. शास्त्रीय मापनासाठी आता मेट्रिक पद्धतीलाच आंतरराष्ट्रीय मान्यता मिळालेली आहे. तसेच भारताच्या सर्वोच्च सभागृहाने विधेयक संमत करून मेट्रिक पद्धतीचाच अंगीकार केलेला आहे. असे असतानादेखील ब्रिटिश मापन पद्धतीची सविस्तर चर्चा, त्या परिमाणांवरील उदाहरणे, पाठ्यक्रम, पाठ्यपुस्तके, व परीक्षा पत्रिकांमध्ये आजही आहेत.

जी मापनपद्धती व्यवहारात व उच्च शिक्षणात आणि संशोधनात कधीही उपयोगी पडणार नाही, तिला पाठ्यपुस्तकांत जरूरीपेक्षा जास्त स्थान देणे अशैक्षणिक व अशास्त्रीय तर आहेच पण बेकायदेशीरही आहे. ह्या गुन्ह्याची दखल घेतली गेली पाहिजे. अभ्यासक्रमातील संदिग्धता हे या सर्वांचे मूळ कारण आहे.

कोणत्याही स्तरावरील एखाद्या वर्गाचा पाठ्यक्रम तयार करताना मागील व पुढील स्तरावर त्या विषयाचा झालेला अथवा होणारा अभ्यास, तसेच अन्य विषयांमध्ये येणारा संबंधित भाग याची माहिती मिळविण्याचे कष्ट तरी कमीत कमी घेतले जावेत अशी अपेक्षा असते. पण असे घडत नाही. शिवाय विविध स्तरांवरील अभ्यासक्रम निर्मितीच्या यंत्रणा भिन्न असल्याने अशा गोंधळात भर पडते. याचा परिणाम म्हणून, जे शैक्षणिक विनोद होतात त्यापैकी एक म्हणजे बारावीचे विद्यार्थी हवामान भूगोलाचा अभ्यास करण्यासाठी नववीची पाठ्यपुस्तके वापरतात.

उच्च स्तरावरील अभ्यासक्रमांच्या विश्लेषणाच्या हेतूने सर्व स्तरांवरील अभ्यासक्रम तपासून पाहत असताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, ती म्हणजे, जितका शिक्षणाचा स्तर उच्च तितका अभ्यासक्रमांचा दर्जा खालावलेला. प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रम तयार करणाऱ्या आपल्या सहकाऱ्यांनी वापरलेली पद्धती व विचार कोणता हे तरी उच्च स्तरावर कार्य करणाऱ्या ज्येष्ठ प्राध्यापकांनी पहायला नको होते का? अभ्यासक्रमाच्या मूलभूत घटकांची जाण व जाणीव वरच्या स्तरावर कमीच दिसते.

अभ्यासक्रमाचे जे चार घटक पूर्वी सांगितले त्यांपैकी पहिला घटक हा 'सामाजिक प्रेरणा व दबाव' हा आहे. आपल्या शिक्षणपद्धतीवर कार्य करणाऱ्या दबावांची यादी मोठी आहे :
१) निसर्गावरील मानवी अतिक्रमण, २) ऊर्जेची समस्या, ३) ढासळतीं जीवनमूल्ये, ४) ग्रामीण व शहरी जीवनातील तफावत, ५) शहराकडील वाढता ओघ, ६) सामाजिक न्याय आणि समानता, ८) धर्म व जातीतील वाढते तणाव, ९) वाढती गुन्हेगारीची प्रवृत्ती, १०) उद्योगशीलतेंचा अभाव, आणि ११) वाढती बेकारी.

या व अन्य दबावाखाली आपली शिक्षणपद्धती कार्य करीत आहे. शिक्षण ही सामाजिक प्रक्रिया असून ती समाजामध्ये घडत असल्याने या दबावांची दखल अभ्यासक्रम नियोजकांना घ्यावीच लागते. हे प्रश्न तसे जीवनस्पर्शी आहेत.

उदाहरणादाखल निसर्गावरील अतिक्रमण व ऊर्जेची समस्या घेता येईल. हे प्रश्न मानवी अस्तित्वाशीच संबंधित आहेत. 'जगा आणि जगू द्या' या शिकवणीपलिकडे जाऊन, 'नव्या पिढींना जगू द्या' हा विचार आतापासून सर्व स्तरांवर सर्व शाखांतील विद्यार्थ्यांवर बिंबवला पाहिजे. उच्चस्तरावरील विद्यार्थ्यांनी या समस्या सोडविण्यासाठी क्रियाशील सहभाग घ्यावा अशीच अपेक्षा करायला हवी.

बेकारी हा विविध बाजू असलेला असाच एक सामाजिक प्रश्न आहे. 'शिक्षण घेणारी पहिली पिढी' अशा सदरातील विद्यार्थी भराभर शिक्षण घेऊन बाहेर पडत असताना आपली व्यावसायिक क्षेत्रे त्यांना सामावून घेण्यास अयशस्वी ठरत आहेत. ही नव्याने शिक्षण घेणारी पिढी शिक्षणाकडे उपजीविकेचे साधन म्हणून पाहते. शिक्षणामुळे त्यांच्या योगक्षेमाची व्यवस्था झाली नाही तर त्यांच्या पदरी घोर निराशा येईल. 'व्यावसायिक शिक्षण' हे यासाठी आपल्या शिक्षणाचा अंगभूत भाग म्हणून समाविष्ट केले गेले पाहिजे. सामाजिक दबावाचा शिक्षणावर कसा परिणाम होतो हे यावरून स्पष्ट होण्यास हरकत नसावी.

अभ्यासक्रम नियोजनाचा दुसरा पायाभूत घटक 'मानवी विकासावस्था' हा आहे. ज्या वयोगटासाठी अभ्यासक्रम तयार करावयाचे असतात, त्या वयोगटाच्या विकासावस्थेची संपूर्ण जाण अभ्यासक्रम नियोजकांना असावी असे अभिप्रेत आहे. मानवाचा भावनिक, बौद्धिक, शारीरिक विकास हा टप्प्याटप्प्याने होत असतो. अर्भकावस्था, बाल्यावस्था व पौगंडाअवस्था असे ते टप्पे आहेत. उच्चस्तरावरील विद्यार्थी हा पौगंडावस्थेतील विद्यार्थी असतो. या वयोगटाची काही खास वैशिष्टचे असतात. त्यांच्या वर्तनामागे काही विशिष्ट प्रेरणा असतात. ते शारीरिक, बौद्धिक, भावनिक आणि नैतिक विकासाच्या एका विशिष्ट अवस्थेपर्यंत पोहोचलेले असतात. त्यानुसार समाज त्यांच्याकडून ज्या काही अपेक्षा करतो, त्यांना विकासात्मक नियुक्त कार्ये असे म्हणतात.

उच्च माध्यमिक व उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी वयोगटातच बुद्धिमत्तेची उच्चतम पातळी गाठली जाते. म्हणूनच उच्चशिक्षणाच्या अभ्यासक्रमाची व्याप्ती जितकी जास्त तितकी विद्यार्थ्यांच्या बौद्धिक उद्दीपनाची कक्षाही रुंदावली जाते. याच काळात नैतिक विकासही पूर्णत्वाला नेता येऊ शकतो. पौगंडावस्थेची विकासात्मक नियुक्त कार्ये तर अभ्यासक्रम नियोजनाला अत्यंत उपयुक्त ठरतात. ती अशी :

१) सोबत्याबरोबर नवे व अधिक परिपक्व संबंध प्रस्थापित करणे
२) स्त्री व पुरुष या नात्यातून सामाजिक भूमिका पार पाडणे
३) शरीर व बांधा यांचा परिणामकारक उपयोग करणे
४) पालक व प्रौढांवरील भावनिक परावलंबनापासून मुक्तता मिळविणे
५) आर्थिक स्वावलंबनाकडे वाटचाल करणे
६) योग्य व्यवसायाची निवड करून त्याची पूर्वतयारी करणे
७) वैवाहिक व कौटुंबिक जीवनाची पूर्व तयारी करणे
८) नागरी क्षमतेसाठी आवश्यक त्या बौद्धिक कौशल्यांचा व संकल्पनांचा विकास करणे
९) सामाजिक दृष्टचा जबाबदार वर्तनाची इच्छा बाळगणे
१०) वर्तनाला मार्गदर्शक अशा जीवनमूल्यांचा अंगिकार करणे

एरिकसन, आसूबेल, कोहलबर्ग, जीन पिआजे अशा मानसशास्त्रज्ञांनी आपल्या दीर्घकालीन संशोधनानंतर मानवी विकासावस्थेवर आता पुरेसा प्रकाश टाकला आहे. या ज्ञान भांडाराकडे पाठ फिरविणे म्हणजे अभ्यासक्रमाच्या अपयशाला निमंत्रण देण्यासारखेच नाही काय ?

अध्ययन प्रक्रियेचे स्वरूप या तिसऱ्या घटकाविषयी 'अध्ययन उपपत्ती' (Learning Theories) मार्गदर्शन करतात. उपलब्ध अध्ययन उपपत्तींचे कमीत कमी तीन गट पाडता येतील : १) चेतक-प्रतिसाद उपपत्ती, २) क्षेत्र उपपत्ती, व ३) सामाजिक अध्ययन उपपत्ती. विद्यार्थी नेमके कसे शिकतात याचे विवरण करणाऱ्या या उपपत्तींचे ज्ञान, अभ्यासक्रम नियोजन, मूल्यमापन करणाऱ्यांना आवश्यक आहे. उच्चशिक्षणातील ज्ञानाची विविधता पाहता जी उपपत्ती

एका ज्ञान प्रकाराला उपयुक्त ठरेल ती दुसऱ्या ज्ञान प्रकारासाठी उपयुक्त ठरेलच असे नाही. विविध उपपत्तींनुसार होणाऱ्या अध्ययनांस चालना देणे हे अभ्यासक्रमाचे एक महत्त्वाचे कार्य आहे.

अध्ययनासंबंधित काही जुन्या संकल्पनाही आता कालबाह्य ठरू लागल्या आहेत. पुनरावृत्ती व सराव याला पूर्वी फार मोठे स्थान अध्ययनात होते. डॉ. रॉबर्ट गॅग्ने, पुनरावृत्तीस अध्ययनात फारसे स्थान देण्यास तयार नाहीत. शिवाय अध्ययनासाठी काही आवश्यक परिपक्वता असेल तरच ते होते हेही ते मान्य करत नाहीत.

विद्यार्थ्याला एखादी गोष्ट शिकायची असेल आणि त्यासाठीची पूर्वावश्यक कौशल्ये त्याच्याकडे असतील तर तो निश्चित ती शिकू शकतो. म्हणजे 'पूर्वावश्यक कौशल्ये' हीच अध्ययनाची मूल-भूत अट आहे.

अभ्यासक्रमांची मांडणी पूर्वावश्यक कौशल्यांच्या श्रेणीयुक्त रचनेनुसार केल्यास अध्ययनाची शंभर टक्के खात्री देता येईल, व कोणतेच अध्ययन कोणासही असाध्य राहणार नाही.

ज्ञानाचे स्वरूप हा अभ्यासक्रम नियोजनाचा चौथा घटक आहे. विद्यार्थ्यांना कोणत्या प्रकारचे ज्ञान देणे योग्य, हा प्रश्न ज्ञानाच्या स्वरूपाशी निगडित आहे. तसा हा एक चिरंतन प्रश्न आहे. विद्यार्थ्यांना वास्तव घटनांचे ज्ञान द्यायचे की ज्ञानसाधनेची प्रक्रिया शिकवायची ? 'प्रोसेस ऑफ एज्यूकेशन' नंतर या विषयावरील चर्चेला नव्याने चालना मिळाली.

वास्तव घटनांचे ज्ञान देण्यापेक्षा प्रत्येक ज्ञानशाखेतील महत्वाची तत्त्वे, सामान्यीकरणे, विद्या-र्थ्यांना 'डिसकव्हरी लर्निंग' पद्धतीने शिकवावीत असा डॉ. जेरोम ब्रुनर यांचा आग्रह आहे. डॉ. आसुबेल दुसरी बाजू घेतात. त्यांच्या म्हणण्यानुसार विविध ज्ञानशाखेतील ज्ञान देणे हे देखील शिक्षणाचे प्रमुख ध्येय होऊ शकेल. मात्र यासाठी योग्य विषय मांडणी करणे आवश्यक आहे. विषय मांडणीस मार्गदर्शक म्हणून 'अॅडव्हान्स ऑर्गनायझर' ची कल्पना ते मांडतात.

काही मानसशास्त्रज्ञ ज्ञानाच्या संरचनेपेक्षा व्यक्तींच्या ज्ञानविषयक गरजांना महत्व देतात. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या गरजेनुसार व त्याच्या समस्या सोडविण्यासाठी जे ज्ञान हवे ते पुरविण्याची सोय अभ्यासक्रमात हवी. म्हणजे 'आंतरज्ञान-शाखीय उपागमाचा' उपयोग करावा लागेल. ज्ञानाच्या कक्षा प्रचंड वेगाने विस्तारत असताना या मतांचा विचार केल्याशिवाय पुढे जाता येणार नाही.

या विविध बाजूंचा योग्य समतोल, आदर्श अभ्यासक्रमामध्ये साधलेला असतो. अशा अभ्यास-क्रमांमध्ये सुस्पष्टता असते. त्याची उद्दिष्टे नेमक्या व विद्यार्थ्यांच्या वर्तन-बदलांच्या परिभाषेत असतात. विद्यार्थ्यांतील व्यक्तिभेद, अध्ययन उपपत्ती, अध्ययन शैली, यांचा समग्र विचार करून शिक्षकानी कोणत्या अध्यापन प्रतिकृतींचा वापर करावा याचे मार्गदर्शन अभ्यासक्रमात केलेले असते. असे अभ्यासक्रम आज तरी एक कल्पनारम्य गोष्ट म्हणून फार तर मान्य केले जातील. म्हणूनच प्रत्यक्षात या आदर्शाप्रत जाण्याची वाट फार बिकट आहे. आपण सध्या कुठे आहोत हे समजले तरी आतापुरते पुरेसे आहे.

ज्या बारा निकष-प्रश्नांच्या सहाय्याने आपण अभ्यासक्रमाचे विश्लेषण करतो, त्यापैकी पहिले पाच प्रश्न अभ्यासक्रमांच्या उद्दिष्टांविषयीचे आहेत. उच्च माध्यमिक अभ्यासक्रमात उद्दिष्टे दिलेली आढळतात, पण त्यात नेमकेपणा नाही. ही उद्दिष्टे साध्य करण्याबद्दलचे स्पष्ट मार्गदर्शन नाही. म्हणजे जुन्या पद्धतीने लिहिलेल्या अभ्यासक्रमाला उद्दिष्टांचे ठिगळ जोडण्यापलिकडे उच्च-माध्यमिक अभ्यासक्रमात कोणतीच नाविन्यता नाही. मुळातच उच्च माध्यमिक शिक्षणाची अंमल-बजावणी करताना महाराष्ट्रात या स्तराचा पुरता विचका करण्यात आला आहे. या त्रिशंकू अव-

बेकारी हा विविध बाजू असलेला असाच एक सामाजिक प्रश्न आहे. 'शिक्षण घेणारी पहिली पिढी' अशा सदरातील विद्यार्थी भराभर शिक्षण घेऊन बाहेर पडत असताना आपली व्यावसायिक क्षेत्रे त्यांना सामावून घेण्यास अयशस्वी ठरत आहेत. ही नव्याने शिक्षण घेणारी पिढी शिक्षणाकडे उपजीविकेचे साधन म्हणून पाहते. शिक्षणामुळे त्यांच्या योगक्षेमाची व्यवस्था झाली नाही तर त्यांच्या पदरी घोर निराशा येईल. 'व्यावसायिक शिक्षण' हे यासाठी आपल्या शिक्षणाचा अंगभूत भाग म्हणून समाविष्ट केले गेले पाहिजे. सामाजिक दबावाचा शिक्षणावर कसा परिणाम होतो हे यावरून स्पष्ट होण्यास हरकत नसावी.

अभ्यासक्रम नियोजनाचा दुसरा पायाभूत घटक 'मानवी विकासावस्था' हा आहे. ज्या वयोगटासाठी अभ्यासक्रम तयार करावयाचे असतात, त्या वयोगटाच्या विकासावस्थेची संपूर्ण जाण अभ्यासक्रम नियोजकांना असावी असे अभिप्रेत आहे. मानवाचा भावनिक, बौद्धिक, शारीरिक विकास हा टप्प्याटप्प्याने होत असतो. अर्भकावस्था, बाल्यावस्था व पौगंडाअवस्था असे ते टप्पे आहेत. उच्चस्तरावरील विद्यार्थी हा पौगंडावस्थेतील विद्यार्थी असतो. या वयोगटाची काही खास वैशिष्टचे असतात. त्यांच्या वर्तनामागे काही विशिष्ट प्रेरणा असतात. ते शारीरिक, बौद्धिक, भावनिक आणि नैतिक विकासाच्या एका विशिष्ट अवस्थेपर्यंत पोहोचलेले असतात. त्यानुसार समाज त्यांच्याकडून ज्या काही अपेक्षा करतो, त्यांना विकासात्मक नियुक्त कार्ये असे म्हणतात.

उच्च माध्यमिक व उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी वयोगटातच बुद्धिमत्तेची उच्चतम पातळी गाठली जाते. म्हणूनच उच्चशिक्षणाच्या अभ्यासक्रमाची व्याप्ती जितकी जास्त तितकी विद्यार्थ्यांच्या बौद्धिक उद्दीपनाची कक्षाही रुंदावली जाते. याच काळात नैतिक विकासही पूर्णत्वाला नेता येऊ शकतो. पौगंडावस्थेची विकासात्मक नियुक्त कार्ये तर अभ्यासक्रम नियोजनाला अत्यंत उपयुक्त ठरतात. ती अशी :

१) सोबत्याबरोबर नवे व अधिक परिपक्व संबंध प्रस्थापित करणे
२) स्त्री व पुरुष या नात्यातून सामाजिक भूमिका पार पाडणे
३) शरीर व बांधा यांचा परिणामकारक उपयोग करणे
४) पालक व प्रौढांवरील भावनिक परावलंबनापासून मुक्तता मिळविणे
५) आर्थिक स्वावलंबनाकडे वाटचाल करणे
६) योग्य व्यवसायाची निवड करून त्याची पूर्वतयारी करणे
७) वैवाहिक व कौटुंबिक जीवनाची पूर्व तयारी करणे
८) नागरी क्षमतेसाठी आवश्यक त्या बौद्धिक कौशल्यांचा व संकल्पनांचा विकास करणे
९) सामाजिक दृष्टचा जबाबदार वर्तनाची इच्छा बाळगणे
१०) वर्तनाला मार्गदर्शक अशा जीवनमूल्यांचा अंगिकार करणे

एरिकसन, आसूबेल, कोहलबर्ग, जीन पिआजे अशा मानसशास्त्रज्ञांनी आपल्या दीर्घकालीन संशोधनानंतर मानवी विकासावस्थेवर आता पुरेसा प्रकाश टाकला आहे. या ज्ञान भांडाराकडे पाठ फिरविणे म्हणजे अभ्यासक्रमाच्या अपयशाला निमंत्रण देण्यासारखेच नाही काय ?

अध्ययन प्रक्रियेचे स्वरूप या तिसऱ्या घटकाविषयी 'अध्ययन उपपत्ती' (Learning Theories) मार्गदर्शन करतात. उपलब्ध अध्ययन उपपत्तींचे कमीत कमी तीन गट पाडता येतील : १) चेतक-प्रतिसाद उपपत्ती, २) क्षेत्र उपपत्ती, व ३) सामाजिक अध्ययन उपपत्ती. विद्यार्थी नेमके कसे शिकतात याचे विवरण करणाऱ्या या उपपत्तींचे ज्ञान, अभ्यासक्रम नियोजन, मूल्यमापन करणाऱ्यांना आवश्यक आहे. उच्चशिक्षणातील ज्ञानाची विविधता पाहता जी उपपत्ती

एका ज्ञान प्रकाराला उपयुक्त ठरेल ती दुसऱ्या ज्ञान प्रकारासाठी उपयुक्त ठरेलच असे नाही. विविध उपपत्तींनुसार होणाऱ्या अध्ययनांस चालना देणे हे अभ्यासक्रमाचे एक महत्त्वाचे कार्य आहे.

अध्ययनासंबंधित काही जुन्या संकल्पनाही आता कालबाह्य ठरू लागल्या आहेत. पुनरावृत्ती व सराव याला पूर्वी फार मोठे स्थान अध्ययनात होते. डॉ. रॉबर्ट गॅग्ने, पुनरावृत्तीस अध्ययनात फारसे स्थान देण्यास तयार नाहीत. शिवाय अध्ययनासाठी काही आवश्यक परिपक्वता असेल तरच ते होते हेही ते मान्य करत नाहीत.

विद्यार्थ्याला एखादी गोष्ट शिकायची असेल आणि त्यासाठीची पूर्वावश्यक कौशल्ये त्याच्याकडे असतील तर तो निश्चित ती शिकू शकतो. म्हणजे 'पूर्वावश्यक कौशल्ये' हीच अध्ययनाची मूलभूत अट आहे.

अभ्यासक्रमांची मांडणी पूर्वावश्यक कौशल्यांच्या श्रेणीयुक्त रचनेनुसार केल्यास अध्ययनाची शंभर टक्के खात्री देता येईल, व कोणतेच अध्ययन कोणासही असाध्य राहणार नाही.

ज्ञानाचे स्वरूप हा अभ्यासक्रम नियोजनाचा चौथा घटक आहे. विद्यार्थ्यांना कोणत्या प्रकारचे ज्ञान देणे योग्य, हा प्रश्न ज्ञानाच्या स्वरूपाशी निगडित आहे. तसा हा एक चिरंतन प्रश्न आहे. विद्यार्थ्यांना वास्तव घटनांचे ज्ञान द्यायचे की ज्ञानसाधनेची प्रक्रिया शिकवायची ? 'प्रोसेस ऑफ एज्यूकेशन' नंतर या विषयावरील चर्चेला नव्याने चालना मिळाली.

वास्तव घटनांचे ज्ञान देण्यापेक्षा प्रत्येक ज्ञानशाखेतील महत्वाची तत्त्वे, सामान्यीकरणे, विद्यार्थ्यांना 'डिसकव्हरी लर्निंग' पद्धतीने शिकवावीत असा डॉ. जेरोम ब्रुनर यांचा आग्रह आहे. डॉ. आसुबेल दुसरी बाजू घेतात. त्यांच्या म्हणण्यानुसार विविध ज्ञानशाखेतील ज्ञान देणे हे देखील शिक्षणाचे प्रमुख ध्येय होऊ शकेल. मात्र यासाठी योग्य विषय मांडणी करणे आवश्यक आहे. विषय मांडणीस मार्गदर्शक म्हणून 'अॅडव्हान्स ऑर्गनायझर' ची कल्पना ते मांडतात.

काही मानसशास्त्रज्ञ ज्ञानाच्या संरचनेपेक्षा व्यक्तींच्या ज्ञानविषयक गरजांना महत्व देतात. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या गरजेनुसार व त्याच्या समस्या सोडविण्यासाठी जे ज्ञान हवे ते पुरविण्याची सोय अभ्यासक्रमात हवी. म्हणजे 'आंतरज्ञान-शाखीय उपागमाचा' उपयोग करावा लागेल. ज्ञानाच्या कक्षा प्रचंड वेगाने विस्तारत असताना या मतांचा विचार केल्याशिवाय पुढे जाता येणार नाही.

या विविध बाजूंचा योग्य समतोल, आदर्श अभ्यासक्रमामध्ये साधलेला असतो. अशा अभ्यासक्रमांमध्ये सुस्पष्टता असते. त्याची उद्दिष्टे नेमक्या व विद्यार्थ्यांच्या वर्तन-बदलांच्या परिभाषेत असतात. विद्यार्थ्यांतील व्यक्तिभेद, अध्ययन उपपत्ती, अध्ययन शैली, यांचा समग्र विचार करून शिक्षकानी कोणत्या अध्यापन प्रतिकृतींचा वापर करावा याचे मार्गदर्शन अभ्यासक्रमात केलेले असते. असे अभ्यासक्रम आज तरी एक कल्पनारम्य गोष्ट म्हणून फार तर मान्य केले जातील. म्हणूनच प्रत्यक्षात या आदर्शाप्रत जाण्याची वाट फार बिकट आहे. आपण सध्या कुठे आहोत हे समजले तरी आतापुरते पुरेसे आहे.

ज्या बारा निकष-प्रश्नांच्या सहाय्याने आपण अभ्यासक्रमाचे विश्लेषण करतो, त्यापैकी पहिले पाच प्रश्न अभ्यासक्रमांच्या उद्दिष्टांविषयीचे आहेत. उच्च माध्यमिक अभ्यासक्रमात उद्दिष्टे दिलेली आढळतात, पण त्यात नेमकेपणा नाही. ही उद्दिष्टे साध्य करण्याबद्दलचे स्पष्ट मार्गदर्शन नाही. म्हणजे जुन्या पद्धतीने लिहिलेल्या अभ्यासक्रमाला उद्दिष्टांचे ठिगळ जोडण्यापलिकडे उच्च-माध्यमिक अभ्यासक्रमात कोणतीच नाविन्यता नाही. मुळातच उच्च माध्यमिक शिक्षणाची अंमलबजावणी करताना महाराष्ट्रात या स्तराचा पुरता विचका करण्यात आला आहे. या त्रिशंकू अव-

स्थेत या स्तरावरील शिक्षणाचे नेमके उद्दिष्ट काय हेच समजेनासे झाले आहे. कोठारी आयोगाने सुचवलेली + २ ची कल्पना, व प्रत्यक्षात आलेली + २ ची अवस्था यात जमीन अस्मानाचा फरक आहे. विद्यार्थ्यातील व्यक्तिभेद, विकासावस्था, व सामाजिक गरजा यांची जाण ठेवून + २ ची कार्यवाही झाली असती तर आजचे चित्र बरेच पालटले असते.

उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची परिस्थिती त्याहूनही वाईट आहे. उच्चशिक्षणाच्या कोणत्याच पाठ्यक्रमाच्या सुरवातीस उद्दिष्टे दिलेली नसल्याने पहिले पाच निकष लावून पाहण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. विकासावस्था, विकासात्मक नियुक्त कार्ये, अध्ययन उपपत्ती, ज्ञानाची संरचना व आंतर-ज्ञानशाखीय उपागम हे सर्व, पाठ्यक्रम करणाऱ्यांच्या ज्ञान व आवाक्या पलिकडचे आहे.

विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमांमध्ये विषय निवडीशिवाय अन्य कोणतेच स्वातंत्र्य नाही. पाठ्यवस्तूतील ज्ञानाची आधुनिकता वाढलेली दिसते. (उदाहरणार्थ विज्ञानातील सॅटेलाइटचे ज्ञान. प्राणिशास्त्रातील पेशीशास्त्र, इ.) रसायनशास्त्राने प्रदूषणासारख्या आधुनिक समस्येची दखल घेतलेली आहे. तसेच 'औद्योगिक रसायनशास्त्र' या विषयाचा समावेश करून उपयुक्तता वाढविण्याचा एक प्रयत्न दिसतो.

परंतु हे आधुनिक किंवा उपयुक्त ज्ञान आकलनाच्या पातळीपर्यंत नेण्यात काहीच अर्थ नाही. तसे ते माध्यमिक शिक्षणामध्येही देता येईल. समस्यांचे स्वरूप, सोडविण्याचे उपाय, त्या उपायांची योग्यायोग्यता, त्या अनुषंगाने योग्य संशोधनाचा अनभव व औद्योगिक क्षेत्रात प्रत्यक्ष जाऊन कार्य करण्याची संधी या सर्वांचा समावेश अभ्यासक्रमातच हवा.

ज्ञानाची आधुनिकता, सत्याचा वेध, जीवनातील विविध क्षेत्रातील नेतृत्व, योग्य रूचि, वृत्ती, नैतिक–बौद्धिकमूल्यांची जोपासना आणि सामाजिक समस्या सोडविण्यासाठी कार्यक्षम मानवसंपदा निर्माण करणे, अशी उच्च शिक्षणाची ध्येये कोठारी आयोगाने सांगितली आहेत. या उद्दिष्टांची जाण व अवधान अभ्यासक्रम नियोजकांना आहे की नाहीं हेच तपासून पहावे लागेल.

असे हे निराशाजनक चित्र आहे. अकरावी ते बी. अेस्सी. भाग ३ पर्यंतचे विज्ञान, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र, भूगोल व गणित या विषयांचे पाठ्यक्रम तपासून पाहताना विद्यार्थ्यांतील बदलापेक्षा विषयज्ञानालाच प्राधान्य दिलेले दिसते. ज्ञानाचे हे प्रचंड ओझे शिरावरून वाहून नेल्याने विद्यार्थ्यात आपोआपच बदल होतील असे गृहित धरले आहे. परंतु हे 'शिरावरील ओझे' विद्यार्थ्यांपुढे केवळ समस्याच निर्माण करणार आहे.

### भाग ३

एका अत्यंत सुरक्षित पोकळीतून एका अमर्याद अवाढव्य विश्वामध्ये, एक सचेतन मांसाचा गोळा म्हणून आपण प्रवेश करतो. या मांसाच्या गोळ्याला आपल्या स्वतःची, स्वतःच्या अवयवांची, 'मी' पणाची, जाणीव नसते. मग आजूबाजूच्या अगम्य विश्वाची व त्या विश्वातील त्याच्यावर कार्य करणाऱ्या अनेक घटकांची काय कल्पना असणार ? पण त्या सचेतन गोळ्यामध्ये जिज्ञासा असते. 'अध्ययन' ही त्याची वृत्ती तर असतेच पण त्यापेक्षा ती त्याची एक मूलभूत गरज असते, व शिकण्यासाठी आवश्यक ती साधनसामग्री त्याच्याजवळ असते. त्यामुळेच ते मूल रांगायला, चालायला, बोलायला शिकते, आणि त्याद्वारे विश्वासंबंधीच्या अनेक संकल्पनाही शिकते. अशा या मुलाची एका 'कारखान्यामध्ये' आपण 'कच्चामाल' म्हणून रवानगी करतो.

त्या उद्योगाचे नाव आहे 'शिक्षण उद्योग.' तेथे त्याच्यावर क्रिया प्रक्रियेला सुरूवात होते. ही प्रक्रिया सतरा वर्षे चालू असते. यापेक्षा कमी कालावधीत इतर उद्योग दर्जेदार उत्पादने निर्माण करू

शकतात. शिक्षण उद्योगाच्या उत्पादनाचा दर्जा त्यामानाने निश्चितच वरचा असायला हवा, विद्यार्थ्यात शिक्षणामुळे जे बदल व्हावेत असे आपण मानतो त्यांना शिक्षणाची उद्दिष्टे म्हणतो आणि विद्यार्थ्यावर केल्या जाणाऱ्या प्रक्रिया व त्यांचा आराखडा याला आपण अभ्यासक्रम असे म्हणतो.

शिक्षणाकडे या दृष्टीकोनातून पाहिल्यास या प्रदीर्घ प्रक्रियेनंतरही जर विशिष्ट दर्जा किंवा गुणवत्ता विद्यार्थ्यात निर्माण होत नसेल तर त्यात दोष कोणाचा ?

समाज व विद्यार्थ्यांकडे बोट दाखवून आपल्याला काही प्रमाणात ही जबाबदारी टाळता येईल. तथापि पाठ्यक्रम, शैक्षणिक सुविधा, शिक्षण प्रक्रिया व प्राध्यापक या, अभ्यासक्रमांशी संबंधित घटकांवर याची बहुतांशी जिम्मेदारी पडते हे आपणास मान्य करावेच लागेल. आणि म्हणून आमच्या शाळा-महाविद्यालयांतून कशाप्रकारे शिक्षण दिले जाते, कोणत्या सुविधा आहेत, कोणत्या अध्यापन पद्धती व अध्ययन अनुभव यांचा उपयोग केला जातो, हे सर्व तपासून पहावे लागेल. पण हे करण्यापूर्वी उच्चमाध्यमिक मंडळे व विद्यापीठांनी तयार केलेले पाठ्यक्रम तपासून पाहण्याचा मी आग्रह धरीन. जितके हे पाठ्यक्रम निसंदिग्ध असतील, शिक्षणाची उद्दिष्टे, पाठ्यवस्तू, अध्यापन पद्धती, अध्ययन अनुभूती व मूल्यमापन तंत्र, या घटकांबाबत ते जितके सुस्पष्टपणे मार्गदर्शन करतील तितकी शिक्षणसंस्थांतील प्रक्रियेची परिणामकारकता वाढण्याची शक्यता जास्त असते. सुस्पष्ट पाठ्यक्रम ही परिणामकारक शिक्षणाची, पुरेशी नसली तरी आवश्यक अट आहे. जोपर्यंत विद्यापीठ व शिक्षण मंडळे ही जबाबदारी पूर्ण करत नाहीत तोपर्यंत प्राध्यापक व शिक्षण संस्थाना दोषी ठरविण्याचा नैतिक अधिकार कोणालाच प्राप्त होत नाही. 'आडातच नसताना पोहऱ्याच्या गळकेपणाकडे बोट दाखविणे' हास्यास्पद आहे.

आपले आजचे पाठ्यक्रम हेते कसे नसावेत' यांचे उत्कृष्ट नमुने आहेत. पाठ्यक्रमाच्या सुरूवातीस पाठ्यक्रमाची उद्दिष्टे मांडावी लागतात हे प्राथमिक तत्त्व ज्ञात नसलेल्यांना, कोठारी आयोगाला अभिप्रेत असलेली उच्च शिक्षणाची उद्दिष्टे ज्ञात असावीत असे मानणे वेडेपणाचे ठरेल. पाठ्यक्रम तयार करताना पाठ्यवस्तू व संदर्भ ग्रंथांची यादी निश्चित करावयाची असते एवढीच समजूत असलेली ही मंडळी उच्च शिक्षणाची उद्दिष्टे ठरविण्यापासूनची सर्व जबाबदारी प्राध्यापकांवर सोपवून रिकामी होतात. म्हणूनच अभ्यासक्रमाच्या विश्लेषणाचे कार्य क्लिष्ट होऊन बसते. अशा वेळी पदव्युत्तर शिक्षणापर्यन्तचा प्रदीर्घ शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून कोठारी आयोगाने निश्चित केलेली उद्दिष्टे अपेक्षिण्यापेक्षा, काही कमीत कमी, मात्र आवश्यक, असे वर्तनबदल अपेक्षित करणे योग्य ठरेल. हे कमीत कमी बदल निश्चित करणे देखील अवघड आहे. सर्वमान्य होईल या दृष्टीने आपण असे म्हणू शकू की लोकशाही, निधर्मी व समाजवादी समाजरचनेतील स्वयंपूर्ण घटक म्हणून ज्या बौद्धिक क्षमता, कौशल्ये व पात्रता आवश्यक आहेत त्या, आपल्या विद्यार्थ्यांमध्ये अत्यावश्यक म्हणून विकसित केल्या जाव्यात. हे वर्तन बदल जर शिक्षणामुळे होऊ शकत नसतील तर, येणारी प्रत्येक नवी परिस्थिती ही विद्यार्थ्यांपुढील एक समस्या ठरणार आहे.

लोकशाही ही जीवनमार्ग म्हणून आपण स्वीकारावी असा उद्घोष करताना आपले आजचे अभ्यासक्रम व्यक्तिविकासाच्या दृष्टीने कितीसे व्यक्तिस्वातंत्र्य देतात ? विद्यार्थ्यांच्या आवडी निवडी, रूची, गरजा यांची दखल आजचे आपले अभ्यासक्रम घेताना दिसत नाहीत. सर्वार्थाने भिन्न स्तरांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणक्रमाची निवड करण्यापलीकडे किंवा फार तर वैकल्पिक विषयांची निवड करण्यापलीकडे कोणतेच स्वातंत्र्य नसते. एकच एक जड अभ्यासक्रम सर्वांना स्वीकारावा लागल्याने विद्यार्थ्यांपुढे निश्चितच काही समस्या निर्माण होतात. समायोजना-

तील अडचणी, न्यूनतेची व वैफल्याची भावना, प्रेरणेचा अभाव, शिक्षणाविषयीचा तिटकारा, रूची-आवडींचा अपुरा विकास किंवा खच्चीकरण, अशा या समस्यांना अल्पकालीन समस्या म्हणता येईल. याशिवाय ज्या समस्या, कमीत कमी पात्रता, क्षमता व कौशल्ये यांच्या अभावामुळे त्यांच्यापुढे उभ्या राहत असतील, त्या कायम स्वरूपाच्या म्हणून दीर्घकालीन असतील व त्यांकडे अधिक गांभिर्याने पहावे लागेल. हे अत्यावश्यक कमीत कमी बदल नेमक्या शब्दांत कसे मांडता येतील ? उदाहणादाखल काही खाली मांडले आहेत :

१) उपजीविकेसाठी म्हणून एखादा व्यवसाय किंवा नोकरीसाठी आवश्यक असणारे ज्ञान वा कौशल्यें विद्यार्थी आत्मसात करतो.

२) समस्येच्या काळात, कमीत कमी तणाव निर्माण करणारा व फायदेशीर असा निर्णय विद्यार्थी घेतो.

३) कोणतीही निवड विद्यार्थी सकारण करतो.

४) धर्म, भाषा व जात ही अभिमानास्पद निवड नसून केवळ एक वारसा आहे, व तो आपल्या इच्छेचा विचार न होता आपल्याकडे आलेला असतो हे तत्त्व विद्यार्थी मान्य करतो.

५) धर्म व जात या वैयक्तिक गोष्टी असून दुसऱ्या व्यक्तिशी वागताना त्यांच्या प्रभावाखाली विद्यार्थी वावरत नाही.

६) साध्य व साधन एकमेकाला छेदून जाणार नाही अशा रीतीने विद्यार्थी त्यांची निवड करतो.

७) समस्येचे कारण ज्ञात झाले असता ते दूर करण्याचा प्रयत्न विद्यार्थी करतो.

असे नेमक्या स्वरूपाचे काही बदल शिक्षणाने विद्यार्थ्यात होतात का हे पडताळून पहायचे असेल तर, आपल्याला विद्यार्थ्यांकडे वळायला हवे. हे जे विद्यार्थी आहेत त्यांचे नुकतेच पदव्युत्तर शिक्षण पूर्ण झालेले आहे. काहींनी अध्यापक म्हणून थोडी उमेदवारी केलेली आहे. शिक्षक-प्रशिक्षणासाठी आलेले हे विद्यार्थी तसे सर्व स्तरांतील आहेत.

१. आनंद सुतार : भूगोल घेऊन एम. ए., डिप्लोमा इन हायर एज्युकेशन (डी. एच्. इ.) चा शिक्षणक्रम पूर्ण झाल्यावर मी त्याला विचारले.

"आता पुढचं काय ठरविलंस ?"

"नोकरीचा शोध. कॉलेजमध्ये नोकरी मिळावी म्हणून तर डी. एच्. इ. केलं सर."

"प्राध्यापकाची नोकरी हा एक प्रयत्न झाला. पण अन्यत्रही प्रयत्न करायला हरकत नाही."

"इतरत्र आम्हाला कुठं चान्सच मिळत नाहीत सर."

"का ? भूगोल तसा उपयुक्त विषय आहे. तुम्हाला इतर क्षेत्रात पण संधी मिळायला हवी. हवामान भूगोल, प्राकृतिक भूगोल, मानवी भूगोल, असे खूप विषय शिकता. हे ज्ञान कोठेच उपयुक्त नाही का ?"

"सगळं अर्धवट आहे सर. आम्ही धड आर्टस्चे नाही; ना धड सायन्सचे. आमचा दोन्हीकडेही उपयोग नाही."

"तर मग यात काही तरी बदल व्हायला पाहिजे असे नाही का वाटत ?"

"कोण करणार ? आमचा तरी पुरता खेळखंडोबा झाला इतकंच खरं आहे आज."

२ सुहासिनी : पदव्यूत्तर शिक्षण पूर्ण झालंय. डी. एच. इ. परीक्षेपूर्वी आठ दिवस आधी येते आणि म्हणते :

"सर, मला परीक्षेला बसायचं नाही. मला आत्मविश्वास वाटत नाही."

"अं ? तुम्हीच असं काही म्हणू लागलात तर इतरांचं काय ? आतापर्यंत सर्वात रेग्युलर तुम्हीच होता. तुमचं वाचनही खूप झालंय. नोटस् पूर्ण आहेत. म्हणजे जवळ जवळ सगळाच अभ्यास झालाय्."

"नाही सर. पण आता भिती वाटते. काही म्हणजे काही आठवत नाही. शिवाय घरच्यानांही माझ्या शिकण्यात इंटरेस्ट नाही. त्यांना फक्त त्यांच्या जबाबदारीतून मुक्त व्हायचं आहे."

"कबूल आहे. पण तुमच्या परीक्षेचा प्रश्न फार तर पंधरा दिवसांचा. तो पर्यंत इतर गोष्टी सहज बाजूला ठेवता येतील. म्हणजे तुमचा निर्णय त्या कारणापुरता तरी योग्य नाही."

"मला काहीच ठरविता येत नाही सर. खरं तर मला नीट निर्णयच घेता येत नाहीत."

३. गिरीश मेडीदार : भूगोलाचे विद्यार्थी. त्यांनी दिलेला शोध-निबंध वाचून पाहिल्यावर मी म्हणालो :

"तुम्ही तुमचा शोध-निबंध खूपच छान लिहिलात. इतरांच्या मानाने."

"थँक्यू सर. पण खरं सांगू. बी. अेड्ला हे सर्व झालेलंच होतं आमचं."

"म्हणजे तुम्ही बी. अेड् आहात ? ... मग तुम्ही तर हा कोर्स करण्याची काहीच गरज नव्हती. विद्यापीठानं जाहिरातीत तसा स्पष्ट उल्लेख केला होता ... ... म्हणजे हे वर्ष, श्रम, तसं वायाच गेलं तुमचं."

"हो सर मी जाहिरात नीट वाचली नव्हती. आणि इथं आल्यावरही फारशी चौकशी केली नव्हती."

४. गिरगोंडा चौगुले : डी. एच. इ. चा एक हुषार अभ्यासू विद्यार्थी. दोन-तीन महिन्यांच्या कालावधीनंतर माझ्याकडे आला आणि म्हणाला :

"सर, मी बहुतेक कोर्स सोडतोय. प्रोबेशनरी ऑफिसर म्हणून माझी बँकेत निवड झालीयं."

"कॉंग्रॅच्युलेशन्स् चौगुले ... ... पण तुमच्यासारखा एक चांगला विद्यार्थी हा कोर्स सोडून जातो याबद्दल गात्र मला वाईट वाटतं. शिवाय तुम्ही केमिस्ट्रीत अेम. अेस्सी. केलंय. डिस्टिंक्शनही मिळालंय. या ज्ञानाचा बँकेत तुम्हाला कितीसा उपयोग होईल ?"

"होय सर, मलाही तसंच वाटतं. पण हा आपल्या शिक्षणपद्धतीचाच दोष आहे. मला इचलकरंजीला स्मॉलस्केल इंडस्ट्री काढायची होती. पण तितका आत्मविश्वास वाटेल या दृष्टीने काहीच शिक्षण मला मिळालं नाही. माझा मित्र अेम. कॉम. आहे. पण बँकेच्या परीक्षेत तो नापास झाला."

"बरोबरच आहे ते. कॉमर्स ग्रॅज्यूएटपेक्षा सायन्स ग्रॅज्यूएट जास्त कार्यक्षम असतात, असं बँकेतल्या अधिकाऱ्यांचंही मत आहे."

"म्हणजे ही इन्कन्सिस्टन्सीच नाही का ?"

५. एस्.एस्. राजहंस : दलितांतील एक शिक्षक. अेम. अे. इंग्लिश नंतर बी. अेड. केलं, आणि अेम. अेड्. साठी प्रवेश घेतला. अभ्यासू वृत्ती असलेला जिद्दी माणूस. अजूनही पुढे

शिकण्याची तीव्र इच्छा आहे. दलितांच्या प्रश्नाबद्दल बोलताना मी म्हणालो :
" राजहंस, तुमच्यासारखी अभ्यासू वृत्ती, जिद्द, धडपड, दलितांतील फारच थोड्या विद्यार्थ्यांत दिसते. सवलती देऊनही ते त्याचा पुरेसा फायदा घेत नाहीत असं मला वाटतं. तुम्हाला काय वाटतं ? म्हणजे राजकारणाचा त्यातला भाग सोडून द्या. "

" थोडं फार बरोबर आहे ते. शिकण्याची प्रेरणा, जिद्द आणि संधी अशा तीनही गोष्टी असतील. दलित पुढे येऊ शकतील पण आम्हाला केवळ कायद्यानेच संधी मिळवून दिलेली आहे, समाजाने नाही.

अगदी सुशिक्षित नव्या पिढीच्या मनातूनही जातीयता गेलेली नाही. आमच्यावर अन्याय झाला, होतो आहे, हे या नवीन पिढीवर ठसविण्यात आपलं शिक्षण सफल झालं नाही असं वाटतं मला."

६. जगेश भोसले : एक तडफदार तरुण प्राध्यापक. अफाट वाचन. हिंदू एकता आंदोलनातील कार्यकर्ता. डी. अेच. इ. करत असताना त्याला अटक झाली. अटकेतून सुटून आल्यानंतरच्या चर्चेत तो म्हणाला :

" मी 'हिंदू एकता' चा कार्यकर्ता आहे याचा मला अभिमान वाटतो."

" हो, तसा तो वाटायलाच हवा." मी म्हणालो " तुम्ही सामाजिक कार्यात भाग घेता ही अभिमानाचीच गोष्ट आहे. विशेषत: 'वर्ण-जाती विसरू या' ही 'हिन्दू एकताची' विधायक बाजू आहे असं मला वाटतं. पण तुमचं आंदोलन उभं राहतंय ते द्वेषाच्या अंगाने. "

" ते, आंदोलन उभं करण्यासाठी स्वीकारलेलं एक साधन आहे. आम्ही विधायक कार्यावर भर देण्याचा प्रयत्न करतोय. '

" म्हणजे थोडासा वैचारिक गोंधळ आहेच. निदान तुमच्यासारख्या विचारी तरुणांनी हा गोंधळ कमी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जर विधायक अंगानं ही चळवळ उभी राहिली तर 'हिंदू एकताची' ती मोठी अॅचिव्हमेंट ठरेल.'

माझ्या विद्यार्थ्यांशी अनौपचारिकरित्या बोलत असतानाचे हे प्रसंग. ते जसे घडले तसे मी मांडले. या घटना खूप बोलक्या आहेत.

यांचे प्रश्न नेमके कोणते आहेत आणि त्यांचा कशाशी संबंध आहे ? एखादा चौगुले, एखादा राजहंस, मुळाशी जाऊन विचार करण्याचा प्रयत्न करतो. इतरांना समस्या जाणवतील पण त्याची कारणमीमांसा करण्याची क्षमता त्यांच्यात नाही. त्यांच्या विचारप्रक्रिया विकसित करण्याऐवजी आपण त्यांना झापडं बांधून त्यांच्या दृष्टीच्या कक्षा निरुंद तर केल्या नाहीत ना ? त्यांच्या विचार प्रक्रियेचे पद्धतशीर खच्चीकरण तर केले नाही ना ?

अभ्यासक्रमामध्ये विषयाला चुकीचे स्थान दिल्यामुळे आनंदा सुतारला बेकारीला सामोरे जावे लागते. सुहासिनीला योग्य निर्णय घेता येत नसल्यामुळे जीवनातल्या समस्येतून तिला मार्ग काढता येणार नाही. मेडीदार निवड करताना कोणताच विचार करत नाही, त्यामुळे त्याचे श्रम, वेळ, पैसा नेहमीच वाया जाणार आहेत. व्यवसायाच्या दृष्टीने उपयुक्त शिक्षण न मिळाल्याने चौगुलेला न आवडणारा व्यवसाय स्वीकारावा लागत आहे. शिक्षण हे सामाजिक विषमतेला हातभार लावते असा ते शिक्षण घेणाऱ्या श्री राजहंस या शिक्षकांचा आरोप आहे. अफाट वाचन करणारा जगेश भोसले, साध्य साधनाची गल्लत करतो. त्यामुळे अखेर त्याच्या हाती काहीच येणार नाही.

मी मुलाखती घेतलेल्या अन्य विद्यार्थ्यांपैकी ७५ टक्के विद्यार्थ्यांना आपण एखादा विषय का निवडला हे सकारण सांगता येत नाही. त्या विषयाच्या निवडीनंतर कोणकोणत्या व्यावसायिक संधी उपलब्ध आहेत हे त्यांना माहीत नसते. या चढाओढीच्या जीवनात तुमचे अस्तित्व टिकविण्यासाठी आजचे शिक्षण उपयुक्त आहे का असं विचारल्यावर ते शांत राहतात. उच्च शिक्षणाची नेमकी उद्दिष्टे काय असं विचारलं की ते अडखळतात. हे पाहिल्यावर जणु आपण त्यांचे विचार व व्यक्तिमत्वं खुरटवून टाकलेली आहेत की काय असं वाटू लागतं.

बार्बियाना (इटली) येथील शाळेतील १० ते १५ वयोगटातील मुलं, शिक्षणाबद्दल मूलगामी व स्वतंत्र विचार करून शिक्षकाला लिहिलेल्या पत्राद्वारे (Letter to a teacher) संपूर्ण जगाला जर धक्का देऊ शकतात तर आमचे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण झालेले विद्यार्थी असा विचार का करू शकत नाहीत? विद्यार्थ्यांत काही विशिष्ट बदल व्हावेत यासाठी आपल्या अभ्यासक्रमात हेतूतः प्रयत्नच केले जात नाहीत. तशी कोणतीही सोय अभ्यासक्रमात नसते. कुठे जायचे? का जायचे? कसे जायचे? कुणीकडे व कुठपर्यंत गेलो? कुठे आणि कोणत्या चुका केल्या? या प्रश्नांपासून शोध व बोध घेण्याच्या फंदात अभ्यासक्रम तयार करणारे व राबविणारे हे दोन्ही प्रकारचे लोक पडत नाहीत. त्यांना तसा जाब विचारणारेही कोणी नसतात. आणि इकडे स्वतःच्या क्षमतांचा विकास करणारे, रुचि-आवडीप्रमाणे व जगण्यासाठी उपयुक्त असे शिक्षण मिळणे हा विद्यार्थ्यांचा जन्मसिद्ध हक्क आहे असे सांगणारे त्यांना कोणी भेटत नाही. त्यामुळे आपल्या समोरील कित्येक समस्यांची बीजे सदोष अभ्यासक्रमात आहेत हे त्यांच्या लक्षात आलेले नाही. या टाकाऊ अभ्यासक्रमाद्वारे आपल्या जीवनाशी खेळ खेळला जातो आहे याचे गांभिर्य विद्यार्थ्यांना जाणवत नाही. पण काही अपात्र लोकांच्या हाती त्यांचे भवितव्य आणि जीवन सोपविण्याइतके त्यांचे जीवन स्वस्त नाही आहे, हे आपल्याला कधीही विसरता येणार नाही.

## भाग ४

'भारतीय शिक्षण पद्धतीमध्ये, आमूलाग्र पुनर्रचना, जवळ जवळ एक क्रांती करण्याची गरज आहे.' कोठारी आयोगाने पंधरा वर्षांपूर्वी हे निदान करून मोठ्या आशावादीपणे या क्रांतीला चालना देण्यासाठी उपाययोजना सुचविल्या होत्या. आम्ही त्या क्रांतीची वाट पहात आहोत आणि अकराशे पानांचा कोठारी आयोगाचा अहवाल विद्यापीठांच्या आणि शैक्षणिक संस्थांच्या ग्रंथालयात धूळ झाडली जाण्याची वाट पहात आहे.

या आयोगाने अभ्यासक्रमविषयक सुचविलेल्या उपाययोजना आजपर्यंत कार्यवाहीत आणल्या असत्या तरी बदलाला सुरवात झाली असती. आजकाल कोणकोणतेच स्वातंत्र्य न राहिलेल्या विद्यापीठांनी आपली स्वायत्तता सिद्ध करण्यासाठी तरी अभ्यासक्रम सुधारण्यासाठी प्रयत्न करायला हवे होते. त्या आमुलाग्र क्रांतीच्या शोधासाठी आता कोणी तरी पुढे व्हायलाच हवे असे, हे सर्व पाहिलं की वाटते.

शिक्षणाला जडत्वाचा शापच आहे का? विद्यापीठांची आणि शिक्षण महामंडळांची धुरा वाहणाऱ्या व्यक्तींची ही असहाय्यता आहे की उदासीनता? अज्ञान आहे की निर्बुद्धपणा?

अभ्यासक्रमावरील या चर्चेचे अनेक फुटकळ निष्कर्ष काढण्यापेक्षा मी एक आणि एकच महत्त्वाचा निष्कर्ष काढणे पसंत करीन : अभ्यासक्रम नियोजनाच्या पुढील पाच सर्वमान्य पायऱ्या आहेत :

१) उच्च माध्यमिक व उच्च शिक्षण कशासाठी हे नेमकेपणाने ठरविणे.
२) उद्दिष्टानुसार विद्यार्थ्यांत कोणती कौशल्ये व क्षमता विकसित होतील हे वर्तनाच्या परिभाषेत मांडणे.

३) उद्दिष्टे साध्य करण्यासाठी संशोधनावर आधारलेल्या निष्कर्षानुसार अभ्यासक्रमाची रचना करणे.

४) अभ्यासक्रमाची परिणामकारकता पाहण्याची यंत्रणा व निकष तयार करणे.

५) निकषांच्या आधारे मूल्यमापन करून अभ्यासक्रमात त्या अनुषंगाने पुनर्रचना करणे.

वरील पायऱ्या या आणि याच क्रमाने आपल्या उच्चस्तरावरील अभ्यासक्रमात आल्याच नाहीत हा तो एकमेव निष्कर्ष आहे.

परिणामतः आपण जे काही बदल केले त्या अपयशातून आपण काहीच शिकलो नाही. आणि नव्या अपयशाला सामोरे गेलो.

आता पुन्हा नव्याने सुरवात करावी लागेल. त्यासाठी विषया-विषयांतील, ज्ञानाच्या शाखांमधील विद्यार्थी-शिक्षकांतील, आणि पारंपरिक परीक्षापद्धतीमुळे निर्माण होणारे आजपर्यंतचे कृत्रिम अडसर दूर करण्याचे धाडस करावे लागेल. त्यासाठी पहिले पाऊल व नंतरची पावले अशी :

१) सध्याच्याच पाठ्यक्रमाची मांडणी, सुस्पष्टता येण्यासाठी शास्त्रशुद्धपणे करावी लागेल.

२) कोणत्याही विषयाचा पाठ्यक्रम ठरविताना, विविध ज्ञानशाखांतील तज्ज्ञ व विद्यार्थी, याबरोबरच अभ्यासक्रम नियोजनाच्या क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश तदर्थ समितीमध्ये हवाच.

३) ज्या ज्या व्यक्तींवर अभ्यासक्रम नियोजनाचे कार्य सोपविले आहे त्यांना प्रशिक्षण द्यावे लागेल.

४) प्रत्येक विद्यापीठाने अग्रक्रमाने 'एक्झॅमिनेशन रिफॉर्म अँड करिक्युलम डेव्हलपमेंट सेल' ची स्थापना करून त्यामार्फत अभ्यासक्रम पुनर्रचना व संशोधनाचे कार्य हाती घ्यावे.

५) सकस अभ्यासक्रम निर्माण करण्याच्या हेतूने प्राध्यापकांमध्ये चिंतन, मनन व विचार सुरू होण्यासाठी विद्यापीठांनी स्पर्धा आयोजित कराव्यात.

६) महाविद्यालयांनी प्रायोगिक तत्त्वावर व विद्यापीठाने पूर्वसंमत केलेल्या आराखड्यानुसार शिक्षणक्रम राबविण्याची परवानगी द्यावी.

७) अभ्यासक्रम, नियोजन व उद्दिष्टे यांचे ज्ञान देण्याच्या हेतूने विद्यार्थ्यांसाठी उद्‌बोधन वर्ग घेण्यात यावेत.

८) अभ्यासक्रमांची कार्यवाही व विकास याच्या मूल्यमापनासाठी आणि शैक्षणिक बाबीसाठी, विद्यार्थी संघटनांनी (व राजकीय पक्षांनी देखील) कायम स्वरूपाचे अभ्यास गट स्थापन करावेत.

९) प्राध्यापकांच्या प्रशिक्षणाची जबाबदारी घेणारी कायम स्वरुपाची यंत्रणा निर्माण करावी.

१०) उच्चस्तरावरील शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करावयाची असल्यास आंतर-ज्ञानशाखीय उपागमाचा स्वीकार करावा.

उच्च स्तरावरील अशा नव्या शिक्षणक्रमांची रुपरेषा कशी असेल ? समाजाच्या व विद्यार्थ्यांचा गरजा पूर्ण करण्यासाठी पाच प्रकारच्या कार्यक्रमाची तरतूद करायला हवी.

१) सामान्य व संस्कारी शिक्षणाचा कार्यक्रम

२) व्यक्तिगत विकासाचा कार्यक्रम

३) व्यावसायिक शिक्षणाचा कार्यक्रम

४) विशेष शिक्षणाचा कार्यक्रम

५) समाजसेवांचा कार्यक्रम.

सामान्य व संस्कारी शिक्षणाच्या कार्यक्रमाचा हेतू राष्ट्रीय सामाजिक समस्यांची जाण निर्माण करणे व विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास करणे असा दुहेरी आहे. या कार्यक्रमात भाषा व समाजशास्त्रांचा समावेश असेल.

व्यक्तिगत विकासाच्या कार्यक्रमामुळे प्रत्येक विद्यार्थ्याच्या वैयक्तिक गरजा, रूचि, कल यानुरूप शिक्षण मिळण्याची संधी मिळेल. मागील कच्चे विषयज्ञान व कौशल्ये सुधारण्याचे वर्ग, इंग्रजी संभाषण कला, भारतीय/परदेशी भाषांचे वर्ग, आणि सृजनात्मक कला व खेळ अशा कार्यक्रमांची सोय असू शकेल.

व्यावसायिक शिक्षणाचा कार्यक्रम हा विशेष शिक्षणास अनुरूप असा ठेवून त्यात व्यावसायिक शिक्षणाची सोय होईल. स्वतंत्ररीत्या व्यवसाय करण्यास किंवा नोकरी मिळण्याइतपत ज्ञान व प्रशिक्षण या कार्यक्रमात अभिप्रेत आहेत. तितका या कार्यक्रमाचा दर्जा उच्च हवा.

विशेषशिक्षण कार्यक्रमात एका ज्ञानशाखेंत प्राविण्य मिळवायचे असून त्यांचे अध्ययन,प्रायोगिक कृती, संशोधन व प्रकल्प इत्यादी गोष्टी या कार्यक्रमात येतील.

सामान्य व संस्कारी शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, विशेष शिक्षण, यांचा उपयोग समाजासाठी व सामाजिक समस्यांसाठी प्रत्यक्षात कसा करता येईल याचा अनुभव समाजसेवा कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मिळावा असे अपेक्षित आहे.

थोडक्यात हे कार्यक्रम आंतर-ज्ञानशाखीय असतील, व त्यासाठी अनेक सुविधा, प्राध्यापकांचे प्रशिक्षण, व आर्थिक पाठबळ यांची गरज आहे. तत्पुर्वी प्रायोगिक पद्धतीवर यातील एकेका कार्यक्रमाची चाचणी घेऊन ते विकसित करण्याच्या प्रक्रियेला सुरवात करता येईल.

ज्यांना-ज्यांना शिक्षणाबद्दल आस्था आहे, ज्यांना या राष्ट्राची, समाजाची काळजी आहे, ज्यांच्यावर शिक्षणाची जबाबदारी आहे, त्या घटकांनी यासाठी पुढाकार घ्यायला हवा. पण यापैकी कोणीच पुढे आले नाही तर युवाशक्तीला पुढाकार घ्यावा लागेल. सकस व उच्च दर्जाचे शिक्षण मिळणे हा त्यांचा हक्क आहे व त्यासाठी सतत जागरूक राहणे हे त्यांचे कर्तव्य ठरते. यासाठी कदाचित् त्यांना शैक्षणिक क्रांतीसाठी चळवळ उभी करावी लागेल. ज्यांच्यावर शैक्षणिक बदलाची जबाबदारी आहे ते जर त्या बदलाला तयार नसतील तर त्यांचे सामाजिक जीवन अशक्य केल्याशिवाय ते बदलणार नाहीत. त्याशिवाय या क्रांतीची सुरवात होणार नाही. अन्यथा नव्या पिढीच्या जीवनाशी चाललेला हा खेळ असाच चालू राहील. आणखी किती पिढ्या, कोणास ठाऊक ?

■ ■

# २९ अभ्यासक्रमांचे आणखी एक विश्लेषण

व. झा. साळी

अध्यापन, अध्ययन आणि मूल्यमापन या तीन प्रमुख क्रियांची शिक्षणप्रक्रिया बनलेली आहे. अर्थात स्वतंत्रपणे विचार केल्यास अध्यापन, अध्ययन आणि मूल्यमापन या केवळ क्रिया नसून त्याही प्रक्रिया आहेत. क्रियेपेक्षा प्रक्रियेची व्याप्ती विस्तृत असते. त्या दृष्टीने शिक्षणप्रक्रियेचा विचार करावयाचा झाल्यास तो एकत्रितपणे करणे इष्ट आहे. त्यामधील घटकांचा स्वतंत्रपणे विचार करणें व ते घटक वेगवेगळे ठेवणे योग्य नाही. म्हणून शिक्षणप्रक्रिया ही अध्यापन, अध्ययन आणि मूल्यमापन अशा प्रक्रियांची संयुक्त व गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. शिक्षणप्रक्रियेचा मूळ हेतू विद्यार्थी प्रक्रियेपूर्वी जसा होता त्यापेक्षा तो प्रक्रियेनंतर वेगळा असणे अपेक्षित आहे. म्हणजे विद्यार्थ्यामध्ये अपेक्षित योग्य दिशेने बदल घडवून आणला पाहिजे. घडवावयाचा बदल हा पूर्वनियोजित सूत्रांवर आधारलेला असतो. या सूत्रांना शैक्षणिक उद्दिष्टे असे म्हणतात. ही उद्दिष्टे अभ्यासक्रमाच्या माध्यमातून साध्य केली जातात. म्हणून अभ्यासक्रम हे माध्यम शैक्षणिक प्रक्रियेतील प्रमुख भाग आहे. या अभ्यासक्रमाचे नियोजन व कार्यवाही योग्य प्रकारे झाल्यास उद्दिष्टपूर्ती सुलभपणे होण्यास मदत होते.

### अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतील प्रमुख क्रिया

अभ्यासक्रमाच्या माध्यमातून अध्ययन-अध्यापन प्रक्रिया घडत असते. ही प्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडावयाची असल्यास ज्या क्रियांची ती झालेली आहे, त्या क्रियांचा समग्रपणे विचार करणे आवश्यक आहे.

**१) शैक्षणिक उद्दिष्टे** – शिक्षण प्रक्रिया म्हणजे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे. हा विकास ज्ञानात्मक, भावात्मक आणि कौशल्यात्मक क्षेत्रात अपेक्षित आहे. ज्ञानात्मक क्षेत्रातील विकास हा विषय पाठ्यांशाद्वारे साधला जातो. त्याकरिता अभ्यासक्रमाची उद्दिष्टे निश्चित केली जातात. प्राध्यापक ब्लूम यांच्या उद्दिष्टे-वर्गीकरण सिद्धांतानुसार ज्ञान, आकलन, उपयोजन, विश्लेषण, संयोजन आणि मूल्यमापन ही प्रमुख उद्दिष्टे होत. ही उद्दिष्टे साध्य करावयाची झाल्यास शिक्षकाला स्पष्टीकरणात्मक विधाने निश्चित करणे आवश्यक असते. म्हणजे ज्ञानात्मक क्षेत्रात साध्य करावयाच्या उद्दिष्टांची स्पष्टीकरणे निश्चित झाल्यास विद्यार्थ्यामध्ये घडवून आणावयाच्या वर्तन-परिवर्तनाची प्रतिकृती निश्चित होते. याकरिता स्पष्टीकरणसारणी तयार करून वर्तन-परिवर्तनाची प्रतिकृती तयार करणे हे अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतील प्रमुख कार्य आहे.

**२) विद्यार्थ्यांचे निदान** – वर्तन-परिवर्तनाची प्रतिकृती निश्चित झाल्यानंतर एखाद्या विशिष्ट

पाठ्यांशासाठी अध्ययन-अध्यापन प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी संबंधित पाठ्यांशाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांची चाचणी होणे आवश्यक असते. ही चाचणी निदानात्मक स्वरूपाची असावी. त्यामुळे विद्यार्थ्यांचे निदान करता येईल. म्हणजे अध्ययन-अध्यापन प्रक्रियेद्वारा साध्य करावयाच्या उद्दिष्टांसाठी विद्यार्थ्यांची आवश्यक ती किमान तयारी आहे किंवा नाही याची माहिती शिक्षकास होणे अत्यावश्यक असते. अन्यथा, संपूर्ण अध्ययन-अध्यापन प्रक्रिया वाया जाऊ शकते. या दृष्टीने शिक्षकास नैदानिक कसोट्यांची माहिती ठेवून विद्यार्थ्यांचे निदान करता आले पाहिजे. विद्यार्थ्यांची नैदानिक तपासणी झाल्यानंतर आवश्यकता भासल्यास उपचारात्मक उपायही शिक्षकास माहीत असावेत व ते वापरता आले पाहिजेत. अशा तऱ्हेने प्रक्रियेपूर्वी विद्यार्थ्यांचे निदान झाल्यानंतर आणि उपचारात्मक उपायांचा वापर केल्यानंतर पुढील पाठ्यांशाच्या अध्ययनासाठी विद्यार्थ्यांची तयारी झाली आहे असे समजता येते. अशा तऱ्हेची विद्यार्थ्यांची तयारी करून घेणे हे या प्रक्रियेतील दुसरे प्रमुख कार्य आहे.

३) **प्रत्यक्ष अध्यापन** – शिक्षकाचे अध्यापन आपोआप होत नसून ते विशिष्ट प्रकारच्या साधनांनी व कृतींनी होत असते. तसेच हे अध्यापन म्हणजे विषय पाठ्यांशाचे वितरण होय. प्रत्यक्ष अध्यापनामध्ये अध्यापकाने करावयाची कृती ही अध्यापनपद्धती, अध्यापकाने वापरावयाची साधने म्हणजे अध्यापनसाहित्यसामुग्री आणि अध्ययनपाठ्यांशांचे वितरण म्हणजे अभ्यासक्रमातील अध्यापन-अध्ययन घटक, यावरून शिक्षकाचे प्रत्यक्ष अध्यापन हे कसे परस्परावलंबी आहे हे स्पष्ट होते. तसेच अध्यापनातील प्रत्येक कृती आणि साहित्य ही अध्यापन घटकाला सुसंगत ठेवणे अपेक्षित असणे आवश्यक ठरते. या सर्व दृष्टींनी विचार केल्यास अध्यापकाचे प्रत्यक्ष अध्यापन हे अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतील तिसरे महत्त्वाचे कार्य ठरते.

अशा तऱ्हेने साध्य करावयाची उद्दिष्टे, विद्यार्थ्यांचे निदान आणि अध्यापकाचे प्रत्यक्ष अध्यापन या तीनही क्रियांची मिळून अध्ययन-अध्यापन प्रक्रिया तयार झालेली आहे. या प्रक्रियेतील प्रमुख माध्यम म्हणजे अभ्यासक्रम-विषय पाठ्यांश होय. त्यामुळे अभ्यासक्रम ह्या माध्यमाला संपूर्ण प्रक्रियेत अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे.

## विद्यार्थी-शिक्षक आंतरक्रिया

शिक्षण प्रक्रियेतील मूलभूत घटक म्हणजे विद्यार्थी. संपूर्ण शिक्षण प्रक्रिया या विद्यार्थ्यांभोवती घडवून आणलेली असते. शिक्षक हा पार्श्वभूमीवर राहून विद्यार्थ्यांचे अध्ययन चांगल्या तऱ्हेने करण्यास मदत करणारा एक मार्गदर्शक आहे. शिक्षणशास्त्रातील या आधुनिक तत्त्वानुसार विद्यार्थी हा केंद्रस्थानी असून अध्यापक या केंद्राच्या परिघसीमेवर फिरत असतो व सर्व बाजूंनी विद्यार्थ्यास मदत करतो.

अभ्यासक्रमातील विषय पाठ्यांश विद्यार्थ्यांपर्यंत कसा पोहोचवावयाचा हे शिक्षकास चांगले ज्ञात असल्यास विद्यार्थी व शिक्षक यांची आंतरक्रिया अधिक बळकट होते. अशा तऱ्हेची आंतरक्रिया घडवून आणण्यासाठी शिक्षकाने विषय पाठ्यांशाकरिता विविध प्रकारच्या पद्धती वापरल्या पाहिजेत. विद्यार्थ्यांचे अध्ययन सुलभ होण्यासाठी त्याला जास्तीत जास्त उत्तेजन दिले पाहिजे. कित्येक वेळा स्पर्धात्मक वातावरण तयार करून त्याला अधिक प्रवृत्त केले पाहिजे. विद्यार्थ्यांची अध्ययन प्रवृत्ती वाढीला लागणे व त्याकरिता अध्यापकांनी सुयोग्य अशा नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती विकसित करून अध्ययन वातावरण तयार केले असता शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामधील आंतरप्रक्रिया अधिक बळकट होत जाते. ही आंतरप्रक्रिया बळकट करावयाची असल्यास अभ्यासक्रम-विषय पाठ्यांश या माध्यमाचे सुसंगत वितरण होणे आवश्यक आहे.

## अभ्यासक्रम

अभ्यासक्रम म्हणजे ज्या माध्यमाद्वारा अध्ययन-अध्यापन प्रक्रिया घडविली जाते व विद्यार्थी शिक्षक आंतरक्रिया बळकट होते, असे एक प्रभावी माध्यम होय. म्हणजे अभ्यासक्रमाशिवाय शिक्षणप्रक्रिया घडूच शकणार नाही. म्हणून शिक्षणप्रक्रियेत विविध विषयांच्या अभ्यासक्रमांना अतिशय महत्त्व प्राप्त झालेले आहे. हे अभ्यासक्रम शिक्षककेंद्री नसून ते विद्यार्थीकेंद्री असतात. तसेच ते केवळ विषय-ज्ञानात्मक नसून त्यास अनुभूतींची जोड दिलेली असते. विषय अभ्यासक्रमांचा सदरहू दृष्टिकोन विचारात घेतल्यास या अभ्यासक्रमाचे ज्ञान विद्यार्थ्यास अधिक चांगल्या प्रकारे करून देण्यास कशी मदत करता येईल याचा विचार अध्यापकाने केला पाहिजे. त्याकरिता प्रत्येक अध्यापकास आपल्या विषयातील अभ्यासक्रम समजून घेण्यास त्या विषय-पाठ्यांशाचे बारकावे चांगले माहीत असावेत. अध्यापकाची अशा तऱ्हेची तयारी असल्यास संबंधित विषयाच्या अभ्यासक्रमातील प्रत्येक घटक, उपघटक यांचे अध्यापन कसे करावयाचे व त्यांचे चांगले अध्ययन होण्यास विद्यार्थ्यांना कशी मदत करावयाची हे शिक्षक ठरवू शकतो.

## अभ्यासक्रमाची विभागणी व नियोजन

प्रचलित युग हे नियोजन-युग आहे, असे आपण म्हणतो. त्या दृष्टीने अध्यापकाच्या दैनंदिन जीवनातही प्रत्यक्ष अध्यापन करताना नियोजन असणे आवश्यक आहे. म्हणून संबंधित विषयाच्या अध्यापकांनी आपल्या विषय अभ्यासक्रमाचे नियोजन केले पाहिजे. नियोजनासाठी विभागणी करावी लागते. म्हणून विषय अभ्यासक्रमाची प्रमुख घटकांमध्ये विभागणी करता आली पाहिजे. घटकनिहाय विभागणी करताना अभ्यासक्रम विश्लेषणाचे तंत्र काळजीपूर्वक वापरले गेले पाहिजे. सर्वसाधारणपणे घटकनिहाय अभ्यासक्रमाची विभागणी व तदनंतरचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करता येते.

नियोजनाच्या दृष्टीने घटकनिहाय विभागणी करताना विद्यार्थ्यांच्या स्वयं-अध्ययनाचे घटक वेगळे करून घ्यावेत. त्यानंतर समूहचर्चेद्वारा साध्य होणारे घटक वेगळे करावेत. ग्रंथालय अभ्यासिकेतूनही काही घटक साध्य करता येतात. विशिष्ट ठिकाणांना व स्थळांना भेटी आणि सहली याद्वारे साध्य होणारे घटक वेगळे काढता येतात. प्रात्यक्षिकाचा भाग असलेल्या विज्ञानविषयाचे काही घटक प्रयोगशाळेतून आणि केवळ प्रयोगदिग्दर्शनामधून साध्य करता येतात. म्हणजे विषय-अभ्यासक्रमाच्या अध्यापनाचे शिक्षक ते विद्यार्थी हाच एकतर्फी मार्ग नाही याची जाणीव अध्यापकांनी ठेवली पाहिजे. विषय अभ्यासक्रमातील विविध घटकांची निर्देशित केल्याप्रमाणे विभागणी केल्यास अध्यापकाचे अध्यापन अधिक प्रभावी होऊन विद्यार्थ्यांचे अध्ययन परिणामी अपेक्षित फलस्वरूप होईल. तसेच कालापव्यय टळून अनेक समस्यांचे निराकरण होईल.

## घटक विश्लेषण

विषय अभ्यासक्रमाची वरीलप्रमाणे घटकनिहाय विभागणी केल्यानंतर प्रत्येक घटकाचे विश्लेषण करणे क्रमप्राप्त ठरते. घटक विश्लेषणामध्ये कोणत्या नवीन पाठ्यांशाचे ज्ञान विद्यार्थ्याला करून द्यावयाचे आहे हे ठरवता आले पाहिजे. यामध्ये नवीन व्याख्या, संज्ञा, तत्त्व, नियम, सिद्धांत, पद्धती, प्रक्रिया, घटना, इत्यादी बाबींचा अंतर्भाव करता येतो. अशा तऱ्हेने त्या घटकाचे विश्लेषण केल्यानंतर त्यातील नवीन पाठ्यांश कशा तऱ्हेने शिकवावयाचा व तो शिकण्यास विद्यार्थ्यांना कशी मदत करावयाची हे शिक्षकास ठरविता येते. याकरिता प्रत्येक अध्यापकाला अभ्यासक्रमातील घटकांचे नियोजनबद्ध विश्लेषण करता आले पाहिजे.

घटकांचे विश्लेषण करताना त्याच्या अध्यापनासाठी, तसेच त्या घटक अध्यापनाची उद्दिष्टे साध्य झाली आहेत किंवा नाहीत हेही तपासता आले पाहिजे. त्याकरिता अध्यापन, विद्यार्थ्यांचे

अध्ययन व नंतर उद्दिष्ट तपासणे यांमध्ये उपलब्ध तासिकांची सांगड घातली पाहिजे. घटकांच्या विभागणीनुसार अध्यापन व अध्ययनपद्धतीही नमूद केल्या पाहिजेत. तसेच कोणत्या शैक्षणिक अनुभूती, कशा तऱ्हेच्या शैक्षणिक वातावरणात देता येतील याचाही निर्देश नियोजनात व विश्लेषणात व्हावा. थोडक्यात सांगावयाचे म्हटल्यास अभ्यासक्रमाचे विश्लेषण हे अध्ययन, अध्यापन व मूल्यमापन असे सर्वसमावेशक व्हावे. म्हणजे विषय घटकांचे विश्लेषण केल्यानंतर अपेक्षित तासिका, उद्दिष्टपूर्तीसाठी अध्यापन पद्धती व चाचणीचे स्वरूप यांचा स्पष्ट निर्देश व्हावा.

स्वयं-अध्यापनाच्या घटकांबाबत विद्यार्थ्यांचे स्वयं-अध्ययन कसे होईल याचे स्पष्ट मार्गदर्शन केले पाहिजे. त्याकरिता विद्यार्थ्याला कोणत्या साहित्याची मदत करता येईल व सदरहू साहित्य कोठे व कसे उपलब्ध होईल, याबाबत माहिती दिली पाहिजे. प्रयोगशाळेशी संबंधित घटकांबाबत प्रयोगशाळेची उपलब्धता व किमान साधनसामुग्री उपलब्ध झाली पाहिजे. भाषा विषयाबाबत कित्येक घटकांचा अभ्यास ग्रंथालयात विद्यार्थ्यांना करता येतो. त्यामुळे संदर्भपुस्तकांचे वाचन वाढून संदर्भग्रंथ कसे हाताळावेत याचेही ज्ञान विद्यार्थ्यांना करून देता येते. कित्येक घटकांचे विवेचन परस्पर संवादांतून, गटचर्चेतून व समूह-चर्चासत्रांमधून करता येते. अशा रीतीने अभ्यासक्रमाचे विश्लेषण हे केवळ विषय पाठ्यांशापुरतेच मर्यादित न रहाता ते अध्यापन, अध्ययन आणि मूल्यमापन या प्रक्रियांशी निगडित करून समग्र शिक्षण प्रक्रियेशी त्याची सांगड घालता येते. पर्यायाने शिक्षणाचा संकुचित दृष्टिकोन बदलून व्यापक दृष्टी निर्माण होते. शिक्षणाचा विस्तारित दृष्टिकोन निर्माण व्हावा हीच अपेक्षा अभ्यासक्रम-विश्लेषणामध्ये आहे.

## विश्लेषणाची गतिशीलता

कोणतीही प्रक्रिया गतिशील असावी हा सामान्य सिद्धान्त आहे. त्यामुळे शिक्षण प्रक्रिया गतिशील रहाणे अपरिहार्य आहे. या प्रक्रियेशी संबंधित सजीव व निर्जीव असे दोन्ही घटक गतिशील असावेत. सजीव घटकांमध्ये शिक्षक, विद्यार्थी व पालक यांची गतिशीलता तर निर्जीव घटकांमध्ये उद्दिष्टे, अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती, अध्यापन साहित्य, मूल्यमापन प्रक्रिया यांची गतिशीलता अपेक्षित आहे. या प्रत्येक घटकांची गतिशीलता कुठल्याही बाबतीत थोडी जरी कमी पडली तरी त्याचा परिणाम संपूर्ण प्रक्रियेवर झाल्याशिवाय रहात नाही. विशेषतः अभ्यासक्रमाच्या बाबतीत हे सूत्र प्रकर्षाने लक्षात घेतले पाहिजे. अभ्यासक्रमाची गतिशीलता समाजाच्या गतिशीलतेवर अवलंबून आहे. त्यामुळे अभ्यासक्रमाचे विश्लेषण करताना त्यामध्ये साचेबंदपणा न आणता दरवर्षी नाविन्यपूर्ण बदल केले जावेत. काही ठराविक कालावधीसाठी अभ्यासक्रम जरी कायम असला तरी प्रत्येक वर्षी पूर्वानुभव जमेस धरून अध्यापन पद्धती, अध्यापन साहित्य, अध्ययन अनुभूती, शैक्षणिक प्रसंग यांमध्ये नवीनता आणून, नाविन्यपूर्ण शैक्षणिक वातावरण निर्माण करता आले पाहिजे. परिणामी शिक्षकाचे अध्यापन व विद्यार्थ्यांचे अध्ययन अधिक परिणामकारक ठरते. याकरिता आमच्या अध्यापकांनी अभ्यासक्रम विश्लेषणाच्या बाबतीत कृतिसंशोधनाची प्रवृत्ती जोपासून ती वाढीस लावली पाहिजे. अशा तऱ्हेची प्रवृत्ती निर्माण झाल्यास अभ्यासक्रमाचे विश्लेषण ही बाब शिक्षण प्रक्रियेत एक वरदान ठरेल.

■ ■

# ३०

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कल्याणाच्या आणि विकासाच्या योजना

शि. श्री. काळे

प्रचलीत उच्च शिक्षण पद्धतीत व समाजात उभ्या असलेल्या यंत्रणेत विद्यार्थ्यांसाठी कल्याण व विकास कार्य करणारे अशासकीय व प्रशासकीय असे अनेक घटक आहेत. अशासकीय घटकात विद्यार्थ्यांनी स्वतःसाठी केलेल्या व त्यांच्यासाठी माता-पिता, पालक, कुटुंब, शिक्षक, शिक्षण-संस्था, खाजगी उपक्रमशीलतेने कार्य करणाऱ्या सामाजिक संस्था, स्वायत्त विद्यापीठे, यांनी केलेल्या कार्याचा अंतर्भाव होतो. प्रशासकीय यंत्रणेने केलेल्या कार्यांत मध्यवर्ती सरकार, राज्यसरकारे, मंत्रिमंडळे, सचिवालये, संचालक (शिक्षण), समाजकल्याण, आरोग्य, ग्रामीण व नागरी विकास, इत्यादी खाती, जिल्हास्तरावरील अन्य कार्यालये व अधिकारी, यांनी विद्यार्थ्यांच्या कल्याण व विकासासाठी केलेल्या कार्याचा समावेश होतो. प्रस्तुत टिपणात मात्र विद्यापीठ व राज्यशासन यांच्या द्वारे होणाऱ्या, चाललेल्या, उपक्रमांची समीक्षा करण्याचा यत्न आहे.

ज्या विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी, विकासासाठी कार्य करायचे त्या विद्यार्थीवर्गात एकजिनसी किंवा सर्वसमान गुणपात्रतेच्या व्यक्ती नाहीत. इतके भेद आहेत की, योजना आखताना ही जाणीव ठेवणे त्या योजनेचे फायदे ज्या त्या विद्यार्थीगटाला त्याच्या गरजेप्रमाणे मिळण्यासाठी आवश्यक आहे. भेदांचे काही प्रकार पुढीलप्रमाणे : विद्यार्थी–विद्यार्थिनी; शहरी–ग्रामीण; आर्थिकदृष्टया गरीब–श्रीमंत; सामाजिकदृष्टया प्रगत व मागासलेले; मागासवर्गीय–हरिजन, गिरिजन; वसतिगृहात राहणारे व भाडयाने जागा घेऊन राहणारे; बंगल्यात राहणारे–झोपड-पट्टयात राहणारे; अनेक शिक्षित पिढयांच्या घरातून आलेले व प्रथम शिक्षित पिढीच्या घरातून आलेले. प्रत्येक गटाची कल्याणविषयक व विकासविषयक गरज निराळी. हे निराळेपण ध्यानात घेऊन योजना आखल्या पाहिजेत व त्यांची अंमलबजावणीही झाली पाहिजे.

विद्यार्थ्यांच्या जीवनात अनेक मर्यादा आढळून येतात, त्रुटी जाणवतात. यांनी शैक्षणिक साधनेत अडचणी उभ्या राहतात. तेव्हा कल्याणयोजनांद्वारा अस्तित्वात असलेल्या त्रुटी पुऱ्या करण्याचा प्रयत्न असतो. कल्याणयोजना यावत्शक्य क्षतिपूर्तीसाठी असतात. विद्यार्थ्यांच्या विकासाला भोवतालच्या परिस्थितीत अनेक अडथळे जाणवतात. ते दूर करणे हे कल्याणयोजना-कार्याचा विशेष. यामध्ये आर्थिक अवरोध, शैक्षणिक प्रक्रियेतील अवरोध, दूर करण्याचे यत्न होतात.

विकासयोजनांद्वारा विद्यार्थ्यांचा वैयक्तिक विकास तर साधायचाच असतो पण, तो समाजाच्या विकासास उपयुक्त ठरेल यासाठी त्याला आवश्यक ते गुण अंगी बाणविण्यास साह्य करायचे असते. म्हणून विद्यार्थी-विकासकार्यात विद्यार्थीवर्गाच्या सामुदायिक बलनिर्मितीच्या उप-

क्रमांचाही समावेश असतो. विधायक कार्यासाठी विद्यार्थ्यांचा सहभाग मिळेल असे व्यक्तिमत्व विद्यार्थ्यांत निर्माण व्हायला पाहिजे. विद्यार्थ्यांत असलेल्या क्षमतेचे संवर्धन व्हावे, तो शारीरिक-बौद्धिकदृष्ट्या विकसित व्हावा; त्याचा मानसिक-भावनिक विकास व्हावा, तो समाजाभिमुख व व्यावसायिक पात्रतेचा व्हावा, ही विद्यार्थी-विकासयोजनेची उद्दिष्टे आहेत.

विद्यार्थ्यांसाठी सेवाकार्य आखले व केले जाते. त्यात विद्यार्थीकल्याण व विद्यार्थीविकास यांचा मिलाफ आढळतो.

कल्याणकारी उपक्रमात पुढील गोष्टींचा समावेश होऊ शकतो : सकस आहार व्यवस्था; आरोग्यशिक्षण व सेवा; आरोग्यविषयक तपासणी, चिकित्सा व उपचार; वसतिगृहे; अभ्यासिकांची तरतूद; विद्यावेतन; साधने उपलब्ध करून देणे, पुस्तकपेढ्या; शारीरिक, बौद्धिक' मानसिक, भावनिक, सांस्कृतिक या संबंधात उपकारक कार्याद्वारा गरजपूर्ती करणे.

विकासकार्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो : व्यायम व क्रीडाव्यवस्था; साहसी प्रवृत्ती-प्रेरक कार्यक्रम (वनविहार, गिर्यारोहण, नदी तटाक यात्रा, जलतरण, नौकानयन, सागरसहली, अवकाशभ्रमण, इत्यादी.); अभ्यासमंडळे, वक्तृत्वस्पर्धा, अभिरुचि संवर्धन - प्रयत्न, विविध छंदोमंडळे; गुणी विद्यार्थ्यांचा सत्कार, स्नेहसोहळा, सहकारी सोसायट्या; राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना, रेडक्रॉस आदी सामाजिक उपयुक्ततेचे उपक्रम.

विद्यार्थीकल्याण व विकास ह्या उद्देशांच्या अनुषंगाने काही कार्य विद्यापीठातून, महाविद्यालयांतून होत असते. त्यावर रकमा खर्चीही पडतात आणि म्हणून तरतुदीही केल्या जातात. विद्यार्थी कल्याणमंडळे, क्रीडामंडळे, स्पर्धा, महोत्सव, उत्सव साह्य देण्याचे विविध उपक्रम होत असतात; पण सर्व कार्याचे उद्दिष्टांच्या चौकटीत काटेकोरपणे उभे राहिलेले चित्र समोर येत नाही. विद्यार्थ्यांचे कल्याण व विकास किती झाला आहे ह्याचे मूल्यांकन खर्ची पडलेल्या रकमात मोजले जाते. जी यंत्रणा या कार्यासाठी उभी आहे ती जुजबी आहे. तिच्या कार्यक्षमतेबद्दल न बोललेच बरे. सरकारी, विद्यापीठीय पातळीवर कार्यक्षम यंत्रणांची गरज आहे. या यंत्रणा आपापल्या क्षेत्रात काम करू शकतील व शिवाय संयुक्तपणेही आणखी काही करू शकतील. विद्यार्थी कल्याण व विद्यार्थी विकास यासाठी विद्यापीठांनी करावयाच्या कार्यासाठी विद्यापीठांच्या कायद्यात उल्लेख असतो. वार्षिक अंदाजपत्रकात काही तरतुदही असते. ती पुरेशी आहे की नाही ? ती विवेकपूर्वक आखलेल्या अग्रक्रमानुसार खर्च होते की नाही ? हे अधिक कटाक्षाने पाहण्याची गरज आहे.

सरकारी यंत्रणेत मागासवर्गीय, अपंग, आर्थिकदृष्ट्या मागासलेले, यांना आर्थिक साह्य दिले जाते. युवकसेवांचे कुठे खाते, कुठे संचलनालय, वगैरे असतात.

विद्यापीठात व राज्यशासनात विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी व विकासासाठी जे कार्य होते त्याची पहाणी अजूनही झालेली नाही. त्यामुळे निष्कर्ष काढणे अवघड होते. पण स्थूलमानाने निष्कर्ष काढणे शक्य होते, ते पुढे दिले आहेत.

### निष्कर्ष

१. उच्च शिक्षणाच्या उपक्रमात विद्यार्थी-कल्याण व विद्यार्थी विकासकार्य, एक महत्त्वाचा अविभाज्य घटक आहे. अनेक वर्षे शासकीय व विद्यापीठीय स्तरावरून हे उद्घोषित केलेले आहे; पण उपक्रम व कृती यांच्या अनुषंगाने पहाणी केली तर हे कार्य उच्च शिक्षणाचे अविभाज्य अंग आहे असे शासनास व विद्यापीठास खरोखर वाटते काय याबद्दल दाट शंका येते.

२. या कल्याण व विकाससेवाकार्यावर परंपरागत विचारांचा जबरदस्त पगडा असल्याचे जाणवते. त्याचबरोबर प्रगत राष्ट्रातील उपक्रमांचे अंधानुकरण करण्याची प्रवृत्ती या उपक्रमात

आढळते. व्यक्तिमत्त्वविकासाला अनुकूल अशी आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक परिस्थिती प्रगत राष्ट्रांत उपलब्ध असल्यामुळे विद्यार्थी कल्याणकार्यात फावल्या वेळाचा सदुपयोग, काही सांस्कृतिक व साहसी उपक्रमांना उत्तेजन, छंदप्रवृत्तींना वाव, अशा गोष्टींचा समावेश होतो. दारिद्र्यपीडित विकसनशील देशात या कार्यक्रमांना परिस्थितीनुरूप निराळेच वळण लागायला हवे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वविकासात आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक, शैक्षणिक, स्वरूपाचे अवरोध असतात. या अवरोधांमुळे निर्माण होणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्याच्या कार्याला विद्यार्थी-कल्याण उपक्रमात अग्रक्रम देणे आवश्यक; पण याची जाण शासकीय व विद्यापीठीय स्तरावर आढळत नाही. क्रीडा व युवक संचलनालयाच्या तरतुदींचा ८५ ते ९० टक्के खर्च क्रीडांवर होतो. विद्यापीठाची जवळजवळ ९० टक्के कल्याण-विकासाची तरतूद युवकमहोत्सव व क्रीडा यांवर खर्ची पडते.

३. विकसनशील राष्ट्रात उगवत्या पिढीत विशेष प्रकारची पात्रता, प्रवृत्ती, प्रेरणा यांची हेतुपुरस्सर जोपसना करण्याची आवश्यकता असते. विद्यार्थी कल्याण व विकास योजना आखीत असताना या गरजेचे भान ठेवणे आवश्यक असते; पण क्रीडा व विविधगुणदर्शनांच्या महोत्सवांसारख्या उपक्रमात दंग झालेल्या लोकांना याची जाण कुठून राहणार ?

४. वर उल्लेखिलेल्या प्रवृत्तींचा व विचारांचा पगडा मनावर असल्यामुळे विद्यार्थी कल्याण व विकास कार्यक्रमांसाठी जी यंत्रणा निर्माण झाली आहे तीत विकृती आढळते. राज्यस्तरावर ज्याप्रमाणे युवकसेवाकार्याची जबावदारी घेणारी यंत्रणा व अधिकारी यांची निर्मिती व नियुक्ती केलेली आढळत नाही, त्याप्रमाणे विद्यापीठातही विद्यार्थी-कल्याणकार्यात 'डीन' ची नियुक्ती केलेली आढळत नाही. या पदावर नेमणूक व्हावी म्हणून विविध स्तरांवर ठराव झाले, विद्यापीठ अनुदानमंडळाची मान्यता मिळाली; पण नेमणूक नाही ! कदाचित विद्यापीठाच्या प्रचलित राजकारणातील काही हितसंबंधितांना अशा प्रकारची नियुक्ती अडचणीत टाकणारी वाटत असेल असा दाट संशय येतो.

५. एकूण यंत्रणेत विद्यार्थी-सहभागाची स्थिती अत्यंत दयनीय आहे. शासनाची भूमिक समस्या निर्माण झाल्यावर जागे होण्याची असल्याने, विद्यार्थ्यात असंतोषाचा उद्रेक होईतो विद्यार्थ्यांचा सहभाग अनावश्यक वाटतो. विद्यापीठात स्टूडंटस् कौन्सिल ही स्वतंत्र यंत्रणा निर्माण केलेली आहे. तथापि या यंत्रणेद्वारे कोणतीही कृति-केंद्रित सहभागिता निर्माण झाल्याचे आढळत नाही.

६. सर्व उपक्रमांना आर्थिक तरतुदीची गरज असते. यासंबंधीची त्रुटि वेळोवेळी ध्यानातही येते; पण त्यासाठीही निर्धाराने प्रयत्न होत नाहीत. त्याचप्रमाणे आवश्यक ती यंत्रणानिर्मितीही केल्याचे आढळत नाही.

७. उपक्रम कार्यान्वित करण्यासाठी अनुकूल पात्रता, प्रकृती व प्रेरणा असलेल्या कार्यकर्त्यांची तीव्र गरज आहे. असे कार्यकर्ते तयार करण्याचा प्रयत्नही कुठे आढळत नाही.

८. आपल्या कल्याणाच्या, विकासाच्या उपक्रमांबद्दल काय केले जाते व काय नाही यासंबंधी विद्यार्थ्यांत दारुण अज्ञान आहे. पालक व समाजातील जबाबदार व्यक्ती तटस्थ आहेत. या कार्यक्रमांची उपेक्षाच नव्हे तर अवहेलनाही होते. या सर्व अनावस्थेमुळे देशातील विविध विकास कार्याची गरज हेरून त्यात परिणामकारकपणे भाग घेणारी एक पिढीच विद्यापीठातून बाहेर यायची राहून गेली.

■ ■

# ३१

## महाराष्ट्रातील मुसलमानांची शैक्षणिक स्थिती

यशवंत दिनकर फडके
गोपाळ दुखंडे
मोहम्मद खडस

महाराष्ट्रातील मुसलमानांचे मनोगत समजावून घ्यावे म्हणून आम्ही १९ मे १९७७ ते १९ नोव्हेंबर १९७८ या दीड वर्षांच्या काळात एक पाहणी केली. या पाहणीसाठी मुंबई शहर व उपनगरे, पुणे, कोल्हापूर, रत्नागिरी, नाशिक, अकोला, अमरावती, औरंगाबाद, ही प्रमुख शहरे जशी निवडली होती, तशीच नालासोपारा, पालघर, सातपाटी, मनोर, वाडा, ही गावेही निवडली होती. जेथील लोकसंख्येत मुसलमानांचे प्रमाण पन्नास टक्क्यांहून अधिक आहे अशा मालेगाव व भिवंडी या गावांचाही पाहणीसाठी निवडलेल्या गावांमध्ये अंतर्भाव करण्यात आला होता. आधी प्रश्नावली तयार करून मग ती भरून घेण्याची सर्वपरिचित पद्धत न अवलंबिता एकूण ५४० व्यक्तींच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यापैकी ५०५ पुरुष व ३५ स्त्रिया होत्या. ज्यांची मुलाखत घ्यावयाची त्यांचा विश्वास संपादन करून त्यांना बोलते करावयाचे व त्यांना राजकीय, सामाजिक, आर्थिक तसेच शैक्षणिक प्रश्नावर मोकळेपणाने बोलू द्यावयाचे ही पद्धत पाहणीसाठी स्वीकारावयाची असे आरंभीच ठरवले होते. निरनिराळ्या वयोगटांतील, उत्पन्नगटातील, तसेच शैक्षणिकदृष्ट्याही भिन्न स्तरावरच्या, मुसलमान स्त्री-पुरुषांच्या मुलाखती घेण्यात आल्या. मात्र कोणतीही मुलाखत घेताना आपल्या मनाशी जे प्रश्न योजिले आहेत त्यांची उत्तरे मिळतील अशा तऱ्हेने संभाषण करण्याची मुलाखत घेणाऱ्यांनी दक्षता बाळगली होती. तरीही जेथे अपुरी माहिती मिळाली असे वाटले, अशा १४० व्यक्तींच्या मुलाखतींचा सांख्यिक एकत्रीकरण, वर्गीकरण व पृथक्करण करताना समावेश केलेला नाही. म्हणजेच एकूण ५४० व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या असल्या तरी तक्ते तयार करताना त्यापैकी ४०० व्यक्तींनी दिलेल्या संपूर्ण माहितीचा आधार घेतला आहे. आम्ही केलेल्या या पाहणीत मुसलमानांचे शैक्षणिक प्रश्न काय आहेत हे समजावून घेण्याचाही प्रयत्न केला होता. आम्हाला जे दिसले ते या लेखात मांडले आहे,

ज्या ४०० व्यक्तींची संपूर्ण माहिती मुलाखतीद्वारा आम्ही मिळवली त्यांच्या शैक्षणिक पात्रतेचे चित्र अखेर दिसले ते असे :–

| निरक्षर | प्राथमिक शिक्षण १ ते ७ इयत्ता | माध्यमिक शिक्षण ८ ते ११ इयत्ता | महाविद्यालयीन | पदव्युत्तर | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ११३ | १५३ | ८५ | ३५ | १४ | ४०० |

महाराष्ट्रातील निरनिराळ्या छोट्यामोठ्या गावी मुलाखती घेऊन आम्ही ज्या चारशे मुसलमानांची संपूर्ण माहिती मिळवली त्यापैकी २८ टक्के लोक निरक्षर असल्याचे आढळले, तर

ानांच्या पूर्व संस्कृतीचा विकास उर्दूतून झाला आहे. उर्दू भाषेला पाच-सहाशे वर्षांचा इतिहास आहे. रत्नागिरी, जळगाव येथेही उर्दू माध्यमाच्या शाळांची संख्या वाढत आहे. उर्दू माध्यमातून शिक्षण घेत असताना एक भाषा म्हणून मराठी भाषा शिकवली जाते. मराठी किंवा इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मुलांना पाठविल्यामुळे त्यांच्यावर चुकीचे संस्कार होतात. शाळेतील व घरातील संस्कृतीत फरक पडतो. या रात्रीच्या शाळेत एकही मुस्लीम विद्यार्थिनी शिकत नाही. मात्र एक मुस्लीम शिक्षिका तेथे काम करते.

### मागे पडण्याचे कारण

प्राथमिक व माध्यमिक शिक्षण उर्दूतून दिले तरी महाविद्यालयीन शिक्षण शक्यतो इंग्रजीतून घ्यावे असे काहीजणांना वाटते. मुसलमान विद्यार्थी इंग्रजी, गणित व विज्ञान या विषयांच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष करतात आणि त्यामुळे ते मागे पडतात असे सुशिक्षित मुसलमानांचे मत असल्याचे आढळते. तांत्रिक शिक्षण घेण्याकडे मुस्लीम विद्यार्थ्यांचा कल नाही; तसेच वाणिज्य शाखेकडे ते फारसे जात नाहीत. याबद्दल अनेकांनी खंत व्यक्त केली. पालघर तालुक्यातील एका उर्दू माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिकेने सांगितले : " नवीन अभ्यासक्रम मुस्लीम मुलांना जमत नाही. त्यामुळे ती नाराज होऊन शाळा सोडतात. मुस्लीम मुलांना कोणत्याच प्रकारची महत्त्वाकांक्षा नाही. मुलांपेक्षा मुली चांगला अभ्यास करतात. मुस्लीम मुले शेतीचे काम करणे कमीपणाचे समजतात. "

### आर्थिक मागासलेपण

आमच्याकडे ज्या चारशे मुसलमानांच्या मुलाखतींची संपूर्ण माहिती आहे त्यांच्यापैकी जवळजवळ पंचाहत्तर टक्के लोकांनी आपले उत्पन्न दरमहा पाचशे रुपयांपेक्षा कमी असल्याचे सांगितले. या कुटुंबातल्या विद्यार्थ्यांपैकी अनेकांनी इ. बी. सी. सवलतीमुळे आपल्याला प्राथमिक व माध्यमिक शिक्षण शक्य होत असल्याचे सांगितले. बहुतेकांचे पालक मटण-मासे विकणे, जुनेपुराणे सामान गोळा करणे, पाव-बटर विकणे, सायकली-स्टोव्ह वगैरे दुरुस्त करणे, बांगड्या, कपडा, भाजीपाला विकणे, यांसारखे व्यवसाय करून गुजराण करीत असल्याने पालकांच्या व्यवसायात मदत करण्याइतपत मुलगा वयाने मोठा झाला की, त्याचे शिक्षण चालू ठेवण्यापेक्षा आपल्या धंद्यात त्याला हाताखाली घेणेच पालकांना परवडते व पसंतही असते. तशात अभ्यासाविषयी मुलाला आच नसेल आणि तो नापास होत असेल तर तत्परतेने त्याला शाळेतून काढून पोटापाण्याच्या उद्योगाला लावण्याकडेच अनेकांची प्रवृत्ती असते. त्यामुळे मुस्लीम विद्यार्थ्यांमध्ये गळतीचे प्रमाणही जास्त आहे.

आर्थिक अडचणींमुळे माध्यमिक शिक्षण ज्यांना मधेच सोडून द्यावे लागले अशी अनेक उदाहरणे आढळली. तशीच मुंबईसारख्या शहरात महापालिकेची प्राथमिक शाळा घरासमोरचा रस्ता ओलांडला की, डोळ्यांसमोर दिसत असली तरीही शाळेत न जाणारी व संपूर्णतया निरक्षर असलेली अनेक मुलेही पहावयास मिळाली. मुंबईच्या एका उपनगरातल्या झोपडपट्टीत बरीच मुसलमान कुटुंबे राहतात. तेथे मुलाखत देणाऱ्या मंडळींनी सांगितले, ' अधिक मुले व कमी मिळकत यामुळे आम्ही मुलांना शिकवू शकत नाही. मुलींना शिकवण्याचा तर विचारच करीत नाही. या झोपडपट्टीत शाळेत जाण्यालायक बहात्तर मुले आहेत. हे सगळे मुलगे–मुली आम्ही मोजतच नाही–शाळेत जात नाहीत. आम्हीही त्यांना शाळेत पाठवत नाही. आमच्या या मोहल्ल्यात कोणीच शिकलेले नाही. आम्हाला अनेक गोष्टी कळतात; पण आता आम्ही काहीच करू शकत नाही. " दुसऱ्या एका उपनगरात स्टेशनला लागून असलेल्या झोपडपट्टीत एका कार्यकर्त्याने छोट्या मुलांसाठी बालवाडी व शाळा सुरू केली; पण शाळेत मुलेच न आल्याने ती बंद करावी लागली.

मुंबईच्याच आणखी एका उपनगरात स्टेशनलगत एक झोपडपट्टी बरीच वर्षे होती. या झोपडपट्टीत प्रामुख्याने मुस्लीम-वस्ती होती. आणीबाणीच्या काळात बळाचा वापर करून ही झोपडपट्टी उध्वस्त करण्यात आली आणि तेथील लोकांना स्टेशनपासून दूर अंतरावर दलदल असलेल्या भागात पर्यायी जागा देण्यात आल्या. या नव्या वसाहतीत मुलाखती घेताना आम्हाला सांगण्यात आले: "इथली बरीच मुले शाळेतच जात नाहीत. कारण त्यांना महामार्ग (हायवे) ओलांडून उर्दू शाळेत जावे लागते. 'हायवे' ओलांडणे लहान मुलांना जमत नाही. एवढ्या मोठ्या वस्तीसाठी अजून शाळा नाही. आजच शाळेच्या इमारतीचा पायाभरणी समारंभ झाला. यापुढे इमारत केव्हा होणार ते खुदा जाणे!"

## ८० घरांच्या गावात एक एस्. एस्. सी.

मुंबईसारख्या शहरात जेथे साक्षरतेचे एकूण प्रमाण महाराष्ट्रातील इतर अनेक भागांपेक्षा कितीतरी जास्त आहे तेथेही अशी स्थिती आढळते, मग खेडेगावात काय होत असेल? मुंबईतल्याच एका उपनगरात स्टेशनजवळच्या एका चाळीतल्या दहा बाय दहाच्या एका खोलीत एकूण शंभरजण राहतात. त्यांपैकी काही रात्री तेथे झोपावयास येतात, तर काही दिवसा! हे सगळे मुसलमान रत्नागिरी जिल्ह्यातल्या राजापूर तालुक्याच्या एका खेडेगावातून आलेले आहेत. त्यापैकी तिघे सोडले तर बाकीचे हॉटेल कामगार आहेत. त्यांनी आपल्या गावातल्या स्थितीबाबत सांगितले, 'गावात मुसलमानांची ऐंशी घरे आहेत. या सर्व घरांतून एकच मुलगा एस्. एस्. सी. झाला आहे. उर्दू शाळा आहे; पण मुले या शाळेतदेखील जात नाहीत. परिस्थितीमुळे मुलांना शिक्षण देता येत नाही. आमच्यापैकी दहा-बारा लोकांना फक्त उर्दू वाचता येते. गावातल्या हायस्कूलमध्ये सध्या मुस्लीम समाजापैकी कोणीही मुलगा जात नाही!'

शक्यतो उर्दू माध्यमातून शिकण्याबाबत बहुतेकजण आग्रह धरीत असले तरी त्यामुळे उर्दू माध्यमाच्या शाळा महाराष्ट्रात सर्वत्र वाढत आहेत असे दिसत नाही. कोल्हापूर जिल्ह्यातल्या उर्दू प्राथमिक शाळांपैकी अनेक शाळा मुलांची पुरेशी संख्या नसल्याने बंद पडल्या. त्या सुरू करण्याच्या प्रचारमोहिमेत सांगली, निपाणी, येथील उर्दूच्या शिक्षकांनी पुढाकार घेतला. त्यामुळे काही शाळा पुन्हा सुरू झाल्या. मात्र या प्राथमिक शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये मुलींची संख्या मुलांच्या संख्येपेक्षा अधिक आहे असे मुलाखतीत सांगण्यात आले. पुण्याजवळच्या एका गावात मुस्लीम वस्ती असूनही एकही उर्दू शाळा नाही! १९६५ साली गणेशोत्सवाच्या वेळी झालेल्या दंगलीत शाळेच्या इमारतीला आग लावण्यात आली. तेव्हा ही एकुलती एक उर्दू शाळा जी बंद पडली ती कायमची बंद झाली! जेथे शाळा आहे तेथे उर्दू जाणणारे शिक्षक मिळत नाहीत, असे औरंगाबादच्या एका मुस्लीम पत्रकाराने सांगितले. मुंबईसारख्या शहरात उर्दू शाळांची संख्या काही कमी नाही. तेथे शिक्षकांची किंवा पाठ्यपुस्तकांचीही कमतरता फारशी भासत नाही. तरीही काय स्थिती आहे याचे वर्णन एका शिक्षकाने केले: 'पन्नास विद्यार्थ्यांनी जर पहिल्या इयत्तेत प्रवेश घेतला, तर त्यातील जेमतेम दहा मुले सातवीपर्यंत जातात. बाकीची चाळीस मध्येच शाळा सोडतात. आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना मध्येच शाळा सोडावी लागते. उर्दूसाठी आम्ही जेव्हा झगडा करतो तेव्हा आम्ही गद्दार (देशद्रोही) समजले जातो.'

## नोकरी नाही, तर शिकायचे कशाला?

आपण शिक्षण घेतले तरी आपण मुसलमान असल्यामुळे आपल्याला नोकरी मिळत नाही अशी भावना अनेक सुशिक्षित मुसलमानांमध्ये खोलवर रुजलेली आढळली. तसे काही अनुभवही आम्हाला ऐकावयास मिळाले. 'नोकरीच मिळत नाही तर शिकून काय उपयोग? शिकूनदेखील

जर हॉटेलमध्येच नोकरी करावी लागणार असेल तर शिक्षणाचा उपयोग तरी काय ?' ही या संदर्भात अनेकदा ऐकलेली प्रातिनिधिक प्रतिक्रिया लक्षात राहिली. काही ठिकाणी नोकऱ्या न मिळाल्याने सुशिक्षित मुस्लीम तरुणही मटका-अड्डा चालवणे, चोरटी आयात करणे, दारू गाळणे, सिनेमा-तिकिटांचा काळाबाजार करणे, वगैरे बेकायदेशीर व्यवसायांकडे ओढले जात असल्याचे सांगण्यात आले.

महाराष्ट्रातील मुस्लीम समाजाच्या शैक्षणिक स्थितीचे चित्र आम्हाला पहावयाला मिळाले ते असे ! शैक्षणिक प्रगतीच्या मार्गात मुसलमानांनाच फक्त अडचणी येतात असे नाही. मात्र त्यांच्या काही खास समस्या आहेत. बऱ्यावाईट समजुती आहेत. शिक्षणविषयक समस्यांवर तोडगे सुचवताना या सगळ्याचे भान ठेवणे आवश्यक आहे असे वाटते.

■ ■

# ३२

## विद्यार्थ्यांच्या शब्दात विद्यार्थ्यांचे प्रश्न –एक नमुना प्रयोग

चंद्रशेखर कापडणीस

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे प्रश्न जाणून घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडून माहिती मिळविण्याचे निरनिराळे प्रकार या संग्रहातील शोध-निबंध लिहिलेल्या लेखकांनी हाताळले आहेत. त्यांच्याच जोडीला विद्यार्थ्यांच्या स्वतःच्या शब्दांत त्यांचे प्रश्न कसे दिसतात हे पाहण्यासाठी एक प्रयोग केला. या प्रयोगात पुणे विद्यापीठाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रस्तुत लेखकाने गोवले. विविध विद्याशाखांच्या विद्यार्थ्यांना भेटून 'तुम्हाला जाणवतात त्या तुमच्या प्रश्नांबद्दल लिहा !', असे लेखकाने विद्यार्थ्यांस सुचविले. या सूचनेप्रमाणे २१ विद्यार्थ्यांनी टिपणे लिहून दिली. या २१ टिपणांचा अभ्यास केल्यावर पुढील गोष्टी नजरेत भरल्या :

१. विद्यार्थ्यांपुढे उभ्या राहिलेल्या प्रश्नांचे स्वरूप सामान्यतः आर्थिक, कौटुंबिक व भावनिक आहे.

२. विद्यार्थ्यांपुढील प्रश्न त्यांच्या वैयक्तिक अडी-अडचणींतून निर्माण झाले आहेत.

३. विद्यार्थी आजूबाजूला जो स्वार्थाचा आविष्कार पाहतात, ज्या लबाडचा त्यांच्या ध्यानात येतात, त्याने विद्यार्थी व्यथित आहेत. या परिस्थितीचे दडपण विद्यार्थ्यांच्या मनावर येत आहे. या दडपणाचे प्रमुख कारण 'या जगात आपले पुढे कसे होणार ?' हा विचार आहे.

४. विद्यार्थ्यांना आपल्या स्वतःच्या भूमिकेची जाण अतिशय अपुरी आणि अस्पष्ट असल्याचे जाणवते. कदाचित त्यामुळेच त्यांच्या लेखनातून त्यांच्या सामाजिक जबाबदारीचे संदर्भ व त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या, प्रतिबिंबित झाल्या नाहीत.

५. स्वतःच्या अडचणी विद्यार्थी पुष्कळदा इतरांच्या–मित्र-मैत्रिणींच्या–परिस्थितीच्या वर्णनातून सुचवितात.

### आविष्काराला दिलेले मथळे

हाती आलेल्या २१ 'अनामिक' लेखकांच्या टिपणातील आविष्कार विचारात घेऊन, प्रत्येक टिपणाला जास्तीत जास्त अर्थवाहक मथळा देण्याचा प्रयत्न केला. त्याचा परिणाम पुढे दिला आहे :

१. नाती, प्रेमसंबंध व भावनिक प्रश्न; २. अस्वस्थ करणारे भावविश्वाचे पर्यावरण; ३. आर्थिक समस्या : नाती-गोती; ४. भावजीवनात निर्माण झालेले विविध गंड; ५. नोकरी-व्यवसायाची चिंता : औद्योगिक क्षेत्राची ओढ; ६. सवयी, व्यसने आणि भीती; ७. शिक्षण-

पद्धती, अभ्यासक्रमाची निरर्थकता, अध्यापनपद्धती– ' जोडयाच्या मापाचा पाय बनविण्याचा प्रकार '; ८. ' एकान्त ' हवा वाटतो; पण ' एकाकी 'पणाचे काय ? ९. कौटुंबिक अशांतता– पायावर डोके ठेवणारा, हात उगारतो तेव्हा; १०. शिक्षण की घर ?; ११. मैत्रिणीचा प्रेमभंग– सरळ मार्गी जीवनाला अचानक कलाटणी; १२. राखीव जागा– समस्येचे उत्तर की नवी समस्या ?; १३. प्रश्न अनेक आणि महत्त्वाचे, अग्रक्रम कुणाला द्यावा ?; १४. सोबतीची ओढ, १५. अपंगत्वावर मात कशी करायची ?; १६. व्यवसायाची निवड, मार्गदर्शनाचा अभाव; भोवतालच्या वातावरणाशी जुळवून घेण्यातल्या अडचणी; १७. पालकांचे कष्ट, डिग्रीचा मर्यादित उपयोग आणि पोटाचा प्रश्न; १८. जागांचे आरक्षण : मागासवर्गीय : संघर्ष अटळ; १९. शिक्षणपद्धती, संस्कारक्षमतेचा अभाव, घसरगुंडी; २०. वैचारिक गोंधळ; २१. कु टुंबियांच्या अपेक्षा, भावनिक संघर्ष आणि असहाय्यता.

## विद्यार्थ्यांच्या लेखनांतील काही उतारे

विद्यार्थी स्वतःचे प्रश्न कोणत्या भाषेत व कोणत्या पद्धतीने मांडतात, त्यांची प्रश्नांकडे पाहण्याची दृष्टी कशी आहे, ह्याची थोडीशी कल्पना यावी या हेतूने विद्यार्थ्यांच्या टिपणातील काही उतारे पुढे दिले आहेत :

१. " ती महासागराला आलेले सहस्रदलाचे कमलपुष्प होती, सौंदर्यसंपन्न. समृद्धीचे झळाळते तेज तिच्या अंगावरून सांडायचे. शिवाय प्रतिभेचा सुंदर संगम, तिच्या सौंदर्याची किनार शोभायचा. त्यामुळे तिच्या दृष्टीने मी अगदीच अफाट सागरकिनाऱ्यावरला एक धूलिकण ! तरीही मी तिला हवाहवासा वाटायचा ! का ? कुणास ठाऊक ? परंतु तिच्या योग्यतेचे आपण नाही, या सार्थ जाणिवेने मी अंतर ठेवून राहायचा. एक अनमोलरत्न झोपडीत कशाला ? असं म्हणून मी टाळायचा तिला. टाळीत आलो. ती मात्र तशीच मनातून रडत आक्रंदत राहिली. मीही एका अगतिक वेदनेची शिकार बनलो; परंतु तिच्या मनाचा एक कोपरा, माझ्या स्नेहाच्या भुकेने तसाच राहिला...

" आम्ही बरोबरीने कॉलेजात होतो. ती मला सीनियर; परंतु साहित्याच्या ओढीने आमची ओळख वाढली आणि तिचं स्नेहात रूपान्तर झालं...

" वेदनेच्या सोबतीत मी मग्न असतो. त्या भग्नस्वप्नांचे पिसारे फुलवीत..."

२. "...सध्याचे गतिमान जीवन. औद्योगीकरणामुळे सध्याचे जीवन किती गतिमान झाले आहे, याची कल्पना प्रत्येकाला आहेच. आपण या गतिमान जीवनात कितपत टिकाव धरू याची कल्पना प्रत्येकाला असतेच असे नाही. या गतिमानतेमुळे सामान्य लोक आपल्या जीवनात कितपत प्रगती करू शकतात ? त्यांना आपल्या नित्य गरजा भागविता येतात की नाही...... भरधाव वेगामुळे आपण एकमेकांपासून किती दूर जातो आहोत... व्यक्ती निसर्गापासून दूर चालली आहे... व्यक्तीव्यक्तींमधील सतत वाढत जाणारे अंतर... निसर्गाकडे पाहण्याचा सध्याचा दृष्टिकोन... गतिमान जीवन... वाढती लोकसंख्या... व्यक्तीचे मानसिक स्वास्थ्य."

३. " ज्या समाजात आपण राहतो त्या समाजातील व्यक्तींशी आपले संबंध जिव्हाळ्याचे, आपुलकीचे असावेत असे वाटते...

" फूटपाथवरून भीक मागत हिंडणारी ती अनाथ मुले. त्यांचे काय ? आई-वडिलांच्या प्रेमाला पारखी झालेली मुले. हॉटेलमध्ये कपबशा विसळणारी मुले. त्यांचे काय ? मद्यपानाच्या व्यसनाने ज्यांची घरकुले उध्वस्त झाली, त्यांच्या लहान मुलांचे काय ?...आर्थिक समस्या !

"...ज्या आर्थिक समस्येमुळे समाजातील लहान बालकांची अनिष्ट जोपासना होत आहे

तीच आर्थिक समस्या माझ्या प्रगतीमध्ये काही अडथळा तर निर्माण करणार नाही ना ?"

४. "एकच प्रश्न सांगणे कठिण...मोठा प्रश्न म्हणजे एम्. एस्सी.तून लवकरात लवकर सुटणे हा आहे...नुसतेच सुटून चालणार नाही तर चांगले मार्कस् पडणे आवश्यक आहे...

" ...राहण्यास जागा नसणे...घरापासून लांब राहण्याची सवय नसणे...त्यामुळे काहीही करावेसे न वाटणे...सारखी घरची आठवण येणे...अभ्यासाचा बोजा वाढलाय...आलेल्या मानसिक ताणामुळे लोकांशी तुसडेपणाने वागणे...आपण अभ्यास करायला नालायक आहेत... आपली दिशाच चुकली...(शुद्धलेखन बघू नये)."

५. "...'नोकरी'... मी येत्या एस्. एस्सी.(फिजिक्स) परीक्षेतून सुटल्यावर 'पुढे काय करावे ?' ?' कोणता मार्ग पत्करावा ?... सभोवतालचे अनुभव डोळ्यांसमोर उभे...राहतात ...परिणाम द्विधा मनस्थिती...यानंतर नोकरीसाठी प्रमुख दोन क्षेत्रे आहेत–१.शिक्षणक्षेत्र, २. औद्योगिक क्षेत्र. कधी कधी शिक्षण क्षेत्र चांगले वाटते; पण प्रामाणिकपणे सांगायचे तर या क्षेत्राचे मूळ महत्त्व अलीकडे ओसरू लागलेले आहे. 'औद्योगिक क्षेत्रा'चा विचार कधीकधी प्रबळपणे मनात येतो; कारण स्वतःच्या अंगी असलेल्या गुणांचा तेथे वापर करण्यास संधी मिळू शकेल असे वाटते."

६. "सिगारेट सोडावी अशी मनापासून इच्छा असूनसुद्धा मी ते करण्यास असमर्थ आहे... पण मला ते करायचंय...अशा सवयी...लोकांच्या सहवासामुळे लागतात...आश्चर्य वाटते की ११ वीपर्यंत सिगरेटचा धूरसुद्धा मला सहन होत नव्हता....हॉटेलात एका मुलाने सिगरेट ऑफर केली...त्याला विश्वासाने नाही म्हटले असते तर प्रसंग टळला असता...पण मला खरेच त्या दिवशी सिगरेटविषयी 'कुतूहल' निर्माण झाले होते. पिताना कसे वाटत असाव ?... दुष्परिणाम जाणवू लागला की आपण ती सवय सोडण्याचा विचार करतो...धावपळीने मला आता थकवा येतो...पक्के ठरवले तर फारसे कठीण नाही...सिगरेट न पिण्याने मी मरणार नाही...पण त्रास मात्र नक्की होणार ! ..."

७. " ...सत्रपद्धतीच्या मूलभूत बाबींपैकी फारच थोड्या गोष्टी इथे उतरल्या आहेत. इथे पाहिले तर दिसते की, सहनशक्तीचा अंत पाहणारा अभ्यासक्रम, कंटाळवाणी लेक्चर्स, उशीरा होणाऱ्या परीक्षा, त्याहूनही उशीरा लागणारे निकाल. हे सगळे कसे काय उद्‌भवले ? या प्रश्नाचे उत्तर सध्याच्या दोषपूर्ण शिक्षणपद्धतीतच सामावलेले आहेसे वाटते....एक यक्षप्रश्न...हे सर्व करून उपयोग काय ? या शिक्षणानंतर मला काय फायदा मिळणार ? ...विद्यार्थ्यांच्या आवडी, प्रवृत्ती, क्षमता, यांच्यानुसार अभ्यासक्रम ठेवायचे पण तसे झाले नाही. एकूण 'जोड्याच्या मापाचा पाय' बनवण्याचा प्रकार आहे....विद्यापीठाने नव्या दिशेने पाऊल उचलले पाहिजे....कोणाचे अनुकरण नको...आजची गरज, शिक्षणाचा दर्जा, इत्यादी पुढे ठेवून एखादी नवी शिक्षणपद्धती अंमलात यावी."

८. " ..राखीव जागा : एक समस्या...प्रत्येक वेळी मुदत वाढवून द्यावी लागते...निवडून येण्यासाठी...निदान शैक्षणिक क्षेत्रात राखीव जागा असू नयेत....मी राखीव जागांच्या विरोधात आहे असे नाही....त्यांना आत्मनिर्भर होण्यास मदत करावी...जोपर्यंत ही गोष्ट ते मनावर घेत नाहीत तोवर हे अशक्य आहे. हमीने त्यांच्या प्रयत्नात शिथिलता येईल..."

९. " ...अपंगत्व...पोलिओ झाला आणि अपंगत्व कायमचे पदरी पडले...कळत नकळत मनावर खूप परिणाम होत गेले....एकटी एकटी राहू लागले...आपण इतरांपेक्षा कमी आहोत ही जाणीव टोचत राहिली. चार माणसांत राहायला नको वाटायचे...पुढे शाळा...माझ्यात बदल होऊ लागला...शिक्षणाने अपंगत्वावर मात करू वाटले...अभ्यास केला...यश संपादन करीत

गले...शिक्षण करून, नोकरी करून, अपंगांस साह्य करीत राहणे हाच उपाय."

१०. "...प्रथम वाटले मला काही अडचणीच नाहीत...'खऱ्याचे मरण'...दलितांना सगळ्या सोयी द्या...पण त्यांना न्याय देताना इतरांवर अन्याय नको!"

"एव्हढे शिकायचे पण भवितव्याची खात्री नाही. किती वर्षे बेकार राहावे लागेल, सांगता येत नाही. आम्ही जेव्हा आमची 'सीनियर' मुले अशी उदास आणि बधिर झाल्याचे पाहिले तेव्हा वाटले शिक्षणपद्धती व नोकऱ्या यांचा मेळ का बसत नाही, बसवत नाहीत."

■ ■

संदर्भ सूची

विषय सूची

लेखक-परिचय

# निवडक संदर्भ सूची

**संकलक** : शां. ग. महाजन

**सहाय्यक** : रेवती पानसे

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांविषयी अनेक भाषांमध्ये व देशांमध्ये विविध लेखन झाले आहे. भारतातील आणि विशेषतः महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या प्रमुख प्रश्नांविषयी, मराठी व इंग्रजी या भाषांतील ही निवडक परंतु प्रातिनिधिक विषयवार संदर्भ-सूची आहे. सूचीमध्ये संदर्भग्रंथ, शासकीय अहवाल, ग्रंथ, प्रबंध, नियतकालिकांमधील लेख आणि या प्रश्नांशी संबंधित प्रमुख नियतकालिकांची माहिती दिली आहे. विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांचा सखोल अभ्यास करण्यास या सूचीची मदत होईल असा विश्वास वाटतो. माहितीतील तपशील पुढील क्रमानुसार दिलेले आहेत :

१. आतापर्यंत झालेले संशोधन २
२. नियतकालिके ३
३. ग्रंथ ३
४. प्रबंध आणि दीर्घनिबंध ५
५. लेख ६

**सूचीतील विषय**

६. शिक्षण
७. उच्च शिक्षण, शिक्षण पद्धती ७
८. विद्यार्थी–पालक–शिक्षक संबंध ८
९. शिक्षणाचे माध्यम ९
१०. सहशिक्षण, स्त्री शिक्षण ९
११. विद्यार्थी आणि ग्रंथालये १०
१२. शिक्षणसंस्था १०
१३. भारतीय विद्यापीठे १०
१४. खुले विद्यापीठ, पत्रद्वारा शिक्षण ११
१५. स्वायत्त महाविद्यालये १२
१६. महाविद्यालये, विद्यार्थ्यांचा सहभाग १२
१७. परीक्षा पद्धती १३
१८. सत्र पद्धती १४
१९. खाजगी शिक्षणवर्ग, परिक्षेतील गैरप्रकार १४
२०. अभियांत्रिकी शिक्षण १४

| | | |
|---|---|---|
| २१. | वैद्यकीय शिक्षण | १४ |
| २२. | वाणिज्य शिक्षण | १५ |
| २३. | विधि शिक्षण | १५ |
| २४. | वास्तुशिल्प शिक्षण | १५ |
| २५. | अध्यापन शिक्षण | १५ |
| २६. | चित्रपट विषयक शिक्षण | १५ |
| २७. | ग्रामीण विद्यार्थ्यांचे प्रश्न | १५ |
| २८. | वर्गीकृत जाती–जमाती/दलित विद्यार्थ्यांचे प्रश्न | १६ |
| २९. | आदिवासी विद्यार्थ्यांचे प्रश्न | १६ |
| ३०. | परदेशी विद्यार्थ्यांचे प्रश्न | १७ |
| ३१. | शारीरिक शिक्षण, राष्ट्रीय सेवा योजना | १७ |
| ३२. | खेळ, गिर्यारोहण | १७ |
| ३३. | विधायक कार्य, रंगभूमी, महाविद्यालयीन नियतकालिके | १७ |
| ३४. | व्यवसाय मार्गदर्शन, नोकरी इ. | १८ |
| ३५. | शुल्क, शिष्यवृत्त्या, सवलती | १८ |
| ३६. | दुष्काळग्रस्त विद्यार्थी | १९ |
| ३७. | लैंगिक शिक्षण | १९ |
| ३८. | वसतिगृहे | १९ |
| ३९. | स्पर्धा–परीक्षा | १९ |
| ४०. | परदेशांत शिक्षण | १९ |
| ४१. | विद्यार्थी संघटना | १९ |
| ४२. | युवकमन, असंतोष व बेशिस्त | २० |
| ४३. | सर्वसाधारण प्रश्न | २१ |
| ४४. | सामाजिक प्रश्न | २३ |

## १. आतापर्यंत झालेले संशोधन

भारतातील निरनिराळ्या विद्यापीठांमध्ये विद्यार्थीविषयक प्रश्नांचा अभ्यास चालू आहे. एम. एड. आणि पीएच. डी. यासाठी या प्रश्नांचा अभ्यास केला जात आहे. तसेच विद्यापीठे आणि संशोधन संस्थांमध्ये संशोधन प्रकल्पही हाती घेतले जात आहेत. संशोधनासाठी निवडलेले विषय, संशोधकाचे नाव, संशोधन मार्गदर्शक. संशोधन हाती घेतलेल्या संस्थेचे नाव इत्यादि माहिती खालील संदर्भ ग्रंथांमध्ये मिळते. हे संशोधन प्रामुख्याने शिक्षण, समाजशास्त्र, मानसशास्त्र, राज्यशास्त्र या विषयांत चालू आहे. या माहितीवरून विद्यार्थी प्रश्नांविषयी नवीन संशोधन कोणत्या बाबींवर करणे आवश्यक आहे हे कळून येते. तसेच एम. ए., पीएच. डी. साठी संशोधन विषय निवडण्यासाठी मार्गदर्शन मिळू शकते.

INTER-UNIVERSITY BOARD OF INDIA, New Delhi. (name changed as Association of Indian Universities).

A Bibliography of Doctoral Dissertations accepted by Indian universities: 1857-1970. Social Sciences. New Delhi, Author, 1974.

( For Years) 1970-75; 1975-76; 1976-77; 1977-78; 1978-79; 1979-80 (Social Sciences and Humanities ).

IUB OF INDIA AND CEYLON, New Delhi.

Bibliography of Doctoral Dissertations. 1857-1970. (subjectwise pamphlets) Education, Library science, Journalism. 1972. Psychology. 1972.

COUNCIL OF ORIENTAL RESEARCH, Bhopal.

National Register of Doctoral Dissertations accepted and in progress in Social Sciences and Humanities in Indian universities. Part One. Social Sciences. Bhopal, Author.

– V. 3. Education and Educational Psychology. 1979.

– V. 4. Sociology, Social Anthropology and Criminology. 1980.

– V. 8. Psychology. 1980.

( १९७० पासून विद्यार्थी प्रश्नांवर कोणते संशोधन चालू आहे याविषयी माहिती वरील ग्रंथांमध्ये मिळते).

NCERT, New Delhi.

Educational investigations in Indian universities. 1939–1961. New Delhi, Author, 1966. ( M. Ed. and Ph. D. Dissertations).

BUCH (M B). Ed. A Survey of research in education. Baroda, Centre of Advanced Study in Education, M. S. University of Baroda, 1974.

BUCH (M B). Ed. Second survey of research in education (1972-78). Baroda, Society for Educational Research and Development, 1979.

## २. नियतकालिके

(नियतकालिकाचे नाव, स्थापना वर्ष, प्रसिद्धी कालखंड, प्रकाशकाचे नाव व पत्ता, वर्गणी या क्रमाने माहिती देण्यात आली आहे.)

EDUCATION QUARTERLY; 1950; Quarterly.

The Controller of Publications, Govt. of India; Delhi 110 054; Rs. 24.

INDIAN EDUCATION ABSTRACTS; 1955; Quarterly.

Ministry of Education and Culture, Govt. of India; G/D Wing, Shastri Bhavan, New Delhi 110 001; Rs. 15.60.

UNIVERSITY NEWS; 1963; Bimonthly.

Association of Indian Universities; Rouse Avenue, New Delhi 110 002; Rs. 16.

YUVA BHARATI; 1973; monthly.

Vivekananda Kendra, Madras (Vivekananda Rock Memorial Committee 36, Singarachari Street, Triplicane, Madras 600 005; Rs. 11.

## ३. ग्रंथ

( माहितीचा क्रम : ग्रंथकारनाम, ग्रंथनाम, प्रकाशनस्थल, प्रकाशक, प्रकाशनवर्ष, आवृत्ती )

अकोलकर (ग वि) आणि इतर. विद्यार्थ्यांची समाजसेवा: तत्त्व व व्यवहार. पुणे, श्री विद्या प्रकाशन, १९७२.

गोळे (वसंत हरी). महाराष्ट्रातील विद्यापीठांपुढील शैक्षणिक व शासकीय समस्या. मुंबई ४, मुंबई मराठी साहित्य संघ

नित्सुरे (य गो). कॉलेज विद्यार्थ्यांना नवे आव्हान. पुणे, य. गो. जोशी

पाटील (लीला) आणि कुलकर्णी (वि म). आजचे शिक्षण, आजच्या समस्या. पुणे ३०, श्री विद्या प्रकाशन, १९७१ (बी. एड्.च्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक समस्यांवरील ग्रंथ.)

वीरकर (प्र कृ) आणि इतर. परीक्षा पद्धतीतील क्रांति (Eductional evaluation) अर्थात शैक्षणिक संमूल्यन. पुणे, आ. २ री. १९७१

ALTBACH (Philip G). Ed. Turmoil and transition : Higher education and student politics in India. Bombay, Lalvani Publishing House, 1968

EAKIN (Tarry Clay). Students and politics : Comparative study with a perspective set from past survey research on political behaviour. Bompay, Popular Prakshan, 1972

DAMLE (Yashwant Bhaskar). College youth in Poona : A study of elite in the making. Poona, Deccan College, 1966

JAFAR (S M). Comp. Student unrest in India : A select bibliography. Gurgoan (Haryana). Indian Documentation Service, 1977

JAMUAR (K K). Study habits of college students. Allahabad, Indian International Publications, 1974

KAKAR (Sudhir) and CHOWDHRY (Kamala). Conflict and choice : Indian youth in a changing society. Bombay, Somaiya Publications, 1970

MEHTA (Prayag). Indian youth : Emerging problems and issues. Bombay, Somaiya Publications, 1971

PARKER (Clyde A). Ed. Selected readings in student services for Indian universities and colleges. New Delhi, U. S. Educational Foundation in India, 1973

RAY (Anil Baran). Students' politics in India · Role of caste, language and region in an Indian university. New Delhi, Manohar Book Service. 1977

SAIYIDAIN (K G). National service scheme : A report. Delhi, Manager of Publications, 1961

SARKAR (S N). Student unrest : A socio-psychological study. Calcutta, India Book Exchange, 1974

SATHE (Malati V). A critical study of the organisation and administration of youth welfare activities in Bombay state : With special reference to physical education and recreation. Poona, 1957

SHINDE (A B). Political Consciousness among college students. Bombay, Thaker and Co., 1972. Rs. 35

SINGHAL (Sushila). Academic leadership and student unrest. New Delhi, Newman Group of Publishers, 1977

SINGHVI (L M). Ed. Youth unrest : Conflict of generations. Delhi, National Pub. House, 1972 (Published under the auspices of the Inst. of Constitutional and Parliamentary Studies)

SIRSIKAR ( Vasant Manjunath ). Social and political attitudes of post-graduate students of the University of Poona 1960–61. Poona, University of Poona, 1963

Association of Indian Universities, New Delhi. Impact of question banking in universities. New Delhi, Author, 1979 (Asso. of Indian Universities, status report series. )

Institute of Constitutional and Parliamentary Studies, New Delhi. Student unrest : Problems and perspectives. New Delhi, Author, 1966

Poona University, Mathematics and statistics department. Study of post-graduate students (1960—61) residing in Poona city of the University of Poona. Poona, Author, 1961

Punjab University, Department of Youth Welfare. Youth speaks. Chandigarh, Author, 1966

University Grants Commission, New Delhi. Report on the problem of student indiscipline in Indian universities. New Delhi, Author, 1960

University Grants Commission, New Delhi. Report of the committee on students' welfare and allied matters. New Delhi, Author, 1967

Youth in India today; A report of the survey on the attitudes of youth and the values to which they remain attached. Bombay, Allied publishers, 1963 ( Issued under the auspices of the World Assembly of Youth )

## ४. प्रबंध आणि दीर्घनिबंध

DABADE (A R). Aspirations of students and their socio-economic background from St. Dnyaneshwar Hostel in Poona. M. A. Soc. Poona U., 1971

DESAI (N). Socio-economic background of married women students of the University and their educational problems. S. N. D. T. U., 1969 ( NCERT and SNDT financed )

DUNAKHE (A R). An investigation into the reading interests and habits of the first year of the degree course Marathi students studying in colleges affiliated to the University of Poona. V. I–II. Ph. D. Edu. Poona U. 1978

FAROOK (F A). A study of the complexes and maladjustments of university youths by means of world association and cardiopneumopolygraph methods. Ph. D. Psy. A. M U. 1974

GOGATE (S B). Critical study of the conditions of second year of junior colleges in Maharashtra, 1976-77 : With special reference to the academic performance of students (Ph. D ). Edu. Poona U. 1979

INWAT (P M). A study of the problems of Thai students residing at Pune for taking higher education in the University of Poona and its affiliated institutes. U. P. Monao Phil. Edu. 1980

JAMUAR (K K). Investigation of some psychological factors underlying the study habits of college students. Ph. D. Edu. Pat. U. 1961

KARANDIKAR (S P). Problems and conditions of students in Poona University area. Ph. D. Edu. Poona U. 1975

KATHURIA (M). An investigation of some personality determinants of vocational maturity and career indecisiveness. Ph. D. Psy. Raj. U. 1974

MULAY (R S). Study of needs and problems of adolescents. University Training College, Nagpur, 1971. (UGC financed)

PIMPALKHARE (M H). Study of Arts, Science and Commerce Colleges in Maharashtra (1971-1972). Ph. D. Edu. Poona U. 1975

REDDI (N Y). Adolescent adjustment in relation to home environment. Ph. D. Psy. Osm. U. 1966

SATHE (M V). Youth welfare activities in the Bombay state : A critical study of the organisation and administration of youth welfare in the Bombay state with special reference to physical education and recreation. M. Ed. Poona U. 1957

SAWANT (N Y). Aspirations of students and their socio-economic background from Students' Welfare Asscciation's hostels in Poona. M. A. Soc. Poona U. 1971

SAYED (Z B). Study of Muslim girl students in Poona. M. A. Soc. Poona U. 1971

SHAH (M V). Study of unemployed graduates in Poona : Some socio logical implications. Ph. D. Soc. Poona U. 1978

SRI CHANDRA. A psycho-social study of tension in college going youth Luc. U. 1971. (ICSSR Financed)

UPADHYAYA (R). Student unrest – A Study of degree colleges of Eastern Uttar Pradesh. Ph. D. Edu. BHU. 1975

WIG (N N) and NAGPAL (R N). A study of mental health in failing university students. Post-graduate Institute of Medical Education and Research, Chandigarh, 1970 (ICMR financed)

INDIAN EDUCATION INDEX ( 1947-1978). Ed. by K. G. Tyagi Sponsored by ICSSR and IIE, Pune. New Delhi, Acharan Prakashan, 1980

## ५. लेख

या भागामध्ये विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांविषयीच्या इंग्रजी व मराठी लेखांची सूची दिली आहे. माहितीचा क्रम: लेखक, लेखनाम, नियतकालिक. नाम (आवश्यक तेथे संक्षेपनाम) खंड/ वर्ष क्रमांक. अंक क्रमांक. महिना दिनांक वर्ष, पृष्ठ क्रमांक.

**नियतकालिकांच्या नावांचे संक्षेप :**

| | |
|---|---|
| Agra Uni Bull | Agra University Bulletin |
| Educ Q | Education Quarterly |
| I Wkly | Illustrated Weekly of India |

| | |
|---|---|
| J Higher Educ | Journal of Higher Education |
| J Legal Educ | Journal of Legal Education |
| J Shivaji Univ | Journal of Shivaji University |
| Marathwada Univ J | Marathwada University Journal |
| New Front Educ | New Frontiers in Education |
| Uni News | University News |

**महिन्यांच्या नावांचे संक्षेप**

| | | | |
|---|---|---|---|
| Jan | जाने | Jul | जुलै |
| Feb | फे | Aug | ऑ |
| Mar | मार्च | Sep | सप्टें |
| Apr | एप्रिल | Oct | ऑक्टो |
| May | मे | Nov | नोव्हें |
| Jun | जून | Dec | डिसें |

## ६. शिक्षण

अकोलकर (ग वि). दोष शिक्षणाचा की परिस्थितीचा? साधना. २६ जाने १९७१ : ११

आयरन (जे डब्ल्यू). शिक्षण वाया जात नाही. समाज प्रबोधन पत्रिका. जून १९६७ : ११

कामतीकर (प्रकाश). एक टिपण. साधना. शिक्षणशुद्धि विशेषांक. २६ जाने १९७१ : ५४ (आजचे शिक्षण...)

काळे (शिवराम श्रीधर). शैक्षणिक आव्हान व त्यातील घटकांच्या भूमिका. साधना. २६ जाने १९७१ : ३५

केतकर (श्री वि). विद्यार्थ्यांना बोल कशाला लावता? उदार शिक्षणाकडे लक्ष द्या. मनोहर. ऑगस्ट १९६८ : ४१ (केवळ विद्यार्थी वर्गातच नव्हे,तर समाजाच्या सर्व थरात आजकाल वैफल्य माजले आहे. त्याचे मूळ अर्थोत्पादक शिक्षणावर जो अवास्तव भर दिला जातो त्याच्यातच. त्यासाठीच हे विवेचन...)

गायकवाड (मिरदेव). शिक्षणास मिळालेली दिशा. प्राध्यापक. जून १९७८ : ९-१०

जोशी (रा भि). आपल्या शिक्षणाची उद्दिष्टे. साधना. २६ जाने १९७१ : १६

तुळपुळे (प्रभा). शिक्षण, सर्वांगीण व्यक्तिमत्त्व आणि क्रांती-प्रवणता. साधना. २६ जाने १९७१ : २०

तुंगार (देवदत्त). मराठवाड्यातील शैक्षणिक समस्या. समाचार. दिवाळी अंक १९६८ : ५५

दाभोलकर (देवदत्त). आगामी दशकातील शिक्षणविषयक धोरण. प्राध्यापक. मे-जून १९७९ : १४-१९

नाईक (जे पी). शैक्षणिक प्रयोगशीलतेची नवी दिशा. साधना. २ ऑक्टो १९७९ : ५

पाटील (मंदा). शिक्षण बदलले पाहिजे. साधना. १५ ऑगस्ट १९६९ : ६०

बिवलकर (राम). भारतातील विद्यापीठीय शिक्षण : उजळती क्षितिजे. योजना. १६ नोव्हें १९८० : ११

लुकतुके (उल्हास). जाणार कुठे? साधना. २६ जाने १९७१ : ५७ (आजचे शिक्षण—एक मानसशास्त्रीय विश्लेषण)

वर्दे (सदानंद). जीवनानुगामी शिक्षणपद्धती : काही विचार. प्राध्यापक. जाने १९७९ : ९-१८

सप्तर्षी (कुमार). विद्यार्थ्यांच्या आरोग्याला घातक असे शैक्षणिक वर्ष. बळिराजा. एप्रिल १९७२ : ४५

सावळापूरकर (पां कृ). आमच्या शिक्षणक्षेत्रातील काही खांचखळगे. विवेक. दिवाळी अंक १९६७ : ३९

आजचे वैज्ञानिक शिक्षण औद्योगिक प्रगतीस उपयुक्त आहे काय ? : परिसंवाद. मराठी विज्ञान परिषद पत्रिका. डिसें ११७० : ३

आमच्या शिक्षणक्षेत्राला जडलेली ही दुखणी कशी नष्ट होतील ? किर्लोस्कर. ऑक्टो १९७१ : १२ (शिक्षणक्षेत्रातील काही अप-प्रवृत्तींवर टाकलेला प्रकाश.)

शैक्षणिक समस्या (अग्रलेख). साधना. ११ नोव्हें १९७८ : ७

MALHOTRA (P L). Work–oriented education : An approach. Uni News. 12 (11) Nov 1974 : 4

SEN (Asoke). Education in a changing world : A plan for practical approach Educ Q. 29 ( 1 ) April 1977 : 16

### ७. उच्च शिक्षण, शिक्षण पद्धती

पांढरीपांडे (श्री ल). उच्च शिक्षणासंबंधी विद्यार्थ्यांना काय वाटते ? जीवन विकास. मे १९६५ : १५०

प्रधान (ग प्र). उच्च शिक्षणाची तरतूद : महाराष्ट्र सरकारने पाच वर्षात काय कार्य केले ? किर्लोस्कर. जाने १९७० : ७१

भालेराव (सी एन). उच्च शिक्षणातील झाकलेले खाचखळगे. साधना. २६ जाने १९७१ : ४३

असे आपल्या उच्च शिक्षण संस्थांतून कधी होईल ? साधना. १९ एप्रिल १९७५ : ९

APTE ( B P ). Colleges and post-graduate teaching. Uni News. 10 ( 3 ) Mar 1972 : 16

DABHOLKAR (Deodatta). Striving for height in higher education. J Higher Educ. 6 (1-3) 1980-81 : 41

JOSHI (Ram). Research and education : Linkage in universities. Uni News. 18 (4) 15 Feb 1980 : 83

KHAN ( Q U ). Higher education in India : Some issues. J Higher Educ. 5 ( 2) Autumn 1979 : 167

LULLA (B P). Problems of post-graduate studies in India. Uni News. 7 (3) Mar 1969 : 13

MATHAI (Samuel). Higher education and the university. Uni News. 18 (17) 1 Sep 1980 : 470

NAIR ( K R Ramachandran). Discipline and authority in higher education. Uni News. 18 (20) 15 Oct 1980 : 565

SAXENA (Asha). Students' corner : What is wrong with university education is not the mode of education but mode of teaching. Educ Q. 21 (3) Oct 1969 : 32

चापेकर (ना गो). हल्लीची शिक्षण पद्धती : मूलभूत विचार. चित्रमय जगत. जून १९६७ : २३२

### ८. विद्यार्थी-पालक-शिक्षक संबंध

आढाव (बाबा). एकलव्य–एक दिव्य–बरेचसे सव्यापसव्य. साधना. २६ जाने १९७१ : ६६

कुलकर्णी (जगन्नाथ). मग आम्ही पालकांनी करावे तरी काय? किर्लोस्कर. मार्च १९५९ : ४२

नाईक (व्ही व्ही). विद्यार्थी, प्राध्यापक आणि मार्गदर्शक योजना. उद्यम. सप्टे १९७२ : ५१४

नाडकर्णी (आनंद). आजचा महाविद्यालयीन शिक्षक. साधना. २६ जाने १९७१ : ६२

पांढरीपांडे (श्री ल). उच्च शिक्षणापासून विद्यार्थ्यांच्या मातापित्यांच्या अपेक्षा. जीवनविकास. मार्च १९६५ : ५६

वाघमारे (जनार्दन). विद्यार्थी आणि प्राध्यापक : परस्पर संबंधांची समस्या. समाज प्रबोधन पत्रिका. १८ (१) जाने–फे १९८१ : ४३–४७

विद्यार्थी, शिक्षक व प्राध्यापकांचा अधःपात. महाराष्ट्र. ऑक्टो १९६६ : १

RAMAMURTI (P V). Towards a meaningful teacher-student system. Uni News. 17 (18) 15 Sep 1979 : 473

### ९. शिक्षणाचे माध्यम

ऊर्ध्वरेषे (प्रभाकर). इंग्रजी जाईल तो सुदिन. किर्लोस्कर. दिवाळी अंक १९६७ : ४५

ऊर्ध्वरेषे (प्रभाकर). इंग्रजीची मगरमिठी. साधना. ७ ऑक्टो १९६७ : १३

काळे (शां म). तंत्रविद्येच्या शिक्षणात मायभाषेचा उपयोग. संपदा. ऑ १९६५ : २३

जाधव (रा ग). मराठी परिभाषा : काही प्राथमिक विचार. नवभारत. १९७१

फडणीस (सतीश). विद्यापीठातील शिक्षणाचे माध्यम प्रादेशिक भाषाच असणे इष्ट. महाराष्ट्र टाईम्स. ४ सप्टें १९६८ : ४

बापट (ब वे). महाविद्यालयीन शिक्षण व माध्यम (मुलाखत).साधना. २३ सप्टे १९६७. १५

राजहंस (बा न). इंग्रजी विरुद्ध देशी भाषांचा प्रश्न : १ : केसरी. २२ ऑक्टो १९६७ : ४ लेखांक २. केसरी. २९ ऑक्टो १९६७ : ४

रेगे (मे पु). माध्यमाचा यक्षप्रश्न. साधना. २६ जाने १९७१ : ६९

सहस्त्रबुद्धे (पु ग). चौदा भाषा महाविद्यालयातील शिक्षणाचे माध्यम. हंस. दिवाळी अंक १९६७ : २७

इंग्रजीचे विद्यापीठीय अभ्यासक्रमात स्थान : परिसंवाद. समाज प्रबोधन पत्रिका. फेब्रु १९७१ : ३०

प्रादेशिक भाषेचा शैक्षणिक माध्यम म्हणून स्वीकार साधना. १ मार्च १९६९ : १५

BHOGLE ( S G ). Switch over from Marathi to English as a medium of instructions and examination : A study of students' problems. Marathwada Uni 14 ( 2 ) Sep 1975 : 49

VADEKAR ( D D ). Medium of education in the universities. प्राध्यापक. एप्रिल १९७८ : ९–१२

### १०. सहशिक्षण, स्त्री शिक्षण

सहशिक्षण : एक शैक्षणिक व सामाजिक प्रश्न. मनोहर. जून १९६८ : २–१०

MEHTA (Hansa). Co-education : At what stages and why ? Educ Q. 21 (1) April 1969 : 22

काळे (भा म). सेवासदन ट्रेनिंग कॉलेजच्या दुसऱ्या वर्षांच्या विद्यार्थीनींची एक सामाजिक व आर्थिक पहाणी. अनुराधा. मार्च १९६७ : ४७

कुलकर्णी (विजया). आजचे कॉलेज शिक्षण स्त्रियांना कितपत उपयोगी आहे? माहेर. ऑगस्ट १९६४ : ४६

गोखले (भारती). नवा रंग हवा. साधना. १५ ऑगस्ट १९६९ : ४१ ( तरुणींचे प्रश्न )

दीक्षित (पु य ). स्त्री शिक्षणाची दिशा : काही समस्या. अनुराधा. मार्च १९६५ : १४

बडवे (सुशीला). मराठवाड्यातील मुलींच्या शिक्षणाची समस्या. मराठवाडा. ४ डिसें १९७९

भगत (शमा शमीम). मुस्लिम स्त्रियांना आवाहन : युवकांचे मनोगत. साधना. १ मार्च १९६९ : १४

सरदेसाई (गार्गी). तरुणींची पिढी : काल आणि आज. वसंत. एप्रिल १९६७ : ३

BHANSALI (Kamalini). Education of women in modern India : Some achievements and problems. Educ Q. 21 (1) April 1969 : 36

GOPALARATNAM (Ranga). Life in a women's college. Educ Q. 14 (56) Dec 1962 : 267

KUMAR (Usha A). Job-oriented education for girls : Some practical and theoretical considerations. Educ Q. 27 (3) Oct 1975 : 14

MISRA (Lakshmi). Democratic India and women's education. Educ Q. 13 (50) Summer 1961 : 119

## ११. विद्यार्थी आणि ग्रंथालये

डोळे (ना य). ग्रामीण महाविद्यालयांतील विद्यार्थी व ग्रंथालये. वाचनालय. मार्च १९७३:१४

ग्रंथालय आणि विद्यार्थीवाचक. माणूस. ३० नोव्हें १९७४ : १९

JAKATI (B C) and MUTKEKAR (A S). Place of college libraries in higher education. J. Shivaji Univ (Hum) 11 (17) 1978

MOSS (G D) and GREEN (A M W). Student opinion of the services of a university library. Aslib Proceedings. 32 (4) April 1980 : 161-166

## १२. शिक्षण संस्था

देशमुख (शारदा). शिक्षणसंस्था आणि धार्मिक शिक्षण. स्त्री. फे १९६७ : ५०

बृहन् महाराष्ट्रातील शिक्षणसंस्थांतील सद्यःस्थितीः प्रश्नावलीच्या अनुषंगाने संस्थांकडून आलेली माहिती. मायमराठी. डिसें १९६७ : २२

## १३. भारतीय विद्यापीठे

अकोलकर (ग वि). ज्यष्ठ विद्यापीठांच्या स्थापनेचा भयावह आग्रह? पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या भाषणाचा परामर्श. साधना. १ ऑक्टो १९६६ : ७

ऊर्ध्वरेषे (प्रभाकर). विद्यापीठ कायदे बदलून काय साधणार ? किर्लोस्कर. जाने १९७४:४७

कर्वे (दिनकर धोंडो). बौद्धिक जीवनाला पारखी झालेली भारतीय विद्यापीठे (पूर्वार्ध). मौज. १७ ऑगस्ट १९५८ : ३

कालेलकर (अनंत). महिला विद्यापीठाने हे कार्य हाती घ्यावे. नवा काळ. १ जुलै १९७८

कोठावळे (भय्यासाहेब). परभणी कृषी विद्यापीठ. माणूस. ११ ऑगस्ट १९७३ : २

गजेंद्रगडकर (प्र बा). विद्यापीठ व सामाजिक परिवर्तन. मराठवाडा. ९ फे १९६९ : ३. (अलिगड विद्यापीठ पदवीदान प्रसंगीचे भाषण. अनुवाद : दिनकर बोरीकर).

जोशी (राम). मुंबई विद्यापीठात दोन महत्त्वाचे शैक्षणिक प्रयोग. साधना. २ ऑक्टो १९७९ : २३

देशपांडे (के ना ). विद्यापीठ समाजपरिवर्तनाचे हत्यार होऊ शकेल ! शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. भा शं. भणगे यांची मुलाखत. किर्लोस्कर. ऑक्टो १९७८ : ९

पळशीकर (वसंत). द इंडियन युनिव्हर्सिटी या पुस्तकात डॉ. रॉबर्ट एल गोदिनो यांनी चितारलेले भारतीय विद्यापीठांचे अंतरंग. समाज प्रबोधन पत्रिका. ३ (११) जून १९६६ : १५

भागवत (अ के). संक्रमणावस्थेतील भारतीय विद्यापीठे. समाज प्रबोधन पत्रिका. मार्च १९७३ : ६० (फिलिप आल्टबाक यांच्या 'द युनिव्हर्सिटी इन ट्रांझिशन : ॲन इंडियन केस स्टडी' या पुस्तकाच्या परिचयाच्या निमित्ताने.)

FLETCHER (A L). Role of agricultural universities as an effective instrument of service to the people. Uni News. June 1973 : 4

JAIN (Ajit Kumar). Democratisation of universities and colleges. Teacher Today. 18 (2) Oct-Dec 1975 : 67–70

KAPUR (R K). Student welfare services in Indian varsities. Uni News. 7 (5) May 1969 : 10

PRASAD (K N). Maintenance of academic standards in Indian universities. Uni News. 18 (17) 1 April 1980 : 165

SINGH (Nand K). University and social change. Uni News. 28 (1) 1 Jan 1980 : 3

SHILS (Edward). Government and universities. New Quest. Jan–Feb 1981 : 5

Maharashtra's somnabulant universities (Student unrest in universities.) Economic and Political Weekly. 4 Sep 1971 : 1907

## १४. खुले विद्यापीठ, पत्रद्वारा शिक्षण

अकोलकर (ग वि). खुले विद्यापीठ. किर्लोस्कर ५६ (६८१) ऑक्टो १९७६ : ४७–५१

अनारसे (एस ए). मुक्त विद्यापीठ : एक करून पाहण्यासारखा शैक्षणिक प्रयोग. प्राध्यापक. जून १९७८ : ८

CHAITANYA. Open university. Educ Q. 25 (2) July 1973 : 10

EKAMBARAM (C R). Case for open education. Educ Q. 23 (1) April 1971 : 21

JOSHI (K L). Open university in India. Uni News. Nov 1973 : 4

PADMANABHAN (C B). The viability of open university for India. Educ Q. 23 (1) April 1971 : 25

WASI (Muriel). The open university : UK and India. Educ Q. 23 (1) April 1971 : 6

पुजारे (म अ). मुंबई विद्यापीठाचा कॉरस्पॉन्डन्स कोर्स. मनोहर. फे १९७२ : १६

BENJAMIN (B N). Education by correspondence : A perspective. Educ Q. 29 (3) Oct 1977 : 14

BHATIA (S C). Correspondence education. Uni News. 19 (6) 15 Mar 1981 : 157

MATHUR (V S). Correspondence education : Some emerging problems. Uni News 18 (1) 1 Jan 1980 : 6

MEHRA (Manmohan). Correspondence education. Uni News. 19 (9) 1 May 1981 : 257

## १५. स्वायत्त महाविद्यालये

धामणकर (श्री बा). स्वायत्त महाविद्यालये. महाराष्ट्र टाइम्स. १९ ऑक्टोबर १९७५ : ४

BHATIA (B M). Autonomous Colleges : Prospects and potentialities. Uni News. 5 (6) June 1967 : 3

GUPTA (G S). Autonomy in universities and colleges. Agra Uni Bull. April 1972 : 9-16

PASUPATHINATHAN (K). The autonomous colleges : Will they lead to improvement in higher education ? Educ Q. 27 (4) Jan 1976 : 24

RAJAGOPAL (M V). How's the first autonomous college like ? Uni News. Sep 1972 : 18-19

Workshop on autonomous colleges. Uni News. 12 (10) Oct 1974 : 4

## १६. महाविद्यालये, विद्यार्थ्यांचा सहभाग

आठवले (सदाशिव). नवी महाविद्यालये – कुणाची ? कुणासाठी ? साधना. २६ जाने १९७१ : ३०

एक प्राचार्य. महाविद्यालये निर्मिती व विकास. साधना. २६ जाने १९७१ : २२

ओक (अ वा). प्रशिक्षण महाविद्यालयापुढील काही समस्या. अध्यापक. ऑगस्ट १९६३ : ५५

गोगटे (श्री ब). मराठवाड्यातील कनिष्ठ महाविद्यालयांचा सर्वंकष अभ्यास. शिक्षण आणि समाज. ४ (१) ऑक्टो-डिसें १९८० : २६

ठोके (बा म). महाविद्यालयीन शिक्षणविषयक समस्या व त्यांची सोडवणूक. अध्यापक. सप्टें १९७१ : ८२-८५

देसाई (जीवन). मराठवाड्यातील महाविद्यालयांतील पहाणी : अहवालाबाबत काही प्रतिक्रिया. मराठवाडा. २३ जुलै १९८०

मंगुडकर (मा प). पुण्यातील कॉलेज विद्यार्थी. लेख १–रविवार सकाळ. ६ एप्रिल १९५८ : ५. लेख २ – रविवार सकाळ. २० एप्रिल १९५८

क्षीरसागर (श्री के). कॉलेज जीवनासंबंधी विचित्र कल्पना. तरुण भारत, पुणे. ११ जून १९७२ : २

क्षीरसागर (श्री के). कॉलेज शिक्षणाला झालेला खरा रोग कोणता ? श्रीसरस्वती. दिवाळी अंक १९५८ : ७७

युवा मनाचे स्पंद. साधना. ११ मार्च १९७८ : २ (महाविद्यालयीन निवडणुका आणि जातीयवाद.)

BHANDARKAR (S S). Colleges of tomorrow. Uni News. 5 (4) April 1967

SRINIVASA (K R). A case for experimental colleges. Hindu. 4 July 1978

Report on evening colleges Educ Q. Dec 1962 : 246

कुलकर्णी (द रा) आणि इतर. विद्यापीठाच्या कारभारात विद्यार्थी. मनोहर. डिसें १९६९ : ४३

GANDHI DOSS (L S). Student participation in varsity set-up. Uni News 17 (18) 15 Sep 1979 : 477

GOKAK ( V K). Student participation in varsity affairs : A VC's view. Uni News. 7 (6) June 1969 : 21

MISRA ( Laksmi ). Students and university governance. Uni News. 18 (1) 1 Jan. 1980 : 4

### १७. परीक्षा पद्धती

अकोलकर (ग वि). परिक्षांची सुधारणा. समाज प्रबोधन पत्रिका. सप्टें-ऑक्टो १९७१ : ४७

ऊर्ध्वरेषे (प्रभाकर). परीक्षा फेल झाल्या ! त्या यशस्वी कशा होतील ? किर्लोस्कर. सप्टें १९७२ : ४९

केळकर (द्वा वा). परीक्षा पद्धतीतील क्रांतिकारी बदल. सृष्टिज्ञान. डिसें १९७२ : ३९९

बापट (प्र ग). उंबरठा ओलांडण्यापूर्वी. मनोहर. जून १९६८ : २७ (परिक्षेतील अपयशाची कारणे)

महाबळ (श्री भा). एक्सटर्नल परीक्षा की विद्यार्थ्यांना शिक्षा. मनोहर. फे १९७२ : ३

लेले (विमल). नको ती ट्युटोरिअल्स्...! अध्यापक. सप्टें १९६५ : ८५

वसेकर (सुभाष). परिक्षांचे ढोंग आणि ज्ञानाचे सोंग. साधना. १५ ऑगस्ट १९६९ : २९

DAVE (R H). Reforming written examinations : Some measures. Educ Q. 23 (2) July 1971 : 1

DEO (Pratibha). Revaluatiou at the university examination : Its effects on the results of candidates. J Higher Educ. 6 (1-3) 1980-81 : 83

GOEL (S C). Some educational problems of examination reform. Educ Q. 23 (2) July 1971 : 19

JULKA (Satya Pal). Exams : Self defeating in aims and objectives. Uni News. 16 (10) 16 May 1978 : 933

KAPOOR (Ranga). Examinations : What reforms are needed. Educ Q. 23 (2) July 1971 : 22

MISRA (R G). Educational relevance of external examinations. Educ Q. 31 (2) July 1979 : 27

NATARAJAN (V). Continuous assessment of technician student performance. Educ Q. 23 (2) July 1971 : 41

NATARAJAN (V). Examination reforms in technical education. Educ Q. 25 (1) April 1973 : 27

NAYUDU (M V). Examination reform. Uni News. 12 (2) Feb 1974 : 19

PALSANE (M N) and DESAI (H G) Grading in the examination : An illusory reform. J Higher Educ. 2 (1) Monsoon 1976 : 59

RAO (R Srinivasa) Improving written examinations by Item Analysis. Educ Q. 25 (2) July 1973 : 1

SAXENA (Asha), SOMAN (Shobha) and RAMASWAMY (Sudha). Examination–As I see it : A symposium. Educ Q. 23 (2) July 1971 : 36, 37, 38

SINGH (R P). Public examinations : An exercise in futility. Educ Q. 23 (2) July 1971 : 16

National seminar on examination reforms at Mahabaleshwar. Uni News. 19 (19) 1 Oct 1981 : 539

New assessment plan to replace old examination system at IIT, Bombay. Uni News. 9 (10) Oct 1971 : 15

## १८. सत्र पद्धती

बर्वे (रा का). सत्र पद्धतीचा डोळस पुनर्विचार व्हायला हवा. प्राध्यापक. जुलै १९७९ : १३-१५ (सत्र पद्धतीचे गुणदोष)

AIKARA (Jacob). Internal assessment in higher education. Educ Q. 29 (3) Oct 1977 : 9

NAGARATNAM (S). Semester system : An appraisal. Uni News. 18 (17) 1 Sep 1980 : 469

PALSANE (M N) and KHEDEKAR (A V). Internal assessment : Objective test and final examination. J Higher Educ. 3 (2) Autumn 1977 : 237

PATIL (S V). Internal evaluation in the agricultural universities. Educ Q. 23 (2) July 1971 : 33-35

REDDY (A. Venkata Rami). Attitude of post-graduate students towards internal assessment. Indian Education Review. 13 (3) July 1978 : 16-32

Internal assessment and external examinations. Uni News. 18 (16) 15 Aug 1980 : 440

GUPTA (Arunkumar). Open book examinations in India : Some reflections. Educ Q. 25 (2) July 1973 : 6

## १९. खाजगी शिक्षणवर्ग, परिक्षेतील गैरप्रकार

एरंडे (जयंत). शाळा-कॉलेजपासून दूर...क्लासकडे. मनोहर. ऑक्टो १९७१ : १६

गाडगीळ (सुधीर). खाजगी क्लासेस : समांतर शिक्षण संस्था ? किर्लोस्कर. ६० (७३३) फे १९८१ : ३३

SIKDAR (M N). Mass copying in university examinations. Modern Review. Nov 1972 : 385-387

## २०. अभियांत्रिकी शिक्षण

भोसले (य बा). पुण्यातील तांत्रिक प्रशिक्षणाच्या समस्या. संपदा. ऑगस्ट १९६५ : २९

सेठी (जे डी). तांत्रिक शिक्षण आणि रोजगार. योजना. ७ (२३) १ जुलै १९७९ : १०

CHANDRAKANT (L S). Technical education for national development. Educ Q. 14 (53) Mar 1962 : 21

DUTTA (S K). Problems of technical education. Uni News. April 1973 : 5

NAYAR (B K), RAO (C R S) and GUPTA (S S). Indian students and trainees in scientific and technical fields who went abroad during 1965–1975. J Higher Educ. 4 (2) Autumn 1978 : 171

परांजपे (कमलाकर). तरुण इंजिनिअर्स अधिक कार्यक्षम कसे होतील ? किर्लोस्कर. मार्च १९८० : ४९

GANDHI (A C). Education of the engineers. Uni News. 27 (22) 15 Nov 1979 : 579

## २१. वैद्यकीय शिक्षण

दरख (पुरुषोत्तम). वैद्यकीय महाविद्यालय रौप्यमहोत्सवानिमित्त काही अपेक्षा, काही विचार. मराठवाडा. १५ ऑगस्ट १९८०

दाभोळकर (नरेन्द्र). आजचे वैद्यकीय शिक्षण. साधना. युवकांचे मनोगत विशेषांक. १५ ऑगस्ट १९६९ : ४४

देशपांडे (एस आर). आजचा विद्यार्थी, आयुर्वेद आणि आधुनिक वैद्यक. तरुण भारत, नागपूर. ५ नोव्हे १९६७ : ६

पंडित (बिंदूमाधव). एम. एफ. ए. एम. अभ्यासक्रमातील ठळक दोष. आयुर्वेद पत्रिका. ऑगस्ट १९६५ : ४७

हवालदार (अनिल). संकलक. उंबरठ्यावर. मनोहर. मे १९६८ : ३३ (पुण्याचे मेडिकल कॉलेज, ॲग्रिकल्चरल कॉलेज व इंजिनिअरिंग कॉलेज यांमधील प्रत्येकी वीस विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन तरुण पिढीच्या मनाचा वेध घेण्याचा प्रयत्न.)

## २२. वाणिज्य शिक्षण

FAROOQUEE (Q H). Commerce education in India. Educ Q. 13 (49) Spring 1961 : 8

PRASAD (U S). Commerce education at the cross-roads. Educ Q. 25 (4) Jan 1974 : 20

## २३. विधि शिक्षण

ALLEN (Francis A). Prospects of university law training. J Legal Educ. 29 (2) 1978 : 127–138

KULSHRESTHA (V D). Restructuring Indian legal education : Some Suggestions. J Bar Council of India. 5 (4) Nov 1976 : 305–320

## २४. वास्तुशिल्प शिक्षण

नायक (सुभाष). आर्किटेक्चरच्या पदविका विद्यार्थ्यांचा संघर्ष का ? महाराष्ट्र टाईम्स. २१ जाने १९७८

## २५. अध्यापन शिक्षण

मराळकर (वि श्री). बी. एड्. कोर्स आज व उद्या. अध्यापक. ऑक्टो १९६७ : १११

SRIDHARA ( M V). Significance of B. Ed. course. Uni News. 18 (3) 1 Feb 1980 : 63

## २६. चित्रपट शिक्षण

दीक्षित (प्रदीप शा). मी एक ताडाच्या झाडाखाली बसलेला विद्यार्थी. मनोहर. मार्च १९७२ : ५९ (फिल्म इन्स्टिटयूटमधल्या विद्यार्थ्यांविषयी बरेच गैरसमज आहेत. इन्स्टिटयूट-मधल्या एका मराठी विद्यार्थ्याची ही कैफियत.)

## २७. ग्रामीण विद्यार्थ्यांचे प्रश्न

इंगळे (व न). मराठवाड्यातील ग्रामीण महाविद्यालयांची विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी मार्ग. अजिंठा. १७ जुलै १९७८

कोठारी (डी एस). भारतीय शिक्षण महामंडळाच्या इतिवृत्तावर ग्रामीण शिक्षण दृष्टिकोनातून टाकलेला प्रकाशझोत. आदर्श. मार्च १९६७ : २

खाडे ( ज्ञानेश्वर). दलित युवाशक्तीला आवाहन. साधना. २ ऑक्टो १९७१ : १२

जोशी (श्रीपाद पां). ग्रामीण युवक. साधना. १५ ऑगस्ट १९६९ : ६४

तांबोळी (लक्ष्मीकांत) आणि इतर. खेडेगाव ते महाविद्यालय. मनोहर. जाने १९७२ : ३

दाभोलकर (देवदत्त). ग्रामीण महाविद्यालयीन शिक्षणाचा कस. समाज प्रबोधन पत्रिका. डिसें १९६६ : २७

पंडित (तारा). ग्रामीण युवाशक्तीचा आगळा आविष्कार. साधना. ७ जुलै १९७३ : ११

बिवलकर (राम). ग्रामीण विद्यार्थ्यांचे प्रश्न. माणूस. १४ फे १९७५ : ७

JAIN (S P). New tasks for the rural youth. Kurukshetra. 26 (20) 16 July 1978 : 20

SHUKLA (R K). Problems faced in organizing the rural youth club. Agra Uni Bull. July 1971 : 27-30

VERMA (M R). Academic plight of rural students : Causes and remedies. Educ Q. 26 (2) July 1974 : 29

Self employment for rural youth. Uni News. 17 (18) 15 Sep 1979 : 479

## २८. वर्गीकृत जाती–जमाती/दलित विद्यार्थ्यांचे प्रश्न

पगारे (विजया). दलितांमधीलही आम्ही दलित ! साधना. १५ ऑगस्ट १९७२ : २५

बेडेकर (सुधीर). दलित विद्यार्थी आणि आजचे शिक्षण. युवक एल्गार. नोव्हें १९७२ : ७७

रायकर (सीताराम). दलितांसाठी वेगळे विद्यापीठ ? साधना. २ सप्टें १९७२ : ९

सात दलित विद्यार्थ्यांचे विचार. माणूस. १० एप्रिल १९७६ : १७

AMBA RAO (U). Higher education and occupational mobility among the scheduled caste youth. J Higher Educ. 1 (3) Spring 1976 : 305

CHITNIS (Suma) Education of the scheduled castes. J Higher Educ. 1 (1) Monsoon 1975 : 167

GUPTA (L P). A study of personality syndromes and cognitive characteristics of scheduled castes, backward classes and non–scheduled castes students. J Higher Educ. 4 (3) Spring 1979 : 381

KARLEKAR (Malavika) Higher education and the scheduled castes. J Higher Educ. 1 (2) Autumn 1975 : 179

KHURANA (G). Educational facilities for scheduled castes. Educ Q. 31 (3–4) Oct 1979 and Jan 1980 : 31

RAO (U A) Higher education and occupational mobility among the scheduled caste youth. J Higher Educ. 1 (3) Spring 1976 : 305–314

RASTOGI (S P). Attitudes and beliefs of Harijan students : Notes from research. J Higher Educ. 4 (2) Autumn 1978 : 251

Special assistance for scheduled castes and scheduled tribes students. Bulletin of Higher Education. 5 (1, 2) Sep 1980 : 23

## २९. आदिवासी विद्यार्थ्यांचे प्रश्न

आदिवासी शिक्षण-प्रशिक्षण : अडचणी व उपाय. सेवायोजन अधिकारी, जव्हार. आदिवासी संशोधन पत्रिका. ३ (२) मार्च १९८१ : ५३–५४, ६१

SHARMA (K R). Specific problems of tribal students studying in non-tribal schools. Educ Q. 28 (4) Jan 1977 : 30-32

### ३०. परदेशी विद्यार्थ्यांचे प्रश्न

लेले (विजय). पुण्यातील परदेशी विद्यार्थी. केसरी. १८ जुलै १९७६ : २

MUCORMACK (W). Problems of American scholars in India. Asian Survey. 16 (11) Nov 1976 : 1064-1080

### ३१. शारीरिक शिक्षण, राष्ट्रीय सेवा योजना

वेले (दामोदर). छात्रसेना : सक्तीकडून ऐच्छिकतेकडे. साधना. १५ ऑगस्ट १९६९ : ५३

युवामनाचे स्पंद. साधना. १८ मार्च १९८० : २ (राष्ट्रीय सेवा योजनेचे लातूरमधील कार्य)

कीर्तने (शं रा). शारीरिक शिक्षणात एकसूत्रीपणा पाहिजे. क्रीडा विश्व. नोव्हें-डिसें १९६८ : ६

दामले (शि वि). शारीरिक शिक्षणातील समस्या. मुखपत्र. दिवाळी अंक १९६४ : २७

देशपांडे (ह वा). तरुण पिढीचे अनुशासन व शारीरिक शिक्षण कार्यक्रमाच्या फेरतपासणीची आवश्यकता. आरोग्यमंदिर. दिवाळी अंक १९६० : १५

BHATTACHARJEA (B M). Twentyfive years of N. C. C. Uni News. 12 (3) March 1974 : 7

DHAKAR (B L) N. C. C. in retrospect and prospect. Educ Q. Jan 1974 : 31

JOSHI (K L). N. C. C. and the universities. Uni News. 12 (5) May 1974 : 7

SAPRU (S). N. C. C : Biggest youth movement in India. Uni News. 16 (3) 1 Feb 1878 : 739-740

### ३२. खेळ, गिर्यारोहण

गोसावी (एस् एस्) आणि इतर. मलाही खेळण्याचा हक्क आहे. मनोहर. जाने १९७० : ९

बागुल (देवीदास). मी फी भरतो ... मलाही खेळण्याचा हक्क आहे. मनोहर. डिसें १९६९ : ३

बापट (धनंजय). खेळांच्या मैदानावर. स्त्री. ४७ (५५७) फे १९७७ : ४७

CHOMDE (S D). Organisational problems of varsity sports. Uni News, 7(9) Sep 1969 : 18,

MUJUMDAR (S B). Sports and games in university curriculum. प्राध्यापक. एप्रिल १९७९ : १३ – १४

अनगळ (हेरंब). उंच कडे, बर्फाच्छादित दऱ्या खोल खोल...मनोहर. ऑगस्ट १९७२ : ४०

### ३३. विधायक कार्य, रंगभूमी, महाविद्यालयीन नियतकालिके

देसाई (त शां). विद्यार्थ्यांची रंगभूमी. आलमगीर. दिवाळी अंक १९५८ : ३७

भावे (पुष्पा). युवक रंगमंच : युवत्यांचा रंगमंच ? माणूस. ५ ऑक्टो १९७४ : २१

बोरसे (सदानंद). महाविद्यालयीन नियतकालिके : एक परखड परीक्षण. माणूस. ४ जून १९७७ : १९

जोहारी (गजानन). हात उभारण्यासाठी असतात. मनोहर. जुलै १९६८ : ३८ (आजूबाजूचे विद्यार्थी विध्वंसनात दंग असताना महाराष्ट्राचा विद्यार्थी पुनर्निर्माणात दंग होता.)

पाटील (प्रभाकर). सोमनाथ छावणी, तरुण आणि बाबा आमटे. मनोहर. सप्टें १९६८ २६

पंडित (मधु). प्रेमाच्या ऋचा गाणारी हेमलकसा येथील धडपड. साधना. १२ ऑक्टो १९७४ : ७

बेडेकर (सुधीर). युक्रांदचे आशादायक शिबीर. साधना. २१ नोव्हें १९७० : ७

लिमये (अरुण). दिल्लीचे छात्र–युवा नेता संमेलन. साधना. १४ डिसें १९७४ : ९

लिमये (सुलोचना). वक्तृत्व स्पर्धांची ही विटंबना बस्स झाली. मनोहर. जुलै १९७१ : ३७ (या स्पर्धांमध्ये वक्ते तयार होत नाहीत, पोपटपंची करणारे घोके तयार होतात.)

सप्तर्षी (कुमार). युवकांसाठी श्रम–संस्कार छावणी. मनोहर. फेब्रु १९६८ : ६

सिंगम (वा बा). भूमिसेना : कल्पना आणि कार्यक्रम. साधना. १५ ऑगस्ट १९७९ : १

### ३४. व्यवसाय मार्गदर्शन, नोकरी इ.

आरोळे (पा ज्ञा). पदवीधरांच्या नोकऱ्या. किर्लोस्कर. सप्टें. १९६५ : ५१

कुकडे (नरेन्द्रकुमार). सुशिक्षित बेकारांची समस्या व नियोजन. रोहिणी. दिवाळी अंक १९६४ : ६५

जालान (सूर्यप्रकाश). शिक्षा, डिग्री व रोजगार. योजना. २४ (१, ३) ७ मार्च १९८० : १०

जोशी (य श). इंजिनियरांची बेकारी. उद्यम. सप्टें. १९७२ : ५०२

ठोके (वा ह). सुशिक्षित पदवीधर, प्रशिक्षित बेकार व त्यांचे भवितव्य. अध्यापक. सप्टें १९७७ : ५७-५८

थोरात (एस् पी पी). नोकरी व व्यवसाय शोधण्याच्या स्पर्धेत महाराष्ट्रीय तरुण मागे का पडतात ? नवे जग. एप्रिल १९६४ : ६१

वर्धेकर (अनंत). युवामनाचे स्पंद. साधना. १ एप्रिल १९७८ : २ (सुशिक्षित तरुणांची बेकारी. एक चिंतन.)

सहस्त्रबुद्धे (रमेश). विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळवून देण्यासाठी महाविद्यालयांना काय करता येईल ? मनोहर. मे १९७२ : ९

AGARWAL (Virendra). Education needs to be job–oriented. Free Press Journal. 31 July 1978

JOSHI (Navin Chandra). Delinking degrees from jobs. Educ Q. 31 (1) Jan 1981 : 22

MISRA (K P). An approach towards educated unemployment. Educ Q. 27 (3) Oct 1975 : 12

NAYAR (D P). Challenge of unemployment to the educational system. Educ Q. 22 (4) Jan 1971 : 1

कुलकर्णी (एन् व्ही). सर्वांगीण तयारी करा. यश तुमचेच आहे. मनोहर. जुलै १९७१ : ५१

जोशी (सु ना). एस्. एस्. सी. (टेक्). पुढे काय ? सप्तर्षी. दिवाळी अंक १९६७ : ४

नाईक (व्ही व्ही). विद्यार्थी, प्राध्यापक आणि मार्गदर्शक योजना. उद्यम. सप्टें १९७२ : ५१४

नित्सुरे (य गो). एस्. एस्. सी. नंतरच्या शिक्षणाच्या विविध वाटा. किर्लोस्कर. एप्रिल १९५९ : ६५

### ३५. शुल्क, शिष्यवृत्त्या, सवलती

SHAH (A B). Rationalisation of college fees. Indian Express. 26 Nov 1978

चिटणीस (म भि). दलित जाती-जमाती, शिष्यवृत्त्या आणि उच्च शिक्षण. अस्मितादर्श. दिवाळी अंक १९७५ : १२१

वाळंबे (मो रा). शैक्षणिक सवलती : महाराष्ट्र सरकारने पाच वर्षात काय कार्य केले ? किर्लोस्कर. जाने १९६७ : ७१

RAO (B V Ramana). Students with scientific talent : Provision of better facilities for their education. Educ Q. 26 (1) April 1974 : 6

WASI (Muriel). Scholarships and national integration. Educ Q. 21 (4) Jan 1970 : 25

### ३६. दुष्काळग्रस्त विद्यार्थी

आमटे (बाबा). लोकबिरादरी : एक विधायक झुंज. दुष्काळग्रस्त तरुणाईला आवाहन आणि आव्हान. साधना. १३ जाने १९७३ : ५

सुराणा (पन्नालाल). दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांचा प्रश्न. साधना. २१ ऑक्टो १९७२ : ५

RAMAMURTHY (M S). Drought in Maharashtra ( its impact on the educational institutions.) Uni News. Mar 1973 : 15

Drought hits students in Maharashtra. Uni News. 11 (2) Feb 1973 : 6

### ३७. लैंगिक शिक्षण

मोडक (उषा). शाळा-कॉलेजांतून मुला-मुलींना लैंगिक शिक्षण द्यावे काय ? (मुलाखत). श्री. ३ जाने १९६८ : ११

ROY (Biswanath). Sex education : A social psychological analysis. Educ Q. 26 (1) April 1974 : 18

SARASWAT (Renuka). Sex education : How a college girl looks at it. Educ Q. 26 (1) April 1974 : 21

### ३८. वसतिगृहे

पवार (अमरजा). लेडीज होस्टेल्स. स्त्री. ४७ (५५७) फेब्रु १९७७ : ३७

बाळ (विद्या). वसतीगृह : तेव्हा आणि आता. स्त्री. ४४ (५२२) मार्च १९७४ : २७

बाळ (विद्या). आम्ही वसतीगृहातल्या मुली. मनोहर. ऑक्टो. १९६८ : ७-१०

### ३९. स्पर्धा परीक्षा

जोशी (सु वि). बुद्धिमत्तेत आपण मुळीच कमी नाही. आडवा येतोय तो आपला न्यूनगंड. मनोहर. एप्रिल १९७१ : ३५

दामले (शि वि). स्पर्धात्मक परीक्षा : उदासीन विद्यापीठे, दिशाहीन विद्यार्थी. मनोहर. मे १९७२ : २३

### ४०. परदेशात शिक्षण

टिकेकर (श्री रा). परदेशात शिक्षण घेण्यासाठी. किर्लोस्कर. मे १९५९ : ६७

पळसुले (सदाशिव). परदेशात जाऊन आलेले विद्यार्थी देशद्रोही आहेत काय ? (अमेरिकेत वास्तव्य करून आलेल्या तरुण-तरुणींच्या खास मुलाखती.) आंदोलन. दिवाळी अंक १९६४ : ८२

MEHTA (Parin C). Brain drain : Causes and remedies. Amrita Bazar Patrika. 2 Dec 1979

### ४१. विद्यार्थी संघटना

जोग (अनंत). भारतातील युवक संघटना : एक विचार. निर्धार. दिवाळी अंक १९७१ : ४२

पेंडसे (वि वि). युवक संघटनांचे महत्त्व ओळखा. मनोहर. जाने १९६७ : ३

युवक क्रांति दल : अन्यायाविरुद्ध ठाम उभी रहाणारी तरुणांची संघटना. उत्तम कथा. ऑगस्ट १९७३ : १३

युवक संघटनांच्या कार्याची दिशा : काही विचार. साधना. १६ नोव्हें १९६८ : २३

युवक क्षेत्रात कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संघटनांसाठी सहाय्य-योजना. शिक्षण आणि समाज १ (४) जुलै-सप्टें १९७८ : २७५

OOMMEN (T K). Role of student voluntary organizations in Indian universities. New Front in Educ. 1 (1) May 1971 : 5–11

**४२. युवक मन, असंतोष, बेशिस्त**

जोशी ( श्री ज ). विद्यार्थीवर्गाच्या बदलत्या अभिरूची. एकता. ऑगस्ट १९७५ : ३३–३६

आठल्ये (श्रीकांत). मुंबईची युवाशक्ती. लोकप्रभा. १३ एप्रिल १९७५ : २४

एकवीस तरुण. विद्यार्थी युवक चळवळीची दिशा कोणती ? मागोवा. जुलै १९७२ : ५७

करंदीकर (शैलजा). विद्यार्थी विश्वातील धुमसता प्रक्षोभ : १ : दोन पिढयात अव्याहत चालत आलेले अंतर. साधना. ६ डिसें १९६९ : ९

करंदीकर (शैलजा). विद्यार्थी विश्वातील धुमसता प्रक्षोभ : २ : विद्यार्थी असंतोषाचे विविध स्वरूप. साधना. १३ डिसें १९६९ : ७

कर्वे (दिनकर धोंडो). विद्यार्थ्यांच्या बहि:शाल चळवळी. केसरी. १७ ऑगस्ट ५८ : ७

कामत (गो स). युवाशक्तीचा उपयोग. साधना. १५ ऑगस्ट १९७९ : ३९

कावळे (श्री र). युवकमन अस्वस्थ आहे. मनोहर. डिसें १९६६ : २

गोरे (ना ग). युवक जेव्हा प्रतिक्रान्तिवादी होतात ! साधना. १४ फेब्रु १९८१ : ३

जोशी (प्र न). विद्यार्थी दंगलखोर का होतात ? वसंत. दिवाळी अंक १९६६ : १६३

पवार (मुरलीधर). विद्यार्थी आणि क्रांती. साधना. ४ एप्रिल १९७० : ७

राईलकर (जयंत). हिप्पी : अशांत व असंतुष्ट तरुण पिढी. मनोहर. ऑगस्ट १९६८ : २६

राजगडकर (नेताजी). हा पृथ्वीच्या पोटातील प्रक्षोभ आहे. साधना. १५ ऑगस्ट १९६९ : ४६ (युवक असंतोषावरील लेख)

शाह (क्रांती). युवकांचे राज्य युवकांसाठी मात्र नाही ! लोकसत्ता. ४ डिसें १९७९

सावंत (म धा). आहेत कुठे हे क्रांतीकारी तरुण ? साधना. १५ ऑगस्ट १९६९ : ४३

विद्यार्थी व आंदोलन : प्राध्यापक आणि विद्यार्थी यांचे विचार. प्रभु प्रभात. दिवाळी अंक १९७० : ११

ACHUTHAN (R). Student youth movement and Gandhian non-violent revolution. Gandhian Thought. July-Aug 1971 : 13-17

ALLERBECK (K R). Some structural conditions for youth and student movements. International Social Science Journal. 24 (2) 1972

ALTBACH (P G). Transformation of the Indian student movement. Asian Survey. 6 (8) Aug 1966 : 448–460

DUA ( M R ). Student unrest demands change in attitude. Political and Economic Review. 1 ( 34 ) 28 Oct 1970 : 5-6

GANDHI ( Kishore ). Student unrest and university response. Women on the March. July 1972 : 10-12

HALLEN (G C). Sociological study of the nature, causes and cure of student unrest in India. Agra Univ Bull. Oct 1972 : 5-24

HAZARIKA (Sanjoy). Campuses in ferment. Himmat. 14 (25) April 1978 : 7, 10

HOGGART (Richard). 1968-1978 Students' movement and its effects in universities. Political Quarterly. 50 (2) April-June 1979 : 172

JOSHI (A C). On student unrest. Uni News. 5 (2) Feb 1967 : 3

SHARMA (S L). Political orientation and protest participation : A comparative study of activist student leaders in two Indian universities. Political Sc. Review. 17 ( 1-2 ) Jan-Mar & April-June 1978 : 49-61

SINGH (Amrik). The emerging student power in India. Uni News. 12 ( 6 ) June 1974 : 4

Discontent among students : Govt. measures. Uni News. 12 ( 5 ) May 1974 : 12

Our unhappy students. (Editorial) Free Press Journal. 3 Dec 1978

उषादेवी. विद्यार्थ्यांमधील वाढती बेशिस्त आणि शिक्षणाची दिशा. ललना. डिसें. १९६४ : २९

चंदावरकर ( ग ल ). विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीला कोण जबाबदार? विद्यार्थी की वडील माणसे ? विविध वृत्त. ३० मार्च १९५८ : २

PILLAI (G B). Is there student indiscipline. Yuva Bharati. 2 (2) Sep 1974 : 15-20

### ४३. सर्वसाधारण प्रश्न

अकोलकर (ग वि). युवक विकासाच्या काही वाटा व सद्य:स्थिती. भारतीय शिक्षण. मे–जून १९७७ : ९७–१२७

अनेक तरुण, तरुणी. आजचा अशांत, अस्वस्थ तरुण. मनोहर. नोव्हें १९६८ : ५६

अनेक लेखक. विकासोन्मुख देशांतील युवकांची जबाबदारी (परिसंवाद). साधना. दिवाळी अंक १९६५ : ५५

अवचट (अनिल). क्रांतीचा अग्रदूत युवक. मनोहर. नोव्हें १९६८ : ९०

आमटे (बाबा). विकासोन्मुख देशातील युवकांची जबाबदारी : ४ : साधना. दिवाळी अंक १९६५ : ६५

ऊर्ध्वरेषे (प्रभाकर). विकासोन्मुख देशातील युवकांची जबाबदारी : २ : साधना. दिवाळी अंक १९६५ : ६०

अंबिके (रं. नी.). विकासोन्मुख देशातील युवकांची जबाबदारी : १ : साधना. दिवाळी अंक १९६५ : ५७

काळे (अनिल). शहरी युवक आणि हरिजन शेतमजूर : 'ग्रामायन'चा एक उपक्रम. माणूस. ७ डिसें १९७४ : ९

गरुडे ( दिनकर शं). युवामनाचे स्पंद : विषवृक्षाची फळे. साधना. २८ जुलै १९७९ : ३ (आजच्या तरुणाची दिशाहीनता.)

गोरे (ना ग). आमचे विद्यार्थी असे का वागतात ? आंदोलन. दिवाळी अंक १९६४ : ११६

घोडगावकर ( प्रतिभा ). तरुण मुलांना वाचा फुटते तेव्हा...स्त्री. ४८ (५६५) १९७७ : २९

जमदग्नी (न शं). चांगले विद्यार्थी का वाया जातात ? रुद्रवाणी. दिवाळी अंक १९७१ । ४७

जोग (शकुंतला ). गंजलेल्या युवाशक्तीला आव्हान. साधना. १ एप्रिल १९७८ : २१

जोशी ( राम ). विकासोन्मुख देशातील युवकांची जबाबदारी : ५ : साधना. दिवाळी अंक १९६५ : ६८

तपस्वी (मो ग). युवा भारती. मनोहर. जुलै १९६९ : १३ (तरुणांचा तरुणांसाठी आणि तरुणांनीच चालविलेला असा अभिनव प्रयोग)

दाभोलकर (देवदत्त). विकासोन्मुख देशातील युवकांची जबाबदारी : ३ : साधना. दिवाळी अंक १९६५ : ६३

देशपांडे (प्रशांत). भारतीय विद्यार्थी : एका पाश्चात्य मित्राच्या दृष्टिकोणातून. साधना. ५ एप्रिल १९७५ : ९

देशमुख (मा गो). मराठवाड्यातील विद्यार्थी. पंचशील. दिवाळी अंक १९६० : ५

परांजपे (शैला). तरुण मुलांना वाचा फुटते तेव्हा...स्त्री. ४६ (५४८) मे १९७६ : ५३

पवार (मुरलीधर). युवकांचे मनोगत : युवक क्रांतीची दिशा, काही विचार. साधना. ८ मार्च १९६९ : १४

बापट (भा रा). युवक समस्या अहवाल (कारीगर : युवक समस्या युवक विकास अहवाल १९७१–७२). समाज प्रबोधन पत्रिका. जुलै-ऑगस्ट १९७२ : ९४

बाळ (विद्या). तरुण मुलांना वाचा फुटते तेव्हा... स्त्री. ४६ (५४५) फेब्रु १९७६ : ४२

बेडेकर (सुधीर). युवक आणि राजकीय पक्ष. साधना. १५ ऑगस्ट १९६९ : २४

भानगावकर (सुलभा). तरुण मुलांना वाचा फुटते तेव्हा... स्त्री. ४७ (५५८) मार्च १९७७ : ५५

भालेराव (क भा). आजचे युवक आणि सहकारी चळवळ. मनोहर. जुलै १९६९ : २९

भावे (स शि). आजचा महाविद्यालयीन विद्यार्थी : आशास्थान की जबाबदारी ? ('द कॉलेज स्टुडंट : अवर होप'चे पुस्तक परीक्षण). समाज प्रबोधन पत्रिका. ५ (२३) ऑ-सप्टें १९६८ : ३९

मराळकर (वि श्री). या विद्यार्थ्यांना झाले आहे तरी काय ? अध्यापक. नोव्हें १९६६ १२९

महाडेश्वर (शशिकांत). तरुण आणि शिक्षण क्षेत्रातील धडपड. साधना. १५ ऑगस्ट १९६९ : १६

रहिमतपुरे (मुमताझ कासिम). मुस्लिम युवकांची ही केविलवाणी स्थिती ! साधना. १५ ऑगस्ट १९६९ : ३७

शाह (नीता). आजचा युवक : एक दृष्टिकोण. साधना. १८ नोव्हें १९७८ : १९

शिंदे (वसंत). युवक कामगारांच्या समस्या व अपेक्षा. साधना. २१ जून १९६९ : १५

सुभेदार (कमलाकर). आजच्या समाजाचे हे जिवंत बळी ! साधना. १५ ऑगस्ट १९६९ :९ (रात्र शाळेतील तरुणांचे प्रश्न)

AMRIK SINGH. Youth activity in the universities. Uni News. 15 (6) 16 Mar 1977 : 139-140

KHAN (M Z) and SINGH (D R). College youth, their courses of study and their view of society. J Higher Educ. 4 (1) Monsoon 1978 : 57

KAKKAR (S B). Notes from research : Student attitudes towards college vis-a-vis university. J Higher Educ. 4 (2) Autumn 1978 : 258

KARANDIKAR (S). Study of the problems and conditions of college students in the Poona University area. Research Bulletin. 8 (3 and 4) Sep-Dec 1978 : 10-16

KULKARNI (P K). Caste amongst the college students. Report on a research survey. Marathwada Univ J. (15 and 16) 1976-77 : 69-78

SANGHVI ( H S). Youth activity in university. Uni News. 15 (15) 1 Aug 1977 : 404, 412

SHARMA ( G R). Notes from research : Adjustment problems of non-professional college students. J Higher Educ. 4 (2) Autumn 1978. 262

SURAJ BHAN. Students and management of colleges. Uni News. 10 (1) Jan 1972 : 15-17

### ४४. विद्यार्थ्यांचे सामाजिक प्रश्न

कुलकर्णी (अनंत). युवकांचे मनोगत : आपली पिढी. साधना. १७ एप्रिल १९७१ : १५

कुलकर्णी (रोहिणी). सामाजिक परिस्थिती आणि आम्ही युवती. साधना. १५ ऑगस्ट १९६९ : २७

चाफेकर (विलास). सामाजिक जाणीव प्रकल्प. विद्याभारतीच्या नव्या अभिक्रमासंबंधीचे एक टिपण : गोषवारा. साधना. ३ जाने १९८१

टेंगशे (मेधा). बुद्धिवाद अंधश्रद्धा : तरुण पिढीचा 'त्रिशंकू'. साधना. २१ जुलै १९७९ : १५

पिंगळे (विजया). दैववादाच्या अंधारात आमचे चाचपडणे. साधना, १५ ऑगस्ट १९६९ ३६ (तरुणींच्या सामाजिक जाणीवा व धार्मिक श्रद्धा.)

सामाजिक समतेसाठी लढणारे जवळबनचे तरुण. साधना. १४ डिसें १९७४ : १५

AUTI (V R) and PAWAR ( S N) Social and political consciousness among the post-graduate untouchable students of the Shivaji University. J Shivaji Univ H. 6 (2) 1973 : 27-36

RAJAGURU ( G ), SATPATHY ( C ) and DAS ( P C). Academic achievements of students : Impact of parents and socio-religious factors. Educ Q. 26 ( 4) Jan 1975 : 41

ROSENMAYR ( L ). New theoretical approaches to sociological study of young people. International Social Science Journal. 24 ( 2 ) 1972

पतके (पु शं). रॅगिंग : एक परिसंवाद. बियाँड फ्रेंडशिप. ७ जाने १९७४ : ४७-५०

■ ■

# विषय सूची


अर्थार्जन ५४,६८,१८४
अभ्यासक्रम नियोजन २७१-२७२
अभ्यासक्रमाचे विश्लेषण २६८-२८४, २८५-२८८
अभ्यासाव्यतिरिक्त कार्यक्रम १००, १२२-१३२,१५६
अनुसूचित जातींचे विद्यार्थी १३८-१४७
(पहा, मागास वर्गीय विद्यार्थी)
अपंग विद्यार्थ्यांचे प्रश्न २२९-२३५
अभियांत्रिकी विद्यार्थी २४६-२४८
आंदोलने १९७-२०९
आहार १६४
आरोग्य १६४,२१५,२३२,२४९-२५९
आरोग्य प्रशिक्षण २५२
उच्चस्तरांवरील अभ्यासक्रम २६८-२८४
इ. बी. सी. ६२
एल्फिन्स्टन महाविद्यालय ३-४
एन्. एस्. एस्. १३,५३,७६,१३०
एन्. सी. सी. १३,५३,१३०
औपचारिक व अनौपचारिक शिक्षण १८५
अंध विद्यार्थी २३६-२४१
कर्मचारी, विद्यापीठीय ४२-४३,९८-९९,११३
महाविद्यालयीन ४२-४३,९८-९९
प्रशासकीय ५८,१३४
कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थी ८५-९५
कॅपिटेशन फी १९८-१९९
कॉपी १९७-१९८
गटवार प्रश्न योजना ४८
गाइड्स (पीएच्. डी.) ११४-११६,११९
ग्रंथालये ५०,९९,११२
ग्रामीण विद्यार्थी ४६-८४
व इंग्रजी भाषा ४९,६३,७८
व मराठी साहित्य ४९
व सामाजिक बांधिलकी ५१
व श्रद्धा ५३
शहरी महाविद्यालयातील ५७-८४
जेवणाचा प्रश्न ७२,७३,१०५
निवास व्यवस्था १४८
नोकरी करणारे विद्यार्थी १७५-१८४
(पहा, बहिःस्थ : विद्यार्थी )
पदवीदान समारंभ ४२
पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या समस्या ९६-१०२; १०३-१०८
पालक १२५,१४९,२३०
पोशाख स्वातंत्र्य १९८
बहिःस्थ : विद्यार्थी १७५-१८४
व विषय निवड १७८
(पहा, नोकरी करणारे विद्यार्थी)
बुक बँक ५९-६०
बेकारी १७-१८
भावनिक प्रश्न २६६-२६७
महाविद्यालयीन प्रवेश ४०
मागासवर्गीय विद्यार्थी ६१-६३,१०६-१०७, १३३-१३७,१४८-१४९,१९५, २२५-२२६

आणि वाणिज्य शिक्षण १५२-१५५
आणि त्यांचे शिक्षक १५५-१५६
आणि शिक्षण प्रक्रिया १५६-१५९
(पहा, अनुसूचित जातींचे विद्यार्थी)
मित्र-मैत्रिणी १३४,१५१,१८२,२१६-२१७
मुसलमान विद्यार्थी २९२-२९७
राखीव जागा ४१
लैंगिक प्रश्न २६०-२६७
वसतिगृहे ७१-७२,९०,२२५-२२८,
२५७-२५८
(पहा, वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे प्रश्न)
वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे प्रश्न २१०-२२४
(पहा, वसतिगृहे)
वाचनाच्या सवयी १३६
विद्यार्थी कल्याण २८९-२९१
विद्यार्थी विकास २८९-२९१
विद्यार्थी-विद्यार्थिनी संबंध १००-१०१
विद्यार्थी प्रतिनिधी १२३-१२४
विद्यार्थिनींचे प्रश्न ५५,१६०-१७४
विद्यार्थिनी
व भावी जीवनासंबंधी निर्णय १६४
व उच्च शिक्षण १६५
व प्राध्यापक १७०-१७१
व पालक १७२
विद्यार्थी-संख्या १९४-१९५
विद्यार्थी-संघटना २०६
विद्यार्थी
व राजकारण १९,२०८
व प्रशासकीय अडचणी २२-४५
व मानसिक स्वास्थ्य १३०
विवाहित विद्यार्थ्यांचे प्रश्न ६२
वैद्यकीय तपासणी २५४-२५६
वैद्यकीय विद्यार्थी २४२-२४५
व्यक्तिमत्त्व समायोजन १४३
शिक्षणक्षेत्रातील मूलभूत समस्या ८-९
शिक्षक-विद्यार्थी संबंध ७४-७५,१०७,
१८७-१९६
शिक्षणाचे माध्यम १०६,२४२-२४३
(पहा, ग्रामीण विद्यार्थी व इंग्रजी भाषा)
शिक्षणाची उद्दिष्टचे १६५, १८५-१८७
शिष्यवृत्ती ३१,१२०,१३४,२०१
शैक्षणिक मार्गदर्शन ९९
संशोधन करणारे विद्यार्थी १०१-१२१
संयोजक-प्राध्यापक १२५-१२६
संस्था-चालक १२६-१३५,१९१-१९२,२०७
सत्रपद्धती १५७
सामाजिक जाणीव १३०
स्टुडंट एड फंड ५५

■ ■

## लेखक–परिचय

- **श्री. दत्तात्रय पांडुरंग आपटे**–कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे–४११००४
- **श्री. किशोर दिगंबर करंदीकर**–कार्यालय अधीक्षक, टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे ४११०३०
- **डॉ. सुमन प्रभाकर करंदीकर**–प्राध्यापक, आदर्श शिक्षण महाविद्यालय, पुणे–४११००४
- **श्री. चंद्रशेखर डी. कापडणीस**–अमेरिकन विश्वविद्यालयात पीएच्. डी. चे विद्यार्थी, द्वारा मानसशास्त्रविभाग, पुणे विद्यापीठ, पुणे–४११००७
- **प्रा. शिवराम श्रीधर काळे**–बँकिंग-विभाग प्रमुख, बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय, पुणे–४११००४
- **श्री. मोहम्मद खडस**–समाजवादी चळवळीतील एक कार्यकर्ते, मुंबई
- **डॉ. संजीव शरश्चंद्र गोखले**–रहिवासी रजिस्ट्रार, संचेती हॉस्पिटल, पुणे–४११००५
- **डॉ. श्रीधर बळवंत गोगटे**–सहसंचालक, विद्याभारती (इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन), कोथरूड, पुणे–४११०२९
- **डॉ. मुकुंद कृष्णाजी गोडबोले**–खाजगी वैद्यकीय व्यवसाय, गुरुधाम, ७२२ (अ ब), लक्ष्मी-पार्क कॉलनी, पुणे–४११०३०
- **श्री. विलास चाफेकर**–समन्वयक, विस्तारविभाग, विद्याभारती (इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन), कोथरूड, पुणे–४११०२९
- **श्रीमती शालिनी गोविंद जोगळेकर**–निवृत्त प्राध्यापक, टिळक शिक्षण महाविद्यालय, 'हेमलता' ९१७/१९ क शिवाजीनगर, फर्ग्युसन कॉलेज रस्ता, पुणे–४११००४
- **प्रा. अनंत नरहर जोशी**–प्राध्यापक, शिक्षण विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–४१६००४
- **डॉक्टर वामन नारायण तुंगार**–संशोधक, किर्लोस्कर कन्सल्टंटस्, पुणे–४११००४
- **प्रा. देवदत्त अच्युत दाभोलकर**–निवृत्त कुलगुरु, पुणे विद्यापीठ; प्राध्यापक, विद्याभारती (इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन), कोथरूड, पुणे–४११०२९
- **प्रा. अरुण दीक्षित**–प्राध्यापक, गोगटे महाविद्यालय, रत्नागिरी, महाराष्ट्र.
- **प्रा. गोपाळ दुखंडे**–प्राध्यापक, महाविद्यालय, भिवंडी, जि. ठाणे, महाराष्ट्र.
- **प्रा. हेमंत देवस्थळी**–प्राध्यापक, नेस वाडिया वाणिज्य महाविद्यालय, पुणे–४११००१

- **डॉ. चंद्रशेखर गंगाधर देशपांडे**–प्राध्यापक, प्रायोगिक मानस-शास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे–४११००७
- **डॉ. विश्वनाथ भालचन्द्र देशपांडे**–प्राध्यापक, मॉडर्न कॉलेज, पुणे–४११००५
- **श्री. वि. रा. देशपांडे**–प्राचार्य, खुस्रो वाडिया इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे–४११००१
- **डॉ. शशिकांत शां. देशपांडे**–प्राध्यापक, बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय, पुणे–४११००४
- **प्रा. पंडित भीमराव टापरे**–प्राध्यापक, किसन वीर महाविद्यालय, वाई, जि. सातारा, महाराष्ट्र.
- **डॉ. सतीश श्रीपाद ठिगळे**–प्राध्यापक, भूशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे–४११००७
- **डॉ. रमेशचंद्र कृष्णाचार्य परळकर**–प्राध्यापक, विवेकानंद कला व सरदार दलीपसिंग वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद (डेक्कन), महाराष्ट्र.
- **श्रीमती रेवती पानसे**, विद्याभारती ( इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन ), कोथरूड, पुणे-४११०२९
- **डॉ. भालचंद्र दिनकर फडके**–प्राध्यापक, पुणे विद्यापीठ, पुणे–४११००७
- **डॉ. यशवंत दिनकर फडके**–महात्मा गांधी अध्यासनाचे प्राध्यापक, पुणे विद्यापीठ, पुणे–४११००७
- **डॉ. मो. वि. भाटवडेकर**–प्राध्यापक, नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ बँक मॅनेजमेंट, नेपियन सी रोड, मुंबई–४०००८१
- **डॉ. शांताराम गजानन महाजन**–प्रभारी उपग्रंथपाल, जयकर ग्रंथालय, पुणे विद्यापीठ, पुणे–४११००७
- **श्रीमती शांता मालेगावकर**–विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कार्यकर्त्या, १३ संगम नगर, बिबवेवाडी, पुणे–४११०३७
- **प्रा. अशोक रंगारी**–प्राध्यापक, मिलिंद महाविद्यालय, औरंगाबाद (डेक्कन), महाराष्ट्र.
- **डॉ. उल्हास विष्णु लुकतुके**–सल्लागार मनोविकारतज्ज्ञ, हिमांशु अपार्टमेंट्स, शीला-विहार कॉलनी, पौड रस्ता, ५० एरंडवणा, पुणे–४११००४
- **श्री. विलास वाघ**–प्रकल्प अधिकारी, प्रौढ शिक्षणयोजना, पुणे विद्यापीठ, पुणे–४११००७
- **डॉ. प्रतिभा प्रभाकर बीरकर**–प्राध्यापक, आदर्श बहुव्यापी शिक्षण महाविद्यालय, पुणे–४११००४
- **डॉ. व. झा. साळी**–संशोधन अधिकारी, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे–४११०१०

REFBK-0023906
२८८२
२३७०६
निबंध ११।५८३

## उच्च शिक्षणाची चिंताजनक स्थिती ...

... अनेक समस्यांमुळे उच्चशिक्षणाची परिस्थिती अगदी गोंधळल्यासारखी झाली आहे. गुणवत्ता आणि संख्या यांचा तोल कसा राखायचा हा यक्षप्रश्न आहे. राष्ट्रीय विकासासाठी आवश्यक असे दर्जेदार मनुष्यबळ निर्माण करणे साधावयाचे असेल तर राष्ट्रीय समस्यांना सामोरे जाणारे शैक्षणिक वातावरण संस्थांमधून निर्माण होणे आवश्यक वाटते. जुनी उद्दिष्टे, जुने अभ्यासक्रम, जुन्या अध्ययन-अध्यापनपद्धती, जुन्या कालबाह्य परंपरा, टाकून देऊन एकूण सर्व कार्यक्रमाची नवीन मांडणी करणे, विद्यापीठे आणि महाविद्यालये यांची पुनर्रचना करणे आणि यासाठी संबंधित शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि शैक्षणिक पदाधिकारी या सार्‍यांच्या दृष्टिकोनात मूलगामी बदल घडवून आणणे, अत्यावश्यक वाटते. वरील गोष्टींची जाणीव आणि भरपूर असमाधान असूनही नवीन प्रयोग होत नाहीत. या गोष्टीमुळेच उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील परिस्थती अधिक चिंताजनक वाटते.